लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाचा
विनियोजन लेखे यावरील

पंचविसावा अहवाल



(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास
दिनांक ऑगस्ट, २०१७ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
ऑगस्ट, २०१७

लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाचा
विनियोजन लेखे यावरील

पंचविसावा अहवाल

एचबी १६१८—१

लोकलेखा समिती
२०१५-२०१६

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(२१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

*(२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

**(२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(२४अ) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रविंद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

---

* श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिनांक २८ सप्टेंबर २०१६ रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

** श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स. यांची दिनांक ५ ऑगस्ट २०१६ रोजी उप सभापती, विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ३१ ऑगस्ट २०१६ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-२०१३ च्या विनियोजन लेख्यांवरील आणि तत्संबंधीच्या लेखापरीक्षा अहवालासंबंधी लोकलेखा समितीचा पंचविसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने सन २०१२-२०१३ या वर्षाच्या महाराष्ट्र शासनाच्या विनियोजन लेख्यांमध्ये नमूद केलेल्या इतर बाबींवरील खर्चाच्या नियंत्रणाबाबत विचार केला असून त्यानूसार समितीचा हा पंचविसावा अहवाल विधानमंडळाला सादर करण्यात येत आहे.

समितीने दिनांक २१ सप्टेंबर २०१६, १३, २० व २५ ऑक्टोबर २०१६, दिनांक १६ व २९ नोव्हेंबर २०१६, दिनांक ४, १८ व २४ जानेवारी २०१७ व दिनांक ३१ मे २०१७ रोजी अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महसुल (मदत व पुनर्वसन) विभाग, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, विधी व न्याय विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, गृहनिर्माण विभाग, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास), महिला व बालविकास विभाग यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरिक्षक-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरिक्षा दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १३ जुलै व ८ ऑगस्ट २०१७ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारूप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन :
मुंबई/नागपूर,
दिनांक ८ ऑगस्ट २०१७.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
(१)	अतिरिक्त खर्च नियमानुकुल करणे—अतिरिक्त खर्च सन २०१२-१३	१
(२)	गृह विभाग (अनुदान क्र. बी-२, बी-१०)	४
(३)	पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय (पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय) विभाग (अनुदान क्र. डी-९, डी-१०, डी-११)	६८
(४)	सार्वजनिक बांधकाम विभाग (अनुदान क्र. एच-३, एच-४, एच-५, एच-६, एच-७, एच-८ व एच-९)	९७
(५)	विधि व न्याय विभाग (अनुदान क्र. जे-१)	२१८
(६)	ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग (अनुदान क्र. एल-७)	२४७
(७)	गृहनिर्माण विभाग (अनुदान क्र. क्यू-३)	२५३
(८)	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (अनुदान क्र. एस-४)	३०२
(९)	महिला व बालविकास विभाग (अनुदान क्र. एक्स-२)	३३३

अतिरिक्त खर्च नियमानुकूल करणे

सन २०१२-२०१३

या अहवालामध्ये समितीने इतरत्र व्यक्त केलेल्या अभिप्रायास अधीन राहून खाली दर्शविण्यात आलेला जादा खर्च नियमानुकूल करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजण्यात यावेत.

खालील प्रकरणामध्ये दत्तमत वा भारित अनुदान/ विनियोजनाच्या रकमेपेक्षा महसुली / भांडवली लेख्यावरील खर्चाची रक्कम अधिक असल्याचे सन २०१२-२०१३ च्या लेख्यावरुन दिसून येते. :-

(रूपये हजारात)

अ.क्र.	**अनुदान/विनियोजनाचे नाव**	**एकूण अनुदान/ विनियोजनापेक्षा झालेला अधिक खर्च (दत्तमत)**	**एकूण अनुदान / विनियोजनापेक्षा झालेला अधिक खर्च (भारित)**
(१)	**(२)**	**(३)**	**(४)**
	ए-महसूल लेख्यांवरील खर्च	(रुपये)	(रुपये)
	महसूल व वन विभाग		
१.	सी-६ "नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य "	८,१२,३६,४१	
२.	सी-७ "वन"		५०
	वित्त विभाग		
३.	जी-३ "व्याज प्रदाने व ऋण सेवा"		५५,४०,३१
	सार्वजनिक बांधकाम विभाग		
४.	एच-३ "गृहनिर्माण"	३,५३,९२	
	नियोजन विभाग		
५.	ओ-५ "डोंगराळ क्षेत्र"	३,४३	
६.	ओ-१४ "जिल्हा योजना, मुंबई शहर"	३,८७,६३	
७.	ओ-१८ "जिल्हा योजना, रत्नागिरी"	१,७५,९२	
८.	ओ-२० "जिल्हा योजना, पुणे"	८,०७,३५	
९.	ओ-२१ "जिल्हा योजना, सातारा"	३,६९,९८	

१०.	ओ-२६ “जिल्हा योजना, धुळे”	५७,३९	
११.	ओ-३० “जिल्हा योजना, औरंगाबाद”	१,११,३३	
१२.	ओ-३१ “जिल्हा योजना, जालना”	१,१०,८०	
१३.	ओ-३२ “जिल्हा योजना, परभणी”	६९	
१४.	ओ-३३ “जिल्हा योजना, नांदेड”	८,७९,२७	
१५.	ओ-३४ “जिल्हा योजना, बीड”	३,९१,३६	
१६.	ओ-३५ “जिल्हा योजना, लातूर”	९१,११	
१७.	ओ-३६ “जिल्हा योजना, उस्मानाबाद”	१,३२,६७	
१८.	ओ-३८ “जिल्हा योजना, नागपूर”	२,०२,७३	
१९.	ओ-४० “जिल्हा योजना, भंडारा”	७३,२४	
२०.	ओ-४१ “जिल्हा योजना, चंद्रपूर”	४,२८,२८	
२१.	ओ-४५ “जिल्हा योजना, अकोला”"	४,४८,६५	
२२.	ओ-४६ “जिल्हा योजना, यवतमाळ”	५,३३,८४	
२३.	ओ-४७ “जिल्हा योजना, बुलढाणा”	१,२०,०४	
	उच्च व तंत्रशिक्षण विभाग		
२४.	डब्ल्यू-१ “व्याज व प्रदाने”		२५,२७,३३
२५.	डब्ल्यू-७ “प्रादेशिक असमतोल दूर करण्याकरिता महसूली खर्च”	४,३४,६०	
	महिला व बालविकास विभाग		
२६.	एक्स -२ “सचिवालय सामाजिक सेवा”	५,३८	
	एकूण ए महसूली लेख्यांवरील खर्च	**८,७३,५६,०२**	**८०,६८,१४**
<u>बी- भांडवली लेख्यावरील खर्च</u>			
	नियोजन विभाग		
२७.	ओ-१९ “जिल्हा योजना, सिंधुदुर्ग”	२,१३	
२८.	ओ-२२ “जिल्हा योजना, सांगली”	५,४६,०१	

२९.	ओ-२३ “जिल्हा योजना, सोलापूर”	४,६१,८१	
३०.	ओ-२४ “जिल्हा योजना, कोल्हापूर”	५,४७,१२	
३१.	ओ-२५ “जिल्हा योजना, नाशिक”	९,९३,२८	
३२.	ओ-२७ “जिल्हा योजना, जळगाव”	७९,६४	
३३.	ओ-२८ “जिल्हा योजना, अहमदनगर”	४,९७,५९	
३४.	ओ-२९ “जिल्हा योजना, नंदुरबार”	१६,७४	
३५.	ओ-३० “जिल्हा योजना, औरंगाबाद”	१,१०,६४	
३६.	ओ-३५ “जिल्हा योजना, लातूर”	६३,२१	
३७.	ओ-३७ “जिल्हा योजना, हिंगोली”	६८,१९	
३८.	ओ-४२ “जिल्हा योजना, गडचिरोली”	५,४३,६८	
३९.	ओ-४३ “जिल्हा योजना, गोंदिया”	७५,८०	
	एकूण(बी) भांडवली खर्च	**४०,०५,८४**	**--**
	एकूण (ए) + (बी)	**९,१३,६१,८६**	**८०,६८,१४**

तळटीप : - समितीने जेव्हा जादा खर्च नियमानुकूल करण्याविषयी शिफारस केलेली असते, अशा वेळी समितीने यापूर्वी केलेल्या शिफारशीनुसार (सन १९५३-५४ च्या विनियोजन लेख्यावरील अहवालांचा परिच्छेद १० पहा.) ज्यामुळे कोणताही जादा खर्च नियमानुकूल करणे आवश्यक ठरते किंवा टाळता येते अशा प्रकारचे लेख्यांवरील कोणतेही प्रस्थापित गैरवर्गीकरण हिशेबात घेणे आवश्यक आहे. म्हणून अशा प्रकारे गैरवर्गीकरणाच्या रकमा हिशेबात घेऊनच वर दर्शविण्यात आलेल्या रकमा काढण्यात आलेल्या आहेत.

गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क)

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. बी-२ "राज्य उत्पादन शुल्क" या शीर्षाअंतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्र.बी-२ "राज्य उत्पादन शुल्क"

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष २०३९ राज्य उत्पादन शुल्क दत्तमत मूळ २,०१,२०,८५ पुरक --- वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च, २०१३) भारित मूळ १,५० पूरक --- वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च, २०१३)	२,०१,२०,८५ १,५०	१,०९,९५,८४ ----	(-)९१,२५,०१ ८९,९४,५८ (-)१,५० १,५०

टिपा व भाष्ये :-

.९१२५.०१ लाख इतकी अंतिम बचत असूनही, वर्षभरात रु.८९९४.५८ लाख इतका निधी परत करणे अपेक्षित होते.

अनुदानातील बचत पुढील शीर्षाखाली झाली :-

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

उपलेखाशिर्षानिहाय अधिक खर्चाची/बचतीची कारणे सोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे आहेत.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०३९ राज्य उत्पादन शुल्क ००१ संचालन व प्रशासन ००१ (०१) (०१) आयुक्त कार्यालय आस्थापना मूळ १९,२३.२४ पुनर्विनियोजन -१०,५५.०४	८,६८.२०	८,६१.९६	६.२४

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

०१ वेतन या उद्दीष्टाखाली वेतनाव्यतिरिक्त इतर देयके उदा.वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके, स्वग्राम/महाराष्ट्र दर्शन प्रवास भत्ता देयके तसेच सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची देयके न स्वीकारल्यामुळे बचत झाली आहे.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
००१ संचालन व प्रशासन ००१ (०१) (०२) निरिक्षण व प्रतिबंधक आस्थापना मूळ ७६,९५.११ पुनर्विनियोजन -८,७०.१०	६८,२५.०१	६७,००.८३	(-)१,२४.१८

टिपा व भाष्ये :-

(एक)रिक्त पदे न भरल्याने (दोन) ६ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीचे प्रदान न केल्याने व (तीन) वैद्यकीय सेवा व रजा प्रवास सवलत देयके सादर न केल्याने उपशीर्षाखालील रु.१९२५.१४ लाख इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

.१२४.१८ लाख एवढया अंतिम बचतीची कारणे मागविण्यात आली, तरीही कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

०१ वेतन या उद्दीष्टाखाली वेतनाव्यतिरिक्त इतर देयके उदा.वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके, स्वग्राम/महाराष्ट्र दर्शन प्रवास भत्ता देयके तसेच सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची देयके जिल्हा कोषागार कार्यालयाने न स्वीकारल्यामुळे बचत झाली आहे. तसेच अधिकारी/कर्मचाऱ्यांची रिक्त पदे न भरल्यामुळे बचत झाली आहे.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००) (०३) धान्य वापरुन अल्कोहोल तयार करण्यासाठी आसवनींना प्रोत्साहन मूळ १,०५,००.०० पुनर्विनियोजन -७०,६७.७६	३४,३२.२४	३४,३२.२४	---

टिपा व भाष्ये :-

.७०६७.७६ लाख इतका निधी प्रत्यक्ष खर्चावर आधारित असून परत करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निरंक.

साक्ष :-

१.२ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीच्या दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या बैठकीत अपर मुख्य सचिव, गृह विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

प्रधानशीर्ष २०३९ राज्य उत्पादन शुल्क, ००१ संचालन व प्रशासन ००१ (०१) (०२), निरीक्षण व प्रतिबंधक आस्थापना या अंतर्गत १२४.१८ लक्ष रुपये पुनर्विनियोजन केलेले आहेत. ते पुनर्विनियोजन केलेले आहेत की, सरेंडर केलेले आहेत ? कारण प्रत्येक ठिकाणी विभागाने पुनर्विनियोजन केलेले आहे असे नमूद केलेले आहे. वर्षाच्या शेवटी जे काही शिल्लक राहिलेले आहे ते विभागाने सरेंडर केलेले आहे. विभागाने हे पुनर्विनियोजन मार्चपूर्वीकेले असते तर ते समितीने मान्य केले असते. पुनर्विनियोजन केले म्हणजे काही ते सरेंडर केले असे होत नाही. यामध्ये जगलरी आहे असे वाटते, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीच्या मताशी सहमती दर्शविली व समितीस सांगितले की, पुनर्विनियोजन ऐवजी प्रत्यार्पित करण्यात आला, सरेंडर करण्यात आला असा शब्दप्रयोग केला पाहिजे होता.

प्रधानशीर्ष २०३९, राज्य उत्पादन शुल्क या अंतर्गत एकूण९१ कोटी २५ लक्ष रुपये शिल्लक राहिले आहेत असे नमूद केलेले आहे. हे जे पैसे शिल्लक राहिले आहेत, त्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, अनुदान क्रमांक 'बी' मध्ये वेतनामध्ये ११ कोटी रुपयांची बचत झालेली आहे. सन २००९ मध्ये दिनांक १.१.२००६ रोजी पासून सहावा वेतन आयोग लागू केला. यामध्ये जवळजवळ ३३ महिन्यांचे अरिअर्स होते. केंद्र शासनाने असे सांगितले होते की, हे थकबाकी (अरिअर्स) दोन हप्त्यात देण्यात यावेत. राज्य शासनाने असा निर्णय घेतला की, हे थकबाकी (अरिअर्स) ५ वार्षिक हप्त्यांमध्ये देण्यात यावेत. या थकबाकी देयके पूर्णपणे परिगणित न होणे, प्रमाणित न होणे यामुळे बचत झालेली आहे.

बहुतेक अधिकारी/कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बिले वेळेवर जातात मात्र ती वर्ष दोन वर्षे पडून असतात, ती मंजूरच होत नाहीत. ते बिचारे चकरा मारुन थकतात. त्यांची वैद्यकीय बिले लवकर मंजूरच होत नाहीत व त्यांना बील नामंजूरीची काही कारणेही सांगितली जात नाहीत. यामध्येसुधारणा झाली पाहिजे. वैद्यकीय बिला बरोबर

प्रवास भत्त्याबाबतही यामध्ये नमूद केलेले आहे. ही बिले का मंजूर केली नाहीत, यामागे काय कारणे होती, ती उशीरा पोहोचली होती का ? अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी समितीस सांगितले की, समितीच्या सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब खरी आहे की, वैद्यकीय बिले अनेक वर्षांपासून पडलेली असतात आणि ती वेळेवर न दिल्याने कर्मचाऱ्यांना खूप त्रास होतो. आता संपूर्ण राज्यात आढावा घेऊन जितकी प्रलंबित बिले आहेत ती त्यांनी वेळेवर दाखल करणे व योग्य वेळेत बिले मंजूर करण्याची एक मोहीम राबविण्यात येत आहे. या वर्षापासून या पद्धतीचे इशु समोर येणार नाहीत. या संदर्भात तक्रार असेल तर कॉन्स्टेबल पासून कोणीही ती तक्रार आयुक्ताकडे घेऊन येऊ शकतात. त्यामुळे आतापासून पुढे असे प्रकार होणार नाहीत. पूर्वी असे एखादे वेळेस घडलेले असेल.

अनेक विभागामध्ये कॅशलेस मेडिकल बिलाची व्यवस्था आहे. तशी योजना येथे राबविण्याबाबत विचार का करीत नाही, असे केले तर वैद्यकीय बिलांची काही अडचणच येणार नाही. वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती इन्शुरन्स कंपनीच करील असे मत समितीने व्यक्त केले असता आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी सांगितले की, We are working like Police. एक्साईज देखील एक युनिफॉर्म सर्व्हीस आहे. आता विभागाने शासनाकडे असे प्रस्तावित केलेले आहे की, पोलिसांच्या धर्तीवर राज्य उत्पादन शुल्क विभागातील कर्मचाऱ्यांना देखील कॅशलेश पद्धतीचे मेडिक्लेम मिळावे.

कॅशलेस मेडीकल बील झाली तर बिलांच्या प्रतिपूर्तीचा मुद्दाच राहणार नाही, त्यामुळे या दृष्टीने विभागाने विचार करावा. राज्यातील सर्व विभागांमध्ये तीच पॉलिसी असली पाहिजे. वैद्यकीय देयकांबरोबर प्रवास भत्ता देयके, वेतनाची देयके वगैरे रेग्युलर देयके देखील वेळेवर सादर केलेली नाहीत. त्यामुळे ही सेव्हींग झालेली दिसते. ही जी बचत झालेली आहे, ती सिस्टम बरोबर नाही त्यामुळे झालेली आहे. हे पैसे अखर्चित राहिल्यामुळे राज्याच्या विकासाकरिता हे पैसे वेळेवर खर्च करु शकता आले नाही. यामध्ये विभागाची चूक दिसते. तसेच कर्मचाऱ्यांनी प्रवासाकरिता स्वत:चे पैसे खर्च केले असतील. त्याच बरोबर वैद्यकीय खर्चही त्यांनी स्वत:च केला असेल. शासनाने कर्मचारी/अधिकाऱ्यांना एवढी फॅसिलिटी दिलेली असताना वैद्यकीय बील/प्रवास भत्ता याची प्रतिपूर्ती का होत नाही. कारण याबाबत खूपदा असे निदर्शनास येते की, काही पर्सेंटेज त्या सँक्शन करणाऱ्या

व्यक्तीला दिले जात नाहीत तोपर्यंत वैद्यकीय बिले किंवा प्रवास भत्त्याची बिले निघत नाहीत. तेथे जे कोणी अकाऊंटंट असतील ते अडवणूक करतात. याबाबत तेथे काही तरी चेक आला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता यावर आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी समितीस सांगितले की, आता पर्यंत कम्प्युटरायझेशन ह्युमन रिसोर्स मॉड्यूलवर झालेले नव्हते. पूर्ण महाराष्ट्रातील कर्मचाऱ्यांच्या सर्व्हिस बुकचे अपडेटिंग व कॉम्प्युटराझेशन पासून ते त्यांच्या बिलाच्या ऑनलाईन अप्रुव्हलची सिस्टम पुढील दोन महिन्यांच्या आत सुरु करण्यात येणार आहे. पूर्वी बिले कोठे व किती प्रलंबित आहेत ही माहिती कमिशनर पर्यंत येण्याची अजिबात शक्यता नव्हती.

जी बीले प्रलंबित आहेत ही बिले कोठे व कोणाकडे प्रलंबित होती ते चेक केले आहे काय ? तसेच कशामुळे बिलाची प्रतिपूर्ती होण्यास उशीर झाला याबाबतचे काही स्पष्टीकरण मागितले आहे काय ? असे प्रश्न समितीने उपस्थित केला असता आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी सांगितले की, या वर्षीपासून ज्या ज्या पातळीवर बिले प्रलंबित होती त्यांना आता आदेश दिलेले आहेत. त्यांचा आढावा आयुक्तपातळीवर सुरु आहे.

विभागीय प्रतिनिधी सांगतात की, प्रलंबित बीलासंदर्भात आढावा घेण्याचे काम आयुक्त पातळीवर सुरु आहे. पण समितीच्या आजच्या बैठकीत ज्या मुद्यासंदर्भात साक्ष सुरु आहे. त्यामध्ये उल्लेख केलेल्या वैद्यकीय/प्रवास भत्ता बिलांची माहिती विभागीय सचिवांकडे समितीच्या बैठकीच्या वेळी उपलब्ध पाहिजे होती. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता स्पेसिफिक कोणती बिले कोठे पडून होती, ती का सादर करता आली नाहीत याबाबतची माहिती लोकलेखा समितीस सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

उत्पादन शुल्क विभाग हा केवळ कार्यालयामध्ये बसून काम करणारा विभाग नाही. तेथील कर्मचाऱ्यांचा प्रवास भत्ता/ वैद्यकीय बिल २-२ वर्षे विभागाकडून अडवून ठेवण्यात येत असतील आणि त्याकरिता कोणाला तरी भेटायची वाट पाहावी लागत असेल तर, It is shame for the Department. लोक स्व:च्या पदरचे पैसे खर्च करुन त्यांची प्रतिपूर्ती करण्याकरिता २-२ वर्षे वाट कशाला पाहतील ? याबाबत सिस्टम बनवावी, दोषी कर्मचाऱ्यांना मेमो द्या, घरी पाठवा. खालच्या अधिकाऱ्यांना प्रश्न विचारा. जर बीलावर काळया पेनने लिहिले,

निळया पेनने लिहिले नाही किंवा रेड पेन वापरले म्हणून अडकवले वगैरे एक्सक्युज दिले असतील तर ते योग्य नाही. ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना या गोष्टीस (बिलाची प्रतिपूर्ती न होणे) सामोरे जावे लागते त्यांना एकदा आपल्या लेव्हलवर बोलवावे आणि त्यांच्याकडून त्यांच्या अडचणी ऐकून घ्याव्यात जेणेकरुन मधल्या अधिकाऱ्यांना असे वाटेल पाहिजे की, आता ज्या अधिकारी/कर्मचारी यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी वरिष्ठ पातळीवर बोलाविले जाऊ शकते असे मत समितीने व्यक्त केले.

या अनुषंगाने समितीने सूचित केले की, ज्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके अडकलेली आहेत, अशा अधिकाऱ्यांसमवेत एखादी बैठक आयोजित करावी यावर आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी सांगितले की, त्यांना या विभागात येऊन फक्त दोन महिन्यांचा कालावधी झालेला आहे. कोणकोणती बिले प्रलंबित आहेत, त्यासंदर्भात आढावा घेतला जात आहे. अनेक कॉन्स्टेबल आयुक्तांनाभेटण्यास कदाचित घाबरु शकतील. म्हणून प्रत्येक कॉन्स्टेबलला आयुक्तांच्या स्वाक्षरीने कोणकोणत्या अडचणी आहेत किंवा कार्यालयात आपली वैयक्तिक कामे प्रलंबित आहेत किंवा कसे, उदा. प्रमोशन, वैद्यकीय देयके प्रलंबित असतील तर ते जाणून घेण्यासाठी पत्र दिलेले आहे. सदर पत्राची प्रत आयुक्त यांनी समितीस अवलोकनार्थ सादर केली. कोणत्याही कॉन्स्टेबलच्या काहीही अडचणी असतील तर त्या सोडविण्यासाठी त्यांनी पोलीस आयुक्तांना भेटावे अशा देखील सूचना पत्रान्वये दिलेल्या आहेत. पुढील महिन्यात कॉन्स्टेबलांच्या अडचणी आहेत किंवा कसे हे जाणून घेण्यासाठी एखादी बैठक आयोजित करण्यात येणार आहे. सदरहू बैठकीत पोलीस अधीक्षक, वैद्यकीय बिले क्लिअर करणारे क्लार्क व इतर संबंधित अधिकारी उपस्थित असणार आहेत. जर एखाद्या पोलीस कर्मचाऱ्यांची नस्ती काही कारणास्तव वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी विनाकारण अडवून ठेवलेली असेल तर नक्कीच त्यांच्या विरोधात कारवाई करणार आहे असे देखील आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी समितीस आश्वस्त केले.

प्रत्येक कॉन्सटेबल त्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी त्यांच्या स्वाक्षरीने पत्र पाठविले हे अतिशय चांगले काम आहे असे मत समितीने व्यक्त केले व त्या अनुषंगाने विभागास सुचित केले की, आयुक्तांनी सर्वासमवेत बैठक आयोजित करावी. प्रत्येक कार्यालयात जाऊन प्रत्यक्ष संबंधित

कर्मचाऱ्यांना भेटून त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न करावा. तसेच सर्वासमवेत जी बैठक आयोजित करण्यात येणार आहे. त्याकरिता बैठकीत वरीष्ठ अधिकाऱ्यांना बोलवू नका. अन्यथा ते संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांना दम देतील. त्यामुळे सदर बैठकीस फक्त पोलीस कॉन्स्टेबलला बोलवून त्यांच्या अडचणी काय आहेत त्या जाणून घेऊन त्यानुसार त्या सोडविण्यास प्रयत्न करावा. यावर कॉन्स्टेबल, पेालीस निरीक्षक यांचा जिल्हानिहाय अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी समितीस अश्वस्त केले.

अधिदान व लेखा कार्यालयाने बिले स्वीकारली नसल्याने त्याबाबतची काही कारणे दिलेली आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वैद्यकीय देयके कोणत्या कारणास्तव अडलेली आहेत, त्यात सुधारणा करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच वैद्यकीय देयके कोणत्या कारणांमुळे अडकलेली आहेत, ती कारणे देखील सांगण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

अभिप्राय :

सदरहू परिच्छेदात राज्य उत्पादन शुल्क विभागात संचालन व प्रशासन अंतर्गत आयुक्त कार्यालय आस्थापना व निरिक्षण व प्रतिबंधक आस्थापना या उपशिर्षाखाली मोठी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आल्याबाबत आक्षेप नोंदविण्यात आले आहे. विशेषत: या अंतर्गत ७६९५.११ लाख रुपयाच्या मुळ तरतुदीपैकी रु.६८२५.०१ लाख प्राप्त झाले असून रु. ६७००.८३ लाख खर्च झालेला आहे व रु. १२४.१८ लाख इतकी अंतिम बचत झाली असून या बचतीची कारणे महालेखाकारांना कळविण्यात आली नसल्याचा आक्षेप नोंदविण्यात आलेला आहे.

वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीची देयके स्वग्राम/महाराष्ट्र दर्शन प्रवास सवलत भत्ता देयके तसेच सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची देयके जिल्हा कोषागार कार्यालयाने न स्वीकारल्यामुळे तसेच अधिकारी / कर्मचाऱ्यांची रिक्त पदे न भरल्यामुळे रु. १२४.१८ लाख बचत झाल्याचे विभागाने समितीसमोर सांगितले. वास्तविकत: प्रशासकीय कारणास्तव रक्कम अखर्चित राहिल्यास ती आर्थिक वर्ष अखेरीस प्रत्यार्पित (Surrender) करणे बंधनकारक असते. परंतु विभागाने ही अखर्चित रक्कम प्रत्यार्पित केल्याचे न दर्शविता ज्ञापनामध्ये त्या रकमेचे पुनर्विनियोजन केल्याचे नमूद केल्यामुळे तीअन्यत्र खर्च केल्याचे दिसून आले. त्यामुळे समितीसमोर या आक्षेपांवरील चर्चेचा रोखच बदलला. चर्चे दरम्यान समितीसमोर हे स्पष्ट झाले की ही रक्कम पुनर्विनीयोजीत न करता प्रत्यार्पित करण्यात आली आहे. अत: वर्षअखेरीस अखर्चित रक्कम प्रत्याप्रित (सरेंडर) केली असल्यास त्यास प्रत्यार्पित दाखविणे आवश्यक आहे. त्यास पुनर्विनीयोजन म्हणता येणार नाही व याची काळजी विभागाने घेण्याची आवश्यकता आहे.

अधिकारी / कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय बिलाचे पैसे अगोदर खर्च केलेले असतात परंतु कार्यालयाकडून ही वैद्यकीय प्रतिपुर्ती दोन-दोन वर्षे प्रलंबित राहते. या कारणास्तव मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद असतांना या प्रतिपुर्ती प्रलंबित राहण्याचे कोणतेही कारण नाही. या शिर्षातंर्गत निधीची तरतूद असते परंतु कर्मचाऱ्यांना त्याची प्रतिपुर्ती होत नाही. या कार्यपद्धतीमुळे निधीचा उपयोगही झाला नाही व त्याचा लाभ कर्मचाऱ्यांनाही मिळाला नाही. अत: अशी वैद्यकिय प्रतिपुर्तीची प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची आवश्यकता आहे. तीच परिस्थिती प्रवास देयकासंदर्भात अस्तित्वात असल्याचे समितीच्या निदर्शनास आहे.

शिफारशी

शिफारस :

१.३ या विभागात प्रशासकीय कारणास्तव मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित राहून आर्थिक वर्ष अखेरीस तो निधी प्रत्यार्पित करण्यात आला. वास्तविकत: प्रवास देयके, वैद्यकीय प्रतिपुर्तीची देयके, स्वग्राम, महाराष्ट्र दर्शन इत्यादी अंतर्गत वर्षअखेरपर्यंत कधी देयके सादर होतील याची कोणतीही शाश्वती नसते त्यामुळे या निधीची तरतूद विभागात करुन ठेवण्यात येते व प्रतिपुर्तीची देयके प्राप्त न झाल्यास रक्कम प्रत्यार्पित करण्यात येते. परंतु यामुळे केवळ याच विभागात नव्हे तर सर्वच विभागात मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करुन मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित पडून राहतो. रिक्त पदांसाठी देखील वेतनाची तरतूद यात मोठया प्रमाणात आढळून येते. रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया ही फार लांबलचक असून यात बराच वेळ जातो. विभागाला वर्षातून तीन वेळा पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधी घेणे शक्य असतानाही अशा प्रकारे तरतूद करुन ती प्रत्यार्पित करणे हे खचितच आर्थिक शिस्तीला धरुन नाही. अत: विभागाने या निधीचे योग्य नियोजन करावे व केवळ तरतूद करुन ठेवण्याची पध्दत भविष्यात टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

१.४ वैद्यकिय प्रतिपुर्तीची देयके विभागस्तरावर निकाली निघण्यास अमर्याद कालावधी जातो. वास्तविक हा निधी अगोदरच कर्मचाऱ्यांनी खर्च केलेला असतो व या प्रतिपूर्तीच्या रकमेची तरतूद विभागात अगोदरच करण्यात येऊन निधी विभागाकडे उपलब्ध देखील असताना व त्यामुळे याची प्रतिपुर्ती तातडीने कर्मचाऱ्यांना होणे आवश्यकता असतांनाही अशी पध्दत विभागात अस्तित्वात असल्याचे समितीला दिसून आले नाही. अशाप्रकारे वैद्यकीय देयके प्रलंबित ठेवण्यामागे अन्य हितसंबंध देखील प्रस्थापित असल्याची शक्यता नाकारता येत नाही. अत: अशी वैद्यकीय देयके दाखल करण्यापासून ते त्यांची प्रतिपुर्ती करणे पर्यंत ही प्रकरणे निकाली काढण्यास कालावधी निश्चित करण्यात यावा. यासाठी संगणकीकरणाचा मोठ्या प्रमाणात उपयोग करण्यात यावा. देयकांचे संनियंत्रण ऑनलाईन पध्दतीने करण्यात यावे. त्या प्रलंबित देयकासंदर्भात आयुक्त स्तरावरुन त्रैमासीक आढावा घेण्यात यावा व तातडीने ही प्रलंबित देयके कालबध्द मर्यादेत निकाली काढणे संबंधितांवर बंधनकारक करण्यात यावे व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

१.५ अनेक खाजगी विभागामध्ये आता अशा प्रकारच्या प्रतिपुर्ती बंद करुन कॅशलेस अथवा आरोग्य विमा पॉलीसी काढण्यात येते. त्यामुळे केवळ प्रिमीयम भरला की संपूर्ण जबाबदारी त्या विमा कंपन्यांची असते. त्या आधारे विभागाने ही पध्दती त्यांच्या विभागात सुरु करण्यासंदर्भात आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यामध्ये सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

गृह विभाग

१.६ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. बी-१० "आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च' या शीर्षाअंतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

अनुदान क्र.बी-१० "आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च"

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष ४०५५ पोलीस यांवरील भांडवली खर्च ४०७० इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च ५०५५ मार्ग परिवहनावरील भांडवली खर्च **दत्तमत-** मूळ ५,५४,२९,९१ पूरक २,०८,६४,०८ वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च२०१३)	७,६२,९३,९९	६,०२,१९,००	-१,६०,७४,९९ १,५८,७६,३३

टिपा व भाष्ये :-

. १६०७४.९९ लाख इतकी अंतिम बचत असूनही रु१५,८७६.३३ लाख इतकी अपेक्षित बचतपत मार्च २०१३ मध्ये प्रत्यर्पित करण्यात आली.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

उपलेखाशिर्ष निहाय बचतीची व अधिक खर्चाची कारणे सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०७० इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च ८०० (००)(०८) पोलीस दलाच्या आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत होमगार्डचे आधुनिकीकरण केंद्र हिस्सा (७५%) मूळ ६,५०.०० पूर्विनियोजन -६,५०.००	---	---	---

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पोलीस दल आनुनिकीकरणा अंतर्गत होमगार्डस आधुनिकीक्करणासाठी केंद्र शासनाकडून अंतिम क्षणी मंजूरी प्राप्त झाल्याने सदरील रकमेचा खर्च झालेला नाही. परिणामी रु.६५०.०० लाख इतक्या अनुदानाची बचतझाली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००)(०९) पोलीस दलाच्या आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत होमगार्डचे आधुनिकीकरण केंद्र हिस्सा (२५%) मूळ २,१६.७५ पुनर्विनियोजन -२,१६.७५	---	---	---

टिपा व भाष्ये :-

केंद्राकडे निधीकरीता मंजुरीस विलंब लागल्याने वर नमूद केलेल्या उपशीर्षाखालील मार्च२०१३ मध्ये रु. ८६६.७५ लाख एवढया संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतुदीचे प्रत्यर्पण करण्यात आले.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पोलीस दल आनुनिकीकरणाअंतर्गत होमगार्डस आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाकडून अंतिम क्षणी मंजूरी प्राप्त झाल्याने सदरील रकमेचा खर्च झालेला नाही. परिणामी रु.२१६.७५ लाख इतक्या अनुदानाची बचत झाली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०५५ पोलीस यांवरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च ८०० (००)(०८) कार्यालयीन इमारतीचे बांधकाम न्याय सहायक विज्ञान प्रयोगशाळा मूळ १,००.०० पुनर्विनियोजन -२०.००	८०.०	८०.००	----

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ मध्ये शासनाने वितरीत केलेला वितरीत केलेला ८०% निधी वितरीत केल्याप्रमाणे खर्ची पडला आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०७० इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च ८०० (००)(०४) परिवहन कार्यालयाकरीता भूमि संपदान मूळ ५,००.०० पुनर्विनियोजन -२,००.००	३,००.००	३,००.००	---

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

एकूण अनुदानाइतका खर्च झालेला आहे. सदरील झालेल्या खर्चाचा महालेखापाल यांचेकडे नोंदविण्यात आलेल्या खर्चाच्या आकड्यांशी ताळमेळ घेण्यात आलेला असून तो बरोबर आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००)(०३) पोलीसांकरिता भूसंपादन व इमारतीच्या बांधकामावरील खर्च मूळ ८,११.७५ पूनर्विनियोजन -१,६२.३५	६,४९.४०	६,४९.४०	---

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाखाली बी-१० आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च ४०७० इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च, ८०० (००)(०७) या प्रयोजनासाठी मूळ रु.८,११.७५ लक्ष इतकी तरतूद दर्शविली होती. सुधारीत अंदाजानुसार८०% निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे एकूण रु.६,४९.४० लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली असून प्रत्यक्ष खर्च रु६,४९.४० लक्ष झाला आहे. त्यामुळे या लेखांवरील कमी किंवा अधिक खर्च झाला नाही.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००)(०५) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास सहायक अनुदान मूळ १,३०,३८.८५ पूनर्विनियोजन -२६,०७.७८	१,०४.३१.०७	१,०४.३१.०७	---

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाखाली बी-१० आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च ४०७० इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, ८०० (००)(०५) या प्रयोजनासाठी मूळ रु.१,३०,३८.८५ लक्ष इतकी तरतुद दर्शविली होती. सुधारीत अंदाजानुसार८०% निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती त्यामुळे एकूण रु. १,०४.३१.०७ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली असून प्रत्यक्ष खर्च रु. १,०४.३१.०७ लक्ष झाला आहे. त्यामुळे या लेखांवरील कमी किंवा अधिक खर्च झाला नाही.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००)(१२) पोलीस प्रशिक्षणासाठी कार्यालयीन इमारतीच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास सहायक अनुदान मूळ २२,०१.९० पूनर्विनियोजन -४,४०.३९	१७,६१.५१	१७,६१.५१	---

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाखाली बी-१० आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च ४०७० इतर प्रशासनिक सेवांवरीलभांडवली खर्च ८०० इतर खर्च ८०० (००)(१२) या प्रयोजनासाठी मुळ रु.२२,०१.९० लक्ष इतकी तरतुद दर्शविली होती. सुधारीत अंदाजानुसार८०% निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती त्यामुळे एकूण रु. १७,६१.५१ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली असून प्रत्यक्ष खर्च रु. १७,६१.५१ लक्ष झाला आहे. त्यामुळे या लेखांवरील कमी किंवा अधिक खर्च झाला नाही.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००)(११) पोलीस प्रशिक्षणासाठी कार्यालयीन इमारतीच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण व कल्याण महामंडळास सहायक अनुदान मूळ १,२६,३७.५० पूनर्विनियोजन -२५,२७.५०	१,०१,१०.००	१,०१,१०.००	---

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाखाली बी-१० आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च४०७० इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च ८०० (००)(११) या प्रयोजनासाठी मुळ रु.१,२६,३७.५० लक्ष इतकी तरतुद दर्शविली होती. सुधारीत अंदाजानुसार८०% निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यामुळे एकूण रु. १,०१,१०.०० लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली असून प्रत्यक्ष खर्च रु. १,०१,१०.०० लक्ष झाला आहे. त्यामुळे या लेखांवरील कमी किंवा अधिक खर्च झाला नाही.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०५५ पोलीस यांवरील भांडवली खर्च २०७ राज्य पोलीस २०७ (००)(०१) नक्षलवादी विरोधी कार्यक्रम-कार्यालयीन इमारतीचे बांधकाम मूळ ६,७७.०० पुनर्विनियोजन -१,३५.४०	५,४१.६०	५,४१.६०	---

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाखाली बी-१० आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च ४०५५ राज्य पोलीस, २०७ (००)(०१) या प्रयोजनासाठी मुळ रु.६,७७.०० लक्ष इतकी तरतुद दर्शविली होती. सुधारीत अंदाजानुसार८०% निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती त्यामुळे एकूण रु.५,४१.६० लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली असून प्रत्यक्ष खर्च रु.५,४१.६० लक्ष झाला आहे. त्यामुळे या लेखांवरील कमी किंवा अधिक खर्च झाला नाही.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०७० इतर प्रशासनिक सेवांवरील खर्च ८०० इतर खर्च ८०० (००)(१०) पोलीस प्रशिक्षण शाळेसाठी निवासी इमारतीचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास सहायक अनुदान मूळ १२,००.०० पूनर्विनियोजन -२,४०.००	९,६०.००	९,६०.००	---

टिपा व भाष्ये :-

वित्त विभागाने केवळ ८०% निधी दिल्यामुळे वर नमूद केलेल्या उपशीर्षाखालील .६३३३.४२ लाख इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आला, त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाखाली बी-१० आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च ४०७० इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च८०० इतर खर्च ८०० (००)(१०) या प्रयोजनासाठी मुळ रु.१२,००.०० लक्ष इतकी तरतुद दर्शविली होती. सुधारीत अंदाजानुसार८०% निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती त्यामुळे एकूण रु.९,६०.०० लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली असून प्रत्यक्ष खर्च रु.९,६०.०० लक्ष झाला आहे. त्यामुळे या लेखांवरील कमी किंवा अधिक खर्च झाला नाही.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०५५ पोलीस यांवरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च ८०० (००)(०३) जिल्हा पोलीस (राज्य हिस्सा २५%) मूळ २४,२७.६० पूनर्विनियोजन -२०,७२.९३	३,५४.६७	३,९२.२५	+३७.५८

टिपा व भाष्ये :-

.३७.५८ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, आवश्यक साधनसामग्री, राज्य पोलीस दलाकरिता वाहने आणि शस्त्र यांच्या संबंधीची खरेदी प्रक्रिया वेळेत पूर्ण न केल्याने परत केलेला रु२०७२.९३ लाख निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले, त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पोलीस महासंचालक कार्यालयाच्या अभिलेखाची पडताळणी केली असता समर्पित रक्कम रु.२०,७२,९३,०००/- ऐवजी रु.२०,३५,३४,९६९/- अशी आहे. त्यामुळे प्रत्यक्षात झालेला खर्च रु.३,९२,२५,०००/- ऐवजी रु.३,९२,२५,०३१/- इतका होईल. तसेच, पोलीस महासंचालक कार्यालयाचा प्रत्यक्षात खर्चही रु.३,९२,२५,०३१/- इतका झाला असल्याने अधिकचा रु.३७,५८,०००/- इतका खर्च झालेला नाही.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००)(०४) जिल्हा पोलीस (केंद्राचा हिस्सा ७५%) मूळ ७३,२३.७९ पूरक ४५.४८ पूनर्विनियोजन -५६,१३.४७	१७,५५.८०	१७,१९.०६	-३६.७४

टिपा व भाष्ये :-

मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीं इतकाही खर्च झालेला नाही वर्षभरातघेतलील रु.४५.४८ लाख इतक्या रकमेची पूरक तरतूद अनावश्यक असलयाचे सिध्द झाले.

.३६.७४ लाखाची अंतिम बचत पाहता आवश्यक साधनसामग्री, राज्य पोलीस दलाकरिता वाहन आणि शस्त्र यांच्या खेरेदीसंबंधीची अपूरी प्रक्रिया यामुळे परत केलेला रू.६१३.४७ लाख इतका निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले, त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पोलीस महासंचालक कार्यालयाच्या अभिलेखाची पडताळणी केली असता समर्पित रक्कम रु.५६,१३,४७,०००/- ऐवजी . ५६,०४,७३,२३१/- अशी आहे. त्यामुळे प्रत्यक्षात झालेला खर्च रु.१७,१९,०६,०००/- ऐवजी १७,१९,०५,७६९/- इतका होईल. पोलीस महासंचालक कार्यालयाचा प्रत्यक्षात खर्चही रु.१७,१९,०५,७६९/- इतका झाला असल्याने रु.३६,७४,०००/- ची बचत किंवा अधिकचा खर्च झालेला नाही.

. ४५,४८,०००/- इतक्या पुरक तरतुदीसंदर्भात, संबंधित उपशिर्षांतर्गत सदर पुरक तरतूद ही मानवी अपव्यापार विरोधी पथक स्थापन करण्याकरीता गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीपीए-०६११/ . .४३२/विशा-६, दि.२६/३/२०१३ अन्वये मंजूर करण्यात आली. या मंजूर तरतुदीमधून रु७.७३,३३७/- इतका निधी संपूर्णपणे खर्च झालेला आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००)(०६) न्याय सहायक विज्ञान (केंद्राचा हिस्सा ७५%) मूळ १०,३९.०० पूनर्विनियोजन -७,३२.०४	३,०६.९६	२,०८.०५	-९८.९१

टिपा व भाष्ये :-

.९८.९१ लाख इतकी अंतिम बचत लखात घेता, न्याय सहायक प्रयोगशाळेकरिता आवश्यक साधनसामग्री खरेदी संबंधीची प्रक्रिया पूर्ण न केल्याने परत केलेला रु७३२.०४ लाख इतका निधी अपुरा असलयाचे सिध्द झाले, त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०११-१२ च्या अतिप्रदान वसूलीची चलनाची रक्कम .९८,९१,०००/- ही महालेखापाल यांच्या लेख्यानुसार सन २०१२-१३ च्या प्रत्यक्ष खर्चातून वजा केली असल्याने रु.९८,९१,०००/- इतक्या रकमेची तफावत दिसून येते. प्रत्यक्षात एकूण मंजूर झालेले आहे. प्रत्यक्षात एकूण मंजूर अनुदान रु३०६.९६/- लाख हे पूर्ण खर्च झालेले आहे याबाबत नोंद घेवून दुरुस्ती करण्याबाबत संचालनालयाच्या दि३१.८.२०१३ रोजीच्या पत्रान्वये महालेखापाल कार्यालयास विनंती करण्यात आली आहे.

संचालक, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई या कार्यालयाच्या सदर लेखाशिर्षाखाली एकूण रु१०.३८ कोटी एवढे अनुदान बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आले होते. तथापि, दि.१२.११.२०१२ च्या शासन निर्णयानुसार सुधारीत अंदाजानूसार प्रत्यक्षात रु५.८० कोटी एवढ्या रकमेच्या खर्चास मान्यता देण्यात आली होती. सदर मंजूर अनुदानातून Scanning electron Microscope या उपकरणाच्या २ नगाच्या खरेदीसाठी रु.३.२० कोटी मान्यता देण्यात आली होती. तथापि, सदर उपकरणाची उपयुक्तता सिध्द झाल्यावर दुसरा नग खरेदी करण्याचा निर्णय झाल्याने त्यावेळी एक नग खरेदी करण्यात आला. त्याचप्रमाणे Evidence Investigation या उपकरणाच्या रु.१.०० कोटी किमतीच्या एका नगाच्या खरेदी प्रक्रियेस योग्य प्रतिसाद न मिळाल्यास सदर खरेदी प्रक्रिया स्थगित करण्यात आली. त्यामुळे एकुण रु७३२.०४ लक्ष एवढे अनुदान शिल्लक राहिल्याचे दिसुन येत आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००) (०५) न्याय सहायक विज्ञान (राज्य हिस्सा २५%) मुळ ३,४७.०० पुनर्विनियोजन -३,०८.८४	३८.१६	३८.१६	---

टिपा व भाष्ये :-

मुख्यत्वेकरुन, पोलीस आयुक्तांकडून न्याय सहायक विज्ञानाकरिता आवश्यक यंत्रसामुग्री संबंधी खरेदी प्रक्रिया अपूर्ण राहिल्याने रु. ३०८.८४ लाख इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापाल यांच्या आकडयानुसार प्रत्यक्ष खर्च व अंतिम फेरबदल तरतूद यांच्यातकाहीही तफावत आढळून येत नाही.

सदर लेखाशिर्षाखाली रु.३.४७ कोटी एवढे अनुदान बीडीएस प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आले होते. परंतु दिनांक १२.११.२०१२ च्या शासन निर्णयान्वये सुधारित अंदाजानुसार फक्त रु२.०१ कोटी एवढयाच रकमेच्या खर्चास मान्यता देण्यात आली होती. सदर मंजूर अनुदानातूनScaning electron Microscope उपकरणासाठीच्या १ नगाच्या खरेदीसाठी रु.१.६० कोटी रकमेची मान्यता देण्यात आली होती. तथापि, सदर उपकरणाची उपयुक्तता सिध्द झाल्यावर खरेदीचा करण्याचा निर्णय दिनांक ३०.३.२०१३ शा.नि.अन्वये घेण्यात आल्यामुळे त्या उपकरणाची खरेदी करण्यात आली नाही. त्यामुळे एकूण रु.३०८.८४ लक्ष एवढे अनुदान शिल्लक राहिल्याचे दिसून येत आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४०५५ पोलीस यांवरील भांडवली खर्च २०७ राज्य पोलीस २०७ (००)(०२) नक्षलग्रस्त क्षेत्रांमध्ये पायाभूत सुविधा मूळ १०,००.०० पूनर्विनियोजन -५,६६.२१	४,३३.७९	४,३३.७९	---

टिपा व भाष्ये :-

केंद्र सरकारने कमी निधी दिल्याने रु.५६६.२१ लाखाची अपेक्षित बचत परत करण्यात आली.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन ०१२-१३ या आर्थिक वर्षाखाली बी-१० आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च ४०५५ राज्य पोलीस २०७ (००)(०२) या प्रयोजनासाठी मुळ रु.१०,००.०० लक्ष इतकी तरतुद दर्शविली होती. सुधारीत अंदाजानुसार८०% निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती त्यामुळे एकूण रु.४,३३.६९ लक्ष इतकी तरतूद वितरीत करण्यात आली असून प्रत्यक्ष खर्च रु.४,३३.६९ लक्ष इतका झाला आहे. त्यामुळे या लेखांवरील कमी किंवा अधिक खर्च झाला नाही

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००)(०७) महाराष्ट्र राजय विशेष सुरक्षा महामंडळाला वर्गणी मूळ १७,००.०० पूनर्विनियोजन -१७,००.००	---	---	---

टिपा व भाष्ये :-

वित्त विभागाकडून वितरणास मंजूरी न दिल्याने रु१७०० लाख एवढ्या रकमेची संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद परत करण्यात आली.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

निधी वितरीत करण्यास वित्त विभागाची मान्यता न मिळाल्याने सदर तरतूद समर्पित करण्यात आली.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (०१)(०१) शहर पोलीस (राज्य हिस्सा २५%) मूळ ११,६३.९८ पूनर्विनियोजन -९,८२.८६	१,८१.१२	१,६३.१२	-१८.००

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्य पोलीस दलाकरिता आवश्यक साधानसामुग्री, वाहने व शस्त्रे यांच्या खरेदीबाबत खरेदी प्रक्रिया पोलीस

महासंचालक यांचेकडून राबविण्यात येते. सदर प्रक्रिया पुर्ण न झाल्याने रुपये१,६३.९८ इतक्या मूळ तरतूदीतून प्रत्यक्ष खर्च रुपये १६३.१२ लाख व रुपये १८.०० लाखाची अंतिम बचत वजा जाता उर्वरित रुपये९८२.८६ लाखाची बचत झाली. सदर शासनास समर्पित करण्यात आली.

पोलीस दल आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत रुपये१,८१.१२ इतक्या अंतिम सुधारीत तरतूदीमधून मोटार वाहन, यंत्र सामुग्री, इतर खर्च व मोठी बांधकामे या चार उद्दिष्टांवर रुपये१६३.१२ लाख इतका खर्च झाला.

मोटार परिवहन विभागाने अधिदान व लेखा कार्यालयास साद केलेली संक्षिप्त देयक क्र.११८, .११,१३,३००/- व देयक .११५, .६,८७,६४७/- अशी एकूण रु.१८.०० लाखाची दि.२९.३.२०१३ रोजी सादर केलेली दोन संक्षिप्त देयके आर्थिक वर्षा अखेरीस दि.३१.३.२०१३ अन्वये आक्षेपित करुन परत करण्यात आल्याने सदर बचत झाली आहे. कृपया सदर बचत क्षमापित करण्यात यावी.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
८०० इतर खर्च ८०० (००)(०२) शहर पोलीस (केंद्राचा हिस्सा २५%) मूळ ३४,५३.७८ पूनर्विनियोजन -३०,३३.२१	४,२०.५७	३,३७.९९	-८२.५८

टिपा व भाष्ये :-

प्रत्यक्ष खर्चावर आधारीत वर नमूद केलेल्या उपशीर्षाखालील रु.४०१६.०७ लाख इतकी बचत परत करण्यात आली.

.१००.५८ लाख इतक्या अंमिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्य पोलीस दलाकरिता आवश्यक साधानसामुग्री, वाहने व शस्त्रे यांच्या खरेदीबाबत खरेदी प्रक्रिया पोलीस महासंचालक यांचेकडून राबविण्यात येते. सदर प्रक्रिया पुर्ण न झाल्याने रुपये३४,५३.७८ लाख इतक्या मूळ तरतूदीतून प्रत्यक्ष खर्च रुपये ३,३७.९९ लाख व रुपये ८२.५८ लाखाची अंतिम बचत वजा जाता उर्वरित रुपये९८२.८६ लाखाची बचत झाली. सदर शासनास समर्पित करण्यात आली.

पोलीस दल आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत रुपये ४,२०.५७ इतक्या अंतिम सुधारीत तरतूदीमधून मोटारवाहन, यंत्र सामुग्री, इतर खर्च व मोठी बांधकामे या चार उद्दिष्टांवर रुपये३,३७.९९ लाख इतका खर्च झाला.

मोटार परिवहन विभागाने अधिदान व लेखा कार्यालयास सादर केलेली संक्षिप्त देयक क्र.११६, .३४,३८.२३५/- व देयक .११३, .२२,७७,८९६/- अशी एकूण रु.८२.५८ लाखाची दि.२९.३.२०१३ रोजी सादर केलेली दोन संक्षिप्त देयके आर्थिक वर्षा अखेरीस दि.३१.३.२०१३ अन्वये आक्षेपित करुन परत करण्यात आल्याने सदर बचत झाली आहे. कृपया सदर बचत क्षमापित करण्यात यावी.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
५०५५ मार्ग परिवहनावरील भांडवली खर्च १९० सार्वजनकि क्षेत्रातील व इतर उपक्रमांतील गुंतवणूका १९० (००)(०१) महाराष्ट्र राजय मार्ग परिवहन महामंडळाला भाग पूरक १,९८,६८.६० पूनर्विनियोजन ६३,३३.४०	२,६२,०२.००	२,६२,०२.००	---

टिपा व भाष्ये :-

सुधारित अंदाजपत्रकानुसार रु६३३३.४० लाख एवढ्या अतिरिक्त निधीची पुनर्विविनियोजनाद्वारे तरतूद करण्यात आली.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातगृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रस्तुत योजनेसाठी रु.१९८६८६० हजार इतके पुरक अनुदान मंजुर करण्यात आले. राज्य मार्ग परिवहन महामंडळाला सवलतीच्या मुल्यासाठी अदा करावयाच्या ५.५०% भांडवली अदा करण्यासाठी रु.६३३३४० हजार इतके पुर्नविनियोजनाद्वारे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले. एकूण अनुदानाइतकाच खर्च झाला असुन सदर झालेल्या खर्चाचा महालेखापाल यांच्याकडे नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घेण्यात आला आहे.

साक्ष :-

१.७ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीच्या दिनांक ४ जानेवारी व ३१ मे, २०१७ रोजीच्या बैठकीत सन २०१२-१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. बी-१० "आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च" यासंदर्भात अपर मुख्य सचिव, गृह विभाग व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

प्रधानशीर्ष ४०७० इतर प्रशासकीय सेवांवरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, ८०० (००) (०८) पोलीस दलाच्या आधुनीकीकरण कार्यक्रमांतर्गत होमगार्डचे आधुनिकीकरण, केंद्र हिस्सा (७५%), ८०० (००) (०९) पोलीस दलाच्या आधुनीकीकरण कार्यक्रमांतर्गत होमगार्डचे आधुनीकीकरण (२५ %)

या अंतर्गत पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाकडून अनुदान केव्हा प्राप्त झाले? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा जो कार्यक्रम आहे त्यातील हा एक भाग होता. सन २०१२-१३ मध्ये पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा कार्यक्रम हाती घेतला होता. त्यात एकूण ८ घटक होते. त्यापैकी हा एक विषय होता. जुलै महिन्यात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने मान्यता दिल्यानंतर केंद्र शासनाकडे आराखडा पाठविण्यात आला. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये केंद्रशासनाकडून काही सूचना प्राप्त झाल्या त्या अनुषंाने कार्यक्रम बदलावा असे सूचित केले होते. केंद्र शासनाकडून मार्च अखेर मान्यता प्राप्त झाली, त्यानंतर हा निधी वापरण्यात आला आहे.

पोलीस दलाच्या आधुनिकीकरणामध्ये होमगार्डच्या आधुनिकीकरणाचा स्पेसिफिक कार्यक्रम होता का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एकूण ८ घटकांपैकी होमगार्ड हा एक घटक आहे. यात प्रामुख्याने दोन गोष्टी ठरविल्या होत्या. त्यांना काही प्रशिक्षण केंद्रे बांधावयाची होती, वाहने विकत घ्यायची होती. परंतु वाहनांची आवश्यकता नाही असे महासंचालकांनी कळविले. बांधकामाच्या संदर्भात त्यावेळी उशिरा सूचना प्राप्त झाल्यामुळे त्या वर्षात कार्यवाही झाली नाही, परंतु पुढील वर्षात कार्यवाही करण्यात आली. तसेच होमगार्ड आणि नागरी संरक्षण यांचा अंतर्भाव असतो होमगार्ड आणि नागरी संरक्षण असे संचालनालय आहे.

महाराष्ट्रामध्ये सिव्हील डिफेन्स ही यंत्रणा बंद पडायची वेळ आली आहे. पोलीस दलामध्ये भरती करीत असताना रिक्त जागांवर होमगार्ड व नागरी संरक्षणाच्या माध्यमातून पोलीस दलाला सहाय्य मिळत असते. जुलै महिन्यात बैठक झाल्यानंतर पाठपुरावा झाला नाही म्हणून अनुदान वेळेवर प्राप्त झाले नाही की केंद्रशासनाकडून अनुदान उशिरा पाठविले ? असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाकडून विभागाला ऑक्टोबरमध्ये पुन्हा सूचना प्राप्त झाल्या. त्या अनुषंगाने आधुनिकीकरणाचा कार्यक्रम बदलावा लागला. मार्च महिन्यातील पहिल्या आठवडयात राज्याकडून आराखडा पाठविण्यात आला.

ऑक्टोबर महिन्यात केंद्र शासनाकडून सूचना प्राप्त झालेल्या असताना मार्च महिन्यात केंद्राकडे आराखडा पाठविला, त्यामुळे केंद्र शासनाला दोष देता येणार नाही. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात आराखडा सादर केला असता तर डिसेंबर महिन्यात निश्चितपणे अनुदान प्राप्त झाले असते. विभागातील अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे राज्य शासनाला वेळेवर अनुदान प्राप्त होण्यास मुकावे लागले ही बाब गंभीर आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीच्या मताशी सहमती दर्शविली व समितीस अवगत केले की, आधुनिकीकरणाचा कार्यक्रम केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा मिळून राबविला जातो. गेली १०-१२ वर्षे हा कार्यक्रम राबविला जात आहे. दरवर्षी कार्यक्रम मंजूर करण्याच्या प्रक्रियेमध्ये वेगवेगळे घटक आहेत. त्यात मोबिलिटी, कम्युनिकेशन, शस्त्र (वेपन्स), गृहनिर्माण (हाऊसिंग), इमारती, न्याय सहाय्य प्रयोगशाळा (फोरेन्सिक लॅब), प्रशिक्षण (ट्रेनिंग) व नागरी संरक्षण (सिव्हील डिफेन्स) हे ८ घटक आहेत. या कार्यक्रमांतर्गत या ८ घटकांसाठी काय काय करायचे याचा आराखडा प्रशासकीय समितीकडून तयार केला जातो व त्यांच्या मान्यतेने तो केंद्र शासनाकडे पाठविला जातो. केंद्र शासनाच्या स्तरावर सुध्दा एक समिती आहे. ती समिती या आराखडयाला मान्यता देत असते. त्यानंतर केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रक्रिया करण्यात येते. हे खरे आहे की, त्या त्या वर्षात कार्यक्रम राबविण्यात विभाग कधीही यशस्वी झाला नाही. सन २०१२-१३ चा कार्यक्रम त्याच वर्षात राबवू शक्ले नसल्यामुळे पुढील वर्षी पुन्हा कार्यक्रम नुतनीकरण करुन घेण्यात येतो आणि राबवविण्यात येतो. हा प्रश्न विभागात सातत्याने निर्माण होत असतो. म्हणून आता या वर्षीच्या कार्यक्रमाला कायमची मंजूरी दिली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारतीच्या कार्यक्रमाला प्रशासकीय मान्यता दिली जाते, दुसऱ्या वर्षी त्या कामावर खर्च करीत असताना नव्याने मान्यतेची गरज भासत

नाही. म्हणून विभागाने यावर्षी असे केले आहे की, जो कार्यक्रम हाती घेतला आहे त्याला यावर्षी आणि पुढील वर्षीच्या अनुदानातून खर्च करता येईल अशी मान्यता दिली आहे. केंद्र शासनाला मात्र या संदर्भात विनंती करावी लागेल. कारण त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी दिलेला निधी ३१ मार्चपूर्वी खर्च झाला नाही तर पुन्हा परवानगी घेतली पाहिजे. ती प्रक्रिया विभागाकडून पूर्ण करुन घेण्यात येईल. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ६ ते ८ महिने विलंब होतो आणि पुढील वर्षी खर्च केला जातो, त्यामुळे अर्थसंकल्पामध्ये तरतूद करताना अडचण येते. ती टाळली जाईल व याबाबत दक्षता घेण्यात येईल. या कार्यक्रमांतर्गत १००० कोटी रुपये प्राप्त होतात.

विभागाकडून मागील चुका लक्षात घेऊन योग्य ती दक्षता घेण्यात येत असल्याची दखल घेतली. परंतु सन २०१२-१३ या वर्षाचा विषय समितीच्या बैठकीत आता चर्चेला आला आहे. त्या वर्षात ६ ते ८ महिने विलंब झाला त्यामुळे ८ घटकांच्या आधुनिकीकरणाच्या कार्यक्रमावर परिणाम झाला नाही का? ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता त्यासंदर्भात विभागीय सचिवांनी समितीस घटनाक्रम सांगितला की, पहिला आराखडा ३० जून, २०१२ ला पाठविण्यात आला होता. त्यानंतर केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे १ सप्टेंबर, २०१२ ला सुधारित आराखडा पाठविला. त्यानंतर पुन्हा केंद्रशासनाकडून सूचना आल्या म्हणून १२ डिसेंबर, २०१२ ला आराखडा पाठविला. केंद्र शासनाकडून सतत सूचना येत गेल्या म्हणून आराखडयात बदल होत गेले.

हा सर्व प्रक्रियेचा भाग आहे. आधुनिकीकरणाचा विषय एका टप्प्याचा नव्हता. २६/११ मुंबईवर झालेल्या हल्ल्यानंतर आधुनिकीकरणामध्ये बदल झाले आहेत. फोर्स १ ची स्थापना करण्यात आली. याकडे समितीने लक्ष वेधले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, फोर्स १ ही राज्य शासनाची योजना म्हणून राबविली आहे.

केंद्र शासनाकडून अनुदान मिळण्यामध्ये सहा महिने विलंब झालाका ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रक्रियेमध्ये विलंब झाला. परंतु पुढील वर्षी मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाने या कार्यक्रमांतर्गत आतापर्यंत ११२८ कोटी रुपये दिलेले आहेत, त्यातील १०६५ कोटी रुपये वापरले आहेत. या कार्यक्रमांतर्गत मोठया प्रमाणात वाहने घेतली आहेत, शस्त्रे घेतली आहेत, न्याय सहाय्य प्रयोगशाळेच्या (फोरेन्सिक लॅबच्या) बांधकामाला चालना देण्यात आली आहे.

केंद्र शासनाने अशी कोणती सूचना केली की, ज्या सूचनेची पूर्तता करण्यास सहा महिने लागले, ज्यामुळे राज्याचे नुकसान झाले? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या काळात विलंब झाला आहे. परंतु केंद्र शासनाने मंजूर केलेला कार्यक्रम त्यांच्या मदतीने राबविण्यात आला. परंतु सन २०१२-१३ चा निधी पुढील वर्षात प्राप्त झाल्यामुळे कार्यक्रम उशीरा राबविण्यात आला.

होमगार्ड आणि नागरी संरक्षण या घटाकांचे विलंबामुळे मोठे नुकसान झाले. वेळेवर निधी न आल्यामुळे त्यांना १० ते ११ महिने भत्ते दिले गेले नाहीत. पोलीस खात्याला ही यंत्रणा चालवायची आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, होमगार्डच्या भत्त्याचा विषय आहे तो आधुनिकीकरणाशी निगडित नाही. त्या संदर्भातील माहिती विभागाकडे उपलब्ध आहे. सप्टेंबर, २०१६ नुसार ३६,८३९ होमगार्ड आहेत. दिनांक १४.२.२०१४ च्या आदेशाप्रमाणे त्यांना प्रतिदिन प्रती होमगार्ड सुधारित कर्तव्य भत्ता ३०० रुपये देण्यात येतो.

नागरी संरक्षण दलाबाबत काय स्थिती आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नागरी संरक्षण दलासाठी अर्थसंकल्पीय तरतूद वेगळी आहे. त्यासंदर्भातील माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल असे सचिवांनी आश्वस्त केले. त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

नागरी संरक्षण विषयक कायदा दि.10.7.1968 पासून संपूर्ण देशात कार्यान्वित झाला असून, नागरिकांच्या जिवितांचे व मालमत्तेच रक्षण करणे, आपत्ती व्यवस्थापन करणे, उत्पादन कायम राखणे, सामाजिक जीवन सुरळीत करणे, नागरीकांची नितिधैर्य व मनोबल वाढविणे आणि युध्दजन्य परिस्थितीमध्ये व आपत्तीमध्ये नागरी जीवन सुरळीतपणे चालू ठेवण्यासाठी शांततेच्या काळात निरनिराळ्या प्रकारचे प्रशिक्षण नागरीकांना देण्याचे काम नागरी संरक्षण दलामार्फत दिले जाते. राज्यस्तरावर नागरी संरक्षण विभागाचे प्रमुख म्हणून संचालकाचे पद निर्माण केलेले असून, या पदावर पोलीस विभागातील पोलीस महासंचालक दर्जातील अधिकारी यांची नेमणूक केली जाते.

दि.14.2.2014 रोजीच्या शासन निर्णयान्वये नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना कर्तव्य भत्ता .150/- प्रति दिन, प्रशिक्षण भत्ता रु.45/- प्रति दिन व उपाहार भत्ता रु.50/- प्रत्येकी दिला जातो.

नागरी संरक्षण दलासाठी सन 2012-13 या आर्थिक वर्षात रु.9.65 कोटी, सन 2013-14 या आर्थिक वर्षात रु.9.70 कोटी, सन 2014-15 या आर्थिक वर्षात 9.87 कोटी, सन 2015-16 या आर्थिक वर्षात रु.10.25 कोटी व सन 2016-17 या आर्थिक वर्षात रु.9.41 कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.

प्रधानशीर्ष ४०७०-इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च ८०० (००) (१०) पोलीस प्रशिक्षण शाळेसाठी निवासी इमारतीचे बांधकाम करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास सहायक अनुदानया शिर्षाखाली ६३३३.४२ लाख रुपये इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली. त्याची कारणे विहित मुदतीत महालेखापालांना कळविली नाहीत म्हणून हा प्रश्न उपस्थित झाला. कारणे वेळेवर न कळविण्याला जबाबदार कोण आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा विषय पण तसाच आहे, आधुनिकीकरणाचा तो एक भाग होता. त्या वर्षी राज्यशासनाचा कार्यक्रम केंद्राकडून मंजूर होऊन आला, त्या वर्षात केंद्राकडून निधी देखील कमी आला. पण विभागाची तयारी पण नव्हती. सन २०१२-१३ मधील अर्थसंकल्पीत निधी सन २०१३-१४ मध्ये खर्च झाला. सन २०१३-१४ चा निधी सन २०१४-१५ मध्ये खर्च केला. विभागाने तरतूद केली परंतु मान्यता वेळेवर प्राप्त झाली नाही किंवा विभागाची खर्च करण्याची प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही म्हणून पुढील वर्षी खर्च करण्यात आला. तसेच पुढील वर्षी गृहनिर्माण व इमारतीसाठी मोठा कार्यक्रम हाती घेतला. त्या संदर्भातील परिपूर्ण माहिती समितीला सादर करण्यात येईल असे देखील विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहितीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.गृहनिर्माण व इमारतीसाठी माहे एप्रिल 2012 ते मार्च 2017 या कालावधीत देण्यात आलेल्या कार्यक्रमाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

एकूण 53 प्रकल्प (1,800 निवासस्थाने) पूर्ण करण्यात आले आहेत. (प्रशासकीय मान्यता रु.762.67 कोटी, मार्च-2017 च्या अखेरपर्यंत रु.655.51 कोटी खर्च)

एकूण 34 प्रकल्पांचे काम सुरु असून, त्यापैकी 16 निवासी इमारतींचे (2,469 निवासस्थाने) व 18 प्रशासकीय इमारतींचे प्रकल्प आहेत (प्रशासकीय मान्यता रु.1,173.53 कोटी, मार्च-2017 च्या अखेरपर्यंत रु.224.52 कोटी खर्च)

म्हाडाकडून एकूण 383 पोलीस निवासस्थाने खरेदी करण्यात येत आसहेत (पाच प्रकल्प) (प्रशासकीय मान्यता रु.85.29 कोटी, मार्च, 2017 च्या अखेरपर्यंत रु.29.58 कोटी खर्च)

1,092 निवासस्थानांच्या बांधकामासाठी (चार प्रकल्प) निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आल्या आहेत (प्रशासकीय मान्यता रु.419.56 कोटी)

6,090 निवासस्थाने बांधकाम प्रकल्प (12 प्रकल्प) आणि 11 प्रशासकीय इमारती बांधकाम प्रकल्प निविदास्तरावर आहेत (प्रशासकीय मान्यता रु.1,862.84 कोटी)

१) 38,322 निवासस्थानांचे बांधकाम प्रकल्प (184 प्रकल्प) आणि 17 प्रशासकीय इमारती बांधकाम प्रकल्प नियोजनस्तरावर आहेत (अंदाजे खर्च रु.9,580.50.50 कोटी)

उपरोक्त लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की,गृह विभागाने सन २०१२ ते सन २०१७ मधील गृहनिर्माण व इमारतींसाठी देण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या माहितीचा लेखाजोखा समितीला सादर केला आहे. परंतु त्यामुळे आमचा विषय बाजूला पडला.यावर विभागीय सचिवांनी सांगितले की,त्यावर्षी प्राप्त निधीतील काही निधी खर्च होऊ शकला नाही, हे खरे आहे. तसेच, मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतील २० टक्के निधी वित्त विभागाने दिला नाही. त्यामुळे खर्च होऊ शकला नाही. याचा उल्लेख महालेखाकारांच्या टिपणीमध्ये करण्यात आला आहे. मी कबूल करतो की, लेखा आक्षेप काढण्यात आल्यानंतर त्यावेळी उत्तर द्यावयास पाहिजे होते की, २० टक्के निधी वित्त विभागाने दिला नाही. सदरहू बाब आता महालेखापरिक्षक यांना कळविण्यात आली असून त्याची नोंद महालेखापाल यांनी घेतली आहे.

गृह विभागाचे सचिव हे पूर्वी वित्त विभागाचे सचिव म्हणून कार्यरत असल्यामुळे त्याप्रमाणे ते समितीला उत्तर देत असून वित्त सचिव म्हणून समितीला त्यांच्याकडून उत्तर अपेक्षित नसून गृह विभागाचे सचिव म्हणून त्यांनी समितील उत्तरे द्यावी. गृह विभागाला निधी प्राप्त झाला नाही, असा लेखा आक्षेप नाही तर प्राप्त निधी विभागाने प्रत्यार्पित केला आहे, त्याची कारणे काय ? विभागाने त्या संदर्भातील कारणे विहित वेळेत महालेखाकार कार्यालयास कळविली असती तर हा लेखा परिच्छेद समितीसमोर चर्चेसाठी आला नसता. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की,

अर्थसंकल्प करीत असताना दोन्ही गोष्टी करणे आवश्यक होते. विभागाला निधी प्राप्त झाल्यानंतर तो खर्च करण्याची तयारी विभागाने केली पाहिजे व त्यासाठी आवश्यक मान्यता घेतल्या पाहिजे. विभागाचा सन २०१२-१३ चा कार्यक्रम उशिरा मान्य झाला त्यामुळे उशिराने निधी प्राप्त झाल्याने तयारी नसल्यामुळे तो खर्च झाला नाही. परंतु पोलीस निवासी इमारतीचे बांधकाम व कार्यालय या संदर्भातील कार्यक्रम पुढे पूर्णपणे घेण्यात आला आहे.

गृह विभागाच्या सचिवांनी यापूर्वी वित्त विभागामध्ये काम केले असल्यामुळे त्यासंदर्भातील त्यांचा अभ्यास गाढा आहे. वित्त विभागाकडे निधीची कमतरता असते. अशा परिस्थितीत काही विभाग नियोजन न करता निधीची मागणी करतात व तो प्राप्त झाल्यानंतर खर्च न करता प्रत्यार्पित करतात. त्यामुळे इतर विभागांना निधीची आवश्यकता असताना त्यांना तो देण्यात येत नाही. एखाद्या विभागाला गरज नसताना त्यांच्याकडून निधी मागणी करण्यात येते व त्यांना तो देण्यात येतो व ज्या विभागास निधीची गरज असते त्यांना तो देण्यात येत नाही, हे यंत्रणेचे अपयश नाही काय ? असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ते वित्त विभागामध्ये कार्यरत असताना अंदाज समितीसमोरील साक्षीच्या वेळी अशाच प्रकारचा प्रश्न चर्चेसाठी आला होता त्यावेळी देखील असेच उत्तर दिले होते. सर्व विभागांना काही उत्पादित केल्याचे आणि निष्पादित केल्याचे दाखवावयाचे असते त्यासाठी त्यांच्याकडून नियोजन करण्यात येते. सदरहू नियोजन करीत असताना विभाग संकुचित नसतो, प्रयत्न करुन साध्य केले पाहिजेअसे विभागास वाटत असते. त्यादृष्टीने विभागाकडून निधीची मागणी करण्यासाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येतो. वित्त विभागाकडून सदरहू प्रस्ताव सरकारला कार्यक्रम घ्यावयाचा असल्याने मान्य करण्यात येतो. अशा प्रकारच्या प्रस्तावामध्ये प्रशासकीय मान्यता नाही, यावर्षी खर्च होऊ शकेल का, अशा प्रकारचे अनेक प्रश्न काढता येणे शक्य असते. परंतु त्यामुळे विभागाला लक्ष देणे व ते त्यांच्याकडून साध्य करुन घेण्यास बाधा येईल, अशा प्रकारची भूमिका वित्त विभागाची असते म्हणूनच गृह विभागाने उद्दीष्ट समोर ठेवून ते पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

परंतु गृह विभागाकडून तसे प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. याकडे समितीने लक्ष वेधले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू प्रक्रिया पार पाडत असताना केंद्र शासन व राज्य शासन या दोन

टप्प्यावर मान्यता घ्यावी लागते. सदरहू मान्यता घेण्यास विलंब झालेला असून तो टाळण्याकरिता प्रक्रिया दुरुस्त केली पाहिजे, ही बाब मान्य आहे. विभागाचा निधी वारंवार व्यपगत होत आहे हे विभागीय सचिव म्हणून पदभार घेतल्यानंतर सुरुवातीस निदर्शनास आले आहे. त्यामुळे मान्यता देतम्ा ती "कायमची मान्यता" देण्यासंदर्भातील शासन निर्णय तातडीने काढला आहे.

गृह विभागाचे सचिव आता ज्या प्रमाणे भूमिका मांडत आहेत त्याप्रमाणे वित्त विभागाचा पदभार सांभाळत असताना मांडत नव्हते. ते आता ज्या अडचणी सांगत आहेत त्या सर्व विभागांना येतात.ज्या लेखाशिर्षाखाली विभागाला निधी प्राप्त झाला असेल तो तात्काळ खर्च झाला पाहिजे. परंतु तो त्याप्रमाणे खर्च होत नसल्यामुळे अशा प्रकारचे लेखा परिच्छेद समितीसमोर चर्चेस येतात. उक्त लेखा परिच्छेदासंदर्भात आता जी कारणे सांगण्यात येत आहेत ती त्यावेळी महालेखाकार कार्यालयास का कळविण्यात आले नाही ? सदरहू बाब त्यावेळी स्पष्ट झाली असती तर हा लेखा परिच्छेद समितीने वगळला असता. काही विभागांना आवश्यकता असताना त्यांना निधी मिळत नाहीत आणि काही विभाग प्राप्त निधी खर्च करु शकत नाही, अशी परिस्थिती आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू लेखा परिच्छेदासंदर्भात गृह विभागाने कोणत्या कारणास्तव निधी प्रत्यार्पित केला याची कारणे व त्यावेळी आलेल्या अडचणी कळवावयास पाहिजे होत्या.

प्रधानशीर्ष ४०७० इतर प्रशासनीक सेवांवरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च ८०० (००) (०५) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळास सहाय्यक अनुदान :

महामंडळाच्या माध्यमातून पोलिसांसाठी घरे बांधण्यात येतात व त्यासाठी गृह विभागाकडून निधी हस्तांतरीत करण्यात येतो. महामंडळाने सदरहू निधी पूर्णपणे खर्च केला काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, दोन कामे पूर्ण झाली असून बाभळगाव जिल्हा लातूर येथील १७१ निवासस्थानांचे काम पूर्ण झाले आहे.सदरहू कामासाठी प्राप्त सर्व निधी खर्च आहे.

लेखाशीर्ष ४०५५ - पोलीस यांवरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च ८०० (००) (०३) जिल्हा पोलीस (राज्य हिस्सा २५%) :-

राज्य पोलीस दलाकरिता वाहने आणि शस्त्र यासंबंधीची खरेदी प्रक्रिया वेळेवर पूर्ण न होण्याची कारणे काय, कोणत्या कारणास्तव निधी प्रत्यार्पित करण्यात आला, सदरहू जबाबदारी कोणाची होती ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उक्त खरेदी संदर्भात पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून त्यांच्या माध्यमातून सदरहू खरेदी प्रक्रिया पार पाडण्यात येते. सदरहू खरेदी करावयाच्या वस्तूंची संख्या खूप आहे.तसेच विभाग कोठे कमी पडतो हे विभागाने तपासले पाहिजे. त्यामुळे उक्त प्रकरणी सन २०१२-१३ मध्ये काय झाले. याबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

विभागीय सचिवांकडून उत्तर प्राप्त न झाल्याने समितीने नाराजी व्यक्त केली व असे मत व्यक्त केले की, ज्या विषयाचा परिच्छेद समितीच्या बैठकीत चर्चेला येणार आहे त्या विषयाचा संपूर्ण अभ्यास विभागीय सचिवांनी केला पाहिजे तसेच त्यांना सहाय्य करण्यासाठी येणाऱ्या अधिकाऱ्यांनी योग्य माहिती विभागीय सचिवांना दिली पाहिजे यावर विभागीय सचिवांनी सांगितले की,I share your concern entirely. In fact, I am repsonsible for ensuring the answers available before me. My efforts have not adequate in giving answers to your questions. It is a fact and I accept it. This audit para is pertaining to year 2012-2013, and therefore I need the records before me for giving answer to the Committee.

ही सर्व खरेदी प्रक्रिया २६/११ च्या हल्ल्यानंतरची असून त्यानंतर विभागाला केंद्र शासनाकडून हा निधी प्राप्त झाला आहे. पोलीस दलाचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण याकरिता सदरहू निधी प्राप्त झाला होता, त्यामुळे हा मुद्दा खूप महत्त्वाचा आहे.त्यामुळे हा मुद्दा इतक्या सहजतेनेघेऊन चालणार नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू खरेदी मध्ये कोणत्या वस्तूंचा समावेश होता, खरेदी प्रक्रिया कधी सुरु करण्यात आली, कोणत्या अडचणी आल्या व त्यासाठी उशिर होण्याची कारणे काय होती,

यासर्व प्रश्नांची उत्तरे समितीला अपेक्षित आहेत. परंतु त्यासंदर्भातील सर्व सविस्तर माहिती प्राप्त होऊ शकली नाही. त्यामुळे विभागीय सचिवांनी विनंती केली की, As far as this particular programme is concern, what I understand that the purchase for this year is happend with the last year budget funds. Now, the point raised on this para is that the department had not spend these funds in the respective year. Therefore, I need to see, what is the total programme for which the department had obtained approval? What is the present status of the implementation of that programme over a period of 10 years? This is the overall picture I have to obtain.

We are not asking general questions on the present subject. We are asking about specific period and specific programme as per the audit para. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले की, unfortunately, I am not able to see the files personally. I will see the files personally and give you a detailed note on this subject.

सदरहू खरेदी प्रकरणी कोणामुळे वेळेवर करणे शक्य झाले नाही, त्यांच्या विरुध्द विभागाने कारवाई करणे समितीस अपेक्षित आहे. सदरहू खरेदीसाठी काही तांत्रिक अडचणी असतील व खरेदी प्रक्रियेसंबंधी संबंधित अधिकाऱ्यांची चूक नसेल तर ती बाब समिती मान्य करेल. परंतु अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे प्राप्त निधी खर्च झाला नसेल तर त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. सदरहू प्रकरणी योग्य ती कार्यवाही करुन त्यासंदर्भातील अहवाल समितीस एक महिन्यांच्या आत सादर करावा. असे निदेश समितीने दिले असत विभागीय सचिवांनी त्यास होकारार्थी उत्तर दिले.

निधीसंदर्भात विभागाला कोणत्या महिन्यात तसे पत्र दिले ? कदाचित विभागाचा प्रस्ताव अगदी शेवटी गेला असेल. काही तरी कोठे तरी गडबड झाली असेल अन्यथा असे होत नाही.केंद्र शासनाची यंत्रणा अगदी व्यवस्थित आहे. त्यांनी विभागाचा प्रस्ताव योग्य वेळेत केंद्र सरकारला जायला पाहिजे होता. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांच्या समोर असलेल्या टिपणीनुसार दिनांक २८.२.२०१३ रोजी केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झालेली असतानाच केंद्र शासनाने निधी कमतरतेमुळे दिनांक ११.३.२०१३ रोजीच्या पत्रान्वये केवळ आवश्यक बाबींचा प्रस्ताव राज्यस्तरीय खरेदी समितीच्या मान्यतेसाठी सादर करावा, असे कळविले होते.

विभागाने फेब्रुवारी, २०१३ मध्ये प्रस्ताव सादर केला होता. विभागाकडे तरतूद होती. विभागाने मे महिन्यामध्ये सर्व फायनल करुन दिले असते तर ही प्रोसेस जर जून, जुलै, ऑगस्टमध्ये झाली असती तर, केंद्र शासनाचा निधी मिळाला असता. शेवटी शेवटी केंद्राच्या काही ॲडजस्टमेंट असतात व त्यांचेही बजेट राज्याच्या अगोदरचे असते.ॲडजस्टमेंट असतात आणि कोणी तरी जास्त निधी घेऊन जातो. गृह विभाग फेब्रुवारी महिन्यामध्ये गेल्याने मार्चमध्ये ही अडचण आली. हाच प्रस्ताव जर आपण जुलै, ऑगस्टमध्ये नेला असता तर, हा निधी मिळाला असता असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात घटनाक्रम सांगताना असे सांगितले की, दिनांक १६.५.२०१२ रोजीच केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानंतर झालेल्या केंद्र शासनाच्या एका समितीने तत्वत: मान्यता दिली. केंद्र शासनाच्या सूचनेनुसार मुख्य सचिवांकडे बैठक होऊन दुसऱ्यांदा परत मान्यता दिली. दिनांक१० मे व दिनांक १० ऑगस्ट रोजी बैठका झाल्या व दिनांक १ सप्टेंबर रोजी आपण सुधारित आराखडा पाठविला. परत केंद्राने सूचना केली की, बदल करा. केंद्राकडूनही यात वेळोवेळी बदल सुचविण्यात आले.

विभागाने मे महिन्यामध्ये पत्र पाठविल्यानंतर केंद्राकडून असे पत्र मिळाले की, केवळ आवश्यक असलेला निधी मागवावा असे सांगितले. विभागाने हीच गोष्ट अगोदर सांगितली असती तर हा परिच्छेद आला नसता. समिती वेळोवेळी सर्व विभागांना सुचित करते की, योग्य कारणे महालेखाकारांना दिली असती तर, महालेखाकारांचा परिच्छेदच आला नसता. आणि मग बैठकीत त्यावर चर्चा करण्याची आवश्यकताच भासली नसती. त्यामुळे त्रुटी वगैरे असतील तर त्या सुधारल्या गेल्या पाहिजेत.

विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

<u>पोलीस दल आधुनिकीकरण योजना सन २०१२-१३ चा वार्षिक कृती आराखडा (केंद्र शासनाकडून प्रस्ताव मान्यतेची वस्तुस्थिती)</u>

१) पोलीस दल आधुनिकीकरण योजनेचा सन २०१२-१३ चा आराखडा केंद्र शासनास सादर करण्यासाठी राज्य शासनाच्या मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय खरेदी समितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने दिनांक १६.०५.२०१२ रोजी केंद्र शासनास रु.२००.०५ कोटी रकमेचा आराखडा सादर करण्यात आला.

२) केंद्र शासनाच्या उच्चस्तरीय समितीची दिनांक २०.०६.२०१२ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने वरील रकमेचा मर्यादेत अंतर्गत बाबनिहाय बदल करुन सुधारीत आराखडा सादर करण्यास केंद्र शासनाने कळविले.

३) केंद्र शासनाच्या उपरोक्त बैठकीतील सूचनांच्या अनुषंगाने मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीची दिनांक 14.07.2012 व दि.09.08.2012 रोजी बैठक झाली.

४) सदर बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक 01.09.2012 रोजी पुन्हा सुधारीत आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात आला.

५) केंद्र शासनाचे दिनांक 04.10.2012 रोजीच्या पत्रानुसार त्यांच्या यापूर्वी दिनांक 18.09.2012 रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. त्यास अनुसरुन या विभागाच्या दि.27.11.2012 रोजीच्या पत्राने पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्रस्ताव मागविण्यात आला.

६) पोलीस महासंचालक कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावास मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय खरेदी समितीच्या दि.1.12.2012 रोजीच्या बैठकीत मान्यता घेवून दि.12.12.2012 रोजी रु.218.07 कोटीचा सुधारीत कृती आराखडा, रु.43.61 कोटीचा पुरवणी आराखडा आणि रु.76.26 कोटीचा मेगासिटी आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात आला.

७) परंतु, उपरोक्त प्रस्तावास अनुसरुन केंद्र शासनाने दिनांक 28.02.2013 च्या पत्रान्वये एकूण रु.39.88 कोटी (केंद्र हिस्सा रु.23.93 कोटी व राज्य हिस्सा रु.15.95 कोटी) इतक्या रकमेचाच आराखडा मंजूर करुन केंद्र शासनाने त्यातील केंद्र हिस्स्याची रु.21.30 कोटी रक्कम राज्य शासनास वितरीत केली आणि उर्वरित रु.2.63 कोटी इतका निधी शस्त्र व दारुगोळा खरेदीसाठी ऑर्डनन्स फॅक्टरी बोर्डाकडे परस्पर वितरीत केली.

८) मात्र, केंद्र शासनाने वरील मंजूर आराखड्यातील बाबींसाठी निधी कमतरता भासत असल्याने राज्य शासनाने आवश्यक तेवढ्याच बाबींसाठी पुन्हा प्रस्ताव तयार करुन त्यास राज्यस्तरीय खरेदी समितीची मान्यता घ्यावी, असे केंद्र शासनाने दिनांक 11.03.2013 च्या पत्रान्वये कळविले.

९) राज्य शासनाने केंद्र शासनाने आधी मंजूर केलेल्या आराखड्यामध्ये कोणताही बदल करणे शक्य नसल्याने राज्यस्तरीय समितीच्या दिनांक 22.03.2013 रोजी झालेल्या बैठकीत केंद्र शासनाने यापूर्वी दिलेल्या मान्यतेनुसार रु.39.88 कोटी रकमेचा आराखडा अंतिम करण्यात आला. त्यानुषंगाने, पोलीस दल आधुनिकीकरण योजनेचा सन 2012-13 चा आराखडा दिनांक 30.03.2013 रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

पोलीस दल आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत सन 2011-12 मधील अखर्चित रकमेचा पुनर्जिवित कार्यक्रम (Revalidation)

त्याचप्रमाणे, पोलीस दल आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत सन 2011-12 मधील अखर्चित रु.79.81 कोटी रकमेचा पुनर्जिवित कार्यक्रम (Revalidation)सन 2012-13 राबविण्याकरीता दिनांक 12.11.2012 च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

उपरोक्त लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, पोलीस दल आधुनिकीकरण योजनेसाठी वर्षाच्या अखेरीत निधी मिळालेला होता. हा निधी सन २०११ – १२ मध्ये खर्च न करता पोलीस दल आधुनिकीकरण कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३ मध्ये हा निधी Revalidation करुन हा निधी पोलीस दल आधुनिकीकराणावर खर्च करण्यात आलेला आहे. गृह विभागाने अशा प्रकारचा अहवाल लोकलेखा समितीस दिलेला आहे. सन २०११-१२ मधील निधीचे Revalidation केले होते काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले होते की, पोलीस दल आधुनिकीकरण हा लहानस एक घटक आहे. या संबंधित हा निधी होता. पोलीस दलातील दैनंदिन व्यवहार आहेत. यामध्ये पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांचे पगार, तेथील स्वयंसेवकांच्या ट्रेनिंगसाठी व जे कर्मचारी ड्युटीवर असताना त्यांना जो भत्ता दिला जातो. या संदर्भात हा निधी खर्च केला जातो.

पोलीस दलाच्या आधुनिकीकरण कार्यक्रमाअंतर्गत होमगार्डचे आधुनिकीकरण यासंदर्भातसन २०१२-१३ मध्ये २,१६,७५,००० Grant received at the fag-end of the year. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की,केंद्र शासनाकडून हा निधी अंतिम क्षणी प्राप्त

झाल्यामुळे गृह विभागाने हा कार्यक्रम राबवू शकलेला नाही.त्यावर्षी जो नियमित कार्यक्रम होता तो आपण राबविलेला आहे. यासाठी जो खर्च झालेला आहे. त्या खर्चाचा उल्लेख केलेला आहे.

पोलीस दल आधुनिकीकरण योजने अंतर्गत वाहने व शस्त्र खरेदी प्रक्रिया वेळेवर पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत? तसेच अधिकाऱ्यांच्या हलगर्जी पणामुळे प्राप्त निधी खर्च झाला नसेल तर त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. असे आपण म्हटले आहे पण गृह विभागाने कोणत्या अधिकाऱ्यावर कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे की नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भामध्ये पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांनी पुरवठा आदेश निर्गमीत केलेले होते. पोलीस आयुक्तांनी एसी बील सादर केले होते पण एसी बील सादर करण्यासाठी अर्थ खात्याने मान्यता दिलेली नाही म्हणून ते बील मंजूर झालेले नाही.

दिनांक ३० मार्च २०१३ रोजी वाहने व शस्त्रे खरेदी करण्यासाठी मान्यता देण्यात आली. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी मान्यता दिल्यामुळे अशा प्रकारचा गोंधळ झालेला आहे. एसी बिलाच्या संदर्भात आपण पुढील परिच्छेदामध्ये असे सांगितले आहे की, निधीची कमतरता असल्यामुळे आम्ही एसी बिलावर मान्यता देत नाही. अशा प्रकारचा प्रस्तापित नियमच आहे. रेग्युलर बिलास मान्यता देण्यात येते. आपण मार्च २०१३ च्या शेवटच्या दिवशी एसी बिलास प्रशासकीय मान्यता देऊन मार्च २०१३ च्या बिलावर निधी घेतल्यामुळे हा निधी अखर्चित राहिलेला आहे. असे समितीचे मत आहे. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, एसी बिलास मान्यता मिळण्याची अशी प्रक्रिया आहे की, केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर प्रशासकीय मान्यता दिली जाते. अशा पध्दतीमुळे एसी बिलास मान्यता मिळण्यास उशीर झालेला आहे. त्यामुळे पुढील जी प्रक्रिया होती. ती डिलेव्हरी होऊन सुध्दा निधी देय होत नव्हता. एसी बिलाचा प्रस्ताव अर्थ खात्याने मान्य केलेला नाही. या कामासाठी पुढील वर्षीच्या निधीतून खर्च करण्यात यावा. अशा सूचना दिलेल्या आहेत.

सन २०१३ चा निधी खर्च झालेला नाही. ही वस्तूस्थिती मान्य करावी लागेल. पुढच्या वर्षीच्या प्रशासकीय मान्यतेला Revalidation मिळालेले आहे. सन २०१३-१४ च्या बजेटमधूनच निधी खर्च

करण्यात आलेला आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी प्रशासकीय मान्यता मिळाल्यामुळे निधी मंजूर झाल्यानंतर केंद्र शासनाकडून निधी वेळेवर येणे आपेक्षित होते पण तो निधी उशिरा प्राप्त झाला होता.

प्रशासकीय मान्यतेनंतरच निधी येतो. प्रशासकीय मान्यता शेवटच्या दिवशी दिली तर निधी प्राप्त होण्यास वेळ लागणारच आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या योजनेसाठी केंद्र शासनाची मान्यता आवश्यक होती.गृह विभागास निधी उशिरा मिळालेला आहे. कारण या योजनेस केंद्र शासनाची मान्यता अंतिम क्षणी मिळालेली आहे. म्हणजे या योजनेस केंद्र शासनाची मान्यता केव्हा मिळालेली आहे?२७ फेब्रुवारी रोजी या योजनेस केंद्र शासनाची मान्यता मिळालेली आहे. केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर मुख्य सचिवांची एक कमिटी आहे. या कमिटीने मान्यता दिल्यानंतर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढले जातात.

गृह विभागाने सादर केलेल्या लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, मुख्य सचिवांची मान्यता घेऊनच हा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येतो. त्या प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्यासाठी गृहविभागास एक महिन्याचा विलंब का झाला. याचे कारण काय आहे? प्रशासकीय मान्यतेस एक महिना उशीर झाल्यामुळे त्यावर्षी हा निधी खर्च करु शकलो नाही. गृह विभागाचे या विषयी काय मत आहे? या विषयीची जाबाबदारी फिक्स करण्याबाबत देखील समितीच्या मागील बैठकीत चर्चा झालेली होती. या कामाची जाबाबदारी गृह विभागाने कोणत्याही अधिकाऱ्यास दिलेली नाही. विनियोजन लेखे अनुदा क्रमांक बी – १० यामध्ये जे प्रश्न विचारले गेले आहेत, त्या सर्व प्रश्नांची उत्तरे विभागाकडूनएकच प्रकारे देण्यात येत आहे. पोलीस दल आधुनिकीकरण योजनेस सन २०१३ मधील निधी का खर्च केलेला नाही. प्रशासकीय मान्यता वेळेवर न देणे, एसी बिले वेळेवर न काढणे तसेच २७ फेब्रुवारी रोजी या प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी एक महिन्याचा कालावधी का लागलेला आहे. याविषयी सविस्तर माहिती समितीस द्यावी असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक ११ मार्च, २०१३ रोजी केंद्र शासनाचे पत्र प्राप्त झाले होते. In the said letter it is written that,

"Only part of Action Plans can be implemented by State Governments within the limited funds available. Therefore, State Governments are requested that the activities which are to be picked up for implementation of the scheme within the available funds may be got approved by the State Level Empowered Committee". त्यानंतर गृह विभागाकडून केंद्र शासनास एक पत्र पाठविण्यात आले होते. आपण त्यांना असे कळविले आहे की, "State Level High Powered Committee took its meeting on 22nd March and approved the Plan amounting to Rs.39.88 crores." निधी प्रमाणे प्लॅनमध्ये कपात करण्यात यावी. असे शेवटच्या क्षणी सांगण्यात आले होते. त्यामुळे या कामासाठी उशीर झालेला आहे. मागिल बैठकीवेळी मी आपणास सांगितले आहे की, या संदर्भामध्ये प्रक्रियात्मक सुधारणा करण्याची आवश्यकता होती. ती सुधारणा गृहविभागाने यावर्षी केलेली आहे. आपण अशी सूचना केलेली आहे की, प्रशासकीय मान्यता निधी उपलब्धेशी निगडीत नाही. मागील वर्षीपासून आपण असे केले आहे की, प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर वेळोवेळी अर्थसंकल्पीत होणाऱ्या निधीतून खर्च करावा असे आदेश काढण्यात आलेले आहेत. यापूर्वी असे होते की, प्रशासकीय मान्यता देत असताना सन २०१२-१३ मध्ये उपलब्ध असलेल्या निधीतून या कामी खर्च करावा अशा सूचना होत्या. त्यामुळे ऑगस्टमध्ये Revalidation चा प्रश्न निर्माण झालेला आहे. सन २०१२-१३ मधील ३१ मार्च संपल्यानंतर मार्च ते ऑगस्ट पर्यंत Revalidation च्या कार्यवाहीत वेळ गेलेला आहे. या वर्षी आपण अशी योजना केली आहे की, Revalidation साठी आता थांबण्याची आवश्यकता नाही. ज्या निविदा प्रकिया सुरु आहेत, त्या सुरुच राहणार आहेत. यावर्षी जे बजेट उपलब्ध आहे. त्यामधून आपण यासाठी निधी खर्च करु शकतो. अशा प्रकारची प्रक्रियात्मक सुधारणा गृह विभागाने केलेली आहे.

विभागीय सचिवांनी मागील बैठकीत दिलेली माहिती पुन्हा सांगत आहेत. समितीचा मुद्दा असाआहे की, सन २०१३ मधील निधी खर्च का केलेला नाही? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाने या प्रस्तावास उशिरा मान्यता दिल्यामुळे निधी खर्च करता आला नाही. आरकेव्हीवाय ही केंद्र शासनाची योजना आहे. या योजने अतंर्गत आपला प्रस्ताव मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे जात नाही. मुख्य सचिवाकडे जी समिती

आहे त्या समितीमध्ये केंद्र शासनाचे सह सचिव स्तरावरील अधिकारी असतात. ही समिती या प्रस्तावास अंतिम मान्यता देते. या मान्यतेनुसार पुढील कार्यवाही सुरु होते. अशा प्रकारची प्रक्रियात्मक सुधारणा गृह विभागामार्फत केंद्र शासनास सूचविणार आहोत.

संक्षिप्त देयकावर रक्कम काढण्यास परवानगी का दिली नाही? याबाबतच्या नस्तीमध्ये असे उत्तर दिलेले आहे की, सुधारित अंदाज सन २०१२-१३ नुसार महसुली अधिक्य नाममात्र असून ते संतुलित ठेवण्यासाठी महसुली खर्च आटोक्यात ठेवणे अत्यावश्यक असल्याने वित्त विभागास सादर केलेल्या संक्षिप्त देयकांवर रक्कम काढण्याचे काही प्रस्ताव वित्त विभागाने अमान्य केले आहेत. अशा प्रकारचे उत्तर गृह सचिवांचे आहे की, वित्त सचिवांचे आहे? अशा प्रकारचे उत्तर असू शकते का? समितीचा मुद्दा असा आहे की, you are now Additional Chief Secretary, Home Department, then you should reply as Additional Chief Secretary, Home Department. यामध्ये गृह विभागाचे सचिव वित्त विभागाची अडचण सांगत आहात ही बाब निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नस्तीवर जे कारण नमूद केले आहे. तेच कारण विशद केलेले आहे. नस्तीवर असेच नमूद केले आहे की, अर्थ खात्याची टिपणी तशीच आहे.

अशा प्रकारची टिपणी सादर करता येऊ शकते का ? Such reply should not come from that Chair. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नस्तीवर आहे तेच कारण समितीस निषेद केले आहे. जर समितीची परवानगी असेल तर यासंबंधी अर्थ सचिवांशी चर्चा करुन समितीस उत्तर सादर करण्यात येईल असे आश्वास्त केले.

गृह विभागाने या विषयासंदर्भात मागील बैठकीत देखील साक्ष दिली होती.You have not given that as a Secretary of Home Department but as a Secretary of Finance Department and for this reason the Committee has taken out this para. याचा अर्थ असा होतो की,त्यांची अडचण आपणास माहिती आहे. पुढील कालावधीमध्ये त्यांच्याबद्दल गृह विभागाची कोणतीच तक्रार राहणार नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सिस्टम बद्दलच बोलत आहे. यामध्ये काही प्रमाणात टेन्शन असते, अशी भूमिका अर्थ खाते व इतर खात्याची आहे. यामध्ये अर्थ व इतर खात्यांची भूमिका

विरोधी आहे असे नाही. गृह खात्याची भूमिका अशी आहे की, सर्व प्रोग्राम पुढे सुरु ठेवावयाचे आहेत आणि अर्थ खात्याची भूमिका अशी आहे की, गृह विभागास प्रोग्राम सुरु ठेवण्यासाठी मार्गदर्शन करावयाचे आहे. अशा प्रकारचे मार्गदर्शन करीत असताना जे नियम आहेत व जो वित्तीय समतोल आहे. त्या नियमाच्या अधिन राहून अर्थ खाते गृह खात्यास मदत करीत असते. गृह विभागास या वर्षी बजेट मिळालेले आहे. यावर्षी आम्ही सर्व बजेट खर्च केला पाहिजे. अर्थ विभागास असे वाटते की, ज्यावेळी निधीचे वाटप करावयाचे आहे. अशा वेळी एसी बिलावर निधी काढण्यात यावा.

एसी बिलावर निधी काढला नाही पाहिजे. It should be paid on actual. एसी बिलावरुन निधी काढून इकडे-तिकडे निधी जमा करण्याऐवजी हा निधी शासनाकडे राहिला तर या निधीवर लागणारे व्याज थांबेल. एसी बिलावर पैसे काढण्याची पध्दत योग्य नाही.विधिमंडळाने मान्यता दिलेल्या निधीची तरतूद जमा करुन घेण्याची भूमिका विभागाची असते. पुढील वर्षी निधीची तरतूद होईल किंवा नाही याची शाश्वती नसते. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व सांगितले की, अशीच भिती विभागास वाटत होती.

पोलीस दल आधुनिकीकरण कार्यक्रम सन 2012-13 अंतर्गत वाहने व शस्त्रे खरेदी करण्यासाठी दि.30.3.2013 च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. सदर शासन निर्णय वर्षाअखेरीस प्राप्त झाल्यामुळे वाहने/शस्त्रे खरेदी प्रक्रिया वेळेवर पूर्ण होवू शकलीनाही. सदर निधी दि.30.8.2013 च्या शासन निर्णयान्वये पुनर्जिवित करण्यात आला असून, सदरचा निधी शासनाने खरेदी प्रक्रियेसाठी विहित केलेल्या नियमानुसार खरेदी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे येथे असे नमूद करण्यात येते की, सदर योजने अंतर्गत पोलीस महासंचालक कार्यालयाकडून सदरचा निधी त्या-त्या आर्थिक वर्षात जरी खर्च झाला नसता तरी तो पुढील आर्थिक वर्षामध्ये पुनर्जिवित केल्यानंतर सदर निधीमधून खरेदी प्रक्रिया करण्यात येत आहे.

तसेच, सुधारित अंदाज सन 2012-13 नुसार महसुली अधिक्य नाममात्र असून ते संतुलित ठेवण्यासाठी महसुली खर्च आटोक्यात ठेवणे अत्यावश्यक असल्याने वित्त विभागास सादर केलेली संक्षिप्त देयकावर रक्कम काढण्याचे काही प्रस्ताव वित्त विभागाने अमान्य केले आहेत.

लेखाशिर्ष ८००इतर खर्च ८०० (००)(०४) जिल्हा पोलिस (केंद्राचा हिस्सा ७५%):-

उपरोक्त अनुदानासंदर्भात The department has stated in their reply that, "5613.47 lakh was not approved by the Department for withdrawal on A.C. Bill.". What was the problem for not giving approval for drawing those funds on A.C. Bills? This is under the same grant B-10. The department has stated in their reply that, "...approvals of procuring equipments under APF on A.C. Bill was not given by the department hence the amount of 5613.47 lakh was surrendered." ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, It is the major question. We have revalidated it in next year. The unspent amount is only Rs. 37 lakh and not the 5613.47 lakh.

The same figures are shown in your entire reappropriation. Your entire saving is linked with that A.C. Bill which was not allowed to withdrawn. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी खुलासा केला की,ए.सी.बिलाचा उल्लेख येथे दिसत नाही. परंतु गृह विभागाने ५६ कोटी रुपये निधी खर्च केला नाही, ही बाब खरी आहे. But in the accounting process one bill may not got registered in right budget head. ५६ कोटी रुपयांची तरतूद केली असता ती विभागाने खर्च केली नाही, हा विषय महत्त्वाचा आहे. As a management perspective, we had a programme which is very seriously link to the security of the State and safety of the people. Once we had decided to implement such programme then we should be able to answer before an august body like this on that programme. Now, I will give you complete details of this programme from its approval stage to the current status of this programme.

Eventually, what you are looking for is that whether we equipped our force appropriately as planned out under the said programme. There may be an issue with some government process. As you are aware that the Government of India has also said that they want to present the budget on 1st February. This is because of the issues of

approvals coming late and the funds not being able to spend within time. Then the Government has to again go through the budget process. We had also toyed with this idea of preponing our budget Session. But we are having our Winter Session at Nagpur in the month of December and then it is difficult for us to immediately have session in January or February. Therefore, this idea was dropped at that time.

पण महालेखाकार यांचे म्हणणे आहे की, महालेखाकार कार्यालयास ज्यावेळी सदरहू प्रकरणी विभागाने उत्तर दिले होते त्यामध्ये सांगण्यात आले की, "आम्ही देयक सादर केले होते पंरतु त्यास मान्यता दिली नाही."बिल सादर न करता ए.सी.विड्रॉल करणे शक्य नाही, याकडे समितीने लक्ष वेधले असता विभागीय सचिवांनी सांगितले की,एन्टीसीपेशनमध्ये ३६ लाख रुपयांचे बील काढता येईल, असे गृहीत धरुन बील सादर केले होते. वित्त विभाग त्यास मान्यता देईल, अशी गृह विभागाला अपेक्षा होती. सदरहू नस्ती ३१ तारखेला सादर करण्यात आल्यामुळे त्यास मान्यता मिळाली नसल्यामुळे सदरहू बील पास झाले नाही.

मुळात अशा प्रकारे बील सादर करणे चुकीचे आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, अनेक वेळा एन्टीसीपेशनमध्ये एखादी बाब मान्य होईल, असे गृहीत धरुन विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येत असतात. ओव्हर बजेटिंगचा विषय अंदाज समितीसमोर ही आला होता. हे खरे आहे की, अर्थसंकल्प हा आकडेमोड असला तरी तो जनतेचा संकल्प व शासनाचा संकल्प असला पाहिजे. आणि गेली ६ वर्षे विभागीय सचिव म्हणून ते याच भावनेने काम करीत आहेत.

<u>लेखाशिर्ष ८०० इतर खर्च ८००(००)(०६) न्याय सहाय्यक विज्ञान (केंद्राचा हिस्सा ७५%) ०५ राज्य हिस्सा (२५%) :-</u>

उपरोक्त लेखाशिर्षास सन २०१२ मध्ये अर्थसंकल्पीत तरतूदीस मान्यता होती. मग यामध्ये उशीर होण्याची कारणे काय आहेत ? निधी मिळूनही तो परत करण्याची प्रक्रिया झालेली आहे. आपल्या राज्यात खूपदा न्यायालयामध्ये दावे हरतात कारण प्रयोगशाळेचा अहवाल वेळेवर येत नाही. मग न्यायालय त्याला जामीन देते, या सर्व गोष्टी होत असतात. एका बाजूला निधी मिळाला तर प्रयोगशाळा उभी करीत नाही. दुसऱ्या

बाजूला असे म्हणतो की, सुविधा नाहीत. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, राज्याच्या न्याय सहाय्यक प्रयोगशाळेमध्ये होत नाही अशी कोणतीही चाचणी नाही. दुसऱ्या कोणत्याही राज्यात चाचणीसाठी नमुने पाठविले जात नाहीत.

परंतु न्यायालयामध्ये कित्येकदा वेळेच्या अहवाल न दिल्याने जामीन मिळतो ही वस्तुस्थिती आहे की नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, त्याची कारणे वेगळी आहेत. विभागीय सचिवांनी देखील समितीच्या मताशी सहमती दर्शविली व समितीस सांगितले की, विभागाने यंत्रणा तयार केलेली आहे, मात्र कामाचा खूप ओघ आहे. केआरएमध्ये मुख्यमंत्री महोदयांनी अशी सूचना केलेली आहे की, हा कालावधी कमी करुन तो ४५ दिवसांवर आणला पाहिजे. ४५ नवीन भ्रमणध्वनी न्याय सहाय्यक प्रयोगशाळा तयार केलेल्या आहेत. त्यांच्या बळकटीकरणाचा प्रस्तावही घेतलेला आहे. आता ४५ दिवसांचे लक्ष्य ठेवलेले आहे. परंतु ते गाठून पुढे जाणेही गरजेचे आहे.

न्याय सहाय्यक प्रयोगशाळाबाबत समितीने व्यक्त केलेल्या उक्त मताशी विभागीय प्रतिनिधींनी सहमती दर्शविली ही बाब चांगली आहे. परंतु पुढे काय करणार हे लोकलेखासमितीचे काम नसून महालेखाकारांनी काढलेल्या आक्षेपासंदर्भात संबंधीत वर्षात काय घडले त्यावर निर्णय घ्यावयाचा आहे व त्याला मान्यता द्यावी की नाही हे ठरवायचे आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या चुका झालेल्या आहेत त्यातून पुढे जाऊन त्याची दुरुस्ती करण्यात येईल.

जर केंद्र शासनाकडून निधी मिळाला होता तर तो विहित वेळेत वापरण्याची गरज होती असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने सर्व निधी वापरला आहे पण तो विहित वेळेत वापरण्यात आला नाही, ही समस्या आहे प्रत्येक वेळी लेखा परिक्षणात हा मुद्दा उपस्थित केला जातो. हल्ली बऱ्याच देशात मल्ट्री ईअर बजेटीग पध्दत अंवलबिण्यात येत आहे.

यावर्षी मिळालेला निधी खर्च केला नाही, तर पुढच्या वर्षी मिळणार नाही या भीतीपोटीही विभागाकडून जास्त रकमेची तरतूद करण्यात येते. पण विदेशाप्रमाणे मल्टी ईयर बजेटिंग केले तर, मल्टी ईयर प्रोजेक्ट होतील असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, घटनेमध्ये जी ॲन्युअल बजेटची तरतूद

आहे, त्यामुळे मल्टी ईयर बजेट विभागाकडून होऊ शकत नाही. परंतु, हे खरे आहे की, खरेदीसंदर्भात ज्या मान्यता आहेत, जसे की शस्त्राची खरेदी किंवा बाकी काही गोष्टी आहेत त्याबाबत सांगावयाचे झाले तर, त्याची विशिष्टता ठरविणे हे देखील खूप जिकिरीचे काम असते. प्रथम समिती स्थापन होते मग सेट करते आणि त्यानंतर केंद्र शासनाची मान्यता घेण्यात येते. मान्यता मिळाल्यानंतर त्याचे पुरवठदारही फार मर्यादित असतात. त्या शस्त्रांची चाचणी करुन घेण्यासाठी देखील हैद्राबाद व चंदीगढ अशा दोनच ठिकाणी प्रयोगशाळा आहेत. The dates for testing is also coming very late. टेस्टींग झाल्यानंतर मग तांत्रिक मान्यता, फायनान्शिअल निविदा उघडतो. There is a process which needs to be reconcilled.

विभागीय सचिवांचा उपरोक्त खुलासा पाहता समितीने असे सुचित केले की, विभागीय अधिकाऱ्यांनी कामाचा एक तक्ता तयार करावा व त्यानुसार कामाला प्राथम्यक्रम द्यावे हे ठरवावे तर सर्व कामे शक्य होतील यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, The procurement process were continued across the year. Therefore, the first thing I did that whatever approvals we give will be like public works department administrative approvals and they will continue and they will not required to be revalidated.

विभागाकडून झालेल्या निष्काळजीपणाबाबत सचिवांनी समितीस सांगणे अपेक्षित असून सचिव समितीस ते न सांगता पुढे दुरुस्त करतो असे सांगतात. समितीची अपेक्षा आहे की, याप्रकरणीजे जे लोक जबाबदार आहेत, त्यांना कोठे तरी शिक्षा झाली पाहिजे. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून दिरंगाई झाली आहे आणि ती जर एक्सप्लनेबल नसेल तर We will take actionअसे समितीस आश्वस्त केले.

न्याय सहाय्यक प्रयोगशाळेने त्या वर्षी खरेदीची प्रक्रिया पूर्ण न करण्याची कारणे काय आहेत, त्यांना कोणत्या अडचणी आल्या ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, स्कॅनिंग इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप या उपकरणाच्या २ नगांच्या खरेदीसाठी ३.२० कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली होती. परंतु, सदरहू उपकरणाचे उपयोगिता प्रमाणपत्र आल्यानंतर, उपयोगिता सिध्द झाल्यानंतर दुसरा नग

खरेदीबाबतचा निर्णय शासनाने कळविलेला होता. त्यामुळे विभागाने अगोदर एक उपकरण घेतले व त्याचा उपयोग पाहिल्यानंतर दुसऱ्या वर्षी उरलेली २ उपकरणे घेतली. मात्र ती त्याच वर्षी घेऊ शकलो नाही, कारण त्याचा उपयोग पाहण्याबाबत शासनाने सांगितले होते.दुसरे एव्हिडन्स इन्व्हेस्टिगेटर नावाचे एक इक्वीपमेंट होते. त्याच्या निविदेला प्रतिसादच मिळाला नाही, त्यामुळे ते खरेदी करु शकलो नाही.

विभागाकडून आता जी कारणे सांगण्यात येत आहेत ती त्याच वेळेस महालेखाकारांना दिली असती तर कदाचित हा परिच्छेद चर्चेकरिता आलाच नसता पण जर दिरंगाई दिसली तर त्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे. मग ही कारणे तेव्हा न सांगण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हेच कारण आहे की, स्कॅनिंग इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप या उपकरणाचे ३ नग होते. त्यापैकी १ नग १ कोटी ६० लाख रुपयांना घेतला. त्याची उपयोगिता काय आहे, त्यावर ॲनालिसीसचे काम चालते. ते चांगल्याप्रकारे होते हे सिध्द झाल्यानंतर पुढच्या वेळेस२ उपकरणे घेतली. शासनाने विभागाला असा शासन निर्णय दिला होता की, तुम्ही एक उपकरण घेऊन त्याची उपयोगिता पाहून उरलेली दोन उपकरणे घ्या. त्यामुळे विभागाने पुढच्या वर्षी घेतली, नाही तर त्याच वर्षी घेतली असती. दुसऱ्या एव्हिडन्स इन्व्हेस्टिगेटर या इन्स्ट्रूमेंटला जगभरातून निविदाच आल्या नाहीत.

प्रधानशीर्ष ४०५५ पोलीस यांवरील भांडवली खर्च, २०७ राज्य पोलीस, २०७ (००) (०२) नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये पायाभुत सुविधा :-

हा नक्षलग्रस्त भागाचा अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. यामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, केंद्र शासनाने कमी निधी दिल्यामुळे बचत झाली. कें शासनाने कमी निधी देण्याची कारणे काय होती, विभागाचा प्रस्ताव वेळेवर गेला नाही का ? कारण एखादी योजना जाहीर केल्यानंतर त्यासाठी निधी देत नाही असे केंद्र शासन करीत नाही. विभागाच्या त्रुटीमुळे ते राहते केंद्रशासन असे कधी करीत नाही उलट हे सर्व असे होते की, २६/११ च्या पार्श्वभूमीवरचे हे सर्व होते म्हणून खूप निधी उपलब्ध करुन दिला होता. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,केंद्र सरकारने त्यांचा कार्यक्रम स्केल डाऊन केला. त्यांनी पुढच्या वर्षी घेण्यास सांगितले.

प्रधानशीर्ष ४०५५ पोलीस यावरील भांडवली खर्च ८०० इतर खर्च, ८०० (००) (०७) महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळा वर्गणी :-

वित्त विभागाने निधी उपलब्ध करुन दिला नाही म्हणून महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळाचा वर्गणीचा कार्यक्रम होऊ शकला नाही, एकदा अर्थसंकल्पामध्ये निधीची तरतूद केल्यानंतर तो का दिला नाही? अशी विचारणा समितीने वित्त विभागास केली. तथापि, याबाबत उत्तर वित्त सचिवांकडून प्राप्त झाले नाही. पण गृह विभागाच्या सचिवांनी सांगितले की,१७ कोटी रुपये बांधकामासाठी तरतूद करुन घेतली होती. सुरक्षा मंडळाची पार्श्वभुमी अशी आहे की, आपल्याकडे अनेक संस्थानांची सुरक्षेशी संबंधित मागणी येते.त्यामुळे पोलीस बळावर मोठा ताण येत होता. तेवढे मनुष्यबळ उपलब्ध होत नाही. बरीच संस्थाने खाजगी सुरक्षा रक्षक नेमतात. परंतु, त्यांना कायद्याने कोणतेही अधिकार नसतात. त्यामुळे प्रत्यक्ष पोलीस मॅन व सुरक्षा गार्ड् यांच्यामधला दुवा तयार करण्याच्या दृष्टिकोनातून सन २०१० मध्ये आपण एक कायदा केला व महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळ तयार केले. यामध्ये आपण खाजगी किंवा सरकारी, निमसरकारी संस्थांनाच्या मागणीप्रमाणे सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबतची भूमिका घेतलेली आहे. तसेच, कायद्याने असेही बंधन केले आहे की, या सुरक्षा मंडळाकडूनच सर्व संस्थांनांनी माणसे घ्यावीत.पूर्वी डीजीपी स्तरावरील अधिकारी कार्यरत होते. आता एडीजीपी हे वरीष्ठ स्तरावरील अधिकारी व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत आहेत.प्रथम माणसांची निवड करण्यात येते आणि मग ज्या संस्थानांची मागणी असतेत्याप्रमाणे त्यांना सुरक्षारक्षक पाठविण्यात येतात. This is the only Government security which can carry weapons. No other security were allowed to carry weapons. This Rs.17 Cr. was proposed for constructing training center in Baramati. I have seen this proposal. At the time when it came before the Finance Department, there was no clearity that whether the land is available or not? What would be the cost? What is the plan? Then the finance Department told to keep aside this proposal for this year.This corporation is presently charging Rs. 20000/month. They are making reasonable amount of profit. I had gone through the records of last Board

meeting which was happend in 2016. In the said meeting, the Board has said that at this point of time we need not bother the Government for funds. Becasue they have accumalted some kind of corpus. Now, they are having 2000 guards which has been provided to 62 institutions. The recruitment was a stumbling block for them. Now, they have taken a policy decision that whoever appears for the recruitment of Police Constable and do not make it, they can be recruited in this corporation.

This decision was announced by the late Hon'ble Home Minister, Shri R.R. Patil in the Assembly House. असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की,They have also prepared a training module for them. The present training has been done in police establishments only and they have a proper weapons policy. They keep the normal terms of employment which are required by law for recruitment. At this point of time Rs. 17 cr. was asked for but the Finance Department told that the proposal is not fully complete and therefore they did not approved it.

असे कित्येक प्रस्ताव येतात की, ज्यांना प्रायॉरिटी असते मात्र त्यांना निधी मिळत नाही. कोणी तरी पत्र देतो की, अमूक कारणासाठी तरतूद करावी आणि तशी तरतूद विभागाकडून कोणत्याही पार्श्वभुमीशिवाय करण्यात येते. त्यामुळे अशी परिस्थिती निर्माण होते असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, It is absolutely necessary for the Finance Department to take on board the aspirations. It is very difficult for us to say that, हे करण्यासारखे नाही, करु नये, तयारी नाही तुमची असे आम्ही फायनान्समध्ये सर्वांना फेल करीत बसलो तर बजेटची साईज ३/४ होऊन जाईल.

पोलिसांवरील ताण कमी करणे व खाजगी सुरक्षा रक्षकांना नोकरी मिळणे याकरिता दोघांमध्ये समन्वय साधण्यासाठी कायदा करण्यात आला होता. तत्कालीन गृह मंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी त्यावेळेस सभागृहात असे सांगितले होते की, यातून १० ते १५ हजार सुरक्षा रक्षक तयार होतील व सुरक्षेकरिता ते वापरता

येतील जेणेकरुन पोलिसांवरील ताण कमी होईल. त्यानंतर मला असे वाटते की, आतापर्यंत केवळ २ हजार सुरक्षा रक्षकांची भरती केलेली आहे. त्यावेळेस ३० हजार इतक्या भरतीचा विषय होता ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता पदभरती प्रक्रियेबाबत निर्णय घेतल्यामुळे आता त्याला थोडी गती येईल.

पदभरतीच्या निर्णय वेगात झाला पाहिजे. कारण देशामध्ये आपल्या प्रथमत: राज्याने याबाबतचा निर्णय घेऊन पथदर्शी कायदा केला होता.राज्यात सुरक्षा रक्षक व रक्षकांची मोठी मागणी आहे. याकडे समितीने लक्ष वेधले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यात अडचण अशी आहे की, सुरक्षा रक्षक महिन्याला २० हजार रुपये वेतनाची मागणी करतात. यामध्ये मिनिमम वेजेस, त्यांचा ओव्हरटाईम या बाबी आहेत. त्यांना शस्त्र हाताळण्याचे प्रशिक्षण दिले जाते तर दुसरीकडे संस्थांना महिना १० ते ८ हजार रुपये वेतनामध्येही सुरक्षा रक्षक मिळतात. त्यामुळे येथे आर्थिकतेचा विषय निर्माण झालेला आहे.

मुळात प्रश्न पैशांचा नाही. कारण यामध्ये फार वाईट अनुभव आलेला आहे. मागे सुरक्षा रक्षक म्हणून कळवा-मुंब्रा भागातील काही मुलांची भरती झाली होती. त्यात काश्मिरचे काही लोक पकडले गेले होते. त्यामुळे समितीने विश्वासर्हतेची बाब निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, Wherever our installations are sensitive and we feel that it requires this kind of security, we will insist and ensure that they will get it.

<u>प्रधानशिर्ष ४०५५ पोली यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, शहर पोलीस (केंद्राचा हिस्सा २५%) राज्य परिवहन मार्गावरील भांडवली खर्च :-</u>

मोटर परिवहन विभागाने अधिदान व लेखा कार्यालयास दिनांक २९.३.२०१३ रोजी सादर केलेली देयके आर्थिक वर्ष अखेरिस दिनांक ३१.३.२०१३ अन्वये आक्षेपित करुन परत करण्यात आल्याने सदर बचत झाली आहे. विभाग जर ३१ तारखेला बिल सादर करीत असेल, तर विभागाने याबाबतचा पूर्वीचा व आताचा प्रेझेंट एक्सपिरिअन्स पाहून सांगावे की, ३१ तारखेला असे करणे हे वित्त विभागाला मान्य होते काय ?ते

टेक्नीकली फ्रेममध्ये बसवून टाकले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ३४ कोटींची तरतूद केली होती, त्यापैकी ३० कोटी रुपये खर्च करण्यात आला नाही. तो पुढच्या वर्षी खर्च केलेला आहे. यासंबंधातील टिप्पणी समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

सीस्टीम इम्प्रुव्ह करण्याबाबतच्या मागणीचे कारण समजले पाहिजे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ॲप्रुव्हल पुढील वर्षी कायम सुरु राहतील तर ते एक किंवा दोन तारखेला बिले सादर करतील. What their worry is की, ॲप्रुव्हल या 31 मार्च पर्यंतची होती आणि ती सादर केले नाही तर लॅप्स होईल व नवीन ॲप्रुव्हल घ्यावे लागेल. परंतु ही10 गाड्यांची ॲप्रुव्हल कायम आहे किंवा 10 वेपन्स घ्यायचे आहे तर पुढील वर्षीच्या बजेटमधून ते करण्यात येतील.

ही बाब 2012-2013 ची आहे. 2013-2014, 2014-2015 या वर्षीचे काय झाले. We need to understand that chronology. या समितीचा हा विषय आहे की इरेग्युलेटरी, मीसॲप्रोप्रीएशन होण्याची कारणे शोधावी व असे परत होता कामा नये, याबाबत काळजी घेतली जावी.यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, I will give all the details for the last 5/6 years. The Committee will come to know what we have set out to achieve and what we have achieved. Procedural improvements are required and I share that. There are some constraints of the Constitution. But within that what improvements are required, we will submit that to you.

If you say that due to the department's fear that the budget provision will lapse, they went on to withdraw the funds. Then who is it who has not approved it, on withdrawal on A.C.Bills? Is it the F.D. or PAO? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, This must have come to the F.D. at that stage. We will have to see exactly what was the movement of the file and what were the views expressed.

But The department legitimately tried to withdraw the funds.यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, Without seeing that particular file on which this particular decision is given it is difficult to say exactly what has happened.

यामध्ये दोन बाबी आहेत. विभागाला31 तारखेला पैसे मिळाले नाही, तरी देखील 1 कोटी रुपये सेव्हींग झाले आहेत. विभागाने सेव्हींग झालेल्या रकमेची कारणे दिलेली नाहीत. विभागाने मोठी रक्कम सरेंडर केली. परंतु फायनल सेव्हींग 100.58 लाख रुपये आहे. या सेव्हींगची कारणे दिलेली नाहीत. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, what I realize is that even the FMGs that have been given, I think, they needed a little more care. Some small amounts have been left out in that. At this stage, I can give you the correct information and I will give that.

The amount may be small but it needs to be explained. Let us not ignore the facts. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ऐसा कहा जा रहा है कि इसमें बचत हो गई हैं. प्रत्यक्ष किती खर्च झाला आणि किती बचत झाली आणि त्यांनी आपल्याला किती कळविले व यामध्ये काय फरक होता, त्याबाबत समितीला माहिती सादर करण्यात येईल.

महालेखाकारांकडूनयाबाबतचे पॉईं ट रेज केले जातातय़ा अनुषंगाने वित्त सचिवांनी विनंती केली की, एवढा निधी का खर्च करु शकला नाहीत. याचे उत्तर असे देण्यात आलेले आहे की, एसी बिल मान्य न झाल्यामुळे तो निधी खर्च करण्यात आलेला नाही. हे उत्तर मोघम व मिसलिडींग आहे. एसी बिल 31 तारखेला सादर केले व ते मान्य झाले नाही, असे मोघम उत्तर न देता एसी बिल शेवटच्या दिवशी सादर करण्याचे किंवा एसी बिल सादर करण्यास विलंब होण्याची कारणे काय होती, हे स्पष्ट करण्यात यावे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, Unless I see the file, I may not be in a position to say what is correct. Whatever reasons are given, I share that it should be in more detail so that there are less queries. At the first stage when the A.G. raises an issue, we should respond to it.

त्या सर्व प्रश्नांची सविस्तर माहिती घेऊन त्याकरिता कोण जबाबदार होते, तसेच बिल उशिराने सादर करण्याची काय कारणे होती, एसी बिल पूर्वी सादर करण्याची जबाबदारी कोणाची होती व त्यांनी ती जबाबदारी योग्य वेळेत का पार पाडली नाही, याबाबत समितीला सविस्तर अहवाल सादर करण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

प्रधानशिर्ष ४०५५ पोलीसांवरील भांडवली खर्च८०० इतर खर्च ८०० (००)(०१) शहर पोलीस (२५%)८०० (००)(०२) शहर पोलीस (७५%)यासंदर्भात समितीने मोटार परिवहन विभागाकडून देयके मार्च २०१३ अखेरीस का सादर करण्यात आली व सदरची देयके विहित कालावधीत का सादर करण्यात आली नाहीत व ती जबाबदारी योग्य वेळेत का सादर केली नाही असे मुद्दे उपस्थित केले असता विभागीय सचिवांनी मोटार परिवहन विभागाने मार्च, २०१३ अखेरीस सादर केलेली देयके अधिदान व लेखा कार्यालयाने आक्षेपित करुन परत केल्याने बचत झाली आहे, याबाबतची सविस्तर टिप्पणी समितीस सादर करण्यात येईल असे अश्वस्त केले. याअनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

सदर वाहनांच्या खरेदीसाठी उत्पादक कंपन्यांकडील वाहनांचे दरकरार उपलब्ध नसल्याने व माहे डिसेंबर, 2012 च्या अखेरीस दरकरार उपलब्ध झाल्यावर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिनांक 25.01.2013 रोजी केंद्र व राज्य हिस्सातील वाहने पूरवठा करण्यासाठी संबंधित पूरवठादारांना एकत्रित पूरवठा आदेश निर्गमित केले. तथापि, दर करारानुसार पुरवठादारास वस्तुंच्या पुरवठ्यासाठी 180 दिवसांची मुदत असल्याने सदर वाहने दिनांक 31.03.2013 पूर्वी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयास प्राप्त होणे शक्य नव्हते. त्यामुळे, राज्य हिस्स्यामधून 1 नग ऑपरेशनल जीप रु.6,87,647/- व 1 नग बस रु.11,13,000/- याप्रमाणे एकूण रु.18,00,947/- तसेच, केंद्र हिस्स्यामधून 05 नग ऑपरेशनल जरप रु.34,38,235/-, 01 नग वाहनाची चेसीस रु.22,77,896/- व 01 नग वरुन वाहनाची साटा बांधणी रु.25,41,500/- याप्रमाणे एकूण .82,57,631/- अशा एकूण 05 संक्षिप्त देयकावर रक्कम आहरित करण्याचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडून शासनास दि.19.03.2013 रोजी प्राप्त झाला. सदर दि.31.03.2013 रोजीपर्यंत वित्त विभागाकडून मान्यता मिळाली नसल्याने पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेमार्फत सादर करण्यात आलेली देयके अधिदान व लेखा कार्यालयाकडून आपेक्षित करुन परत करण्यात आली. त्यामुळे सदर रु.100.58 लाख इतक्या रकमेची बचत झाल्याचे दिसून येते. तद्नंतर, सदर वाहनांच्या खरेदीसाठी दि.30.08.2013 च्या शासन निर्णयान्वये सन 2012-13 मधील वरील अखर्चित रक्कम पुनर्जिवित करण्यात आली असून, सन 2013-14 च्या आर्थिक वर्षात उपरोक्त खरेदी करण्यात आली आहे.

प्रधानशिर्ष ४०५५ पोलीसांवरील भांडवली खर्च, ८००, इतर खर्च (००)(०७) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ अंशदान याअंतर्गत वित्त विभागाने निधी उपलब्ध करुन दिला नाही म्हणून महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळाचा वर्गणीचा कार्यक्रम होवू शकला नाही, असेहीनमूद केलेले आहे. बजेटमध्ये तरतूद असूनही सदर निधी उपलब्ध का झाला नाही. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता याबाबत विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळास रु.25.00 कोटी निधी भागभांडवल देण्याचा शासनानेनिर्णय घेतला होता. त्यास अनुसरुन सन 2009-10 मध्ये रु.2.00 कोटी, सन 2010-11 मध्ये रु.3.00 कोटी व सन 2011-12 मध्ये रु. 3.00 कोटी असे एकूण रु.8.00 कोटी भागभांडवल/शासन अंशदान देण्यात आले. उर्वरित रु.17.00 कोटी सन 2012-13 मध्ये देण्यासाठी आवश्यक तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली होती.

सदर निधी वितरणाचा प्रस्ताव पुढील आर्थिक वर्षात सादर करण्याचे वित्त विभागाने अभिप्राय दिले. त्यामुळे हा निधी अवितरीत राहीला.

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळास सन 2016-17 मध्ये रु.5.00 कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. आतापर्यंत एकूण रु.13.00 कोटी एवढा निधी देण्यात आला आहे.

उपरोक्त लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने असे मत व्यक्त केले की, शासनाने महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळास २५ कोटी रुपये निधी भागभांडवल देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार सन २०१२-१३ मध्ये उर्वरित १७ कोटी रुपये देण्यासाठी आवश्यक तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली होती. सदरहू निधी वितरणाचा प्रस्ताव पुढील आर्थिक वर्षामध्ये सादर करण्याचे वित्त विभागाने अभिप्राय दिले, असे गृह विभागाने स्पष्टीकरणामध्ये नमूद केले आहे. पुढील५ वर्षांच्या काळामध्ये उर्वरित १७ कोटी रुपये निधी देण्यातआला नसून सन २०१६-१७ मध्ये महामंडळास ५ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला. अद्याप १२ कोटी रुपये भागभांडवलाचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला नाही. वित्त विभागने सन २०१२-१३ मध्ये सांगितले होते की, उर्वरित निधीचा प्रस्ताव पुढील वर्षात सादर करण्यात यावा. परंतु त्यानंतरही त्यांनी केवळ५ कोटी रुपये निधी महामंडळास उपलब्ध करुन दिली आहे का ? तसेचविभागाने १७ कोटी रुपये रक्कम समर्पित केली, त्याची

कारणे काय? सदरहू निधी प्राप्त न झाल्यामुळे महामंडळाच्या कोणत्या योजना होऊ शकल्या नाही? कारण तत्कालीन गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या संकल्पनेनुसार गृह विभागाने सदरहू योजना राबविली आहे.१० हजार सुरक्षा रक्षक तयार करण्यात येतील, असे गृह विभागाने म्हटले होते परंतु आतापर्यंत केवळ २ हजार सुरक्षा रक्षक तयार करण्यात आले आहेत. राज्यात सुरक्षा रक्षक निर्माण करण्याची परवानगी केवळ एकाच महामंडळाला आहे. ते खाजगी कंपनी सारखे वागतात. उक्त महमंडळाच्या सुरक्षा रक्षकांनाच शस्त्र वापरण्याची परवानगी आहे. असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उक्त महामंडळाच्या बोर्ड ऑफ डायरेक्टर यांची १० वी बैठक दिनांक १८फेब्रुवारी, २०१६ मध्ये घेण्यात आली. त्यावेळी त्यांनी नोंद घेतली की, "Regarding proposal to Finance Department of Rs.17 crores of Capital Grant". The then M.D. stated "that for the time beingCorporation does not need any capital infusion hence this issue may be kept at the back burner for the time being". समितीने सांगितल्याप्रमाणे शस्त्र वापरण्याचे अधिकार सदरहू महामंडळाच्या सुरक्षा रक्षकांना देण्यात आले आहेत. सदरहू महामंडळ नफ्यामध्ये असून त्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होत आहे.

उक्त महामंडळाचे उत्पन्नाचे साधन काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सुरक्षा रक्षकांचा पुरवठा करण्यासाठी महामंडळास पैसे मिळतात त्यामुळे सदरहू महामंडळास नफा होत आहे. त्यामुळे महामंडळस भागभांडवलाची आवश्यकता नाही अशी त्यांनी सूचना केली आहे.

सन २०१२-१३ मध्ये १७ कोटी रुपयांची तरतूद कशासाठी केली? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मंत्रिमंडळाने सुरक्षा महामंडळास मान्यता दिली त्यावेळी त्याचा बिजनेस प्लॅन त्यांच्या समोर आला नसावा. त्यामुळे त्यांनी २५ कोटी रुपये भागभांडवल देण्याबाबत सूचना केली. त्यानुसार महामंडळाकडून मागणी करण्यात आली. परंतु महामंडळाच्या कामामध्ये झपाट्याने वाढ होत गेली. महामंडळाने ३,५०० सुरक्षा रक्षक त्यांनी तयार केले व त्यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या रकमांमुळे नफ्यामध्ये वाढ होत गेली. वैद्यकीय महाविद्यालयांनाही सुरक्षा रक्षक पुरविण्यात येणार आहेत. सुरक्षा रक्षक

पुरविण्याबाबत अनेक संस्थाकडून महामंडळाकडे मागणी करण्यात येत आहे. अशा परिस्थितीमुळे आता महामंडळास निधीची आवश्यकता नाही. यावर्षी सुरक्षा महामंडळास शासनाने निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून तो वापरण्यात आला आहे.

यावर्षीच्या निधीचा मुद्दा नाही. गृह विभागाकडून महामंडळासाठी २५ कोटी रुपये भागभांडवल देण्याबाबत मंत्रिमंडळास प्रस्ताव पाठविला असेल.१७ कोटी रुपये महामंडळास देण्यामागे कोणती भूमिका होती ?महामंडळासाठी २५ कोटी रुपये तरतूद करण्याची मंजूरी मिळाल्यानंतर दरवर्षी२, ४,५ कोटी रुपये याप्रकमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात आला. त्यानंतर १७ कोटी रुपये निधी मिळणे शिल्लक असल्याने त्याकरिता तरतूद करण्यात आली. त्यानंतर दोन-तीन वर्षांनी ५ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला. एकंदरीत असे चित्र दिसते. महामंडळासाठी २५ कोटी रुपये निधी देण्यामागे कोणता बिजनेस प्लॅन होता, १७ कोटी रुपयांची तरतूदीची मागणी कोणत्या कारणास्वत करण्यात आली ? व सदर निधींची तरतूदीची मागणी गृह विभागाकडून करण्यात आली होती का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,गृह विभागाकडून १७ कोटी रुपये निधीच्या तरतूदीची मागणी केली होती.

When there is a budgetary provision, they can cut 20-30%, but how can they deny entire fund? गृह विभाग वेळेवर मागणी केली होती काय ? महामंडळास निधीची आवश्यकता नाही, असे आपण आताच समितीला सांगितले आहे. महामंडळास निधीची आवश्यकता नसतना २५ कोटी रुपयांच्या भागभांडवलाची आवश्यकता का भासली, १७ कोटी रुपयांची तरतूद कोणत्या कारणास्तव करण्यात आली? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, गृह विभागाने वित्त विभागास सादर केलेल्या टिपणी मध्ये नमूद केले होते की, उक्त महामंडळास २५ कोटी रुपये अंशदान / भागभांडवल मंत्रिमंडळाच्या मान्यतेने मंजूर केले आहे. सदरहू भागभांडवलापैकी१८ कोटी रुपये निधी आतापर्यंत महामंडळास वितरित करण्यात आला आहे. महामंडळास वितरित करण्यात आलेल्या भागभांडवलातून सन२०१०-११ ते सन २०१२-१३ या आर्थिक वर्षांत झालेला खर्च व शिल्लक निधी याची माहिती १२ व १३/प.वि.वर आहे. ८ कोटी रुपये भागभांडवलापैकी ३,५७,६२,९१२ हजार रुपये निधी शिल्लक आहे. महामंडळाच्या सन २०१३-

१४ या आर्थिक वर्षाती अंदाजित खर्च ३६ कोटी ८१ लक्ष रुपये व उपेक्षित ३३ कोटी रुपये दाखविलेले आहेत. महामंडळास सुमारे ५०० ते १००० उमेदवारांची भरती करण्यासाठी जागा व अद्ययावत प्रशिक्षण केंद्राच्या स्थापनेसाठी १७ कोटी रुपये निधी देण्याची मागणी करण्यात आली आहे. तथापि, जागेची किंमत, केंद्राचे बांधकाम व अन्य बाबींसाठी आवश्यक असणाऱ्या अंदाजित खर्चाची माहिती विभागाकडून मागविण्यात आली असता ती सादर करण्यात आली आहे. त्यासंदर्भात वित्त सचिव महोदयांनी सूचना केली आहे की, प्रस्ताव पुढील आर्थिक वर्षांच्या अनुदानातून वितरणातून सादर करावा.

पुढील वर्षात निधीची मागणी करण्यात आली होती का, त्याचे प्रयोजन होते का ? व निधीची मागणी केली असेल तर किती निधीची मागणी केली अशी विचारणा समितीने केली असता माहे मार्च मध्ये सदरहू सूचना केली होती त्यानंतर पुढील वर्षामध्ये पुरवणी मागणी सादर केली होती.गृह विभागाने १७ कोटी रुपयांची मागणी केली. सदरहू मागणी प्रधान सचिव यांचेशी चर्चा करुन सादर करण्यात आली होती. महामंडळास उपलब्ध करुन दिलेल्या ८ कोटी रुपये भागभांडवलाच्या खर्चाचा तपशिलाची त्यांनी मागणी केली होती, "Above details may be forwarded". या कारणास्तव त्यावेळी प्रस्ताव मान्य झाला नाही.

प्रशिक्षण, बांधकाम व जागा या कारणास्तव महामंडळास निधीची आवश्यकता होती व त्यामुळे गृह विभागाने निधीची मागणी केली होती. त्यावेळी वित्त विभागाने का निधी उपलब्ध करुन दिला नाही ? गृह विभागाने टिपणी सादर केली होती की, ८ कोटी रुपये निधी पैकी ५ कोटी रुपये खर्च केले व ३ कोटी रुपये निधी शिल्लक होता. निधीच्या मागणीसाठी अंदाजपत्रक सादर केले असतानाही पुढील आर्थिक वर्षात मागणी करण्याचे वित्त विभागाने सूचित केले. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ते आज गृह विभागाचा सचिव या नात्याने आजच्या समिती बैठकीस उपस्थित असल्याने वित्त विभागाची भूमिका त्यांनी मांडणे योग्य ठरणार नाही. याबाबीवर वित्त विभागाचे प्रकाश टाकू शकतील. महामंडळाच्या माध्यमातून देण्यात येणारे प्रशिक्षण हा महत्त्वाचा मुद्दा आहे व तो महामंडळास पोषक असा ठरलेला आहे. दरवर्षी राज्यामध्ये ५ ते ६ हजार पोलिसांची भरती करण्यात येते. या भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड झालेली नसते त्यांच्या अग्रक्रमानुसार उमेदवारांची निवड सुरक्षा रक्षकांसाठी करण्यात येते.

कोणत्या पदासाठी उमेदवारांची निवड करण्यात येते, त्याचे पदनाम काय आहे, त्यांची वेतनश्रेणी काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सुरक्षा रक्षक पदावर निवड करण्यात येते. सीआयएसएफ सारखे काम करतो म्हणून त्यांना पोलीस शिपायाची वेतनश्रेणी द्यावी, अशी याचिका सुरक्षा रक्षकांनी दाखल केली आहे. राज्यातील १२ पोलीस ट्रेनिंग सेंटर आहेत व १ एसआरपीएफचे ट्रेनिंग सेंटर असून एसआरपीएफ व पोलिसांना तेथे ९ महिने प्रशिक्षण देण्यात येते. त्यानंतरच्या ३ महिन्यांच्या काळात सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्यात येते. गोरेगाव एसआरपीएफच्या कॅम्पसमध्ये सध्या सुरक्षा रक्षकांना ट्रेनिंग देणे सुरु आहे. अशा पध्दतीने ट्रेनिंगचे एक्झीस्टींग इन्फ्रास्ट्रक्चरचा वापर करण्यात आला आहे. त्याऐवजी महामंडळाने स्वत:चे प्रशिक्षण केंद्र सुरु करावे, असे मत देखिल विभागीय सचिवांनी व्यक्त केले.

समितीचा इतर इन्फ्रास्ट्रक्चर वापराबाबत काही आक्षेप नाही. Why all these are not considered while budgetting Rs.17 crores? १७ कोटी रुपये निधी प्राप्त करुन घेऊन इतर खात्यामध्ये पार्कीं ग झोन मध्ये ठेवावयाचे होते, कोणत्या कारणासाठी पैसे रिलिज केले नाही ? गृह विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी वित्त विभागाकडे सादर करण्यात आलेल्या नोटींग बाबत माहिती दिली आहे, ती योग्य आहे काय ? पुढील वर्षी निधी देऊ असे म्हटल्यानंतर तो द्यावयास पाहिजे होता परंतु मागणी केली असता तो दिला नाही. सदरहू निधी दिला नाही, बरे झाले, असे गृह विभागाकडून जस्टीफिकेशन देण्यात येत आहे. सदरहू निधी लॅप्स झाला असेल व तो दुसऱ्या कोणत्या तरी खात्यामध्ये जमा करण्यात आला असेल. असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता वित्त सचिवांनी समितीस सांगितले की, गृह विभागाने मागणी केल्यानंतर पैसे रिलिज करण्यापूर्वी शिलक रकमेची माहिती विचारली होती. तसेच गृह विभागाकडे निधी शिल्लक असल्याने पुढील वर्षी निधीची मागणी करावी, असे वित्त विभागाने सांगितले होते.

अभिप्राय व शिफारशी

1.8 लेखाशिर्ष 4070 इतर प्रशासनिक सेवा भांडवली खर्च, पोलिस दलाचे आधुनिकीकरण कार्यक्रम याअंतर्गत केंद्रशासनाकडून निधी मंजूरीस विलंब लागल्याने राज्य शासनाच्या हिश्याचा संपुर्ण अर्थसंकल्पीय निधी प्रत्यार्पित करण्यात आला. प्रत्येक आर्थिक वर्षात पोलिस दलाचे आधुनिकीकरण कार्यक्रमाचा निधी हा त्या-त्या वर्षात खर्च न होता पुढील आर्थिक वर्षात निधी खर्च होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यामुळे पोलिस दल आधुनिकीकरण कार्यक्रमात मोबिलीटी, कम्युनिकेशन, शस्त्र, हाऊसिंग, इमारती, न्याय सहाय्यक प्रयोगशाळा, प्रशिक्षण व नागरी संरक्षण या आठ घटकांचे मोठयाप्रमाणात नुकसान झाल्याचा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला आला आहे. अशाप्रकारच्या विलंबाची कारणे काय ? अशी समितीने विचारणा केली असता जुलै महिन्यात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने मान्यता दिल्यानंतर केंद्र शासनाकडे यासंदर्भातील आराखडा पाठविण्यात आला. परंतु केंद्र शासनाकडून काही सूचना प्राप्त झाल्या. त्याअनुषंगाने कार्यक्रम बदलावा असे केंद्र शासनाने सूचित केल्यामुळे सदर प्रस्ताव पुन्हा सादर करुन त्यास केंद्र शासनाकडून सरतेशेवटी मार्च महिन्यात मान्यता प्राप्त झाली व त्यानंतर हा निधी वापरण्यात आला. त्यामुळे हा विलंब झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

1.9 पोलिस दलाचे आधुनिकीकरण या कार्यक्रमाअंतर्गत जे उपरोक्त आठ घटक आहेत त्यांचा आराखडा प्रशासकीय समितीकडून तयार केला जातो. व त्यांच्या मान्यतेने तो केंद्र सरकारकडे पाठविण्यात येतो. केंद्र सरकारच्या स्तरावर एक समिती असून सदर समिती या आराखडयाला मान्यता देते. त्यानंतर केंद्र सरकारकडून निधी प्राप्त झाल्यानंतर पुढील प्रक्रीया राज्य शासनामार्फत राबविण्यात येते. आता पर्यंत चालू आर्थिक वर्षात कार्यक्रम राबविण्यात गृह विभाग कधीही यशस्वी झालेला नाही. सदर कार्यक्रमाला केंद्राकडून मंजूरी वर्षाच्या शेवटी मिळते व त्याची अंमलबजावणी करेपर्यंत पुढील वर्ष सुरु होते. त्यामुळे त्याच आर्थिक वर्षात सदर कार्यक्रमाचा निधी खर्च न होता तो पुढील आर्थिक वर्षात खर्च करण्यात येतो. ही बाब सातत्याने घडत असल्याने गृह विभागाने आता या कार्यक्रमाला कायमची मंजूरी देण्याची पध्दत सुरु केली आहे. त्यामुळे आता दुसऱ्या वर्षी सदर कामास पुन्हा मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. जो कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याचा निधी चालू आणि पुढील आर्थिक वर्षाच्या अनुदानातून खर्च करता येईल. परंतु ही सर्व प्रक्रीया केंद्र शासनाच्या स्तरावर सुध्दा पार पाडण्यात येत असल्यामुळे त्यांचा निकषानुसार चालू आर्थिक वर्षाचा निधी 31 मार्च पूर्वी खर्च न केल्यास त्यासाठी पुन्हा परवानगी घेणे आवश्यक असल्याने याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन सध्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करुन यासाठी शासनस्तरावरुन योग्य व कालबध्द नियोजन करण्यात यावे. कोणत्याही

परिस्थितीत केवळ प्रशासकीय मान्यतेसाठी चालू आर्थिक वर्षात हा निधी प्राप्त न होता तो त्यापुढील आर्थिक वर्षात प्राप्त होतो. यासंदर्भातील योग्य नियोजन करुन केंद्र शासनाची मान्यता घेण्याचे कालबध्द प्रयत्न करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

1.10 सन 2012-2013 मध्ये पोलिस दलाच्या आधुनिकीकरणाचा जो कार्यक्रम हाती घेतला होता त्यातील एकूण आठ घटकापैकी होमगार्ड आणि नागरी संरक्षण दल हा एक घटक आहे. यात प्रामुख्याने दोन बाबी निश्चित करण्यात आल्या होत्या. 1) प्रशिक्षण केंद्र बांधणे 2) वाहने विकत घेणे परंतु महासंचालकांनी गृह विभागास असे कळविले की, वाहनांची आवश्यकता नाही व प्रशिक्षण केंद्र बांधकामाच्या संदर्भात विभागास उशिरा सुचना प्राप्त झाल्यामुळे उपलब्ध निधी त्यावर्षात खर्च न करता पुढील वर्षात खर्च करण्यात आल्याचा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे.

1.11 शासनाने होमगार्डची निर्मिती ही पोलिस यंत्रणेवर पडणारा ताण कमी करण्यासाठी केली होती. परंतु होमगार्डकडे विभागाचे दुर्लक्ष होत असून सद्य:स्थितीत होमगार्डना कोणत्याही सोयी सुविधा मिळत नाहीत. वर्षाला केवळ 180 दिवस त्यांना काम देणे बंधनकारक असून त्यांना प्रति दिनी .300 भत्ता देण्यात येतो. सप्टेबर, 2016 च्या आकडेवारीनुसार राज्यात 36,839 होमगार्ड ने नोंदणी केलेली आहे. प्रत्यक्षात एवढे होमगार्ड उपलब्ध आहेत की नाही याबाबत समितीला शंका वाटते. होमगार्डना वाहनांची आवश्यकता असताना संचालकांनी वाहनांची आवश्यकता नसल्याचे कळविले. तसेच होमगार्डना प्रशिक्षण केंद्राची नितांत गरज असताना ते बांधण्यासाठी विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. होमगार्डना तात्पुरते काम दिल्यामुळे त्यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होतो. त्यासाठी त्यांना कायमस्वरुपी काम देण्यात यावे व महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळाच्या धर्तीवर प्रति महिना एक रक्कम निश्चित करण्यात यावी. पोलिस दलाचे आधुनिकीकरण या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून वेळोवेळी मिळणाऱ्या निधीचा वापर त्याच आर्थिक वर्षात करण्यात यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

1.12 नागरी संरक्षण दलाच्या माध्यमातून पोलिस दलाला सहाय्य करण्यात येते. नागरी संरक्षण विषयक कायदा दिनांक 10 जुलै, 1968 पासून देशात कार्यान्वित झाला असून नागरिकांच्या जिवीताचे व मालमत्तेचे संरक्षण करणे, आपत्ती व्यवस्थापन करणे, उत्पादन कायम राखणे, सामाजिक जीवन सुरळीत करणे, नागरिकांचे नितीधैर्य व मनोबल वाढविणे, युध्दजन्य परिस्थितीमध्ये व आपत्तीमध्ये नागरी जीवन सुरळीत चालू ठेवण्यासाठी शांततेच्या काळात निरनिराळ्या प्रकारचे प्रशिक्षण

नागरिकांना देण्याचे काम नागरी संरक्षण दलामार्फत केले जाते असे असताना महाराष्ट्रामध्ये नागरी संरक्षण दल ही यंत्रणा बंद पडण्याची वेळ आली आहे असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे.

1.13 नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना कर्तव्य भत्ता . 150/- प्रती दिन, प्रशिक्षण भत्ता . 45/- प्रती दिन व उपाहार भत्ता . 50/- प्रत्येकी दिला जातो. आजच्या महागाईच्या काळात हा भत्ता अत्यल्प असून कोणत्याही व्यक्तीस यातून आपला दैनदिन खर्च भागविता येणार नाही. त्यामुळे यामध्ये वाढ करण्यात यावी. सन 2012-13 या आर्थिक वर्षात 9.65 कोटी, सन 2013-14 या आर्थिक वर्षात . 9.70 कोटी, सन 2014-15 या आर्थिक वर्षात . 9.87 कोटी, सन 2015-16 या आर्थिक वर्षात 10.25 कोटी व सन 2016-17 या आर्थिक वर्षात . 9.41 कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. मागिल 5 वर्षाची खर्च केलेली रक्कम पाहता ती फारच कमी असून त्यामुळे नागरी संरक्षण दलामध्ये कोणतेही आधुनिकीकरण झालेले नाही तसेच **सन 2016-17 या आर्थिक वर्षात सर्वात कमी खर्च करण्यात आलेला आहे हे पहाता नागरी संरक्षण दल एक दुर्लक्षित घटक झाला आहे व त्यांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा व मोबदला यामध्ये वाढ करून या घटकासाठी पोलिस दल आधुनिकीकरण या अंतर्गत अधिक निधी खर्च करण्यात यावा व त्यासाठी राज्य शासनाने अधिक निधिची तरतूद करण्यात यावी याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

1.14 लेखाशिर्ष 4055 पोलिस या वरील भांडवली खर्च, जिल्हा पोलिस (केंद्राचा हिस्सा 75 टक्के) व (राज्याचा हिस्सा 25 टक्के) या अंतर्गत निधीची तरतूद ही साधन सामग्री राज्य पोलिस दलाकरीता वाहने आणि शस्त्र यांच्या खरेदीसाठी होती. सदर खरेदीची प्रक्रिया अपूरी राहिल्यामुळे विभागाने निधी परत केल्याचा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे.

1.15 **उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत राज्य पोलिस दलाकरीता वाहने आणि शस्त्रे यासंबंधीची खरेदी प्रक्रिया पार पाडण्यात येते. यामध्ये केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा याअंतर्गत खरेदी प्रक्रिया वेळेवर पुर्ण करण्यात आली नसल्यामुळे निधी खर्च करण्यात आला नाही. सर्व खरेदीची प्रक्रिया ही 26/11 च्या मुंबई हल्ल्याच्या नंतरची असून त्यानंतर विभागाला केंद्र शासनाकडून खरेदी प्रक्रियेच्या योजनेस दिनांक 27 फेब्रुवारी, 2013 रोजी केंद्र शासनाची मान्यता मिळूनही त्याच वर्षात निधी खर्च करण्याची कार्यवाही केलेली नाही. पोलिस महासंचालक कार्यालयाकडून पोलिस वाहन व शस्त्र खरेदी हा विषय राज्याच्या सुरक्षेच्यादृष्टीने अत्यंत महत्वाचा व संवेदनशील असून तो अती प्राधान्याने हाताळणे अपेक्षित असताना देखील खरेदी प्रक्रियेची कार्यवाही त्याच आर्थिक वर्षात पार न पाडल्यामुळे राज्याच्या सुरक्षिततेच्या गंभीर विषयाकडे पोलिस महासंचालक कार्यालय गांभीर्याने पाहात**

नसल्याचे समितीला वाटते. अत: या बाबी विभागाने अतिशय नियोजनबध्दरित्या व प्राधान्याने हाताळाव्यात व सदरहु खरेदी प्रक्रियेसंबंधीचा निधी हा ज्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे विहित मुदतीत खर्च झाला नाही त्यांच्यावर योग्य ती कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्याच्या आत समितीस सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

1.16 4070 इतर प्रशासकीय सेवांवरील भांडवली खर्च या शिर्षाखाली सन 2012-13 आर्थिक वर्षात 63.33 कोटी रुपये इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली त्याची कारणे विहित मुदतीत कळविण्यात आली नाही असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला आहे.

1.17 उपरोक्त निधीचा विषय हा आधुनिकीकरणाचाच एक भाग आहे. सन 2012-13 या वर्षी आधुनिकीकरणाचा कार्यक्रम केंद्राकडून मंजूर होवून आला परंतू त्यावर्षात केंद्राकडून जो निधी प्राप्त झाला तो खर्च करण्याची विभागाची तयारी, क्षमता व नियोजन नव्हते. यामध्ये विभाग निधी खर्च करण्यास कमी पडल्याचे दिसून येते. विभागाने गृहनिर्माण व इमारतीसाठी माहे एप्रिल, 2012 ते मार्च, 2017 या कालावधीत रुपये 909.61 कोटी निधी खर्च केला असल्याचे समितीस सांगण्यात आले. ही गत पाच वर्षाची खर्चाची आकडेवारी असून ती प्राप्त निधीच्या प्रमाणात कमी असल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडून प्राप्त झालेला संपूर्णनिधी खर्च करण्यास विभागास अपयश आले. यामध्ये गृह विभागात नियोजनाचा अभाव दिसून येतो तसेच गृहनिर्माण व इमारती याअंतर्गत सध्याही अनेक प्रकल्प अपूर्ण असतानाही विभागाने निधी प्रत्यार्पित करणे ही बाब गंभीर आहे. खरे तर इतर विभागांना निधीची आवश्यकता असताना त्यांना निधी मिळत नाही व गृह विभागाकडे मंजूर निधी पडून राहतो. या निधीचे नियोजन योग्यरित्या करण्यात यावे. प्राप्त निधी त्याच आर्थिक वर्षात खर्च होणेकरिता आवश्यक ती कारवाई प्राधान्याने करण्यात यावी. उपरोक्त प्रकरणी निधी खर्च करण्यास ज्यांनी विलंब केला आहे व महालेखाकारांना वेळेत योग्य माहिती कळविण्यात आली नाही अशा अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

1.18 न्याय सहायक प्रयोगशाळा या लेखाशिर्षा अंतर्गत .1039.00 लाख रुपये इतक्या मुळ तरतुदीपैकी न्याय सहायक प्रयोगशाळेकरीता आवश्यक साधन सामग्री खरेदी संबंधीचीप्रक्रिया पुर्ण न केल्याने .732.04 लाख रुपये इतका निधी परत करण्यात आल्याचा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे.

1.19 राज्यात अनेक न्यायालयीन दाव्यामध्ये महत्वाचा साक्षीपुरावा म्हणून न्याय सहाय्यक प्रयोगशाळेचा अहवाल ग्राह्य धरण्यात येतो. परंतु सदर प्रयोगशाळेचा अहवाल वेळेवर प्राप्त न होण्यामुळे संबंधित व्यक्तीला पुराव्या अभावी जामीन मंजूर करण्यात येतो. विभागास प्रयोगशाळेसाठी निधी उपलब्ध होऊनही खरेदी प्रक्रिया विहित वेळेत न राबविल्यामुळे प्रयोगशाळा उभी करता आली नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली. विभागाने यंत्रणा उभी केली आहे, परंतु विभागाकडे प्रयोगशाळेतून साक्षीपूराव्यासाठी घेण्यात येणाऱ्या नमून्यांची चाचणी वेळेत करण्यात येत नाही. सदर चाचणी विलंबाने केल्यास त्यास काहीच अर्थ राहत नाही. त्यामुळे यामध्ये निश्चित केलेला कालावधी कमी करण्यात यावा. वेळेत चाचणी होण्यासाठी राज्यात न्याय सहाय्यक प्रयोगशाळा वाढवण्याची गरज असून त्याप्रमाणे विभागाने कार्यवाही करावी. केंद्राकडून निधी मिळालेला असताना त्याचा वापर न्याय सहाय्य प्रयोगशाळा वाढविण्यासाठी करण्यात न आल्यामुळे राज्यात त्यांची कमतरता आहे व वेळेत चाचणी न केल्यामुळे न्यायालयातील दाव्यांमधून आरोपी सुटून जाऊ शकतात. अत: राज्यात अशा प्रयोगशाळांची संख्या वाढविण्यात यावी व अधिकाधीक अद्ययावत व आधुनिक स्वरुपाची प्रयोगशाळा सुरु करण्यात याव्यात. याप्रकरणी जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांची चौकशी करून चौकशीत दोषी आढळल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

1.20 शस्त्र किंवा अन्य बाबीच्या खरेदीची मान्यता घेणे व त्याचा तपशिल निश्चित करणे ही खुपच किचकट बाब आहे. यासाठी प्रथम समिती स्थापन होते, नंतर खरेदी करण्यात येणाऱ्या वस्तूचा तपशिल निश्चित केला जातो व त्यानंतर केंद्र शासनाची मान्यता घेण्यात येते. मान्यतेनंतर त्यांचे पुरवठादारही फार मर्यादित असतात. शस्त्र चाचणी करून घेण्यासाठी हैद्राबाद व चंदीगढ अशा दोनच ठिकाणी प्रयोगशाळा असल्याने या ठिकाणी चाचणीच्या तारखा खूप उशिरा मिळतात. या सर्व प्रक्रियेमध्ये सुधारणा करण्याची व यावर आळा घालण्याची आवश्यकता असल्याने समितीने यासंदर्भात आवश्यक ती प्रक्रिया नियोजनबध्दरित्या राबवावी. विभागीय अधिकाऱ्यांनी खरेदी संदर्भात कामाचा प्राथम्यक्रम ठरविण्यात यावा व त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती 3 महिन्यात समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

1.21 महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळाला वर्गणी या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध . 17 कोटी एवढ्या मुळ अनुदानाची संपुर्णरक्कम परत करण्यात आली असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला आहे.

1.22 अनेक संस्थांची पोलिस संरक्षणाची मागणी असते. पोलिस यंत्रणेवर असलेला कामाचा ताण लक्षात घेता त्यांना मागणी प्रमाणे खाजगी, निमशासकीय व शासकीय संस्थांना पोलिस संरक्षण उपलब्ध करून देणे शक्य नसते अशा वेळी सदर संस्थाने खाजगी सुरक्षा रक्षकाची नेमणुक करतात. परंतु त्यांना कायद्याने कोणतेही अधिकार नसतात. त्यामुळे प्रत्यक्ष पोलिस व सुरक्षा रक्षक यांच्या मधला दुवा तयार करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने सन 2010 मध्ये एक कायदा केला सदर कायद्यानुसार महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळ तयार करण्यात आले आहे. यामध्ये खाजगी किंवा शासकीय व निम शासकीय संस्थांना मागणीनुसार सुरक्षा रक्षक पुरविण्यात येतात. यात सर्व संस्थांनी या सुरक्षा महामंडळाकडूनच माणसे घ्यावीत असे कायद्याने बंधन घातलेले आहे. या महामंडळावर वरिष्ठ स्तरावरील अधिकारी व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत आहेत. यामहामंडळामध्ये प्रथम सुरक्षा गार्डची निवड करण्यात येते आणि मग ज्या संस्थांची मागणी असेल त्याप्रमाणे त्यांना सुरक्षा गार्ड पुरविण्यात येतात.

1.23 महामंडळास अंशदान व भाग भांडवलासाठी रुपये 25 कोटी निधी मंत्रीमंडळाच्या मान्यतेने मंजुर करण्यात आला. सन 2012-13 या आर्थिक वर्षात गृह विभागाने .17 कोटी रुपयांची तरतूद केली होती परंतू सदर रक्कम महामंडळास वितरीत करण्यात आली नाही. सदर निधीची मागणी महामंडळाने सुमारे 500 ते 1000 उमेदवारांची भरती करण्यासाठी जागा व अद्ययावत प्रशिक्षण केंद्राच्या स्थापनेसाठी केली होती. सदर निधी प्राप्त व्हावा याकरीता प्रस्ताव वित्त विभागास सादर केला होता परंतू वित्त विभागाने त्यास मान्यता दिली नाही. महामंडळास निधीची आवश्यकता होती कारण सध्या सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देताना राज्यातील 12 पोलिस प्रशिक्षण केंद्र व एक एसआरपीएफ चे प्रशिक्षण केंद्र याचा वापर करण्यात येतो. त्याठिकाणी 9 महिने पोलिसांना प्रशिक्षण देण्यात येते व त्यानंतरच्या 3 महिन्याच्या काळात सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्यात येते. त्यामुळे महामंडळास सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी बारा महिन्यातून केवळ तीन महिन्याचा कालावधी उपलब्ध होत असल्याने पुरेसे सुरक्षा रक्षक उपलब्ध करता येत नाही. राज्यात अनेक अशासकीय, निमशासकीय व शासकीय संस्थांची सुरक्षा रक्षकांची मागणी असूनही त्याची पुर्तता करता येत नाही. महामंडळास मागणी प्रमाणे प्रशिक्षित सुरक्षा रक्षक उपलब्ध करुन देता यावेत त्यासाठी त्यांना सोयी-सुविधा निर्माण करणे याकरीता निधीची आवश्यकता असल्याने शासनाने मंजूर केलेल्या रुपये 25 कोटी पैकी रुपये 13 कोटी महामंडळास सन 2016-17 पर्यंत प्राप्त असून उर्वरित रुपये 12 कोटी निधी महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षा महामंडळास चालू आर्थिक वर्षात उपलब्ध करुन देण्यात यावा. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास वमत्स्यव्यवसाय विभाग (पशुसंवर्धन)

2.1 भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. डी-९ "पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च", डी१० "मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च" व डी-११ "राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण" या शीर्षांतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

अनुदान क्र. डी-९ ४४०३ - पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च व६४०३- पशुसंवर्धनावरील कर्जे

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४०३ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च दत्तमत्त मुळ रु. १२,३५,०० पुरक रु. ४७,५१ वर्षभरात परत केलेल्या (मार्च २००१) रकमा रु. ४,३७,९७	१२,८२,५१	८,४४,५४	(-) ४,३७,९७

टिपा व भाष्य :-

प्रत्यक्षात एकूण खर्च हा मुळ तरतुदी एवढा देखिल झालेला नाही. तेव्हा माहे जुलै2012 मध्ये केलेल्या पुरक मागणी रक्कम रु. ४७.५० लक्ष अनावश्यक दिसून येते.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातपशुसंवर्धनविभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

पुरक मागणीव्दारे रु. ४७.५० लक्ष निधी १९० (००)(०१) महाराष्ट्र मेंष व लोकर विकास महामंडळाना भाग भांडवली अंशदान या लेखाशिर्षाखली करणेत आली असून सदर लेखशिर्षाखाली मुळ निधी रु.६९.०० लक्ष असून प्रत्यक्ष खर्चा ८७.३८ लक्ष एवढा आहे. म्हणजेच पूरक मागणी अनावश्यक नव्हती.

खालील कारणामुळे प्रत्यक्षात एकूण खर्च हा मुळ तरतुदी एवढा देखिल झालेला नाही.

१. कुक्कुट लस मात्रा निर्मिती प्रयोगशाळा स्थपने करीता केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त न झालेने.

२. केंद्र शासनाची मंजूरी निधीच्या केवह७५ टक्केच निधी वितरीत केलेने.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४०३ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च १०१(००)(०३) जीएलपी/जीएमपी मानकानुसार पशु वैद्यकीय जैव पदार्थ पुणे संस्थेचे बळकटीकरण– राज्य योजनांतर्गत योजना मूळ रु. ३,००.०० पुर्नर्विनियोजन रु. (-)२,२४.७२	७५.२८	७५.२८	------

टिपा व भाष्ये :-

कुककुट लस मात्रा निर्मिती प्रयोगशाळा स्थापने करिता केंद्र शासनाची मुजरी प्राप्त न झालेने माहे मार्च-२०१३ मध्ये .२,२४.७२ लक्ष निधी पुर्नविनियोजनाद्वारे समर्पित आला.

ज्ञापन :- महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

कुककुट लस मात्रा निर्मिती प्रयोगशाळा स्थापने करिता केंद्र शासनाची मुंजरी प्राप्त न झालेने माहे मार्च, २०१३ मध्ये .२,२४.७२ लक्ष निधी पुर्नविनियोजनाद्वारे समर्पित करणेत आला.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४०३ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च १०१(००)(०४) राज्यस्तरीय पशु वैद्यकीय संस्थांचे बळकटीकरण करणे -७५ टक्के केंद्र हिस्सा मुळ रु. ६,००.०० पुर्नर्विनियोजन रु. (-) १,२५.१५	४,७४.८५	४,७४.८५	------

टिपा व भाष्ये :-

केंद्र शासनाची मुंजरी निधीच्या केवळ ७५ टक्केच निधी वितरीत केलेने माहे मार्च, २०१३ मध्ये रु. १,२५.१५ लक्ष निधी पुर्नविनियोजनाद्वारे समर्पित आला.

ज्ञापन :- महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे

केंद्र शासनाची मुंजरी निधीच्या केवळ ७५ टक्केच निधी वितरीत केलेने माहे मार्च, २०१३ मध्ये रु. १,२५.१५ लक्ष निधी पुर्नविनियोजनाद्वारे समर्पित करणेत आला.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४०३ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च १०१(००)(०५) राज्यस्तरीय पशु वैद्यकीय संस्थांचे बळकटीकरण करणे -२५ टक्के राज्य हिस्सा मुळ रु. २,००.०० पुर्नर्विनियोजन रु. (-) ४१.७२	१,५८.२८	१,५८.२८	------

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाने केंद्र हिश्यात कपात केल्याने राज्य हिश्यात मुंजर निधीच्या केवळ ७५ टक्केच निधी ठेवून माहे मार्च, २०१३ मध्ये रु. ४१.७२ लक्ष निधी पुर्नविनियोजनाद्वारे समर्पित करणेत आला.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१९० – सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमातील गुंतवणूका- १९०(००)(०१) महाराष्ट्र मेंष व लोकर विकास महामंडळाना भाग भांडवली अंशदान मूळ रु. ६९.०० पूरक रु. ४७.१३ पुनर्विनियोजन रु. (-)२९.१३	८७.३८	८७.३८	------

टिपा व भाष्ये :-

उपरोक्त लेखाशिर्षाखाली राज्य शासनाकडून प्राप्त निधीच्या अधिन राहून माहे मार्च, २०१३ मध्ये रु.७०.८५ लक्ष निधी पुनर्विनियोजनाद्वारे समर्पित करणेत आला.

ज्ञापन :- महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखाली राज्य शासनाकडून प्राप्त निधीच्या अधिन राहून माहे मार्च-२०१३ मध्ये रु.२९.१३ लक्ष निधी पुनर्विनियोजनाद्वारे समर्पित करणेत आला.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
१११ – मांस संस्करण १११(००)(०१) पशुआहार संशोधन केंद्र येथील दर्जा नियंत्रण प्रयोगशाळा केंद्र मूळ रु६५.०० पुनर्विनियोजन रु. (-)१६.२५	४८.७५	४८.७५	------

टिपा व भाष्ये :-

यंत्र व सामग्री खरेदी करीता भावबंद करार उपलब्ध नसलेले माहेमार्च, २०१३ मध्ये रु.१६.२५ लक्ष निधी पुनर्विनियोजनाद्वारे समर्पित करणेत आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

यंत्र व सामग्री खरेदी करीता भावबंद करार उपलब्ध नसलेने माहे मार्च-२०१३ मध्ये रु.१६.२५ लक्ष निधी पुनर्विनियोजनाद्वारे समर्पित करणेत आला.

कृषी, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (मत्स्यव्यवसाय)

अनुदान क्र.डी-१० "मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च"

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४०५ –मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च ६४०५ – मत्स्यव्यवसायासाठी कर्ज दत्तमत्त मुळ– ५४,८२,०० पूरक २ वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २०१३)	५४,८२,०२	४०,१३,४७	(-)१४,६८,५५ १४,६८,५३

टिपा व भाष्ये :-

मुळ तरतुदी एवढा सुध्दा खर्च झाला नाही.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आथिक वर्षात प्रधानशिर्ष ४४०५-मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च व ६४०५-मत्स्यव्यवसायासाठी कर्ज दत्तमत्त यामध्ये मूळ तरतूद रुपये ५४,८२.०० लक्ष प्राप्त झाली असून त्यापैकी ४०,१३.४७ लक्ष इतका खर्च झाला आहे. तसेच शासनास रुपये १४,६८.५३ लक्ष इतकी तरतुद समर्पित करण्यात आली आहे सदर रक्कम समर्पित करण्याची कारणे त्या त्या लेखशीर्ष व उपशीर्षासमोरील रकान्यामध्ये दर्शविण्यात आली आहेत.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४०५ –**मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च** **१०१ गोड्या पाण्यातील** मत्स्यव्यवसाय १०१ (००)(०४) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना गोडयापाण्यातील कोळंबी बीज उबवणी केंद्र राज्य योजनांतर्गत योजना (४४०५०६२२) मूळ– ३०.०० पुनर्विनियोजन (-) ३०.००	------	------	-------

टिपा व भाष्ये :-

प्रस्ताव प्राप्त न झाल्याने मार्च २०१३ मध्ये रु. ३० लाख इतका संपूर्ण निधी प्रात्यार्पित करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात या योजनेखाली रु. ३०.०० लाख एवढी मुळ तरतुद प्राप्त होती. दि. १२/१२/२०१२ अन्वये रु. ३०.०० लक्ष तरतूद बीडीएसवर उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु बीडीएसवर तरतूद उपलब्ध न झाल्यामुळे रु.३०.०० लाख तरतूद समर्पित करण्यात आली आहे.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४०५ –मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूक १९० (००) (०१) मत्स्यव्यवसाय महामंडळ रा. योजना (४४०५०१०३) मुळ– २,००.०० पुनर्विनियोजन (-) १,५०.००	५०.००	५०.००	----

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रस्ताव प्राप्त नसल्यामुळे तसेच बीडीएसवर तरतुद प्राप्त न झाल्यामुळे तरतूद समर्पित करण्यात आली आहे.

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
६४०५ –मत्स्यव्यवसायासाठी कर्जे १९५ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाना कर्जे पं.यो.यो. १९५ (००)(०१) पं.यो.यो. यांत्रिक नौका / खोल सागरातील नौकासाठी कर्जे (रासविनि हिस्सा) (६४०५००८१) मुळ २८,८८.०० पुनर्विनियोजन (-) २,९२.२३	२५,९५.७७	२५,९५.७६	-०.०१

टिपा व भाष्ये :-

वर नमुद केलेल्या उपशीर्षांतर्गत प्रस्ताव न आल्यामुळे (रु१५० लाख) प्रस्ताव मंजुरी न मिळाल्यामुळे (. २९२.२३ लाख),मार्च, २०१३ मध्ये रु. ४४२.२३ लाख इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात या योजनेखाली मूळ तरतूद रु. २८८८.०० लाख प्राप्त झाली होती. ५५% कर्ज रकमेकरिता शासनास एकूण १६९ प्रस्ताव मुजंरीस्तव पाठविण्यात आले होते. त्यामधील१११ प्रस्तावाला मंजुरी प्राप्त झाली व ५८ प्रस्तावाना मंजुरी नसल्यामूळे मूळ तरतुदीनुसार झालेली बचत रु२९२.२३ लाख शासनाय समर्पित करण्यात आली आहे. अंतिम तरतुद२५९५.७७ लाख तरतुदीनुसार रु.२५,९५.७६ लाख एवढा खर्च झाला आहे. त्यापैकी वचत (-) ०.०१ हि मर्यादित आहे.

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च १०३ सागरी मत्स्यव्यवसाय १०३ (००)(०२) लहान मासेमारी बंदरे राज्य योजनांतर्गत योजना (४४०५०६५१) मुळ ३,००.०० पुनर्विनियोजन (-) ३,००.००	----	----	----

टिपा व भाष्ये :-

देयके संमत न झाल्यामुळे विनियोजन /प्रत्यार्पितच्या मार्गाने मार्च २०१३ मध्ये रु. ३०० लाख इतकी संपूर्ण तरतुद काढून टाकण्यात आली.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात या योजनेखाली मूळ तरतूद रु. ३०० लाख प्राप्त होती. परंतु बीडीएसवर रु.१.८८ लाख तरतुद प्राप्त झाली. सदरचे देयक पारिक न झाल्यामुळे पुर्ण तरतुद रु३०० लाख शासनास समर्पित करण्यात आली होती.सदर तरतुदीपैकी शासन स्तरावरुन रु. ४३.९८ लाखाचे पुनर्विनियोजन रा. स. वि. नि. भागभांडवल या योजनेकरिता करण्यात आली आहे. अंतिम तरतुद नक्त आहे.

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च **१९५ सहकारी संस्था** **१९५ (०१)(०३) यांत्रिक नौका (रासविनी)** **हिस्सा (४४०५०१६८)** **मुळ - २,६२.००** **पुनर्विनियोजन (-) २,६२.००**	----	----	----

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात या योजनेखाली मूळ तरतूद रु. २,६२.०० लाख प्राप्त झाली होती. यापुर्वी 35% रक्कम अदा केलेल्या २५४ अपूर्ण नौका पूर्ण करण्यासाठी सदर लेखा शिर्षाखालील रक्कम५५% कर्ज वितरीत करण्यासाठी ६४०५ कर्ज या शिर्षाखाली पुनर्विनियोजन वळती करण्याबाबत शासनास प्रस्तावित केले होते. वित्त विभागाकडून मार्च अखेरीस सदर ५५% टक्केच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली नाही. तथापि ४१ गटांसाठी २५% रक्कम वितरीत करण्याच्या प्रस्तावास शासनाकडून दि.३१/०३/२०१३ रोजी अंतिम क्षणी मंजूरी प्राप्त झाली. दरम्यानच्या कालावधीज बी.डीएस. प्रणाली बंद झाल्यामुळे२५% रक्कम ४१ गटांना वितरीत करणे शक्य झाले नाही. त्यामुळे पूर्ण तरतुद समर्पित करण्यात आले आहे.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च १९५ सहकारी संस्था १९५ (०१)(१०) यांत्रिक नौका (रासविनी) (४४०५०५५१) मुळ- १०,५०.०० पुनर्विनियोजन (-) १०,५०.००	----	----	----

टिपा व भाष्ये :-

त्यांचे प्रस्ताव उशिरा प्राप्त झाल्यामुळे मंजुर झाले नाहीत त्यामुळे मार्च२०१३ .१३१२ लाख इतकी संपूर्ण तरतुद वर नमुद केलेल्या उपशीर्षातंर्गत विनियोजन /प्रत्यर्पण या मार्गाने काढूण घेण्यात आली.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात या योजनेखाली मूळ तरतूद रु. १०,५०.०० लाख एवढी तरतुद प्राप्त झाली होती. यापुर्वी 35% रक्कम अदा केलेल्या २५४ अपूर्ण नौका पूर्ण करण्यासाठी सदर लेखा शिर्षाखालील रक्कम५५% कर्ज वितरीत करण्यासाठी ६४०५ कर्ज या शिर्षाखाली पुनर्विनियोजन वळती करण्याबाबत शासनास प्रस्तावित केले होते. वि विभागाकडून मार्च अखेरीस सदर ५५% टक्केच्या प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाली नाही. तथापि ४१ गटांसाठी २५% रक्कम

वितरीत करण्याच्या प्रस्तावास शासनाकडून दि.३१/०३/२०१३ रोजी अंतिम क्षणी मंजूरी प्राप्त झाली. दरम्यानच्या कालावधीज बी.डी.एस प्रणाली बंद झाल्यामुळे२५% रक्कम ४१ गटांना वितरीत करणे शक्य झाले नाही. त्यामुळे पूर्ण तरतुद समर्पित करण्यात आले आहे.

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च १९५ सहकारी संस्था १९५ (०१)(११) सुरक्षण, वाहतुक व विक्री (४४०५०५५१) (रासविनी हिस्सा) मुळ - १,७५.०० पुनर्विनियोजन (-) ६४.१६	१,१०.८४	१,१०.८४	----

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात या योजनेखाली रु. १,७५.०० लाख ट्रक टेम्पोच्या प्रस्तावासाठी प्राप्त झाली होती. शासनास प्रस्तावित केलेल्या रक्कमेपेक्षा कमी रक्कमेस शासन मंजुरी प्राप्त झाली.उर्वरित बचत नौका बांधकामासाठी ६४०५-कर्जे या अर्थशिर्षाखाली वळती करण्याबाबत शासनास प्रस्तावित केले होते. परंतु त्या प्रस्तावास शासन मंजुरी प्राप्त झाली नसल्याने उर्वरित तरतुद रु.६४.१६ लाख समर्पित करण्यात आली व अंतिम तरतूद रु१,१०.८४ लाख पुर्णपणे खर्च करण्यात आली.

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
६४०५ - मत्स्यव्यवसायासाठी कर्जे १९५ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाना कर्जे पं.यो.यो. १९५ (००)(०२) सुरक्षण वाहतूक व विक्री (रासविनी हिस्सा) (६४०५००७२) मुळ- ३,२०.०० पुनर्विनियोजन (-) १,९२.०३	१,२७.९७	१,२७.९७	----

टिपा व भाष्ये :-

ट्रक व टेम्पो खरेदीसाठी शासनाकडून कमी निधी मंजुर झाल्यामुळे वर नमूद केलेल्या उपशीर्षाअंतर्गत मार्च२०१३ मध्ये रु.२५६.१९ लाख इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात या योजनेखाली मूळ तरतूद रु. ३२०.०० लाख तरतुद प्राप्त झाली होती. ट्रक टेम्पोच्या प्रस्तावासाठी शासनास प्रस्तावित केलेल्या रक्कमेपेक्षा कमी रक्कमेस शासन मंजूरी प्राप्त झाली. उर्वरित बचत नौका बांधकामासाठी ६४०५ कर्ज या अर्थशिर्षाखाली वळता करण्याबाबत शासनास प्रस्तावित केले होते. परंतू त्या प्रस्तावास शासन मंजुरी प्राप्त झाली नसल्यामुळे मूळ तरतुदीनुसार झालेली बचत रु.१९२.०३ लाख शासनास समर्पित करण्यात आली आहे. व अंतिम तरतुदीनुसार पुर्ण खर्च झाला आहे.

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
४४०५ - मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च, १९५ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाना कर्जे पे.यो.यो. १९५ (००)(०५) सुरक्षण, वाहतूक व विक्री नौकासाठी कर्जे (रासविनी हिस्सा) (४४०५०१७७) मुळ- २,३०.०० पुरक ०.०२ पुनर्विनियोजन ८,८३.९८	११,१४.००	११,१३.९९	-०.०१

टिपा व भाष्ये :-

ट्रक व टेम्पो यांच्या खरेदी आणि राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ भांडवली हिस्सा यासाठी शासनाकडून प्राप्त झालेला मंजूर प्रस्तावावरील खर्चात वाढ झाल्यामुळे मार्च२०१३ मध्ये रु.८८३.९८ लाख इतका अतिरिक्त निधी पुरविण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात या योजनेखाली मूळ तरतूद रु. २३०.०० लाख प्राप्त झाली होती. ट्रक टेम्पो व रासविन भागभांडवलाच्या प्रस्तावाकरिता शासन मंजुरी प्राप्तझाल्यामुळे बीडीएस वा प्राप्त झालेली तरतूद रु.१११४.०० लाख पैकी रु.११,१३.९९ एवढी खर्च झाली असून बचत रु.०.०१ मर्यादित आहे.

अनुदान क्र. डी-११ " राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण "

. हजारात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
६००३- मत्स्यव्यवसायावरील राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण मुळ रु. ३२,००,०० पुरक रु. --- वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २०१३)	३२,००,००	२५,४४,१०	(-) ६,५५,९० -६,५५,९०

टिपा व भाष्ये :-

विनियोजनातील बचत खालील शीर्षाखाली झाली.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राष्ट्रीय सहकार विकास निगम कडून मच्छीमार सहकारी संस्थांना यांत्रिकी नौका खरेदीसाठी तसेच मासळीचे संरक्षण, पणन व वाहतूक तसेच भाग-भांडवल या योजनांसाठी कर्ज देण्यात येते. सदर कर्जाची परतफेड राज्य शासनामार्फत करण्यात येते. त्याकरीता प्रत्येक वित्तीय वर्षात निधी अर्थसंकल्पीत करण्यात येतो. सदर निधी अर्थसंकल्पीत करताना नेमक्या किती निधीची आवश्यकता लागणार आहे याबाबत राष्ट्रीय सहकार विकास निगम कडून माहिती घेण्यात येते व त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे संबंधित वर्षामध्ये निधी अर्थसंकल्पित केला जातो. रष्ट्रीय सहकार विकास निगम शासनास माहिती सादर करताना मागील वित्तीय वर्षात वितरित करण्यात आलेली कर्जे, चालू वित्तीय वर्षात वितरित होणारी अंदाजित कर्जे विचारात घेऊन नेमका किती निधी अर्थसंकल्पीत करावा लागणार आहे याबाबत माहिती सादर करते. सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये NCDC कडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे कर्जाच्या मुद्दलाची परतफेड करण्याकरीता .३२,००,००,०००/- इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. तथापि कर्जे कमी वितरित झाल्याने, NCDC ने .२५,४४,०९,८००/- इतक्या निधीची मागणी केली. त्यानुसार रु.२५,४४,०९,८००/- इतका निधी वितरित करुन .६,५५,९०,२००/- इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आलेला आहे.

(रु.लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
६००३- राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण १०८ राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून कर्जे १०८ (००)(०१) राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाकडून कर्जे मुळ रु. ३२,००,०० पुरक रु. -६,५५.९०	२५,४४.१०	२५,४४,१०	---

टिपा व भाष्ये :-

राष्ट्रीय सहकार विकास महामंडळाला कर्जाच्या प्रत्यक्ष पुनर्प्रदानावर आधारीत .६५५.९० लाख इतक्या निधीचे केलेले प्रत्यर्पण विचारात घेता, विभागाचे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्र हे जास्त असल्याचे सिध्द झाले.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात मत्स्यव्यवसाय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राष्ट्रीय सहकार विकास निगम कडून मच्छीमार सहकारी संस्थांना यांत्रिकी नौका खरेदीसाठी तसेच मासळीचे संरक्षण, पणन व वाहतूक तसेच भाग-भांडवल या योजनांसाठी कर्ज देण्यात येते. सदर कर्जाची परतफेड राज्य शासनामार्फत करण्यात येते. त्याकरीता प्रत्येक वित्तीय वर्षात निधी अर्थसंकल्पीत करण्यात येतो. सदर निधी अर्थसंकल्पीत करताना नेमक्या किती निधीची आवश्यकता लागणार आहे याबाबत राष्ट्रीय सहकार विकास निगम कडून माहिती घेण्यात येते व त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे संबंधित वर्षामध्ये निधी अर्थसंकल्पित केला जातो. राष्ट्रीय सहकार विकास निगम शासनास माहिती सादर करताना मागील वित्तीय वर्षात वितरित करण्यात आलेली कर्जे, चालू वित्तीय वर्षात वितरित होणारी अंदाजित कर्जे विचारात घेऊन नेमका किती निधी अर्थसंकल्पीत करावा लागणार आहे याबाबत माहिती सादर करते. सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये NCDC कडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे कर्जाच्या मुद्दलाची परतफेड करण्याकरीता .३२,००,००,०००/- इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. तथापि कर्जे कमी वितरित झाल्याने, NCDC ने .२५,४४,०९,८००/- इतक्या निधीची मागणी केली. त्यानुसार रु.२५,४४,०९,८००/- इतका निधी वितरित करुन .६,५५,९०,२००/- इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आलेला आहे.

साक्ष :-

2.2 उपरोक्त अनुदानासंदर्भात समितीने दिनांक २१ सप्टेबर, २०१६ रोजी प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग यांची साक्ष घेतली.

पशुसंवर्धन विभाग

प्रधानशीर्ष ४४०३ पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च १०१ (००)(०३) जीएलपी/जीएमपी मानकानुसार पशुवैद्यकीय जैवपदार्थ पुणे संस्थेचे बळकटीकरण- राज्य अंतर्गत योजना

कुक्कुट लस मात्रा निर्मिती प्रयोगशाळा स्थापनेकरीता केंद्र सरकारची मंजूरी प्राप्त झाली नाही, याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मागणी क्रमांक डी-९ ही ४४०३ या लेखाशीर्षातील इन्स्टिटयूट ऑफ व्हेटर्नरी बायोलॉजीकल प्रॉडक्टस, पुणे येथील जीएलपी/ जीएमपी नॉर्मसबाबत आहे. यामध्ये केंद्र सरकारची मंजूरी प्राप्त झाली नाही हे लेखी दिलेले उत्तर अचूक नाही. यामध्ये चार कंपोनंट होते. त्यामधील कार्यालयीन खर्च पूर्ण झालेला आहे. दुसरी बाब 8 लक्ष रुपये सामग्री व पुरवठयाबाबत होती, त्यात ७ लाखाची बचत झालेली आहे कारण बायो डिझेलची परवानगी दिनांक ३० मार्च २०१३ रोजी मिळाली. याचा निधी वित्त विभागाकडून येईपर्यत विभागाने कार्यालयीन खर्चातून हे काम केलेले होते. कारण प्रयोगशाळा बंद ठेवता येत नाही. त्यामुळे यामध्ये बचत झालेली आहे. परंतु हे काम पूर्ण झालेले आहे. तिसरी बाब म्हणजे यामध्ये यंत्रसामग्रीकरीता ४० लाख रुपयांची तरतूद होती. ३२ लाख खर्च झालेला आहे, यामधील ७ लाख ६४ हजार रुपये राहिलेले आहेत कारण जो डेटा लॉगर घ्यावयाचा होता त्याची किंमत जास्त होती. तो ७ लाखाच्या मर्यादेत बसत नव्हता. पण जे आयटम बसत होते, ते सर्व पूर्ण घेतलेले आहेत. बाष्पपात्र व लहान वस्ते इत्यादी मिळून ३२ लाख रुपये खर्च केलेला आहे. शेवटची मोठी रक्कम रु.१८४ लाखापैकी ३३ लाख बचत म्हणून दिसत आहे. १५० लाखाची बचत दिसते ती राष्ट्रीय कृषी विकास योजनेमध्ये दिसत आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेमध्ये हा निधी मिळाल्यामुळे तो खर्च करुन प्रयोगशाळा पूर्ण केलेली आहे. तेथील बचत झालेली रक्कम समर्पित केलेली आहे. फक्त कार्यालयीन खर्चातून बायो डिझेल वापरले आहे. बांधकाम राष्ट्रीय कृषी विकास योजनेमध्ये करुन घेतल्यामुळे हा निधी शिल्लक राहिलेला आहे.

उपरोक्त लेखाअंतर्गत विभागाने पुरवणी मागणी घेतली आहे व रक्कम प्रत्यार्पित केली आहे ही बाब समितीने निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जी पुरवणी

मागणी मान्य केलेली आहे ती बाब वेगळी आहे. ज्या बाबींकरिता पुरवणी मागणी घेतली आहे, त्याकरिता त्याचा वापरही झालेला आहे. महाराष्ट्र मेप व लोकर महामंडळाच्या भाग भांडवलाकरिता ही पुरवणी मागणी घेतलेली आहे. ज्या साठी तो निधी होता, त्या उद्देशासाठी त्याचा वापर झालेला आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेमध्ये व कार्यालयीन खर्चातून हा खर्च भागविलेला आहे. तेथेच बचत झालेली आहे. मोठी बचत अशामुळे दिसते की, त्या वर्षी फक्त ८० टक्के निधी रिलीज केलेला आहे. यामुळे २० टक्के बचत झालेली आहे.

कुक्कुट लस मात्रा निर्मिती प्रयोगशाळेस केंद्र शासनाची मंजूरी न मिळण्याचे कारण काय, कालांतराने यास मंजूरी मिळाली का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये पूर्ण खर्च झालेला असून प्रयोगशाळा पूर्ण झालेली आहे. फक्त राष्ट्रीय कृषी विकास योजनेमध्ये हा खर्च केलेला आहे. तो खर्च राज्याच्या निधीतून झालेला नाही.

राष्ट्रीय कृषी विकास योजनेमधून हे काम केलेले आहे पण यास मंजूरीच मिळालेली नाही. असे स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केले आहे. याबाबत समितीने लक्ष वेधले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केलेले उत्तर हे अचूक नाही व त्याबाबत सचिवांनी समितीची क्षमा मागितली.

कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून सचिवांना खोटी माहिती मिळत आहे हा विषय समितीच्या बैठकीत चर्चेला आल्यामुळे ही बाब समितीच्या निदर्शनास आली की, केंद्र शासनाची परवानगी मिळाली आहे नाहीतर केंद्र सरकारची परवानगी मिळाली नाही असे समितीस गृहीत धरावे लागले असते. या प्रकल्पास केंद्र सरकारची मंजूरी मिळाली की नाही व ५० टक्के रक्कम मिळाली किंवा मिळाली नाही याबाबत योग्य माहिती अधिकाऱ्यांकडून सांगितली नाही. त्यामुळे विभागीय सचिवांना चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी असे समितीने सूचीत केले असता काम पूर्ण झालेले आहे. पशुसंवर्धन विभागाशी संबंधित बाकीचे ज्या पाच बाबी आहेत त्याची ८० टक्के रक्कम मिळाली असून पूर्ण रक्कम खर्च झालेली आहे. फक्त २० टक्के रकमेची बचत झालेली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

मत्स्यव्यवसाय विभाग

प्रधानशिर्ष ४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च :-

१०१ गोडया पाण्यातील मत्स्यव्यवसाय १०१ (००) (०४) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना गोडयापाण्यातील कोळंबी बीज उबवणी केंद्र राज्य योजनांतर्गत योजना (४४०५०६२२)

या योजनेअंतर्गत सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात ३० लाख एवढी मुळ तरतूद प्राप्त होती. ही १०० टक्के रक्कम आर्थिक वर्षाच्या शेवटी देण्यात येते का ? अगोदर काही निधी रिलीज केला आहे की नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,हा मुद्दा यामुळे आलेला आहे की, एनसीडीसीच्या योजनेमध्ये ३ घटक आहेत. ५ टक्के अनुदान भागभांडवल, २० टक्के भागभांडवल व ५५ टक्के भाग भांडवल अशा प्रकारे कर्ज दिले जाते. यामध्ये ५ टक्के, २० टक्के व डीपीडीसीकडून १० टक्के असे ३५ टक्के रक्कम दिलेली कर्ज प्रकरणे मोठया प्रमाणावर होती. त्यामुळे विभागाने निर्णय घेतला की, ५५ टक्केची कर्ज प्रकरणे भरपूर प्रमाणात प्रलंबित असल्याने सर्व कामे अर्धवट राहिलेली आहेत. भागभांडवलाची रक्कम कर्जामध्ये पुनर्विनियोजन करुन घेऊन, कर्जात रुपांतरीत करुन घेऊन काही प्रकरणे पूर्ण होतील. नवीन प्रकरणे तोपर्यत थांबविण्यात आली होती. हा निर्णय विभागाने वित्तीय वर्षाच्या मध्येच घेतला आहे. वित्त विभागाने त्याला मान्यता दिलेली नाही. शेवटी याच योजनेखाली ५ टक्के व २० टक्केप्रमाणे त्यांनी ४ कोटी रुपये रक्कम ३१ मार्च २०१३ ला वितरीत केली. ही रक्कम वितरीत केली तेव्हा बीडीएस सिस्टीम बंद पडलेली होती. तसेच जितकी रक्कम वर्ग करण्याची त्यांनी परवानगी दिलेली आहे, त्याचा कर्ज म्हणून वापर झालेला आहे. जेथे कर्जाचा भाग आहे, तेथे लक्षात येते की, जास्त खर्च झालेला आहे.

प्रधानशिर्ष ६४०५ मत्स्यव्यवसायासाठी कर्जे १९५ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना कर्जे, पं. यो. यो. १९५ (००) (०१) पं.यो.यो. यांत्रिक नौका/खोल सागरातील नौकासाठी कर्जे (रासविनी हिस्सा) :-

या योजनेअंतर्गत सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात ५५ टक्के कर्ज रकमेकरिता शासनास १६९ प्रस्ताव मंजूरीस्तव पाठविण्यात आले होते. त्यातील १११ प्रस्तावांना मंजूरी मिळाली व ५८ प्रस्तावांना मंजूरी मिळाली नाही. म्हणून २ कोटी ९२ लाख २३ हजार रुपयाची बचत झाली आहे. त्या अनुषंगाने समितीने प्रश्न उपस्थित केला की, हे प्रस्ताव मंजूरीसाठी कधी आले होते. ५८ प्रस्तावांना मंजूरी नाकारण्याची कारणे काय होती ? यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, २८ कोटी ८८ लाखाची मुळ तरतूद होती. सुरुवातीस ७५ टक्के रक्कम वितरीत केली गेली. नंतर ती ८० टक्केपर्यत दिली गेली आहे. त्यांनी काही बाबींच्या

पुनर्विनियोजनाकरिता आणखी रक्कम दिली. उपलब्ध असलेल्या सर्व निधीचा वापर झालेला आहे. त्यामुळे उर्वरित प्रकरणे हाती घेता आलेली नाहीत. त्या वर्षी संपूर्ण योजनांना २० टक्केची कपात लावलेली होती.

तरीही विभागाला ८० टक्केपेक्षा जास्त रक्कम मिळाली आहे असे म्हणणे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महालेखाकांराच्या आक्षेप काढण्याच्या प्रथेप्रमाणे मुळ अर्थसंकल्पामधील रक्कम व प्रत्यक्ष खर्च झालेली रक्कम पुनर्विनियोजनामध्ये धरली जाते.

पण विभागाने असे म्हटले आहे की, २० टक्के कपात झाली व निधी कमी मिळाला आहेत, हे न म्हणता ही रक्कम प्रत्यार्पित केल्याचे म्हटले आहे. समितीसमोर असलेल्या माहितीमध्ये असे म्हटले आहे की, प्रस्तावांना मंजूरी नव्हती म्हणून रक्कम समर्पित केलेली आहे. विभागाने लेखी स्वरुपात समितीस कळविलेली माहिती वेगळी आहे व बैठकीच्या वेळी सांगत असलेली माहिती वेगळी आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सदर बाब मान्य केली व प्रस्तावास मंजूरी का मिळाली नाही, कोणाकडून विलंब झाला याची माहिती समितीस सादर करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

समितीला माहिती देण्याबाबतचा नमुना छापिल असतो. त्या छापित नमुन्यात बदल करण्यात यावा. २० टक्के कपातीची रक्कम समोरासमोर तशीच टॅली होते. आता विभागाचे प्रस्ताव संमत न होण्याचे कारण असे आहे की, त्यावेळी योजनेच्या निधीमध्ये २० टक्के कपात होती. सध्या जे काम चालू आहे, त्यास अधिक निधी दिल्यास ते काम पूर्ण होईल. व्दितीय व तृतीय टप्प्यावर असलेले प्रस्ताव वगळायचे याबाबतचे परंपरागत छापील नमूना बंद करण्यात यावा. यामुळे अर्धे प्रश्न सुटतील. विभागाकडून बरोबर उत्तर दिले तर आणखी प्रश्न तयार होत नाहीत. आता बऱ्याच गोष्टी बदलण्यात आलेल्या आहेत पण काही राहिल्या आहेत. चांगल्यासाठी बदल होणे अपेक्षीत आहे. शासनाच्या प्रचलित वापरात काही बोजड शब्दही आहेत. त्यातून दुसराच अर्थ ध्वनित होतो. परांपरागत सर्वच प्रोफार्मा घेऊन चालले पाहिजे असे शासनावर बंधन नाही. यामध्ये सुटसुटीतपणा आला पाहिजे. त्यामुळे विभागालाही व्यवस्थित उत्तरे देता येतील. या प्रोफार्मामध्ये सुटसुटीतपणा असेल तर विभागाकडे दोनच प्रश्न येतील. त्यामुळे चांगल्या कामासाठी म्हणून प्रोफार्मामध्ये बदल करावा. यामुळे वेळेचा अपव्यय टाळता येईल असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले की, सन २०१२-२०१३ व २०१३-२०१४ ची माहिती समितीसमोर एक महिन्याच्या आत सादर करण्यात येणार आहे त्यामध्ये हा प्रश्न उद्भवणार नाही.

विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये चुकीची उत्तरे दिल्यामुळे समितीचा वेळ वाया गेला. विभागीय सचिवांनी समितीस योग्य स्पष्टीकरण देऊन समितीचे समाधान करण्याचा

प्रयत्न केला. पण ज्या अधिकाऱ्यांनी चुकीची लेखी उत्तरे तयार केली त्यांच्याकडून विभागाने स्पष्टीकरण घ्यावे व याबाबत विभागाने गांभिर्याने लक्ष घालावे अशी सूचना समितीने विभागास केली.

प्रधानशिर्ष ४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च :-

मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च १९५ सहकारी संस्था १९५ (०१) (०३) यांत्रिक नौका (रासविनी) (४४०५०१६८) (०१)(१०) यांत्रिकी नौका (राजविम) (४४०५०५५१) १९५ सहकारी संस्था १९५ (०१) (०३) यांत्रिक नौका (रासविनी)

या अंतर्गत २.२२ कोटी व १९५ सहकारी संस्था १९५ (०१) (१०) यांत्रिकी नौका (रासविनी) या अंतर्गत १०.५० कोटी अशी एकूण १२.७२ कोटी रुपयांची तरतूद विभागाला उपलब्ध झाली. यापैकी ८.७८ कोटी रुपये मत्स्यव्यवसायासाठी कर्जे १९५- मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना कर्जे, पं.यो.यो. १९५ (००) (०१) पं.यो.यो.यांत्रिकी नौका/खोल सागरातील नौकासाठी कर्जे (रासविनी हिस्सा) या योजनेअंतर्गत खर्च झाले. त्या संदर्भातील लेखाशीर्ष पुनर्विनियोजनाचा प्रस्ताव पाठविला होता तो मंजूर झाला नाही. ३१ मार्च, २०१३ रोजी ४.३३ कोटी रुपये या दोन्ही योजनांकरिता दिले गेले, परंतु बीडीएस बंद झाल्यामुळे रक्कम काढता आली नाही असे सचिवांनी समितीस सांगितले.

पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव पूर्वी वित्त विभागाचे सचिव होते. त्या अनुषंगाने समितीने उपरोक्त विषयाबाबत विचारणा केली की, ३१ मार्च, २०१३ रोजी मंजुरी मिळाली. परंतु अकाऊंटींग त्याच दिवशी पूर्ण होते. बीडीएस प्रणाली केव्हा बंद होते याची अधिकाऱ्यांना माहिती असते. वित्त विभागाने बीडीएस प्रणाली बंद होणार त्याच वेळेला सहमती देऊन हा मुद्दा निर्माण करण्याचे कारण काय होते ? यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, महालेखापालांनी हा मुद्दा उपस्थित केला असता तर बरे झाले असते. वित्त विभागाला मुद्दा उपस्थित करण्याकरिता मर्यादा असतात. वित्त विभागाकडे ४० हजार कोटी रुपये उपलब्ध असले तरी बजेट ६० हजार कोटी रुपयांचे सादर होते आणि ते मंजूर होऊन जाते. त्यामुळे पहिल्या दिवसापासून कपात सुरु होते. शेवटपर्यंत वित्त विभागाकडून विभागांना हळहळू निधी दिला जातो आणि आदेशही काढले जातात. वित्त विभागाने पैसे दिले, परंतु ते काढता येऊ नयेत, कारण विभागाकडे तितके पैसे नसतात. पदूमचे सचिव हे दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वित्त विभागात रुजू झाल्यानंतर दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत ३ महिने त्यांना काहीच करता आले नाही. परंतू त्यानंतर नियंत्रणाची प्रगती योग्य नाही हे त्यांच्या निदर्शनास आले. दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी वित्त सचिव म्हणून त्यांनी सर्व संबंधितांची बैठक घेतली आणि वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांकडे विचारणा केली की, निधी संदर्भात सर्वच नस्त्या बोलावण्याची कारणे

काय आहेत? अधिकाऱ्यांकडून माहिती घेवून ही पध्दत बदलण्याची आवश्यकता आहे असे अतिरिक्त मुख्य सचिव यांना सुचविले. पहिला आदेश एप्रिल महिन्यात काढला. विभागाला ७० टक्के निधी वितरित झाला आहे असे समजून नस्त्या पाठवू नका. २०१६-१७ मध्ये आणखी धाडसी निर्णय घेऊन ८० टक्के निधी वितरित केला. वित्त विभागाकडे कुठलीही नस्ती येत नाही. परंतु हा बदल पदुम या खात्याच्या पातळीवर करण्यात आला नाही.

या अनुषंगाने समितीने सुचित केले की, या संदर्भात समन्वय समिती स्थापन करण्याची आवश्यकता आहे. ही अडचण सर्वच विभागांमध्ये आहे. अर्थसंकल्पीत केलेली तरतूद आणि प्रस्तावित केलेल्या कामाची रक्कम यामध्ये तफावत असते. सर्वच कामांना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे, कारण लोकप्रतिनिधींकडून कामाची शिफारस केली जाते, पाठपुरावा होत असतो. अशी समन्वय समिती स्थापन करण्यात आली तर ती समिती वित्त विभाग व इतर विभागांमध्ये समन्वय ठेवेल. या समितीकडून कामांची छाननी झाली की महालेखापालांच्या दृष्टीने देखील सोयीचे होईल. आता कृषी व पदुम विभाग असा क्रांतीकारी निर्णय घेण्यात यावा. सध्याचे पदुम विभागाचे सचिव हे जेव्हा वित्त विभागात कार्यरत होते तेव्हा ७० ते ८० टक्के निधी वितरीत करण्याचा निर्णय घेतला होता म्हणूनच आता त्यांना कृषी विभागात नियुक्त केले आहे. कृषी व पदुम हे विभाग शेतकऱ्यांच्या आणि राज्याच्या दृष्टीने महत्वाचे आहेत. जसा ॲप्रोचसचिवांनी वित्त विभागामध्ये घेण्यात आला तसाच ॲप्रोच या विभागामध्ये म्हणजे पदुम विभागामध्ये देखिल असावा असे मत समितीने व्यक्त केले असता यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

<u>प्रधानशिर्ष- ६००३ मत्स्यव्यवसायावरील राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण :</u>

मत्स्यव्यवसायावरील राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण सन २०१२-१३ या वर्षात कमी खर्च होण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये मूळ तरतूद ३२ कोटी रुपयांची होती. त्यापैकी प्रत्यक्ष २५ कोटी ४४ लाख १० हजार रुपये खर्च झाला आहे. बचत होण्याचे कारण असे की, एनसीडीसीकडून नोव्हेंबर, २०११ मध्ये विचारणा केली गेली की तुम्हाला किती रक्कम परतफेड करावी लागणार आहे, त्यावेळी विभागाने ५५ कोटी रुपये लागतील असे कळविले होते. परंतु मागणी २५ कोटी ४४ लाख १० हजार रुपयांची पाठविली होती. त्यामुळे रक्कम अखर्चित राहिली. त्यामुळे विभागाने याबाबत सुधारणा सुचविली आहे. एनसीडीसीकडून जेव्हा मागणी करण्यात येते त्यावेळी त्यांच्या अटी व शर्तींची, व्याज दराची माहिती असते. त्यामुळे अचूक नियोजन करण्याच्या दृष्टीने या वर्षापासून विभागाकडून कार्यवाही केली जाईल.

विभागाने ५५ कोटी रुपये सांगितले आणि २५ कोटी रुपये घेतले असे झाले का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले व सांगितले की, ३० कोटी रुपयांची बचत केल्यामुळे गॅप पडला. परंतु आता विभागाचे पासबुक व्यवस्थित ठेवण्यात येईल. यलो बुकमध्ये विभागाने २०१६-१७ मध्ये आकडेवारी जुळत नाही म्हणून टिप्पणी दिली होती. आकडेवारी अचूक तयार करुन सचिवांच्या सहीने कळवावे असे विभागाने विधिमंडळाला पत्र पाठविताना त्यात स्टार दिला आहे. आकडेवारीचा अद्‌याप ताळमेळ झालेला नाही. एनसीडीसी आणि पदुम विभाग व पदुम विभाग आणि लाभार्थी यांच्यामध्ये खर्चाचा ताळमेळ (रिकन्साईल) झाला पाहिजे.

मच्छीमार सहकारी संस्थांना यांत्रिकी नौका खरेदीसाठी तसेच मासळीचे संरक्षण, पणन व वाहतूक यासाठी निधीची मागणी केली जाते. आजही अनेक प्रस्ताव पडून आहेत, ज्यांना निधीची आवश्यकता आहे त्यांना तो मिळत नाही. १० जणांनी मागणी केली तर दोन जणांना निधी मिळतो. एकीकडे निधी उपलब्ध असताना तो दिला जात नाही. ३० कोटी रुपयांमध्ये अनेकांना सामावून घेता आले असते. ज्या कारणासाठी नियतव्यय राखून ठेवला जातो त्याचा विनियोग होत नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मत्स्यव्यवसायावरील राज्य शासनाचे देशाअंतर्गत ऋण (मागणी क्र.डी-११) या अंतर्गत उत्पन्नातून एनसीडीसीला परतफेड करायची आहे. मागणी कमी असल्यामुळे रक्कम शिल्लक राहिली आहे.

विभागाने ५५ कोटी रुपये सांगितले होते व ३२ कोटी रुपयांची तरतूद केली, त्यापैकी २५ कोटी ४४ लाख १० हजार रुपये खर्च झाला व उर्वरित रक्कम समर्पित करण्यात आली. एनसीडीसीकडून विचारणा केली जाते त्यावेळी अवास्तव मागणी का होते ? ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, पूर्ण राज्याची आकडेवारी काढून विभागनिहाय विभागणी केली तर अशी परिस्थिती आली नसती. राज्यात ऊसासाठी, वस्त्रोद्‌योगासाठी, पोल्ट्रीसाठी सहकारी संस्थांना कर्ज दिले जाते. परंतु विभागनिहाय ब्रेकअप देताना आकडेवारी बदलते. परंतु आता या वर्षापासून पदुम विभागाचा हिशोब व्यवस्थित ठेवण्यात येत आहे. जेणेकरुन तफावत येणार नाही.

शहरी आणि सागरी भागातील मच्छीमार लोकांना या योजनांचा लाभ मिळतो. औरंगाबाद विभागातील ग्रामीण भागात जायकवाडी सारखे अनेक मोठे प्रकल्प आहेत तसेच इतर ठिकाणी सुध्दा असे प्रकल्प आहेत. तेथे काम करणारे लोक आहेत. ते या सरकरी योजनेपासून अनभिज्ञ आहेत. तेथील मच्छीमार लोकांना या योजनेचा फायदा दिला तर रक्कम खर्च होईल. एनसीडीसीकडून अल्पदरात कर्ज दिले जाते याची त्यांना माहितीच नसते. सरकारी योजनाची

माहिती व्हावी यासाठी वर्कशॉपचा उपयोग होऊ शकतो. म्हणून किमान त्या भागात स्थापन केलेल्या सहकारी संस्थांना बोलावूनत्यांचा वर्कशॉप घ्यावा किंवा विभागीय पातळीवर वर्कशॉप घेण्यात यावेतअशी सूचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी याबाबत सांगितले की, आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनाअसे वर्कशॉप घेण्यास सांगितले आहे. मत्स्य खाद्य व्यवसाय, मत्स्य बीज यात विभाग मागे आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते. बीज वाढविण्याचा मे महिन्यात प्रयत्न केला होता. परंतु मे महिन्यात स्टॉक नव्हता. हॅचरिज दुरुस्तीसाठी बंद होते. जून २०१७ पासून हंगाम सुरु होतो. यावर्षी व्यवस्थित जाहिरात देऊन कार्यवाही करण्यात येणार आहे.

शेतकऱ्यांनी तयार केलेल्या शेततळयातील माशांचा लिलाव ६ लाख रुपयांना झाल्याचे पहावयास मिळाले. लोक याबाबत अनभिज्ञ आहेत. अशा प्रकारचा वर्कशॉप प्रत्येक विभागीय पातळीवर घेतला तर जागृती होऊ शकते. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, बारमाही पाणी नाही, त्यांना मासेमारी करणे शक्य नाही. माशांची वाढ एका महिन्यात १०० ग्रॅम व १२ महिन्याच्या काळात सुमारे १ किलो इतकी होते. जेथे पाणी उपलब्ध नाही तेथे फायदा नाही. अनेक शेतकरी एकत्र आले तर हॅचरिजमधून बीज घेऊन त्यांना देतो. त्यांनी त्या बिजाची ३ ते ४ इंच वाढ करुन फ्लाईंग स्टेजला आल्यानंतर तळ्यात सोडले तर त्यांची पुरेशा प्रमाणात वाढ होते. विभागाकडून बायबॅकची गॅरेंटी देण्यात येते.

परंतु वर्षभर पाणी नाही असे नाही. सहा महिने पाणी उपलब्ध असेल तरी चालते. वनक्रॉप घेता येते असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कमर्शियली माशांची वाढ पुरेशा प्रमाणात होणार नाही, त्यामुळे दर कमी मिळतो. यावर एक किलो वजनाचा मासा १०० टक्के सहा महिन्यात तयार होतो. त्यामुळे प्रतयेक विभागीय पातळीवर कार्यशाळा घेण्यात यावे असे मत समितीने व्यक्त केले.

मच्छीमार समाजाचे मासेमारी हे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन आहे. ७१० कि.मी.चा सागर किनारा या राज्याला लाभला आहे. मच्छीमार समाजाच्या सहकारी संस्थांना कमी दरात डिझेल पुरविले जाते. निसर्गाची सायकल ही एका भागात वेगळी आणि दुसऱ्या भागात वेगळी असे नसते असे सायकल जगभरात एकच सायकल असते. फार तर वातावरणामुळे १५ ते २० दिवसांचा फरक येतो ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणली.

विभागीय सचिवांनी समितीस माहिती दिली की, हॅचरिज पूर्णत: फन्क्शन नसल्यामुळे रेअरिंग पाँडमध्ये ब्रूड स्टॉक वाढविता आले नाही. यावर्षी रेअरिंग पाँड शिल्लक राहणार नाहीत. तेथे ब्रूड उत्पादनाचा प्रश्न येणार नाही. आता ३० हॅचरिज आहे, ८ रेंटवर दिला आहे. बाकी २२ मध्ये १५० कोटीपर्यंत मत्स्य बीज करता आला असता. आतापर्यंत १० ते २० कोटी पर्यंत मत्स्य व्यवसाय करण्यात येत होता. आता तो ३० कोटी पर्यंत करण्यात आला आहे.

वारणा प्रकल्पाखालील भागात १० एकर जागा पाटबंधारे विभागाकडून मिळालेली आहे, तेथे मागील ५ वर्षात विभागाने काहीही केले नाही. प्रकल्प सुरु करण्यासाठी प्रस्ताव पाठविल्यानंतर आयुक्त कार्यालयाकडून त्रुटी काढल्या जातात. डीपीडीसीकडून या प्रकल्पासाठी ५० लाख रुपयांची तरतूद झालेली असताना प्रस्ताव मान्य नसल्यामुळे तो निधी खर्च होत नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर काम सुरु झालेले आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

अनुदान क्र.डी-९ "पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च" :

2.3 अभिप्राय :- ४४०३ यालेखाशिर्षातंर्गत पशुसंवर्धनावरील भांडवली खर्च यामध्ये मूळ तरतूद रु.२३५.०० लाख करण्यात आली होती व पूरक मागणी रु. ४७.५१ लाख घेण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च ८४४.५४ लाख झाला असून रु. ४३७.९७ लाख बचत झाली आहे. लेखापरींक्षण करताना असे निदर्शनास आले की, प्रत्यक्षात एकूण खर्च हा मूळ तरतूदी ऐवढा देखिल झालेला नाही असे असताना रुपये ४७.५१ लाख रक्कमेची पूरवणी मागणी घेण्यात आली. ती अनावश्यक होती असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदवला आहे. तसेच१०१(००)(०३) जीएलपी/जीएमपी मानकानुसार पशुवैद्यकीय जैवपदार्थ पुणे संस्थेचेबळकटीकरण राज्य योजनांतर्गत योजना या लेखाशिर्षातंर्गत रुपये३०० लाख मूळ तूरतूद होती. एकूण अनुदान ७५.२८ प्राप्त झाले व प्रत्यक्ष खर्च ७५.२८ झाला आहे. . २२४.७२ लाख पुर्नविनियोजीत करण्यात आले कारण कुक्कुट लस मात्रा निर्मिती प्रयोगशाळा स्थापनेकरीता केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त झाली नाही तसेच यासाठी केंद्रशासनाचा निधी केवळ८० टक्के मंजूर झाला आहे असाही आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला आहे.

2.4 मूळ तरतूदी इतका निधी खर्च झाला नसतानाही पुरवणीमागणी करण्यात आली. पूरक मागणी रु.४७.५१ लाख हा निधी १९०(००)(०१) महाराष्ट्र मेंष व लोकर विकास महामंडळाना भाग भांडवली अंशदानी या लेखाशिर्षाखाली घेण्यात आला होता. या लेखाशिर्षाखाली मूळ तरतूद रु.६९.०० लाख असून प्रत्यक्षखर्च रु.८७.३८ लाख एवढा असल्याने पूरवणी मागणी आवश्यक नव्हती. पुरवणीमागणी ज्या उद्देशासाठी घेण्यात आली तिचा वापरत्याच उद्देशासाठी करण्यात आलेला आहे असे समितीस सांगण्यात आले.

2.5 शिफारस :- उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत खालील कारणामुळे प्रत्यक्षात एकूण खर्च हा मूळ तरतूदी एवढा देखिल झालेला नाही. १) कुक्कुट लस मात्रा निर्मिती प्रयोगशाळा स्थापनेकरीता केंद्र शासनाची मंजूरी प्राप्त न झाल्यामुळे व २) केंद्र शासनाने मंजूर निधीच्या केवळ ७५ टक्केच निधी वितरीत केला आहे असे समितीला दिलेल्या लेखी उत्तरात नमूद आहे. परंतू याचे बांधकाम आता पूर्ण झाले असून यामध्ये प्राप्त झालेली पूर्ण रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. तसेच राष्ट्रीय कृषी विकास योजना व कार्यालयीन खर्चातून उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत खर्च भागवण्यात आला आहे. या लेखाशिर्षांतर्गत वित्त विभागाने ८० टक्के निधी वितरीत केल्यामुळे उर्वरित निधीची बचत झाल्याचे दिसून येते. हा विषय शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाचा असून त्यांना यामधून शेतीला पूरक असा व्यवसाय करता येतो. त्यामुळे अशा योजनांसाठी २० टक्के कपात लावणे योग्य नसल्याचे समितीचे मत आहे. भविष्यात अशा योजनांना निधी वितरीत करतांना वित्त विभागाने कपात न लावण्याबाबत आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

मत्स्यव्यवसाय विभाग

अनुदान क्र.डी.-१० " मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च"

2.6 अभिप्राय :-४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च-१०१-गोड्या पाण्यातील मत्स्यव्यवसाय १०१ (००) (०४) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, गोड्या पाण्यातील कोळंबी बीज उबवणी केंद्र राज्य योजनांतर्गत योजना सन२०१२-१३ या आर्थिक वर्षात या योजनेखाली रु.३०.०० लाख एवढी मुळ तरतूद प्राप्त होती. प्रस्ताव प्राप्त न झाल्याने मार्च, २०१३ मध्ये .३० लाख इतका संपूर्ण निधी प्रत्यार्पित करण्यात आला असा आक्षेप महालेखाकारांच्या अहवालात नोंदविला आहे. विभागाने त्यांच्या स्पष्टीकरणज्ञापनात असे नमूद केले आहे की, दिनांक १२/१२/२०१२ अन्वये रु.३०.०० लाख तरतूद बीडीएसवर उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु बीडीएसवर तरतूद उपलब्ध न झाल्यामुळे रु.३०.०० लाख तरतूद समर्पित करण्यात आली आहे.

2.7 शिफारस . (१) :- उपरोक्त मुद्दा हा एनसीडीसीच्या योजनेबाबतचा असून यामध्ये दोन प्रकारची कर्ज प्रकरणे आहे त्यामध्ये ३५ टक्के रक्कम दिलेले कर्ज प्रकरणे व ५५ टक्के रक्कम दिलेली कर्ज अशी दोन्ही प्रकारची कर्ज प्रकरणे अर्धवट होती. भाग भांडवलाची रक्कम कर्जामध्ये पुनर्विनियोजीत करुन घेऊन कर्जात रुपांतरित करुन घेवून काही प्रकरणे पूर्ण करण्यात येतील असे समितीला आश्वासित करण्यात आले. परंतु शासनाकडून माहिती प्राप्त झाली नाही. आता पर्यंत शासनाने किती कर्ज प्रकरणे पूर्ण करण्याची कार्यवाही केली आहे याची सविस्तर माहिती समितीस देण्यात यावी तसेच समितीला आश्वासित करुनही माहिती न पुरविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

2.8 अभिप्राय :- सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात ६४०५ या लेखाशिर्षाखाली अंतर्गतमत्स्यव्यवसायासाठी कर्जे १९५ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांना कर्जे, पं.यो.यो.१९५ (००) (०१) पं.यो.यो. यांत्रिकी नौका/खोल सागरातील नौकासाठी कर्जे या उपशीर्षातंर्गत प्रस्ताव न आल्यामुळे रु१५० लाख व प्रस्तावांना मंजूरी न मिळाल्यामुळे रु९२.७३ लाख असे एकूण रु.४४२.२३ लाख इतका निधी मार्च, २०१३ मध्ये समर्पित करण्यात आल्याचा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलाआहे.

2.9 शिफारस . (२) :- उपरोक्त योजनेखाली ५५ टक्के कर्ज रकमेकरिता शासनास १६९ प्रस्ताव मंजूरीस्तव पाठविण्यात आले होते. त्यातील १११ प्रस्तांवना मंजूरीमिळाली व ५८ प्रस्तावांना मंजूरी मिळाली नाही. म्हणून २९२.२३ लाखाची बचत झाली व सदर रक्कम शासनास समर्पित करण्यात आली. वास्तविक उपरोक्त

योजनेखाली २८ कोटी ८८ लाखाची तरतूद होती. सुरुवातीला ७५ टक्के रक्कम वितरीत केली गेली नंतर ती ८० टक्केपर्यंत दिली गेली आहे. वित्त विभागाने पुनर्विनियोजनाकरिता आणखी रक्कम दिली. त्यामुळे उपलब्ध असलेला सर्व निधी वापरण्यात आला असे असले तरी विभागाकडे एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले होते त्यापैकी शासनास पाठविलेले व प्रस्तावांना मंजूरी न मिळालेले वगळून अद्याप किती प्रस्ताव शासनाकडेप्रलंबित आहेत. सदर प्रस्ताव कधी पर्यंत निकाली काढण्यात येणार आहे याबाबत समितीस माहिती देण्यात यावी. तसेच उपरोक्त योजनाअंतर्गत प्रस्तावांना मंजूरी का मिळाली नाही व ज्या अधिकाऱ्यांच्या स्तरावर विलंब झाला त्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

2.10 अभिप्राय :- लेखाशिर्षक्र. ४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च १९५ सहकारी संस्था १९५ (०१) (०३) यांत्रिकनौका याअंतर्गत २.२२ कोटी १९५ (०१) (१०) यांत्रिक नौका या लेखाशीर्षातंर्गत १०.५० कोटी अशी एकूण १२.७२ कोटी रुपयांची तरतूद विभागास उपलब्ध होती. यापैकी ८.७८ कोटी रुपये मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थाना कर्जे याकरिता व ४.३३ कोटी रुपये यांत्रिकनौका या दोन्ही योजनांकरिता वित्त विभागाने 31 मार्च रोजी निधी दिला होता परंतु बीडीएस बंद झाल्यामुळे रक्कम काढता आली नाही.

2.11 वित्त विभागाकडून बऱ्याच वेळेस ३१ मार्च रोजी निधी वितरीत केला जातो. परंतु वित्तीय लेख त्याच दिवशी पूर्ण करण्यात येते व बीडीएस प्रणाली सुध्दा त्यादिवशी बंद होणारअसते त्यामुळेबीडीएस अभावी वितरीत झालेला निधी सुध्दा संबंधित विभागास मिळत नाही अशा बाबी व अडचणी विनियोजनाच्या अहवालावर चर्चा करताना वारंवार समितीच्या निदर्शनास आलेल्या आहेत.

2.12 शिफारस . (३) :- निधी वितरीत करण्यासंदर्भातील मुद्दा महालेखाकारांनी उपस्थित करणे आवश्यक आहे. ३१ मार्च रोजी निधी वितरीत केल्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. केवळ रक्कम कागदावर दिल्याचे व घेतल्याचे दाखवूननंतर ती रक्कम समर्पित करावी लागते अशा केवळ तांत्रिक बाबींमध्ये हा निधी अडकवून न ठेवता ज्या उद्देशासाठी हा निधी अर्थसंकल्पीत केला जातो. त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी त्याचे योग्य नियोजन होणे आवश्यक आहे. तरीही वित्त विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ६/४/२०१५ रोजी बैठक घेवून निधी वितरणाच्या संदर्भात एप्रिल महिन्यात विभागाला ७०% निधी वितरीत झाला आहे असे समजून नस्त्या वित्त विभागाकडे पाठविण्यात येऊ नये तसेच सन २०१६-१७ मध्ये वित्त विभागाने एप्रिल महिन्यात ८०% निधी वितरीत

करण्याचा निर्णय घेतला. आता वित्त विभागाकडे कुठलीही नस्ती येत नाही. त्यामुळे अर्थसंकल्पीत निधी वितरणाच्या संदर्भातील यंत्रणा अधिक वेगवान व सुटसुटीत केली आहे. यासंदर्भात पदुमविभागाने वित्त विभागाच्या बदललेल्या कार्यपध्दतीचा अवलंब केलेला नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली व असे सुचित केले की, ही अडचण सर्वच विभागामध्ये आहे. बऱ्याच वेळेस अर्थसंकल्पित तरतुद केलेली रक्कम आणि प्रस्तावित केलेल्या कामाची रक्कम यामध्ये तफावत असते. सर्वच कामांना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. बऱ्याच कामाची शिफारस लोकप्रतिनिधींकडून करण्यात येते शिवाय त्याचा पाठपुरावा करण्यात येतो त्यामुळे यासंदर्भात समन्वय समिती स्थापन करण्याची आवश्यकता आहे आणि सदर समिती वित्त विभाग व इतर विभागामध्ये समन्वय ठेवण्याचे काम करेल. शिवाय समन्वय समितीकडून निधीची छाननी झाल्यास महालेखाकारांना विभागाचे लेखापरिक्षण करणे सोईचे होईल असे समितीचे मत आहे. उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता वित्त विभागाकडून वितरीत करण्यात येणाऱ्या निधीच्या संदर्भात वित्त विभाग व इतर विभाग यांच्यामध्ये समन्वय ठेवण्यासाठी समन्वय समिती स्थापन करण्यात यावी. सदर समितीमध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात यावा व विभागाला प्राप्त झालेला अर्थसंकल्पीत निधी नियोजनबध्द पध्दतीने व विहीत वेळेत खर्च करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस देण्यात यावी. अशी समितीची शिफारस आहे.

अनुदान क्र.डी.११ "राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण"

2.13 अभिप्राय :- मागणी क्र.डी-११ लेखाशिर्ष ६००३ याअंतर्गतमत्स्यव्यवसायवरील राज्य शासनाचे देशांतर्गत ऋणयामध्ये शासनाचे निकष असे आहे की, राष्ट्रीय सहकार विकास निगम कडून मच्छीमार सहकारी संस्थांना यांत्रिकी नौका खरेदीसाठी तसेच मासळीचे संरक्षण, पणन व वाहतूक तसेच भाग भांडवल या योजनासाठी कर्ज देण्यात येते. सदर कर्जाची परतफेड राज्य शासनामार्फत करण्यात येते. त्याकरिता प्रत्येक वित्तीय वर्षात निधी अर्थसंकल्पीत करण्यात येतो. सदर निधी अर्थसंकल्पीत करताना नेमक्या किती निधीची आवश्यकता लागणार आहे याबाबत राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून माहिती घेण्यात येते. प्राप्त माहितीच्या आधारे सदर वर्षामध्ये निधी अर्थसंकल्पीत करण्यात येतो. राष्ट्रीय सहकार विकासनिगम शासनास माहिती सादर करताना मागील वित्तीय वर्षात वितरीत केलेली कर्जे, चालू वित्तीय वर्षात अंदाजित वितरीत करण्यात येणारी कर्जे याबाबत आढावा घेऊन नेमका किती निधी अर्थसंकल्पीत करावा लागणार आहे याची माहिती शासनास सादर करतात.

उपरोक्त निकष पाहता राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून नोव्हेंबर, २०११ मध्ये कर्ज वितरणासाठी ५५ कोटी रुपये लागतील असे शासनास कळविण्यात आले होते. परंतु प्रत्यक्षात सन२०१२-१३ या वर्षासाठी मागणी २५ कोटी ४४ लाख ९

हजार ८०० रुपयेची केली होती राष्ट्रीय सहकार विकास निगम यांनी शासनाकडे कर्जाची कमी मागणी केल्याने मच्छिमारांवर अन्याय झाला आहे. विभागाने सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात उपरोक्त योजनेकरिता मूळ तरतूद ३२ कोटी रुपयाची केली होती सदरहू तरतूद सुध्दा पूर्णपणे वापरण्यात आली नाही. त्यातीलरुपये ६ कोटी ५५ लाख ९० हजार २०० इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आला आहे यावरुन योजना शासनस्तरावरुन तयार करायच्या शासनाकडून निधी देखिल अर्थसंकल्पीत करण्यात येतो परंतु याची प्रभावी अंमलबजावणी प्रशासनाच्या स्तरावरून न झाल्यामुळे निधी परत जाणे ही तर अत्यंत आक्षेपार्ह बाब आहे, परिणामी अनेक मच्छिमार कर्जापासून वंचित राहीले

2.14 शिफारस . (१) :- राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून अर्थसंकल्पीत निधीचे नियोजन योग्यप्रकारे करण्यात आले नाही. कारण राष्ट्रीय सहकार विकास निगम जेव्हा निधीची मागणी करते त्यावेळी त्यांना अट माहिती असते. या बाबी विचारात घेता अर्थसंकल्पात निधीची मागणी करताना त्याचे योग्य नियोजन होणे आवश्यक होते. त्यामुळे भविष्यात अचूक नियोजन करुन अर्थसंकल्पीत निधीची मागणी करण्यात यावी व त्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

2.15 शिफारस . (२) :- मच्छीमार सहकारी संस्थांना यांत्रिकी नौका खरेदीसाठी तसेच मासळीचे संरक्षण, पणन व वाहतूक यासाठी शासनाकडून निधी दिला जातो. विभागाकडे निधीअभावी अनेक प्रस्ताव पडून असतात. अनेक मच्छीमारांना विशेषत: ग्रामीण मच्छीमारांना शासकीय योजनांची माहिती नसते. शहरी आणि सागरी भागातील मच्छीमार लोकांना योजनांचा लाभ मिळतो. परंतु ग्रामीण भागात जेथे पाणी साठयाचे मोठे प्रकल्प आहेत तेथील मच्छीमार लोकांना योजनांचा लाभ मिळत नाही. त्यांना मच्छीमारांसाठी असलेल्या शासकीय योजनांचा लाभ समजावून सांगितल्यास विभागाकडे मोठ्या प्रमाणात अखर्चित राहणारी रक्कम खर्च होईल. यासाठी योजनांचा लाभ व्यक्तीगत मच्छीमार तसेच त्यांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थांना बोलावूनराष्ट्रीय सहकार विकास निगमकडून अल्पदरात देण्यात येणाऱ्या कर्जाची माहिती देण्यासाठी नियमित कार्यशाळा घेण्याची आवश्यकता आहे. शासनाने मच्छीमारांसाठी देण्यात येणारे कर्जे, सोयी सुविधा व सवलती या सर्व शासकीय योजनांच्या माहितीसाठी नियमितपणे प्रत्येकवर्षी एक किंवा दोन कार्यशाळा आयोजित करावी व शासकीय योजनांच्या अंमलबजावणीसाठी त्यांचे प्रबोधन करण्यात यावे याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग

3.1 भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन२०११-१२ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालांतील अनुदान क्र.एच-३ "गृहनिर्माण", एच-४ "सचिवालय व इतर आर्थिक सेवा", एच-५ "मार्ग व पूल", एच-६ "सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च", एच७ "सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च", एच-८ "सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च", एच९ "प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च" या शिर्षाअंतर्गत अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी आपल्या अहवालात पुढीलपमाणे अभिप्राय दिले आहेत.

एच-३ गृहनिर्माण

. हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-३ गृहनिर्माण (सर्व दत्तमत) प्रधानशीर्ष-२२१६, गृहनिर्माण मुळ २,४४,६३,२१ पुरक २,२०,६४,०० पुर्नर्विनियोजन --- वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१३)	४,६५,२७,२१	४,६८,८१,१३	(+) ३,५३,९२ ४६,८८

टिपा व भाष्ये :-

अनुदानांतर्गत रु३,५३.९२ लाख इतका (प्रत्यक्ष अधिक खर्च रु.३,५३,९२,४६३ इतका) अधिक खर्च नियमात बसविणे आवश्यक आहे.

.३,५३.९२ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, जुलै२०१२ मध्ये केलेली रु.२,२०,६४.०० लाख इतकी पुरक तरतूद अपुरी असल्याचे सिध्द झाले आणि मार्च२०१३ मध्ये रु. ४६.८८ लाख इतका परत केलेला निधी अवास्तव असल्याचे सिध्द झाले. अनुदान अधिक खर्चाचे बंद झाल्याचे लागोपाठचे हे सहावे वर्ष आहे.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखाकारांनी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ.१७२ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-३, गृहनिर्माण (सर्व दत्तमत) प्रधानशीर्ष-२२१६, गृहनिर्माण संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.४,६५,२७,११ लाख (रुपये चारशे पासष्ट कोटी सत्तावीस लाख अकरा हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु४,६८,८१,१३ लाख (रुपये चारशे अडुसष्ट कोटी एक्याऐंशी लाख तेरा हजार फक्त) परिणामी रु.३,५३.९२ लाख (रुपये तीन कोटी त्रेपन्न लाख ब्याण्णव हजार फक्त) एवढा अधिक खर्च दर्शविण्यात आला आहे. सदरचा अधिक खर्च प्रत्यक्ष खर्च नसून, मागणी क्र.एच-३ मधील आंतर लेखा हस्तांतरण करतांना समायोजनावरील आहे.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-३ गृहनिर्माण प्रमुख लेखाशीर्ष-२२१६ गृहनिर्माण ८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (००) (०१) (२०५९ मधून यथाप्रमाणे लेख्यांतर्गत हस्तांतरण) मुळ १,१६,१५.८६	१,१६,१५.८६	१,२३,१०.०७	(+) ६,९४.२१

टिपा व भाष्ये :-

.६,९४.२१ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट२०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.१७३ वर दर्शविलेली स्थिती मान्य करण्यात आहे. (२२१६ ००६२).

मुंबई अर्थसंकल्प नियम पुस्तिकेतील परिच्छेद७२ मध्ये २०५९-सार्वजनकि बांधकाम या लेखाशीर्षाखाली आस्थापना तसेच हत्यारे व संयत्रे खर्च आंतरखाते बदलद्वारे इतर भांडवली व महसुली शीर्षाकडे वर्ग करण्याची पध्दत विहित केली आहे. जेणेकरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या विविध कामावरील आस्थापने व सयंत्रावरील खर्चाचे वरील प्रमाणात योग्य निर्धारण करता यावे. यानुसार परिगणना करण्यासाठी खालील सूत्र अवलंबिण्यात येते.

1) २०५९- सार्वजनिक बांधकामे (एक) संचालन व प्रशासन या मुख्य लेखाशीर्षाखालील एकूण तरतूद

वजा

1. स्थानिक क्षेत्रासाठी तरतूद
2. रुपांतरित आस्थापनेसाठी करण्यात आलेली तरतूद
3. राज्य रस्ते निधीकडे खर्ची टाकण्यात आलेला आस्थापना खर्च
4. अन्य शासकीय/ स्थानिक संस्था/ खाजगी संस्थांसाठी केलेल्या कामाबद्दल००५९- सार्वजनकि बांधकाम या शीर्षाखाली येणाऱ्या जमा रकमा

ब. हस्तांतरण करावयाचा निव्वळ आस्थापना खर्च

क. भांडवली शीर्षावरील टक्केवारी खर्च

(आस्थापना खर्च)

ड. महसुली शीर्षाखाली कामावर आकारावयाचा व हस्तांतर करावयाचा निव्वळ आस्थापना खर्च (बक)

तदनंतर उपरोक्त आकडेवारीच्या आधारे खालीलप्रमाणे गुणक परिगणित करण्यात येतो :-

<u>वरील डनुसार एकुण आस्थापना खर्च</u>

महसुली विभागातील सर्व प्रमुख लेखाशीर्षा खालील मुळ बांधकामावरील एकुण खर्च= गुणक "क्यु"

(प्रमुख लेखाशीर्ष) २२१७ व २२५२ वगळून

यावरुन संबंधित लेखाशीर्षाकडे हस्तांतरित करावयाची रक्कम खालीलप्रमाणे परिगणित करण्यात येते.

1. २२१६ गृहनिर्माण या शिर्षाखालील तरतूद	**x**	क्यु	=	२२१६ गृहनिर्माण तरतूद खालील आंतर लेखा हस्तांतरण.
2. ३०५४ – मार्ग व पूल या शीर्षाखाली तरतूद (स्थानिक क्षेत्र वगळून)	**x**	क्यु	=	३०५४ रस्ते व पुल खालील आंतर लेखा हस्तांतरण

वरील (१) व (२) नुसार संबंधित लेखाशीर्षाकडे (म्हणजे२२१६ - गृहनिर्माण व ३०५४ - रस्ते व पूल या शीर्षाकडे) खर्च हस्तांतरण केल्यानंतर२०५९ – सार्वजनिक बांधकामे खालील उर्वरीत खर्च त्याच शीर्षाखाली रहातो.

हे सुत्र ह्या लेखाशीर्षाखालील एकुण अनुदान व खर्च ह्या दोन्ही बाबी खालील आकडेवारी निश्चित करण्यासाठी सामायिक आहे. पहिली बाब पुर्वानुमानावर निश्चित करण्यात येते. दुसरी बाब वर्षे अखेरीस प्रत्यक्ष आकडेवारीवर निश्चित करण्यात येते. त्यामुळे या दोन्ही टप्प्यावरील आकडेवारी तसेच ज्या गुणकाच्या आधारे संबंधित शीर्षाकडे हस्तांतर करावयाची रक्कम ठरविली जाते तो गुणकही नेहमीच सारखा नसतो आणि ह्या गुणकामध्ये जराशी तरी तफावत झालयास ती परीणामत: बचत किंवा अधिक्य होण्यास प्रकरणपरत्वे कारणीभूत ठरते. हेच कारण प्रस्तुत प्रकरणी झालेल्या अधिक खर्चाबाबत आहे. तसेच फरकाबाबातची कारणे सर्वसाधारणत: विनियोजन लेख्यामधील संबंधीत शीर्षाखालील अधिक्य / बचत बाबींवर दिलेल्या स्पष्टीकरणानुसार आहेत.

प्रसंगत: ह्या उपलेखाशीर्षाखाली दर्शविण्यात आलेला खर्च काल्पनिक आहे. आस्थापना व हत्यारे व संयत्रे यावरील खर्च प्रथमत: २०५९ – सार्वजनिक बांधकाम या शीर्षाखाली नोंदविला जातो व तदनंतर संबंधित उपलेखाशीर्षाकडे आंतरखाते बदल केला जातो. जेणे करुन महसुली शीर्षाखाली कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च दिसून यावा.

उपरोक्त परिस्थितीत बाजूस दर्शविण्यात आलेला अधिक खर्च कृपया नियमित करण्यात यावा.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-३ गृहनिर्माण प्रमख लेखाशीर्ष-२२१६ गृहनिर्माण ०७ इतर गृहनिर्माण ०५३ परिरक्षण व दुरूस्ती (००)(०१) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा मुळ २,००.०० पुरक --- पुर्नर्विनियोजन -४०.००	१,६०.००	१,५९.३८	(-) ०.६२

.०.६२ लाख इतकी अंतिम बचत मूळ अर्थसंकल्पात कपात करण्यात आल्यामुळे वर नमुद केलेल्या उपशीर्षाखाली मार्च २०१३ मध्ये, प्रत्यार्पणाद्वारे करण्यात आलेला रु.४०.०० लाख इतका निधी अपुरे असल्याचे सिध्द झाले.

.०.६२ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट-२०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखाकांरानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.१७३ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-३, गृहनिर्माण, प्रधानशीर्ष – २२१६, गृहनिर्माण, ०७ इतर गृहनिर्माण, ०५३ परिरक्षण व दुरुस्ती, (००)(०१) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा (२२१६ ०३४९) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.१,६०.०० लाख (रुपये एक कोटी साठ लाख फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.१,५९.३८ लाख (रुपये एक कोटी एकोणसाठ लाख अडतीस हजार फक्त) झाला. परिणामी रु.०.६२ लाख (रुपये बासष्ट हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे. सदर बचत अत्यल्प आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये केवळ रु.१,६०.०० लाख इतकी तरतूद खर्चासाठी उपलब्ध झाली होती. यास्तव उर्वरित रु.४०.०० लाख इतकी तरतूद समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-३ गृहनिर्माण प्रमुख लेखाशीर्ष-२२१६ गृहनिर्माण ८० सर्वसाधारण ०५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री (००)(०१) (२०५९ मधून यथाप्रमाण लेख्यांतर्गत हस्तांतरण) मुळ ६,४७.२२	६,४७.२२	३,५८.१८	(-) २,८९.०४

वरील उपशीर्षाखालील रु.२,८९.०४ लाख इतकी अंतिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१३).

मुख्यत्वेकडून, अयोग्य व सदोष अर्थसंकल्पीय तरतुदीमुळे अनुदान अधिक खर्चाने बंद झाल्याचे लागोपाठचे हे सहावे वर्ष आहे.

मागील वर्षांमधील अधिक खर्च खाली दिला आहे :-

वर्ष	एकूण तरतूद	खर्च (रु.लाखात)	अधिक खर्च
२००७-०८	१,८०,७३.१५	२,२६,५७.५६	४५,८४.४१
२००८-०९	२,५६,०१.३९	३,०१,८२.७३	४५,८१.३४
२००९-१०	२,९३,९८.९०	३,६२,२१.७९	६८,२२.८९
२०१०-११	३,१५,७०.२०	४,१५,७१.२८	१,००,०१.०८
२०११-१२	२,७२,४१.४४	३,१३,१४.७५	४०,७३.३१

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.१७३ वर दर्शविलेली स्थिती मान्य करण्यात आहे. (२२१६ ०३३१)

मुंबई अर्थसंकल्पनियम पुस्किेतील परिच्छेद-७२ मध्ये २०५९-सार्वजनकि बांधकामे या लेखाशीर्षाखाली आस्थापना तसेच हत्यारे व संयत्रे खर्च आंतरखाते बदलाद्वारे इतर भांडवली व महसुली शीर्षाकडे वर्ग करण्याची पध्दती विहित केलीआहे की, जेणेकरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्याविविध कामावरील प्रयोजनासाठीच्या खर्चाचे योग्य निर्धारण करता यावे. ह्यानुसार परिगणना करण्यासाठी खालील सूत्र अवलंबिण्यात येते.

अ) २०५९- सार्वजनिक बांधकामे (एच-६) यंत्रसामुग्री व साधनसामुग्री या लेखाशीर्षाखालील एकूण तरतूद.

वजा

1. स्थानिक क्षेत्रासाठी करण्यात आलेली तरतूद
2. राज्य रस्ते निधीकडे खर्ची टाकण्यात आलेला हत्यारे व संयंत्रे खर्च
3. अन्य शासकीय/ स्थानिक संस्था/ खाजगी संस्थांच्या कामाबद्दल व
4. ००५९- सार्वजनकि बांधकाम या शीर्षाखाली येणाऱ्या जमा रकमा

ब) हस्तांतरण करावयाच्या निव्वळ हत्यारे व संयंत्रे खर्च– (वजा)

क) भांडवली शीर्षावर टक्केवारी खर्च (हत्यारे व संयंत्रे खर्च)

ड) एकूण (ब व क) महसुली शीर्षाखालील कामावर आकारावयाच्या व करावयाच्या एकूण हत्यारे व संयंत्रे खर्च. तद्नंतर उपरोक्त आकडेवारीच्या आधारे खालीलप्रमाणे गुणक परिगणित करण्यात येतो.

वरील **ड** नुसार एकुण हत्यारे व संयंत्रे खर्च

महसुली विभागातील सर्व प्रमुख लेखाशीर्षा खालील मुळ बांधकामावरील एकुण खर्च= गुणक "क्यु"
(प्रमुख लेखाशीर्ष) २२१७ व २४०६ वगळून)

यावरुन संबंधित लेखाशीर्षाकडे हस्तांतरित करावयाची रक्कम खालीलप्रमाणे परिगणित करण्यात येते.

1.	२२१६ गृहनिर्माण या शिर्षाखालील तरतूद (स्थानिक क्षेत्र वगळून)	**x**	क्यु	=	२२१६ गृहनिर्माण खालील आंतर लेखा हस्तांतरण.
2.	३०५४ – मार्ग व पूल या शीर्षाखाली तरतूद (स्थानिक क्षेत्र वगळून)	**x**	क्यु	=	३०५४ रस्ते व पुल खालील आंतर लेखा हस्तांतरण

वरील (१) व (२) नुसार संबंधित लेखाशीर्षाकडे (म्हणजे२२१६ - गृहनिर्माण व ३०५४ - रस्ते व पूल या शीर्षाकडे) खर्च हस्तांतरण केल्यानंतर२०५९ – सार्वजनिक बांधकामे खालील उर्वरीत खर्च त्याच शीर्षाखाली रहातो.

हे सुत्र या लेखाशीर्षाखालील एकुण "अनुदान" व "खर्च" ह्यादोन्ही बाबीखालील आकडेवारी निश्चित करण्यासाठी सामायिक आहे. पहिली बाब पुर्वानुमानावर निश्चित करण्यात येते. तर दुसरी वर्षे अखेरीस प्रत्यक्ष आकडेवारीवर निश्चित करण्यात येते. त्यामुळे या दोन्ही टप्प्यावरील आकडेवारी तसेच ज्या गुणकाच्या आधारे संबंधित शीर्षाकडे हस्तांतर करावयाची रक्कम ठरविली जाते तो गुणकारी नेहमीच सारखा नसतो. आणि ह्या गुणकामध्ये जराशी तरी तफावत झाल्यास ती परीणामत: बचत किंवा अधिक्य होण्यास प्रकरणपरत्वे कारणीभूत ठरते. व हेच कारण प्रस्तुत प्रकरणी झालेल्या अधिक्यबाबत देण्यात येत आहे. तसेच फरकाबाबातची कारणे सर्वसाधारणत: विनियोजन लेख्यामधील संबंधीत शीर्षाखालील अधिक्य / बचत बाबींवर दिलेल्या स्पष्टीकरणानुसार आहेत.

प्रसंगत: ह्या उपलेखाशीर्षाखाली दर्शविण्यात आलेला खर्च काल्पनिक आहे. आस्थापना व हत्यारे व संयत्रे यावरील खर्च खर्च प्रथमत: २०५९ – सार्वजनिक बांधकाम या शीर्षाखाली नोंदविला जातो व तद्नंतर संबंधित उपलेखाशीर्षाकडे आंतरखाते बदल केला जातो. जेणेकरुन महसुली शीर्षाखाली कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च दिसून यावा.

उपरोक्त परिस्थितीत बाजूस दर्शविण्यात आलेला बचत कृपया क्षमापित करण्यात यावी.

एच-४-सचिवालय व इतर आर्थिक सेवा

. हजारांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
अनुदान क्रमांक एच-४-सेक्रेटरीएट व इतर – आर्थिक सेवा प्रधानशीर्ष-२४०६, वनीकरण व वन्यजीवन ३०५१, बंदरे व दीपगृहे ३०५३, नागरी विमानचालन ३४५१, सचिवालय-आर्थिक सेवा दत्तमत मुळ ४०,८७,८३ पुरक --- पुर्नर्विनियोजन --- वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१३)	४०,८७,८३	३१,१०,३०	(-) ९,७७,५३ ९,७३,६१

टिपा व भाष्ये :-

.९,७७.५३ लाख इतकी अंतिम लक्षात घेता, अनुदानांतर्गत प्रत्यार्पणासाठी विचारात घेतलेली केवळ रू.,७३,६१ लाख इतका निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले. अनुदान बचतीचे बंद झाल्याचे हे लागोपाठचे आठवे वर्ष आहे.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखाकारांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.१७४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-४- सेक्रेटरीएट व इतर – आर्थिक सेवा प्रधानशीर्ष-२४०६-वनीकरण व वन्यजीवन, ३०५१-बंदरे व दीपगृहे, ३०५३- नागरी विमानचालन व ३४५१-सेक्रेटरीएट-आर्थिक सेवा संबधी आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात मागणी क्र.एच-४ खाली एकूण .४०,८७.८३ लाख (रुपये चाळीस कोटी सत्त्याऐंशी लाख त्र्याऐंशी हजार फक्त) इतके अनुदान उपलब्ध होते. तर त्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च रू१,१०.३० लाख (रुपये एकतीस कोटी दहा लाख तीस हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.९,७७.५३ लाख (रुपये नऊ कोटी सत्त्याहत्तर लाख त्रेपन्न हजार फक्त) बचत दर्शविण्यात आली आहे.

सन २०११-१२ मध्ये रु.९,७३.६१ लाख (रुपये नऊ कोटी त्र्याहत्तर लाख एकसष्ट हजार फक्त) एवढे अनुदान समर्पित करण्यात आले असल्याने प्रत्यक्षात रु.३.९२ लाख इतकी बचत झाली आहे. सदर बचत मागणी क्र.एच-४ मधील एकत्रित बचत आहे.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-४-सेक्रेटरीएट व इतर – आर्थिक सेवा प्रधानशीर्ष-२४०६, वनीकरण व वन्यजीवन ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन ११२ सार्वजनिक उद्याने (००)(०१) संचालक, उपवने व उद्याने मुळ ८,८८.५० पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) ९६.५३	७,९१.९७	७,९१.२४	(-) ०.७३

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची मागणी क्र. एच-४-सेक्रेटरीएट व इतर – आर्थिक सेवा, प्रधानशीर्ष-२४०६-वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११२ सार्वजनिक उद्याने, (००)(०१) संचालक, उपवने व उद्याने, (००)(०१) संचालक, उपवने व उद्याने (२४०६ ०८०१) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.७,९१.९७ लाख (रुपये सात कोटी एक्याण्णव लाख सत्त्यावण्ण हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.७,९१.२४ लाख (रुपये सात कोटी एक्याण्णव लाख चोवीस हजार फक्त) झाला. परिणामी रु.०.७३ लाख (रुपये त्र्याहत्तर हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

संचालक, उपवने व उद्याने यांच्या अधिपत्याखालील पुणे कार्यालयाचे वैद्यकीय खर्चाबाबतचे रु०.७३ लाख इतक्या रकमेचे देयक कोषागार कार्यालयाकडून आक्षेपासह परत आल्यामुळे सदर बचत झालेली आहे.

संचालक, उपवने व उद्याने यांच्या आस्थापनेवरील१० पदे रिक्त असल्यामुळे रु.९६.५३ लाख एवढे अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-४-सेक्रेटरीएट व इतर – आर्थिक सेवा प्रधानशीर्ष-३४५१, सचिवालय-आर्थिक सेवा (०९०) सचिवालय (००)(०१) सार्वजनिक बांधकाम विभाग मुळ २९,६६.६५ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) ८,५०.४३	२१,१६.२२	२१,१३.०४	(-) ३.१८

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी विनियोजन लेखा२०१२-१३ ची मागणी क्र. एच-४-सेक्रेटरीएट व इतर–आर्थिक सेवा, प्रधानशीर्ष-३४५१-सचिवालय-आर्थिक सेवा, (०९०) सचिवालय, (००)(०१) सार्वजनिक बांधकाम विभाग (३४५१०२६२) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.२१,१६.२२ लाख (रुपये एकवीस कोटी सोळा लाख बावीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.२१,१३.०४ लाख (रुपये एकवीस कोटी तेरा लाख चार हजार फक्त) झाला. परिणामी रु.३.१८ लाख (रुपये तीन लाख अठरा हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

वेतन व आस्थापना विषयक खर्चाची देयके आक्षेप घेऊन अधिदान व लेखा कार्यालयाकडून वर्ष संपल्यानंतर विभागास परत केल्यानंतर त्याचे निराकरण करुन देयक पुन्हा सादर करणे शक्य न झाल्यामुळे रु३.१८ लाख इतकी बचत झाली आहे. तसेच अधिदान व लेखा कार्यालय येथे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील मार्च २०१३ या महिन्याचे खर्चमेळाचे काम हे उशिरा होत असल्याने सदर रु.३.१८ लाख इतकी बचतीची रक्कम वेहीच प्रत्यार्पित करणे शक्य झाले नाही.

विभागाच्या आस्थापनेवरील ९९ रिक्त पदे न भरल्याने रु.८५०.४३ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-४-सेक्रेटरीएट व इतर – आर्थिक सेवा प्रधानशीर्ष-३०५१, बंदरे व दीपगृहे ०२ लहान बंदरे १०२ बंदर व्यवस्थापन (००)(०१) अधीक्षक अभियंता संकल्पचित्र मंडळ, नवी मुंबई मुळ २१.५७ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) १४.९३	६.६४	६.६४	---

बचत अंतलात केल्यामुळे मार्च २०१३ मध्ये वर नमुद केलेल्या उपशीर्षाखाली रु.९,६१.९ लाख इतका निधी काढण्यात आला आणि रु.३.९१ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, प्रादेशिक प्राधिकरणांनी परत केलेला निधी अपूरा असल्याचे सिध्द झाले.

.३.९१ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ मागणी क्र. एच-४-सेक्रेटरीएट व इतर – आर्थिक सेवा, प्रधानशीर्ष-३०५१, बंदरे व दीपगृहे, ०२ लहान बंदरे, १०२ बंदर व्यवस्थापन, (००)(०१) अधीक्षक अभियंता संकल्पचित्र मंडळ, नवी मुंबई (३०५१ ०४९२) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.६.६४ लाख (रुपये सहा लाख चौसष्ट हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.६.६४ लाख (रुपये सहा लाख चौसष्ट हजार फक्त) झाला. प्रत्यक्ष खर्च एकूण अनुदाना एवढाच झाला असल्याने, बचत / अधिक खर्च झालेला नाही.

पदे रिक्त असल्यामुळे रु.१४.९३ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

अनुदान क्रमांक-एच-४-सेक्रेटरीएट व इतर आर्थिक सेवा

3. बचतीसह अनुदान बंद होण्याचे हे लागोपाठचे आठवे वर्ष आहे, त्यातून अत्याधिक अंदाज केल्याचे क्यामुळे सदोष अर्थसंकल्प असल्याचे निदर्शनात येते.

आधीच्या वर्षातील बचत खाली दिल्याप्रमाणे आहे :-

वर्ष	एकूण तरतूद	खर्च (रु.लाखात)	अधिक खर्च
२००५-०६	२०,७८.८५	१८,१०.१९	२,६८.६६
२००६-०७	२१,२९.०१	१८,४९.०५	२,७९.९६
२००७-०८	२१,५१.९३	२०,२६.५०	१,२५.४३
२००८-०९	२४,५१.८३	२१,७८.७०	२,७३.१३
२००९-१०	३०,३४.२७	२६,८२.३२	३,५१.९५
२०१०-११	३६,२८.०१	२८,७८.१५	७,४९.८६
२०११-१२	३९,८७.१०	२९,५६.२४	१०,३८.८६

एच-५-मार्ग व पूल

. लाखांत)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
अनुदान क्रमांक एच-५- मार्ग व पूल प्रधानशीर्ष -३०५४, मार्ग व पूल दत्तमत मुळ २८,३९,२८,०० पूरक ४,१७,०५,२३ वर्षाभरात परत केलेली रक्कम (मार्च२०१३) **भारित** मुळ १५,०० पूरक ---- वर्षाभरात परत केलेली रक्कम (मार्च२०१३)	३२,५६,२३ १५,००	२६,९६,९१,८८ -	-५,५९,४१,३५ ४,८२,२९,७१ (-)१५,०० १५,००

टीपा व भाष्ये : -

अनुदानातील रु. २६,९६,९१.८८ लाखांचा एकूण खर्च हा रु, २८,३९,२८.०० लाखांचा मूळ तरतुदी इतकाही झाला . ४,१७,०५.२३ लाखाची पूरक तरतूद (जुलै, २०१२ मध्ये रु.६७,०५.२३ लाख, डिसेंबर,२०१२ मध्ये रु. ३,५०.०० (लाख)) अनावश्यक असल्याचे सिध्द झाले. तसेच अनुदानातील रु.५,५९,४१.३५ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, मार्च २०१३ .४,८२,२९.७१ लाखांचा परत करण्यात आलेला निधी अपर्याप्त असल्याचे सिध्द झाले.

ज्ञापन : -

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ-१७५- वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-५ मार्ग व पूल प्रधानशिर्ष ३०५४ मार्ग व पूल या संबंधी आहे.

यासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सन २०१२-१३ मध्ये या लेखाशिर्षाखाली एकूण रु.३२,५६,३३.२३ लाख (रुपये तीन हजार दोनशे छप्पन कोटी तेहतीस लाख तेवीस हजार फक्त) एवढी एकूण अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध होती. त्या तुलनेत खर्च रु.२६,९६,९१.८८ लाख (रुपये दोन हजार सहाशे शहाण्णव कोटी ऐक्याण्णव लाख अठ्ठयाऐंशी हजार फक्त) झाला. परिणामी रु.५५९,४१.३५ लाख (रुपये पाचशे एकोणसाठ कोटी एकेचाळीस लाख पस्तीस हजार फक्त) बचत दर्शविण्यात आली आहे. तथापि संपूर्ण वर्षामध्ये रु४८२,२९.७१ लाख (रुपये चारशे ब्याऐंशी कोटी एकोणतीस लाख एकाहत्तर हजार फक्त) एवढी रक्कम समर्पित केली असल्याने प्रत्यक्षात रु.७७,११.६४ लाख (रुपये सत्त्याहत्तर कोटी अकरा लाख चौसष्ट हजार फक्त) एवढी बचत झालेली आहे.

.४,८२,२९.७१ लाख (रुपये चारशे ब्याऐंशी कोटी एकोणतीस लाख एकाहत्तर हजार फक्त) इतक्या समर्पित रकमेमध्ये रु.३,१६,७०.४३ लाख ही योजनेतर तर .१,६५,५९.२८ लाख योजनांतर्गत तरतूदीच्या लेखाशिर्षाखालील बचत आहे. योजनेतर समर्पित रक्कमेत (३०५४ ०२४७) या लेखाशिर्षाखाली केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत केंद्र शासनाकडून वित्तीय वर्षात प्रत्यक्ष उपलब्ध होणारी तरतूद असल्याने या लेखाशिर्षा एवढे अंदाज निश्चित करण्यात येऊन उर्वरित रक्कम .६५,३७.०० लाख समर्पित करण्यात आली. योजनांतर्गत तरतूदीच्या रु१,६५,५९.२८ लाख इतक्या बचतीमध्ये .४६.७७.८३ लाख इतकी बचत ही तेरावा वित्त आयोग अनुदाने-दुर्गम क्षेत्रातील रस्त्यांचा विकास (३०५४२३६६) केंद्राकडून प्राप्त तरतूदीचा समावेश आहे. सदरची तरतूद केंद्रशासनाकडून प्राप्त होत असल्याने वित्त विभागाच्या सहमतीनंतर सदर तरतूदीचा सन २०१३-१४ मध्ये विनियोग करण्यात आला आहे. सन २०११-१२ मध्ये तेरावा वित्त आयोगांतर्गत केंद्रशासनाकडून प्राप्त तरतूदीपैकी ज्या तरतूदी समर्पित करण्यात आल्या त्या पुढील वित्तीय वर्षात सन २०१२-१३ मध्ये पुन्हा अर्थसंकल्पित करण्यात येऊन खर्च करण्यात आल्या आहेत.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-५ मार्ग व पूल प्रधानशीर्ष -३०५४, मार्ग व पूल ०३, राज्य महामार्ग १०२ पूल (०१) बांधकामे (०१)(०१) सर्वसाधारण मोठे/लहान बांधकामे मुळ १,५०.०० पूरक ---- पुनर्विनियोजन (-) ३०.००	१,२०.००	१,१९.९९	(-)०.०१

ज्ञापन : -

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ-१७६- वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-५ मार्ग व पूल प्रधानशिर्ष ३०५४ मार्ग व पूल, ०३, राज्य महामार्ग, १०२ पूल, (०१) बांधकामे, (०१)(०१) सर्वसाधारण मोठे/लहान बांधकामे (३०५४००६९) या संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.१५०.०० लाख (रुपये एक कोटी पन्नास लाख फक्त) एवढी एकूण अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध होती. त्यापैकी रु.१२०.०० लाख (रुपये एक कोटी वीस लाख फक्त) एवढी तरतूद वितरीत करण्यात आली होती. तर त्या तूलनेत प्रत्यक्ष खर्च रु.११९.९९ लाख (एक कोटी एकोणीस लाख नव्याण्णव हजार) दर्शविण्यात आली आहे. परिणामी रु.०.०१ लाख (रुपये एक हजार फक्त) बचत झाल्याचे दिसून येते. सदर बचत अत्यल्प असल्याने क्षमापित करण्यात यावी.

सन २०११-१२ या वर्षात वित्त विभागाने मंजूर केलेले सुधारित अंदाज विचारात घेता रु.३०.०० लक्ष इतकी तरतूद समर्पित करण्यात आली आहे.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच५ मार्ग व पूल प्रधानशीर्ष -०४ जिल्हा व इतर मार्ग ८०० इतर खर्च (०१)(०१) केंद्रीय मार्ग निधी (वाटप) मोठी बांधकामे मुळ १,१२,२७.०० पूरक ---- पुनर्विनियोजन (-) २४,०२.८९	८८,२४.१९	८८,१९.७२	(-)४.४७

ज्ञापन : -

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ-१७६- वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-५ मार्ग व पूल प्रधानशीर्ष -०४ जिल्हा व इतर मार्ग, ८०० इतर खर्च, (०१)(०१) केंद्रीय मार्ग निधी (वाटप) मोठी बांधकामे (३०५४०१६७) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये या लेखाशिर्षाखाली एकूण अर्थसंकल्पीय तरतूद रु१,१२,२७.०० (रुपये एकशे बारा कोटी सत्ताविस लाख फक्त) एवढी करण्यात आली होती. त्यापैकी रु.८८,२४.१९ लाख (रुपये अठ्ठ्याऐंशी कोटी चोवीस लाख एकोणीस हजार फक्त) एवढी तरतूद वितरीत करण्यात आली होती. तर त्या तूलनेत प्रत्यक्ष खर्च रु८८,१९.७२ लाख (एक अठ्ठ्याऐंशी कोटी एकोणीस लाख बहात्तर हजार फक्त) दर्शविण्यात आली आहे. परिणामी रु४.४७ लाख (रुपये चार लाख सत्तेचाळीस हजार फक्त) बचत झाल्याचे दिसून येते.

या वर्षात क्षेत्रीय कार्यालयांकडून करण्यात आलेली मागणी व वित्त विभागाने मंजूर केलेले सुधारीत अंदाज विचारात घेता रु.२४,०२.८१ लाख तरतूद समर्पित करण्यात आली. अंतिम बचत रु४.४७ लाख ही अंतिम वितरीत तरतूदीच्या तुलनेत अल्प असल्यामुळे क्षमापित करण्यात यावी.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
पृष्ठ क्रमांक- १७६ अनुदान क्रमांक एच५ मार्ग व पूल प्रधानशीर्ष -८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च (००)(०६) तेराव्या वित्त आयोगाच्या केंद्रीय सहाय्यातून अवघड क्षेत्रातील रस्त्याचा विकास मुळ ७५,५६.९५ पूरक ---- पुनर्विनियोजन (-) ४६,७७.८३	२८,७९.१२	२८,७९.११	(-)०.०१

. ४.४९ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, कोणत्याही विनिर्दिष्ट कारणाशिवाय मार्च, २०१३ मध्ये वरील उपशीर्षाखालील काढण्यात आलेला रु.७१,१०.६४ लाखांचा निधी अपुरा असल्याचेसिध्द झाले.

.४.४९ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट२०१३).

ज्ञापन : -

महालेखापालांनी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ-१७६- वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-५ मार्ग व पूल प्रधानशीर्ष -३०५४ मार्ग व ८० सर्वसाधारण, ८०० इतर खर्च, (००)(०६) तेराव्या वित्त आयोगाच्या केंद्रीय सहाय्यातून अवघड क्षेत्रातील रस्त्याचा विकास (३०५४२३६६) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये या लेखाशिर्षाखाली एकूण रु.७५,५६.९५ लाख (रुपये पंचाहत्तर कोटी छपन्न लाख पंच्यान्नव हजार फक्त) एवढी एकूण अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशीर्षाखाली मंजूर होती.

त्यापैकी रु.२८,७९.१२ लाख (रुपये अठ्ठावीस कोटी एकोणऐंशी लाख बारा हजार फक्त) एवढी तरतूद उपलब्ध होती. तर त्या तूलनेत प्रत्यक्ष खर्च रु.२८,७९.११ लाख (रुपये अठ्ठावीस कोटी एकोणऐंशी लाख अकरा हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.०.०१ लाख (रुपये एक हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.०.०१ लाख (रुपये एक हजार फक्त) बचत झाल्याचे दिसून येते. सदर बचत एकूण अनुदानाच्या तुलनेत अल्प असल्याने क्षमापित करण्यात यावी.

या लेखाशिर्षाखाली केंद्राकडून राज्य विशिष्ट गरजा-दुर्गम क्षेत्रातील रस्ते विकासासाठी अनुदान प्राप्त होते. सन २०११-१२ मध्ये खर्च न होऊ शकलेले अनुदान व्यपगत न होता सन२०१२-१३ मध्ये अर्थसंकल्पीत करण्यात येऊन तसेच,

सन २०१२-१३ मध्ये खर्च न होऊ शकलेले अनुदान वयपगत न होता सन २०१३-१४ मध्ये अर्थसंकल्पीय करण्यात येऊन खर्च करण्यात आले.

एच-६-सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारती

. हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम २२०२, सर्वसाधारण शिक्षण २२०३, तंत्रशिक्षण २२०५, कला व संस्कृती २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य २२१७, नगरविकास २२३०, कामगार व सेवायोजन २४०३, पशुसंवर्धन २४०५, मत्स्यव्यवसाय दत्तमत – मुळ १७,८८,१०,८० पुरक ३,६२,९५,०५ वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१३) **भारित** मुळ ३,०२,८० पुरक --- पुर्नर्विनियोजन --- वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१३)	२१,५१,०५,८५ ३०२,८०	१९,२३,८०,२८ २,८२,९२	(-) २,२७,२५,५७ २,२०,५२,८५ (-) १९,८८ १९,८८

टिपा व भाष्ये :-

. २,२७,२५.५७ लाखांची अंतिम बचत विचारात घेता रु२,२०,५२.८५ लाखांचा परत केलेला निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले.

ज्ञापन :-

महालेखापालींनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.१७९ वर दर्शविलेली स्थितीत मागणी अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारतीप्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम २२०२, सर्वसाधारण शिक्षण २२०३, तंत्रशिक्षण २२०५, कला व संस्कृती २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य २२१७, नगरविकास २२३०, कामगार व सेवायोजन २४०३, पशुसंवर्धन२४०५, मत्स्यव्यवसाय संबंधी आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात मागणी क्र.एच-६ खाली एकूण रु.२१,५१,०५.८५ लाख (रुपये दोन हजार एकशे एकानव्व कोटी पाच लाख पंचाऐंशी हजार फक्त) इतकेअनुदान उपलब्ध होते. तर त्या तूलनेत प्रत्यक्ष खर्च रु१९,२३,८०.२८ लाख (रुपये एक हजार नऊशे तेवीस कोटी ऐंशी लाख अठ्ठावीस हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी .२,२७,२५.५७ लाख (रुपये दोनशे सत्तावीस कोटी पंचवीस लाख सत्तावन्न हजार फक्त) बचत झाल्याचे दर्शविण्यात आले आहे.

सन २०१२-१३ मध्ये रु.२,२०,५२.८५ लाख एवढे अनुदान समर्पित करण्यात आले असल्याने प्रत्यक्षात .६,७२.७२ लाख (रुपये सहा कोटी बाहत्तर लाख बाहत्तर हजार फक्त) इतकी बचत झाली आहे. सदर बचत मागणी क्रमांक एच-६ मधील एकत्रित बचत आहे.

महालेखापालींनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.१७९ वर दर्शविलेली स्थितीत मागणी अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारतीप्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम २२०२, सर्वसाधारण शिक्षण २२०३, तंत्रशिक्षण २२०५, कला व संस्कृती २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य २२१७, नगरविकास २२३०, कामगार व सेवायोजन २४०३, पशुसंवर्धन२४०५, मत्स्यव्यवसाय संबंधी आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात मागणी क्र.एच-६ खाली एकूण रु.३,०२.८० लाख (रुपये तीन कोटी दोन लाख ऐंशी हजार फक्त) एवढी भारीत तरतूद उपलब्ध झाली होती. तर त्या तूलनेत प्रत्यक्ष खर्च रु.२,८२.९२ लाख (रुपये दोन कोटी ब्याऐंशी लाख ब्याण्णव हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु१९.८८ लाख (रुपये एकोणवीस लाख अठ्ठाऐंशी हजार फक्त) बचत झाल्याचे दर्शविण्यात आले आहे. सदर बचत अल्प असून बचतीची रक्कम वर्षअखेरीस समर्पित करण्यात आली आहे.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम ८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (०७) अधिक्षक अभियंता, दुग्धशाळा बांधकाम मंडळ, मुंबई (०७)(०१) पर्यवेक्षण मुळ ९४.७९ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) १९.२८	७५.५१	७५.४८	(-) ०.०३

ज्ञापन :-

महालेखापालींनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.१८१ वर दर्शविलेली स्थितीत मागणी अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ८० सर्वसाधारण, ००१ संचालन व प्रशासन, (०७) अधिक्षक अभियंता, दुग्धशाळा बांधकाम मंडळ, मुंबई, (०७)(०१) पर्यवेक्षण (२०५९२६२६) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये रु.७५.५१ लाख (रुपये पंचाहत्तर लाख एकावन्न हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होती. त्या तूलनेत प्रत्यक्ष खर्च रु.७५.४८ लाख (रुपये पंचाहत्तर लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.०.०३ लाख (रुपये तीन हजार फक्त) बचत झाल्याचे दर्शविण्यात आले आहे.

रिक्त पदे न भरल्यामुळे रु.१९.२८ लाख इतके अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम ८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (३४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, यवतमाळ (३४)(०१) पर्यवेक्षण मुळ ९७.८५ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) १९.६०	८६.२५	८५.२८	(-) ०.९७

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ. १८१ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६-सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष-२०५९ सार्वजनिक बांधकाम, सर्वसाधारण, ००१ सचांलन व प्रशासन, (३४) अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ,यवतमाळ,(३४)(०१) पर्यवेक्षण (२०५९२६४४) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये रु ८६.२५ लाख (रुपये शाऐंशी लाख पंचवीस हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होती. त्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च रु ८५.२८ लाख (रुपये पंच्याऐंशी लाख अठ्ठावीस हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु. ०.९७ लाख (रुपये सत्त्याण्णव हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

या लेखशिर्षाखालील रु.०.९७ लाख इतका खर्च अनवधानाने कार्यान्वयन-२०५९२६५३ या लेखाशिर्षावर नोंदविला गेल्यामुळे रु.०.९७ लाख इतकी बचत दिसून येते.

रिक्त पदे न भरली गेल्यामुळे रु.११.६० लाख इतके अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष -२२१० वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१, नागरी आरोग्य सेवा- विषमचिकित्सा ८००- इतर खर्च इमारती- स्वेच्छा अनुदानांमधून वित्त व्यवस्था केलेली लहान बांधकामे (००)(०४) सहसंचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय), मुंबई मुळ २,००.०० पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) ४०.००	१,६०.००	१,४२.७७	(-) १७.२३

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ. १८६ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२२१० वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१, नागरी आरोग्य सेवा- विषमचिकित्सा, ८००- इतर खर्च इमारती- स्वेच्छा अनुदानांमधून वित्त व्यवस्था केलेली लहान बांधकामे (००)(०४) सहसंचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय), मुंबई(२२१० ००५७) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये रु.१,६०.०० लाख (रुपये एक कोटी साठ लाख फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु.१,४२.७७ लाख (रुपये एक कोटी बेचाळीस लाख उत्याहत्तर हजार फक्त) झाला. परिणामी रु.१७.२३ लाख (रुपये सतरा लाख तेवीस हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

सदर बचत सहसंचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय), मुंबई यांच्याकडील विखुरलेल्या लहानलहान कामांवरील आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये प्रस्तुत लेखाशिर्षाखाली एकूण रु१,६०.०० लाख इतके अनुदान खर्चासाठी उपलब्ध झाले होते. त्यामुळे उर्वरित रु.४०.०० लाख इतके अप्राप्त अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष -२२१७ नगरविकास ०१ राज्य भांडवल विकास ००१ संचालक व प्रशासन (००)(०१) सहसंचालक बी.डी.डी. चाळ मुळ ५,६०.८८ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) ७६.२०	४,८४.६८	४,५८.५६	(-) २६.१२

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ. १८६ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२२१७ नगरविकास, ०१ राज्य भांडवल विकास, ००१ संचालक व प्रशासन (००)(०१) सहसंचालक बी.डी.डी. चाळ (२२१७ ०२३४) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.४,८४.६८ लाख (रुपये चार कोटी चौऱ्याऐंशी लाख अडुसष्ट हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु२,१९.९८ लाख (रुपये दोन कोटी एकोणीस लाख अठ्ठयाण्णव हजार फक्त) झाला. परिणामी रु.२६.१२ लाख (रुपये सव्वीस लाख बारा हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात सेवानिवृत्त/निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची देयके विलंबामुळे अधिदान व लेखा कार्यालयाने स्विकारली नाहीत. त्यामुळे रु२६.१२ लाख इतकी बचत दिसून येते.

रिक्त पदे न भरल्यामुळे रु.७६.२० लाख इतके अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष -२४०३ पशुसंवर्धन ८०० इतर खर्च स्वेच्छा अनुदानांमधुन वित्त व्यवस्था केलेली लहान बांधकामे (००)(०१) आयुक्त, पशुसंवर्धन मुळ ३,००.०० पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) ६०.००	२,४०.००	२,१९.९८	(-) २०.०२

वरील उपशीर्षाखालील रु.११,१५.७० लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता मार्च २०१३ मध्ये प्रत्यर्पण/पुनर्विनियोजनाद्वारे काढण्यात आलेला रु१,५७,५२.२६ लाखांचा निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले.

.११,१५.७० लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट२०१३).

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ. १८६ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२४०३ पशुसंवर्धन, ८०० इतर खर्च स्वेच्छा अनुदानांमधुन वित्त व्यवस्था केलेली लहान बांधकामे, (००)(०१) आयुक्त, पशुसंवर्धन(४०३०९६४) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.२,४०.०० लाख (रुपये दोन कोटी चाळीस लाख फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु२,१९.९८ लाख (रुपये दोन कोटी एकोणीस लाख अठ्ठयाण्णव हजार फक्त) झाला. परिणामी रु.२०.०२ लाख (रुपये वीस लाख दोन हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

सन २०१२-१३ मध्ये संबंधित बांधकामाकरीता पुरेसे प्रस्ताव न झाल्यामुळे रु२०.०२ लाख इतकी बचत झाली आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये प्रस्तुत लेखाशिर्षाखाली एकूण रु२४०.०० लाख इतके अनुदान खर्चासाठी उपलब्ध झाले होते. त्यामुळे उर्वरित रु६०.०० लाख इतके अप्राप्त अनुदाना समर्पित करणे भाग पडले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम ८०, सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (१५) अधिक्षक अभियंता, (सा.बां.) मंडळ, पुणे (१५)(०२) कार्यान्वयन मुळ ६५,६१.९७ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) ९,१७.७३	५६,४४.२४	५६,५९.७०	(+) १५,४६

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ. १९१ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ८०, सर्वसाधारण, ००१ संचालन व प्रशासन, (१५) अधिक्षक अभियंता, (सा.बां.) मंडळ, पुणे(१५)(०२) कार्यान्वयन (२०५९१०२२) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.५६,४४.२४ लाख (रुपये छप्पन्न कोटी चव्वेचाळीस लाख चोवीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु५६,५९.७० लाख (रुपये छप्पन्न कोटी एकोणसाठ लाख सत्तर हजार फक्त) झाला. परिणामी रु.१५.६४ लाख (रुपये पंधरा लाख चौसष्ट हजार फक्त) एवढा अधिक खर्च दर्शविण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे यांच्या अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग या कार्यालयांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील रु.५.४६ लाख इतक्या खर्चाची आकडेवारी संबंधित कार्यालयाने उपलब्ध करुन न दिल्यामुळेसदर रकमेचा समावेश अंतिम सुधारीत अनुदानामध्ये होऊ शकला नाही. परिणामी रु.१५.४६ लाख इतका अधिक खर्च दिसून येत आहे.

सदर मंडळांतर्गत विविध कार्यालयातील रिक्त पदे न भरल्याने रु९१७.७३ लाख इतके अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम ८०, सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (४३) अधिक्षक अभियंता पुणे प्रादेशिक (विद्युत) मंडळ, पुणे (४३)(०२) कार्यान्वयन मुळ १०,५२.७१ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) १,४१.३४	९,११.३७	९,८५.३८	(+) ७४.०१

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ. १९२ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ८०, सर्वसाधारण, ००१ संचालन व प्रशासन, (४३) अधिक्षक अभियंता पुणे प्रादेशिक(विद्युत) मंडळ, पुणे (४३)(०२) कार्यान्वयन (२०५९०८१२) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.९,११.३७ लाख (रुपये नऊ कोटी अकरा लाख सदतीस हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेतप्रत्यक्ष खर्च रु.९,८५.३८ लाख (रुपये नऊ कोटी पंचाऐंशी लाख अडतीसहजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.७४.०१ लाख (रुपये चौऱ्याहत्तर लाख एक हजार फक्त) एवढा अधिक खर्च दर्शविण्यात आला आहे.

कार्यकारी अभियंता, ठाणे विद्युत विभाग हे कार्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, पुणे यांच्या अधिनस्त कार्यरत होते. सार्वजनिक विभागाच्या दि.१८.०६.२०१२ च्या शासन निर्णयान्वये विद्युत मंडळाची फेररचना झालयानंतर सदर कार्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, मुंबई यांच्या अधिनस्त दि२०/७/२०१२ पासून कार्यान्वित झाले. मंडळाच्या फेररचनेनंतर कार्यकारी अभियंता (विद्युत) ठाणे यांनी त्यांच्या वेतनावरील खर्च०५९०७९५ या

लेखाशिर्षाखाली अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, मुंबई येथे दर्शविणे आवश्यक्होते. तथापि त्यांनी रु.७४.०१ लाख इतका खर्च २०५९०८१२ या लेखाशिर्षाखाली अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, पुणे येथे नोंदविला असल्याने या लेखाशिर्षाखाली अधिक खर्च दिसून येतो. सदर बाब खर्चाच्या ताळमेळाच्या वेळी निदर्शनास न आल्यामुळे याबाबत चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव (TOE/NOE) विहित वेळेत सादर करणे शक्य झाले नाही.

रिक्त पदे न भरल्यामुळे रु.१,४१.३४ लाख इतके अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम ८०, सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (४५) अधिक्षक अभियंता नागपूर प्रादेशिक (विद्युत) मंडळ, नागपूर (४५)(०२) कार्यान्वयन मुळ ८,९५.७४ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) ३,७३.८८	५,२१.८६	७,५१.१५	(+) २,२९.२९

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ. १९४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ८०, सर्वसाधारण, ००१ संचालन व प्रशासन, (४५) अधिक्षक अभियंता नागपूर प्रादेशिक (विद्युत) मंडळ, नागपूर, (४५)(०२) कार्यान्वयन संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.५,२१.८६ लाख (रुपये पाच कोटी एकवीस लाख शाऐंशी हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होती. त्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च रु.७,५१.१५ लाख (रुपये सात कोटी

एकावन्न लाख पंधरा हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.२,२९.२९ लाख (रुपये दोन कोटी एकोणतीस लाख एकोणतीस हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आला आहे.

कार्यकारी अभियंता, अमरावती विद्युत विभाग हे कार्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, नागपूर यांच्या अधिनस्त कार्यरत होते. सार्वजनिक विभागाच्या दि.१८.०६.२०१२ च्या शासन निर्णयान्वये विद्युत मंडळाची फेररचना झाल्यानंतर सदर कार्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, अमरावती यांच्या अधिनस्त दि२०/७/२०१२ पासून कार्यान्वित झाले. मंडळाच्या फेररचनेनंतर कार्यकारी अभियंता (विद्युत), अमरावती यांनी त्यांच्या वेतनावरील खर्च २०५९४११९ या लेखाशिर्षाखाली अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, अमरावती येथे दर्शविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी .२,२९.२९ लाख इतका खर्च २०५९०८५७ या लेखाशिर्षाखाली अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, नागपूर येथे नोंदविला असल्याने या लेखाशिर्षाखाली रु.२,२९.२९ लाख इतका अधिक खर्च दिसून येत आहे. सदर बाब खर्चाच्या ताळमेळाच्या वेळी निदर्शनास न आल्यामुळे याबाबत चुकीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव (TOE/NOE) विहित वेळेत सादर करणे शक्य झाले नाही.

रिक्त पदे न भरल्यामुळे रु.३,७३.८८ लाख इतके अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती **प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम** **८०, सर्वसाधारण** **७९९ निलंबन** **(००)(०३) संकिर्ण सार्वजनिक बांधकाम अग्रिमे**			
मुळ २.४२			
पुरक ---			
पुर्नर्विनियोजन (-) २.४२	---	२१.४०	(+) २१.४०

.३,८४.८० लाखांचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता मार्च२०१३ मध्ये परत करण्याद्वारे वरील उपशीर्षाखाली रु.३८.०९.९९ लाखांचा निधी काढण्यात आला.

.३,८४.८० लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट२०१३).

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ. १९३ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ८०, सर्वसाधारण, ७९९ निलंबन, (००)(०३) संकिर्ण सार्वजनिक बांधकाम अग्रिमे(२०५९ २३५९) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.२.४२ लाख (रुपये दोन लाख बेचाळीस हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होती. संकीर्ण लेखाशिर्षाखालील तरतूदी दरवर्षी १/३ या प्रमाणात कमी उपलब्ध होत असल्याने, क्षेत्रीय अधिकाऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार वितरीत करणे शक्य नव्हते. त्यामुळे संपूर्ण रु.४२ लाख इतकी तरतूद समर्पित करण्यात आली. तथापि यापूर्वीच्या संकीर्ण लेखाशिर्षाखालील जमा रकमा समायोजित केल्यामुळे सदर लेखाशिर्षाखाली .२१.४० लाख (रुपये एकवीस लाख चाहीस हजार फक्त) इतका अधिक खर्च दर्शविण्यात आला आहे.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती **प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम** **०१ कार्यालयीन इमारत** **०५३ परिरक्षण व दुरुस्ती** **(०२) इमारतींची दुरुस्ती** **(०२)(०३) मत्स्यव्यवसाय इमारतींची दुरुस्ती** मुळ २५.९९	२५.९९	३५.९९	(+) १०.००

टिपा व भाष्ये :-

.१०.०० लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट२०१३).

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ. १९३ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक

बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ०१ कार्यालयीन इमारत, ०५३ परिरक्षण व दुरुस्ती (०२) इमारतींची दुरुस्ती (०२)(०३) मत्स्यव्यवसाय इमारतींची दुरुस्ती(०५९२७३३) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.२५.९९ लाख (रुपये पंचवीस लाख नव्याण्णव हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होती. त्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च ३५.९९ (रुपये पस्तीस लाख नव्याण्णव हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.१०.०० लाख (रुपये दहा लाख फक्त) अधिक खर्च दर्शविण्यात आला आहे.

सदर अधिक खर्च कार्यकारी अभियंता, (विद्युत विभाग), अमरावती यांच्याकडील आहे. मार्च२०१३ मध्ये खाते बदल (T.E.O.) नोंदीद्वारे उपरोक्त अधिक खर्चाचे मुख्य लेखाशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम याखाली विशेष दुरुस्ती अंतर्गत अनुदानात नोंद घेण्याबाबत प्रस्ताव महालेखापाल कर्यालयास सादर करण्यात आला होता. तथापि, अनवधानाने मे २०१२ मध्ये नोंदविलेल्या खर्चाच्या लेखाशिर्षाचा संगणक संकेतांक नमूद केलेला नसल्याने महालेखापाल कार्यालयाकडून खातेबदल नोंद घेण्यात आली नाही. कार्यकारी अभियंता, (विद्युत विभाग), अमरावती यांनी सदर चुक अनवधनानेझालेली असल्याने क्षमापित करण्याची विनंती केली आहे.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती **प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम** **८०, सर्वसाधारण** **००१ संचालन व प्रशासन** **(५८) अधीक्षक अभियंता (विद्युत) नाशिक** **(५८)(०२) कार्यान्वयन** मुळ ०.०१ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) २,६५.३८	२,६५.३९	---	(-)२,६५.३९

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ. १९४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ८०, सर्वसाधारण, ००१ संचालन व प्रशासन, (५८) अधीक्षक अभियंता (विद्युत) नाशिक, (५८)(०२) कार्यान्वयन (२०५९ ४०८४) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.२,६५.३९ लाख (रुपये दोन कोटी पासष्ट लाख एकोणचाळीस हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होती.त्या तूलनेत प्रत्यक्ष खर्च "निरंक" दर्शविण्यात आला आहे. परिणामी .२,६५.३९ लाख (रुपये दोन कोटी पासष्ट लाख एकोणचाहरीस हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

कार्यकारी अभियंता, नाशिक विद्युत विभाग हे कार्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, औरंगाबाद यांच्या अधिनस्त कार्यरत होते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक १८/०६/२०१२ च्या शासन निर्णयान्वये विद्युत मंडळाची फेररचना झाल्यानंतर सदर कार्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, नाशिक यांच्या अधिनस्त दि.२०/७/२०१२ पासून कार्यान्वित झाले. मंडळाच्या फेररचनेनंतर कार्यकारी अभियंता (विद्युत) नाशिक यांनी त्यांच्या वेतनावरील खर्च २०५९४०९३ या लेखाशिर्षाखाली अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, नाशिक येथे दर्शविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी रु.२४२.२३ लाख इतकी बचत झाली. सदर बाब खर्चाच्या ताळमेळाच्या वेळी निदर्शनास न आल्यामुळे याबाबत चुकीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव (TOE/NOE) विहित वेळेत सादर करणे शक्य झाले नाही. तसेच रु.२३.१६ लाख एवढया रकमेची देयके कोषागारातून आक्षेपासह परत आल्यामुळे एकूण रु२६२.३९ लाख इतकी बचत दिसून येत आहे.

अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, नाशिक या नवनिर्मित मंडळासाठी सा.बां. विभागाच्या दि.७/११/२०१२ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र लेखाशिर्ष (२०५९४०९३) निर्माण करुन सन २०१२-१३ करिता त्याखाली रु.०.०१ लाख इतकी लाक्षणिक तरतूद करण्यात आली होती. सदर मंडळ प्रत्यक्षात कार्यान्वित झाल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्चासाठी .२,६५.३८ लाख इतके अनुदान अन्य लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती **प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम** **८०, सर्वसाधारण** **००१ संचालन व प्रशासन** **(५९) अधीक्षक अभियंता (विद्युत), अमरावती** **(५९)(०२) कार्यान्वयन**			
मुळ ०.०१			
पुरक ---			
पुर्नर्विनियोजन २,५४.००	२,५४.०१	---	(-)२,५४.०१

कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता, पुनर्विनियोजनेद्वारे वरील उपशीर्षाखाली रु.५,१९.३८ लाखांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला, तथापि ही रक्कम या वित्तीय वर्षात वापरता देऊ शकली नाही.

अनावश्यक रोखून धरलेल्या निधीची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ. १९४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ८०, सर्वसाधारण, ००१ संचालन व प्रशासन, (५९) अधीक्षक अभियंता (विद्युत) अमरावती, (५९)(०२) कार्यान्वयन संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.२,५४.०१ लाख (रुपये दोन कोटी चौपन्न लाख एक हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होती. त्या तूलनेत प्रत्यक्ष खर्च "निरंक" दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.२,५४.०१ लाख (रुपये दोन कोटी चौपन्न लाख एक हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

कार्यकारी अभियंता, अमरावती विद्युत विभाग हे कार्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ,नागपूर यांच्या अधिनस्त कार्यरत होते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक१८/०६/२०१२ च्या शासन निर्णयान्वये विद्युत मंडळाची फेररचना झाल्यानंतर सदर कार्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, अमरावती यांच्या अधिनस्त दि.२०/७/२०१२ पासून कार्यान्वित झाले. मंडळाच्या फेररचनेनंतर कार्यकारी अभियंता (विद्युत)अमरावती यांनी त्यांच्या वेतनावरील खर्च २०५९४११९ या लेखाशिर्षाखाली अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ,अमरावती येथे दर्शविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी रु.२,५४.०१ लाख इतकी बचत दिसून येत आहे. सदर बाब खर्चाच्या ताळमेळाच्या वेळी निदर्शनास न आल्यामुळे याबाबत चुकीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव (TOE/NOE) विहित वेळेत सादर करणे शक्य झाले नाही.

अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, अमरावती या नवनिर्मित मंडळासाठी सा.बां. विभागाच्या दि.७/११/२०१२ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र लेखाशिर्ष(२०५९४११९) निर्माण करुन सन २०१२-१३ करिता त्याखाली .०.०१ लाख इतकी लाक्षणिक तरतूद करण्यात आली होती. सदर मंडळ प्रत्यक्षात कार्यान्वित झाल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्चासाठी रु.२,५४.०० लाख इतके अनुदान अन्य लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती **प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम** **८०, सर्वसाधारण** **००१, संचालन व प्रशासन** **(५३)(०१) संचालक- सार्वजनिक बांधकाम विभाग (योग्य)**			
मुळ ३,५३.०१			
पुरक ---			
पुर्नर्विनियोजन (-) ८६.४८	२,६६.५३	५,८२.४०	(+) ३,१५.८७

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ. १९३ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ८०, सर्वसाधारण, ००१, संचालन व प्रशासन, (५३)(०१) संचालक- सार्वजनिक बांधकाम विभाग (योग्य) (२०५९०६१४) संबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.२,६६.५३ लाख (रुपये दोन कोटी सहासष्ट लाख त्रेपन्न हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होती. त्या तूलनेत प्रत्यक्ष खर्च रु.५,८२.४० लाख (रुपये पाच कोटी ब्याऐंशी लाख चाळीस हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु३,१५.८७ लाख इतका अधिक खर्च दर्शविण्यात आला आहे.

अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई तसेच महालेखापाल कार्यालय, मुंबई येथे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचा खर्चमेळ केला असता विभागाचा प्रत्यक्ष खर्च रु.२६६.२१ लाख इतका झाला आहे. अतिरिक्त दर्शविण्यात आलेला खर्च हा सा.बां.विभाग (खुद्द) कडील नसून ठाणे, रत्नागिरी, पुणे, सोलापूर, परभणी व नाशिक या जिल्हांमधून प्रस्तुत लेखाशिर्षाखाली चुकीने नोंदविण्यात आला आहे. प्रत्यक्षात एकूण अनुदानाच्या तुलनेत कमी/अधिक खर्च झालेला नाही.

आठमाही सुधारित अंदाजांमध्ये वेतन व आस्थापना खर्चाचा आढावा घेऊन रू६.४८ लाख एवढे अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती **प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम** **८०, सर्वसाधारण** **००१ संचालन व प्रशासन** **(४४) अधीक्षक अभियंता, औरंगाबाद प्रादेशिक (विद्युत) मंडळ, औरंगाबाद** **(४४)(०२) कार्यान्वयन** मुळ ७,४६.४१ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-)१,१३.९४			
	६,३२.४७	८,७४.७०	(+)२,४२.२३

.५,५८.१० लाखांचा अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, कोणतीही विनिर्दिष्ट कारण न देता मार्च २०१३ मध्येच वरील उपशीर्षाखालील रु.२,००.४२ लाखांचा निधी काढण्यात आला.

.५,५८.१० लाख एवढया अंतिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ. १९४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ८०, सर्वसाधारण, ००१ संचालन व प्रशासन, (४४) अधीक्षक अभियंता, औरंगाबाद प्रादेशिक (विद्युत) मंडळ, औरंगाबाद(४४)(०२) कार्यान्वयन (२०५९०८३९) संबधी आहे.

सन २०१२-१३ एकूण रु.६,३२.४७ लाख (रुपये सह कोटी बत्तीस लाख सत्तेचाळीस हजार फक्त) एवढी अर्थांकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होती. त्या तूलनेत प्रत्यक्ष खर्च रु८,७४.७० लाख (रुपये आठ कोटी चौऱ्याहत्तर लाख सत्तर हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.२,४२.२३ लाख (रुपये दोन कोटी बेचाळीस लाख तेवीस हजार फक्त) एवढा अधिक खर्च दर्शविण्यात आला आहे.

कार्यकारी अभियंता, नाशिक विद्युत विभाग, नाशिक हे कार्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, औरंगाबाद यांच्या अधिनस्त कार्यरत होते.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दिनांक१८.६.२०१२ च्या शासन निर्णयान्वये विद्युत मंडळाची फेररचना झाल्यानंतर सदर कार्यालय अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, नाशिक यांच्या अधिनस्त दि.२०/७/२०१२ पासून कार्यान्वित झाले. मंडळाच्या फेररचनेनंतर कार्यकारी अभियंता(विद्युत) नाशिक यांनी त्यांच्या वेतनावरील खर्च २०५९४०९३ या लेखाशीर्षाखाली अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, नाशिक येथे दर्शविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी रु.२४२.२३ लाख इतका खर्च २०५९०८३९ या लेखाशिर्षाखाली अधीखक अभियंता, प्रादेशिक विद्युत मंडळ, औरंगाबाद येथे नोंदविल्यामुळे सदर लेखाशिर्षाखाली रु.२४२.२३ लाख इतका अधिक खर्च दिसून येतो. सदर बाब खर्चाच्या ताळमेहाच्या वेही निदर्शनास न आल्यामुळे याबाबत चुकीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव (TOE/NOE) विहित वेळेत सादर करणे शक्य झाले नाही.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती **प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम ८०, सर्वसाधारण** **०५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री राज्य क्षेत्र जिल्हापरिशद व पंचायत समिती अधिनियम, १९६१-याच्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने**			
मुळ ---			
पुरक ---			
पुर्नर्विनियोजन ---	---	२,३४.५५	(+) २,३४.५५

टिपा व भाष्ये :-

वरील उपशिर्षाखालील रु.२,३४.५५ लाख इतक्या अनधिकृत खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ. १९५ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकिय व कार्यचालन इमारती, प्रधानशिर्ष -२०५९ सार्वजनिक बांधकाम, ८०, सर्वसाधारण, ०५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री राज्य क्षेत्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१-याच्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने (२०५९२१२५) संबधी आहे.

विनियोजन लेख्यामध्ये बाजूला दर्शविलेल्या स्थितीसंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, सदर लेखाशिर्षाखालील .२,९५.२६ लाख (रुपये दोन कोटी पंच्याण्णव लाख सव्वीस हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद व तेवढेच एकूण अनुदान, तसेच रु.६०.७१ लाख (रुपये साठ लाख एकाहत्तर हजार फक्त) प्रत्यक्ष खर्च याबाबतचा तपशिल अनु क्र.७० (पृ.७५) वरील विनियोजन लेख्यामध्ये दर्शविण्यात आला आहे. सदर तपशिल विचारात घेतला असता, प्रत्यक्षात सन २०१२-१३ मध्ये सदर लेखाशिर्षाखाली रु.२,९५.२६ लाख (रुपये दोन कोटी पंच्याण्णव लाख सव्वीस ह्जार फक्त) एवढी तरतूद उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च रु.२,९५.२६ लाख (रु.६०.७१ लाख + रु.२,३४.५५ लाख) इतकाच झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुत लेखाशिर्षाखाली बचत अथवा अधिक खर्च झालेला नाही.

एच-७-सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च

. हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-७ सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च (सर्व दत्तमत) **प्रधानशीर्ष** **४०५५ पोलीस यावंरील भांडवल खर्च,** **४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च,** **४७११ पूर नियंत्रण प्रकल्पांवरील भांडवली खर्च,** **५०५१ बंदरे व दीपगृहे यांवरील भांडवली खर्च,** **५०५३ नागरी विमानचालनावरील भांडवली खर्च,** **५०५४ मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च** **दत्तमत** मुळ २२,५३,७३,२८ पुरक १,४२,००,०६ वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २०१३)	२३,९५,७३,३४	१९,७०,६४,५९	(-) ४,२५,०८,७५ ४,२४,८७,७९

टिपा व भाष्ये :-

अनुदानाखालील .१९,७०,६४.५९ लाखांचा प्रत्यक्ष खर्च रु.२२,५३,७३.२८ लाख एवढया मूळ तरतूदी इतका देखील झाला नाही, रु.१,४२,००.०६ लाखांची पूरक तरतूद (जुलै१०१२ मध्ये रु.०.०१ डिसेंबर २०१२ मध्ये रु. १,४२,००.०२ लाख व मार्च २०१३ मध्ये रु.०.०३ लाख) अत्याधिक असायाचे सिध्द झाले.

2. .४,२५,०८.७५ लाखांची अंतिम बचत लक्षात घेता, मार्च रु.४,२४,८७.७९ लाखांचा परत करण्यात आलेला निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले.

ज्ञापन :-

महालेखापालानी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ.१९८ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-७-सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च (सर्व दत्तमत) प्रधानशिर्ष४०५५ पोलिसांवरील भांडवली खर्च, ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च,४७११ पूर नियंत्रण प्रकल्पांवरील भांडवली खर्च, ५०५१ बंदरे व दीपगृहे यांवरील भांडवली खर्च, ५०५३ नागरी विमानचालनावरील भांडवली खर्च, ५०५४ मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च यासंबंधी आहे.

सन २०११-१२ मध्ये मागणी क्रमांक एच-७ मध्ये एकूण रु.२३,९५,७३.३४ लाख (रुपये दोन हजार तीनशे पंच्याण्णव कोटी त्र्याहत्तर लाख चौतीस हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध होती. तर त्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च .१९,७०,६४.५९ लाख (रुपये एक हजार नऊशे सत्तर कोटी चौसष्ट लाख एकोणसाठ हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.४,२५,०८.७५ लाख (रुपये चारशे पंचवीस कोटी आट लाख पंच्याहत्तर हजार फक्त) बचत झाल्याचे दिसून येते.

सन २०११-१२ मध्ये रु.४,२४,८७.७९ लाख (रुपये चारशे चोवीस कोटी सत्त्याऐंशी लाख एकोणऐंशी हजार फक्त) एवढे अनुदान समर्पित करण्यात आले असल्याने प्रत्यक्षात रु.२०.९६ लाख (रुपये वीस लाख शहाण्णव हजार फक्त) इतका अधिक खर्च दिसून येत आहे. सदरचा अधिक खर्च एकूण अनुदानाच्या तुलनेत अत्यल्प आहे.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-७ सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च **प्रधानशीर्ष- ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च** **०१ शासकीय निवासी इमारती** **१०६ इमारती सर्वसाधारण एकत्रित निवासव्यवस्था** **(००)(०१) मोठी बांधकामे** मुळ २७,४९.८७ पुरक ०.०१ पुर्नर्विनियोजन (-) ४,४०.३६	२३,०९.५२	२३,०९.१७	(-) ०.३५

ज्ञापन :-

महालेखापालानी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ.१९८ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-७-सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील, प्रधानशीर्ष- ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च,०१ शासकीय निवासी इमारती, १०६ इमारती सर्वसाधारण एकत्रित निवासव्यवस्था, (००)(०१) मोठी बांधकामे (४२१६०२६२) संबंधी आहे.

सन २०११-१२ मध्ये एकूण रु.२३,०९.५२ लाख (रुपये तेवीस कोटी नऊ लाख बावन्न हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु.२३,०९.१७ लाख (रुपये तेवीस कोटी नऊ लाख सतरा हजार फक्त) झाला. परिणामी रु.०.३५ लाख (रुपये पस्तीस हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे. सदर बचत एकूण अनुदानाच्या तुलनेत अत्यल्प असून अधिक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, औरंगाबाद यांचेकडील आहे.

सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये रु.२३४४.४८ लाख एवढेच अनुदान अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर प्राप्त झाले होते. त्यामुळे रु.४०५.४० लाख (रु.२७९९.८८- .२३४४.४८ लाख) एवढे अनुदान अप्राप्त होते. प्राप्त तरतूदीपैकी रु.३४.९६ लाख एवढे अनुदान अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ, औरंगाबाद यांचेकडून खर्च होऊ न शकल्याने एकूण.४४०.३६ लाख (४०५.४० + ३६.९६) एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-७ सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च ०१ शासकीय निवासी इमारती ७०० इतर गृहनिर्माण (०१)(०१) न्यायदान मोठी बांधकामे			
मुळ ६,९६.००			
पुरक ०.०२			
पुर्नर्विनियोजन (-) २,०४.४४	४,९१.५८	४,९१.५७	(-) ०.०१

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ.१९८ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-७-सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील, प्रधानशीर्ष- ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च ०१ शासकीय निवासी इमारती, ७०० इतर गृहनिर्माण, (०१)(०१) न्यायदान मोठी बांधकामे (४२१६०२९१ राज्य हिस्सा) संबंधी आहे.

सन २०११-१२ मध्ये एकूण रु.४,९१.५८ लाख (रुपये चार कोटी एक्याण्णव लाख अठ्ठावन्न हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु४,९१.५७ लाख (रुपये चार कोटी एक्याण्णव लाख सत्तावन्न हजार फक्त) झाला. परिणामी रु.०.०१ लाख (रुपये एक हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे. सदर विनियोजन लेख्यात दर्शविण्यात आलेली रु.०.०१ लाख एवढी बचत अत्यल्प आहे.

सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये रु.५४४.०७ लाख एवढेच अनुदान अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध झाले होते. त्यामुळे रु.१५१.९५ लाख एवढे अनुदान अप्राप्त होते. प्राप्त तरतूदीपैकी अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ, सातारा, उस्मानाबाद व नागपूर यांनी मागणी कमी केल्याने, रु५२.४९ लाख एवढी तरतूद खर्च होऊ शकली नाही. परिणामी .२०४.४४ लाख (रु.१५१.९५ + .५२.४९ लाख) एवढी तरतूद समर्पित करण्यात आली.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-७ सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च ०१ शासकीय निवासी इमारती ७०० इतर गृहनिर्माण (०१)(०१) न्यायदान (केंद्रीय पुरसकृत योजना) मोठी बांधकामे			
मुळ १८,२६.००			
पुरक ०.०१			
पुर्नर्विनियोजन (-) ४,४८.५४	१३,७७.४७	१३,७७.४८	(+) ०.०१

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा२०१२-१३ ची पृ.१९८ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-७-सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील, प्रधानशीर्ष- ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च ०१ शासकीय निवासी इमारती, ७०० इतर गृहनिर्माण, (०१)(०१) न्यायदान (केंद्रीय पुरसकृत योजना) मोठी बांधकामे (४२१६०५२२) संबंधी आहे.

सन २०११-१२ मध्ये एकूण रु.१३,७७.४७ लाख (रुपये तेरा कोटी सत्त्याहत्तर लाख सत्तेचाळीस हजार फक्त) एवढी एकूण अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होती. त्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च रू१३,७७.४८ लाख (रुपये तेरा कोटी सत्त्याहत्तर लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.०.०१ लाख (रुपये एक हजार फक्त) जादा खर्च झाल्याचे दिसून येते. सदर खर्च एकुण अनुदानाच्या तुलनेत अत्यल्प आहे. तरी सदर खर्च क्षमापित करण्यात यावा.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये रु.१४६०.८० लाख एवढेच अनुदान एवढेच अनुदान प्राप्त झाले होते. प्राप्त तरतूदीपैकी रु.८३.३३ लाख एवढे अनुदान अधीक्षक अभियंता ठाणे, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, नाशिक व अहमदनगर यांचेकडून खर्च होऊ शकले नाही. परिणामी अप्राप्त रु.३६५.२१ लाख (रु.२८२६.०१ – .१४६०.८० लाख) व खर्च न होणारे .८३.३३ लाख एवढे असे एकूण ४४८.५४ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-७ सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ५०५४ मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च ०४ जिल्हा व इतर मार्ग ८०० इतर गृहनिर्माण (०४)(०१) नाबार्डकडून घेतलेल्या कर्ज सहाय्यामार्फत अंमलबजावणी केलेली बांधकामे मोठी बांधकामे			
मुळ ४,२५,००.००			
पुरक ७५,००.००			
पुर्नर्विनियोजन (-) ९९,९९.९९	४,००,००.०१	४,००,०७.३८	(+) ७.३७

वरील उपशीर्षाखालील रु.४,१३,८४.८६ लाख इतका अंतिम खर्च मूळ तरतूदी इतका देखील झाला नाही. .७५,००.०१ लाख इतकी पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले आणि रु.७.३८ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, कोणतीही विनिर्दिष्ट कारणे न देता प्रत्यार्पणाद्वारे मार्च २०१३ मध्ये काढलेला रु.१,०४,४८.५३ लाख इतका निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

.७.३८ लाख इतक्या अंमिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१३)

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०० वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-७ प्रधानशीर्ष- ५०५४ मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च, ०४ जिल्हा व इतर मार्ग, ८०० इतर गृहनिर्माण, (०४)(०१) नाबार्डकडून घेतलेल्या कर्ज सहाय्यामार्फत अंमलबजावणी केलेली बांधकामेमोठी बांधकामे (५०५४०७५२) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.४,००,००.०१ लाख (रुपये चारशे कोटी एक हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. तर प्रत्यक्ष खर्च रु.४,००,०७.३८ (रुपये चारशे कोटी सात लाख अडतीस हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे.

परिणामी रु. ७.३७ लाख (रुपये सात लाख सदतीस हजार फक्त) जादा खर्च झाल्याचे दिसून येते. सदर खर्च एकूण अनुदानाच्या तुलनेत अत्यल्प आहे. तरी सदर खर्च क्षमापित करण्यात यावा.

सन २०१२-१३ मध्ये या लेखाशिर्षाखाली वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारीत अंदाजाच्या अनुषंगाने .९९,९९.९९ लाख (रुपये नव्याण्णव कोटी नव्याण्णव लाख नव्याण्णव हजार मात्र) एवढी तरतूद समर्पित करण्यात आली.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-७ सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च ०१ शासकीय निवासी इमारती ७०० इतर गृहनिर्माण (०१)(०२) न्यायदान केंद्र पुरस्कृत योजना (राज्य हिस्सा) आस्थापना खर्च			
मुळ ९६.००			
पुरक ---			
पुर्नर्विनियोजन (-) २७.६७	६८.३३	६६.४८	(-) १.८५

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०० वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-७ प्रधानशीर्ष-४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च, ०१ शासकीय निवासी इमारती, ७०० इतर गृहनिर्माण, (०१)(०२) न्यायदान केंद्र पुरस्कृत योजना (राज्य हिस्सा) आस्थापना खर्च (४२१६०३०६) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.६८.३३ लाख (रुपये अडुसष्ट लाख तेहतीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु.६६.४८ लाख (रुपये सहासष्ट लाख अठ्ठेचाहीस हजार फक्त) झाला. परिणमी रु.१.८५ लाख (रुपये एक लाख पच्याऐंशी हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे. अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, धुळे, नांदेड, अकोला या कार्यालयाची आस्थापना खर्चाची कमी नोंद महालेखापाल कार्यालयाकडे केल्या सदर लेखाशीर्षाखाली बचत दिसून येत आहे.

सन २०१२-१३ मध्ये या वित्तीय वर्षात लेखाशिर्ष ४२१६०२९१ खाली प्रमुख बांधकामाच्या १३.९० टक्के प्रमाणात आस्थापना खर्चासाठी रु.६८.३३ लाख एवढ्या अनुदानाची आवश्यकता असल्याने, उर्वरित रु.२७.६७ लाख एवढे अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-७ सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च ०१ शासकीय निवासी इमारती ७०० इतर गृहनिर्माण (०३)(०५) न्यायदान केंद्र पुरस्कृत योजना – केंद्राचा हिस्सा आस्थापना खर्च			
मुळ २,५४.००			
पुरक ---			
पुर्नर्विनियोजन (-) ६२.५३	१,९१.४७	१,८३.२१	(-) ५.२६

.७.११ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, मूळ अर्थसंकल्पावर अनिवार्य कपात लादल्याचे नमूद करुन मार्च २०१३ मध्ये वरील उपशीर्षाखाली रु.९०.२० लाख इतका परत करण्यात आलेला निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले. बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१३)

ज्ञापन :-

महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०० वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-७ प्रधानशीर्ष-४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च, ०१ शासकीय निवासी इमारती, ७०० इतर गृहनिर्माण, (०३)(०५) न्यायदान केंद्र पुरस्कृत योजना – केंद्राचा हिस्सा आस्थापना खर्च (४२१६०५३१) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.१,९१.४७ लाख (रुपये एक कोटी एक्याण्णव लाख सत्तेचाळीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.१,८६.२१ लाख (रुपये एक कोटी शाऐंशी लाख एकवीस हजार फक्त) झाला. परिणामी रु.५.२६ लाख (रुपये पाच लाख सव्वीस हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

सदर विनियोजन लेख्यात दर्शविण्यात आलेली बचत अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ धुळे यांचेकडील असुन आस्थापना खर्चाची कमी नोंद महालेखापाल कार्यालयाकडे झाल्याने सदर बचत दिसुन येत आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये लेखाशीर्ष ४२१६०५२२ खालील प्रमुख बांधकामांच्या प्रमाणात१३.९० टक्के .१९१.४७ लाख इतक्या अनुदानाची आस्थापना खर्चासाठी आवश्यकता असल्याने उर्वरित रु.६२.५३ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-७ सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४०५५ पोलीसांवरील भांडवली खर्च २११ पोलीस गृहनिर्माण (०१)(०३) शासकीय कार्यालयीन इमारती हत्यारे व संयंत्रे यांवरील खर्च			
मुळ ४.७८			
पुरक ९.५८			
पुर्नर्विनियोजन ---	१४.३६	४८.७५	(+) ३४.३९

.३४.३९ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, वरील उप शीर्षाखालील रु९.५८ लाख इतकी पूरक तरतूद अपुरी असल्याचे सिध्द झाले या मागील कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०० वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र.एच-७ प्रधानशीर्ष-४०५५ पोलीसांवरील भांडवली खर्च, २११ पोलीस गृहनिर्माण, (०१)(०३) शासकीय कार्यालयीन इमारती हत्यारे व संयंत्रे यांवरील खर्च (४०५५००४५) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.१४.३६ लाख (रुपये चौदा लाख छत्तीस हजार फक्त) एवढी तरतूद अर्थसंकल्पीय तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध होती. तर त्या तूलनेत खर्च रु.४८.७५ लाख (रुपये अठ्ठेचाळीस लाख पंचाहत्तर हजार फक्त) झाला. परिणामी रु.३४.३९ लाख (रुपये चौतीस लाख एकोणचाळीस हजार फक्त) अधिक खर्च दर्शविण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात अधिक खर्च झालेला नाही.

क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी सदर लेखाशीर्षाखाली प्रत्यक्षात रु१४.०२ लाख इतका खर्च नोंदविलेला आहे. त्यामुळे सदर विनियोजन लेख्यात रु.०.३४ लाख एवढी बचत असून सदर बचत प्रामुख्याने धुळे, अकोला यांचेकडील खर्चाची नोंद महालेखापांलाकडे न झाल्याने तसेच मुख्य अभियंता (विद्युत) यांचा कमी खर्च नोंदविल्यामुळे सदर बचत दिसून येत आहे

एच-८-सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च

. लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च **प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च** **०१ कार्यालयीन इमारती** **०५१ बांधकाम** **०३ न्यायदान केंद पुरस्कृत योजना राज्य हिस्सा (योजनांतर्गत)** **(०३)(०१) मोठी बांधकामे** मुळ १,३२,१७.०० पुरक ०.०२ पुर्नर्विनियोजन -४३,५१.७३	८८,६५.२९	८८,६५.२६	(-) ०.०३

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०३ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, ०३ न्यायदान केंद पुरस्कृत योजना राज्य हिस्सा (योजनांतर्गत), (०३)(०१) मोठी बांधकामे (४०५९०६७२) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.८८,६५.२९ लाख (रुपये अठ्ठयाऐंशी कोटी पासष्ट लाख एकोणतीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु८८,६५.२६ लाख (रुपये अठ्ठयाऐंशी कोटी पासष्ट लाख सव्वीस हजार फक्त) झाला. परिणामी रु.०.०३ लाख (रुपये तीन हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात एकूण रु.१३२१७.०० लाख एवढी तरतूद अर्थसंकल्पीय करण्यात आली होती. जुलै व डिसेंबर २०१२ पुरवणी मागणीद्वारे नविन कामे अर्थसंकल्पीत झाली होती. सन २०१२-१३ मध्ये वित्त विभागाने योजनांतर्गत तरतूदींना २० टक्के कपात लावल्यामुळे रु.१०५७.६१ लाख एवढीच तरतूद खर्च करण्यास अनुमती होती. प्राप्त तरतूदपैकी रु.१७०८.३२ लाख एवढी तरतूद मुंबई, रायगड, रत्नागिरी, अहमदनगर, जळगाव, धुळे, गडचिरोली व विद्युत यांचेकडील विविध कामास खर्च होऊ शकली नाही. तसेच वित्त विभागाच्या कपातीमुळे रु४३५१.७३ लाख एवढी तरतूद समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च **प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च** **०१ कार्यालयीन इमारती** **०५१ बांधकाम** **०७ जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत) राज्य योजनांतर्गत योजना** **(०७)(०१) मोठी बांधकामे** मुळ १,२१,७३.९१ पुरक ०.०१ पुर्नर्विनियोजन -२३,७९.८३	९७,९४.०९	९७,९४.०५	(-) ०.०४

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, (१३) कार्यालयीन इमारत (योजनांतर्गत), (१३)(०१) मोठी बांधकामे (४०५९०९७७) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.९२,११.८८ लाख (रुपये ब्याण्णव कोटी अकरा लाख अठ्ठयाऐंशी हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु.८५,१६.२३ लाख (रुपये पच्याऐंशी कोटी सोळा लाख तेवीस हजार फक्त) झाला. परिणामी रु.६,९५.६५ लाख (रुपये सहा कोटी पंचाण्णव लाख पासष्ट हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

या संदर्भात नमूद करण्यात येते की, लेखाशीर्ष ४०५९०९७७ खाली अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, सातारा यांचेकडील रु.६,९५.६५ लाख तरतूद ठेव अंशदान स्वरुपात ठेवण्यास अनुमती दिलेली होती. त्यानुसार खर्चाचा लेखा महालेखापाल कार्यालयास सादर केला होता. सदर रकमेचा लेखा महालेखापाल कार्यालयाने स्विकृत केला नसल्याने, सदर बचत दिसून येत आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये रु.९२,११.८८ लाख एवढेच अनुदान खर्चासाठी उपलब्ध झाले होते. त्यामुळे अप्राप्त रु.२,८५.७० लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१ बांधकाम (१३) कार्यालयीन इमारत (योजनांतर्गत) (१३)(०१) मोठी बांधकामे			
मुळ ७३,८८.४४			
पुरक २१,०९.१४			
पुर्नर्विनियोजन -२,८५.७०	९२,११.८८	८५,१६.२३	(-) ६,९५.६५

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च,प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, ०७ जिल्हा प्रशासन (योजनांतर्गत) राज्य योजनांतर्गत योजना, (०७)(०१) मोठी बांधकामे(४०५९०७९९) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.९७,९४.०९ लाख (रुपये सत्त्याण्णव कोटी चौऱ्याण्णव लाख नऊ हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु९७,९४.०५ लाख (रुपये सत्त्याण्णव कोटी चौऱ्याण्णव लाख पाच हजार फक्त) झाला. परिणामी रु.०.०४ लाख (रुपये चार हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात सदर लेखाशीर्षाखाली रु.९७९४.०९ लाख एवढीच तरतूद अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर खर्चासाठी प्राप्त झाली होती. त्यामुळे उर्वरित रु.२३७९.८३ लाख एवढी तरतूद समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१ बांधकाम (१३) कार्यालयीन (योजनांतर्गत) (१३)(०२) आस्थापना खर्च			
मुळ १०,२६.९९			
पुरक २,९३.१७			
पुर्नर्विनियोजन -३९.७१	१२,८०.४५	११,८३.७६	(-) ९६.६९

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, (१३) कार्यालयीन इमारत (योजनांतर्गत), (१३)(०२) आस्थापना खर्च (४०५९०९८६) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.१२,८०.४५ लाख (रुपये बारा कोटी ऐंशी लाख पंचेचाळीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु.११,८३.७६ लाख (रुपये अकरा कोटी त्र्याऐंशी लाख शाहत्तर हजार फक्त) झाला. परिणामी रु.९६.६९ लाख (रुपये शहाण्णव लाख एकोणसत्तर हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

लेखाशिर्ष ४०५९०९७७ खाली अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, सातारा यांचेकडील प्रमुख बांधकामाचा निधी ठेव अंशदान स्वरुपात ठेवण्यास अनुमती दिलेली होती. तथापि, महालेखापाल कार्यालयाने रु.९६.६९ लाख रकमेचा लेखा स्विकृत केला नसल्याने, आस्थापना खर्चाची रु.९६.६९ लाख एवढी बचत दिसून येते.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये लेखाशिर्ष ४०५९०९७७ खालील प्रमुख बांधकामाच्या प्रमाणात १३.९० टक्के .१२१८०.४५ लाख एवढ्या अनुदानाची आस्थापना खर्चासाठी आवश्यकता असल्याने उर्वरित रु.३९.७१ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१ बांधकाम (१३) कार्यालयीन इमारती (योजनांतर्गत) (१३)(०३) हत्यारे व संयंत्रे यांवरील खर्च			
मुळ ८१.२७			
पुरक २३.२०			
पुर्नर्विनियोजन (-) ३.१४	१,०१.३३	९३.६८	(-) ७.६५

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, (१३) कार्यालयीन इमारती (योजनांतर्गत), (१३)(०३) हत्यारे व संयंत्रे यावरील खर्च(४०५९०९९५) संबंधीआहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.१,०१.३३ लाख (रुपये एक कोटी एक लाख तेहतीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु.९३.६८ लाख (रुपये त्र्याण्णव लाख अडुसष्ट हजार फक्त) झाला. परिणामी रु.७.६५ लाख (रुपये सात लाख पासष्ट हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे.

लेखाशिर्ष ४०५९०९७७ खाली अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, सातारा यांचेकडील प्रमुख बांधकामाचा निधी ठेव अंशदान स्वरुपात ठेवण्यास अनुमती दिलेली होती. तथापि, महालेखापाल कार्यालयाने रु७.६५ लाख हत्यारे व संयंत्रे यावरील खर्चाचा लेखा स्विकृत केला नसल्याने रु.७.६५ लाख एवढी बचत दिसून येते.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये लेखाशिर्ष ४०५९०९७७ खालील प्रमुख बांधकामाच्या प्रमाणात १.१० टक्के .१०१.३३ लाख एवढ्या अनुदानाची हत्यारे व संयंत्रे यावरील खर्चासाठी आवश्यकता असल्याने उर्वरित रु३.१४ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व सांस्कृतिक कार्य यावरील भांडवली खर्च, ०१ सर्वसाधारण शिक्षण २०३ विद्यापीठीय व उच्च शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (००)(०१) मोठी बांधकामे			
मुळ १०,४२.३०			
पुरक ०.०१			
पुर्नर्विनियोजन (-) २,०९.३१	८,३३.००	८,३२.९४	(-) ०.०६

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च,प्रधानशीर्ष- ४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व सांस्कृतिक खर्च, ०१ सर्वसाधारण शिक्षण, २०३ विद्यापीठीय व उच्च शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना,(००)(०१) मोठी बांधकामे संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.८,३३.०० लाख (रुपये आठ कोटी तेहतीस लाख फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु८,३२.९४ लाख (रुपये आठ कोटी बत्तीस लाख चौऱ्याण्णव हजार फक्त) झाला. परिणामी रु.०.०६ लाख (रुपये सहा हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे. सदर विनियोजन लेख्यात दर्शविण्यात आलेली बचत अधीक्षक अभियंता, साबां.मंडळ, औरंगाबाद यांचेकडील आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात सदर लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर रु८,३३.०० लाख एवढे अनुदान उपलब्ध झाले होते. त्यामुळे उर्वरित रु२०९.३१ लाख अप्राप्त अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व सांस्कृतिक कार्य यावरील भांडवली खर्च, ०२ तंत्र शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत इमारती १०३ तंत्र विद्यालये (००)(०७) मोठी बांधकामे			
मुळ ६,०८.८७			
पुरक ०.०१			
पुर्नर्विनियोजन -१,५०.२६	४,५८.६२	४,५८.६०	(-) ०.०२

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०४ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च,प्रधानशीर्ष- ४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व सांस्कृतिक कार्य यावरील भांडवली खर्च, ०२ तंत्र शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत इमारती,१०३ तंत्र विद्यालये, (००)(०७) मोठी बांधकामे (४२०२०६४२) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.४,५८.६२ लाख (रुपये चार कोटी अठ्ठावन्न लाख बासष्ट हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु४,५८.६० लाख (रुपये चार कोटी अठ्ठावन्न लाख साठ हजार फक्त) झाला. परिणामी रु.०.०२ लाख (रुपये दोन हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे. सदर बचत अत्यल्प आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये एकूण रु.६०८.८८ लाख तरतूदीपैकी रु.४८१.३८ लाख एवढीच तरतूद अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर प्राप्त झाली होती. प्राप्त तरतूदीपैकी अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ, नांदेड व अमरावती **यां** अनुक्रमे रु.१४.२२ व रु.८.५४ लाख अशी एकूण रु.२२.३६ लाख एवढी तरतूद समर्पित केली व अप्राप्त रु.१२७.५० लाख (.६०८.८८ लाख – .४८१.३८ लाख) अशी एकूण रु.१५०.२६ लाख एवढी तरतूद समर्पित करण्यात आली.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती ०५१ बांधकाम (२४) उपनिबंधक, नोंदणी व मुंद्राक विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम (२४)(०२) आस्थापना खर्च			
मुळ १,८१.३०			
पुरक ---			
पुर्नर्विनियोजन -१,५८.३०	२३.००	१३.६२	(-) ९.३८

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२०७ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष- ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, (२४) उपनिबंधक, नोंदणी व मुंद्राक विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम, (२४)(०२) आस्थापना खर्च (४०५९२५०३) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.२३.०० लाख (रुपये तेवीस लाख फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु.१३.६२ लाख (रुपये तेरा लाख बासष्ट हजार फक्त) झाला. परिणामी रु.९.३८ लाख (रुपये नऊ लाख अडतीस हजार फक्त) एवढी बचत दर्शविण्यात आली आहे. अधीक्षक अभियंता, औरंगाबाद (रु३.८४ लाख) व अमरावती (रु.५.५६ लाख) यांचेकडील कामावरील आस्थापना खर्चाची नोंद महालेखापाल कार्यालयाकडे न झाल्याने सदर बचत दिसून येत आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये लेखाशीर्ष ४०५९२४९७ खाली प्रमुख बांधकामाच्या तरतूदींच्या प्रमाणात १३.९० टक्के रु.२३.०० लाख एवढ्या अनुदानाची आस्थापना खर्चासाठी आवश्यकता असल्याने उर्वरित रु.१५८.३० लाख एवढी तरतूद समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती ०५१ बांधकाम (१२) निरीक्षक बंगले, विश्रांतीगृह (योजनेतंर्गत) राज्य योजनांतर्गत योजना (१२)(०२) आस्थापना खर्च			
मुळ ७६.६९			
पुरक २,४१.७४	३,०३.०५	३,०६.८९	(+) ३.८४
पुर्नर्विनियोजन - १५.३८			

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२१८ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, (१२) निरीक्षक बंगले, विश्रांतीगृह (योजनेतंर्गत) राज्य योजनांतर्गत योजना(१२)(०२) आस्थापना खर्च (४०५९०९५९) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.३,०३.०५ लाख (रुपये तीन कोटी तीन लाख पाच हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु३,०६.८९ लाख (रुपये तीन कोटी सहा लाख एकोणनव्वद हजार फक्त) झाला. परिणामी रु.३.८४ लाख (रुपये तीन लाख चौऱ्याऐंशी हजार फक्त) एवढा अधिक खर्च दर्शविण्यात आला आहे.

कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग औरंगाबाद यांचेकडून रु३,८३,२४९/- इतका खर्च या लेखाशिर्षाखाली नोंदविल्यामुळे रु.३.८४ लाख एवढा अधिक खर्च दिसून येत आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये लेखाशीर्ष ४०५९०९४१ या खाली प्रमुख बांधकामाच्या तरतूदींच्या प्रमाणात १३.९० टक्के रु.३०३.०५ लाख इतक्या अनुदानाची आस्थापना खर्चासाठी आवश्यकता असल्याने उर्वरित रु.१५.३८ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशिर्ष – ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०१ नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य) ११० रुग्णालय व दवाखाने पंचवार्षिक योजनांतर्गत योजना ०१ इमारती (०१)(०२) आस्थापना खर्च			
मुळ १६,९२.१७			
पुरक २,६०.०६	१५,६१.४८	१६,१९.०४	(+) ५७.५६
पुर्नर्विनियोजन - ३,९०.७५			

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२१८ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च्र प्रधानशिर्ष – ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च, ०१ नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य), ११० रुग्णालय व दवाखाने पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०१ इमारती, (०१)(०२) आस्थापना खर्च (४२१०००२३) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.१५,६१.४८ लाख (रुपये पंधरा कोटी एकसष्ट लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तुलनेत खर्च रु१६,१९.०४ लाख (रुपये सोळा कोटी एकोणीस लाख चार हजार फक्त) झाला. परिणामी रु.५७.५६ लाख (रुपये सत्तावन्न लाख छपन्न हजार फक्त) एवढा अधिक खर्च दर्शविण्यात आला आहे.

अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, औरंगाबाद, नांदेड तसेच मुख्य अभियंता विद्युत यांच्या कार्यालयाकडून आस्थापना खर्चाची अधिक नोंद झाल्याने रु.५७.५६ लाख इतका अधिक खर्च दिसून येत आहे. अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, औरंगाबाद यांचेकडील सन२०११-१२ या वित्तीय वर्षातील खर्चाची नोंद महालेखापाल कार्यालयाने सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात खर्चाची अधिक नोंद झाली. परिणामी रु.५७.५६ लाख इतका अधिक खर्च दिसून येत आहे.

लेखाशीर्ष ४२१०००१४ खालील प्रमुख बाधकामाच्या तरतूदीच्या १३.९० टक्के आस्थापना खर्चासाठी .१५६१.४८ लाख इतक्या अनुदानाची आवश्यकता असल्याने उर्वरित रु.३९०.७५ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशिर्ष – ४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च ०१ अनुसूचित जातीचे कल्याण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना इमारती २७७ शिक्षण (००)(०१) मोठी बांधकामे मुळ ४३,४७.८२ पुरक --- पुर्नर्विनियोजन - ४३,४७.८२	०.००	४,२६.५७	(+) ४,२६.५७

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२१९ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशिर्ष– ४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च,०१ अनुसूचित जातीचे कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना इमारती, २७७ शिक्षण, (००)(०१) मोठी बांधकामे (४२२५०३२७) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये या लेखाशीर्षाखाली .४३,४६.८२ लाख (रुपये त्रेचाळीस कोटी सत्तेचाळीस लाख ब्याऐंशी हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. मात्र या लेखाशीर्षाखालील कामांना उपभोक्ता विभागाने कामनिहाय तरतूद दर्शविलेली नसल्याने रु.४३,४७.८२ लाख एवढी तरतूद वितरीत झाली नाही. परिणामी सदर तरतूद वर्षअखेरीस समर्पित करण्यात आली.

सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये ठेव अंशदान स्वरुपात निधी ठेवण्यात उपभोक्ता विभागाने अनुमती दिलेली होती. त्यानुसार नाशिक, जळंगाव, औरंगाबद्द, अमरावती व बीड या क्षेत्रिय कार्यालयांनी आवश्यक लेखा महालेखापाल कार्यालयास सादर केला होता. परंतु महालेखापाल कार्यालयाने सन२०११-१२ चा खर्च सन २०१२-१३ मध्ये दर्शविल्यामुळे .४२६.५७ एवढा अधिक खर्च दिसून येत आहे.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशिर्ष – ४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवलीद खर्च ०१ अनुसूचितजातीचे कल्याण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना इमारती २७७ शिक्षण (००)(०२) आस्थापना खर्च			
मुळ ६,०४.३५			
पुरक ---	०.००	५८.८४	(+) ५८.८४
पुर्नर्विनियोजन - ६,०४.३५			

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२१९ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशिर्ष– ४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च,०१ अनुसूचित जातीचे कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना इमारती, २७७ शिक्षण, (००)(०२) आस्थापना खर्च (४२२५०३२७) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये या लेखाशीर्षाखाली .६,०४.३५ लाख (रुपये सहा कोटी चार लाख पस्तीस हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. मात्र या लेखाशीर्षाखालील कामांना उपभोक्ता विभागाने कामनिहाय तरतूद दर्शविलेली नसल्याने प्रमुख बांधकामाचा निधी वितरीत झाला नाही. परिणामी आस्थापना खर्चासाठी असलेली रु६,०४.३५ लाख एवढी तरतूद वर्षअखेरीस समर्पित करण्यात आली.

सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये ठेव अंशदान स्वरुपात निधी वर्ग करण्यास उपभोक्ता विभागाने अनुमती दिलेली होती. त्यानुसार नाशिक, जळंगाव, औरंगाबाद, बीड या क्षेत्रिय कार्यालयांनी खर्चाचा लेखा सादर केला होता.परंतु २०१२-१३ मध्ये नोंदविल्यामुळे रु.५८.८४ लाख एवढा अधिक खर्च दिसून येत आहे.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवलीखर्च प्रधानशिर्ष – ४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवलीद खर्च ०१ अनुसूचित जातीचे कल्याण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना इमारती २७७ शिक्षण (००)(०३) हत्यारे व संयंत्रे यांवरील खर्च			
मुळ ४७.८३			
पुरक ---	०.००	४.६६	(+) ४.६६
पुर्नर्विनियोजन - ४७.८३			

टिपा व भाष्ये :-

.४,९०.०७ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, वरील उप शीर्षाखालील मार्च २०१३ मध्ये खर्चाच्या स्थितीत खात्री न करता आणि परत करण्यासाठी कोणतेही कारण न देता काढण्यात आलेली रु.५०,००.०० लाख इतकी संपूर्ण तरतूद अवास्तव असल्याचे सिध्द झाले.

.४,९०.०७ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२१९ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशिर्ष– ४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च,०१ अनुसूचित जातीचे कल्याण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना इमारती, २७७ शिक्षण, (००)(०३) हत्यारे व संयंत्रे यांवरील खर्च(४२२५०३३६) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये या लेखाशीर्षाखाली .४७.८३ लाख (रुपये सत्तेचाळीस लाख त्र्याऐंशी हजार फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. तथापि या लेखाशीर्षाखालील कामांना उपभोक्ता विभागाने कामनिहाय तरतूद दर्शविलेली नसल्याने सदर लेखाशीर्षाखालील निधी वितरीत होऊ शकला नाही. परिणामी वर्षअखेरीस निधी समर्पित करणे भाग पडले.

सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये ठेव अंशदान स्वरुपात निधी वर्ग करण्यास उपभोक्ताविभागाने अनुमती दिलेली होती. त्यानुसार नाशिक, जळंगाव, औरंगाबाद, बीड या क्षेत्रिय कार्यालयांनी खर्चाचा लेखा सादर केला होता. परंतु२०११-

१२ चा हत्यारे व संयंत्रे यांवरील खर्च महालेखापाल कार्यालयाने सन२०१२-१३ मध्ये नोंदविल्यामुळे रु.४.६६ लाख एवढा अधिक खर्च दिसून येत आहे.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशिर्ष – ४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व सांस्कृतिक कार्य यांवरील भांडवली खर्च ०२ तंत्र शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गमत योजना-इमारती १०५ अभियांत्रिकी/तंत्र महाविद्यालये व संस्था यांवरील भांडवली खर्च (००)(०२) आस्थापना खर्च			
मुळ १,२०.८७			
पुरक ---	८६.८२	८६.८३	(+) ०.०१
पुर्नर्विनियोजन - ३४.०५			

टिपा व भाष्ये :-

.०.०१ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, वरील उपशीर्षामधून मार्च२०१३ मध्ये कोणतेही कारण न देता प्रत्यर्पणाद्वारे काढण्यात आलेला रु.३४.०५ लाख निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

.०.०१ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे प्रतिक्षित आहेत. (ऑगस्ट२०१३).

५. अत्याधिक अंदाज आणि सदोष अर्थसंकल्पन दर्शवून, बचतीची अनुदान बंद करण्यात आल्याचे हे सलग पाचवे वर्ष आहे. मागील वर्षामध्ये झालेली बचत खाली देण्यात आली आहे.

वर्ष	**एकूण तरतूद**	**खर्च (रु.लाखात)**	**बचत**
२००८-०९	४,७४,८१.४६	४,२९,४३.५५	४५,३७.९१
२००९-१०	६,५२,०८.५२	४,७०,६३.२९	१,८१,४५.२३
२०१०-११	६,७८,८६.४५	४,७०,५३.१४	२,०८,३३.१३
२०१२-१३	१०,६६,१४.६३	७,४१,१७.७४	३,२४,९६.८९

मार्च २०१३ मध्ये पुनर्विनियोतनांतर्गत रु३५.७५ लाख इतका निधी परत करण्यात आला. अत्याधिक अंदाज सदोष अर्थसंकल्पन दर्शवून बचतीसह विनीयोजन बंद केल्याचे हे सलग चौथे वर्ष आहे.

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२१९ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशिर्ष– ४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व सांस्कृतिक कार्य यांवरील भांडवली खर्च,०२ तंत्र शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गमत योजनइमारती, १०५ अभियांत्रिकी/तंत्र महाविद्यालये व संस्था यांवरील भांडवली खर्च,(००)(०२) आस्थापना खर्च (४२०२०७११) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण .८६.८२ लाख (रुपये शाऐंशी लाख ब्याऐंशीहजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च एकूण अनुदाना एवढाच झाला असल्याने बचत / अधिक खर्च दर्शविण्यात आलेला नाही. सदर विनियोजन लेख्यात दर्शविण्यात आलेला नाही. सदर विनियोजन लेख्यात दर्शविण्यात आलेला रु.०.०१ लाख एवढा अधिक खर्च अत्यल्प आहे.

सन २०११-१२ या वित्तीय वर्षामध्ये लेखाशीर्ष ४२०२०७०२ खाली प्रमुख बांधकामाच्या प्रमाणात आस्थापना खर्चासाठी १३.९० टक्के रु.८६.८२ लाख इतक्या अनुदानाची आवश्यकता असल्याने, उर्वरित रु.३४.०५ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च प्रधानशिर्ष – ४०५९ सार्वजनिक बांधकामांवरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती १०५ बांधकाम (०२) राज्यपाल (भारित)(योजनांतर्गत) (०२)(०१) प्रमुख बांधकामे			
मुळ १,५५.४१			
पुरक २,८५.३९	४,०९.७१	४,०९.७१	---
पुर्नर्विनियोजन - ३१.०९			

टिपा व भाष्ये :-

कोणतेही कारण न देता मार्च २०१३ मध्ये वरील उपशीर्षामधून रु.३१.०९ लाख एवढा निधी परत करण्यात आला.

अत्याधिक अंदाज न सदोष अर्थसंकल्पन दर्शवून बचतीसहित विनियोजन बंद करण्यात आल्याचे हे लागोपाठचे चौथे वर्ष आहे. मागील वर्षात झालेल्या बचती खाली देण्यात आल्या आहेत :

वर्ष	एकूण तरतूद	खर्च (रु.लाखात)	बचत
२००९-१०	५,३९.२९	३,६८.०१	१,७१.२८
२०१०-११	४,००.०४	३,४८.७३	५१.३१
२०१२-१३	४,३०.०१	३,६५.५०	६४.५१

ज्ञापन :-

महालेखापांलानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२१९ वर दर्शविलेली स्थिती मागणी क्र. एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारती यांवरील भांडवली खर्च, प्रधानशिर्ष– ४०५९ सार्वजनिक बांधकामांवरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, १०५ बांधकाम, (०२) राज्यपाल (भारित)(योजनांतर्गत), (०२)(०१) प्रमुख बांधकामे (४०५९०६४५) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण .४,०९.७१ लाख (रुपये चार कोटी नऊ लाख एकाहत्तर हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशीर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.४,०९.७१ लाख (रुपये चार कोटी नऊ लाख एकाहत्तर हजार फक्त) झाला. प्रत्यक्ष खर्च एकूण अनुदाना एवढाच झाला असल्याने बचत / अधिक खर्च दर्शविण्यात आलेला नाही.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये लेखाशीर्षाखाली रु.४०९.७१ लाख एवढेच अनुदान अर्थसंकलप वितरणप्रणाली उपलब्ध झाले होते. त्यामुळे उर्वरित अप्राप्त रु.३१.०९ लाख एवढे अनुदान समर्पित करण्यात आले.

एच-९-प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च

. हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक-एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यांवरील भांडवली खर्च (सर्व दत्तमत) **प्रधानशीर्ष-४२०२, शिक्षण, क्रिडा, कला व सांस्कृतिक कार्य यांवरील भांडवली खर्च,४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनकि आरोग्य यांवरील भांडवली खर्च, ४२५० इतर सामाजिक व सामुहिक सेवांवरील भांडवली खर्च,** **५०५४ मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च** **दत्तमत**			
मुळ १,४५,११.००			
पुरक ५७,४२,९९	२,०२,५३,९९	१,४४,२३,२९	(-) ५८,३०,७०
पुर्नर्विनियोजन ---			
वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च २०१३)			५८,११,९७

टिपा व भाष्ये :-

अनुदानाखाली झालेला रु.१,४४,२३.२९ लाख इतका प्रत्यक्ष खर्च हा .१,४५,११.०० लाख इतक्या मूळ तरतुदी इतकाही झाला नाही, रु.५७,४२.९९ लाखाचा (जुलै २०१२ मध्ये रु.५६,२७.९९ लाख आणि डिसेंबर २०१२ मध्ये .१,१५.०० लाख) इतकी पूरक तरतूद अत्याधिक असलयाचे सिध्द झाले.

अनुदानातील रु.५८,३०.७० लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, रु.५८,११.९७ लाख इतका परत करण्यात आलेला निधी अपूरा असलयाने सिध्द झाले. बचतीसह अनुदान बंद करण्यात आले हे लागोपाठचे सहावे वर्ष आहे.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. महालेखाकांरानी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२२१ वर दर्शविलेली स्थिती मागणी

क्र.एच-९, प्रादेशिक असमतोल दूर करण्यांवरील भांडवली खर्च,४२०२, शिक्षण, क्रिडा, कला व सांस्कृतिक कार्य यांवरील भांडवली खर्च, ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनकि आरोग्य यांवरील भांडवली खर्च,४२५० इतर सामाजिक व सामुहिक सेवांवरील भांडवली खर्च,५०५४ मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्चसंबधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये मागणी क्र. एच-९ अंतर्गत एकूण रु.२,०२,५३.९९ लाख (रुपये दोनशे दोन कोटी त्रेपन्न लाख नव्याण्णव हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद उपलब्ध होती. त्या तुलनेत प्रत्यक्ष खर्च रु१,४४,२३.२९ लाख (रुपये एकशे चव्वेचाळीस कोटी तेवीस लाख एकोणतीस हजार फक्त) दर्शविण्यात आला आहे. परिणामी रु.५८,३०.७० लाख (रुपये अठ्ठावन्न कोटी तीस लाख सत्तर हजार फक्त) बचत झाल्याचे दिसून येते.

वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम विचारात घेता, प्रत्यक्षात रु.१८.७३ लाख (रुपये अठरा लाख त्र्याहत्तर हजार फक्त) (रु.५८.३०.७० लाख – . ५८,११.९७ लाख) इतकी बचत झाली असून ती मागणी क्र.एच-९ मधील एकत्रित बचत आहे. गौणशिर्षनिहाय स्पष्टीकरणे पृष्ठ ते वर स्वतंत्रपणे ठेवण्यात आली आहेत.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च **प्रधानशीर्ष-४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च** **०४ सार्वजनकि आरोग्य** **२०० इतर कार्यक्रम** **पंचवार्षिक योजनांतर्गत योजना** **राज्य योजनांतर्गत योजना** **प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी योजना इमारती** **(००)(०१) प्रमुख बांधकामे**			
मुळ ७८,२६.०८			
पुरक ४९,९३.९०	८७,६७.७८	८७,६७.३९	(-) ०.३९
पुर्नर्विनियोजन (-) ४०,५२.२०			

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२२२ वर दर्शविलेली स्थिती मागणी . एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

यांवरील भांडवली खर्च, ०४ सार्वजनकि आरोग्य, २०० इतर कार्यक्रम पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी योजना इमारती,(००)(०१) प्रमुख बांधकामे(४२१००१४१) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.८७,६७.७८ लाख (रुपये सत्याऐंशी कोटी सदुसष्ट लाख अठ्ठयाहत्तर हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु८७,६७.३९ लाख (रुपये सत्त्याऐंशी कोटी सदुसष्ट लाख एकोणचाहीस हजार फक्त) झाला. परिणामी रु.०.३९ लाख (रुपये एकोणचाळीस हजार फक्त) लाख एवढी बचत दर्शविण्यात आलेली आहे. सदर रु.०.३९ लाख एवढी बचत अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, औरंगाबाद यांची असून एकूण अनुदानाच्या तुलनेत अत्यल्प आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात नविन बाब, जुले व डिसेंबर २०१२ पुरवणी मागणीद्वारे रु.६३६८.९० लाख एवढी तरतूद करण्यात आली होती. सदर तरतूदीतून कामे नव्याने अर्थसंकल्पात समाविष्ट झाली असल्याने विहित कार्यपध्दती अवलंबून संपूर्ण तरतूदी खर्च करणे शक्य झाले नाही. परिणामी रू०५२.२० लाख एवढी तरतूद समर्पित करणे भाग पडले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च **प्रधानशीर्ष-४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च** **०४ सार्वजनिक आरोग्य** **२०० इतर कार्यक्रम** **पंचवार्षिक योजनांतर्गत योजना** **राज्य योजनांतर्गत योजना** **प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी योजना इमारती** **(००)(०२) आस्थापना खर्च**			
मुळ १०,८७.८२ पुरक ६,९४.१५ पुर्नर्विनियोजन (-) ५,६३.२५	१२,१८.७२	१२,०९.९९	(-) ८.७३

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२२२ वर दर्शविलेली स्थिती मागणी

. एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष-४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च, ०४ सार्वजनकि आरोग्य, २०० इतर कार्यक्रम पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी योजना इमारती,(००)(०२) आस्थापना खर्च (४२१००१५९) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.१२,१८.७२ लाख (रुपये बारा कोटी अठरा लाख बाहत्तर हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.१२,०९.९९ लाख (रुपये बारा कोटी नऊ लाख नव्याण्णव हजार फक्त) झाला. परिणामी रु.८.७३ लाख (रुपये आठ लाख त्र्याहत्तर हजार फक्त) लाख एवढी बचत दर्शविण्यात आलेली आहे.

अधीक्षक अभियता, सा.बां.मंडळ, सोलापूर, उस्मानाबाद, नांदेड व अमरावती यांचेकडील आस्थापना खर्चाची कमी नोंद महालेखापाल कार्यालयाकडे झाल्याने रु.८.७३ लाख एवढी बचत दिसून येत आहे.

सन १०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये लेखाशिर्ष ४२१००१४१ खालील प्रमुख बांधकामाच्या तरतूदीच्या १३.९० टक्के रु.१२१८.७२ लाख इतक्या अनुदानाची आस्थापना खर्चासाठी आवश्यक असल्याने उर्वरित रु.५६३.२५ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च			
प्रधानशीर्ष-४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च			
०४ सार्वजनकि आरोग्य			
२०० इतर कार्यक्रम			
पंचवार्षिक योजनांतर्गत योजना			
राज्य योजनांतर्गत योजना			
प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी योजना इमारती			
(००)(०३) हत्यारे व संयंत्रे यांवरील खर्च			
मुळ ८६.१०			
पुरक ५४.९४			
पुर्नर्विनियोजन (-) ४४.५९	९६.४५	९५.९७	(-) ०.४८

टिपा व भाष्ये :-

वरील उपशीर्षाखालील रु.९.६० लाख इतकी अंतिम बचत लखात घेता, कोणतीही कारणे न देता मार्च २०१३ मध्ये परत केलेला रु.४६,६०.०४ लाख एवढा निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले.

.९.६० लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत.(ऑगस्ट २०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२२२ वर दर्शविलेली स्थिती मागणी . एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च, ०४ सार्वजनकि आरोग्य, २०० इतर कार्यक्रम पंचवार्षिक योजनांतर्गत योजना राज्य योजनांतर्गत योजना प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी योजना इमारती, (००)(०३) हत्यारे व संयंत्रे (४२१००१६८) यावरील खर्च संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.९६.४५ लाख (रुपये शहाण्णव लाख पंचेचाळीस हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.९५.९७ लाख (रुपये पंचाण्णव लाख सत्त्याण्णव हजार फक्त) झाला. परिणामी रु.०.४८ लाख (रुपये अठ्ठेचाळीस फक्त) लाख एवढी बचत दर्शविण्यात आलेली आहे. अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, योलापूर, औरंगाबाद व नांदेड यांचेकडील हत्यारे व संयंत्रे यावरील खर्चाची कमी नोंद महालेखापाल कार्यालयाकडे झाल्याने रु.०.४८ लाख एवढी बचत दिसून येत आहे.

सन १०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये लेखाशिर्ष ४२१००१४१ खालील प्रमुख बांधकामाच्या तरतूदीच्या१.१० टक्के .९६.४५ लाख इतक्या अनुदानाची हत्यारे व संयंत्रे यावरील खर्चासाठी आवश्यक असल्याने उर्वरित रू४.५९ लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च **प्रधानशीर्ष-४२०२, शिक्षण, क्रीडा, कला व सांस्कृतिक कार्य यांवरील भांडवली खर्च** **०२ तंत्र शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना** **इमारती राज्य योजनांतर्गत योजना** **१०३ तंत्रशाळा** **(००)(०४) मोठी बांधकामे** मुळ ३७,५१.३० पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) ७,५२.५४	२९,९८.७६	२९,९८.७४	(-) ०.०२

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२२३ वर दर्शविलेली स्थिती मागणी . एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष४२०२, शिक्षण, क्रीडा, कला व सांस्कृतिक कार्य यांवरील भांडवली खर्च,०२ तंत्र शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, इमारती राज्य योजनांतर्गत योजना १०३ तंत्रशाळा,(००)(०४) मोठी बांधकामे(४२०२०३२८) मागणी संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.२९,९८.७६ लाख (रुपये एकोणतीस कोटी अठ्ठयाण्णव लाख शाहत्तर हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.२९,९८.७४ लाख (रुपये एकोणतीस कोटी अठ्ठयाण्णव लाख चौऱ्याहत्तर हजार फक्त) झाला. परिणामी .०.०२ लाख एवढी बचत दर्शविण्यात आलेली असून सदर बचत अत्यल्प आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये या लेखाशिर्षाखाली रु.३७५१.३० लाख एवढी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली होती. तर रु.३०००.८५ लाख एवढी तरतूद खर्चासाठी उपलब्ध झाली होती. त्यामुळे रु७५०.४५ लाख एवढी तरतूदी अप्राप्त होती. प्राप्त तरतूदीपैकी अधीक्षक अभियता, रायगड सा.बां.मंडळ, नवी मुंबई यांनी दिनांक३०.३.२०१५ रोजी रु.२.०९ लाख एवढी तरतूद समर्पित केली त्यामुळे एकूण रु७५२.५४ लाख (रु. ७५०.४५ + . २.०९ लाख) एवढी तरतूद समर्पित करण्यात आली.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च **प्रधानशीर्ष-४२५०, इतर सामाजिक व सामूहिक सेवांवरील भांडवली खर्च** **२०१ कामगार शिल्प कारागीर प्रशिक्षण इमारती** **पंचवार्षिक योजनांतर्गत योजना** **राज्य योजनांतर्गत योजना** **प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी योजना-इमारती** **(००)(०५) आस्थापना खर्च**			
मुळ १,४४.६८ पुरक --- पुर्नर्विनियोजन (-) ३४.६३	१,१०.०५	१,०१.६२	(-) ८.४३

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२२३ वर दर्शविलेली स्थिती मागणी . एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष४२५०, इतर सामाजिक व सामूहिक सेवांवरील भांडवली खर्च, २०१ कामगार शिल्प कारागीर प्रशिक्षण इमारती, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी योजनाइमारती, (००)(०५) आस्थापना खर्च (४२५००१२३) संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.१,१०.०५ लाख (रुपये एक कोटी दहा लाख पाच हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.१,०१.६२ लाख (रुपये एक कोटी एक लाख बासष्ट हजार फक्त) झाला. परिणामी रु.८.४३ लाख (रुपये आठ लाख त्रेचाळीस हजार) एवढी बचत दर्शविण्यात आलेली आहे.

अधीक्षक अभियता, सा.बां.मंडळ, ठाणे यांनी आस्थापना खर्चाची नोंद महालेखापाल कार्यालयाकडे केली नसल्याने, तसेच अधीक्षक अभियंता, विशेष प्रकल्प मंडळ, वरळी मुंबई यांनी आस्थापना खर्चाची कमी नोंद केल्यामुळे एकूण रु८.४३ लाख एवढी बचत झाली.

लेखाशिर्ष ४२५००११४ खालील प्रमुख बांधकामाच्या तरतूदीच्या १३.९० टक्के रु.११०.०५ लाख इतक्या अनुदानाची आवश्यक असल्याने, उर्वरित रु.३४.४३ लाख एवढे अनुदान समर्पित करण्यात आले.

. लाखांत)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
अनुदान क्रमांक एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च **प्रधानशीर्ष-४२०२, शिक्षण, क्रिडा, कला व सांस्कृतिक कार्य यांवरील भांडवली खर्च** **०२ तंत्र शिक्षण** **पंचवार्षिक योजनांतर्गत योजना** **राज्य योजनांतर्गत योजना** **१०३ तंत्रशाळा** **(००)(०५) आस्थापना खर्च**			
मुळ ५,२१.४३			
पुरक ---	४,१६.८३	४,१६.८३	---
पुर्नर्विनियोजन (-) १,०४.६०			

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भातसार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. महालेखापालांनी विनियोजन लेखा २०१२-१३ ची पृ.२२३ वर दर्शविलेली स्थिती मागणी . एच-९ प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च, प्रधानशीर्ष४२०२, शिक्षण, क्रिडा, कला व सांस्कृतिक कार्य यांवरील भांडवली खर्च, ०२ तंत्र शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना,राज्य योजनांतर्गत योजना, १०३ तंत्रशाळा, (००)(०५) आस्थापना खर्च संबंधी आहे.

सन २०१२-१३ मध्ये एकूण रु.४,१६.८३ लाख (रुपये चार कोटी सोळा लाख त्याऐंशी हजार फक्त) एवढी तरतूद या लेखाशिर्षाखाली उपलब्ध झाली होती. त्या तूलनेत खर्च रु.१,४,१६.८३ लाख (रुपये चार कोटी सोळा लाख त्याऐंशी हजार फक्त) झाला. प्रत्यक्ष खर्च एकूण अनुदानाएवढाच झाला असल्याने बचत/अधिक खर्च दर्शविण्यात आलेला नाही.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये या लेखाशीर्षाखाली ४२०२०३२८ खालील प्रमुख बांधकामाच्या प्रमाणात तरतूदीच्या १३.९० टक्के रु.४१६.८३ लाख इतक्या अनुदानाची आस्थापना खर्चासाठी आवश्यकता असल्याने उर्वरित .१०४.६० लाख एवढे अनुदान समर्पित करणे भाग पडले.

साक्ष :-

3.2 उपरोक्त अनुदानासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक१३ ऑक्टोबर व २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी प्रधान सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

एच-३ गृहनिर्माण

उपरोक्त शिर्षाअंतर्गत यामध्ये ३,५३,९२,४६३ रुपये इतका अधिकचा खर्च दाखविण्यात आलेला आहे, त्यापैकी ४६,८८,००० रुपये परत केलेले आहेत. यामध्ये कॉस्टींग योग्य पध्दतीने केलेले दिसून येत नाही. याबाबत स्पष्ट करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, आंतरलेखा समायोजनाची महालेखाकार आणि विभाग यांची पध्दत यांची सांगड घालून हिशोबाची गणना केली पाहिजे याकरिता योग्य ती मान्यता घेणे आवश्यक आहे.

या तफावतीकरिता महालेखाकार आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी एकमेकांसोबत बसूनबदल (मॉडिफिकेशन) आणि सुधारणा (अपग्रेडेशन) करणे आवश्यक आहे, जेणेकरुन एकूण हिशेबामध्ये तफावत येणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आंतरलेखा समायोजनाच्या पध्दतीमुळे प्रतीवर्षी हिशोबात तफावत दिसून येत आहे. काही वर्षांमध्ये हा हिशेब एक्सेस दाखविण्यात आलेला आहे. तर काही वर्षांमध्ये हा हिशोब मायनसमध्ये दाखविण्यात आलेला आहे. वित्त विभाग आणि एजी यांची अकाऊंटिंगची पध्दत वेगवेगळी असून याचे रिकन्सिलिएशन करुन योग्य तो निर्णय घेण्यात येणार आहे. नॉर्मली वन पर्सेंट फरक अलाऊ केला जातो आणि टू पर्सेंट कपात दाखविली जाते. महालेखाकार यांची पध्दत आणि वित्त विभागाच्या विभिन्न पध्दतीमुळे अनेक विभागांच्या हिशेबामध्ये तफावत दिसून येते. काही ठिकाणी एक करोड रुपये जास्त खर्च झालेला दिसून येतो, कुठेतरी एक करोड रुपये कमी खर्च झालेला दिसून येत आहे. प्रत्येक निविदा प्रक्रियेंतर्गत कॉंटिन्जन्सी फंड असतो, तो कधी वापरला जातो का ? कॉंटिन्जन्सी फंड वापरण्याकरिता कोणकोणत्या कारणांची आवश्यकता आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ४००० कोटी रुपयांचे बजेट असेल तर त्याकरिता १०० कोटी रुपये कॉंटिन्जन्सी फंडच्या स्वरुपात ठेवलेला असतो. एखादया वेळी कामांकरिता मजूरांची संख्या किंवा कच्च्या मालाचे भाव कमी जास्त असेल तर या संदर्भात किंमतीमध्ये फरक पडतो. दिनांक ३१ मार्च पर्यंत हा फंड जर वापरला गेला नाही तर तोही परत करावा लागतो. काही वेळा हा फंड डिपॉजिट बेसिसवर देखील प्रदान केलेला असतो. एखादया योजनेकरिता विहित केलेला निधी हा ८० टक्के प्रदान करण्यात येतो व त्यापैकी २० टक्के निधीला कट लावला जातो. तसेच, या अकाऊंटिंग सिस्टममध्येही कॉम्प्लिकेशन्स असल्यामुळे हे होत असते. काही वेळा एखादया वर्षी बजेटिंग करण्यात आलेला निधी त्या कामाकरिता पुरत नाही, त्या कामांच्या पुर्ततेकरिता पुढील वर्षीच्या बजेटमधील निधीची वाट पाहण्यात येते. लोकलेखा समितीच्या सूचना व इतर समस्या यामुळे वित्त विभाग आणि महालेखाकार यांच्या अकाऊंटिंग सिस्टममधील फरक विभागाकडून वर्कआऊट करुन त्यामधील तफावत लवकरच काढून टाकण्यात येईल. सन २०१२-२०१३ मधील तफावतीच्या

रकमेबाबतची विभागाची चूक विभागाला मान्य असून यावर वर्कआऊट करुन ही तफावत दूर करण्यात येईल. समायोजित रकमांचेही रिकन्सीलिएशन करण्यात येईल असे समितीस विभागीय सचिवांनी अश्वस्त केले.

एच-४ सेक्रेटरीएट व इतर आर्थिक सेवा

उपरोक्त लेखाशिर्षाअंतर्गत या योजनेंतर्गत ९,७३,६१,००० रुपये आर्थिक वर्षाच्या शेवटी सरेंडर करण्यात आलेले आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की,यामध्ये अनेक पदे रिक्त आहेत, त्यामुळेही काही रक्कम प्रत्यार्पित करावी लागलेली आहे, रिक्त पदांकरिता असलेला निधी पदे रिक्त असल्यामुळे सेव्हींगमध्ये गेलेला आहे. संचालक, उदयाने व उपवने यांच्याकडे पदे आणि संकल्पचित्र मंडळात असलेली पदेही रिक्त्त आहेत. या सर्व रिक्त पदांचा आढावा घेतला तर ९९ पदे विभागाची रिक्त आहेत. संचालक, उदयाने यांची ३६ पदे रिक्त आहेत. संकल्प चित्र मंडळ यांची४ पदे रिक्त आहेत.

याअनुषंगाने समितीने सूचित केले की,कमीत कमी डिसेंबरमध्ये याचा फेर आढावा घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात पुर्ननियोजन करणे आवश्यक आहे. योजनेतर खर्च ब्लॉक करण्यात काहीही अर्थ नाही. काही बाबींसंदर्भात महालेखाकार यांना विभागाने कन्सिलिएशनबाबत पत्र पाठविलेले आहे यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, या वर्षी जी.आर.नुसार ही पदे आकृतीबंधानुसार मान्य होऊन देखील काही पदे कालानुमानाने व सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेली आहेत. वित्त विभागाचा एक जी.आर. होता की, पदे भरु नका. एका बाजूला पदांचा आकृतिबंध मान्य झाला आणि दुसऱ्या बाजूला वित्त विभागाचा जी.आर.आला की, पदे भरु नका. रि पदे आता भरा अगर भरु नका, हा समितीचा मुद्दा नाही. नोव्हेंबर महिन्यामध्ये विभागाला माहिती असते की, पदे किती रिक्त आहेत, त्याबाबतचा हिशोब दयावयाचा आहे. याबाबतचा हिशोब मार्चच्या ऐवजी डिसेंबरमध्ये करण्यात यावा. जी पदे भरलेली नाहीत, त्याकरिता नोव्हेंबरमध्येच नियोजन करता येत नाही का ? ज्यावेळी आपण मार्च मध्ये त्या पूर्ण पदांकरिता असलेला निधीची तरतूद करण्यात येते, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, डिसेंबरमध्ये रिवाईज्ड एस्टिमेट तयार होतात, जानेवारीमध्ये हे पैसे सरेंडर केले जातात. विभागाने ९,७३,००० रुपये जानेवारीमध्येच सरेंडर करुन ते वित्त विभागाकडून ॲक्सेप्ट करण्यात आलेले आहेत. अकाऊंटिंगमधून ३,९२,००० रुपयांचा फरक पडलेला आहे. मंत्रालयामध्येच ९९ पदे रिक्त आहेत.

परंतु महालेखाकारांचा मुद्दा आहे की, मागील ८ वर्षापासून सतत सेव्हींग चालू आहे. विभाग रकमेची प्रोव्हीजन करता परंतु पदे भरत नाहीत. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सुधारित आकृतीबंधाप्रमाणे नॉर्मली वेतनाची मागणी करण्यात येते. त्यामुळे वर्षाच्या सुरुवातीस कार्यात्मक अंदाजपत्रक तयार करताना विभागास ती माहिती द्यावी लागते. जी पदे रिक्त आहेत, ती भरावयास परवानगी मिळणार असेल तर त्याची रक्कम मागायची नाही काय. पदे भरण्यास पुढील वर्षी अचानक परवानगी मिळू शकते.

ही मागणी विभाग पुरवणी मागण्यांद्वारे किंवा पुनर्विनियोजनाद्वारे करु शकते. अमेंडमेंड इस्टॅब्लिशमेंट शेडयुल फायनल झाल्यावर पद भरण्याच्या सिस्टीममध्ये परवानगी घेण्याच्या सिस्टीममध्येही बदल करण्याची आवश्यकता आहे. अमेंडमेंड इस्टॅब्लशमेंट शेडयुल म्हणजे सुधारित आकृतीबंधामध्ये लोकसंख्या, वाढते

शहरीकरण, वाढता विकास, वाढते इन्स्ट्रास्ट्रक्चर पाहून ही पदे निर्माण केली जातात. हे सर्व चालवायचे असेल, या सर्वांवर शासनाचे किंवा कोणाचे मॉनीटरींग ठेवायचे असेल तर त्यासंबंधी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. असे समितीने सूचित केले.

एक वर्षाच्या कालावधीमध्ये अमेंडमेंड इस्टॅब्लिशमेंट शेडयुलप्रमाणे नेमणूका झाल्या नाहीत तर त्याला रद्दबातल समजण्यात यावे का ? याकरिता किमान कोणाला तरी जबाबदार धरले पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले. तथापि समितीने च्यक्त केलेले उपरोक्त मताला विभागीय सचिवांकडून होकार आले का वा नाकार असे पण उत्तर प्राप्त झाले नाही.

पदसंख्येप्रमाणे विभागास प्रोव्हीजन करावी लागते. समितीचा मुद्दा असा आहे की, विभागाला वर्षातून होणाऱ्या तीन अधिवेशनात पुरवणी मागण्या सादर करता येतात. विभागाला मागितल्याप्रमाणे वेतनाकरिता कधीही खर्च मिळू शकतो. ही बाब समितीच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा नॉन प्लॅनचा खर्च आहे. नॉन प्लॅन खर्चाची तरतूद ही पहिल्यांदाच होत असते. एमपीएससीमार्फत पद भरती होते. एमपीएससीला दोन वर्षापूर्वी पदांची रिक्वॉयरमेंट दिलेली असते. अचानक सर्व पदांची रिक्रुटमेंट करावयाची म्हटले तर त्यांची रिक्रुटमेंट व ट्रेनिंगकरिता या तरतुदी विभागाला कराव्या लागतात. विभागाकडून त्याबाबत मागणी करण्यात येते. डिसेंबरच्या रिवाईज एस्टीमेट शेडयुलमध्ये त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते. डिसेंबरमध्ये होणाऱ्या अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये ही रक्कम सरेंडर झाली पाहिजे. त्यामुळे ही रक्कम दुसरीकडे कोठे तरी आपणास वापरता येईल. अर्थसंकल्प सादर करताना प्लॅन व नॉन प्लॅनची घोषणा मंत्री महोदय दोन्ही सभागृहात करतात. यामध्ये विभागाला संधी आहे की, ज्या उमेदवारांची तुम्ही भरती केली असेल त्यांनी रुजू होणे, त्यांचे प्रशिक्षण होणे, त्यांचा पगार चालू होणेकरिता किमान ३ ते ६ महिने जातात. विभागाला अधिकचे पैसे मागण्याकरिता तीन संधी मिळतात. ही नॉन प्लॅन खर्चाची रक्कम विभागास सहज मिळू शकते. ही रक्कम बजेटमध्ये दाखविल्यामुळे फुगवून दिसते. ही रक्कम कामासाठी वापरता येत नाही. तेवढी रक्कम लोकप्रतिनिधींच्या बाकीच्या कामास वळती करु शकतात किंवा अर्थसंकल्पात रक्कम कमी दर्शविण्यात यावी ही याबाबतची सिस्टीम ॲडॉप्ट करावी असे समितीने सूचित केले ज्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

अनुदान क्रमांक एच-५ - मार्ग व पूल

प्रधानशिर्ष ३०५४, मार्ग व पूल या लेखाशिर्षाअंतर्गत विभागाने पुरवणी मागणी घेतली व एक रुपयाही खर्च केलेला नाही ही पूर्ण रक्कम सरेंडर केलेली आहे. यातील मुळ तरतुद रक्कम२८.३९ कोटी २८ लाख आहे. एकूण अनुदान किंवा विनियोजन रक्कम रुपये ३२.५६ कोटी ३३ लाख २३ हजार आहे. पण यातील मुळ तरतुर ही खर्च झालेली नाही. म्हणजे घेण्यात आलेली पुरवणी मागणी पूर्ण वाया गेलेली आहे का अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यावेळी पुरवणी मागणी रिलीज झाली नाही. कारण १३ व्या वित्त आयोगामार्फत केंद्र शासनाकडून ही रक्कम येत असते.

ही संपूर्ण पुरवणी मागणी केंद्र सरकारशी संबंधित आहे का? याबाबतचा ब्रेक अप कसा आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र सरकारकडून १३ व्या वित्त

आयोगाकडून रस्त्यांसाठी त्यावेळी ४०० कोटी रुपये ५ वर्षांकरिता मंजूर होणार होते. हे २०१२-२०१३ मध्ये अपेक्षीत टारगेट होते. या सर्व रकमा केंद्र सरकारकडून येणार होत्या. मुळ तरतूद २८७९.१२ लाख मिळाली होती व पूर्ण खर्च २८७९.११ लाख झालेला आहे. यामध्ये १ लाख रुपयांची बचत आहे.

अनुदान क्र.एच-५ रस्ते व पूल यातील मुळ तरतूद २८ कोटी ३९ लाख मधील काहीही रक्कम खर्च झालेली नाही. अपेक्षीत डिमांड असेल तर समितीचे काही म्हणणे नाही यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रधानशीर्ष ३०५४ योजनेतर मध्ये विभागाची मुळ तरतूद २८३९ कोटी होती. यामधील जुलै २०१५ मध्ये ४१७ कोटी रुपये मिळाले आहेत. डिसेंबरला मिळाले नाहीत. अशी एकूण ३२५६ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

एकूण ४१७ कोटीपैकी एक रुपयाही खर्च झालेला नाही. या रकमेमध्ये राज्य शासनाची काही रक्कम होती का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ३-४ लेखाशीर्ष मिळून एकत्रितपणे केंद्र सरकारची ही रक्कम होती. ४१७ कोटी रक्कम त्या वर्षी उपलब्ध झालेली नाही. केंद्र सरकारकडून जेवढे पैसे मिळाले तेवढे बजेट होऊन खर्च झाले आहेत. समितीने सांगितलेली बाब वित्त विभागाने कट म्हणून लावलेली आहे. सिमीत अनुदानाइतका विभागाचा खर्च झालेला आहे.

निधी वितरीत झाला नाही हा वेगळा मुद्दा आहे, सरेंडर झाले नाही हा वेगळा मुद्दा आहे. येथे समितीने लक्ष वेधले असे विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाने कट लावला असे म्हणत नसून तर समर्पित केले आहे असेच विभागाचे म्हणने आहे.

हा प्रश्न वारंवार येत असतो. दाखविण्यात आलेली रक्कम रिलीज झालेली नाही पण पेपरवर दर्शविण्यात आलेली नाही. ते समर्पित केले आहे असेच दाखवावे लागेल. त्यामुळे विभागाने समर्पित असा शब्दप्रयोग दाखवावा. समितीच्या मते सप्लीमेंटरीच्या पैशाला कधीही कट लावत नाही. मुळ तरतुदीमध्ये कट लावला जातो. असे मत समितीने व्यक्त केले असा विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रकरणामध्ये अयोग्य असे काहीही घडलेले नाही. समितीच्या बैठकीस वित्त विभागाचे सचिव देखिल उपस्थित आहे. त्यामुळे समितीस आवश्यकता वाटत असेल तर वित्त विभागाच्या सचिवांचे मत विचारावे.

जर २० टक्के कट असेल तर २० टक्के कट करावा. पण यामध्ये १५ टक्के कट दिसत आहे. विभागास पुनर्विनियोजनामध्ये ४१७ कोटी रुपये मिळाले आहेत असे दिसते पण ते प्रत्यक्षात एक रुपयाही मिळाला नाही. विभागाकडून समर्पित केले आहेत असा शब्दप्रयोग का वापरण्यात येतो. विभागाने ही रक्कम समर्पित का केली आहे याचा रिप्लाय महालेखाकारांकडे आहे. अधिकाऱ्यांनी समितीला जबाबदारीने उत्तर द्यावे अशी समितीची अपेक्षा आहे. विभागाने महालेखाकांर यांनादिनांक ३० मार्च २०१३ रोजी उत्तर दिलेले आहे. २०१२-२०१३ या वर्षापासून जिल्हा परिषदांकडे जिल्हा व इतर मार्ग तसेच ग्रामीण मार्ग हस्तांतरीत झाल्याने अनुक्रमांक१ व २ येथील लेखाशीर्षाखाली दाखल न झालेली तरतूद समर्पित करण्यात येत आहे. विभागाकडून वित्त विभागास, महालेखाकारांना व समितीला वेगवेगळी माहिती देत आहे. याचे समितीला आश्चर्य वाटत आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागानेही रक्कम कारणे देऊन समर्पित केलेली आहे.

विभागाने ही रक्कम समर्पित का केली आहे. विभागाकडून सांगण्यात येते की, ही रक्कम त्यांना मिळाली

नाही. पण विभागाला ही रक्कम मिळाली नसताना ही रक्कम समर्पित केली गेली आहे असे विभागाचे पत्र आहे. हे विभागाचे पत्र या रकमेसंबंधीच आहे का हे सुध्दा पुन्हा एकदा तपासून पहावे.ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,सदरील पत्र हे दिनांक ३०.३.२०१३ चे आहे. यामध्ये विभागाकडे जेवढी रक्कम उपलब्ध झालेली आहे. त्यामध्ये जिल्हा परिषद ग्रामीण मार्ग व इतर रस्ते हस्तांतरीत झाल्यामुळे त्या लेखाशीर्षाखाली नामदाखल ठेवलेली रक्कम समर्पित करण्यात येत आहे असे पत्रात लिहिले आहे. नामदाखल ठेवलेली रक्कम फक्त एक हजार रुपये आहे. जिल्हा परिषदांना देण्यात येणारे अनुदान फक्त एक हजार रुपये आहे.

लेखाशिर्ष सुरु (हेड ओपन) करण्याकरिता देण्यात आलेली ही टोकन रक्कम आहे का अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,चर्चा परिषदामध्ये सहभाग यामध्ये २.५८ कोटी रुपये, जिल्हा परिषदांना द्यावयाची रक्कम अनुदान पगार कार्यवाही १३०.५८ कोटी रुपये, रस्त्यांच्या बांधकामासाठी अनुदान ठेव हस्तांतरण, म्हणजे केंद्र सरकारकडून ही रक्कम मिळते, त्यासाठी राखीव निधी ६५ कोटी रुपयांचा आहे. पर्यवेक्षण व दुरुस्तीमध्ये २५० कोटी रुपये परत केलेले आहेत. जी पुरवणी मागणी अपेक्षीत खर्च म्हणून मंजूर करुन घेतो. ती रक्कम कधीकधी रिलीज होत नाही. रिलीज न झालेल्या पैशाला कधीही कट लागला असे म्हणत नाही. तो स्वत:हून वित्त विभागाकडे समर्पित केला आहे असे म्हणण्यात येते. विभागाकडून तसेच उत्तर दरवेळी देण्यात येते. हे सर्व त्याला अनुसरुन आहे.

विभागाकडे एक रुपयांचीही बचत नाहीत पण रक्कम सरेंडर केली आहे असे विभागाचे म्हणणे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१२-२०१३ मध्ये जे काही वित्त विभागाने कट लावले होते ती सर्व रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाने वित्त विभागाला समर्पित करण्यात आलेली आहे.

हे जे डिस्क्रीपशन दिले आहे, रक्कम सुध्दा त्याच डिस्क्रीपशनमध्ये मागितली असेल. पण ही रक्कम रिलीज झाली नाहीत. म्हणून त्याच डिस्क्रीपशनच्या फॉरमॅटमध्ये रकमा परत दिल्या असतील असा समितीचा अंदाज आहे. पण ही रक्कम विभागाकडे वर्ग झालेली नाही तर या रकमेपुढे विभागाने असे लिहिले पाहिजे की, वित्त विभागाने ही रक्कम रिलीज केलेली नाही. याबाबत वित्तीय तरतूद झाली होती, अर्थसंकल्पात घोषणाही झाली होती पण ते रिलीज झाले नाही त्यामुळे ते पैसे परत समर्पित करण्याचा प्रश्न येत नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली. असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा करतांना सांगितले की, अनुदान क्रएच-६ सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारती अंतर्गत प्रधानशिर्ष २२०३ तंत्रशिक्षण ८०० इतर खर्च इमारती स्वच्छा अनुदानामधून वित्त व्यवस्था केलेली लहान बांधकामे (००)(०१) संचालक तंत्रशिक्षण अंतर्गत मुळ तरतूद १ कोटी दिसत आहे. प्रत्यक्ष अनुदान ८० लक्ष हातामध्ये मिळाले आहे. सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षामध्ये प्रस्तुत लेखाशीर्षाखाली एकूण ८० लाख इतके अनुदान खर्चासाठी उपलब्ध झाले हाते. त्यामुळे उर्वरित २० लाख रुपये इतके अप्राप्त अनुदान समर्पित करणे भाग पडले.

विभागाने ही बाब अनुदान क्र.H-६ मध्ये दुरुस्त केली आहे. पण आता अनुदान क्र. H-५ संदर्भात समिती चर्चा करीत असताना त्यातील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असा खुलासा विभागाने केला नाही. असा

खुलासा विभागाने ज्या शिर्षाखाली प्राप्त तरतूद अप्राप्त अनुदानमुळे समर्पित केली तेथे असे अप्राप्त अनुदान समर्पित केले असे नमूद केले असते तर महालेखाकारांनी हा मुद्दा काढला नसता ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, काही झाले तरी अशा बाबी महालेखाकार पॉईं टआऊट करतात. ते सेव्हींग केले तरी व खर्च जास्त केला तरी पॉईटआऊट करतात.शासनाला तशीच ऑर्डर काढावी लागते. ही ऑर्डर दिनांक ३० मार्चला काढलेली आहे. यामध्ये म्हटले आहे की, मंजूर सुधारीत अंदाजांच्या अनुषंगाने आहे ती तरतूद ठेवण्यात येऊन उर्वीरत रक्कम प्रत्यार्पित करण्यात येत आहे.

<u>प्रधानशिर्ष ३०५४ मार्ग व पूल ८० सर्वसाधारण ०५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री (००)(०१) लेखाअंतर्गत हस्तांतरण २०५९ सार्वजनिक बांधकाम यामधून हत्यारे व सयंत्रे खर्चाचे यथाप्रमाणे हस्तांतरित</u>

या अनुदानाअंतर्गत एकूण अनुदान८,६७.८३ लक्ष रुपये होते, खर्च २,४६.६९ लक्ष रुपये झाला असून बचत ६,२१,१४ लक्ष झाली आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की,आंतरलेखा समायोजन करण्यात आले आहे. वर्षाच्या सुरुवातीला वित्त विभागाकडून फॉर्म्युला क्यु सर्व विभागांना देण्यात येतो व त्याप्रमाणे अकाऊंट फायनल केले जाते. त्यामध्ये अधिकचा खर्च किंवा कमी खर्च यांची एकत्रित रक्कम काढली जाते. तथापि, विभागाची नियम पुस्तिका आणि महालेखाकार कार्यालयाची नियम पुस्तिका म्हणजे गणना करण्याची पध्दत यामध्ये फरक आहे. या वर्षी सार्वजनिक बांधकाम विभाग त्या कार्यालयाबरोबर कोऑर्डिनेट करणार आहे. विभागाची कॅलक्युलेशनची पध्दत आणि महालेखाकांर कार्यालयाची पध्दत यामध्ये फरक आहे. लेखी खुलाशातही हे स्पष्ट केले आहे की, प्रसंगत: या उपलेखाशीर्षाखाली दर्शविण्यात आलेला खर्च काल्पनिक आहे. आस्थापना व हत्यारे व सयंत्रे यावरील खर्च प्रथमत: २०५९-सार्वजनिक बांधकाम या शीर्षाखाली नोंदविला जातो व तद्नंतर संबंधित उपलेखाशीर्षाकडे आंतरलेखा हस्तांतरण केला जातो. जेणेकरुन महसुली शीर्षाखालील कामावर झालेला प्रत्यक्ष खर्च दिसून यावा. यावर विभागाने महालेखाकार कार्यालयाबरोबर कोऑर्डिनेट करावे व पुढील कार्यवाही करावी असे समितीने सूचित केले.

महालेखाकारांचे ऑब्झर्वेशन असे आहे की, "Excess budget increases the outlay under the grant which finally affect the State budget, which needs to be reviewed by both Administrative department as well as Finance Department." विभागाने ५५९ कोटी रुपयांची सेव्हिंग केली आहे व ती रक्कम सरेंडर केली आहे. त्यामुळे एक्सेस बजेट आऊटले दिसतो आणि तो बजेटला ॲफेक्ट करतो. याबाबतचा रिव्ह्यू वेळेवर झाला पाहिजे, ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की,महालेखाकार कार्यालयाचे म्हणणे बरोबर आहे. परंतु, विभागाचे धोरण असे आहे की, मागील वर्षीच्या प्लॅनमध्ये १५ ते २० टक्के वाढ करुन विभागाकडून नवीन प्लॅन तयार करण्यात येतो. मागील वर्षी २० टक्के कपात असेल तर १५ टक्के वाढ करण्यात येते. वर्षाच्या शेवटपर्यंत सर्व विभागांच्या निधीत कपात होते. काही वेळा शेवटच्या क्षणी असे होते की, एखादा रस्ता दुरुस्त करण्याचा निर्णय घेतला जातो व शेवटच्या क्षणी काही निधी रिलिज होतो. हे सेव्हिंग दिसते आहे ते त्यामुळे आहे. शेवटपर्यंत ही

क्लॉरिटी नसते की, किती निधी विभागाला वितरित होणार आहे. सेल्स टॅक्स डिसेंबरमध्ये मिळतो. डिसेंबरपर्यंत शासनाला हे समजत नाही की, किती पैसे या माध्यमातून मिळणार आहेत. डिसेंबरनंतर निधी मिळतो. अन्यथा, कपात लागू होते. मधल्या कालावधीत एखादा रस्ता दुरुस्त करण्याचा निर्णय घेतला किंवा इरिगेशनचे प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय घेतला गेला तर त्या विभागाला कपातीपेक्षा जास्त निधी मिळू शकतो. परंतु हे नियोजन कितीही प्रयत्न केले तरी शेवटपर्यंत होत नाही. महालेखाकार यांचे म्हणणे बरोबर आहे की, सुरुवातीला आपल्याला टॅक्समधून किती निधी मिळणार आहे हे समजले तर योग्य नियोजन करता येईल. परंतु तसे होत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

एच-६

अनुदान क्रमांक एच-६-सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारती

उक्त अनुदानाच्या परिच्छेदातून असे दिसून येते की, रिकन्सिलिएशन झालेले नाही. अनेक परिच्छेद हे रिकन्सिलिएशन न झाल्याबाबतचे आहेत. याअनुषंगाने समितीने विचारणा केली की, सन २०१२-१३ चे रिकन्सिलिएशन अद्याप झालेले नाही. खर्च मेळाचे काम तसेच चुकीच्या नोंदी दुरुस्तीचे प्रस्ताव महालेखाकारांकडे सादर न करण्याची कारणे काय आहेत ? जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे का ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की,या संदर्भात २७ अधिकारी दोषी आहेत व त्यांच्याकडून स्पष्टीकरणे व खुलासे मागविण्यात आले आहेत.

प्रधानशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम ८० सर्वसाधारण ००१ संचालक प्रशासन (३४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, यवतमाळ(०३)(०१) पर्यवेक्षक २१

यामध्ये रुपये ९७,०००/- एवढा बचत खर्च झाल्याचे दिसून येत आहे. याबाबत खूलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, येथे सांकेतिक क्रमांक चुकला आहे. हा खर्च अनावधानाने "कार्यान्वयन-२०५९२६५३" या लेखाशीर्षावर नोंदविला गेल्यामुळे ९७ हजार रुपयांची बचत दिसून येत आहे. महालेखाकार कार्यालयात जाऊन तपासून घेणे गरजेचे होते. त्यामुळे संबंधितांकडून स्पष्टीकरण मागविलेले आहे. तसेच ११.६० लक्ष रुपये समर्पित करण्यात आले आहेत. २ वर्षांपूर्वी मागविली आहेत. हा सॅलरी एक्सपेंडिचर असून तो रेक्टिफाय होतो. आता ऑनलाईन पध्दत सुरु झालेली असल्यामुळे असे पुढे घडणार नाही.

प्रधानशिर्ष २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य (०१) नागरी आरोग्य सेवा विषमचिकित्सा ८०० इतर खर्च इमारती स्वेच्छा अनुदानामधून वित्त व्यवस्था केलेली लहान बांधकामे (००)(०४) सहसंचालक आरोग्य सेवा (वैद्यकीय) मुंबई

या अंतर्गत १७ लाख २३ हजार रुपयांची बचत झालेली आहे. यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की,एमओडब्ल्यू म्हणून एक योजना सुरु झाली होती. स्वेच्छा अनुदानांमधून वित्तव्यवस्था केलेली लहान बांधकामे करण्यासाठी १ लक्ष रुपये खर्च करण्याचे अधिकार सह संचालकांना होते. एकत्रितपणे २ कोटी रुपयांची २०० कामे मंजूर झाली होती व हा निधी बीडीएसवर उपलब्ध होता. १५ मार्चला निधी उपलब्ध करुन देण्यात आला व ३१ मार्चपर्यंत खर्च करावयाचा होता. या कालावधीत अधिकाऱ्यांनी खर्च करावयास हवा होता. परंतु, तो झालेला नाही. त्यामुळे १७ लक्ष रुपयांची बचत झाली आहे.

प्रधानशिर्ष २२१७ नगरविकास ०१ राज्य भांडवल विकास ००१ संचालक व प्रशासन (००)(०१) संचालक बी.डी.डी. चाळ

या अंतर्गत सन २०१२-१३ या वित्तीय सेवानिवृत्ती/निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या सहाव्या वेतन

आयोगाच्या फरकाची देयके विलंबामुळे अधिदान व लेखा कार्यालयाने स्विकारली नाही. त्यामुळे२६ लक्ष १२ हजार रुपयांची बचत झाली. देयके वेळेवर अदा न करण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १५ मार्च नंतर ट्रेझरीमध्ये कामाचा लोड असतो. वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके व अन्य तपासणी करणे आवश्यक असलेली बिले ट्रेझरीकडून परत पाठविली जातात. अशा प्रकारे बिले न स्वीकारल्यामुळे बचत झाली आहे.

<u>प्रधानशिर्ष २४०३ पशुसंवर्धन ८०० इतर खर्च स्वेच्छा अनुदानामधून वित्त व्यवस्था केलेली लहान बांधकामे (००)(०१) आयुक्त पशुसंवर्धन</u>

या योजनेअंतर्गत २० लक्ष २ हजार रुपयांची बचत झालेली आहे. महालेखाकार यांचा आक्षेप असा आहे की, .११,१५.७० लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, इतर खर्च स्वेच्छा अनुदानांमधून वित्त व्यवस्था केलेली लहान बांधकामे याअंतर्गत ही तरतूद होती. आयुक्त पशुसंवर्धन यांना१ लक्ष रुपयांपर्यंतच्या मर्यादेत कामे करता येतात. अशा महाराष्ट्रातील विखुरलेल्या कामांसाठी २ कोटी ४० लक्ष रुपयांपैकी २ कोटी २० लक्ष रुपये खर्च झाला असून २० लक्ष रुपये अखर्चित राहिले आहेत.

पण महालेखाकार यांचा असा आक्षेप आहे की, .११,१५.७० लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे प्रतिक्षित आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांनी पशुसंवर्धन लेखाशीर्षाचे एक उदाहरण दिले आहे. अशाच प्रकारच्या सर्व विखुरलेल्या कामांची एकत्रित रक्कम महालेखाकारांनी दिलेली आहे.

हा सर्व फरक महालेखाकार कार्यालयाबरोबर बसून रिकन्साईल करुन घ्यावा. असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाला रक्कम प्रत्यार्पित करीत असतो. ती ऑर्डर घेऊन महालेखाकार कार्यालयाला दाखवून बचत कोठे व कशी झाली आहे, हे सांगणे गरजेचे आहे. यापुढे ही कार्यवाही करुन घेण्यात येईल.

हा सन २०१२-२०१३ वर्षातला विषय आहे. आता ३ वर्षे ६ महिने पूर्ण झाली आहेत. म्हणून विभागाकडून कार्यवाही करण्यात आली नाही. ही कार्यवाही विभागाला कधी करण्यात येणार आहे अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागानेवेटिंग करुन घेतले आहे. त्यामध्ये जे मुद्दे निघाले आहेत ते महिन्याभरात पूर्ण करुन घेण्यात येतील.

<u>प्रधानशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम ८०, सर्वसाधारण १९६ जिल्हापरिषदांना सहाय (००)(०२) स्थानिक क्षेत्रातील योजना, ०५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री राज्य क्षेत्र जिल्हापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने</u>

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ यांच्या इमारतीच्या दुरुस्तीकरीता कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने याअंतर्गत एकूण अनुदान२९५.२६ लाख रुपये, प्रत्यक्ष खर्च

६०.७१ लाख रुपये व शिल्लक २,३४,५५ लाख रुपये आहे. ०५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री रात्य क्षेत्र जिलहापरिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांच्या कलम १८२ अन्वये जिल्हा परिषदांना सप्रयोजन अनुदाने याअंतर्गत दिलेले स्पष्टीकरणात्मक ज्ञापनातील नमूद केलेलया उत्तराबाबत विभागाने सपष्ट करावे असे समितीने विभागास सांगितले असे विभागीय सचिवांनी सांगितले की, दोन्ही अनुदानाअंतर्गत प्राप्त झालेल्या लेखी उत्तराचे एकत्रित वाचन केले तर एका अनुदानाअंतर्गत जास्त तर दुसऱ्या अनुदानाअंतर्गत कमी असे दिसून येते.

एका अनुदानाअंतर्गत जादा खर्च व एका अनुदानाअंतर्गत कमी खर्च दिसतो. विभागाने महालेखाकार कार्यालयाना नोट ऑफ एरर वेळेवर दिलेला नाही ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी नोट ऑफ एरर वेळेवर दिला नाही ही बाब मान्य केली. तसेच विभागीय सचिवांनी असेही सांगितले की, रिव्ह्यु वमध्ये तशा सूचना दिलेल्या आहेत. सर्वांचे नोट ऑफ एरर एकत्रित करुन ते सबमीट करायचे आहे. परंतु या स्पष्टीकरणातून निदर्शनास येईल की, यामध्ये दिरंगाई किंवा तफावत झालेली नाही.

<u>प्रधानशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम ८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (१५) अधिक्षक अभियंता (सा.बां.) मंडळ पुणे(१५)(०२) कार्यान्वयन अंतर्गत</u>

या अनुदानाअंतर्गत अधीक्षक अभियंता, पुणे यांच्या कार्यालयाकडून एक्सेस एक्सपेंडिचर झाल्याचे दिसून येत आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पुणे कार्यालयाला वेतन व भत्त्यासाठी ६५ कोटी ६१ लक्ष रुपये उपलब्ध झाले होते. त्यांनी डिसेंबर महिन्यात ९ कोटी १७ लक्ष रुपये शासनाकडे प्रत्यार्पित केले आहेत. ॲन्टीसिपेशनप्रमाणे सरेंडर केले आहेत. त्याप्रमाणे बिले सबमिट व्हावयास हवी होती. परंतु, पूर्वीप्रमाणे बिले सबमिट झाली व ट्रेझरीकडून ती पास झाली. याबाबत संबंधितांकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. तसेच येथून पुढे काळजी घेत आहोतअसे देखिल विभागीय सचिवांनी अश्वस्त केले.

<u>प्रधानशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम ८०, सर्वसाधारण ७९९ निलंबन (००)(०३) संकीर्ण सार्वजनिक बांधकाम अग्रिमे</u>

याअंतर्गत विभागाकडे काही प्रोव्हीजनच नाही. असे असताना विभागाने २१.४० लाख रुपये खर्च करण्याचे काय कारण आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हे सस्पेन्स अकाऊंट आहे. त्यामध्ये प्रत्यक्ष खर्च झालेला नसतो. सस्पेन्स अकाऊंटमध्ये कधी कधी डांबर विकत घेतले जाते. त्यावर झालेला खर्च हा त्या वर्षाच्या शेवटी त्या ग्रॅट्सला ॲडजस्ट करायचा असतो. आलेले २ लाख ४० हजार रुपये त्यांनी सरेंडर केले. परंतु प्रत्यक्ष टी.ओ. टाकताना किंवा खर्च करताना त्यांना२१ लाख ४० हजार रुपये पाहिजे होते. आवश्यकता होती तर त्यांनी विभागाला पैसे मागायला पाहिजे होते, परंतु त्यांनी विभागाला पैसे मागितले नाही.

पण या ठिकाणी २१.४० लाख रुपये कसे दाखविण्यात आले ? अशी विचारणा समितीने केली असता हे टी.ओ.

ॲडजस्ट केलेले असतात. निलंबन लेख्यामध्ये कागदोपत्री ॲडजस्टमेंट केली जाते. It is not actual expenditure. हा निलंबन लेखा आहे.

<u>प्रधानशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम, ०१ कार्यालयातील इमारती, ०५३ परिरक्षण व दुरुस्ती (०२) इमारतीची दुरुस्ती (०२)(०३) मत्स्यव्यवसाय इमारतीची दुरुस्ती व ८० सर्वसाधारण ००१ संचालक व प्रशासन (५८) अधिक्षक अभियंता (विद्युत) नाशिक(५८)(०२) कार्यान्वयन</u>

उक्त लेखाशिर्षाची माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, हे सुध्दा विद्युत विभागासंदर्भात दिलेल्या माहितीप्रमाणे आहे.

मत्स्यव्यवसाय इमारतीची दुरुस्ती या संदर्भाप्रमाणे झालेल्यासंगणकांत संकेतांक नमूद केलेला नसल्याने महालेखापाल कार्यालयाकडून खातेबदल नोंद घेण्यात आली नाही. याबाबत खुलासा करतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, ते अकाऊंटला ॲडजस्ट करणारच नाही. याचे कारण म्हणजे त्याच्यामध्ये तो नंबर लिहिलेला पाहिजे. ही कुठल्यातरी व्यक्तीची चूक आहे. त्यामुळे याबाबतीत त्यांनी विनंती केली आहे की, चूक क्षमापीत करावी. समितीने चूक क्षमापीत केली नाही तर विभागाला त्याबाबत ॲक्शन घ्यावी लागेल.

अशा प्रकारे मोठ्या प्रमाणात ॲडमीनीस्ट्रेटीव्ह लॅप्सेस रहाणार असेल तर ही सिस्टिम कधीच दुरुस्त होणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, गेले तीन दिवस झालेल्या बैठकीमध्ये वरिष्टाकडून आदेश दिलेले आहेत. यामध्ये ज्या चुका होत आहेत, त्याकरिता यामध्ये डीजीटलायजेशन आणून अकाऊंटींग सुधारले, तर अशा चुका रहाणार नाही. तसेच फील्डलेव्हलवर पगार काढतो. फीलॅडलेव्हलवर पगार काढतो. तालुकास्तरावर देखील अभियंते आहेत.

सन २०१५-२०१६ या वर्षामध्ये काही चुका रहाणार नाही, असे समितीला आश्वासन देऊ शकता काय ? यावर विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही.

विभागाकडे इंटरनल सिस्टिम आहे. असे असतानाही, अशा चुका होण्याची कारणे काय आहेत? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, खालील लेव्हलला कुठेतरी हेड ऑफ अकाउंट लिहिले नाही किंवा हेड ऑफ अकाउंट चुकीचे लिहिल्यावर असे होऊ शकते. यामध्ये लोकांचे समुपदेशन आवश्यक आहे व संबंधितांचे एज्युकेशनही आवश्यक आहे, तसेच जास्तीत जास्त संगणकीकरण होणे देखील आवश्यक आहे.

समुपदेशन आवश्यक आहे म्हणजेच याचा असा अर्थ निघतो की, त्याच चुका वारंवार होत आहेत. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडे ३८ हजार ५०० अधिकारी व कर्मचारी आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सेंट्रलाईज पगार काढण्याची पद्धत नाही. त्यामध्ये लेबर देखील आहेत. हे पाहिले तर यामध्ये फार काही दिरंगाई किंवा भ्रष्टाचार झालेला नाही. अकाऊंटचे प्रिन्सिपल फॉलो केलेले नाही व ती विभागाची चूक झाली असून ते विभागाला मान्य करावेच लागेल, यात शंका नाही. या जास्तीत जास्त लक्ष देऊन त्यात सुधारणा करण्यात येतील. तरी देखील असे अनावधानाने होऊ शकते, परंतु भविष्यात असे झाले तरी नोट ऑफ एरर देऊन ते रेक्टीफाय करण्याची सुधारणा किंवा संधी विभागाकडे आहे.

ही सर्व प्रोसेस करुन सुद्धा असे झाल्याचे दिसते. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय

सचिवांनी त्यास सहमती दर्शविली परंतु तसे झाल्यावर त्यांनी नोट ऑफ एरर द्यायला पाहिजे होते संबंधितांनी त्यावेळी लक्ष दिले नाही. नवीन वर्षे सुरु झाले की, नवीन वर्षाचे काम सुरु होते. पण या वर्षी अधिक चांगल्या प्रकारे लक्ष देऊ. असे देखिल समितीला अश्वस्त केले.

विभागाने कार्यवाहीसाठी काही केले तर संबंधितांकडूनम्हणजे त्यांच्याकडून चूक झाली तेसांगण्यात येते की, चूक जाणूनबुजून झाली नाही. तसेच आपण देखील असे म्हणू शकत नाही कीत्यामागे काही उद्देश होता. तसेच यात उद्देश लिहिलेला नसल्यामुळे हे साबीत होऊ शकत नाही. परंतु ती चुकच आहे.असे देखिल विभागीय सचिवांनी सांगितले.

समिती वैयक्तिक कोणाबाबत बोलत नसून महालेखाकार यांच्या रिमार्क्सबद्दलच बोलत आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ते अनावधानाने झालेले आहे व ते विभागाला मान्य करावेच लागेल. संबंधितांनी यासंदर्भात लक्ष देऊनच काम करावे अशा सूचना देण्यात येतील.

<u>अधिक्षक अभियंता (विद्युत) नाशिक(५८)(०२) कार्यान्वयन या अंतर्गत</u>

यात २६५.३९ लाख रुपयांची बचत दाखविलेली आहे. याबाबत खूलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, नाशिक येथे कार्यालय शिफ्ट झाले होते. तिकडे प्लस दिसते तर इकडे मायनस दिसते. दुसरी बाब अशी आहे की, कार्यालय कुठेही शिफ्ट झाले तरी अकाउंटंट शिफ्ट होत नाही, त्याची बदली होत नाही किंवा तो तेथे रुजू होत नाही. त्यामुळे तेथील कुठल्या तरी व्यक्तीला जबाबदारी दिली जाते आणि पगार काढल्याशिवाय ते ऑफीस चालू शकत नाही. असे देखील काही वेळा घडते. यात विभागाची चूक झालेली नाही, असे नाही. परंतु समितीला त्याबाबतची कारणे निदर्शनास आणूनदेण्यात येत आहे.

<u>प्रधानशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम ०८ सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन ५८ अधिक्षक अभियंता (विद्युत) नाशिक(५८)(०२) कार्यान्वयत व (५९) या अंतर्गत अधिक्षक अभियंता (विद्युत) अमरावती (५९)(०२) कार्यान्वत या अंतर्गत</u>

अधीक्षक अभियंता, नाशिक यांच्या कार्यालयासंदर्भात अनेक आक्षेप आहेत.त्यामध्ये असे नमूद केले आहे की, “The grant was not utilised during the year and kept idle.” २६५ लक्ष ३९ हजार रुपये निधीचा वापर त्यांनी केला नाही. तसेच अमरावती या कार्यालयाने देखील २५४ लक्ष रुपयांचा वापर केलेला नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी याबाबत स्पष्ट केले की, त्यावेळी नाशिक येथे विद्युत विभागाचे डिव्हिजन शिफ्ट झाले होते. ते पूर्वी औरंगाबाद येथे होते. नाशिक येथे त्यांना नवीन अकाऊंट हेड मिळाले. त्यामुळे नाशिक येथे सेव्हिंग दिसत असून औरंगाबाद येथे एक्सेस दिसत आहे. अधीक्षक अभियंता यांना अशा सूचना देण्यात आल्या आहेत की, हा इफेक्ट महालेखाकार कार्यालयाच्या निदर्शनास आणून द्यावा व रिकन्साईल करुन घ्यावे. त्याचप्रमाणे अमरावती येथील डिव्हिजन नागपूर येथे शिफ्ट झाले होते. त्या ठिकाणीही अशीच परिस्थिती आहे.

प्रधानशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम ८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (४३) अधिक्षक अभियंता पूणे प्रादेशिक (विद्युत) मंडळ पुणेव (४३)(०२) कार्यान्वयन व (४५) अधिक्षक अभियंता नागपूर प्रादेशिक (विद्युत) मंडळ नागपूर(४५)(०२) कार्यान्वत

उक्त लेखाशिर्षा अंतर्गत पुणे, नागपूर मध्ये एक्सेस खर्च झाल्याचे दिसत आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, डीव्हीजन्सचा पगार म्हणजेच ही रक्कम एक्झीक्युशन मधील एक्सेस आहे. पुणे व नागपूर कार्यालयाच्या चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव त्यावेळी सबमीट करायला पाहिजे होते. नोट ऑफ एरर सबमीट केले नसल्यामुळे हे झालेले आहे. पुणे प्रादेशिक (विद्युत) मंडळ पुणे यांनाप्रत्यक्षात १० कोटी ५२ लाख रुपयांची तरतूद होती, त्यातील पुनर्विनियोजनाद्वारे विभागाने १ कोटी ४१ लाख रुपये परत केलेले आहे. याबाबत त्यांनी अंदाज घ्यायला पाहिजे होता, तसेच त्यांना जास्तीचे पैसे पाहिजे होते, तर त्यांनी पुनर्विनियोजन करताना कमी रक्कम सरेंडर करणे आवश्यक होते. त्यांचा अंदाज चुकल्यामुळे एक्सेस झाल्याचे दिसत आहे. यासंदर्भात महालेखाकार यांच्याकडे मे महिन्यामध्येच नोट ऑफ एरर देणे आवश्यक होते. परंतु संबंधित अधिकाऱ्याने नोट ऑफ एरर दिले नाही.

हे पुनर्विनियोजनाबाबतचे आहे. ती रक्कम विभागाला मिळाली किंवा कसे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पैसे व्यवस्थित होते. परंतु विभागाने त्याचा हिशोब योग्य अँटीसिपेट केला नाही. यामध्ये चूक झाली तरी ३१ मार्च रोजी रेक्टीफाय करायला पाहिजे होते. ते जमले नाही तर मे महिन्यातील रिव्हाईज अकाऊंटनंतर नोट ऑफ एरर सबमीट करायला पाहिजे होते, परंतु ते केलेले नाही. नोट ऑफ एरर सबमीट केली नसल्यामुळे मुख्य अभियंता, विद्युत यांनाया प्रकरणासंबंधित जबाबदार अधिकारी कोण आहे, याची चौकशी करावी, अशा सूचना दिलेल्या आहेत. संबंधित अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल.

बीडीएसमध्ये वेतनाकरिता मायनसमध्ये पैसे काढता येतात काय ? विभागाने येथे पुनर्विनियोजीत केलेले आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, या ठिकाणी पुनर्विनियोजीत केले असले तरी ट्रेझरीमध्ये रिव्हाईज इस्टीमेटची फीगर गेलेली नसते. ती डीपार्टमेंटला दिलेली असते. ती विभागाकडे बीडीएसवर पूर्ण असते. जबाबदारीने जेवढी रक्कम सरेंडर केली, त्या लिमिटमध्ये राहून खर्च करायला पाहिजे. ही संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी असते.

त्यांनी त्या लिमिटमध्ये रहायला हवे होते. ती रक्कम बॅलेन्स असली पाहिजे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिलेपरंतु त्यांनी तसे केलेनसल्यामुळे ७४ लाख रुपये जास्तीचे काढले गेले. असे झाले तर ३१ मार्च पर्यंत विभागाकडून ऑर्डर काढून घ्यायला पाहिजे होती. परंतु त्यांनी तसेही केले नाही. तसेच जूनमध्ये महालेखाकार यांच्याकडे नोट ऑफ एरर सबमीट करणे आवश्यक होते, परंतु ते देखील केलेले नाही. यावर विभागाची सर्वात मोठी चूक अशी आहे की, ज्या ठिकाणी नोट ऑफ एरर वेळेवर देणे आवश्यक होते, ते दिलेले नाही. नोट ऑफ एरर दिले असते तर या बाबी आल्या नसत्या.

उस्मानाबाद, अमरावती अशा बऱ्याच ठिकाणी असे झालेले आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विद्युत विभागामध्ये सर्वात जास्त आहे. कारण त्यावेळी विद्युत

डीपार्टमेंटचे पुनर्नियोजन झाले आणि तसे पाहिले तर हे सर्व विषय इलेक्ट्रीकलचे आहे. विभागाकडे असलेली इन्सपॅक्टरेट ऊर्जा विभागात शिफ्ट केली. इन्सपॅक्टरेट ऊर्जा विभागात शिफ्ट केल्याने त्यांचे नागपूर, औरंगाबाद अशा शहरांमध्ये नवीन ऑफीसेस तयार केल्यामुळे असे झाले.

<u>प्रधानशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम ८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (५३)(०१) संचालक सार्वजनिक बांधकाम विभाग (योग्य)</u>

याअंतर्गत महालेखाकांराकडून प्राप्त झालेल्या वेटींग पत्रात एक्सेस एक्सपेंडीचर दाखविलेले आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पगाराविषयीचे आहे. याबाबत महालेखापालांना विभागाचे स्पष्टीकरण सादर केले होते आणि ते मान्यही झालेले आहे.

स्पष्टीकरण मान्य झाले आहे, पण आता त्याबाबत महालेखाकांराचा तो मुद्दा वेटींगमध्ये येण्याचे काय कारण आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ते परत एकदा दाखवून घेण्यात येईल असे अश्वस्त केले. या अंतर्गत जास्तीचा खर्च झाल्याचे दिसत आहे. याबाबत खूलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, हा खर्च तपासला आहे. हा खर्च सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांचा नाही. हा खर्च ठाणे, रत्नागिरी, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, परभणी आणि नाशिक या जिल्ह्यातून चुकीचे लेखाशिर्ष नोंदविले असल्यामुळे झाला होता. प्रत्यक्षात यास महालेखाकार यांनी मान्यता दिलेली आहे. महालेखाकार यांनी नोट ऑफ एररला मान्यता दिलेली आहे.

महालेखाकार यांनी मान्यता दिली आहे की, आपण नोट ऑफ एरर टाकणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यास महालेखाकार यांनी मान्यता दिली असून त्यासंदर्भातील पत्र सुध्दा आहे.

<u>प्रधानशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम ८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (५३)(०१) संचालक – सार्वजनिक बांधकाम विभाग (योग्य)</u>

या अंतर्गत जास्तीचा खर्च झाल्याचे दिसत आहे. याबाबत खूलासा करताच विभागीय सचिवांनी सांगितले की, हा खर्च तपासला आहे. हा खर्च सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय यांचा नाही. हा खर्च ठाणे, रत्नागिरी, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, परभणी आणि नाशिक या जिल्ह्यातून चुकीचे लेखाशिर्ष नोंदविले असल्यामुळे झाला होता. प्रत्यक्षात यास महालेखाकार यांनी मान्यता दिलेली आहे. महालेखाकार यांनी नोट ऑफ एररला मान्यता दिलेली आहे.

महालेखाकार यांनी मान्यता दिली आहे की, आपण नोट ऑफ एरर टाकणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यास महालेखाकार यांनी मान्यता दिली असून त्यासंदर्भातील पत्र सुध्दा आहे.

<u>प्रधानशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम ८० सर्वसाधारण ००१ संचालन व प्रशासन (४४) अधिक्षक अभियंता औरंगाबाद प्रादेशिक (विद्युत) मंडळ औरंगाबाद(४४)(०२) कार्यान्वयन अंतर्गत</u>

याबाबत खूलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की,या ठिकाणी मुख्य अभियंता, विद्युत यांच्याकडून त्यांच्या अधिनस्त अधिकाऱ्यांचे रिऑर्गनायजेशन झाले, त्यांच्याकडून नोट ऑफ एरर गेलेले नाही. नोट ऑफ एरर मंत्रालयातून गेलेली होती, परंतु त्यांच्याकडून गेलेली नाही.

नोट ऑफ एरर इतके वर्षे न देण्याची काय कारणे आहेत ? आता विभागाची साक्ष लागली म्हणून आता नोट ऑफ एरर दाखविण्यात येत आहे. परंतु पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे जरा अजून चार, पाच वर्षे साक्ष लागली नसली, तर तो पर्यंत नोट ऑफ एरर सादर केलीच नसती काय ? या डीले संदर्भात काय सिस्टिम आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, साधारणत: सर्व क्षेत्रीय अधिकारी हे आतापर्यंत फील्डचा एक्सपेंडीचर म्हणजेच वर्क्सच्या एक्सपेंडीचरकडे बारकाईने बघत नाही. तेथील नोट ऑफ एरर जनरली सबमीट होतात. आस्थापनेच्या बाबतीत होणारे दुर्लक्ष या वर्षीपासून होणार नाही. यासंदर्भातील अंदाज व्यवस्थित दिले जातील किंवा चुकून असे झाले नाही तर ३१ मार्च रोजी ते तपासून घेतले जाईल. ते देखील झाले नाही, तर मे महिन्यानर्यंत सर्व पगाराच्या नोट ऑफ एरर सबमीट करण्यात येतील.

महालेखाकार यांनी ऐच्छिक बाबीबद्दल जे ऑब्झर्वेशन काढलेले आहे, त्याबद्दल विभागाचे अभिप्रायामध्ये दिलेले नाही. परंतु त्याबद्दल बारकाईने अभ्यास करुन ज्या काही योग्य सूचना आहेत, त्या अवलंबिल्या पाहिजे जेणे करुन सिस्टिम योग्य प्रकारे चालेल व समितीचे देखील काम कमी होईल, तसेच विभागाला ते सोयीचे होईल. असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मधल्या काळात झालेल्या ऑडीटसंदर्भात नागपूर येथील महालेखाकांर कार्यालयात जाऊन यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

निलंबन व्यवहार याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, खरेदी, संग्रह, संकीर्ण सार्वजनिक बांधकामाविषयक आगाऊ रकमा, कार्यशाळा निलंबन, रोकड मेळ निलंबन लेखा या बाबी निश्चितपणे सकारात्मक दृष्टीने करण्यात येईल.

या बाबींना अतिशय गांभीर्याने हाताळण्याची आवश्यकता आहे. याचे कारण म्हणजे नॉन कंम्प्लायन, नॉन रिकन्सीलेशन, नॉन सबमिशन, नॉन नोट ऑफ एरर हे सर्व वेळेवर न दिल्यामुळे सर्व प्रश्न उपस्थित झालेले आहेत. आपण मोठ्या प्रमाणात निधी खर्च करतो. दुसऱ्या बाजूलाविभागाकडे ३४ हजार अधिकारी व कर्मचारी सेवेमध्ये आहेत. ही सर्व सिस्टिम डेव्हलप केली नाही, तर या चुका नेहमी होत रहातील. या दृष्टीने महालेखाकर यांनी केलेल्या सूचनांवर आवर्जून विचार करुन त्याचा अवलंब करण्याची गरज असून त्याबद्दल कार्यवाही करावी. तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला येत्या तीन महिन्याच्या आत सादर करावी. जेणेकरुन पुढील वेळी अशा प्रकारचा प्रश्न उद्भवणार नाही, याबाबत काळजी घ्यावी असे समितीने सूचित केले.

सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यावरील भांडवली खर्च (सर्व दत्तमन)

उपरोक्त अनुदानाअंतर्गत२२.५३.७३.२८ लाख रुपये मूळ अनुदान आहे आणि हे सुध्दा खर्च करु शकले नाही सप्लीमेंटरी डिमांडच्या माध्यमातून आणखी १.४२ कोटी ६ हजार रुपये घेतले याबाबत माहिती देतांना विभागीय सचिवांनी सांगितले की,मूळ प्रोव्हीजन २२,५३ कोटी ७३ लाख २८ हजार एवढी होती. दोन हेडमध्ये बंदरे, दीपगृहे आणि इतरत्र असे पैसे समर्पित करण्यात आले.

एकूण जी प्रोव्हीजन होती त्यात आणखी अतिरिक्त मागणी करण्यात आली. परंतु मूळतरतूदच खर्च होऊ शकली नाही तर मग सप्लीमेंटरी मागणी का करण्यात आली ? १.४२ कोटी ६ हजार रुपयांची सप्लीमेंटरी आहे. ४.२४ कोटी ८७ लाख ७९ हजार रुपये समर्पित करण्यात आलेले आहेत, म्हणजे सप्लीमेंटरी बिलाची आवश्यकताच नव्हती. हि बाब समितीने विभागाला निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यावेळेस शासनाने यात मूळ अनुदानाला २० टक्के कपात केलेली होती. ८० टक्के अनुदान उपलब्ध होते. काही प्रमाणात सप्लीमेंटरी बिल टाकणे आवश्यक होते. दुसरी बाब अशी की, केंद्र शासनाचा हिस्सा असतो आणि न्यायदानाचे लेखाशिर्ष आहेत त्यासाठी खर्च दाखविण्यासाठी आणि केंद्र शासनाकडून पैसे मिळविण्यासाठी सप्लीमेंटरी बिल टाकावे लागते.

मागच्या बैठकीच्या वेळेस असे सांगण्यात आले होते की, २२,५३ कोटी ७३ लाख २८ हजार हे आस्थापनावर आहे. असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की,सब हेडवाईज गेलो तर बऱ्यापैकी आस्थापना आणि हत्यारे व संग्रह यावर मोठ्या प्रमाणावर खर्च झालेला आहे.

प्रधानशिर्ष ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च ०१ शासकीय निवासी भरती १०६ इमारती सर्वसाधारण एकत्रित निवासव्यवस्था (००)(०१) मोठी बांधकामे

या अंतर्गत मूळ अनुदान २७ कोटी ४९ लाख ८७ हजार एवढे होते आणि ४ कोटी ४० लाख ३६ हजार एवढे अनुदान समर्पित केलेले आहेत. यात ४०५.४० लाख अनुदान अप्राप्त होते, तो कट लागलेला होता. विभागाकडून खर्च न झालेले अनुदान फक्त ३४.९६ लाख एवढेच आहे. ३४.९६ लाख अनुदान खर्च का झाले नाही याची कारणे अशी आहेत की, औरंगाबाद येथे एकूण गृहनिर्माणाची तीन कामे मंजूर होती त्यातील दोन कामे पूर्ण झालेली होती. कांचनवाडीच्या एका कामामध्ये जेवढा खर्च करु शकत होतो त्या मूळ प्राप्त अनुदानापैकी २.७५ लक्ष रुपये आमच्याकडे शिल्लक ठेवले आणि उरलेले ३४.९६ लक्ष रुपये समर्पित करण्यात आले. त्यामुळे याठिकाणी ४४० लक्ष ३६ हजार रुपये समर्पित केल्याचे दिसत आहे. ४०५.४० लक्ष रुपये मेजर कटमुळे मंत्रालयातच कट झालेले होते. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

या निमिताने समितीने सूचित केले की, कॉन्ट्रॅक्टरला दंडाच्या तरतूदीसाठी६ ते १ वर्षाची मुदत देतो ती फार कमी आहे. याठिकाणी कार्यकारी अभियंत्याला मुदत देण्याचे अधिकार आहेत. त्या तरतूदी वाढविल्या पाहिजेत. जेणकरुन वेळेत कामे होतील आणि पैसे खर्च होतील. तसेच अधिकारी आहेत त्यांनाही सांगण्यात

यावे की, कोणत्या परिस्थितीमध्ये एक्सटेंशन देण्यात यावे. यासाठी नवीन सिस्टीम अपडेट करण्यात यावी. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, निविदेचा ब-फॉर्म आहे यात क्लॉज-२ मध्ये एक्सटेंशन देण्याची तरतूद आहे हा बदलून बेंच मार्किंग करीत आहोत. यात २० टक्के काम झाले २० टक्के पेमेंट करण्यात येईल आणि २० टक्के काम झाले नाही तर माईल्डस्टोनला त्यादिवशी ५० हजार ते १ लाख रुपये दंड सुरु होईल ते थांबविण्याचे अधिकार कार्यकारीअभियंत्याला राहणार नाहीत. नॅशनल हायवेमध्ये करण्यात येते अशी पध्दत राज्यात वापरावी अशा पध्दतीची मंजूरी वित्त विभागाच्या चर्चेमध्ये घेतलेली आहे आणि आता फॉर्म बदलत आहोत. बदललेला फॉर्म मुख्य अभियंता श्री.सगणे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तयार केला. सदर फॉर्म शासनाच्या मान्यतेसाठी आलेला आहे. विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायासाठी पाठविलेला आहे. सदर फॉर्मला मंजूरी घेऊन लवकरात लवकर इश्यू करण्यात येईल. यापुढे एक्सटेंशन देण्याचे अधिकारी कोणाला राहणार नाहीत.

हा चांगला निर्णय विभागाणे घेतलेला आहे. दुसरा विषय असा की, आमदार निधीतील १० लाखाच्या कामाला एक वर्षाची मुदत असते. परंतु २-२ वर्षे ही कामे होत नाहीत. लोकप्रतिनिधी गेल्यानंतर लोक विचारतात काम कधी पूर्ण होणार आहे. किती शिफारस रुपयांच्या कामासाठी किती मुदत असावी यासाठी कालमर्यादा असायला हवी. असे समितीने सूचित केले असता याबाबतचे परिपत्रक तयार करण्यात येईल. असे विभागीय समितीस अश्वस्त केले.

वीस टक्के काम झाले तर वीस टक्के पेमेंट करण्यात येईल. यात कॉन्ट्रॅक्टर काय करतात की, बीबीएम कार्पेट करतात, सीलकोडला जास्त पैसे लागतात म्हणून करतच नाहीत. त्यामुळे रस्ता लगेच खराब होतो. सीलकोड केल्याशिवाय रस्ता टिकतच नाही. कार्पेटपर्यंतचे बील काढून देतात. त्यामुळे सदर रस्त्याचे काम पुन्हा करावे लागते. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता व्हीडीओ बेस सिस्टीम सुरु करण्यात येत आहे. दोन दिवसात सिलकोड केला नाहीतर प्रत्यक्षात त्याचे एसएमएस अलर्ट जीपीआरएसला डायरेक्ट येतील. याचे सिलकोड ३ दिवसात, ८ दिवसात का करण्यात नाहीत याची माहिती घेण्यात येईल.

कार्पेटपर्यंतचे बिल काढले जाते सिलकोड केला नाही म्हणून त्याचे तेवढे बील काढून क्लोज करुन टाकले जाते. ही बाब देखिल समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्व नाही, पण यातील ३० टक्के राखीव ठेवावे असे काहीतरी करण्यात येईल.

या अनुषंगाने समितीने उदाहरण दाखल सांगितले की, वाशिम डिव्हीजनमध्ये वर्षभरामध्ये ५० कोटी रुपयांचे काम झालेले नाही. यात ५ ते ६ सब डिव्हीजन आहेत. तरी सुध्दा ५० ते ६० कोटी रुपयांचे काम वर्षभरात होऊ शकत नाही. एवढा मोठा स्टाफ असूनही कामे होत नाहीत हा विषय महत्त्वाचा आहे. टेंडर आल्यानंतर किती दिवसात वर्कऑर्डर द्यायची, काम कधी सुरु झाले पाहिजे, याबाबत एक सॉप्टवेअर डेव्हलप करायला पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, आजच्या घडीला बीम्स प्रणालीमध्ये पेमेंट कुठले होते हे त्याक्षणी दिसू शकते. विभागाची पहिल्या टप्प्यातील रोड इम्प्रुव्हमेंट सिस्टमची सुधारणा करण्याचे

सॉप्टवेअर तयार आहे आणि त्याचे टेस्टींग सुरु आहे. यामध्ये रस्त्याचे चेनेजेस असतात ते एमआरसॅटच्या डाटाशी आणि गुगल डाटाशी मॅचअप करावे लागतात. सेगमेंटेशनचे काम सुरु आहे.महाराष्ट्रात असे एकूण ९८ हजार किलोमीटर आहेत. जवळपास ४० किलोमीटर डाटाचे म्हणजे १६ जिल्ह्यांमध्ये हे काम झालेले आहे. अन्य जिल्ह्यांमध्ये हे काम चालू आहे. हे काम मी स्वत: करीत होतो त्यामुळे मला याची माहिती आहे.एकदा सेगमेंटेशन पूर्ण झाले की, ज्या चेनजेसचे म्हणाल तो डेटा मंत्रालय स्तरावर नक्की होईल.

<u>प्रधानशिर्ष ४२१६ गृहनिर्माण वरील भांडवली खर्च ०१ शासकीय निवासी इमारती १०६ इमारती सर्वसाधारण एकत्रिक निवासव्यवस्था (००)(०१) मोठी बांधकामे, ७०० इतर गृहनिर्माण (०१)(०१) न्यायदान मोठी बांधकामे</u>

न्यायदान मोठी बांधकामामध्ये एक लाख वाचले असे नमूद केले आहे. येथे ५२ लक्ष ४९ हजार रुपये समर्पित केले.परंतु १२९ ठिकाणी ३६ लक्ष ९६ हजार रुपये समर्पित केले. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ३६ लाख रुपये आहेत ते चुकीचे आहेत. ३४.९६ लक्ष असे ते पाहिजे आणि हे एकाच कामाच्या बाबतीत झालेले आहे. ही विभागाकडून चूक झालेली होती.

परंतु प्रत्यक्षात हे पैसे खर्च का होऊ शकले नाहीत ? अशी विचारणा विभागीय सचिवांनीऔरंगाबादला कांचनवाडी येथे एकच काम प्रोग्रेसमध्ये ठेवायचे होते त्या कामाच्या प्रोग्रेसला अपेक्षित २७५ लक्ष रुपये अनुदान खर्च करु शकत होतो, तेवढे ठेवले आणि बाकीचे पैसे समर्पित केले.

विभागाने औरंगाबादबाबत सांगितले परंतु सातारा, उस्मानाबाद व नागपूरचे काय झाले ? अशी विचारणा विभागीय सचिवांनी सांगितले की, न्यायदान लेखाशिर्षाखाली उस्मानाबाद न्यायालयीन इमारतींची ११ कामे होती त्यापैकी केज, माजलगाव, लोहारा येथील ४ कामे पूर्ण झालेली होती. उर्वरित कामे डिसेंबरच्या बजेटमध्ये आली होती व इस्टिमेट व टेंडर प्रक्रियेला विलंब लागतो त्यामुळे उस्मानाबाद सर्कल मध्ये निधी वापरण्यात आला नाही.

सातारा आणि नागपूर येथील निधी वापराबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सातारा सर्कल मधील मेढा व सातारा येथील कामांसाठी माहे डिसेंबर मध्ये निधी प्राप्त झाला होता तो वापरण्यात आला व उर्वरित निधी समर्पित करण्यात आला. नागपूर सर्कल मधील कळमेश्वर येथे करावयाचे काम हे झुडपी जंगलामधील असल्याने उक्त काम करण्यात आले नाही. त्यामुळे उक्त निधी समर्पित करण्यात आला होता व त्या कामाची जागा बदलून घेऊन ते पुढील वर्षी पूर्ण केले.

<u>प्रधानशीर्ष ५०५४ मार्ग व पूल यांवरील भांडवली खर्च ०३ राज्य महामार्ग ३३७ रस्त्यांची कामे, (००)(०१) मोठी बांधकामे</u>

अंतर्गत १.५६ कोटी ९६ लाख ५० हजार रुपये निधी समर्पित केल्याचे दिसून येते. एवढ्या मोठ्या

प्रमाणात निधी समर्पित करण्याचे कारण काय, २३ कोटी ९१ लाख ३१ हजार रुपयांची पुरवणी मागणीविभागाने सादर केली होती त्यामध्येही कट लावण्यात आला होता काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाच्या एकूण निधी पैकी ८० टक्के निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता व २० टक्के निधीला कट होता. वित्त विभागाने २० टक्के निधी समर्पित करण्याच्या सूचना दिल्यामुळे तो समर्पित करण्यात आला व त्याचा उल्लेख स्पष्टीकरणामध्ये करण्यात आला आहे.

वित्त विभागाने सर्व विभागांच्या निधीला २० टक्के कट लावला होता, त्यामुळे वित्त विभागाने आपली भूमिका स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे. जुन्या विनियोजन ज्या विभागाच्या घेण्यात आल्या होत्या त्यासंदर्भात २० टक्क्यांचा प्रश्न होता. दुसरा पर्यायी शब्द नसल्यामुळे"रक्कम समर्पित करण्यात यावी" असा शब्दप्रयोग करावा लागतो कारण उक्त रक्कम विभागाच्या खात्यामध्ये जमा झालेली नाही. उक्त रक्कम कागदोपत्री देण्यात आली व परत करण्यात आली, त्यामुळे त्यास "समर्पित केले" असा शब्द प्रयोग करण्यात येतो. त्यामुळे याप्रकरणी वित्त विभागाने खुलासा करणे आवश्यक आहे.तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने समर्पित केलेल्या निधीची रक्कम २० टक्क्यांपेक्षा कमी दिसून येते.

विभागाची मूळ तरतूद ८.२४ कोटी ७८ लाख रुपये होती व २० टक्के कटनुसार १.६५ कोटी रुपये समर्पित करणे आवश्यक आहे परंतु विभागाने त्याप्रमाणात ते समर्पित केले नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,माहे मार्च, २०१३ मध्ये पुरवणी अर्थसंकल्पात मंजूर निधी रिलिज करण्यात आला नाही. उक्त रक्कमेसह समर्पित निधी १.५६ कोटी ९६ लाख ५० हजार रुपये होता.

याचा अर्थ पुरवणी अर्थसंकल्पात मंजूर रक्कम विभागाला प्राप्त झाली नाही.हि बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता याबाबत वित्त सचिवांनी समितीस सांगितले की,दिनांक १४ जानेवारी, २०१३ रोजीच्या परिपत्रकानुसार सर्व विभागांना निधी समर्पित करण्यासंदर्भात वित्त विभागामार्फत कळविण्यात आले होते. त्यानुसार नॉन प्लॅनसाठी ८५ टक्के व प्लॅनसाठी ८० टक्के निधी खर्च करण्याची परवानगी विभागांना देण्यात आली होती. त्यानंतर निधी १०० टक्के खर्च करण्याची परवानगी माहे मार्च मध्ये देण्यात आली होती.

वित्त विभागाने ८० टक्के निधी माहे मार्चपर्यंत खर्च करण्याबाबत परिपत्रक काढले होते, अशा वेळी विभागाने बिलेच तयार करावीत का ? एखाद्या विभागाला जानेवारीमध्ये १००० कोटी रुपये देण्यात येणार आहेत त्याचे नियोजन करा, असे वित्त विभागाने सांगितले व त्यानंतर संबंधित विभागाने नियोजन करुन निधी खर्च केला. त्यानंतर वित्त विभागाने माहे जानेवारी मध्ये परिपत्रक काढून कळविले की, नॉन प्लॅनची रक्कम ८५ टक्के व प्लॅनची रक्कम ८० टक्के यानुसार खर्च करावी. अशा वेळी विभागाकडून काम थांबविण्यात येईल किंवा ते रद्द करण्यात येईल. त्यानंतर पुन्हा वित्त विभागाने माहे मार्च मध्ये परिपत्रक काढून १०० टक्के रक्कम खर्च करण्यास कळविले तर अशा वेळी विभागाने दोन महिन्यांच्या कालावधीत काम कशा प्रकारे मॅच करावे ? वित्त विभागाने निधी वितरीत करण्यासंदर्भातील परिपत्रक केव्हा काढले होते? अशी विचारणा समितीने केली असता वित्त सचिवांनी सांगितले की,वित्त विभागाने दिनांक १४ जानेवारी, २०१३ रोजी प्लॅन व नॉन प्लॅन करिता ८०

व ८५ टक्के खर्चाबाबतचे परिपपत्रक काढले होते. १०० टक्के निधी खर्च करण्याबाबतचे परिपत्रक वित्त सचिवांकडे समितीच्या बैठकीच्या वेळी नसल्यामुळे त्याबाबतची माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल असे आश्वासीत केले.

वित्त विभागाने माहे जोनवारीमध्ये ८० टक्के रक्कम खर्च करण्याचे आदेश दिले व त्यानंतर माहे मार्च मध्ये १०० टक्के खर्च करण्याचे परिपत्रक काढले, अशा वेळी संबंधित विभागाने कशा प्रकारे कार्यवाही करावी ? माहे मार्चमध्ये १०० टक्के निधी विभागाने खर्च करावा, असे आदेश काढण्याचे हे पहिलेच वर्ष असावे. एकूण निधीच्या ८० टक्के निधी खर्च करण्यात यावा, असे परिपत्रक दरवर्षी काढण्यात येत नाही. सन १०१३ मध्ये ८० टक्के निधी खर्च करण्यास वित्त विभागाने अनुमती दिली. त्यानंतर पुन्हा जानेवारी ते मार्च या कालावधीत विभागाने त्यांचा १०० टक्के निधी खर्च करण्याचे परिपत्रक काढल्यानंतर दोन महिन्यात विभागाने ती रक्कम कशी खर्च करावी, कामाचे नियोजन कसे करावे, अनपेक्षितरित्या निधी प्राप्त होणार, असे गृहीत धरावे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाचे माननीय सचिव व सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव हे एकाच सिस्टमचा भाग आहेत. त्यामुळे विभागाच्या विरोधात समितीनां मत व्यक्त करता येणार नाही. परंतु विभागाच्या निधीमुळे काही कामांची गती मंद करावी लागते.

बांधकाम विभागाचे सचिव हे प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरामध्ये "कट" लावण्यात आला होता, असे सांगत असल्यामुळे हा प्रश्न उपस्थित झाला आहे. "कट" चा मुद्दा उपस्थित केला नसता तर विभागाने बचत केली किंवा काम करणे शक्य झाले नाही, असे समितीला गृहीत धरता आले असते. वर्षाच्या सुरुवातीला किंवा माहे नोव्हेंबर अथवा डिसेंबर मध्ये विभागाला सर्व निधी उपलब्ध करुन देण्याची पध्दत आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मागील दोन वर्षात सुधारणा करण्यात आली आहे. वर्षाच्या सुरुवातील माहे एप्रिल किंवा मे मध्ये ८० टक्के निधी वितरीत झाला हे विभागाला समजते. पूर्वी कॅशफ्लो सिस्टमनुसार १५ टक्के, ३० टक्के या प्रमाणात निधी वितरण करण्यात येते होते. तसेच, वित्त सचिव यांनी सांगितल्याप्रमाणे ८० टक्के लिमिट विभागाला कळविण्यात आली आहे. त्यावेळी ८० टक्के निधी वितरीत करण्यात येणार आहे, हे विभागाला माहिती होते. रस्त्यांच्या संदर्भात काम सुरु असते त्यामुळे त्याकरिता शेवटच्या टप्प्यात निधी प्राप्त झाला तर काही प्रमाणात काम सुरु ठेवता येते. परंतु इमारतीच्या कामांच्या बाबतीत कंत्राटदार काम थांबवतात कारण सिमेंट, स्टील असे डायरेक्ट एक्स्पेंडिचरचे मुद्दे असतात त्यामुळे उक्त कामावर परिणाम होतो. इमारती व्यतिरिक्त रस्त्यांच्या कामासाठी कधी-कधी विभागाला शेवटच्या टप्प्यात निधी प्राप्त झालेला आहे.

विभागाला १०० टक्के निधी वितरीत करण्यात येणार आहे, असे केव्हा कळविण्यात आले याची माहिती समितीला सादर करण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

विभागाकरिता अर्थसंकल्पात मध्ये तरतूद करण्यात आली परंतु निधी प्राप्त झाला नाही हे खरे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,विभागाकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली व ती वापरण्याकरिता पूर्वी टप्प्याटप्प्याने परवानगी देण्यात येत असत त्यानुसार विभागाने निधी खर्च केला आहे.

पुरवणी मागणी सादर केल्यानंतर विभागाला निधीची तरतूद करण्यात आली परंतु तो निधी विभागाला प्राप्त झाला नाही काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागास तो निधी खर्च करता न आल्यामुळे समर्पित करावा लागला.

म्हणजे विभागाकरिता निधीची तरतूद करण्यात आली परंतु ती खर्च झाली नाही असे विभागाचे म्हणणे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, माहे डिसेंबर मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीतून सांगली करिता३८ लक्ष रुपये, बीड व लातूर या तीन ठिकाणी कामे करावयाची होती परंतु ती कामे चालू करता आली नाही. त्यामुळे काम कसा आले नाही व निधी समर्पित करण्यात आला.

उक्त ठिकाणची कामे का करता आली नाही ? माहे डिसेंबर मध्ये तरतूद करण्याकरिता विभागाने पुरवणी मागणी सादर केल्यानंतरच तरतुद केली असणार. विभागाने अंदाजपत्रक व इतर बाबी पूर्ण केल्यानंतरच पुरवणी मागणी सादर करण्यात येते. विभागाची मागणी नसताना निधी उपलब्ध करुन देण्यात आला का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून मागणी प्रस्तावित करण्यात येते. त्याकरीता अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली असताना.

विभागाला निधी वितरीत करण्यात येतो तो कामे निश्चित करुन त्यासाठीच देण्यात आलेला नसतो. राज्यातील इतर कामांची देयके प्रलंबित आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी राज्यातील इतर कामांची देयके प्रलंबित आहे असे सांगितले.

कामांची देयके प्रलंबित असताना उक्त रक्कमेतून ती का दिली नाहीत? वित्त विभागाने सांगूनही ती बाब आपण रेकॉर्डवर आणत नाहीत. वित्त विभागाकडे निधीची कमतरता असते. सांगली व सातारा सर्कल मधील निधी व्यपगत होत असेल तर तो निधी रायगड किंवा इतर जिल्ह्यांना देता येणे शक्य आहे. वित्त विभागाकडून कामांसाठी निधी देण्यात येत नाही तो विभागाला देण्यात आलेला असतो. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता त्यावेळी उपलब्ध तरतूद अन्यत्र वळवता येणे शक्य होते काय, हे तपासावे लागेल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

उक्त बाब तपासण्याची आवश्यकता का आहे ? विभागाला निधी वितरीत केलेला आहे. विभागाला पैसे वळविण्याकरिता पैसे द्यावे लागतात, अर्थ खात्याच्या तरतुदीसाठी देखील पैसे द्यावे लागतात. कामांसाठी निधी प्राप्त करुन घेण्याकरिता आमदार महोदयांना अनेक वेळा फेऱ्या माराव्या लागतात, खूप त्रास सहन करावा लागतो परंतु विभागाकडून सहजपणे निधी समर्पित करण्यात येतो. विभागाला प्राप्त निधी इतरत्र वळविण्याचा अधिकार आहे, तो वित्त विभागाला नाही. एखाद्या विभागाला उपलब्ध करुन दिलेला निधी इतरत्र वळविण्याचा अधिकार

वित्त विभागाला नाही, असेल तर विभागाच्या सचिवांनी निदर्शनास आणून द्यावे. विभागाच्या अधिकाऱ्यांना व्यपगत होणारा निधी इतरत्र वळविण्याचा अधिकार असताना तो वापरला नाही.व्यपगत होणारा निधी इतर जिल्ह्यातील कामांची देयके अदा करण्याकरिता वळविण्याचा विचार विभागाच्या अधिकाऱ्यांनी केला नाही का? रस्ते व पुल लेखाशिर्षा खालील निधी मोठ्या प्रमाणात का समर्पित करण्यात आला ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागांना दिल्या जाणाऱ्या माहे मार्च मधील तरतुदी ठोक स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येतात. विभागाला उपलब्ध करुन देण्यात आलेली ८० टक्के तरतूद खर्च करण्यात आली. त्यानंतर उर्वरित शिल्लक रक्कम समर्पित का करण्यात आली यासंदर्भातील ॲक्टीव्हिटी लॉग पाहण्यात येईल. सदरहू निधी केव्हा रिलिज करण्यात आला होता हे तपासल्यानंतर समितीला माहिती सादर करणे शक्य होईल.

माहे मार्च मध्ये ६.९१ कोटी ७२ लाख ८१ हजार रुपये निधी विभागाला मिळाला होता, विभागाने रस्त्यांच्या कामांचा १.५६ कोटी ९६ लाख ५० हजार रुपये निधी समर्पित केला आहे. परंतु विभागाकडून नेहमी सांगण्यात येते की, रस्त्यांच्या कामासाठी निधी कमी आहे. १.५६ कोटी ९६ लाख ५० हजार रुपये निधी विभागाने समर्पित केला व वित्त विभाग १०० टक्के निधी उपलब्ध करुन देण्यास तयार होता. उक्त निधी प्रलंबित देयके अदा करण्यासाठी वापरता येणे शक्य होते. १५६ कोटी ९६ लाख ५० हजार रुपये निधी विभागाला वितरीत करण्यात आला नव्हता.

पण विभागाला १०० टक्के तरतूद उपलब्ध करुन देण्यास तयार होतो, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिवांनी दिली आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, संगणकीय अभिलेखानुसार सांकेतांकाप्रमाणे विभागाकरिता८२४.७८ कोटी रुपये मूळ तरतूद होती. माहे डिसेंबर मध्ये सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागणीद्वारे २३ कोटी ९१ लाख ३१ हजार रुपये तरतूद प्राप्त झाली. माहे मार्च मध्ये सादर करण्यात आलेल्या पुरवणी मागणीद्वारे १००० कोटी रुपये तरतूद प्राप्त झाली. अशा प्रकारे विभागाला एकूण ८४८ कोटी ६९ लाख ३१ हजार रुपये तरतूद विभागाकरिता करण्यात आली. ६९१ कोटी ७१ लाख ८१ हजार रुपये सुधारीत अंदाज तरतूद करण्यात आली होती व१५६ कोटी ९६ लाख ५० हजार रुपये तरतूद अवितरीत होती.

उक्त तरतूद अवितरीत का राहील, याची माहिती वित्त विभागाच्या सचिवांनी समितीला द्यावी. असे समितीने वित्त सचिवांना सांगितले की, माहे मार्च मधील तरतुदी बाबतची माहिती समितीच्या बैठकीच्या वेळी उपलब्ध नसल्यामुळे समितीला सादर करण्यात येईल. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांनी सांगितले की, उक्त रक्कम वितरीत झाली नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यासंदर्भात रिकन्साईल करुन घेण्यात येईल.

सदर माहिती विभागाने उक्त रकमेची मागणी केली होती काय ? वित्त विभागाच्या सचिवांनी माहिती दिली आहे की, १०० टक्के निधी वितरीत करण्यास तयार होतो. विभागाकडून सांगण्यात येते की निधी वितरीत

करण्यात आला नाही. सदरहू निधी वितरीत करण्याची मागणी बांधकाम विभागाने केली होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून रिवाईज इस्टीमेटची मागणी केलेली असते. त्यासंदर्भातील स्टेटमेंट आता माझ्याकडे आता उपलब्ध नाही ते उपलब्ध करुन देण्यात येईल. १५६ कोटी ९६ लाख ५० हजार रुपये तरतूद अवितरीत होती, असे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते.

अशी स्थिती असेल तर विनियोजनचा उपयोग काय ? विभागाला पैसे मिळाले नाही व ते खर्च करण्यात आले नाही.विभागाला उपलब्ध करुन देण्यात आलेली तरतूद विभागाने वापरली नाही व ती बेकायदेशीररित्या समर्पित करण्यात आली. विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांना देण्यात आलेल्या अधिकारानुसार उक्त रक्कम इतरत्र वळवून वापरता येणे शक्य होते, परंतु तो अधिकार त्यांनी वापरला नाही, असा समितीचा आक्षेप आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, पुनर्विनियोजनाचे अधिकार विधि मंडळाने विभागाला दिलेले आहेत.

अर्थसंकल्पिय तरतूद विधि मंडळाकडून करण्यात येते त्यामध्ये बदल करण्याचा अधिकार विभागाला नाही. अर्थसंकल्पिय तरतूद खात्यासाठी करण्यात आलेली असते ती मंत्री महोदयांच्या माध्यमातून मंत्रिमंडळामध्ये प्रस्ताव सादर करुन इतर कामासाठी विभागाला वळवता येते. विभागाकडे कामांचे देणे असताना कोणत्या अधिकारान्वये विभागाने निधी समर्पित केला ?विभागाने स्पष्टीकरणामध्ये समर्पित केला या ऐवजी निधी प्राप्त झाला नाही, असे नमूद करणे आवश्यक होते परंतु तसे नमूद केले नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने सादर केलेल्या स्पष्टीकणामध्ये नमूद केले आहे की, "सन २०१२-१३ मध्ये या लेखाशिर्षाखाली वित्त विभागाने मंजूर केलेल्या सुधारित अंदाजाच्या अनुषंगाने१५६ कोटी ९६ लाखं ५० हजार रुपये निधी समर्पित करण्यात आला."

जो निधी विभागाला मिळालाच नाही, तो समर्पित कसा काय करता येईल, विभागाने काहीही लिहिले तर समिती ते मान्य कसे करणार ? विभाग पैसे सरेंडर कसे काय करु शकते. कारण विभागाकडून सांगण्यात येते की, पैसे सरेंडर केलेले नाहीत, फक्त तसे सांगितले आहे, असे चालणार नाही. येथे हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, सार्वजनिक बांधकाम विभागाला वित्त विभागाने पैसे दिलेले नाहीत. मग समितीने याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाला न विचारता वित्त विभागाला विचारणा करेल. विभागाला निधी मिळाला नसेल पण विभागीय सचिव समितीसमोर सांगतील की, तो निधी समर्पित केला. याचा अर्थ विभागीय सचिव समिती समोर खोटी साक्ष देत आहात.हा गंभीर विषय आहे. विभागीय सचिवांनी समिती समोर वस्तुस्थिती मांडली पाहिजे असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

विभागीय सचिव सांगतात रिॲप्रोप्रिएशन केले. पण विभागाला प्लानिंग व फायनान्सची मान्यता न घेता रिॲप्रोप्रिएशन करता येते का ? जर असे झाले असेल तर विभागाने पुर्नविनियोजन हा शब्द वापरु नका. सार्वजनिक बांधकाम विभागाने असे सांगावे की, वित्त विभागाने पैसे दिले नाहीत. जर विभागाने पैसे घेतले नसतील तर ती तुमची चुक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व समितीला आश्वस्त केले की, जेथे पैसे वितरित झालेले नाहीत, तेथे स्पष्टपणे म्हणण्यात येईल की, हे

पैसे वितरित झालेले नाहीत.

वित्त विभागाकडून अप्राप्त निधी हा पुनर्विनियोजनचा नसून तर तो निधी मिळाला नाही अशी दुरुस्ती करण्यात यावी. विभागाकडून वस्तुस्थिती मांडण्यात येईल व त्याप्रमाणे वित्त विभागाकडे विवेचन करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

विभागाकडून सुधारित वस्तुस्थिती मांडण्यात येईल व त्या प्रमाणे वित्त विभागाकडे विवेचन करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

<u>प्रधानशिर्ष 5054 मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च,०३ राज्य महामार्ग 337 रस्त्याची कामे (00)(02) आस्थापना खर्च</u>

या अंतर्गत 32 लाख ९५ हजार रुपयांचे सेव्हिंग झाल्याबाबत नमूद केलेले आहे याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की,ही जी वरची मागणी आहे तिला आस्थापना खर्च घ्यायचा असतो. तो अकाऊंटिंग ॲडजस्टमेंट म्हणून आहे. वरचा खर्च कमी झाला म्हणजे तेवढ्या प्रमाणात आस्थापना खर्च कमी झाला म्हणून ती बचत दिसत आहे. १३.९ टक्के आस्थापना खर्च असतो. तेवढाच खूप झाला. १.५६ कोटी ९६ लाख ५० हजार रुपये कट झाले किंवा मिळाले नाहीत ते विभागाकडून समर्पित झाले. त्याचे आस्थापना खर्चाचे पैसेही समर्पित झाले.

विभागाने महालेखाकारांना असे सांगितले असते की पैसेच मिळालेले नाहीत तर, समितीला व त्याबरोबरच विभागाला या विषयावर इतका वेळ घालविण्याची वेळ आली नसती. विभागाकडून सांगण्यात येते की, पैसे सरेंडर केले. पैसे सरेंडर केले म्हटले की, हे सर्व प्रश्न उपस्थित होतात असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासकीय परिभाषेत मांडताना आमच्या दृष्टीने वित्त विभाग, गृह विभाग हे वरचे विभाग आहेत. आम्ही त्यांच्याकडे नेहमी सरेंडर करतो. आपण म्हणत असाल तर समितीच्या आदेशानुसार आम्ही सांगतो.

सर्व विनियोजन लेखे पाहिले तर मॅक्झिमम इशु हाच आहे की, एक तर जमा रक्कम समर्पित केली आहे किंवा अधिकचा खर्च झालेला आहे. अधिकचा खर्च फारच कमी झालेला आहे. यापूर्वीही विनियोजन लेख्यांबाबत असेच मुद्दे उपस्थित झाले असता समितीला ते परिच्छेद साक्षीकरिता घेतल्यानंतर असे लक्षात येते की, ८० टक्के कट असल्यामुळे ती रक्कम आपल्याला खर्च करता आली नाही. ती टेक्नीकली समर्पित दाखवावी लागते. तुम्ही ती रक्कम २० टक्के कटमुळे समर्पित केली किंवा न खर्च केल्यामुळे समर्पित केली तरी बजेटेड अमाऊंट फूल असल्यामुळे महालेखापालाने ती रक्कम टॅली करावीच लागते. महालेखापालांची परिच्छेद सिलेक्शन करताना किंवा ऑडिट ऑब्जेक्शन घेताना विभागाने त्यांच्या असे निदर्शनास आणून दिले की, २० टक्के कटमुळे त्यांना हा निधी प्राप्त झाला नाही तर त्यांनी असे परिच्छेद वेगळे काढून द्यावेत. हा केवळ टेक्नीकल कम्प्लायन्स असतो. त्या सर्व परिच्छेदांवर भविष्यात समितीला माहिती देण्यात यावी. एका बैठकीमध्ये चर्चा करता येईल. समितीने एवढा वेळ गंभीररित्या चर्चा करुन त्यातून काहीच आऊटपूट निघत

नसेल तर हा टेक्नीकल मुद्दा धरुन हे परिच्छेद एकत्र डिस्पोज करणे आवश्यक आहे. महालेखाकारांनी समितीला हे पॉईं ट आऊट करुन दिले पाहिजे. विभागानेही त्यांना असे सांगितले पाहिजे कीत्यांना २० टक्के निधी न मिळाल्यामुळे ते खर्च करु शक्लेले नाहीत. यासाठी ते जनरल ऑब्जेक्शन असल्यासारखे ट्रिट करते आणि हे विषय समिती समोर चर्चेसाठी येतात. या अनुषंगाने समितीने सुचित केले की,जो निधी विभागाला मिळाला नाही परंतु, त्याची अर्थसंकल्पीय तरतूद दाखविण्यात आलेली आहे. अर्थात ती दिलीच पाहिजे असे नाही, काही परिस्थितीमुळे ते देऊही शकत नाहीत तर अशा परिस्थितीत तुम्ही निधी उपलब्ध न झाल्यामुळे हे सेव्हिंग दाखविण्यात येत आहे, असा क्लिअरकट उल्लेख करण्यास काही हरकत नाही.विभागाने वेटिंगच्या वेळेस महालेखापालांनी हे सांगितले पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, सन २०१३-२०१४ चे विनियोजन लेख करताना त्याप्रमाणे स्पष्टता आणून योग्य शब्दरचना करण्यात येईल.

<u>प्रधानशिर्षक ४२१६ गृहनिर्माण भांडवली खर्च ०१ शासकीय निवासी इमारती ७०० इतर गृहनिर्माण (०१)(०२) न्यायदान कोश पुरस्कृत योजना (राज्य हिस्सा) आस्थापणा खर्च (०३)(०४) न्यायदान केंद्र पुरस्कृत येाजना केंद्र हिस्सा आस्थापण खर्च</u>

धुळे, नांदेडबाबत असे नमूद केले आहे की, महालेखापालांनी आस्थापना खर्चाची कमी नोंद केली. याबाबतची वस्तुस्थिती काय आहे ते विभागाने महालेखाकार कार्यालयामध्ये नोट ऑफ एरर का पाठविली नाही ? कारण विभागाकडून सांगण्यात आले आहे की, असे सांगता एजींनी खर्चाची नोंद केली नाही, याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, सर्वसाधारणपणे कामाचा खर्च असेल तर, विभागाचे लोक त्या खर्चाकडे अतिशय गांभीर्याने पाहतात. येथे आस्थापना खर्च १३ टक्के आहे आणि टी अँड पीचा खर्च १ टक्के देखील नाही.

मार्च महिन्यामध्ये सुध्दा रिकन्सीलेशनची मिटिंग होते, त्यावेळेस विभागाकडून हे सांगण्यात येत नाही. वेटिंगच्या वेळेसही सांगण्यात येत नाही व विभागाकडून महालेखाकार आक्षेप घेण्यात येतो की, त्यांनी नोंद केली नाही, विभागाकडून अधिकच्या खर्चाबाबत सांगण्यात येते की, तो अधिकचा खर्च नाही ती नोट ऑफ एरर आहे. नोंद केली नाही म्हणून तो अधिकचा दिसतो. त्याचप्रमाणे ५ लाख २६ हजार रुपयांच्या अधिक खर्चाबाबतही विभागाकडून हेच सांगण्यात येते ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की ज्या अधिकाऱ्यांनी मे महिन्यामध्ये रिकन्सीलेशन करुन घेतले आहे तेथे काही ॲक्शन घेतलेली नाही. जेथे कोठे फिल्डवर अशी लॅक्झिटी झालेली आहे की, आस्थापना खर्च नोंदविताना तो चुकीचा नोंदविला गेला त्या ठिकाणी विभागाने आमच्या कन्सर्ड लोकांचे एक्सप्लनेशन कॉल करुन काही ठिकाणी शिक्षाही केलेली आहे.

विभागाकडून मोठ्या प्रमाणात नोट ऑफ एरर महालेखाकाराकडे आली नाही असे दिसत आहे. आस्थापना व टी अँड पी यांच्या बाबतीत चूक व्हायला नको. सन २०१२-२०१३ चे ॲनालिसीस वेळेस

अकाऊंटिंगचे संगणकीकरण सुरु झाले होते यामध्ये काही वेळेस ती माहिती भरताना तत्कालीन लोकांमध्ये ज्ञानाच्या अभावामुळे काही चूक झाली असेल. सन २०१३-२०१४ मध्ये या चुका फार कमी आहेत आणि आता नंतर पुढे तर चुका आढळणारच नाहीत.

<u>प्रधानशिर्ष ४०५५ पोलिसावरील भांडवली खर्च २११ पोलीस गृहनिर्माण (०१)(०३) शासकीय कार्यालयीन इमारती हत्यारे व संयत्रे यावरील खर्च</u>

या अंतर्गत विभागाकडे नमूद केले आहे की, पोलीस गृहनिर्माण यामध्ये आपण असे नमूद केले आहे की, अधिकचा खर्च नाही. यावर खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की,गडचिरोली जिल्हयाच्या बाबतीत त्यांच्या अकाऊंटसमध्ये दाखविण्यात आला होता. वेळच्या वेळेस ही नोट ऑफ एरर जाणे आवश्यक होती. त्या कार्यालयाने परिगणना केलेली नाही. गडचिरोली कार्यालयाची चूक आहे. तेथील एक्झेक्युटिव्ह इंजिनिअरचे एक्सप्लनेशन कॉल केलेले आहे.

आता हे पैसे कोणत्या हेड खाली खर्च केले पाहिजे होते ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,मुळात तो खर्च दाखविण्यात आलेला आहे. खर्च कोणताही झालेलाच नाही. नोट ऑफ एरर आणून हा खर्च आमच्या कार्यालयाच्या नावे चुकीचा दाखविण्यात आलेला आहे असे लक्षात आणून दिले असते तर हे दिसलेच नसते.

खर्च झालेला नाही आणि दाखविण्यात आला, याचे थोडेसे स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, एखाद्या कामावर आपण १०० रुपये खर्च केले की, त्याच्या अकाऊंटमध्ये दाखविताना १३.९ टक्के हा आस्थापना खर्च आणि १.१९ टक्के हा टी अँड पीचा खर्च दाखविला पाहिजे. ही नोंद महालेखाकार कार्यालयाकडून (वेट) तपासून घेतली पाहिजे. फायनल अकाऊंट मे महिन्यामध्ये होतात तेव्हाच्या मिटिंगमध्ये हे लक्षात आणून दिले पाहिजे आणि त्या त्या कार्यालयाने हे तपासले पाहिजे की, त्यांच्या कार्यालयामध्ये चुकीची नोंद झालेली नाही ना. अकाऊंट तपासताना कधी कधी लेखाशीर्षांच्या बाबतीत पाहिलेच जात नाही म्हणजे त्यांच्याकडे खर्च नाही शून्य ग्रांट आहे परंतु, त्यांचा खर्च नोंदविला आहे का हे तपासावे लागते ते त्या क्लार्कने तपासले नाही. अकाऊंटंटने नीट पाहिले नाही म्हणून हे असे राहून गेले.

विभागाकडे डिव्हीजनला स्पेशल अकाऊंटंट आहे ना ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांच्याकडे २८९ डिव्हीजनल अकाऊंटंटच्या पोस्ट होत्या त्यातील जवळपास सव्वाशे पोस्ट २ वर्ष रिक्त होत्या. एकेका डिव्हीजनल अकाऊंटंटकडे ३-३ डिव्हीजनचा चार्ज होता. त्यानंतर एका बॅचची मोठ्या प्रमाणात भरती झाली, त्यांचे ट्रेनिंग झाले आता निदान हे सुसह्य झालेले आहे. काही काही ठिकाणी चांगले डिव्हीजनल अकाऊंटंट उपलब्ध झालेले आहेत. मधल्या काळात there was paucity of staff and Divisional Accounts Officers were not available.

H-8

प्रधानशिर्ष ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च०१ कार्यालय इमारती ०५१ बांधकामे (२४) उपनिबंधक नोंदणी व मुद्रांक विभाग यांच्या कार्यालय व इमारतीचे बांधकाम(२४)(०१) मोठी बांधकाम

उक्त लेखाशिर्ष नोंदणी उपनिबंधक मुद्रांक विभाग यांच्या कार्यालयीन इमारतीचासार्वजनिक बांधकामे प्रशासकीय व कार्यचालन इमारती यावरील भांडवली खर्च आहे. सदर कामाच्या अनुषंगाने यावर्षी अनुदान उपलब्ध आहे. मागच्या अनुदानाच्या बाबतीत पैसे परत केलेले होते. त्याची कारणे वेगवेगळी होती. सातारा येथे कोर्ट केस झालेली होती. अन्य ठिकाणी कार्यारंभ आदेश देण्यात आले. यात कॉम्पॅक्टर विकत घ्यायचा असतो तो एका विशिष्ट कंपनीचा म्हणजे गोदरेज कंपनीचा घ्यावा असा आग्रह होता. ज्याठिकाणी काही अडचण नाही अशी कामे मार्चअखेरपर्यंत पूर्ण होतील.

सन २०१२-२०१३ मध्ये मोठ्या प्रमाणात पैसे शासनाकडे जमा करण्यात आलेले आहेत.१३ कोटी ४ लाख ३५ हजार रुपयांपैकी ११ कोटी ३८ लाख ८५ हजार रुपये जमा केलेले आहेत याची कारणे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सातारा येथील कामांना एका विशिष्ट कंपनीचा कॉम्पॅक्टर स्टोरेज फॅसिलिटी असते गोदरेज कंपनीची घ्यावी असा आग्रह होता. गोदरेज कंपनीच्या कॉम्पॅक्टरमध्ये मोनोपॉली होते. म्हणून इतर कंपन्यांच्या कॉम्पॅक्टरने सातारा येथील न्यायालयामध्ये केस दाखल केल्याने न्यायालयाने टेंडर प्रक्रियेवर सन २०१३ मध्ये स्टे आणला आणि बरेच प्रयत्न करुनही सदर स्टे अजूनही उठलेला नाही. यासंदर्भात गोदरेज कंपनीऐवजी कॉम्पॅक्टर असे जनरल टेंडर केले तर सदर इमारतीचे काम पूर्ण होऊन मार्चपर्यंत इमारत ताब्यात घेऊ शकतो.

स्टे देऊन तीन वर्षे झालेली आहेत. उच्च न्यायालयामध्ये एक अर्ज केला असता तर सदर स्टे उठविता आला असता.जिल्हा न्यायालयाच्या स्टे ला एवढी वर्षे लागत असतील तर यात कुठेतरी अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा असू शकतो. त्यामुळे यावर दोन महिन्यात निर्णय घेण्यात यावा. कारण यामुळे सर्व कामे खोळंबलेली आहेत. असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सातारा येथील एका ठिकाणी असे झालेले आहे. कॉम्पॅक्टर बसवून बिल्डींगचे काम पूर्ण झाले की, वापरासाठी इमारतीचा ताबा देण्यात येऊ शकतो.

सध्या इमारत उपयोगात नाही असे विभागाचे म्हणणे आहे काय ? एकदा कोर्टामध्ये केस गेल्यानंतर सरकारी वकिलाला फाईल देऊन टाकतो आणि नंतर त्याची माहिती घेतच नाही. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, येत्या १५ ते २० दिवसात उच्च न्यायालयाकडून डायरेक्शन मिळविण्यात येईल. यासंदर्भात मदत व पुनर्वसन (महसूल) विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले की,सन २०१२-२०१३ मध्ये काही ठिकाणी वर्कऑर्डर दिलेले नव्हते, सुप्रमा प्राप्त नव्हते अशी काही कारणे होती. आठ ठिकाणी बांधकाम करायला पाहिजे होते. सातारा, नाशिक, औरंगाबाद, उस्मानाबाद, मोरखेड, नांदेड, अमरावती, अकोला आणि यवतमाळ यापैकी

नाशिक येथील काम जवळपास पूर्ण झालेले आहे. सहा महिन्यांपूर्वी याची माहिती घ्यायला सुरुवात केली होती. सातारा सोडून बाकी ठिकाणचे बांधकाम मार्च २०१७ पर्यंत पूर्ण होतील असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे आश्वासन आहे.

कॉम्पॅक्टरशिवाय इमारतीचा ताबा देऊ शकत नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कॉम्पॅक्टरमध्ये महत्त्वाचे मूळ दस्तऐवज साठवले जातात. म्हणून बिल्डींग बांधताना कॉम्पॅक्टर असणे महत्त्वाचे असते. गोदरेज कंपनीपेक्षा जास्त पॉवरफुल असे कॉम्पॅक्टर आता मिळायला सुरुवात झालेली आहे. कोर्टामध्ये त्याप्रमाणे मांडणी करण्यात येईल.

लोकलेखा समितीच्या साक्षीला विषय आल्यानंतर विभाग सर्व माहिती गोळा करायला सुरुवात करते. कोर्टात जाऊन जर व्यवस्थित बाजू मांडली की, इमारत पूर्ण झालेली आहे तर कोर्ट यावर निर्णय लगेच देते. असे मत समितीने व्यक्त केलेअसे विभागीय सचिवांनी सांगितले की, नोंदणी मुद्रांक शुल्क विभागाची साधारणत:८० ते ९० कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने केली. या योजनेमध्ये फक्त आठ कामे मागे राहिलेली आहेत. इतरत्र कुठेही अडचण आली नाही. सगळीकडे कॉम्पॅक्टर घेतलेली आहेत.

समितीला हे सर्व मान्य आहे. पण तेथे अडचण आली त्यावर चर्चा करण्यात येते. पाच हजार कोटींचे बजेट असले तर आपण या पाच हजार कोटींवर चर्चा करीत नाही. ज्यामध्ये अडचणी आहेत त्यावर मुख्य अभियंता यांनी तोडगा काढला पाहिजे. परंतु तो काढला जात नाही.ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी समितीस आश्वासन दिले की,३१ मार्च, २०१७ पर्यंत काम पूर्ण करण्यात येईल.

<u>एच-८ सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यालयाच्या इमारती यावरील भांडवली खर्च</u>

उत्त अनुदाना अंतर्गत विभागाने असे नमूद केले आहे की, मध्ये असे नमूद केले आहे की, सप्लीमेंटरी डिमांड पूर्णसरेंडर केली व २० टक्कयांच्या वर गेलात, विभागाने ३६८ कोटी २२ लाख ३६ हजार रुपये सरेंडर केले याबाबत सांगताना विभागीय सचिवांनी सांगितले की, तेथेही २० टक्के कट होता. त्याव्यतिरीक्त ३.६७ कोटी ३८ लाख ९९ हजार रुपयाची बचत झाली.

३६८ कोटी २२ लाख ३६ हजार रुपयांपैकी १०८७ कोटी २४ लाख १२ हजार रुपयांचे २० टक्के रक्कम २१६ कोटी रुपये होईल. विभागाला सप्लीमेंटरी डिमांडचे १२६ कोटी १३ लाख १९ हजार रुपये मिळाले नाहीत काय ? समितीच्या मते सप्लीमेंटरीचे पैसे पूर्ण मिळतात. कटचा मुद्दा वेगळा आहे. सप्लीमेंटरीचे पैसे पूर्ण मिळतातच या प्रकरणात २०० कोटी रुपयापर्यंत समजू शकतो मात्र विभागाने ३६८ कोटी २२ लाख ३६ हजार रुपये सरेंडर केलेले आहे. प्रत्येक वेळी २० टक्के कट असे विभागाकडून सांगण्यात येत तसे आता सांगू नका यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, २० टक्क्यांची फिगर २४२ कोटी रुपयांची आहे म्हणजे ३६२ पैकी २४२ कोटी रुपये तर कटच होतात.

मूळ तरतूद १०८७ कोटी रुपयांची आहे. ३६२ कोटी पैकी २४२ कोटी रुपये कटच होतात परंतु, जे राहिलेले पैसे आहेत त्याची कारणे काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये प्रधानशीर्ष ४०५९, ४२०२, ४२१०, ४२११, ४२१७ नगरविकास, ४२२५ अनुसूचित जातीजमाती, ४२३५ सामाजिक सुरक्षा ही जी लेखाशीर्ष आहेत मत्स्यव्यवसाय भांडवली खर्च यामध्ये मत्स्यव्यवसाय विभागाकडची काही कामे ही नाबार्डच्या लेखाशीर्षाखाली घेण्यात आली त्यामुळे त्यांच्याव्र इथला जो निधी आहे तो विभागानेच काढून घेतला आणि नंतर दुसरीकडे त्या लेखाशीर्षाखाली वर्ग करण्यात आला.

नाबार्डमुळे किती निधी गेला अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रधानशीर्ष ४०५९ कार्यालयीन इमारतीचा खर्च या लेखाशीर्षामध्ये वित्त विभागाच्या कपातीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून २६.४३ लक्ष रुपये काढून घेण्यात आले. प्रधानशीर्ष ४०५९ कार्यालयीन इमारती जिल्हा प्रशासन राज्य योजना मोठी बांधकामे यामध्ये २३.७९ कोटी रुपये कपातीमुळेकाढून घेण्यात आले.

समितीने २०० कोटी रुपयांची झालेली कपात सोडून चर्चा करीत आहे. त्या शिवाय जे पैसे परत गेले त्याची कारणे सांगावीत. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, न्यायदानामध्ये केंद्र शासनाचे पैसे आलेले होते. त्यावेळेस तत्कालीन सचिवांनी ते पैसे पूर्ण खर्च झाले पाहिजेत असा आग्रह धरला होता म्हणून विधी व न्याय विभागाने वित्त विभागाच्या सहमतीने ठेव अंशदान म्हणून ते पैसे वर्ग करण्याची परवानगी मिळविली होती. परंतु बजेटचे पैसे डिपॉझिटला वर्ग करण्याच्या विभागाच्या कृतीला महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यामुळे आणि प्रोसिजरल नसल्याने ते स्वाभाविक आहे, या ऑब्जेक्शनपोटी विभागाने केलेला खर्च त्यांनी गृहित धरला नाही परिणामी ते पैसे कट म्हणून दिसतात किंवा ते खर्च झालेले नाहीत म्हणून दिसतात. दुसरे मत्स्यव्यवसाय विभागाचे आहे. ज्यामध्ये लोकांनी विरोध केल्यामुळेअर्नाळा येथे योजनाच करता आली नाही.

आता आपण हेडवाईज चर्चा करु कारण समाधानकारक सरेंडरबाबत निधी हा पुर्नविनियोजन केल्याचे दाखविण्यात आले आहे. परंतु, हेडवाईज पाहताना समितीला असे दिसून येत नाही. समितीला ३ हजार, ४ हजार, ८ हजार असे दिसतात आणि विभागाकडून सांगण्यात येते की, कोणतेही कारण नसताना पुर्नविनियोजन दाखविलेले आहे आणि विभागाकडून सांगण्यात येते की, त्यांनापैसे मिळालेले नाहीत. याबाबत समितीला स्पष्ट करावे असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी आश्वस्त केले की, याबाबतचे एक टेबल तयार करुन ते समितीला सादर करण्यात येईल.

विभागीय सचिवांकडे समितीच्या बैठकीच्या वेळी जर माहिती देता येत नसेल तर समितीच्या बैठकीत होणाऱ्या साक्षीला काहीच अर्थ नाही. एकीकडे विभागाकडून सांगण्यात येते की, 36 कोटी रुपये सरेंडर केले. मात्र शिर्षाप्रमाणे पाहिले तर सरेडर दिसत नाही. समितीला पुनर्विनियोजन दिसत आहे. विभागाकडून सांगण्यात येते की, 30 टक्के कट लावला पण वित्त विभागाचा कट 20 टक्के आहे. त्यामुळे 30 टक्के कट याबाबत समितीने विभागास खुलासा करायला सांगितला. यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की,पुरवणी

मागणीमध्ये जे पैसे अंतिमत: रिलिज झाले पाहिजे होते ते जर अवितरित राहिले असतील तर तोही खर्च यामध्ये दिसणार आहे. ८० टक्क्यांबाबत असे आहे की, त्याची फिगर २४२ कोटी रुपये होते. मात्र पुरवणी मागण्यांमध्ये जे पैसे डिसेंबर किंवा मार्च महिन्याच्या सप्लीमेंटरी मध्ये येतात ते पैसे वितरित झाले नसल्यास ते अवितरित दिसले असतील. विभागाला पैसे मिळाले आणि खर्च केले नाहीत, अशी बाब फार कमी आहे.

विभाग २० टक्यांप्रमाणे २४२ कोटी रुपये ही अमाऊंट कोणत्या आधारावर आहे. कारण मूळ रक्कम १०८७ कोटी २४ लाख १२ हजार रुपये आहे त्या अनुषंगाने २१७.४४ कोटी रुपये होतात. मग सप्लीमेंटरीचे १२६ कोटी १३ लाख १९ हजार रुपये पूर्ण मिळाले नाहीत असे गृहीत धरले तरी, २५ कोटी रुपये राहतात. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मत्स्य व्यवसाय विभागाच्या २ मोठ्या योजना आहेत. त्यामध्ये पैशांची बचत झालेली आहे. त्या योजनांना विरारच्या पुढच्या लोकांनी विरोध केला होता. म्हणून पूर्ण होऊ शकले नाही

<u>प्रधानशीर्ष ४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च, १०३ सागरी मत्स्यव्यवसाय पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, (०२) (०१) लहान मासेमारी बंदरे-केंद्रीय पुरस्कृत योजना मोठी बांधकामे</u>

लेखाशीर्षांतर्गत एकूण १५ कोटी ३९ लाख ११ हजार रुपये सरेंडर केलेले आहेत. या अंतर्गत आनंदवाडी, देवगड येथे मासेमारी बंदर बांधावयाचे होते. त्याला विरोध झाल्याने ते काम बंद झाले. कारंजा, ता. उरण येथे मासेमारी बंदर बांधावयाचे होते. त्याला विरोध होता ते काम करता आले नाही. अर्नाळा ता. वसई, जि. ठाणे येथे मासेमारी बंदर बांधावयाचे होते, त्याला विरोध होता ते करता आले नाही. श्रीवर्धन या ठिकाणी मत्स्यव्यवसाय विभागाने मासेमारी बंदर कामाचा आराखडा वॅबकॉस या सल्लागाराकडून तयार करुन घेण्याचे व अन्य ठिकाणी दुसऱ्या योजनेतून हे काम घ्यायचे ठरविल्यानेया योजनेतून एवढे पैसे विभागाच्या सहमतीनेच सरेंडर केले.

<u>प्रधानशीर्ष 4059 सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, ०३ न्यायदान केंद्र पुरस्कृत योजना राज्य हिस्सा (योजनांतर्गत)(०३) (०१) मोठी बांधकामे</u>

यासंदर्भात प्राप्त तरतुदीपैकी रु. १७०८.३२ लाख एवढी तरतूद मुंबई रायगड, रत्नागिरी, अहमदनगर, जळगाव, धुळे, गडचिरोली व विद्युत यांच्याकडील विविध कामास खर्च होऊ शकली नाही, याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, याचेमुख्य कारण असे आहे की, बांद्रे येथे फॅमिली कोर्ट बांधावयाचे होते. मात्र आजही त्या इमारतीचे काम सुरु होऊ शकलेले नाही. अगोदर या १५ प्लॉटवर जो काही एफएसआय होता त्यानुसार आम्हाला ५ किंवा ६ मजली इमारत करता येत होती. परंतु, मुंबईतील न्यायालयांची संख्या आणि फॅमिली कोर्टाची आवश्यकता लक्षात घेता ४३ फॅमिली कोर्ट बांधणे आवश्यक असल्याने हायकोर्ट बिल्डींग कमिटीने याबाबतीत शासनाला आदेश दिले. त्यानुसार येथे एफएसआय वाढवून घेऊन आपण आता या स्टेजला G + १३ च्या इमारतीचे रिवाईज एस्टिमेट मंजूर करुन घेतलेले आहे. आता सुध्दा बांधकामाला एक अडचण आलेली

आहे ती म्हणजे तेथे सीआरझेडची लाईन प्लॉटवर घेतलेली आहे. आता सीआरझेडचे क्लिअरन्स मिळाला असून या वर्षी त्या कामाला सुरुवात करण्यात येत आहे. या स्टेजपर्यंत हे काम आणले आहे. जेथे खरोखरीच अडचणी आहेत अशा ठिकाणीच विभागाने पैसे सरेंडर केलेले आहेत.

रायगड, रत्नागिरी, अहमदनगर या ठिकाणी काय अडचण होती ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, रायगडमध्ये नवीन कामे आली होती. नंतर ही कामे सुरु झाली. अलिबाग येथील न्यायालय इमारतीचे काम मंजूर होते. परंतु पहिले तीन महिने काम करता आले नाही. तांत्रिक मंजुरी आणि निविदा प्रक्रिया यामुळे अडचण निर्माण झाला.

विभागीय सचिवांनी अशा प्रकारे व्हेग उत्तर देण्यापेक्षा निधी प्रत्यक्षात कधी प्राप्त झाला, तांत्रिक मंजुरी कधी मिळाली, निविदा प्रक्रिया कधी सुरु झाली, वर्क ऑर्डर कधी देण्यात आली व काम कधी सुरु झाले, अशी सविस्तर माहिती दिली. तर समितीला काम करणे सुकर होईल असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पनवेल येथील कामाची वर्क ऑर्डर दिनांक १/२/२०१३ रोजी दिली होती. हे काम डिसेंबर, २०१२ मध्ये मंजूर झाले होते परंतु, त्या वर्षी तेवढे काम होऊ शकले नाही. अलिबागचेही तसेच आहे. अलिबाग येथे सत्र न्यायालय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी १४१ लक्ष रुपये प्राप्त झाले होते. त्यासाठी वर्क ऑर्डर २६/११ ला झाली आहे.

जुलै महिन्यात निधी प्राप्त झाल्यानंतर विभागाने वर्क ऑर्डर चार महिन्यानंतर दिलेली आहे. वास्तविक पाहता, दोन महिन्यात वर्क ऑर्डर देणे गरजेचे होते. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीचे म्हणणे बरोबर आहे. या प्रक्रियेमध्ये बराच विलंब होतो. त्यामुळे विभागाच्या प्रधान सचिवांनी एक संयुक्त बैठक घेतली होती व त्यामध्ये असे ठरविण्यात आले आहे की, साधारणपणे अडीच महिन्यात ही सर्व प्रक्रिया पूर्ण करुन वर्क ऑर्डर देण्यात यावी. दुसरी बाब अशी आहे की, न्यायालयीन इमारतींच्या कामाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार सार्वजनिक बांधकाम विभागाला नाहीत. न्यायालयाची स्वत:ची इन्फ्रास्ट्रक्चर कमिटी आहे व त्यांच्याकडून कामाबाबतचा निर्णय होत असतो.

एखाद्या कामासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली जाते. मार्च महिन्यानंतर साधारणपणे जूनपर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण होणे गरजेचे आहे. परंतु विभागाचा असा अनुभव आहे की, ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यापर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होत नाही. ही वस्तुस्थिती आहे. मागील बजेटमधील मंजूर कामे व प्रत्यक्षात त्यांच्या प्रक्रिया कधी पूर्ण झाल्या आहेत, हे एकदा विभागाने तपासावे. म्हणजे, ही बाब लक्षात येईल. या कामांबाबत निविदा प्रक्रिया कधी पूर्ण झाली आहे व वर्क ऑर्डर कधी देण्यात आली आहे, हे देखील विभागाने तपासावे. कारण आमदार झाल्यानंतर टर्मच्या पहिल्या बजेटमध्ये जी कामे मंजूर झाली होती ती कामे अजुनही सुरु आहेत. हा एक्झिक्युशनचा भाग आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, रस्त्यांच्या कामाच्या बाबतीत प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी साधारणपणे सहा महिन्यांचा कालावधी लागतो. हाच कालावधी अडीच महिन्यांपर्यंत कसा आणता येईल, हे विभागाकडून काळजीपूर्वक तपासण्यात येत आहे.

<u>प्रधानशीर्ष ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, (१३) कार्यालयीन इमारत (योजनांतर्गत) (१३) (०१) मोठी बांधकामे, (१३) (०२) आस्थापना खर्च, (१३) (०३) हत्यारे व सयंत्रे यावरील खर्च</u>

या अंतर्गत अंशदानामध्ये बचत दिसून येत आहे. आपण या लेख्यांवरील स्पष्टीकरणात असे म्हटले आहे की, "सदर रकमेचा लेखा महालेखापाल कार्यालयास सादर केला होता. सदर रकमेचा लेखा महालेखापाल कार्यालयाने स्वीकृत केला नसल्याने सदर बचत दिसून येत आहे." याबाबत खूलासा करतांना विभागीय सचिवांनी सांगितले की,या लेख्याची वस्तुस्थिती ही आहे की, हे काम अर्थसंकल्पात मंजूर झाले होते. तथापि हे काम डिपॉझिटकडे वर्ग करण्यास विभागाने वित्त विभागाची परवानगी मागितली होती. वित्त विभागानेही या कृतीस आक्षेप घेतला नाही. परंतु, डिपॉझिटमध्ये खर्च वर्ग करण्यासाठी एक प्रोसिजर असते. ही कृती अकाऊंट कोडनुसार नाही, असा आक्षेप महालेखाकार यांनी घेतला. त्यामुळे हा खर्च बुक होऊ शकला नाही व बचत दिसत आहे. एकदा अर्थसकल्पात तरतूद केल्यानंतर ती रक्कम त्याच आर्थिक वर्षात खर्च केली पाहिजे व खर्च झाली नाही तर मॅन्युअलनुसार ती सरेंडर केली पाहिजे. बजेटमध्ये कामासाठी दिलेले पैसे डिपॉझिटला ठेऊन देऊन यथावकाश खर्च करणे योग्य नाही, हा महालेखाकार यांचा आक्षेप योग्य आहे. तथापि, येथून पुढे विभागाकडे सुधारणा करण्यात येणार आहे.

येथून पुढे खूप सुधारणा होणार आहे.पण या मुद्याबाबत स्पष्टीकरण द्यावे. असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की,महालेखाकार यांचा आक्षेप विभागाने मान्य केला आहे. हा खर्च डिपॉझिटला टाकणे बरोबर नाही.

महालेखाकार यांनी आक्षेप काढणे आणि विभाग ती चूक कबुल करणे, एवढ्याने हा विषय संपणार नाही. या कृतीस कोण जबाबदार आहेत ? अशी विचारणा विभागीय सचिवांनी केली असता, वित्त विभागाच्या मान्यतेने असा निर्णय घेण्यात आला होता. असे विभागीय सचिवांनी समितीच्या बैठकीत वित्त सचिव उपस्थित असल्याचे त्यांनी समितीला सांगितले की,सदरची फाईल बघितल्याशिवाय याबाबत काही सांगता येणार नाही. महालेखाकार यांनी सदर नस्ती समितीस दाखविली असता समितीने असे मत व्यक्त केले की, विभागाची ही कृती नियमानुसार नाही. सार्वजनिक बांधकाम या विभागाने वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला. कारण, तो साताऱ्याशी संबंधित विषय होता. वित्त विभागाने या प्रस्ताव मान्यता दिली कारण तो साताऱ्याचा विषय होता. वास्तविक पाहता अशा प्रकारे नियमात न बसणारा चुकीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने पाठवावयास नको होता व वित्त विभागानेही मंजूर करावयास नको होता. हे काम केवळ साताऱ्याचे होते म्हणून आपण हा प्रस्ताव पाठविला का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यावर अशा प्रकारचा प्रस्ताव पाठविणे आणि मंजुरी मागणे चुकीचे होते, हा महालेखाकार यांचा आक्षेप योग्य

आहे, हे विभागाने यापूर्वीच मान्य केले आहे. त्यामुळे विभागाचे जनरल उत्तर समितीने मान्य करावे, अशी विनंती विभागीय सचिवांनी समितीस केली.

विभागाने अनेक लेख्यांबाबत नोट ऑफ एरर न दिल्यामुळे हे लेखे पुस्तकात आले आहेत. विभागाने नोट ऑफ एरर का सादर केलेले नाहीत ? अशी विचारणा विभागीय सचिवांनी केली असता या संदर्भात आढावा घेतला असून ज्या ज्या अधीक्षक अभियंता किंवा कार्यकारी अभियंता स्तरावर लॅप्सेस झालेले आहेत, खर्च तपासलेला नाही, काम केले नाही, त्यांच्याविरुध्द ॲक्शन घेतलेली आहे. यावर समितीने विभागाचे कोणाविरुध्द काय ॲक्शन घेतलेली आहे, याची एकत्रित माहिती समितीला सादर करावी, असे निदेश दिले. सदर माहिती समितीस सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

<u>०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, (१२) निरीक्षण बंगले, विश्रांतीगृह (योजनांतर्गत) राज्य योजनांतर्गत योजना (१२) (०२) आस्थापना खर्च</u>

यासंदर्भात कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांचेकडून रु.३,८३,२४९/- इतका खर्च या लेखाशिर्षाखाली नोंदविल्यामुळे रु.३.८४ लाख एवढा अधिक खर्च दिसून येत आहे. याबाबत खुलासा करावा असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ०१ कार्यालयीन इमारती, ०५१ बांधकाम, (२४) उपनिबंधक, नोंदणी व मुद्रांक विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम, (२४) (०१) मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली नोंदविला आहे. त्यामुळे ३.८४ लक्ष रुपये जास्त खर्च दिसत आहे. याबाबत संबंधितांनी नोट ऑफ एरर द्यावयास हवी होती. ती दिलेली नाही. त्यामुळे संबंधितांविरुध्द विभागाकडून ॲक्शन घेण्यात येत आहे.

<u>प्रधानशीर्ष ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च, ०१ नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य), ११० रुग्णालये व दवाखाने पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ०१ इमारती, (०१) (०२) आस्थापना खर्च</u>

यावर सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षातील खर्चाची नोंद महालेखापाल कार्यालयाने सन २०१२-१३ मध्ये दर्शविली आहे. त्यामुळे रु.५७.५६ लाख इतका अधिक खर्च दिसून येत आहे. याबाबत खुलासा करतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०११-१२ मध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने वित्त विभागाची मंजुरी घेऊन त्यांचा निधी ठेव अंशदान ठेवण्यासाठी मंजुरी दिली होती. परंतु हा खर्च महालेखापालांनी त्यावेळी डिसअलाऊ केला. त्यामुळे हा खर्च पुढील वर्षी कॅरीफारवर्ड झाला आहे. हे लेखाशीर्ष डिपॉझिटचे होते. पण तो खर्च अलाऊ होत नसल्यामुळे या हेडला वर्ग केला आहे. त्या हेडला ते पैसे मिळाले व पूर्ण खर्च झाले आहेत. परंतु, डिपॉझिटला केलेला खर्च या हेडला वर्ग केला आहे त्यामुळे जास्त दिसतो आहे. सन २०११-१२ ची तरतूद पूर्ण खर्च केली आहे. त्या काळात विविध विभागांनी डिपॉझिटला पैसे ठेवणे सुरु केले होते. कारण,

डिपॉझिटचे पैसे पुढील दोन वर्षात खर्च करता येतात. सन २०११-१२ या आर्थिक वर्षात तरतूद होती. ती पूर्ण खर्च केली आहे. पण डिपॉझिटखाली खर्च होता. तो डिसअलाऊ केल्यामुळे कोठे तरी बुक करणे आवश्यक होते.

अशा प्रकारे खर्च करणे योग्य आहे का ? असे महालेखाकांरानी विचारले असता अशाप्रकारे खर्च करावयास नको होता असे उत्तर विभागीय सचिवांकडून प्राप्त झाले.

डिपॉझिट हेडखालील पैसे या हेडकडे का वर्ग करण्यात आले ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०११-१२ या आर्थिक वर्षात जी कृती केली होती ती योग्य नव्हती. परंतु, हा खर्च कोठे तरी बुक करणे आवश्यक होते म्हणून या लेखाशीर्षाखाली केला आहे. प्रोसिजर चुकलेली आहे, हे विभागाने मान्य केले आहे.

विभागाचे इंटेनशन चांगले आहे. परंतु हे पूर्वोदाहरण होऊ नये. विभागाच्या अधिकाऱ्यांनी वित्त विभागाची परवानगी घेऊन ही कृती केली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता ही पध्दत बंद केली आहे. सध्या वर्कवाईज पैसे देण्यात येतात.

इमारत बांधकामाबाबत समितीला असे सांगावयाचे आहे की, ९५ टक्के काम पूर्ण झालेले असते. परंतु, बांधकाम संबंधित विभागाकडे हॅण्ड ओव्हर होत नाही. यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाकडून दर तीन महिन्यांनी आढावा घेण्यात येत आहे. आतापर्यंत २० न्यायालयीन इमारती हॅण्ड ओव्हर केलेल्या आहेत. इतर विभागांच्या बाबतीत अडचण होती. पण याही बाबतीत काम पूर्ण झाल्यानंतर३ महिन्यात इमारत हॅण्डओव्हर करण्याबाबतचा निर्णय घेतला आहे. पाणी पुरवठा, विद्युत जोडणी प्राप्त झाल्यानंतर हॅण्ड ओव्हर करणे आवश्यक आहे. तशा सूचना पाठविल्या होत्या व आतापर्यंत ८९ इमारती हॅण्ड ओव्हर झाल्या आहेत.

वाशिम येथील जिल्हा सत्र न्यायालयाची नव्याने बांधण्यात आलेली इमारत १०० वर्षे जुनी दिसते आहे. सार्वजनिक बांधकाम सचिवांनी यासंदर्भात विशेष समिती नेमावी व बांधकामाची चौकशी करावी असे निदेश समितीने विभागीय सचिवांना दिले असून सन २०१६ च्या हिवाळी अधिवेशनात सदर इमारतीला भेट देऊन पहाणी करण्यात येत आहे असे अश्वस्त केले.

<u>प्रधानशीर्ष ४२२५ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च, ०१ अनुसूचित जातीचे कल्याण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना इमारती २७७ शिक्षण, (००) (०१) मोठी बांधकामे, (००) (०२) आस्थापना खर्च, (००) (०३) हत्यारे व सयंत्रे यांवरील खर्च</u>

या तिन्ही ठिकाणी कोणतीही प्रोव्हीजन नसताना पैसे मिळाले आणि खर्च झाल्याचे दाखविले कोणत्या आधारे दाखविले आहे यासंदर्भात खूलासा केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या पध्दतीने

औरंगाबादच्या संदर्भात ३.८४ लाख रुपयांच्यासंबंधी स्पष्टीकरण दिले की, त्याच पध्दतीने हे त्यासारखेच आहे. सन २०१०-११ मध्ये निधी होता आणि उपभोक्ता विभागाने वित्त विभागाच्या अनुमतीने ते डिपॉझिट करण्यास परवानगी दिली. डिपॉझिटचा खर्च डिसअलाऊ झाल्यानंतर तो या लेखाशीर्षाखाली दिसायला लागला म्हणून तो जादाचा खर्च आहे. तिन्ही ठिकाणी असेच झाले आहे. एक चूक सगळीकडे रिपीट झाली आहे. बाकी काही नाही.

पण हे करणे शक्य आहे यावर विभागीय सचिवांनी सांगितले की,त्यावेळी आपण ज्याला कॉमन म्हणतो त्या पध्दतीने झाले आहे.

इसमें आपको जितना मिला उतना पूरा का पूरा आपने सरंडर कर दिया, जब कि उस हेड में खर्चा होना चाहिए था. ही बाब महालेखाकांरानी निदर्शनास आणून दिली.

यामध्ये ४३ कोटी ४७ लाख ८२ हजार रुपये विभागाची प्रोव्हीजन होती. ही संपूर्ण रक्कम सरेंडर करुन टाकली आणि मूळ अनुदान आता शिल्लक राहिलेले नाही.ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी ही तरतूद वितरीतच झाली नसल्यामुळेविभागानी ती समर्पित केली आहे असे सांगितले.

मग विभागाने हा निधी खर्च कोठून केला आहे. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, हा निधी त्याच्या आधीच्या म्हणजे सन २०११-१२ मध्ये सामाजिक न्याय या विभागाने हा निधी त्यांच्याकडून खर्च होत नसल्यामुळे हा निधी डिपॉझिट हेडला घेण्यास परवानगी दिली होती.

डिपॉझिट हेडचा निधी येथे खर्च केल्याचे दाखविता येते काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,असे दाखविता येत नाही. ते चुकीचे होते. डिपॉझिट हेडला घेणे हे चुकीचेच आहे असे महालेखापालांनी निदर्शनास आणल्यानंतर तो झालेला खर्च कुठल्याही तरी हेडखाली दाखविणे भाग होते. आता खर्च झालेला निधी हा डिपॉझिट हेडचा आहे.

मग असा खर्च या हेडखाली दाखविणे कितपत योग्य आहे. आता या निधीचे रिकन्शीलिएशन अकाऊंटचा हिशेब कसा लागेल. उक्त तीनही हेडमध्ये ४ कोटी ६६ लाख, ५८ कोटी ८४ लाख रुपये आणि ४ कोटी २६ लाख ५७ हजार हा अधिकचा खर्च आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सन २०११-१२ चे हे तीनही खर्च महालेखापालांनी डिसअलाऊ केल्यामुळे ते आता येथे दिसतील. ही अनियमितता आहे व ती चुकीची आहे. या चुकीबद्दल विभागाच्या स्तरावर तीनही ठिकाणाहून स्पष्टीकरण घ्यावे लागेल.

पण समितीच्या मते हा निधी हेडमधून खर्च झालेला आहे. डिपॉझिट हेडमधून खर्च झालेला नाही.असे मत समिीने व्यक्त केले असता विभरगीय सचिवांनी सांगितले की, स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नाही. (००)(०१) मोठी बांधकामे याबाबत दिलेल्या सपष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद केले आहे की, सन २०११ मध्ये वित्तीय वर्षात ठेव अंशदान स्वरुपात निधी ठेवण्यास उपभोक्ता विभागाने अनुमती दिली होती. त्यामुळे नाशिक, जळगाव, औरंगाबाद, अमरावती आणि बीड या क्षेत्रीय कार्यालयांनी आवश्यक लेखा

महालेखापालांना सादर केले. सन २०११ या वर्षाचा खर्च डिसअलाऊ झाल्यानंतर तो ऑटोमॅटिकली कॅरी ओव्हर झाला आणि पुढील आर्थिक वर्षात तो खर्च एक्सेस दिसतो आहे.

मूळ तरतूद तशीच असताना याला आपण अधिकचा खर्च कसे म्हणणार आहोत. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०११-१२ मध्ये ते करणे सुध्दा चुकीचे होते हे विभागाने मान्य केले आहे.

पण हा अधिकचा खर्च आहे असे म्हणता येणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्याला नाव अधिकचा खर्च असे दिले आहे आणि त्याला जर दुसरे नाव देता येत असेल तर तसे होईल. सामाजिक न्याय विभागाने ४३ कोटी रुपयांची तरतूद वितरीत केली नाही. त्यामुळे या लेखाशीर्षाखालील निधी शून्य होता. आधीच्या डिपॉझिटमधील निधी आणि दरवेळी जो रुटींन निधी येत गेले असते तर ते कसे तरी ॲडजेस्ट करता आले असते. ते सुध्दा शक्य झाले नाही. डिपॉझिट हेडला त्यावेळी रिकन्साईल करायला हवे होते. त्यावेळी महालेखापाल महोदय किंवा त्यांच्या कार्यालयास सार्वजनिक बांधकाम विभागाने कन्व्हीन्स करायला हवे होते. तसे त्यावेळी करु शकलो नसल्याने हे अकाऊंटींग बरोबर दिसत नाही.

आता हे अकाऊंट बरोबर केले पाहिजे. असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, येथून पुढे आता विभागाकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. समितीने हे मान्य करावे अशी विनंती विभागीय सचिवांनी केली.

समिती हे कसे मान्य करेल. ज्यांनी अशी चूक केली आहे त्यांनाच जबाबदारी निश्चित केली पाहीजे. कारण अकाऊंटच्या मॅन्यूअलप्रमाणे हे चुकीचे आहे असे करता येत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०११-१२ ची आरोग्य विभागाची धारिका आणि वित्त विभागाची धारिका तपासून आम्ही याबद्दल समितीला माहिती सादर करण्यात येईल.

यामध्ये झालेल्या चुकीबद्दल संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. कारण सन २००१-१२ मध्ये डिपॉझिटच्या खर्चाची पोस्टींग मान्य केलेली नाही. आता सन २०१२-१३ मध्ये अधिकचा खर्च दिसतो तर तो अधिकचा खर्च नाहीच. डिपॉझिटमधील खर्चासंबंधी विभाग काही तरी सिस्टीम विकसित केली पाहिजे. कारण सिस्टीम तोडून विभाग काम करायला लागला तर कसे होईल. अकाऊंट सिस्टीम तर विभागाने पाळलीच पाहिजे. हे सर्व पाहिल्यानंतर असे दिसते की, अकाऊंट सिस्टीमचे व्हायोलेशन होत आहे. असे मत समिीने खेदाने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, असता सन २०११-१२ च्या दोन्ही विभागाकडील फाईल तपासून घेण्यात येईल.

सार्वजनिक बांधकामाचे विभागाअंतर्गत ऑडीट होत नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता इंटरनल ऑडीटच्या संबंधीविभागीय सचिवांनी सांगितले की, ज्यावेळी ते चिफ इंजिनिअर होतो आणि त्यावेळी असे म्हटले होते की, हा निधी सरेंडर करण्यात यावा. परंतु शासनाकडून त्यावेळी अशा सूचना आल्या

की, हा निधी शासनाकडे सरेंडर करायचा नाही. विभागाला जर ते वापरायचे असतील तर त्यासंबंधी अन्य पर्याय सांगावेत. त्या पर्यायांमध्ये एक असा पर्याय असतो की, काही निधी विभाग महामंडळांकडे वर्ग करु शकतो. तसे करणे शक्य असेल तर तो हा निधी खर्च होतेा. पण येथे तसे करणे विभागाला शक्य नव्हते. मग हा निधी डिपॉझिट हेडला ठेवता येईल काय हा एक पर्याय पुढे आला व त्यातून तसा सल्ला मिळाला असेल व त्याप्रमाणे हा निधी ठेवला असावा.

हा निधी खर्च केला त्याबद्दल वाद नाही. पण मिस-क्लासिफिकेशन झालेले आहे. मिस क्लासिफिकेशनमुळे या क्युरी आलेल्या आहेत. हि बाब समितीने निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मिस-क्लासिफिकेशन हे कोणत्या स्तरावर झाले या संदर्भात सन २०११-१२ ची सार्वजनिक आरोग्य विभागाची फाईल, सार्वजनिक बांधकाम विभागाची फाईल आणि वित्त विभागाची मंजूरीची फाईल या तीनही फाईल्स तपासून यावर माहिती सादरकरण्यात येईल.

सन २००८-०९, २००९-१०, २०१०-११, २०११-१२, २०१२-१३ या प्रत्येक वर्षी बचत मोठ्या प्रमाणात झाल्याचे एच-८ या हेडमध्ये दिसते. सन २००८-०९ मध्ये पाहिले तर सुरूवातीला ४५ कोटी ३७ लाख ९१ हजार रुपये आणि आता या वर्षी ३२४ कोटी ९६ लाख ८९ हजार पर्यंत गेलो आहोत. यामध्ये विभागाच्या अर्थसंकल्पाची संकल्पना समितीला योग्य वाटत नाही. कारण विभागाकडून तरतूद मोठ्या प्रमाणात करण्यात येते. मात्र निधी त्यानुसार खर्च होत नाही किंवा विभागाला निधी मिळाला नाही असे कारण सांगितले जाते, त्यादृष्टीने विचार करता अर्थसंकल्पित निधी सदोष असतो. मोठा फुगा दाखविला जातो आणि शेवटी निधी खर्च होत नाही असे दिसते आणि ही प्रक्रिया मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. असे मत समितीने व्यकत केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वर्षाच्या सुरूवातीला जे अनुदान मिळते ते जर तेवढे रिलिज झाले तर हे आकडे ऑटोमॅटिकली कमी होऊन जातील. केवळ काम होत नाही म्हणून निखळ सरेंडर जेथे विभागाने असे केले आहे किंवा त्या ठिकाणी परिणामकारक बजेट कसा खर्च करायचा आहे याबाबत सिस्टम तयार करता येईल. समितीने सुचविल्याप्रमाणे एक सुधारणा विभागामध्ये केलेली आहे की, जर एखादे काम अर्थसंकल्पात आले की, ते अडीच महिन्यांच्या आत ते सुरू करु असे नियोजन केलेले आहे. प्रधान सचिवांनी तसे निर्देश द्यावेत असे सर्क्युलर निर्गमित करीत आहोत. टप्पे ठरवून देण्यात येत आहे. निविदेचा कालावधी आपण आता कमी केला आहे. पूर्वी तो ४५ दिवसांचा होता. पहिल्या टप्प्यात तो २५ दिवसांचा होता. निविदेला प्रतिसाद मिळाला नाही तर तो १५ दिवसांचा केला आहे. समितीला हे ज्ञात आहे. अशा प्रकारे कालावधीच्या सिस्टीममध्ये सुधारणा करीत आहोत. वित्तीय मर्यादा येते आणि त्यामुळे कट लागतो असे आपण जे म्हणतो ती आर्थिक मर्यादा वर्षाच्या सुरूवातीलाच कळते. त्यामुळे पुढे मागे आता तोही प्रश्न उद्भवणार नाही.

याअनुषंगाने समितीने सूचित केले की,टेंडर सबमिशन झाल्यानंतर त्या कामांच्या वर्क ऑर्डर्स आपण १५ दिवसात इश्यू कराव्यात. समितीचे असे म्हणणे नाही की, ते काम ७ दिवसात करावे. त्यासाठी जास्तीत जास्त १५ दिवस ठेवावेत. टेंडर सबमिशन झाल्यानंतर २-२, ३-३ महिने वर्क ऑर्डर इश्यू होत नाहीत. यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विभागाने मंडळ स्तरावर ७ दिवस आणि प्रादेशिक विभाग स्तरावर निविदेवर ७ दिवसात निर्णय होईल. ही बाब प्रधान सचिव महोदयांनीच सांगितली आहे आणि त्यांच्या सहीनेच याबद्दलचे आदेश निर्गमित होतील. विभागीय सचिवांनी केलेल्या उक्त खुलासा समितीने मान्य केला पणयामध्ये कंत्राटदाराला पत्र दिल्यानंतर पैसे भरायची मर्यादा १५ दिवसांची आहे. सिक्युरीटी डिपॉझिट भरल्याशिवाय आपण त्याला कार्यारंभ आदेश देऊ शकत नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता कंत्राट देताना कंत्राटदारांराना ७ दिवसांची मुदत द्यावी.असे समितीने सूचित केले याअनुषंगाने विभागीय सचिवांनी सांगितले की, असे विभागाला निविदेमध्ये सुधारणा करावी लागेल.

विभागीय सचिवांनी सूचविलेली सुधारणा निवेदेमध्ये करावा पण विभागाकडूनसिस्टीम तयार करण्यात येते तेव्हा सिस्टीममध्ये काय सुधारणा करायची ती करावी पण सिस्टीम फास्ट झाली पाहिजे. असे समितीने सूचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की,ज्या ठिकाणी मोठी कामे असतात त्या ठिकाणी आपण बँक गॅरंटीची तरतूद ठेवतो.

सिक्युरीटी डिपॉझिट २ टक्के आहे. १०० कोटींचे काम घेतले तर २ टक्क्यांप्रमाणे २ कोटी रुपये लागतात. २ कोटींची बँक गॅरंटी मिळणे फार कठीण काम नाही. ज्यावेळी तो कंत्राटदार १०० कोटी रुपयांचे कंत्राट भरतो त्यावेळी त्याची २ कोटी रुपये भरण्याची मानसिकता असते. त्यासाठी १५ दिवसांचा कालावधी कशाला हवा. जर त्याची २ कोटी रुपये बँक गॅरंटी भरण्याची क्षमता नसेल तर त्याने १०० कोटी रुपयांचे टेंडर कशाला भरायचे. कारण कंत्राटदार क्वॉलिफाईड असतात. त्यांची क्षमता एवढे मोठे काम घेण्याची असते. तेव्हाच तो अशी निविदा भरतो. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाचे विभागाकडे जे पत्र आलेले आहे. त्यामध्ये त्यांनी ३० दिवसांची मुदत मागितलेली आहे. ते मी एकदा पडताळून घेण्यात येईल यावर समितीने त्याला ७ दिवसांचा कालावधी द्यावा. वाटल्यास ८ दिवस मुदत द्यावी. असे सूचविले असता सध्याची प्रचलित मुदत १५ दिवसांची आहे ती ७ दिवसांवर आणता येईल काय याचा अभ्यास करुन निर्णय घेण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी ससमितीस सांगितले.

अनुदान क्रमांक एच-९ "प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च"

यामध्ये प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च या संदर्भात १४५ कोटी ११ लाख रुपयांची मूळ तरतूद आहे. विभागाचे यामध्ये सांगितले की, त्यापैकी ५८ कोटी ३० लाख ७० हजार रुपये सरेंडर

केले आहेत. यामध्ये २० टक्क्यांचे काही कारण आहे काय, २० टक्के असेल तर २९ कोटी रुपये कट झाले पाहिजेत. हा निधी प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी खर्च केले आहेत किंवा कसे? कारण याबाबत मागील ६ वर्षांची आकडेवारी समितीकडे आहे. सन २००७-०८ मध्ये ६४ कोटी, त्यानंतर सन २००८-०९ मध्ये ३३ कोटी, त्यानंतर सन २००९-१० मध्ये १९ कोटी आणि सन २०१०-११ मध्ये २८ कोटी व सन २०१२-१३ या वर्षी ६० कोटी असे दिसते. याची माहिती लेखाशीर्षनिहाय सविस्तर कोणत्या हेडला कोणती रक्कम कमी झाली आहे आणि त्याची कारणे कोणती. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी एच-९ या अनुदानाअंतर्गत असलेल्या लेखाशिर्षानुसार माहिती देताना सांगितले की,४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील हा खर्च आहे. यामध्ये ४० कोटी ५२ लाख २० हजार रुपये सरेंडर केले आहेत. यामध्ये सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात डिसेंबर मध्ये पुरवणी मागण्यांद्वारे ६३ कोटी ६८ लाख ९० हजार रुपये एकदम मिळाले.

डिसेंबर २०१२ ला विभागाला ६३ कोटी रुपये मिळाले का अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने एकत्रित तरतूद होती ती संपूर्ण खर्च करणे शक्य नव्हते. त्यामुळे त्या त्या एस.ई.नी त्यासंबंधी अभ्यास करुन त्या त्या वेळी तो तो निधी सरेंडर केलेला आहेत व त्या फिगर येथे दिलेल्या आहेत.

बॅकलॉगचा निधी मिळविण्यास किती त्रास होतो. याची जाणीव सर्वाना आहे. त्यामुळे जाणुनूबुजून अशा प्रकारचे कृत्य केले जाते. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तसे नाही. कारण सार्वजनिक आरोग्य विभागाचे एकंदरीत कामकाजाचे सन २०१२-१३ पासून विभागाकडे मॉनिटेरिंग होते आणि त्यासाठी खूप प्रयत्न केले आहेत. विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या वर्षी एस.ई. ठाणे यांनी ४ कोटी ५२ लाख रुपये सरेंडर केले. त्याची कारणे शोधली गेली तेव्हा असे लक्षात आले की, ठाणे जिल्हा त्यावेळी एकत्रित होता. विक्रमगड आणि खेडूत या दोन ठिकाणी जागाच मिळाली नव्हती. विक्रमगडच्या ग्रामीण रुग्णालयाची जागा अजूनही मिळालेली नाही. बदलापूर येथील वाणगाव, पालघर येथील नकाशे मिळालेले नाहीत. टोकावडे येथील काम सुध्दा त्यामुळे करता आले नाही. अशीच स्थिती रायगडमध्ये झाली. रायगडमध्ये विभागाने काम करण्याचा प्रयत्न केला. ५ कोटींपैकी त्यांनी ३ कोटी रुपये खर्च केले तर २ कोटी रुपये सरेंडर केले. पनवेल ग्रामीण रुग्णालयाच्या बांधकामाची ऑर्डर होऊ शकली नाही आणि श्रीवर्धन येथील काम पूर्ण झाले होते पण तरतूद दुप्पट उपलब्ध झाली होती.

बॅकलॉग म्हणून नाही तर कोणत्याही कामासाठी जो निधी जागेसाठी मिळतो तो पडून राहतो किंवा परत जातो त्यासंबंधी विभागीय अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींशी समन्वय केला पाहिजे. त्यांना पत्र दिले पाहिजे की, अमूक कामासाठी निधी आलेला आहे पण जागेअभावी हा निधी परत जात आहे, ही बाब त्यांच्या निदर्शनास आणावी व यासंबंधी पाठपुरावा करण्यास सांगावे.असे सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यांना सहमती

दर्शविली व प्रत्येक एस.ई.ना तशा सूचना देण्यात येते, तसेच प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील सन्माननीय सदस्यांच्या अशी बाब निदर्शनास आणावी. विभागाने जे अधिकारी आहेत त्यामध्ये अधिक्षक अभियंता असो, कार्यकारी अभियंता असो की, उप अभियंता असो त्यांनी जर स्थानिक लोकप्रतिनिधींना फॉलोअपसाठी सोबत घेतले तर तो पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांच्याकडे फॉलोअप करुन प्रश्न मार्गी लागू शकतो.

विभागीय सचिवांनी सांगितले की,सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव तसेच अन्य विभागाच्या सचिव म्हणजे तंत्रशिक्षण विभागाचे सचिव यांच्या एकत्रित तीन बैठका सार्वजनिक बांधकाम विभागासोबत झाल्या आहेत. जागांचा प्रश्न बहूतांशी सुटलेला आहे. पुढील वर्षी बॅकलॉगच्या हेडची सर्व कामे संपवून हे हेड्स बंद करायची असे ठरले असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. या अनुषंगाने समितीने सूचित केले की, विषय फक्त सार्वजनिक आरोग्य विभागापुरता मर्यादित सांगत नाही तर इन जनरल त्याबद्दल विचार विभागाने करावा.

या अनुषंगाने समितीने इथे असे व्यक्त केले की, ज्या ज्या ठिकाणी असा प्रकार आहे त्या ठिकाणी असे केले तर त्या त्या क्षेत्रातील सन्माननीय सदस्यास त्याच्या मतदार संघाचा विकास करण्याची चिंता विचारात घेऊन ते पुढाकार घेतील. यावर विभागीय सचिवांनी यामध्ये काहीही अडचण नाही. निश्चितपणे तश्या सूचना देण्यात येतात.

<u>प्रधानशिर्ष ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च ०४ सार्वजनिक आरोग्य २०० इतर कार्यक्रम</u>

या अंतर्गत ४० कोटी ५२ लाख २० हजार रुपये सरेंडर केले, त्याची कारणे काय आहेत. अशी विचारणा समितीने केली असता जे ४० कोटी रुपये सरेंडर केले ते ठाण्यामध्ये एकूण ६ कामे सुरू करु शकलो नसल्यामुळे एस.ई. ठाणे यांनी ४ कोटी ५२ लाख रुपये सरेंडर केले आहेत. रायगडमधून २ कोटी २० लक्ष रुपये सरेंडर झाले आहेत. ३ कोटी ३ लक्ष रुपये वापरले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यासाठी ६४ लक्ष रुपयांची तरतूद होती त्यापैकी ५१ लक्ष वापरले आणि १२ लक्ष सरेंडर झाले आहेत. मंडणगड येथील कुठले तरी एक काम पुढे होऊ शकले नाही. पुणे जिल्ह्यासाठी १२०३ लक्ष तरतूद होती. त्यापैकी १०४७ कोटी अनुदान सुधारित करण्यात आले आणि १०१ कोटी त्यांनी सरेंडर केले आहेत. म्हणजे कामाच्या प्रगतीनुसार खर्च करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. जेथे शक्य नव्हते तेथे खर्च झालेला नाही. सातारा जिल्ह्यासाठी ८८० लक्ष तरतूद होती, त्यापैकी ३८० लक्ष रुपये खर्च झाले आहेत आणि ४९४ लक्ष सरेंडर झाले आहेत. सोलापूर जिल्ह्यासाठी ७६७ लक्ष तरतूद होती, अंतिम सुधारित अनुदान६१३ लक्ष होते. त्यापैकी १५३ लक्ष निधी ते खर्च करु शकले नाहीत. माझ्या माहितीनुसार सोलापूरमध्ये मंद्रूप नावाचे जे गाव होते त्या ठिकाणी ग्रामीण रुग्णालयाबद्दल वाद निर्माण झाला होता आणि त्यामुळे ते काम करता आले नाही. कोल्हापूरमध्ये ६०८ लक्ष तरतूद होती, ३४१ लक्ष अंतिम सुधारित अनुदान होते आणि त्यापैकी २६७ लक्ष निधी खर्च होऊ शकला नाही. अहमदनगर जिल्ह्यासाठी १०१२ लक्ष इतकी तरतूद होती. ८९७ लक्ष इतका निधी खर्च झाला आणि १ कोटी रुपये ते खर्च करु शकले नाहीत.

म्हणजे आता मुद्दा असा आहे की, विभागाने नियोजन मागणी आणि उपलब्ध निधी यावरुन असे दिसते की, निधी उपलब्ध नसल्यामुळे कामे होत नाहीत. काही ठिकाणी निधी उपलब्ध असताना काम होऊ शकत नसल्यामुळे निधी सरेंडर केला आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बॅकलॉगच्या या लेखाशीर्षांसंदर्भात ग्रामीण रुग्णालयांच्या बाबतीत जो बृहत आराखडा सार्वजनिक आरोग्य विभागाने तयार केला व त्यासंबंधीची जी कामे करावयाची होती त्या कामांच्या संदर्भात जागा उपलब्ध नसल्यामुळे तो निधी सरेंडर झाला आहे.

जागा नसताना त्यांनी निधी देऊन टाकला काय, विभागाने काहीही समजून सांगितले तरीसमितीला ते मान्य नाही. या अनुषंगाने समितीने उदाहरण दाखल सांगितले की, ४ कोटीचे बांधकाम गोंदिया येथे बॅकलॉगसंबंधी घेतले होते. तेव्हा टप्प्याटप्प्याने निधी मिळाला, कारण ते सांगण्यात येते की, निधी नाही. गोंदियाला बॅकलॉगमध्ये पॉलिटेक्निक कॉलेज आहे त्यासाठी रखडत रखडत निधी मिळतो आणि या ठिकाणी विभागीय सचिवांनी सांगितले की, निधी उपलब्ध आहे हे कसे ? बॅकलॉग दूर करण्यासाठी संपूर्ण निधी वितरीत केला जातो काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंबंधी ते सार्वजनिक आरोग्य विभागासंबंधी बोलून घेतील.

कोणताही विभाग असो, सार्वजनिक आरोग्य असो, शिक्षण विभाग असो, उच्च शिक्षण विभाग असो, या विभागाअंतर्गत ज्या कामांना प्रशासकीय मान्यता दिल्या असतात त्यांचा संपूर्ण निधी उपलब्ध नसतो. असे कधीच होत नाही की, प्रशासकीय मान्यता मिळाली आहे म्हणून त्यासाठी संपूर्ण निधी वितरीत केला पाहिजे. खर्च झाले नाही, सरेंडर केल्याचे दाखवावे. हि बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, असे मत विभागीय सचिवांनी दिले असता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत असे झालेले आहे ही वस्तुस्थिती आहे. पण तंत्रशिक्षण विभागाची तशी परिस्थिती नाही. तेथे वेगळी स्थिती आहे.

जो बॅकलॉगचा निधी आहे तो राज्य शासनाचा असल्यामुळे तो घेऊन टाकायचा आणि जर तो खर्च होऊ शकणार नसेल तर तसे आपण सांगू शकत नाही काय, असे केले असते तर तो आऊट-ले दुसरीकडे कुठे तरी वितरीत झाला असता. त्यामुळे बचत आणि अधिकचा खर्च हे दोन्ही विषय वित्तीय शिस्तीला धरुन नाहीत. एका बाजूला विभागाकडे निधी शिल्लक आहे, पण ते काम करु शकत नाही हे जस्टीफाय विभागाकडून करण्यात येते. एखाद्या ठिकाणी जागा मिळाली नाही म्हणून खर्च होऊ शकला नाही ही बाब मान्य आहे. पण जर अशी सिस्टीम असेल की, शासनाने पूर्ण निधी दिला तरी आपण पूर्णपणे खर्च करु शकणार नसू तर तो निधी का स्वीकारायचा ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंबंधी विभागीय सचिवांनी नोंद घेतली असूनयेथून पुढे जागा उपलब्ध नसेल तर अशा निधीची मागणी करु नये असे सांगण्यात येईल.

पण जर जागा असेल तर, त्यामध्ये टेंडर प्रक्रिया, वर्क ऑर्डर आणि त्यानंतर काम सुरू करण्यात होणारा विलंब हे गृहित धरुनच शासनाकडून निधी मिळविला पाहिजे. असे केले तर हा निधी बचत झाल्याचे किंवा

सरेंडर करण्याचा प्रश्न येणार नाही. विदाऊट लॅण्ड प्रशासकीय मान्यता मिळतच नाही. विदाऊट लॅण्ड प्रशासकीय मान्यता कोणीही देऊ शकत नाही. जागा उपलब्ध नसताना टेंडरही काढता येत नाही. टेंडर न काढता पैसे कसे घेण्यात येतात. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की,सन २०१०-११ व सन २०११-१२ ला धडक कार्यक्रम नव्हता, केंद्र सरकारचे पैसे मिळणार होते, त्यामुळे त्यावेळी योजना तयार करून काम करण्यात येणार होते.

निधी मिळणार होता असे विभागीय सचिवांनी सांगितले पणअसे नाही, विभागाला पैसे मिळाले हि बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता यावर विभागीय सचिवांनी सांगितले की,योजना तयार करून केंद्र सरकारकडे सबमिट केली होती, ती न्यायालयीन व आरोग्य विभाग यांची होती, त्यांनी कामे निवडली.

केंद्र सरकारचा पैसा न मिळता, रिईम्बर्स होईल म्हणून ॲडव्हान्समध्ये देऊन टाकले, असे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, खर्च केला तर रिईम्बर्समेंट मिळणार होती, त्यामुळे त्यांनी बजेट दाखविले. पण खर्च होऊ शकला नाही. मात्र विभागीय सचिवांनी केलेला सदर खूलासा समितीस योग्य वाटला नाही. या अनुषंगाने विभागीय सचिवांनी अश्वस्त केले की,येथून पुढे काळजी घेण्यात येईल.

विभागाला निधी मिळणार आहेत, जर जास्त खर्च दाखविला तर जास्त पैसे मिळतील. हे सर्व ऑप्टिमिस्टिक आहे. विभागाकडून खर्चच होणार नव्हता तर पैसे मिळणार कसे होते ? जोपर्यंत यूसी देणार नाही तोपर्यंत विभागाला रिईम्बर्समेंट कशी मिळणार ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी विभागाकडे सांगितले की, प्राप्त झालेल्या मागच्या वर्षी नाबार्डकडून एकूण ६४५ कोटी रूपयांची तरतूद होती. डिसेंबरपर्यंत खर्च होत नव्हता. फक्त ११० कोटी रूपयांचा खर्च झाला होता. विभागाने प्रयत्न केला, ६१५ कोटी रूपये खर्च केले आणि रिईम्बर्समेंट मिळविली.

<u>प्रधानशिर्ष ४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व सांस्कृतिक कार्य यावरील भांडवली खर्च०२ तंत्र शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना इमारती राज्य योजनांतर्गत योजना १०३ तंत्रशाळा (००)(०४) मोठी बांधकामे</u>

या अंतर्गत विभागाने शिक्षण व क्रीडा यामध्ये देखील खूप पैसे सरेंडर केले आहेत. जवळपास ७ कोटी ५२ लाख ५४ हजार रूपये व १ कोटी ४ लाख ६० हजार रूपये सरेंडर केले आहेत. अशी विचारणा समितीने केली असता यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, या लेखाशीर्षाखाली ७५०.४५ लाख रूपये अप्राप्त आहेत. विभागाने इफेक्टिव्ह सरेंडर २ लाख रूपये एवढेच केले आहे.

पण सरेंडर अमाऊंट २ लाख ९ हजार रूपये आहे. ७५०.४५ लाख रूपये उपलब्ध झाले नाहीत.

अनुदान क्र.एच-3 "गृहनिर्माण" :-

अभिप्राय व शिफारस

3.3 सन 2012-13 मध्ये मागणी क्र. एच – ३ "गृहनिर्माण" या लेखाशिर्षा अंतर्गत एकूण अनुदान .465,27,11,000/- प्राप्त झाले होते. त्यापैकी .468,81,13,000/- एवढे अनुदान खर्च झाले आहे. परिणामी .3,53,92,000/- एवढा अधिकचा खर्च झाला आहे. यामध्ये अधिक खर्च नियमात बसविणे आवश्यक असून जुलै,२०१२ मध्ये .220,64,00,000/- इतक्या रकमेची घेतलेली पूरक मागणी अपुरी होती. तसेच मार्च,२०१३ मध्ये .46.88 लाख इतका परत केलेला निधी योग्य नव्हता. असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे.

3.4 उपरोक्त लेखाशिर्षा अंतर्गत .3,53,92,000/- हा अधिक खर्च झालेला नसून तो आंतरलेखा हस्तांतरण उपशिर्षाखाली करताना समायोजनावरील फरक आहे. महालेखाकार आणि विभाग यांच्यामध्ये खर्चाची गणना करण्याची जी पध्दत आहे ती वेगवेगळी असल्याने आंतरलेखा समायोजनामध्ये फरक येतो. या पध्दतीतील तफावतीमुळे महालेखाकार व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या लेख्यांमध्ये तफावत दिसून येते व हिशोबाचा ताळमेळ न बसल्यामुळे महालेखाकारांकडून सदरहू आक्षेप नोंदविण्यात येतात. या दोघांमध्ये खर्चाची गणना करण्याच्या पध्दतीमध्ये समानता येत नाही तोपर्यंत खर्चामध्ये अशाप्रकारे तफावत येतच राहणार व लेख्यांचा ताळमेळ जुळू शकणार नाही. अत: यामध्ये अधिक सुस्पष्टता आणण्यासाठी व लेख्यांचा ताळमेळ जुळणेकरिता व पध्दतीमधील तफावत दुर करणेकरिता महालेखाकार व सार्वजनिक बांधकाम विभाग या दोन्ही विभागांनी एकत्रितरित्या प्रयत्न करुन पध्दतीमध्ये आवश्यक ते बदल व सुधारणा करण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

अनुदान क्र.एच-4 "सेक्रेटरीएट व इतर आर्थिक सेवा" :-

अभिप्राय व शिफारस

3.5 सन २०१२-१३ मध्ये मागणी क्रमांक एच -४- सेक्रेटरीएट व इतर आर्थिक सेवा या लेखाशिर्षांतर्गत .40,87,83,000/- एकूण अनुदान प्राप्त झाले आहे. त्यापैकी .31,10,30,000/- एवढे अनुदान खर्च झाले आहे परिणामी .9,77,53,000/- बचत झाली असून .9,73,61,000/- एवढी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे. अनुदान बचतीचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे हे लागोपाठचे आठवे वर्ष आहे असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे.

3.6 **विभागाने रिक्त पदे न भरल्यामुळे .9,73,61,000/- ही रक्कम सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात अखर्चित राहिल्यामुळे प्रत्यार्पित करण्यात आली आहे. ही रक्कम अखर्चित राहून प्रत्यार्पित केल्याचे हे पहिलेच**

वर्ष नसून गत 8 वर्षापासून अशाप्रकारे पदांसाठी केलेली तरतूद पदे रिक्त राहिल्यामुळे प्रत्यार्पित करण्यात येत आहे. ही तर अधिकच गंभीर बाब आहे. जर आठ वर्षे विभागाला पदे भरली नाहीत तरीही चालू शकते तर मग एवढ्या मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करण्याची आवश्यकता नाही. ज्यावेळी ही पदे भरण्याची प्रक्रिया सुरु होईल त्यावेळेस पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून हा निधी परत प्राप्त करुन घेता येवू शकतो. तसेच आठ वर्षापासून जर ही पदे रिक्त आहेत तर या पदांची आवश्यकता आहे किंवा कसे ? याचा पुनर्आढावा घेण्यात यावा. योजनांतर्गत व योजनेत्तर अनुदानाची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात येते. विभागाने रिक्त पदासाठी आवश्यक असलेली वेतनाची तरतूद दर्शविल्यामुळे विभागाचा निधी वाढलेला दिसतो. आकृतीबंध, वाढते शहरीकरण, विकास, पायाभुत सुविधांची वाढती गरज याअनुषंगाने विभागाकडे येणाऱ्या कामाची व्याप्ती पाहता पद निश्चिती करण्यात यावी व भरलेल्या पदांचा आढावा घेवून उपलब्ध निधीच्या खर्चाची आवश्यकता तपासून निधीची अतिरिक्त मागणी करणे किंवा वेळेवर पुनर्विनियोजनाचा प्रस्ताव सादर करणे व अशाप्रकारे आकृतीबंधानुसार निश्चित केलेली पदे रिक्त राहणार नाहीत याची विभागाने काळजी घ्यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच वित्त विभागाने देखील प्रत्येक वर्षी विभागांतर्गत निधीची तरतूद करताना मागील 3 वर्षाच्या खर्चाचा आढावा घेवून खर्चित रक्कम व प्रत्यार्पित रकमेच्या आधारावर पुढील आर्थिक वर्षात निधीची तरतूद करावी व याबाबत आवश्यक ती उपाययोजना करून केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यात समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

3.7 लोकलेखा समितीसमोर चर्चेला घेण्यात येणाऱ्या विनियोजन लेख्यांसंदर्भात ही उपरोक्त नियमित निरीक्षणे समितीच्या निदर्शनास आलेली आहेत. अनेक मंत्रालयीन विभागाच्या साक्षी घेताना समितीस ही बाब प्रकर्षाने जाणवते की, प्रत्येक विभागात रिक्त पदे, वैद्यकीय प्रतिपूर्ती, कार्यालयीन खर्च, वेतन व भत्ते इत्यादींसाठी फार मोठ्या प्रमाणात निधी राखून ठेवण्यात येतो व प्रतिपूर्तीअभावी तो वर्षाअखेरीस समर्पित करण्यात येतो. या प्रतिपूर्ती वर्षअखेरपर्यंत कधीही सादर होऊ शकतात. त्यामुळे अशा प्रकारे निधी राखून ठेवावाच लागतो व यास समितीचा कोणताही विरोध नाही. परंतु सर्व विभागांचा एकत्रित विचार केल्यास हा निधी फार मोठ्या प्रमाणात शासन स्तरावर वर्षभर राखून ठेवण्यात येतो. केवळ तरतूद आहे म्हणून ती ठेवायची व नंतर तीही सरेंडर करायची यास समितीचा व महालेखाकारांचा आक्षेप आहे. रिक्त पदे ही काही अचानक भरली जात नाही. त्यासाठी मोठा कालावधी जातो. अशा परिस्थितीत वर्षातून तीन वेळा पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने निधी जर विभागाला

मिळणे शक्य असेल तर ही तरतूद अडवून पार्किंग झोनमध्ये ठेवण्याची आवश्यकता नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. मिळालेली तरतूद परत केली अथवा मागितली नाही तर पुन्हा हा निधी परत मिळण्यास वित्त विभागाकडून अनेक अडचणी येतात त्यामुळे असा निधी राखून ठेवण्याकडे विभागाचा कल जास्त असतो. अशा परिस्थितीत शासनाने व विशेषत: वित्त विभागाने यातून तोडगा काढून अशा प्रकारे निधीची तरतूद वर्षभर राखून ठेवण्यापेक्षा यासाठी एकत्रित निधी राखून ठेवून विभागाकडून ज्या प्रमाणे मागणी येईल त्याप्रमाणे तातडीने निधीचे वितरण या एकत्रित निधीतून करण्यात यावे व फार मोठ्या प्रमाणात अशाप्रकारे निधी वर्षभर अडवून ठेवण्यासंदर्भातील कार्यपध्दतीला आळा घालावा. याबाबतची शक्यता पडताळून यातून योग्य तो मार्ग काढावा व हा निधी पार्किंग झोनमधून बाहेर काढावा व या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

अनुदान क्रमांक :- एच – ६ "सार्वजनिक बांधकामे आणि कार्यचालन इमारती"

<u>अभिप्राय व शिफारस</u>

3.8 लेखाशिर्ष २०५९ सार्वजनिक बांधकाम, २२०२ सर्वसाधारण शिक्षण , २२०३ तंत्रशिक्षण, २२०५ कला व संस्कृती, २२१० वैद्यकीय सेवा सार्वजनिक आरोग्य, २२१७ नगरविकास, २२३० कामगार व सेवायोजन, २४०३ पशुसंवर्धन, २४०५ मत्स्यव्यवसाय या अंतर्गत सन २०१२-१३ यावित्तीय वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाने मुळ तरतूद .1788,10,80,000/- केली आहे. पुरक मागणी .362,95,05,000/- आहे. यापैकी .2151,05,85,000/- एवढे अनुदान विभागास प्राप्त झाले व प्रत्यक्ष खर्च .1923,80,28,000/- झाला असून रु.227,25,57,000/- एवढ्या रकमेची बचत झाली असून मार्च, २०१३ अखेर .220,52,85,000/- वर्षभरात परत केलेली रक्कम आहे. असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे.

3.9 **सार्वजनिक बांधकाम विभागाने खर्च मेळाची कार्यवाही विहित वेळेत पुर्ण केली नसल्यामुळे सदर परिच्छेद समितीसमोर आला आहे. खर्च मेळाची कार्यवाही समितीची साक्ष होई पर्यंत विभागाने पुर्ण केलेली नव्हती. अधिक्षक अभियंता, पुणे यांच्या कार्यालयाची देयके ट्रेझरी कडून विहित मुदतीत पास करुन घेण्यात आली नाही. अधिक्षक अभियंता, यवतमाळ येथील कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्याने सांकेतिक क्रमांक चुकविला होता. आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयामध्ये वित्त विभागाच्या रकमांची नोंद व महालेखाकार**

कार्यालयाच्या रक्कमांची नोंद यामध्ये तफावत आढळून आली. सदर चुका 31 मार्चपर्यंत सुधारणे शक्य असताना किंवा त्यानंतरही मे महिन्यात पुन्हा संधी उपलब्ध असताना ह्या त्रुटींचे निराकरण विभागाकडून महालेखाकार कार्यालयात न केल्यामुळे सदरहु परिच्छेदात आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. विभागांतर्गत कार्यरत असलेल्या लेखा विभागामध्ये खर्चाच्या ताळमेळा संदर्भात विहित कार्यपध्दतीच्या अज्ञानामुळे या सर्व बाबी घडतात. लेखा विषयक नियमानुसार व तांत्रिक बाबी हाताळण्यास कर्मचारी वर्ग सक्षम व प्रशिक्षित नसल्यामुळे अशा अडचणी कायम उद्भवतच राहणार, ज्यामुळे महालेखाकारांचे आक्षेप विभागाला टाळता येणार नाहीत. या सर्व बाबींवर आळा घालण्यासाठी वित्तीय नियमांमध्ये विहित कार्यपध्दतीनुसार व विहित मुदतीत विभागाने आर्थिक ताळेबंद अथवा लेखांचे खर्चाचा ताळमेळ (Reconciliation) करणे आवश्यक असताना ते विभागाकडून करण्यात येत नाही. वेळोवेळी विभागाच्या लेख्यांचे खर्चाचा ताळमेळ (Reconciliation) झाला असता तर विभागाला हे आक्षेप टाळता आले असते. अत: विभागाने खर्चाचा ताळमेळ (Reconciliation) नियमित व अचूकरित्या करावा. यासाठी आवश्यक असलेला प्रशिक्षित कर्मचारी वर्ग देण्यात यावा अथवा कोषागार कार्यालयामधून वित्तीय नियमांचे ज्ञान असणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे व अशापध्दतीने विभागांतर्गत लेख्यांमध्ये होणाऱ्या आर्थिक अनियमिततेवर आळा घालण्यात यावा. तसेच उपलब्ध कर्मचारी वर्गांना या सर्व लेखा विषयक बाबींचे योग्य प्रशिक्षण देण्यासाठी विभागाने एक कार्यशाळा आयोजित करावी. तसेच सदरहू प्रकरणात आक्षेपित लेख्यांसंदर्भात महालेखाकारकार्यालयासोबत एकत्रितरित्या बसून खर्चमेळाची (Reconciliation) कार्यवाही पुर्ण करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

3.10 अनुदाना खालील खर्चामध्ये "निलंबन" या शिर्षाखाली रु.22.75 लाख इतक्या रकमेचा समावेश आहे. हे लेखाशिर्ष अंतिम लेखाशिर्ष नसून निलंबन व्यवहारपुर्ण झाल्याचे आणि त्याचे अंतरिमरित्या लेखन झाल्याचे मानण्यापुर्वी ज्यामध्ये आणखी रकमा देणे किंवा किंमतीचे समायोजन करणे आवश्यक असते. असे अंतरिम व्यवहार या लेख्यात सामावून घेण्यात येतात. त्यानुसार या शिर्षाखालील व्यवहार अंतिम लेखाशिर्षामध्ये समायोजित केले नसतील तर ते अंतरीम व्यवहार या लेख्यात समावून घेण्यात येतात. या व्यवहारामध्ये खर्ची रकमा व जमा रकमा या दोन्हींचा समावेश असतो. तथापि, अनुदाना संबंधीच्या मागण्याप्रमाणे जमा रकमेचा समावेश नसतो व त्या मागण्या फक्त एकूण खर्ची रकमांसाठीच असतात. या व्यवहाराची नोंद १) खरेदी, २) संग्रह,

३) संकीर्ण सार्वजनिक बांधकाम विषयक आगाऊ रकमा, ४) कार्यशाळा निलंबन, ५) रोकड मेळ निलंबन लेखा या पाच उपशिर्षा खाली करण्यात येते. या उपरोक्त खर्चाच्या मेळाची कार्यवाही तसेच चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर करण्याबाबतची कार्यवाही विभागाने गांभिर्याने व नियमितरित्या करणे आवश्यक असतानाही ती कार्यवाही न केल्यामुळे उपरोक्त लेखाशिर्षाअंतर्गत समितीसमोर आक्षेप छाननीसाठी आलेले आहेत. विभागाकडे मोठ्या प्रमाणात अधिकारी/कर्मचारी असतानाही निधीच्या खर्चाचे व्यवस्थापन योग्यप्रकारे ठेवण्यात येत नाही. यासाठी विभागाकडे निधी खर्च करण्याबाबत सध्या असलेल्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

3.11 **सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी खर्च मेळाचे काम तसेच चुकीच्या नोंदीचे दुरुस्तीचे प्रस्ताव महालेखाकारांकडे सादर करण्यासाठी तसेच लेख्यांच्या संबंधी असलेल्या इतर बाबींकरीता तीन वर्षे सहा महिन्याचा विलंब विभागाने केला आहे. या विलंबासाठी त्यांच्यावर कारवाई करण्यात येत असल्याचे समितीला आश्वासित करण्यात आले आहे त्यानुसार या विषयासंदर्भात २७ अधिकारी दोषी असून त्यांच्याकडून स्पष्टीकरणे व खुलासे मागविण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. याबाबत समितीला आश्वासित केल्याप्रमाणे संबंधितांवर केलेल्या कारवाईची सविस्तर माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

अनुदान क्र.एच-७ "सामाजिक सेवा व आर्थिक सेवा यावरील भांडवली खर्च" :-

<u>अभिप्राय व शिफारस</u>

3.12 लेखाशिर्ष ४२१६ गृहनिर्माणावरील भांडवली खर्च या अंतर्गतüसन २०१२-१३ या वित्तीय वर्षामध्ये एकूण तरतूद .27,49,88,000/- होती यापैकी .23,44,48,000/- एवढे अनुदान अर्थसंकल्प वितरण प्रणालीनुसार प्राप्त झाले होते. त्यामुळे .4,05,40,000/- एवढे अनुदान अप्राप्त होते. प्राप्त अनुदानापैकी .34.96 लाख एवढे अनुदान अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांच्याकडून खर्च होवू न शकल्यामुळे एकूण .4,40,36,000/- एवढे अनुदान समर्पित करण्यात आले आहे असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला आहे.

3.13 **औरंगाबाद येथे गृहनिर्माणाची तीन कामे मंजूर होती त्यातील दोन कामे पूर्ण झाली व एक काम अपूर्ण राहिले होते. सदर कामास विलंब झालेला असतानाही कंत्राटदारावर दंड आकारण्यात आला नाही. कंत्राटदारावर**

दंड लावण्यासाठी सहा महिने ते एक वर्षापर्यंतची मुदतवाढ देण्याची तरतूद असून याचा वेळोवेळी वापर करुन निर्णय कंत्राटदाराच्या बाजूने होत असतो. या पध्दतीमध्ये आता बदल करुन बेंच मार्की ग करीत असून जेवढे काम झाले तेवढ्याच रकमेचे प्रदान कंत्राटदाराला करण्यात येईल व तेवढ्या विहित मुदतीत काम झाले नाही तर त्या दिवसापासून दंड आकारण्यास सुरुवात होईल व यात मुदतवाढ देण्याचे अधिकार कोणालाही राहणार नाहीत असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले असता कंत्राटदार फक्त बीबीएम कार्पेट करतात सिलकोड करीत नाहीत व कार्पेटचे देयक काढून घेतात. यावर आता व्हिडीओ बेस सिस्टिम सुरु करीत असून दोन दिवसात सिलकोड केला नाही तर प्रत्यक्षात त्याचे एसएमएस अलर्ट जीपीआरएसला थेट दर्शवितील अशी कार्यपध्दती विभाग राबवित असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच राष्ट्रीय महामार्गांमध्ये काम करताना कंत्राटदारासाठी जी पध्दत अवलंबिण्यात येते तीच पध्दती राज्यात अवलंबिण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच उपरोक्तप्रमाणे बेंच मार्की ग सिस्टिम व व्हिडीओ बेस सिस्टिमची अंमलबजावणी योग्यरित्या विभागीय स्तरावरुन करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

3.14 **सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत निधी खर्च करण्यासंदर्भात होत असलेली वित्तीय लेखापरिक्षणातील अनियमितता, गैरवर्गीकरण, रिकन्सीलीएशन न होणे इत्यादी बाबी लक्षात घेता या विभागाअंतर्गत होत असलेल्या सर्व कामांचे संगणकीकरण होणे आवश्यक आहे. या संपूर्ण कामासाठी एक आज्ञावली विकसित करण्यात यावी. त्यामध्ये निविदा आल्यानंतर कामाचे आदेश किती दिवसात देण्यात यावे, काम किती दिवसात सुरु करावे इत्यादी सर्व बाबींचा देखील समावेश करुन सदर आज्ञावलीची अंमलबजावणी राज्यातील सर्व जिल्हयांमध्ये करण्यात यावी याबाबत केलेल्या कार्यवाही"ÖßÖß माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

<u>अभिप्राय व शिफारस</u>

3.15 सन २०१२-१३ मध्ये ५०५४ मार्ग व पुल यांवरील भांडवली खर्च, मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली एकूण तरतुद .848,69,31,000/- यापैकी एकूण .691,72,81,000/- एवढी अर्थसंकल्पिय तरतूद उपलब्ध होती. त्यामधील .691,70,68,000/- खर्च झाले आहे व रु.2.13 लाख बचत झाली असून .156,96,50,000/- समर्पित करण्यात आले असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला आहे.

3.16 वित्त विभागाने उपरोक्त मंजुर केलेल्या सुधारित अंदाजाच्याअनुषंगाने .156,96,50,000/- एवढ्या निधीचे समर्पण योग्य नाही. कारण योजनेत्तरची रक्कम ८५ टक्के व योजनेअंतर्गतची रक्कम ८० टक्के यानुसार खर्च करावी असे वित्त विभागाने माहे जानेवारी मध्ये परीपत्रक काढून कळविले होते तसेच ´ÖÖ"ÖÔ ´Ö¬µÖê १०० टक्के निधी खर्च करण्याबाबत सुध्दा परिपत्रक वित्त विभागाने काढले होते. परंतु त्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतेही नियोजन केले नव्हते. विभागास १०० टक्के निधी मंजूर असताना हा संपूर्ण निधी खर्च करण्यासंदर्भात कार्यवाही न करता मोठया प्रमाणात निधी समर्पित केला असल्यामुळे सार्व्रजनिक बांधकाम विभागाने भविष्यात अशाप्रकारची पुनरावृत्ती टाळावी. निधी समर्पित करणेअगोदर एकाच लेखाशिर्षांतर्गत असलेल्या विविध उपलेखाशिर्षाअंतर्गत या निधीचा उपयोग करता येईल किंवा कसे या पर्यायाचा विचार व शहानिशा करुन नियमानुसार पुढील कार्यवाही करावी व मंजूर असलेला १०० टक्के निधी खर्च करण्यासंदर्भात व रक्कम खर्च करणे शक्य नसल्यास कमी रकमेची तरतूद करण्यासंदर्भात योग्य ते नियोजन करण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

3.17 उपरोक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने विनियोजन लेख्यासंदर्भात महालेखाकारांचे आक्षेपावर चर्चा करताना समितीला नियमित येणाऱ्या अडचणीपैकी सर्वांत महत्वाची बाब म्हणजे वित्त विभागाकडून लावण्यात आलेल्या २०% कपातीमुळे समर्पित करण्यात आलेली रक्कम ही आहे. विभागासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात येते. या निधीवर काही वेळेला परिस्थितीनुसार वित्त विभागाकडून २०% कपात लावण्यात येते. त्यामुळे हा २०% निधी विभागाला वितरित होत नाही. अशा परिस्थितीत विभागाला एकूण प्राप्त तरतूदीपैकी वित्त विभागाच्या २०% कपातीमुळे प्राप्त होवू न शकलेली रक्कम वर्षाअखेरीस तांत्रिक दृष्टया कागदोपत्री प्रत्यार्पित (surrender) केल्याचे दाखवावे लागते व रक्कम प्रत्यार्पित दाखविल्यास त्यावर महालेखाकारांकडून आक्षेप नोंदविण्यात येतात. महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर हे परिच्छेद लोकलेखा समितीसमोर चर्चेला घेणे क्रमप्राप्त ठरते. समितीसमोर विनियोजन लेख्यांवर चर्चा करतेवेळी जास्तीत जास्त प्रकरणामध्ये वित्त विभागाच्या कपातीमुळे रक्कम तांत्रिक दृष्टया सरेंडर दाखविलेली असते व ही बाब विभागाअंतर्गत अत्यंत तांत्रिक स्वरुपाची असताना यात समितीचा बहुमूल्य वेळ वाया जातो व विनियोजन लेख्याअंतर्गत मोठया प्रमाणात आक्षेपांचे परिच्छेद प्रलंबित दिसतात. यावर अनेकदा समितीसमोर चर्चादेखील झालेली आहे. यासंदर्भात वित्त विभागाने यथोचित तोडगा काढून कपात करण्यात आलेल्या निधीसंदर्भात तांत्रिकदृष्टया समायोजन करुन वितरीत व

अवितरीत निधीचे योग्य नियोजन करुन महालेखाकार यांच्या स्तरावर यासंदर्भात आक्षेप येणार नाहीत अशा प्रकारे उपाययोजना करण्यात यावी व अवलंबिलेल्या सुधारीत कार्यपध्दतीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय व शिफारस

3.18 लेखाशिर्ष - ४०५५ पोलिसांवरील भांडवली खर्च, २११ पोलिस गृहनिर्माण (०१) (०३) शासकीय कार्यालयीन इमारती हत्यारे व संयत्रे यावरील खर्च याअंतर्गत मुळ तरतुद रुपये४.७८ लाख व पुरक मागणी रुपये ९.५८ लाख घेण्यात आली होती. सन २०१२-१३ मध्ये एकूण अनुदान १४.३६ लाख रुपये प्राप्त झाले व प्रत्यक्षात झालेला खर्च हा . ४८.७५ लाख एवढा दिसून येत असल्यामुळे रु.३४.३९ लाख एवढा अधिक खर्च झाला आहे. सदर अधिक खर्च लक्षात घेता विभागाने घेतलेली रुपये ९.५८ लाखाची पुरक मागणी ही अपुर्ण होती असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला आहे.

3.19 **क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी उपरोक्त लेखाशिर्षाअंतर्गत रुपये १४.०२ लाख इतका निधी प्राप्त असून तेवढाच निधी खर्च झालेला आहे. सदर विनियोजन लेख्यांत अधिक खर्च झाला नसून रुपये ०.३४ लाख एवढी बचत झाली आहे. या लेखाशिर्षांतर्गत अधिक खर्च चूकीने नोंदविण्यात आला असून तो गडचिरोली जिल्ह्याच्या लेख्यांमध्ये दाखविण्यात आला आहे. ही बाब विभागाने वेळच्या वेळी चुकीच्या नोंदीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव न पाठविल्यामुळे तसेच संबंधित कार्यालयानेखर्चाची योग्य परिगणना केलेली नसल्यामुळे उपस्थित झाला आहे. ही गडचिरोली कार्यालयाची चूक असून यामध्ये गडचिरोली येथील कार्यकारी अभियंता जबाबदार असल्याने त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला असल्याचे समितीस सांगण्यात आले असून सदर प्रकरणी विभागाने कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

अनुदान क्र. एच :- ८ "सार्वजनिक बांधकामे प्रशासकीय व कार्यचालन इमारती यावरील भांडवली खर्च"

अभिप्राय व शिफारस

3.20 लेखाशिर्ष – ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, उप निबंधक, नोंदणी व मुद्रांक विभाग यांच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम, मोठी बांधकामे याअंतर्गत मुळ तरतुद .13,04,35,000/- होती. सन २०१२-१३ मध्ये एकूण .1,65,50,000/- एवढी तरतुद प्राप्त झाली. त्यापैकी प्रत्यक्ष खर्च .1,65,53,000/- झाला असून रुपये ३ हजार एवढा

अधिक खर्च झाला आहे. .11,38,85,000/- समर्पित करण्यात आलेल्या रक्कमेचे प्रमाण खूपच जास्त असल्याचा आक्षेप महालेखाकारानी नोंदविला आहे.

3.21 **सन २०१२-१३ मध्ये उपरोक्त लेखाशिर्षाअंतर्गत .13,04,35,000/- पैकी .11,38,85,000/- समर्पित केलेल्या रक्कमेचे प्रमाण मोठे असल्यामुळे यामध्ये अर्थसंकल्पीय तरतूद व खर्चाचा कुठलाही ताळमेळ व नियोजन समितीला दिसून आला नाही. उपरोक्त लेखाशिर्षाअंतर्गत निधी समर्पित करण्याचे कारण काही ठिकाणी वर्क ऑर्डर दिलेली नव्हती तर काही ठिकाणी सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त नव्हती हे कारण समितीस संयुक्तीक वाटत नाही. पूर्ण वर्षभरात जिल्हास्तरावर विभागाने निधी खर्च Ûêú»ÖÖ नाही. सदर निधी खर्च करता येणार नसल्याचा आढावा घेऊन विभागाने वर्ष संपण्याच्या अगोदर अखर्चित निधीचा पुनर्विनियोजनाचा प्रस्ताव सादर करुन निधीचे यथायोग्य नियोजन करणे विभागाला शक्य असतानाही अशा नियोजनाचा अभाव समितीला दिसून आला. या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

3.22 **विभागाने सातारा, नाशिक, औरंगाबाद, उस्मानाबाद, मोरखेड, नांदेड, अमरावती, अकोला आणि यवतमाळ याठिकाणच्या कामापैकी केवळ नाशिक येथील काम पुर्ण केलेले आहे. विभागाने सदर कामे जलदगतीने पूर्ण करण्याची कार्यवाही करावी. यामध्ये सातारा जिल्हयाच्या कामाबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे सदर जिल्हा वगळता उपरोक्त अन्य ठिकाणची सर्व बांधकामे मार्च, २०१७ पर्यंत पुर्ण करण्याचे आश्वासन समितीस देण्यात आलेले आहे. समितीस आश्वासित केल्याप्रमाणे विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत देण्यात यावी तसेच सातारा येथील बांधकामाबाबत न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणी शासनामार्फत योग्य ती बाजू न्यायालयात मांडून प्रकरण तातडीने निकाली काढण्याचा प्रयत्न करण्यात यावा व उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहितीस समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

<u>अभिप्राय व शिफारस</u>

3.23 लेखाशिर्ष ४४०५ मत्स्यव्यवसायावरील भांडवली खर्च, सागरी मत्स्यव्यवसाय पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, लहान मासेमारी बंदरे - केंद्रीय पुरस्कृत योजना मोठी बांधकामे या अंतर्गत सन २०१२-१३ मध्ये मुळ अनुदान

.17,85,00,000/- होते. यामध्ये एकूण अनुदान .2,45,89,000/- प्राप्त झाले व ते पुर्ण खर्च करण्यात आले. त्यामुळे बचत किंवा अधिक खर्च झालेला नाही. परंतु .15,39,11,000/- एवढी तरतुद सर्मपित करण्यात आली आहे असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला आहे.

3.24 **उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत आनंदवाडी, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथील मासेमारी बंदर बांधण्याचे काम स्थानिक मच्छीमार लोकांमुळे बंद करण्यात आले.करंजा, ता.उरण, जि.रायगड येथील ४७५ मीटर लांबीचे ब्रेक वॉटर मासेमारी बंदर बांधण्याचे काम पुर्णझाले असून उर्वरित काम मच्छीमार बांधवांनी विरोध दर्शविल्यामुळे बंद करण्यात आलेले आहे. तसेच अर्नाळा, ता.वसई, जि.ठाणे येथील मासेमारी बंदर बांधणे या कामास मच्छीमारांचा व ग्रामस्थांचा विरोध असल्याने काम सुरु करता आले नाही. जीवना, ता.श्रीवर्धन, जि.रायगड येथे मासेमारी बंदर बांधणे या कामाचा केवळ आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यामुळे भविष्यात ही कामे पूर्ण करणार असल्याचे विभागामार्फत सांगण्यात आले. वास्तविकत: प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात येऊन त्यासाठी निधी प्राप्त देखील होणे. परंतु हा निधी कोणत्याही कारणात्सव अखर्चित राहणे ही बाब वित्तीय शिस्तीला अनुसरुन नाही. प्राप्त निधी खर्च करताना येणाऱ्या स्थानिक वा अन्य अडचणी समांतर पातळीवर सोडवून प्रकल्प पुर्णत्वाकडे नेण्याची पुर्ण जबाबदारी व नियोजन हे विभागाचेच असते. त्यात विभाग अपयशी झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित राहीला. या बाबींची पुनरावृत्ती विभागाने भविष्यात टाळावी व या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस३ महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

<u>अभिप्राय व शिफारस</u>

3.25 लेखाशिर्ष ४२२५ अनुसूचित जाती-जमाती व मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च०१ अनुसूचित जातीचे कल्याण पंचवार्षिक योजनाअंतर्गत योजना इमारती२७७ शिक्षण (००) (०१) मोठी बांधकामे याअंतर्गत४ कोटी २६ लाख ५७ हजार अधिक खर्च झाला आहे व (००)(०२) अस्थापना खर्च याअंतर्गत रुपये ५८ लाख ८४ हजार अधिक खर्च झालेला आहे तसेच (००)(०३) हत्यारे व सयंत्र यावरील खर्च याअंतर्गत ४ लाख ६६ हजार इतका अधिक खर्च झालेला आहे. या तीनही लेखाशिर्षाचा अधिकचा खर्च हा डिपॉझिट हेडचा असून तो सन २०१२-१३ मध्ये अधिक खर्च दाखवणे चुकीचे असल्याचा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे.

3.26 उपरोक्त तीनही लेखाशिर्षाअंतर्गतचा अधिकचा खर्च हा सन २०११-१२ या अर्थसंकल्पीय वर्षाचा असून सदर ठेव शिर्षाचा निधी (Deposit Head Amount) वित्त विभागाच्या परवानगीने ठेवण्यात आला होता. परंतू ठेव शिर्षाचा निधी खर्च केल्याचे दाखवता येत नाही त्यामुळे ठेव शिर्षाच्या निधीचे गैरवर्गीकरण झाल्याचे दिसून येते. निधी खर्च केल्याचे दाखवता येत नाही त्यामुळे ठेव शिर्षाच्या निधीचे गैरवर्गीकरण झाल्याचे दिसून येते. या तीनही अधिक खर्चाच्या नोंदीस महालेखाकारांनी परवानगी नाकारली. त्यामुळे हा अधिकचा खर्च दिसून येत असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. ही चुक नाशिक, जळगाव, औरंगाबाद व बीड या क्षेत्रिय कार्यालयांनी केलेली असल्यामुळे त्यांच्याकडून विभागाने स्पष्टीकरण घेऊन त्यांच्यावर जबाबदारी निश्चितकरुन कारवाई करण्यात यावी. वेगवेगळ्या विभागांची कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करण्यात येतात व या कामासाठी आवश्यक असणारा निधी संबंधित विभाग सार्वजनिक बांधकाम विभागाला देत असते. असा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिल्यानंतर त्या विभागामार्फत तो खर्ची पडल्याचे दाखविण्यात येते. परंतु तो निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आल्यानंतर कामाच्या प्रगतीनुसार पुढील वर्षी खर्चीपडतो व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असा निधी ठेव शिर्षाअंतर्गत (Deposit Head) ठेवण्यात येतो. ज्यास महालेखाकारांनी मान्यता देण्यास असहमती दर्शविली. वास्तविकत: तरतूद खर्ची पडल्याचे दाखविण्यासाठी विभागाकडून हा निधी एकत्रित स्वरुपात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करण्यात येतो. अशाप्रकारे एकाच वेळेस रक्कम देण्याची कोणतीही गरज नाही. परंतु ती दिल्यामुळे सर्व विभागांची मिळून एकत्रित फार मोठी रक्कम ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे डिपॉझीट केली जाते. या बाबी आर्थिकदृष्ट्या योग्य नसल्याचे समितीचे मत आहे. अत: डिपॉझीट हेडमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये रक्कम जमा करताना कामाच्या प्रगतीच्या प्रमाणात निधी जमा केल्यास या आक्षेपाधीन बाबी टाळता येतील. अत: शासनाने यासंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करुन या सर्व बाबींवर नियंत्रण आणून कामाचे मुल्यमापन करावे अशी समितीची शिफारस आहे तसेच विभागाने डिपॉझीट निधीची ठेव ठेवण्यासाठी योग्य तो लेखाशिर्ष महालेखाकारांच्या संमतीने निश्चित करुन त्याप्रमाणे त्याप्रमाणे लेखा पध्दतीमध्ये बदल करण्यात यावा व उपरोक्त प्रकरणी विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय व शिफारस

3.27 अत्याधिक अंदाज आणि सदोष अर्थसंकल्पन दर्शवून, बचतीसह अनुदान बंद करण्यात आल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन २०१२-१३ हे सलग पाचवे वर्ष असल्याचा महालेखाकारांचा आक्षेप आहे त्याकरीता त्यांनी सन २००८-०९ पासून सन २०१२-१३ यावर्षापर्यंत एकूण तरतूद झालेला खर्च व झालेली बचत याचा तक्ता दिलेला आहे.

वर्ष	एकूण तरतूद	खर्च (रु.लाखात)	बचत
२००८-०९	४७४,८१.४६	४२९,४३.५५	४५,३७.९१
२००९-१०	६५२,०८.५२	४७०,६३.२९	१८१,४५.२३
२०१०-११	६७८,८६.४५	४७०,५३.१४	२0८,३३.१३
२०१२-१३	१०६६,१४.६३	७४१,१७.७४	३२४,९६.८९

3.28 **सन २००८-०९ ते सन २०१२-१३ या पाच वर्षात मागणी क्रमांक एच-८ या हेडमध्ये मोठयाप्रमाणात बचत झाल्याचे दिसते. सन २००८-०९ मध्ये ४५ कोटी ३७ लाख ९१ हजार रुपये एवढी बचत झालेली असून सन २०१२-१३ मध्ये ३२४ कोटी ९६ लाख ८९ हजार रुपये बचत झालेली आहे. अर्थसंकल्पीत निधी खर्च झाला नाही की तो समर्पित करण्यात येतो निधी समर्पित करण्याचे प्रमाण वाढत चाललेले असून यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुधारणा करण्यात यावी. अर्थसंकल्पीय निधीतून जी कामे सुरु करण्यात येतात त्यासाठी योग्य ते नियोजन करण्यात यावे व याप्रकरणी सर्व प्रादेशिक कार्यालयांना तसे निर्देश देण्यासाठी परीपत्रक निर्गमित करण्यात यावे. तसेच वित्त विभागाने देखील पुढील आर्थिक वर्षात निधीची तरतूद करताना गत ३ वर्षातील खर्चाचा व समर्पित रकमेचा आढावा घेऊन निधीच्या तरतूदीस मान्यता द्यावी व याप्रकरणी विभागाने केलेल्या कार्यवाही माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

अनुदान क्र.एच :- ९ "प्रादेशिक असमतोल दूर करण्यावरील भांडवली खर्च"

अभिप्राय व शिफारस

3.29 लेखाशिर्ष ४२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य या वरील भांडवली खर्च, सार्वजनिक आरोग्य, इतर कार्यक्रम पंचवार्षिक योजना प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठीयोजना इमारती, प्रमुख बांधकामे याअंतर्गत सन२०१२-१३ मध्ये

मूळ तरतूद .78,26,08,000/- व पूरक मागणी .49,93,90,000/- प्राप्त झाले आहे. एकूण .87,67,78,000/- एवढी तरतूद प्राप्त होती त्यापैकी .87,67,39,000/- एवढी तरतूद खर्च करण्यात आली व .0.39 लाख बचत झालेली आहे. मूळ तरतूद व पूरक मागणी मिळून .128,19,98,000/- अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती यापैकी .40,52,20,000/- विभागाने समर्पित केले असल्याचा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे.

3.30 **सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात नवीन बाबअंतर्गत जुलैव डिसेंबर, २०१२ मध्ये पूरवणी मागणीद्वारे पूर्ण राज्यासाठी एकूण .63,68,90,000/- एवढी तरतूद करण्यात आलेली होती. सदर तरतूद विभागाने खर्च केली नाही. विशेषत: त्यातील विक्रमगड, वानगाव व पालघर तसेच टेकावडे येथील ग्रामिण रुग्णालयाची कामे विभागास पूर्ण करता आली नाही. यामध्ये जास्तीत जास्त कामे ही जागा उपलब्ध न झाल्याने पुर्ण करण्यात आली नाही. वास्तविकत: जागा उपलब्ध नसताना ग्रामीण रुग्णालयांसाठी प्रशासकीय मान्यता विभागाने देणे, तसेच निधीची तरतूद देखील करुन पुढे तांत्रिक मान्यता देखील देण्यात येणे हे अत्यंत अव्यवहारिक नियोजन असून जागेची उपलब्धता नसताना विभाग या सर्व बाबींची पुर्तता करुच शकत नसताना या प्रकरणी रुग्णालयाची मान्यता कशी काय मिळाली, हा प्रश्न उद्भवतो. हा अत्यंत चुकीचा पायंडा असून रुग्णालयासाठी जागा नसताना व रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण होवू शकत नसताना पुरवणीमागणीच्या माध्यमातून हा निधी मागणे कदापि समर्थनीय नाही. ग्रामीण रुग्णालये ही ग्रामीण जनतेच्या दृष्टीने महत्त्वाची असून त्यासाठी विभागाने निधीचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. शासनाकडून निधी प्राप्त होऊनही ग्रामीण भागातील रुग्णालयाची कामे विहित वेळेत न करणे ही बाब योग्य नाही. उपरोक्त ग्रामिण रुग्णालयाचा निधी हा जागा उपलब्ध न झाल्यामुळे परत गेल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. अत: या रुग्णालयांचे काम शासनस्तरावरुन पूर्ण करण्यात यावे व अशा प्रकारच्या कार्यपध्तीचा अवलंब भविष्यात टाळण्यात यावा. तसेच ग्रामीण रुग्णालयासाठी जागा उपलब्ध व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींशी संपर्क साधून यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करावा व अपूर्ण कामे पुर्ण करावीत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

विधी व न्याय विभाग

4.1 भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन२०१२-१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. जे-१ "न्यायदान" या शीर्षांतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष २०१४- न्यायदान (दत्तमत) मूळ १०,१८,७४,४६ पूरक ९६,७७,२७ वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २०१३)	११,१५,५१,७३	८,५५,४७,१४	-२,६०,०४,५९ ३,३३,६८,७४
प्रधान शीर्ष २०१४- न्यायदान (भारित) मूळ १,५८,२३,३८ पूरक १६,८६,९६ वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, २०१३)	१,७५,१०,३४	१,४८,४८,१०	-२६,६२,२४ ३५,०७,०२

टिपा व भाष्ये :-

मूळ अर्थसंकल्पीय तरतूदीइतकाही खर्च झालेला नाही आणि वर्षभरात मिळविण्यात आलेली रु.६७७.२७ लाख एवढी पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले आहे.

2) . २६००४.५९ लाख इतकी अंतिम बचत असताना रु.३३३६८.७४ लाख इतका परत करण्यात आलेला निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्यातील अवर्षण व नैसर्गिक आपत्ती परिस्थितीमुळे व मंत्रालय नूतनीकरण इत्यादी कारणांमुळे वित्त विभागाने सुधारीत अंदाजानुसार अनुदानात रु.५४ हजार इतकी कपात करुन रु.१११५५११९ हजार इतके अनुदान वितरित केले होते. सदर अनुदानातून रु८२६७०६१ इतका खर्च झाला असुन, रु.२८८८०५८ इतकी बचत झाली आहे.

विविध न्यायालये / कार्यालयांतील रिक्त पदे, वर्ष अखेरीस कार्यालयीन खर्चाची मोठ्या रकमांची देयके पारित न झाल्यामुळे तसेच शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे सदर बचत झाली आहे.

सदर लेखाशिर्षाखाली रु.१५८२३३८ हजार इतके अनुदान अर्थसंकल्पित होते व रु.२६४११६१ हजार इतक्या रकमेच्या पूरक मागण्या मान्य झाल्या होत्या. अशाप्रकारे एकूण १८४६४९९ हजार इतक्या अनुदातून वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु४६६४ हजार इतकी कपात करुन रु.१८४१८३५ हजार इतके अनुदान वितरित केले होते. त्यातून .१४९६२३० हजार इतका खर्च झाला असून, रु.३४५६०५ हजार इतकी बचत झाली आहे.

न्यायालयांतील रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने तसेच शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे सदर बचत झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, १०५-दिवाणी व सत्र न्यायालये, १०५ (०१)(०१) मुंबई शहर दिवाणी व सत्र न्ययालये मूळ ४५,१८.१३ पूरक --- पुनर्विनियोजन -४,३७.३९	४०,८०.७४	३८,११.८८	-२,६८.८६

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.४५१८.१३ लाख इतक्या मूळ अनुदानातून वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु.६९.२६ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.३८११.४८ लाख इतका खर्च झाला असून रु.४३७.३९ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, १०५- दिवाणी व सत्र न्यायालये, १०५ (०२)(०२) ग्राम न्यायालय अधिनियम, २००८ अंतर्गत ग्राम न्यायालयाची स्थापना			
मूळ १,३८.१७ पूरक ०.०१ पुनर्विनियोजन -२६.३३	१,११.८५	३२.६७	-७९.१८

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.१३८.१८ लाख इतक्या मूळ अनुदानातून(मूळ १३८.१७ + पूरक ०.०१) वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु७५.९४ लाख इतकी कपात करुन .६२.२४ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.३५.९१ लाख इतका खर्च झाला असून, .२६.३३ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, १०६-लघुवाद न्यायालये, १०६ (०२)(०२) लघुवाद न्यायालये मूळ ६,०६.५० पुनर्विनियोजन -४१.४९	५,६५.०१	५,६३.६५	-१.३६

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे. सदर लेखाशिर्षाखालील रु.६०६.५० लाख इतक्या अनुदानातून वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु१.३६ लाख इतकी कपात करुन .६०५.१४ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.५६३.६५ लाख इतका खर्च झाला असून, .४१.४९ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, ११०- महाप्रशासक व शासकीय विश्वस्त ११० (००)(०१) मूळ ८९.४४ पूरक १४.६३ पुनर्विनियोजन -३.०९	१,००.९८	९०.९८	-१०.००

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.१०४.०७ लाख (मूळ ८९.१४ + पूरक १४.६३) इतक्या अनुदानातून वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु९.३५ लाख इतकी कपात करुन .९४.७२ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.९१.६३ लाख इतका खर्च झाला असून, .३.०९ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४- न्यायदान, ११४ विधि सल्लागार व समुपदेशी, ११४ (००)(०१) विधि सल्लागार व समुपदेशी, शहर अधिकारी मूळ २५,२२.३६ पूरक २,५६.७९ पुनर्विनियोजन -१,४१.२०	२६,३७.९५	२४,७३.८९	-१,६४.०६

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.२७७९.१५ लाख (मूळ २५२२.३६ + पूरक २५६.७९) इतक्या अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु७६.१४ लाख इतकी कपात करुन .२७०३.०१ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.२५६१.८१ लाख इतका खर्च झाला असून, .१४१.२० लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४- न्यायदान, ८००-इतर खर्च ८०० (००)(०२) न्यायदानात सुधारणा करण्यासाठी तेरावा वित्त आयोग अनुदाने (केंद्रीय सहाय्य) मूळ १,१४,५८.०० पूरक ५४,२६.६० पुनर्विनियोजन (-)१,४०,५९.३१	२८,२५.२९	२५,३०.१६	-२,९५.१३

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.१६८८४.६० लाख (मूळ ११४५८ + पूरक ५४२६.६०) इतक्या अनुदानातून रु.२८२५.२९ लाख इतका खर्च झाला असून, .१४०५९.३१ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

टिपा व भाष्ये :-

कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता, वर नमूद केलेल्या उपशीर्षाखालील रु.१४७०८.८१ लाखांचा निधी परत करण्यात आला.

वरील उपशीर्षाखाली रु.८१७.२३ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१३).

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, १०५- दिवाणी व सत्र न्यायालये, १०५ (०५)(०१) न्यायिक अधिकारी प्रशिक्षण संस्था मूळ १,७०.५७ पुनर्विनियोजन -७१.७१	९८.८६	१३०.८१	+३१.९५

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.१७०.५९ लाख इतक्या मूळ अनुदानातून वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार .३१.९५ लाख इतकी वाढ करुन .२०२.५२ लाख इतके अनुदान वितरित केले आहे त्यापैकी रु.१३०.८१ लाख इतका खर्च झाला असून, .७१.७१ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळेझालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४- न्यायदान, १०८- फौजदारी न्यायालये, १०८ (०१)(०१) फौजदारी न्यायालये मूळ ४६,१२.०५ पूरक --- पुनर्विनियोजन -१४,५२.०७	३१,५९.९८	३८,८८.५४	+७,२८.५६

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.४६१२.०५ लाख इतक्या मूळ अनुदानातून वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार .९९.१९ लाख इतकी कपात करुन .४५१२.८६ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.३०६०.०७ लाख इतका खर्च झाला असून, .१४५२.०७ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४- न्यायदान, (००) १०७- इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालये, १०७ (००)(०१) इलाखा शहर दंडाधिकारी न्यायालये मूळ ३५,९०.२३ पूरक १,३१.४४ पुनर्विनियोजन -१४,१०.५६	२३,११.११	३४,२८.२०	+११,१७.०९

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.३७,२१.६७ लाख (मूळ ३५९०.२३ + पूरक १३१.४४) इतक्या अनुदानातून वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु५६.१९ लाख इतकी वाढ करुन .३७७७.८६ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.३४२७.९२ लाख इतका खर्च झाला असून, .३४९.९४ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, १०५- दिवाणी व सत्र न्यायालय, १०५ (०१)(०२) प्रमुख न्यायालय, कौटुंबिक न्यायालय मूळ २१,३१.३४ पूरक ६,१४.२१ पुनर्विनियोजन -१८,४९.६६	८,९५.८९	१९,१६.७९	+ १०,२०.९०

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.२७४५.५५ लाख (मूळ १२३१.३४ + पूरक ६४१.२१) इतक्या अनुदानातून वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु२७६.९० लाख इतकी वाढ करुन .३०२२.४५ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.१७३१.७६ लाख इतका खर्च झाला असून, .१२९०.६८ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४- न्यायदान, ११४- विधी सल्लागार व समुपदेशी ११४ (००)(०२) मुफसल अधिकारी मूळ १३,२७.२२ पूरक २,०५.०० पुनर्विनियोजन -२,३१.६८	१३,००.५४	१४,७१.१४	+१,७०.६०

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.१५३२.२२ लाख (मूळ १३२७.२२ + पूरक २०५) इतक्या अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु१४५.७८ लाख इतकी वाढ करुन .१६७८ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.१४४६.३२ लाख इतका खर्च झाला असून, .२३१.६८ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४- न्यायदान, १०५-दिवाणी व सत्र न्यायालये, १०५ (०२)(०१) जिल्हा व सत्र न्यायाधिक मूळ ६,७२,२३.८४ पूरक ३०,२८.५८ पुनर्विनियोजन -१,३४,४६.८६	५,६८,०५.५६	६,१३,२६.३७	+४५,२०.८१

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.७०२५२.४२ लाख (मूळ ६७२२३.८४ + पूरक ३०२८.५८) इतक्या अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु५९७.९८ लाख इतकी कपात करुन .६९६५४.४४ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.५९०७६.१५ लाख इतका खर्च झाला असून, .१०५७८.२९ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

टिपा व भाष्ये :-

.७५८९.९१ लाख इतका अंतिम अधिक खर्चा असताना कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता वर नमूद केलेल्या उपशीर्षाखाली रु.१८४६२.५४ लाखांचा प्रत्यार्पित करण्यात आलेला निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले, त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत (ऑगस्ट २०१३).

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, १०५-दिवाणी व सत्र न्यायालये, १०५ (०६)(०१) केंद्रीय अन्वेषण विभाग (सी.बी.आय) विशेष न्यायालये मूळ १,४३.३५ पुनर्विनियोजन -४१.९३	१,०१.४२	१,६९.५१	+६८.०९

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.१३.३५ लाख इतक्या मूळ अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रू.३.०७ लाख इतकी वाढ करुन .२०६.४२ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.१६४.४९ लाख इतका खर्च झाला असून, .४१.९३ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यमुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, १०६-लघुवाद न्यायालये, १०६ (००)(०१) इलाखा शहर न्यायालये मूळ २४,६८.६२ पुनर्विनियोजन -७३,६१	२३,९५.०१	२६,४९.६४	+२,५४.६३

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.२४६८.६२ लाख इतक्या मूळ अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार .२८८.६६ लाख इतकी वाढ करुन .२७५७.२८ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.२६८३.६७ लाख इतका खर्च झाला असून, .७३.६१ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, १११- सरकारी मुखत्यार, १११ (००)(०१) सरकारी मुखत्यार मूळ १,६३.६६ पुनर्विनियोजन -३२.९४	१,३०.७२	१,८८.०१	+५७.२९

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.१६३.६६ लाख इतक्या मूळ अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु.८.५६ लाख इतकी वाढ करुन .२२२.२२ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.१८९.२८ लाख इतका खर्च झाला असून, .३२.९४ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४- न्यायदान, ११४-विधी सल्लागार व समुपदेशी, ११४ (००)(०३) महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मूळ ७,०६.०१ पूरक ०.०१ पुनर्विनियोजन -४७.८६	६,५८.१६	८,७०.९२	+२,१२.७६

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.७०६.०१ लाख इतक्या मूळ अनुदानातून वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार .२०७.५८ लाख इतकी वाढ करुन .९१३.५९ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.८६५.७३ लाख इतका खर्च झाला असून, .४७.८६ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

टिपा व भाष्ये :-

.५९२.७७ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता वर नमूद केलेल्या उपशीर्षाखालील प्रत्यार्पित करण्यात आलेला रु.१९६.३४ लाखांचा निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले, त्याची कारणे प्रतिक्षेत आहेत (ऑगस्ट २०१३).

5. विनियोजनात, मूळ अर्थसंकल्पीय तरतूदी इतकाही खर्च झाला नाही आणि रु.१६८६.९६ लाखांची पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले.

6. .२६६२.२४ लाखांची अंतिम बचत असताना, रु३५०७.०२ लाख एवढा परत करण्यात आलेला निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, १०२ उच्च न्यायालये, १०२ (०१)(०१) न्यायाधीश मूळ २०,४०.०३ पुनर्विनियोजन -१,५४.८६	१८,८५.१७	१५,२०.८१	-३,६४.३६

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.२०४०.०३ लाख इतक्या मूळ अनुदानातून रु११.२२ लाख इतक्या रकमेचे अन्यत्र पुनर्विनियोजन करण्यात आले. तसेच, वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु३००.७२ लाख इतकी कपात करुन .१७२८.०९ लाख इतके अनुदान वितरित केले आहे त्यापैकी रु.१५८४.४५ लाख इतका खर्च झाला असून, .१४३.६४ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४- न्यायदान, १०२-उच्च न्यायालये, १०२ (०४)(०१) लेखा अन्वेषण आयुक्त मूळ ५२.८० पुनर्विनियोजन -१.७२	५१.०८	४१.५५	-९.५३

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशिर्षाखालील रु.५२.८० लाख इतक्या मूळ अनुदानातून वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रू.४५ लाख इतकी कपात करुन .४३.३५ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.४१.६३ लाख इतका खर्च झाला असून, .१.७२ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

टिपा व भाष्ये :-

. ३७३.८९ लाख इतकी अंतिम बचत लक्षात घेता, वर नमुद केलेल्या उपशीर्षाखालील प्रत्यार्पण / पुनर्विनियोजन याद्वारे काढण्यात आलेला रु.१५४.८६ लाखांचा निधी अपुरा असल्याचे सिध्द झाले, त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २०१३)

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४ – न्यायदान, १०२- उच्च न्यायालये, १०२ (०५) (०१) परिव्यय (कर) निर्धारक (मूळ न्यायशाखा) मूळ ..... रु. ४०.७७ पुनर्विनियोजन ..... रु - १०.६६	३०.११	३०.१९	+०.०८

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्षाखालील रु. ४०.७७ लाख इतक्या मूळ अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रू.१६ लाख इतकी वाढ करुन रु.४०.९३ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी .३०.२७ लाख इतका खर्च झाला असून .१०.६६ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकासरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४ न्यायदान, १०२- उच्च न्यायलये,१०२ (०८) (०१) लेखा कार्यालये मुळ ..... रु ४२.०७ पुनर्विनियोजन ..... रु-१३.४७	२८.६०	२९.७८	+१.१८

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्षाखालील रु.४२.०७ लाख इतक्या मूळ अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु.१८ लाख इतकी वाढ करुन रु.४३.२५ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.२९.७८ लाख इतका खर्च झाला असून .१३.४७ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकासरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४ न्यायदान, १०२- उच्च न्यायलये,१०२ (०९) (०१) बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार न्यायदानात सुधारणा व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष अनूदान मुळ ..... रु २४,९०.४३ पुनर्विनियोजन ..... रु-६,६५.९१	१८,२४.५२	१९,२४.६५	+१,००.१३

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्षाखालील रु. २४९०.४३ लाख इतक्या मूळ अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु. ११२ लाख इतकी वाढ करुन रु.२६०२.४३ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु१९३६.५२ लाख इतका खर्च झाला असून रु.६६५.९१ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकासरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४ न्यायदान, १०२- उच्च न्यायलये,१०२ (०२) (०१) प्रबंधक मूळ शाखा (२०१४ ००७४) मुळ ..... रु १८२१.८७ पूरक ..... रु१०२४.४५ पुनर्विनियोजन ..... रु-१२,५९.७९	१५,८६.५३	१९,५२.०५	+३,६५.५२

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्षाखाली रु.१८२१.८७ लाख इतके अनुदान अर्थसंकल्पित होते. तसेच रु.१९७९.०८ लक्ष इतक्या रकमेच्या पूरक मागण्या मंजूर करण्यात आल्या व रु.४६.१५ लाख इतक्या रकमेचे अन्यत्र पुनर्विनियोजन करण्यात आले. तसेच, वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु.५७५.४१ लाख इतकी कपात करुन ३१७९.३९ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु. १९६५.७५ लाख इमका खर्च झाला असून रु. १२१३.६४ लाख इमकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकासरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

(रुपये लाखात)

शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)
२०१४ न्यायदान, १०२- उच्च न्यायलये,१०२ (०३) (०१) प्रबंधक अपील शाखा मुळ ..... रु ८७,१४.७९ पूरक ..... रु६,६२.५१ पुनर्विनियोजन ..... रु-१३,७४.०७	८०,०३.२३	८६,६२.५३	+६,५९.३०

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्षाखाली रु.८७१४.७९ लाख इतके अनुदान अर्थसंकल्पित होते. तसेच प्रत्येकी रु.१००० इतक्या रकमेच्या २ पूरक मागण्या मंजूर करण्यात आल्या रु.५१.३१ लाख इतक्या रकम अन्य लेखाशीर्षांतून पुनर्विनियोजन उपलब्ध करण्यात आली. तसेच, वित्त विभागाने सुधारित अंदाजानुसार रु. १३४०.९७ लाख इतकी वाढ करुन १०१०७.०९ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु.८६८१.७१ लाख इमका खर्च झाला असून रु. १४२५.३८ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकासरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

टिपा व भाष्ये :-

. ११२४.९५ लाख इतका अंतिम अधिक खर्च लक्षात घेता, वर नमुद केलेल्या उपशीर्षाखालील काढण्यात आलेला रु.३३२३.९० लाखांचा निधी अत्याधिक असल्याचे सिध्द झाले, त्याची कारणे कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट २०१३)

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४ न्यायदान, १०२- उच्च न्यायलये,१०२ (०७) (०१) न्यायालयधारक व परिसमापक मुळ ..... रु ३,२२.२३ पुनर्विनियोजन ..... रु-२३.९९	२,९८.२४	३,३१.५२	+३३.२८

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्षाखाली रु.३२२.२३ लाख इतक्या मूळ अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजनुसार रु.३८.०२ लाख इतकी वाढ करून रु. ३६०.२५ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु. ३३६.२६ लाख इतका खर्च झाला असून, रु २३.९९ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकासरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

टिपा व भाष्ये :-

. ३३.२८ लाख इतका अंतिम बचत लक्षात घेता, रू३.९९ लाखांचा प्रत्यार्पित करण्यात आलेला निधी अनावश्यक असल्याचे सिध्द झाले.

२३.९९ लाखांच्या निधीचे प्रत्यार्पण व रु. ३३.२८ लाख इतका अंतिम अधिक खर्च याची कारणे प्रतिक्षत आहेत. (ऑगस्ट २०१३)

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
२०१४ न्यायदान, १०२- उच्च न्यायलये,१०२ (०२) (०२) मुळ १,०१.०९	१,०१.०९	१,६८.०७	+६६.९८

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर लेखाशीर्षाखाली रु.१०१.०९ लाख इतक्या मूळ अनुदानात वित्त विभागाने सुधारित अंदाजनुसार रु१०९.८५ लाख इतकी वाढ करून रु. २१०.९४ लाख इतके अनुदान वितरित केले आहे. त्यापैकी रु. १६८.६२ लाख इतका खर्च झाला असून, रु ४२.३२ लाख इतकी बचत झाली आहे.

सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी रकमेची देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकासरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली आहे.

टिपा व भाष्ये :-

.६६.९८ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे कळविण्यात आली नाहीत. (ऑगस्ट २०१३).

साक्ष :

4.2 उपरोक्त विषयासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीच्या दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली.

अनुदान क्र. जे-१ "न्यायदान यासंदर्भात" विभागाकडून प्राप्त झालेली स्पष्टीकरणात्मक ज्ञापनातातील उत्तरे ही एक सारखीच आहेत. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता या विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सन २०१३-१४ व २०१२-२०१३ मध्ये वेतनाची रक्कम समर्पित करण्यात आली आहे. विभागाने वेतनाची रूपये २५२.०० कोटी इतकी रक्कम समर्पित केली आहे. याचे कारण असे होते की, १३ व्या वित्त आयोगाने शिफारस केली होती. त्यानुसार केंद्र शासनाकडून राज्य शासनाला अनुदान देण्यात आले होते. त्या अनुदानाचे प्रत्येक वेळी बजेट करण्यात येत होते. त्याची तरतूद केली नाही तर ती व्यपगत होत होती. त्यामुळे विधी व न्याय विभाग बजेट करीत होते. त्यामध्ये कोर्ट मॅनेजर, लोक अदालत वगैरे घटक (कंपोनंटस) होते. असे जे वेगवेगळे घटक (कंपोनंटस) होते त्यासाठी तेथे पद तयार करणे गरजेचे होते. विभागाने पदांची निर्मिती केली होती पण त्या वेळेत भरल्या नाहीत. वेतनाची तरतूद करणे गरजचे होते त्यामुळे विभागाने वेतनाची तरतूद केली होती. परंतु, ती पदे रिक्त असल्यामुळे किंवा भरली न गेल्यामुळे रक्कम समर्पित करण्यात आलेली आहे. यातील समर्पित रकमेचा मुख्य घटक (मेजर कंपोनंट) हा वेतनाचा आहे.

समितीने पुढे अशी चिवारणा केली की, वेतनासाठी सुरूवातीलाच बजेट करून ठेवण्यात येते. बजेट करताना विभागाचा मागील ३ वर्षांचा आढावा घ्यावा. त्यावरून कोणती पदे भरली नाही हे विभागाच्या लक्षात येईल. पद आल्यानंतर पूरक मागणीमध्ये निधीची मागणी करण्यात येऊ शकते किंवा मायनस ग्रँटला सुध्दा वेतन देण्यात येऊ शकते. तेव्हा हे जादा बजेट करण्याचे कारण काय आहे ? तसेच ही मंत्रालयीन स्तरावरील पद आहेत काय ? आणि इतर कुठल्या आहेत यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, या ज्युडिशिअरीच्या पोस्ट आहेत. ८७ नियंत्रण अधिकारी (कंट्रोलिंग ऑफिसर्स) आहेत. त्यात प्रत्येक जिल्ह्याची पद आहेत. त्यानंतर हायकोर्टातील पद आहेत. चॅरिटी कमिशनर ऑर्गनायझेशनमधील काही पद आहेत. हे फार मोठे ऑर्गनायझेशन आहे. जवळपास ४५२ कोर्ट कॉम्प्लेक्सेस आहेत. यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर कर्मचारी वर्ग लागतो. त्यामुळे

ही कमी जास्त संख्या होते. या वर्षी विभागाला अमूक एक एवढेच कर्मचारी असतील असे सांगणे थोडे कठीण जाते. काही वेळा पोस्ट भरल्या जातात, रिक्त होतात, पदोन्नती मिळते.

रिक्त पदांसंबंधी भरती न होण्याचे कारण काय आहे ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असून विभागीय सचिवांनी सांगितले की, हायकोर्टमध्ये सेंट्रलाईजड् पद्धतीने भरती होते. त्यानंतर मग प्रत्येक जिल्ह्याला लिपिक, शिपाई ही पदे भरली जातात. यात नियुक्ती प्राधिकारी उच्च न्यायालय असते. भरती प्रक्रिया देखील उच्च न्यायालयामार्फतच राबविण्यात येते. तेथून नियंत्रण अधिकारी यांचेकडून बजेटची तरतूद मागितली जाते. त्याप्रमाणे विभागाकडून तरतूद करण्यात येते.

यासंदर्भात प्रधान सचिव वित्त विभाग यांनी असा प्रश्न उपस्थित केला जर मार्च पर्यत पदे भरू शकणार किंवा कसे याची शाश्वती नसेल तर सुरूवातीला बजेट न करता जेव्हा पद भरले जाईल किंवा भरण्याच्या मार्गावर असेल तेव्हा त्या त्या महिन्याला पूरक मागणी सादर करता येणार नाही काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या त्या महिन्याला पूरक मागणी कशी काय सादर करता येईल ? जेव्हा अधिवेशन असेल तेव्हाच पूरक मागणी सादर करता येईल.

पण विभागाला तीन वेळा पूरक मागणी सादर करण्याची संधी आहे. ती संधी विभागाने वापरावी असे समितीचे मत आहे यावर विभागीय सचिवांनी सदर बाब तपासून घेण्यात येईल असे समितीस आश्वस्त केले.

वेतन देऊ शकत नाही असे होऊ शकत नाही. कारण मायनस बजेटींगमध्ये वेतन देण्यात येऊ शकते. विभागाकडून दिलेल्या निधीचा विनियोग होत नसल्यामुळे अन्य विभागाचा निधीला कट लावण्यात येतो. विधी व न्याय विभाग वर्ष अखेर निधी न वापरता समर्पित करत आहे व पुढच्या वर्षी पुन्हा निधीची मागणी करण्यात येते तेव्हा यावर विभागाने उपाययोजना करावी असे समितीने सूचित केले असता यावर विभागीय सचिवांनी सदर बाब तपासून घेण्यात येईल असे आश्वस्त केले. सदर माहिती विभागाकडून प्राप्त झाली असून ती खालीलप्रमाणे आहे.

"यापुढे विभागाकडून अर्थसंकल्पिय तरतुदीचा पूर्ण वापर होईल, याबाबत काळजी घेण्यात येईल. यादृष्टीने विभागाने सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांना दि.२१.१२.२०१६ च्या पत्रान्वये निधी विनावापर पडून राहणार

नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच आवश्यकता असेल त्याचवेळी निधिची पूरक मागणी सादर करण्यात येईल."

सगळ्याच विभागांमध्ये विनियोजना संबंधातील हाच विषय असतो. विभागाने रक्कम मागितली तर ती त्यांना पटकन मिळावी अशी तरतूद पाहिजे असे समितीने सूचित केले असा वित्त विभागाच्या सचिवांनी समितीस विनंती केली की, समितीने वित्त विभागाला औपचारिकरित्या शिफारस करावी की, ज्या परिस्थितीमध्ये पदे रिक्त असतात त्या परिस्थितीमध्ये आर्थिक तरतूद करू नये. कदाचित या संबंधातील नियम स्पष्ट नसेल. त्यामुळे तरतूद केली जात असावी. पद भरले नाही तर ती रक्कम सरेंडर केली जाते. पद भरले गेल्यानंतर पुरवणी मागणीच्या माध्यमातून निधी त्वरित द्यावा अशा प्रकारची तरतूद केली पाहिजे.

वर्गनिहाय खालपर्यंत किती पद रिक्त आहेत त्याबाबतची माहिती विभागाकडे असते. ही पदे हायकोर्टामार्फत भरली जातात. हायकोर्टच म्हणते की, पदे रिक्त असल्यामुळे न्यायदानाच्या कामात विलंब होत आहे. उलट त्यांनी पदे लवकर द्यावीत अशी अपेक्षा आहे. रिक्त पदे जस जशी भरली जातील त्याप्रमाणे विभागाला नजिकच्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागणी करता येईल. त्यामुळे विभागाला झालेली बचत समर्पित करावी लागणार नाही. विभागाकडून मोठी तरतूद करण्यात येते आणि वर्ष अखेर रक्कम खर्च न झाल्यामुळे समर्पित करण्यात येते असे होता कामा नये. अशाने विभागांनाच अडचणी येतात. असे मत समितीने व्यक्त केले असा विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, हायकोर्ट जेव्हा न्यायाधिशाची नियुक्ती करते तेव्हा कर्मचारी द्यावे लागतात. तसेच एखादे ठिकाणी नवीन न्यायधिश आला तर काम कमी होते, कोर्ट कमी होते. नवीन 200 JMFC भरले तर प्रत्येक ठिकाणी म्हणजे जेथे इन्फ्रास्ट्रक्चर आहे तेथे ते दिले जातात. नवीन जिल्हा न्यायाधीशाला तर त्यास २ शिपाई आणि २ लिपिक भरण्याचा अधिकार आहे. अशा वेळी ते त्यांच्याकडील निवड सूचीचा (सिलेक्ट लिस्टचा) वापर करतात. ती निवड सूची (सिलेक्ट लिस्ट) दोन वर्षे व्हॅलिड असते. त्या निवड सूची (सिलेक्ट लिस्टमधून) ते नवीन लोकांना घेतात. न्यायधीशाची संख्या वाढली तर स्टाफची संख्या वाढते. न्यायाधीशाची संख्या कमी झाली तर कर्मचाऱ्यांची संख्या कमी होते. यातील फक्त १० ते २० टक्के भाग

हा कायम बदलत असतो. यासंदर्भात समितीने निदेश दिले आहेत ते तपासून घेण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले. त्यानुसार विभागाकडून प्राप्त झालेली लेखी माहिती खालीलप्रमाणे आहे.

"यापूढे आवश्यक असेल तेवढ्याच निधिची मागणी करण्यात येईल. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वर्ष अखेर निधी समर्पित करण्याची गरज भासणार नाही."

प्रधान शिर्ष २०१४ न्यायदान या अंतर्गत सन २०१२-२०१३ मध्ये रुपये ९६७७.२७ लाख एवढी पूरक तरतूद अनावश्यक असल्याचे सिध्द झाले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१२-२०१३ मध्ये ३३३ कोटी ८६ लाख रुपये सरेंडर करण्यात आले आहे. त्यापैकी २५५ लक्ष रुपये ही वेतनाची रक्कम आहे. बाकीच्या बाबतीत रिकन्सीलेशन न झाल्यामुळे फिगर्समध्ये तफावत दिसत आहे.

म्हणजे समिती समोर आलेली आकडेवारी चुकीच्या आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या चुकीच्या आहेत असे नाही. म्हणजेच विभागाने रिकन्सीलेशन न केल्याने महालेखाकांरानी त्यांची नोंद घेतलेली नाही ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यानंतर एक्सप्लनेशन दिलेले आहे. परंतु, रिकन्सीलेशन वेळेत न झाल्यामुळे दोन्ही फिगर्समध्ये तफावत दिसत आहे.

या वर्षी म्हणजे सन २०१४-१५ मध्ये विभागाने रिकन्सीलेशन केले आहे काय ? व या वर्षी असा बचतीचा प्रॉब्लेम नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या वर्षी रिकन्सीलेशन केले आहे व असा बचतीचा प्रॉब्लेम यावर नाही.

Austerity measures म्हणजे काय ? अशी विचारणा महालेखाकांरानी समितीच्या माध्यमातून विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कधी कधी पद निर्मितीवर बंदी असते, पद भरतीवर बंदी असते, वित्त विभाग ७०-८० टक्के कट लावते अशा बऱ्याचशा गोष्टी असतात. ओरिजनल एस्टिमेट व रिव्हाईज एस्टिमेट मध्येही खूप फरक आहे. रिव्हाईज एस्टिमेटमध्ये कमीच होते.

यासंर्भात वित्त सचिवांनी खुलासा केला की, रिव्हाईज एस्टिमेट हे शेवटी असते विभागाला किती रिव्हाईज बजेट होते आणि त्यापैकी विभागाने किती खर्च केला हे महालेखाकांर पाहत नाहीत. ते ओरिजनल बजेटच पाहतात. विभागाने ओरिजनल बजेट किती होते आणि किती सप्लीमेंटरी घेतली या तुलनेत किती खर्च केला हे ते पाहतात. रिवाईज बजेट हे वर्ष संपल्यानंतरचे असते. या अनुषंगाने वित्त सचिवांनी सूचविले की, विभागाने त्यामुळे ही काळजी घेतली पाहिजे की, ओरिजनल बजेट आणि विभागाने केलेल्या सप्लीमेंटरी मागणीच्या तुलनेत बजेट खर्च झाले पाहिजे. यावर विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले व याबाबत विभागाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर नमूद केले आहे की, अर्थसंकल्पित तरतुद पूर्ण खर्च होईल याबाबत काळजी घेण्यात येईल.

प्रधान शिर्ष २०१४ न्यायदान ११० महाप्रशासक व शासकीय विश्वस्त ११४ विधी सल्लागार व समुपदेशी ११४ (००) (०१) विधी सल्लागार व समुपदेशी, शहर अधिकारी, ८०० इतर खर्च ८०० (००) (०२) न्यायदान सुधारणा करण्यासाठी तेरावा वित्त आयोग अनुदाने केंद्रीय सहाय्य या उपशिर्षाअंतर्गत ८१७.२३ लाख रुपये इतक्या बचतीची कारणे महालेखाकांराना वेळेत कळविण्यात आलेली नाहीत. हे काम वेळेत का होत नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कारणे कळविलेली आहेत. परंतु, ऑफिसमध्ये जाऊन व्यक्तीश: रिकन्सीलेशन करावे लागते. ते झालेले नाही.

रिकन्सीलेशन वेळेत करणे बंधनकारक असताना का केले नाही ? त्या वर्षी लेखा अधिकारी नव्हते का, ते पद रिक्त होते का ? मूळ तरतूद असतानाही विभागाकडून सप्लीमेंटरी मागणी करण्यात येते परंतु एकूण खर्च होत नाही मग विभागाने पूरक मागणी करण्याचे कारण काय ? विभागाचे जेवढे बजेट लागते तेवढीच तरतूद करुन घ्यावी. प्रत्येक गोष्टीसाठी वेगळी सप्लीमेंटरी मागणी विभागाकडून कशासाठी करण्यात येते. विभागाला हे माहीत असते की, कशासाठी तरतूद करावी लागणार आहे. तशी तरतूद करावी. नाही तर बजेट करणे कशाला म्हणतात ? प्रत्येक वेळेस विभागाकडे रक्कम असतानाही विभाग पूरक मागणी करीत आहे व पूरक मधून खर्च करीत आहात. मात्र पूरक मधून खर्च करण्याकरिताही तरतूद पाहिजे ना ? विभाग असे म्हणू शकत नाही की, मूळ बजेटमध्ये तरतूद नाही आणि पूरक मागितली तर तरतूद करता येते. हे चुकीचे आहे. १४७ कोटी रुपयांचा निधी

परत करण्यात आलेला आहे. ही मोठी रक्कम आहे. आपण त्याची कारणेही दिलेली नाहीत. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कारणे कळविण्यात आली होती मात्र ती वेळेत कळविलेली नाहीत.

बजेट करण्यामध्ये यात कुठेही आर्थिक नियोजन दिसत नाही. कधी कधी बाकीच्या ठिकाणी ५०-६० टक्के कट लागतो आणि विभागाकडे तरतूद पडून राहते. असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत वित्त विभागाच्या सचिवांनी खुलासा केला की, गरजेपेक्षा थोडीशी जास्त मागणी करणे या सवयीमुळे महालेखाकार, लोकलेखा समिती तसेच वित्त विभाग यांना या बाबीच्या सामोरे जावे लागते. विभाग प्रमुख म्हणून सर्वांनी काळजी घेतली पाहिजे की, जेवढे खर्च होणार आहे ते तपासून तेवढीच मागणी करावी. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, यापूढे वास्तवदर्शी अर्थसंकल्प सादर करण्याची काळजी घेण्यात येईल.

विभागाने वास्तवदर्शी अर्थसंकल्प (रिअलिस्टीक बजेट) करावे. तसेच ही देखील सवय पाहिली आहे की, सप्लीमेंटरी मागणी जास्त करुन ठेवायची नंतर खर्च झाला आहे की नाही याची काळजी करायची नाही. परंतु, विभागाला हे कळत नाही की, त्यानाच नंतर ते फेस करावे लागणार आहे. खालच्या लोकांची अशी टेन्डसी असते. समजा सप्लीमेंटरी घेतली, सेफ साईडसाठी विभाग तशी घेत असते. परंतु, नंतर जेव्हा हे कळते की, खर्च होऊ शकणार नाही त्यावेळेस ती वेळेवर सरेंडर करण्याची किंवा विभागाला कळविण्याची काळजी घेतली जात नाही, हा प्रॉब्लेम आहे. केवळ जास्त निधी घेण्याकडे विभागाचे लक्ष असते मात्र निधी परत करण्याकडे लक्ष देत नाही. ही बाब वित्त सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली.

वित्त सचिवांनी निदर्शनास आणून दिलेल्या बाबीसंदर्भात समितीने सूचित केले की,विभागाने मार्च अखेरपर्यंतची वाट पाहू नये. विभागाला असे कळले की, ही पदे रिक्त राहणार आहेत तर तो निधी लवकर सरेंडर करावा.

प्रधान शिर्ष २०१४ न्यायदान १०२, उच्च न्यायालयाने १०२ (०७) (०१) न्यायालयाधारक व परिसमापक याअंतर्गत .६६.९८ लाख इतक्या खर्चाची अंतिम कारणे कारणे कळविण्यात आली नाही. यामध्ये विभागाकडून कन्सीलेशन करण्यात आले नसल्याने विभागाने याकडे लक्ष द्यावे अशी सूचना समितीने केली

असता सचिवांनी आश्वस्त केले की, समितीच्या सूचनेप्रमाणे रिकन्सीलेशन करुन घेण्यात येईल तसेच यापुढे बजेट करताना आर्थिक नियोजन करण्यात येईल. याबाबत विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, खर्च मेळाची कार्यवाही विहित मुदतीत करण्याबाबत संबंधित नियंत्रक अधिकऱ्यांना सूचना देण्यात येतील.

प्रशासकीय वेतनासाठी जी अमाऊंट येते त्यातून फर्निचर किंवा बाकीचा खर्च करता येत नाही त्यामुळे विभागाकडून पूरक मागणी मागण्यात येते. अशावेळेस आक्षेप असा असतो की, मूळ तरतूद खर्च झालेली नसताना पूरक मागितली आहे. हे जर दोन स्वतंत्र हेड असतील तर त्यांना को-रिलेट करता कामा नये. असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत वित्त सचिवांनी सांगितले की, समजा वेतनाचा निधी खर्च होत नसेल आणि इतर ठिकाणी जास्त मागणी असेल तर तुम्ही असे रिॲप्रोप्रिएशन अलाऊ करता काय ? त्यावर असे अलाऊ करता येत नाही असे उत्तर मिळाले. याचा अर्थ सध्याच्या नियमाप्रमाणे तसे होत नाही. म्हणून वित्त सचिवांनी विनंती केली की, समितीने ही एक पॉलिसी म्हणून शिफारस केली तर वित्त विभाग ती कन्सीडर करील. परंतु, आजच्या घडीला तशी पॉलिसी नाही. सॅलरी ग्रँट इतर ठिकाणी वर्ग करता येत नाही.

मूळ व पूरक अशी दोन्ही रक्कम एकत्र करुन आक्षेप काढण्यात येतात. दोन्ही खर्च स्वतंत्र शीर्षाखाली असतील तर त्या दोघांचे बायफर्केशनही स्वतंत्ररित्या दिले पाहिजे की, मूळ मधून एवढी रक्कम खर्च झाली नाही आणि पूरक मधून एवढी रक्कम खर्च झाली नाही. समिती समोरही ते अगदी स्पष्टपणे आले पाहिजे. असे समितीने मत व्यक्त केले.

विभागाचे असे म्हणणे आहे की, मूळ तरतुदीतून फर्निचर अथवा बाकीच्या खर्च वेतनाच्या हेडखाली खर्चच करु शकत नसल्यामुळे पुरक मागणी करण्यात येते. समजा १० कोटी रुपये घेतले आणि पूरक २ कोटी रुपये घेतले तर २ कोटी रुपये फर्निचरच्या कामासाठी खर्च झाले. परंतु, दोन्ही रकमा एकत्र केल्यामुळे मूळ रकमेएवढा खर्च झालेला नसल्याचे दिसते. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता यासंदर्भात महालेखाकांरानी सांगितले की, विभागाने रक्कम एक्सेस नाही असे रिकन्सिलिएशनच्या वेळी महालेखाकारांना

एक्स्प्लेन करावे. जेवढी पुरवणी मागणी मागितली होती तेवढा खर्च झालेला आहे आणि जी बचत झालेली आहे ती सॅलरी हेड खाली झालेली आहे, हे रिकन्सिलिएशनच्या वेळी विभागाने एक्स्प्लेन करावे.

यावर विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले व यासंदर्भात विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये नमूद केले आहे का, यापूढे प्रत्येक लेखाशिर्षाखाली उद्दीष्टनिहाय खर्चाचा ताळमेळ घालण्यात येईल. विभागाने इतर हेडसाठी जी रक्कम मागितलेली आहे ती खर्च झालेली आहे किंवा नाही, हे क्लिअर होणे आवश्यक आहे. असे समितीने सूचित केले असा विभागीय सचिवांनी आश्वस्त केले की, सन २०१२-१३ या वर्षात वेतनासाठी आणि इतर हेडमधून किती खर्च झालेला आहे याचे विभागाकडून रिकन्सिलिएशन करुन घेण्यात येईल.

अभिप्राय

4.3 विधी व न्याय विभागांतर्गत मागणी . जे-1 लेखाशिर्ष 2014 "न्यायदान" या अंतर्गत विविध उपशिर्षाखाली झालेल्या रकमेच्या बचतीसंदर्भात महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदविलेले आहेत. यात विशेषत: मुंबई शहर दिवाणी व सत्र न्यायालये, ग्राम न्यायालयाची स्थापना, लघुवाद न्यायालये, महाप्रशासक व शासकीय विश्वस्त, विधी सल्लागार व समुपदेशी, शहर अधिकारी, न्यायदानात सुधारणा करण्यासाठी 13 वा वित्त आयोग अनुदाने (केंद्रीय सहाय्य), न्यायीक अधिकारी प्रशिक्षण संस्था, फौजदारी न्यायालये, कौटुंबिक न्यायालये, विधी सल्लागार व समुपदेशी मुफसल अधिकारी, जिल्हा व सत्र न्यायाधिश, केंद्रीय अन्वेषण विभागांतर्गत विशेष न्यायालये, इलाखा शहर न्यायालये, सरकारी मुखत्यार, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय न्यायाधिश, अन्वेषण आयुक्त, परिव्यय (कर) निर्धारक (मुळ न्यायशाखा), उच्च न्यायालय (लेखा कार्यालय), 12 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार न्यायदानात सुधारणा व प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष अनुदान, प्रबंधक मुळ शाखा, अपिल शाखा, न्यायालयधारक व परिसमापक अशा वेगवेगळ्या लेखा उपशिर्षांतर्गत अखर्चित रक्कम प्रत्यार्पित केल्याचे तसेच अधिकची रक्कम खर्च केल्याचे आक्षेप या परिच्छेदांन्वये नोंदविण्यात आलेले आहेत.

4.7 या सर्वच लेखा उपशिर्षांतर्गत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात विभागाने समितीसमोर सादर केलेल्या लेखी उत्तरात सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अधिक आश्चर्याची बाब म्हणजे अधिक खर्च ज्या ठिकाणी दर्शविण्यात आलेला आहे त्याठिकाणी देखील हीच कारणे नमूद आहेत. विभागाने या आक्षेपांतर्गत समितीला सादर केलेल्या लेखी उत्तरात अनेक त्रुटी असून संपुर्ण विवरण हे दोषपुर्ण आहे. यात रकमेचा कोणताही ताळमेळ दिसून येत नसून मुळ तरतूद, वित्त विभागाकडून कपात केल्यानंतर प्राप्त निधी, झालेला प्रत्यक्ष खर्च, झालेला खर्च अधिकचा दिसत असतानाही अखर्चित रक्कम प्रत्यार्पित केल्याचे विवरण पत्रात नमूद करणे यासंदर्भात समितीसमोर सादर केलेल्या दोषपुर्ण तपशीलामुळे महालेखाकारांनी आक्षेपात नमूद केलेल्या आकडेवारीशी विभागाने लेखी उत्तरात नमूद केलेल्या आकडेवारीची जुळवणी करणे समितीला अतिशय कठीण झाले. या सर्व बाबी वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारे असून आर्थिक शिस्तीला अनुसरुन नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच विधी व न्याय विभागाने मागणी . जे-1 न्यायदान लेखाशिर्षाअंतर्गत दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद करण्यात आले आहे की, सन 2012-13 मध्ये वेतनाची रक्कम समर्पित करण्यात आली आहे. कारण तेराव्या वित्त आयोगाने शिफारस केल्यानूसार केंद्र शासनाकडून राज्य शासनाला अनुदान देण्यात आले होते. सदर अनुदानाची रक्कम प्रत्येक वेळी अर्थसंकल्पात तरतुद करण्यात येत होती. ती तरतुद केली नाही तर सदर रक्कम व्यपगत होत होती. त्यामुळे विधी व न्याय विभागात अर्थसंकल्प करताना तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनाच्या रक्कमेची तरतुद करणे आवश्यक होते. ती तरतुद न्यायालय व्यवस्थापक, लोक अदालत इत्यादी घटकासाठी लागणाऱ्या पदांकरीता करण्यात येत होती. त्यासाठी पदांची निर्मिती करणे आवश्यक होते. विभागाने पदांची निर्मिती केली परंतु ती वेळेत भरली नाहीत. पदे न भरल्यामुळे रक्कम समर्पित करण्यात आल्याचे विभागाने समितीसमोर सांगितले.

शिफारस

4.8 **विधी व न्याय विभागामधील जे-1 "न्यायदान" या लेखा शिर्षाअंतर्गत अनेक उपशिर्षांसंदर्भात समितीने विस्तृत चर्चा केली असता त्या सर्व ठिकाणी कोट्यावधी रुपयांची फार मोठी रक्कम ही अखर्चित राहिल्यामुळे प्रत्यार्पित केल्याचे समितीसमोर दिसून आले. यासाठी प्रमुख कारणे ही विविध न्यायालये /**

कार्यालयातील रिक्त पदे, वर्षअखेरीस कार्यालयीन खर्चाची मोठ्या रकमांची देयके पारित न झाल्यामुळे तसेच शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे सदर बचत झालेली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. समितीने या परिच्छेदांची छाननी केली असता ही रक्कम फार मोठी असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. अशाप्रकारे निधीची मोठ्या प्रमाणात तरतूद करुन ठेवणे व वर्षअखेरीस ती अखर्चित राहिल्यास ती प्रत्यार्पित करण्यात येणे ही बाब आर्थिक शिस्तीला अनुसरुन नसून वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारी आहे. या सर्व प्रकरणी विभागांतर्गत आर्थिक नियोजनाचा अभाव समितीला दिसून येत असून मोठ्या प्रमाणात निधी वर्षभर राखून व अडवून ठेवण्याची भूमिका विधी व न्याय विभागासह अन्य सर्वच विभागांमध्ये समितीला दिसून येते. लोकलेखा समितीसमोर चर्चेला घेण्यात येणाऱ्या विनियोजन लेख्यांसंदर्भात ही उपरोक्त नियमित निरीक्षणे समितीच्या निदर्शनास आलेली आहेत. अनेक मंत्रालयीन विभागाच्या साक्षी घेताना समितीस ही बाब प्रकर्षाने जाणवते की, प्रत्येक विभागात रिक्त पदे, वैद्यकीय प्रतिपूर्ती, कार्यालयीन खर्च, वेतन व भत्ते इत्यादींसाठी फार मोठ्या प्रमाणात निधी राखून ठेवण्यात येतो व प्रतिपूर्तीअभावी तो वर्षाअखेरीस समर्पित करण्यात येतो. या प्रतिपूर्ती वर्षअखेरपर्यंत कधीही सादर होऊ शकतात. त्यामुळे अशा प्रकारे निधी राखून ठेवावाच लागतो व यास समितीचा कोणताही विरोध नाही. परंतु सर्व विभागांचा एकत्रित विचार केल्यास हा निधी फार मोठ्या प्रमाणात शासन स्तरावर वर्षभर राखून ठेवण्यात येतो. केवळ तरतूद आहे म्हणून ती ठेवायची व नंतर तीही समर्पित करायची याससमितीचा व महालेखाकारांचा आक्षेप आहे. रिक्त पदे ही काही अचानक भरली जात नाही. त्यासाठी मोठा कालावधी जातो. अशा परिस्थितीत वर्षातून तीन वेळा पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधी जर विभागाला मिळणे शक्य आहे तर ही तरतूद वर्षभर अडवून ठेवण्याची आवश्यकता नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. मिळालेली तरतूद परत केली अथवा मागितली नाही तर पुन्हा हा निधी परत मिळण्यास वित्त विभागाकडून अनेक अडचणी येतात त्यामुळे असा निधी राखून ठेवण्याकडे विभागाचा कल जास्त असतो. अशा परिस्थितीत शासनाने व विशेषत: वित्त विभागाने यातून तोडगा काढून अशा प्रकारे निधीची तरतूद वर्षभर राखून ठेवण्यापेक्षा यासाठी सर्व विभागांचा मिळून एकत्रित निधी राखून ठेवून विभागाकडून ज्या प्रमाणे मागणी येईल त्याप्रमाणे तातडीने निधीचे वितरण या एकत्रित निधीतून करण्यात यावे व फार मोठ्या प्रमाणात अशाप्रकारे निधी वर्षभर अडवून ठेवण्यासंदर्भातील कार्यपध्दतीला आळा घालावा. शासनाने व वित्त विभागाने याबाबतची शक्यता पडताळून यातून योग्य तो मार्ग काढावा व हा निधी पार्किंग झोनमधून बाहेर काढावा व याअनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस३ महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

4.9 सर्वच लेखा उपशिर्षांतर्गत घेतलेल्या आक्षेपासंदर्भात विभागाने समितीसमोर सादर केलेल्या लेखी उत्तरात सदर बचत ही रिक्त पदे, अंदाजित खर्चापेक्षा कमी देयके प्राप्त झाल्याने व शासनाच्या काटकसरीच्या धोरणामुळे व खर्चावर नियंत्रण ठेवल्यामुळे झालेली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. अधिक आश्चर्याची बाब म्हणजे अधिक खर्च ज्या ठिकाणी दर्शविण्यात आलेला आहे त्याठिकाणी देखील हीच कारणे नमूद आहेत. विभागाने या आक्षेपांतर्गत समितीला सादर केलेल्या लेखी उत्तरात अनेक त्रुटी असून संपुर्ण विवरण हे दोषपुर्ण आहे. यात रकमेचा कोणताही ताळमेळ दिसून येत नसून मुळ तरतूद, वित्त विभागाकडून कपात केल्यानंतर प्राप्त निधी, झालेला प्रत्यक्ष खर्च, झालेला खर्च अधिकचा दिसत असतानाही अखर्चित रक्कम प्रत्यार्पित केल्याचे विवरण पत्रात नमूद करणे यासंदर्भात समितीसमोर सादर केलेल्या दोषपुर्ण तपशीलामुळे महालेखाकारांनी आक्षेपात नमूद केलेल्या आकडेवारीशी विभागाने लेखी उत्तरात नमूद केलेल्या आकडेवारीची जुळवणी करणे समितीला अतिशय कठीण झाले. या सर्व बाबी वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारे असून आर्थिक शिस्तीला अनुसरुन नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. तसेच विधी व न्याय विभागाने खर्च मेळाचे काम विहित मुदतीत न

केल्यामुळे अनेक रकमांमध्ये तफावती दिसून येतात. तसेच अनेक ठिकाणी रक्कम खर्च झालेली असताना त्याचे केवळ रिकन्सीलिएशन न झाल्यामुळे अथवा झालेले रिकन्सीलिएशन विहित मुदतीत महालेखाकारांना न कळविण्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात हे आक्षेप नोंदविण्यात आलेले असून ते छाननीसाठी समितीसमोर घेण्यात आलेले आहेत. विनियोजन लेख्यासंदर्भात विभागाअंतर्गत असलेली आर्थिक ताळेबंद व लेख्यासंदर्भातील बेशिस्त कार्यपध्दती कारणीभूत असल्याचे समितीचे मत आहे. विभागांनी प्रत्येकी ३ महिन्यात लेख्यांचे रिकन्सीलीएशन करणे आवश्यक व बंधनकारक असताना याचे पालन विभागांकडून करण्यात येत नाही. परिणामी हे ताळेबंद नंतर जुळत नसल्यामुळे त्यात खूप अडचणी निर्माण होतात. यासाठी विभागाअंतर्गत लेखापरिक्षणव्दा रिकन्सीलिएशन नियमित करण्यात यावे. तसेच प्राप्त निधीचे योग्य नियोजन करुन अखर्चित रक्कम फार मोठ्या प्रमाणात प्रत्यार्पित करण्यात येऊ नये याची काळजी विभागाने घ्यावी. तसेच समितीला सादर केलेल्या दोषपुर्ण ज्ञापनाबाबत व रिकन्सीलीएशन मुदतीत न करणाऱ्या सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस 3 महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

4.10 वेतनासाठी तरतूद करण्यात आलेल्या रकमेतून वेतना व्यतिरिक्त बाबींवर उदा.फर्निचर व कार्यालयीन खर्च इ. बाबींवर निधी खर्च करता येत नसल्यामुळे या बाबींसाठी लागणारा निधी हा पूरक मागणींच्या माध्यमातून विभागाला उपलब्ध करुन घ्यावा लागतो. वास्तविकत: पूरक मागणीच्या माध्यमातून कार्यालयीन खर्चासाठी प्राप्त निधी हा पुर्णपणे खर्च झालेला असल्याचे समितीला दिसून आले. परंतु वेतनावरील रक्कम मात्र अखर्चित असते. अशा परिस्थितीत महालेखाकारांकडून आक्षेप नोंदविताना दोन्ही खर्च हे स्वतंत्ररित्या विभागणी करुन न दर्शविता केवळ मुळ तरतूदीमध्ये पुरवणी मागणीच्या रकमेचा समावेश करुन यातून एकूण खर्चाची रक्कम वजा करुन उर्वरित एकत्रित रक्कम प्रत्यार्पित दाखविल्यामुळे समितीसमोर असे चित्र निर्माण होते की, मुळ तरतूदच खर्च झालेली नसताना विभागाने पूरक मागणी का केली ? व त्यामुळे निधी प्रत्यार्पित करण्याची गरज पडली. या बाबींवर आळा बसण्यासाठी तसेच लेखे अधिक सुस्पष्ट करण्यासाठी आक्षेप नोंदविताना वेतनावरील तरतूद व वेतनाव्यतिरिक्त खर्च हे स्वतंत्ररित्या दर्शविल्यास अधिक स्पष्टता येईल व यातून समितीसमोर चर्चेसाठी येणाऱ्या अनेक बाबी कमी होवू शकतील. यासाठी महालेखाकार कार्यालयाकडून आक्षेप नोंदविताना विभागाने देखील अशा बाबींची स्पष्टता वेळेत केली तर असे आक्षेप टाळता आले असते असे समितीचे मत आहे. यासाठी वित्त विभागाने यावर विचार विनिमय करुन यथोचित तोडगा काढावा व वित्तीय नियमांच्या अधिन राहून शक्य असल्यास वेतनाचे अनुदान शिल्लक राहिल्यास ते वेतना व्यतिरिक्त बाबींवर खर्च करण्याची मुभा वित्त विभाग देवू शकते किंवा कसे ? याची देखील शहानिशा करुन योग्य तो निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. तसेच महालेखाकारांकडून मुळ तरतूद व पूरक मागणी अशा दोन्हीही रकमा एकत्र करुन आक्षेप नोंदविण्यात येतो. खर्च मेळाच्यावेळी विभागाने मूळ तरतूद व पुरवणी मागणी यामध्ये विभागाला प्राप्त निधी संदर्भात वेतनावरील तरतूद व वेतना व्यतिरिक्त अन्य बाबींवरील तरतूद व खर्च यासंदर्भात महालेखाकार कार्यालयाकडून करण्यात येणाऱ्या लेखापरिक्षणाच्यावेळी सुस्पष्ट माहिती द्यावी व असे आक्षेप निघण्याचे टाळावे. उपरोक्त विषयाच्या आधारे वित्त विभागाने खर्च मेळासंदर्भात योग्य त्या मार्गदर्शक सूचना काढून त्या सर्व विभागांना वितरीत करण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाही माहिती समितीस 3 महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

ग्रामविकास विभाग

5.1 भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन२०१२-१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र.एल-७ "ग्रामविकासावरील भांडवली खर्च" या शीर्षांतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

अनुदान क्र.एल-7 "ग्रामविकासावरील भांडवली खर्च"

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
4515, इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च 800, इतर खर्च 800 (01) (01) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना (45150119) मूळ 40,00.00 पुनर्विनियोजन -7,62.00	32,38.00	32,38.00	---

वित्त विभागाकडून सुधारित अंदाजानुसार निधी जमा न झाल्यामुळे मार्च 2013 मध्ये रु.762 लाख एवढा निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात ग्रामविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन 2012-13 या वर्षात मागणी क्र.एल-7 4515 इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च (45150119) या लेखाशीर्षांतर्गत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील भावफरक कलम, टेंडर प्रिमीयम, जादा खर्चाकरिता व राज्य प्रशासकीय खर्चाकरिता रु.4000.00 लक्ष इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती.

वित्त विभागाने रु.4000.00 लक्षपैकी रु.3238.00 लक्ष इतकाच निधी वितरणासाठी उपलब्ध करुन दिलेला असून सदर रु.3238.00 लक्ष निधी पूर्ण खर्च करण्यात आलेला आहे. तसेच रु.3238.00 लक्ष इतक्या रक्कमेच्या खर्चाबाबतचे अंतिम सुधारित अंदाज नियोजन व वित्त विभागाकडून मंजूर करण्यात आले.

साक्ष :-

5.2 उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीच्या दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती. सदर बैठकीत अनुदान क्र.एल-7 :- इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, 800 इतर खर्च, 800 (01) (01) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना या अंतर्गत ४० कोटी रुपयांची तरतूद होती. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले कीप्रधानमंत्री ग्रामसडक योजनेकरिता ४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी केवळ ३२ कोटी ३८ लाख रुपये वित्त विभागाकडून वितरित करण्यात आले होते. तेवढा निधी या योजनेतील कामांना खर्च झालेला आहे. उर्वरित निधी वितरित न झाल्यामुळे तो प्रत्यार्पित करण्यात आलेला आहे.

उर्वरित निधी खर्च न होण्याची कारणे कोणती आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाने योजनेकरिता जेवढा निधी वितरित केला होता, तेवढा पूर्णपणाने खर्च झालेला आहे. उर्वरित ७.६२ लाख रुपयांचा निधी वित्त विभागाकडून वितरितच न झाल्यामुळे पुनर्विनियोजनाच्या माध्यमातून तो आर्थिकवर्षाअखेर प्रत्यार्पित करण्यात आलेला आहे.

विभागाने वितरित न झालेल्या निधीबाबत कपातीमुळे प्रत्यार्पित केला अशी शब्द रचना न वापरता पुनर्विनियोजन असा उल्लेख केलेला आहे. विभागाने जर हे परिच्छेद महालेखाकांराच्या लक्षात आणून दिले असते की वित्त विभागानेच या निधीमध्ये कपात केलेली आहे. त्यामुळे हा निधी खर्च होऊ शकला नाही तर महालेखाकांरानी देखील तशा पध्दतीने यात अभिप्राय दिले असते.

परंतु एकूण ४० कोटी इतक्या निधीतून ७.६२ कोटी रुपये निधी वितरित झाला नाही, म्हणजे वित्त

विभागाने हा कट लावलेला आहे. परंतु यामध्ये कोठेही वितरित न झालेल्या निधीबाबत कट हा शब्द उल्लेखिलेला नाही. पैसे कमी वितरित का करण्यात आले ? विभागाने या योजनेच्या कामांकरिता विहित निधीपैकी उर्वरित निधीची मागणी केली नाही का ? कारण या बाबीमुळे प्रत्येक वेळी समितीचा कामकाजाचा वेळ बराचसा वाया जात असतो. वित्त विभागाच्या कपातीमुळे रक्कम प्रत्यार्पित केली असा उल्लेख न करता पुनर्विनियोजन हा शब्द वापल्यामुळे चर्चेचा रोखच बदलेला आहे. परंतु या संदर्भात त्या विशिष्ट आर्थिक वर्षामध्ये कपात होती की नाही, याबाबतचा रेकॉर्डही विभागाकडे उपलब्ध नाही. विभागाने या निधीबाबत कपात म्हणून लिहिणे आवश्यक होते. यामध्ये याबाबत कपात या शब्दाचा उल्लेख केलेला नाही. जलसंधारण विभागाच्या उत्तरामध्ये स्पष्टपणे २० टक्के कपात (कट) लावलेली आहे, असे म्हटलेले आहे. कपात (कट) लावण्यात आलेले पैसे आर्थिक वर्षाअखेर प्रत्यार्पित करण्यात आलेले आहेत, असे म्हटलेले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, वित्त विभागाने याकरिता राखीव असलेला उर्वरित निधी वितरित करण्यात यावा, असा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यावर वित्त विभागाने उर्वरित २० टक्के निधी वितरित करता येणार नाही, असा शेरा दिला होता.

अर्थसंकल्पीय तरतूद पूर्ण खर्च करता आले नाही, याचे कारण या निधीला कट लावण्यात आला होता, असा यामध्ये स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक होते. ४० कोटी रुपयांची मागणी केली. ४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. परंतु केवळ ३२.३८ कोटी रुपये एवढाच निधी वितरित करण्यात आलेला आहे. ७.६२ कोटी रुपयांचा निधी वित्त विभागाच्या निधी कपातीमुळे खर्च झाला नाही असे नमूद करणे आवश्यक होते. याकरिता आर्थिक शिस्तीची गरज आहे असे मत समितीने खेदाने व्यक्त केले व विभागाच्या कामकाजाबाबत नाराजी व्यक्त केली.

आता मोठया प्रमाणात स्टेट हाय वे चे रुपांतर नॅशनल हाय वे मध्ये होत आहे. याकरिता लागणारा निधी व नियोजनही आता नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियानेही मान्य केलेले आहे. या अंतर्गत ब-याचशा रस्त्यांचा निधी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत वापरला जात आहे. याकरिता डायरेक्ट केंद्राकडून खर्च केला जात आहे. ग्रामीण क्षेत्रातील अंतर्गत रस्ते मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत जोडून घेतले जात

आहेत. याबाबत शासनाची भूमिका आणि धोरण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की, प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत महाराष्ट्राकरिता मार्च,२०१७ पर्यंत १९०० कि.मी.चे लक्ष्य नियोजित केलेले असून ते पूर्ण करण्याचे नियोजनही राज्य शासनाने केलेले आहे. या १९०० कि.मी.चे काम प्रगती पथावर आहे. पुढील वर्षी अंदाजे १००० कि.मी. रस्त्याच्या कामाचे लक्ष्य ठेवून त्याकरिता नियोजन करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत २००० किमीचे काम सुरु केलेले आहे. या २००० किमीच्या कामाच्या निविदा काढलेल्या आहेत.

सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षामध्ये ज्या योजनेकरिता निधी कमी प्राप्त झाला, पुढील आर्थिक वर्षाकरिता निधीची तरतूद करीत असताना मागील वर्षी कमी दिलेला निधी इनकॉर्पोरेट करण्यात येतो का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रतीवर्षी योजनांकरिता किंवा एखादया विकास कामाकरिता आर्थिक तरतूद ही एक निरंतर प्रक्रिया आहे.

मागणी केल्यानंतरही जर निधी कमी वाटला तर पुन्हा मागण्यात येतो अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या कामाकरिता केवळ ३२.३८ कोटी रुपये जरी निधी मिळालेला असला तरीही त्यातून कोणत्याही कंत्राटदारांची देयके प्रलंबित नाहीत.

एखादे विकास काम व त्याकरिता असलेली आर्थिक तरतूद ही एक निरंतर प्रक्रिया जरी असली तरीही भाववाढ व एस्टीमेट यामधील बाबीही महत्त्वाच्या आहेत, त्यामधील बदल लक्षात घेता दरवर्षी कामाकरिता आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले.

अभिप्राय

5.3 इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, 800 इतर खर्च, 800 (01) (01) प्रधानमंत्री ग्रामसडक योजना या लेखाशिर्षाअंतर्गत 40 कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली होती. परंतु त्यातील फक्त .32.38 कोटी एवढा निधी खर्च करण्यात आला व .7.62 कोटी प्रत्यार्पित केले असा आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केला आहे.

यासंदर्भात विभागामार्फत साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आणण्यात आले की, वित्त विभागाकडून लावण्यात आलेल्या निधी कपातीमुळे विभागाला केवळ .32.38 कोटी प्राप्त झाले व तेवढा निधी या योजनेअंतर्गत खर्च झालेला आहे. उर्वरित .7.62 कोटी निधी वित्त विभागाकडून कपातीमुळे (cut) वितरीतच न झाल्यामुळे तो आर्थिक वर्षाच्या अखेर तांत्रिकरित्या प्रत्यार्पित केल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. वास्तविकरित्या वित्त विभागाकडून निधीमध्ये कपात झाल्यामुळे विभागालास निधी कमी प्राप्त झाला त्यामुळे .7.62 कोटी अखर्चित दिसत असून तांत्रिकदृष्ट्या ही रक्कम प्रत्यार्पित दाखविणे आवश्यक असताना विभागाच्या ज्ञापनात या रकमेचे पुनर्विनियोजन केल्याचे नमूद केल्यामुळे तसेच निधी कपातीचा उल्लेख न केल्यामुळे समितीसमोर वस्तुस्थिती स्पष्ट होवू शकली नव्हती. विभागाने निधी कपातीमुळे सरेंडर केलेल्या रकमेसाठी 'प्रत्यार्पित' हा शब्द वापरला असता तर समितीसमोर विषय अधिक स्पष्ट झाला असता असेही समितीने नमूद केले.

शिफारस

5.4 **सदरहु परिच्छेदाअंतर्गत .40 कोटीची तरतूद असताना .32.38 कोटी खर्च करण्यात आले व .7.62 कोटी अखर्चित रक्कम प्रत्यार्पित केल्याचे मुळ आक्षेप महालेखाकार यांच्याकडून घेण्यात आलेले आहेत. मात्र साक्षीदरम्यान समितीसमोर वित्त विभागाने लावलेल्या निधी कपातीमुळे ही रक्कम विभागाला प्राप्त झाली नाही व त्यामुळे ती अखर्चित राहिली असे स्पष्ट करण्यात आले.**

उपरोक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने विनियोजन लेख्यासंदर्भात महालेखाकारांचे आक्षेपावर चर्चा करताना समितीला नियमित येणाऱ्या अडचणीपैकी सर्वांत महत्वाची बाब म्हणजे वित्त विभागाकडून लावण्यात आलेल्या २०% कपातीमुळे समर्पित करण्यात आलेली रक्कम ही आहे. विभागासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात येते. या निधीवर काही वेळेला परिस्थितीनुसार वित्त विभागाकडून २०% कपात लावण्यात येते. त्यामुळे हा २०% निधी विभागाला वितरित होत नाही. अशा परिस्थितीत विभागाला एकूण प्राप्त तरतूदीपैकी वित्त विभागाच्या २०% कपातीमुळे प्राप्त होवू न शकलेली रक्कम

वर्षाअखेरीस तांत्रिक दृष्टया कागदोपत्री प्रत्यार्पित (surrender) केल्याचे दाखवावे लागते व रक्कम प्रत्यार्पित दाखविल्यास त्यावर महालेखाकारांकडून आक्षेप नोंदविण्यात येतात. महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर हे परिच्छेद लोकलेखा समितीसमोर चर्चेला घेणे क्रमप्राप्त ठरते. समितीसमोर विनियोजन लेख्यांवर चर्चा करतेवेळी जास्तीत जास्त प्रकरणामध्ये वित्त विभागाच्या कपातीमुळे रक्कम तांत्रिक दृष्टया समर्पित दाखविलेली असते व ही बाब विभागाअंतर्गत अत्यंत तांत्रिक स्वरुपाची असताना यात समितीचा बहुमूल्य वेळ वाया जातो व विनियोजन लेख्याअंतर्गत मोठया प्रमाणात आक्षेपांचे परिच्छेद प्रलंबित दिसतात. यावर अनेकदा समितीसमोर चर्चादेखील झालेली आहे. यासंदर्भात वित्त विभागाने यथोचित तोडगा काढून कपात करण्यात आलेल्या निधीसंदर्भात तांत्रिकदृष्टया समायोजन करुन वितरीत व अवितरीत निधीचे योग्य नियोजन करुन महालेखाकार यांच्या स्तरावर यासंदर्भात आक्षेप येणार नाहीत अशा प्रकारे उपाययोजना करण्यात यावी व अवलंबिलेल्या सुधारीत कार्यपध्दतीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

गृहनिर्माण विभाग

6.1 भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन२०१२-१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान . क्यू-३ "गृहनिर्माण" या शीर्षांतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष 2216-गृहनिर्माण 02-नागरी गृहनिर्माण 800-इतर खर्च 800 (03) (05) अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का), मुंबईशहर, मूळ 2,03,92 पुनर्विनियोजन -33.50	1,70,42	1,70,42	---

वाहने निकाली ठरल्याने वाहनाच्या दुरुस्तीवरील खर्च समाविष्ट करण्यात आला नाही. त्यामुळे आणि मुख्यत्वे रिक्त पदांमुळेरु.33.50 लाख एवढ्या रकमेचा निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अपर जिल्हाधिकारी (अति.निष्का.) मुंबई शहर या कार्यालयास वित्तीय वर्ष सन 2012-13 मध्ये शासन निर्णय दिनांक 23 जुलै, 2012 अन्वये एकूण 203.92 लक्ष इतके अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करण्यात आले होते. सदरहू कार्यालयाच्या आठमाही आढाव्यानुसार रिक्त पदांमुळे, जुनी मोटार वाहने निर्लिखित केल्यामुळे सन 2012-13 या आर्थिक वर्षात रु.170.42 लक्ष इतका प्रत्यक्ष खर्च झाला असून उर्वरीत रु.33.50 लाख इतक्या रकमेचा निधी दिनांक 31.03.2013 च्या शासन निर्णयान्वये समर्पित करण्यात आला.

यासंदर्भात महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

यावर विभागाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.203.92 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी रु.170.42 लक्ष इतका प्रत्यक्ष खर्च झाला. रिक्त पदामुळे व जुने मोटार वाहने निर्लेखित केल्यामुळे रु.33.50 लक्ष इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष 2216-गृहनिर्माण 02-नागरी गृहनिर्माण 800-इतर खर्च 800 (03) (06) अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का), पश्चिम उपनगरे पूरक 7,49,86 मूळ 0,01 पुनर्विनियोजन -65,90	6,83,97	6,83,83	-0.14

वित्त विभागाव्दारे कपात लादल्यामुळे आणि अधिदान व लेखा कार्यालयाने वेतन व भत्याची थकबाकीशी संबधित देयके न स्वीकारल्यामुळे मुख्यत्वे रिक्त पदांमुळेमार्च, 2013 मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यर्पण यांव्दारे रु.65.90 लाखांचा निधी काढण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पश्चिम उपनगरे या कार्यालयास वित्तीय वर्ष सन 2012-13 मध्ये शासन निर्णय दि.23 जुलै, 2012 अन्वये एकूण रु.749.86 लक्ष इतके अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करण्यात आले होते. तसेच शासन आदेश दिनांक 28 मार्च, 2013 अन्वये प्रस्तुत कार्यालयाच्या भाडेपट्टीवरील खर्च भागविण्यासाठी रु.71.81 लक्ष इतकी रक्कम पुरक अनुदान म्हणून मंजूर करण्यात आली आहे. अशा प्रकारे एकूण रु.821.67 लक्ष इतके अनुदान मंजूर करण्यात आले होते. सन 2012-13 या वित्तीय वर्षात प्रस्तुत कार्यालयाचा एकूण खर्च रु.683.83 लक्ष इतका झालेला आहे. तसेच सन 2012-13 या वित्तीय वर्षात रिक्त पदे, अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयाकडून वेतन भत्याची देयके परत केल्यामुळे तसेच वित्त विभागाने खर्च करण्याच्या मर्यादेवर बंधन आणल्याने सदर आर्थिक वर्षात रु.137.70 लक्ष इतकी बचत झाली असून दिनांक 31.03.2013 च्या शासन निर्णयान्वये सदरहू रक्कम समर्पित करण्यात आली आहे.

महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय :-

Suitably clarification may be given in PAC for not providing copies of supplementary order in appropriate time before the finalization of Appropriation account 2012-13. There is difference in FMG thereby the saving figures also differs. Necessary clarification for not carrying out confirmation of FMG with AG on time may please be given in PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.749.86 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. तसेच शासन आदेश दिनांक 28/3/2013 अन्वये प्रस्तुत कार्यालयाच्या भाडेपट्टीवरील खर्च भागविण्यासाठी रु.71.81 लक्ष इतकी रक्कम पुरक अनुदान म्हणून मंजूर करण्यात आली. असे एकूण रु.821.67 लक्ष इतके अनुदान मंजूर होते त्यापैकी एकूण खर्च रु.683.83 लक्ष इतका झालेला आहे. रिक्त पदे, अधिदान व लेखा अधिकारी कार्यालयाकडून वेतन भत्याची देयके परत केल्यामुळे तसेच वित्त विभागाने दिनांक 14/01/2013 च्या शासन निर्णयानुसार 20% कपात लावल्यामुळे रु.137.70 लक्ष इतकी तरतूद समर्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष 2216-गृहनिर्माण 02-नागरी गृहनिर्माण 800-इतर खर्च 800 (03) (07) अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का), पूर्व उपनगरे मूळ 8,17,69 पुनर्विनियोजन -1,49,79	6,67,90	6,67,89	-0.01

मुख्यत्वेकरुन वाहने निकामी असल्यामुळे दुरुस्तीची कामे, पेट्रोल, डिझेल यामधील बचत आणि रिक्त पदे न भरल्यामुळे, कर्मचारी निवृत्त झाल्यामुळे मार्च, 2013 मध्ये रु.149.79 लाख एवढया रकमेचा निधी प्रत्यार्पित करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पूर्व उपनगरे या कार्यालयास वित्तीय वर्ष सन 2012-13 मध्ये शासन निर्णय दि.23 जुलै, 2012 अन्वये एकूण रु.817.69 लक्ष इतके अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करण्यात आले होते. सन 2012-13 या आर्थिक वर्षात प्रस्तुत कार्यालयाचा प्रत्यक्ष खर्च 667.90 लक्ष इतका झाला आहे. रिक्त पदांमुळे जुनी मोटार वाहने निर्लेखित केल्यामुळे रक्कम दिनांक 31.03.2013 च्या शासन निर्णयान्वये समर्पित करण्यात आली आहे.

महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for saving/re-appropriation may be given to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.817.69 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. प्रस्तुत कार्यालयाचा प्रत्यक्ष खर्च रु.667.90 लक्ष इतका झाला आहे. 100 रिक्त पदांमुळे व 7 जुनी वाहने निर्लेखित केल्यामुळे रु.149.79 लक्ष इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 31- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (01)(04) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्र.1 (विशेष घटक योजना) (2216 141 6) (योजनांतर्गत) मूळ 27,00 पुनर्विनियोजन -27,00	--	--	--

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील बेघर कुटूंबाकरिता अंमलात आलेल्या राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.1 (सुधारित) या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सन 2012-13 या आर्थिक वर्षात मागणी क्र.क्यू-3, "2216-गृहनिर्माण,
31-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (01) (04) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्र.1 (विशेष घटक योजना) (2216 141 6) (योजनांतर्गत)" या लेखाशीर्षाखाली रु.27.00 कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. त्यापैकी वित्त विभागाने 80% म्हणजेच रु.21.60 कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला होता. परंतु, सदर आर्थिक वर्षात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाकडून अनुसूचित जाती प्रवर्गाच्या लाभार्थ्यांच्या घरकुलांसाठी मागणी प्राप्त झाली नाही. त्यामुळे शासनाच्या मान्यतेने सदर रु.21.60 कोटी इतका निधी "2216-गृहनिर्माण, 31- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (01) (06) झोपडपट्टी स्वच्छता कामे-झोपडपट्टी क्षेत्रफळात राहणाऱ्या अनुसूचित जातींना नागरी सुविधा पुरविणे (योजनांतर्गत) (2216 262 8) या बाबीकरिता पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आला. उर्वरीत 20% म्हणजेच रु.5.40 कोटी इतका निधी वर्षअखेरपर्यंत वित्त विभागामार्फत उपलब्ध न होऊ शकल्याने तो अर्थ-1 कार्यासनाच्या शासन निर्णय दिनांक 31.3.2013 अन्वये प्रत्यार्पित करण्यात आला आहे."

सबब, उपरोक्त स्पष्टीकरण स्विकारुन विषयांकित परिच्छेद वगळण्यात यावा, अशी विनंती महालेखाकार कार्यालयास करण्यात येत आहे.

महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय :-

This was a wrong budget provision without proper study, this scheme was introduced and afterwards it was seen a single amount was allocated in the budget provision. Please clarify the details regarding this scheme to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.2700.00 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. सदर आर्थिक वर्षात जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाकडून सदर योजनेंतर्गत मागणी प्राप्त झाली नाही. याचे प्रामुख्याने मुख्य कारण रमाई व इंदिरा आवास योजनेमध्ये अनुसूचित जातीचे लाभार्थी नसल्याबाबत सामाजिक न्याय विभागाने वर्षाअखेरच्या टप्प्यात कळविले. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाच्या मान्यतेने रु.2160.00 लक्ष इतका निधी झोपडपट्टी स्वच्छता कामे-झोपडपट्टी क्षेत्रफळात राहणाऱ्या अनुसूचित जातींना नागरी सुविधा पुरविणे (2213, 2628) या बाबीकरिता पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आला. उर्वरीत रु.540.00 लक्ष इतका निधी वित्त विभागाच्या कपातीच्या आदेशाच्या अनुषंगानेप्रत्यार्पित करण्यात आला आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 31- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (03) आर्थिक दुर्बलघटकांना घरकुल योजनेसाठी अनुदान, 103 (03) (06) नवीन चंद्रपूरशहराचा विकास (2216 11 02) (योजनांतर्गत) मूळ 55,00,00 पुनर्विनियोजन -11,00,00	44,00,00	44,00,00	--

वित्त विभागाने केवळ 80% निधी वितरित करण्यास अनुमती दिल्यामुळे मार्च, 2013 मध्ये रु.11.00 कोटी इतका निधी वर्षाअखेरीस (मार्च, 2013) प्रत्यार्पित करण्यात आला आहे.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन 2012-13 या आर्थिक वर्षात "2216 गृहनिर्माण, (03) आर्थिक दुर्बल घटकांना घरकुल योजनेसाठी अनुदान (03) (06) नवीन चंद्रपूर शहराचा विकास (2216 11 02) (योजनांतर्गत)" या लेखाशिर्षाखाली रु.55.00 कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. सदर निधीचे वितरण करण्यास परवानगी मिळण्याबाबत वित्त विभागास विनंती करण्यात आली होती. परंतु सदर वित्तीय वर्षाच्या अखेरीस (मार्च, 2013) वित्त विभागाने त्यांच्या परिपत्रक क्र.अंदाज-2012/प्र.क्र.64/2012/अर्थसंकल्प-3, दिनांक 14.1.2013 अन्वये उपरोक्त निधीपैकी रु.44.00 कोटी म्हणजेच 80% निधीच्या वितरणास अनुमती दिली आहे. सदर निधी पूर्णपणे खर्च करण्यात आला असून याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र म्हाडाच्या नागपूर मंडळाने सादर केले आहे. परिणामस्वरुप उर्वरीत रु.11.00 कोटी इतका निधी वर्षाअखेरीस (मार्च, 2013) प्रत्यार्पित करण्यात आला आहे.

सबब, उपरोक्त स्पष्टीकरण स्वीकारुन विषयांकित परिच्छेद वगळण्यात यावा, अशी विनंती महालेखाकार कार्यालयास करण्यात येत आहे.

महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.5500.00 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. त्यापैकी रु.4400.00 लक्ष इतका खर्च झाला असून वित्त विभागाने दि.14/01/2013 च्या शासन निर्णयानुसार 20% कपात केल्यामुळे रु.1100.00 लक्ष इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 31- सहायक अनुदाने (वेतनेत्तर) (03) (08) विडी कामगारांना घरकुलांसाठी अर्थसहाय्य (राज्य हिस्सा) (2216 120 2) (योजनांतर्गत) मूळ 5,00,00 पुनर्विनियोजन -5,00,00	---	---	---

मागणी अभावी मार्च, 2013 मध्ये रु.5.00 कोटी इतका संपूर्णनिधी प्रत्यार्पित करण्यात आला आहे.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन 2012-13 या आर्थिक वर्षात "2216 गृहनिर्माण-31-सहायक अनुदाने (वेतनेतर) (03) (08) विडी कामगारांना घरकुलांसाठी अर्थसहाय्य (राज्य हिस्सा) (2216 120 2) (योजनांतर्गत)" या लेखाशिर्षाखाली रु.5.00 कोटी इतकी तरतूद उपलब्ध होती. या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून ज्या विडी कामगार संस्थांनाघरबांधणीसाठी रु.40,000/- प्रति घरकुल इतके अर्थसहाय्य प्राप्त होते, त्या संस्थांनात्यांच्या मागणीनुसार राज्य शासनामार्फत रु.25,000/- प्रति घरकुल इतके अनुदान मंजूर करण्यात येते. सन 2012-13 या आर्थिक वर्षात कोणत्याही विडी कामगार संस्थेकडून राज्य शासनाकडून देण्यात येणाऱ्या रु.25,000/- इतक्या निधीसाठी मागणी प्राप्त झाली नाही. त्यामुळे वर्षाअखेरीस (मार्च, 2013) उपरोक्त रु.5.00 कोटी इतकी संपूर्णतरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

सबब, उपरोक्त स्पष्टीकरण स्वीकारुन विषयांकित परिच्छेद वगळण्यात यावा, अशी विनंती महालेखाकार कार्यालयास करण्यात येत आहे.

महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.500.00 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. विडी कामगारांकरिता केंद्र शासनाव्दारे 100% अनुदानाच्या माध्यमातून घरकुलाकरिता निधी देण्यात येतो. परंतु हा निधी कमी पडत असल्याने पुरक अनुदानाची आवश्यकता होती. म्हणून राज्य शासनाने ज्या केंद्रीय योजनेत केंद्र शासनाव्दारे घरकुलांना निधी दिला आहे याची खात्री करुन त्यास राज्य शासनाव्दारे पुरक अनुदानाच्या स्वतंत्र योजनेव्दारे (विचाराधीन) (2216 1202) योजनेतून) पुरक अर्थसहाय्य विडी कामगारांच्या संस्थांच्यामागणीनुसार देण्यात येते. सन 2012-13 मध्ये राज्य शासनाकडे राज्य योजनेच्या तरतूदीमधून निधीची मागणी न आल्याने खर्च होऊ शकला नाही. परिणामी रु.500.00 लक्ष इतकी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80 सर्वसाधारण 103 गृहनिर्माण मंडळ, महानगरपालिका, इत्यादींना सहाय्य 103 (04) (01) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान-नागरी क्षेत्रातील गरीबांना मुलभूत सेवा-योजना (सर्वसाधारण योजना) (राज्य हिस्सा) (25%) मूळ 2,90,69,00 पुनर्विनियोजन -2,60,15,83	 30,53,17	 30,53,17	 ---

टिपा/भाष्य :- निरंक

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानाअंतर्गत 'शहरी गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे' हा केंद्र पुरस्कृत उप अभियान, राज्यातील 14 नागरी स्वराज्य संस्थांमध्ये राबवण्यात येते. केंद्र व राज्य हिश्याची प्रकल्पातील कटीबध्दतेच्या अनुषंगाने लागणारा केंद्र व राज्य हिश्याकरिताचा निधी अर्थसंकल्पातून वितरित करण्यात येतो. केंद्र शासनाव्दारे मंजूर प्रकल्पाच्या अंमलबजावणी नागरी स्वराज्य संस्थांमधूनहोत असल्याने राज्य हिश्याची तरतूद प्रकल्प मंजूरीच्या व त्या वर्षात केंद्र शासनाकडून अपेक्षित केंद्र हिश्याच्या अनुषंगाने वर्षाच्या सुरुवातीस करण्यात येते. प्रकल्पाच्या प्रगतीनुसार केंद्र शासनाव्दारे प्राप्त निधी कमी प्रमाणात प्राप्त झाल्यास परिणामी राज्य हिश्यात बचत होते. सदर योजनेसाठी मान्य असणारे प्रकल्प लक्षात घेऊन रु.290.69 कोटी इतकी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. परंतु रु.30,53.17 लक्ष इतका प्रत्यक्ष खर्च योजनेअंतर्गत राज्य हिश्यापोटी झाला आहे. उर्वरीत रु.231.82 कोटी पुनर्वियोजनाव्दारे राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात आले. रु.28,33,84,500/- इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे. तसेच सदर योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने केंद्र हिश्याच्या प्रमाणात राज्य हिस्सा वितरीत होतो. या वर्षी केंद्र शासनाकडून या योजनेतंर्गत प्राप्त केंद्र हिस्सा कमी प्रमाणात उपलब्ध झाल्याने तेवढ्या प्रमाणात राज्य हिस्साही कमी झाला आहे.

महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.29069.00 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. ही योजना केंद्र पुरस्कृत असल्याने केंद्र हिश्याच्या प्रमाणात राज्य हिस्सा वितरित होतो. यावर्षी केंद्र शासनाकडून या योजनेंतर्गत प्राप्त हिस्सा रु.90,09.00 लक्ष इतकाच कमी प्रमाणात उपलब्ध झाल्याने तेवढ्या प्रमाणात राज्य हिस्सा कमी वितरित करण्यात आला. त्यामुळे प्रत्यक्ष खर्च रु.3053.17 लक्ष इतका झाला आहे. रु.231,82.00 लक्ष इतकी तरतूद पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आली. उर्वरीत रु.28,33.84 लक्ष इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80 सर्वसाधारण 103 गृहनिर्माण मंडळ, महानगरपालिका, इत्यादींना सहाय्य 103 (04) (02) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान-एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (राज्य हिस्सा) मूळ 83,26,00 पुनर्विनियोजन -79,60,69	 3,65,21	 3,65,21	 ---

टिपा/भाष्य :-

केंद्रीय हिश्याच्या प्रमाणात राज्य हिस्सा कमी दिल्यामुळे आणि वित्त विभागाच्या मंजूरीनुसार अनुदानाच्या 80% मर्यादेत खर्च केल्यामुळे मार्च 2013 मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यपर्ण यांव्दारे रु.33976.62 लाख एवढया रकमेचा निधी काढण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानाअंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम हा केंद्र पुरस्कृत उप अभियान राज्यातील 93 नागरी स्वराज्य संस्थांमध्ये राबवण्यात येते. केंद्र व राज्य हिश्याकरिता निधी अर्थसंकल्पातून वितरित करण्यात येतो. केंद्र शासनाव्दारे मंजूर प्रकल्पाच्या अंमलबजावणी नागरी स्वराज्य संस्थांमधून होत असल्यामुळे प्रकल्पातील विविध अडचणीवर मात करुन सुरु होणे अपेक्षित असते. राज्य शासनाव्दारे राज्य हिश्याची तरतूद प्रकल्प मजूरीच्या अनुषंगाने वर्षाच्या सुरुवातीस करण्यात येते. प्रकल्पाच्या प्रगतीनुसार केंद्र हिस्सा प्राप्त झाल्यावर त्या अनुषंगाने राज्य हिस्सा वितरित करण्यात येतो. केंद्र शासनाव्दारे प्राप्त निधीच्या कमी प्रमाणात प्राप्त झाल्यास परिणामी राज्य

हिश्यात बचत होते. सदर योजनेसाठी रु.83.26 कोटी इतकी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. रु.65.21 लक्ष इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे. रु.60 कोटी पुनर्विनियोजनाव्दारे राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. रु.19,60,78,700/- इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.8326.00 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. प्रत्यक्ष खर्च रु.365.21 लक्ष झाला आहे. रु.6000.00 लक्ष इतकी तरतूद पुनर्विनियोजनाव्दारे राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेसाठी क्र.1 करीता उपलब्ध करुन देण्यात आले. रु.1960.78 लक्ष इतकी प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80 सर्वसाधारण 103 गृहनिर्माण मंडळ, महानगरपालिका, इत्यादींना सहाय्य 103 (05) (01) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान-नागरी क्षेत्रातील गरिबांना मुलभूत सुविधा (केंद्र हिस्सा)			
मूळ 5,77,20,00		90,09,02	
पुनर्विनियोजन -4,87,10,98	90,09,02		---

टिपा व भाष्य :-

वित्त विभाग व नियोजन विभागाच्या मंजूरीनुसारएकात्मिक गृहनिर्माण व गलिच्छ वस्ती विकास योजनेमध्ये केंद्रीय हिश्याच्या निधी उपलब्ध करण्यासाठी अपेक्षित केंद्रीय हिस्सा प्राप्त न झाल्यामुळे मार्च, 2013 मध्ये प्रत्यर्पण/पुनर्विनियोजन यांव्दारे रु.48710.98 लाख एवढया रकमेचा निधी काढण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानाअंतर्गत शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे हा केंद्र पुरस्कृत उप अभियान राज्यातील 14 नागरी स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यात येते. केंद्र व राज्य हिश्याकरिता निधी अर्थसंकल्पातून वितरित करण्यात येतो. केंद्र शासनाव्दारे मंजूर प्रकल्पाच्या अंमलबजावणी नागरी स्वराज्य संस्थांमधून होत असल्याने प्रकल्पातील विविध अडचणीवर मात करुन सुरु होणे अपेक्षित असते. राज्य शासनाव्दारे केंद्र हिश्याची तरतूद प्रकल्प मंजूरीच्या अनुषंगाने व प्रकल्पाचा टप्पा व 3 हप्त्यात मिळणारी रक्कम यांचा विचार होऊन वर्षाच्या सुरुवातीस करण्यात येते प्रकल्पाच्या प्रगतीनुसार केंद्र हिस्सा प्राप्त झाल्यावर तो प्रकल्पांना वितरित करण्यात येतो. सदर योजनेसाठी या योजनाअंतर्गत 53 प्रकल्पामध्ये रु.4993 कोटी रकमेचे प्रकल्प मंजूर असून सदर प्रकल्प पूर्णतेच्या विविध टप्प्यात असल्याने रु.577.20 कोटी इतकी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. रु.90,09.02 लक्ष इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाला असल्याने प्रत्यक्ष खर्च झाला आहे. रु.397,10,98,000/- इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे. तसेच सदर योजनेसाठी केंद्र शासनाकडून अपेक्षित निधी प्राप्त झालेला नाही. प्रत्यक्षात प्राप्त निधी वितरित करण्यात आलेला आहे.

महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.57720.00 लक्ष इतकी अर्थसंकल्पीत तरतूद मंजूर करण्यात आली होती. केंद्र शासनाचा निधी हा प्रकल्पाच्या प्रगतीनुसार प्राप्त होत असतो. त्यानुसार रु.9009.02 लक्ष इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाला. उर्वरीत बचतीमधून रु.90,00.00 लक्ष इतका निधी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियान एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (2216 1461) अंतर्गत केंद्र हिश्यापोटी दि.31/03/2013 च्या FMG च्या आदेशान्वये पुनर्विनियोजित करण्यात आला. उर्वरीत रु.39710.98 लक्ष इतक निधी समर्पित करण्यात आला आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80 सर्वसाधारण 103 गृहनिर्माण मंडळ, महानगरपालिका, इत्यादींना सहाय्य 103 (05) (02) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान-एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम (सर्वसाधारण योजना) (केंद्राचा हिस्सा) (80%) मूळ 3,00,00,00 पुनर्विनियोजन -7,34,03	2,92,65,97	2,92,65,97	---

टिपा/भाष्य :-

वित्त विभागाव्दारे मान्यता प्राप्त अनुदानाच्या 80% मर्यादेत खर्च झाल्यामुळे मार्च, 2013 मध्ये रु.734.03 लाख एवढ्या रकमेचा निधी काढण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानाअंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम हा केंद्र पुरस्कृत उप अभियान रात्यातील 93 नागरी स्वराज्य संस्थांमध्येराबविण्यात येते. केंद्र व राज्य हिश्याकरिता निधी अर्थसंकल्पातूनवितरित करण्यात येतो. केंद्र शासनाव्दारे मंजूर प्रकल्पाच्या अंमलबजावणी नागरी स्वराज्य संस्थांमधून होत असल्याने प्रकल्पातीिं विविध अडचणीवर मात करुन सुरु होणे अपेक्षित असते. केंद्र शासनाचा हिस्सा दोन टप्प्यात प्राप्त होतो. प्रकल्पाच्या प्रगतीनुसार केंद्र हिस्सा प्राप्त झाल्यावर त्या अनुषंगानेराज्य हिस्सा वितरित करण्यात येतो. केंद्र शासनाव्दारे प्राप्त निधीच्या कमी प्रमाणात प्राप्त झाल्यास परिणामी राज्य हिश्यात बचत होते. सदर योजनेसाठी रु.300.00 कोटी इतकी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. तथापि, वित्त विभागाने दि.14 जानेवारी, 2013 च्या परिपत्रकान्वये मूळ अर्थसंकल्पीय तरतूदीच्या 80 टक्के मर्यादेमध्ये खर्च करण्याबाबत सूचना दिल्याने सुधारित तरतूद रु.240.00 कोटी इतकी झाली. रु.2,92,65.97 लक्ष इतका निधी केंद्र हिश्यापोटी प्राप्त होऊन प्रत्यक्ष खर्च झाला आहे. तसेच या योजनेसाठी रु.90 कोटी पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आले. रु.97,34,03,000/- इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे. सर्व तरतूद खर्च करण्यात आल्या अधिक खर्च (+) किंवा बचत (-) निरंक आहे.

महालेखाकार कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.300,00.00 लक्ष इतकी तरतूद मंजूीकरण्यात आली होती. केंद्र शासनाकडून केंद्र हिश्यापोटी प्राप्त रक्कम वितरित करण्यामुळे प्रत्यक्ष खर्च रु.29,297.00 लक्ष झाला आहे. तरतूद कमी पडत असल्याने रु.90,00.00 लक्ष इतकी तरतूद गरीबांना मुलभूत सुविधा पुरविणे, केंद्र हिस्सा, सर्वसाधारण घटक (2216 1452) च्या बचतीतून पुनर्विनियोजनाव्दारे प्राप्त करण्यात आली. वित्त विभागाची कपात लक्षात घेता उर्वरीत रु.97,34.03 लक्ष इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80 सर्वसाधारण 103 गृहनिर्माण मंडळ, महानगरपालिका, इत्यादींना सहाय्य 103 (04) (04) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान-एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम (विशेष घटक योजना) (राज्य हिस्सा) (10%) मूळ 30,00,00 पुनर्विनियोजन -29,26,25	73,75	73,75	---

टिपा/भाष्य :-

वित्त विभागाव्दारे मान्यताप्राप्त अनुदानाच्या 80% मर्यादेत खर्च केल्यामुळे मार्च, 2013 मध्ये प्रत्यपर्ण/पुनर्विनियोन यांव्दारे रु.2926.25 लाख एवढ्या रकमेचा निधी काढण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियानाअंतर्गत एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम हा केंद्र पुरस्कृत उप अभियान राज्यातील 93 नागरी स्वराज्य संस्थांमध्येराबविण्यात येते. केंद्र व राज्य हिश्याकरिता निधी अर्थसंकल्पातूनवितरित करण्यात येतो. केंद्र शासनाव्दारे मंजूर प्रकल्पाच्या अंमलबजावणी नागरी स्वराज्य संस्थांमधून होत असल्याने प्रकल्पातील विविध अडचणीवर मात करुन सुरु होणे अपेक्षित असते. राज्य शासनाव्दारे राज्य हिश्याची तरतूद प्रकल्प मंजूरीच्या अनुषंगाने वर्षाच्या सुरुवातीस करण्यात येते. प्रकल्पाच्या प्रगतीनुसार केंद्र हिस्सा प्राप्त झाल्यावर त्या अनुषंगानेराज्य हिस्सा वितरित करण्यात येतो. केंद्र शासनाव्दारे प्राप्त निधीच्या कमी प्रमाणात प्राप्त झाल्यास परिणामी राज्य हिश्यात बचत होते. सदर योजनेसाठी रु. 30.00 कोटी इतकी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. तथापि, वित्त विभागाने दिनांक 14 जानेवारी, 2013 च्या परिपत्रकान्वये मूळ अर्थसंकल्पीय तरतूदीच्या 80 टक्के मर्यादेमध्ये खर्च करण्याबाबत सूचना दिल्याने सुधारित तरतूद रु.24.00 कोटी इतकी झाली. यापैकी रु. 14.40 कोटी इतकी तरतूद अनुसूचित जातीचे प्राबल्य असलेल्या झोपडपट्टी क्षेत्रात नागरी सुविधा पुरविणेकरिता सामाजिक न्याय विभागाच्या सहमतीने पुनर्विलोकीत करण्यात आले. रु.14,76,24,800 इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे व रु.73.75 लक्ष इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे. तसेच सदर योजना ही केंद्र पुरस्कृत योजना असल्याने केंद्र हिश्याच्या प्रमाणात अनुसूचित जातीचे प्राबल्य असणाऱ्या लाभार्थ्यांच्या प्रकल्पात राज्य हिस्सा वितरित होतो. सदर लेखाशीर्षातंर्गत पुनर्विनियोजनानंतर रु.73.75 लक्ष इतकी तरतूद उपलब्ध करण्यात आली होती व उपलब्ध करण्यात आलेली सर्व तरतूद खर्च करण्यात आल्याने अधिक खर्च (+) किंवा बचत (-) निरंक आहे.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.30,00.00 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. यापैकी रु.14,40.00 लक्ष इतकी तरतूद अनुसूचित जातीचे प्राबल्य असलेल्या झोपडपट्टी क्षेत्रात नागरी सुविधा पुरविण्याकरिता सामाजिक न्याय विभागाच्या सहमतीने पुनर्विनियोजित करण्यात आली. रु.73.75 लक्ष इतका प्रत्यक्ष खर्च झाला आहे. उर्वरीत रु.1486.25 लक्ष प्रत्यार्पित करण्यात आला आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80 सर्वसाधारण 103 गृहनिर्माण मंडळ, महानगरपालिका, इत्यादींना सहाय्य 103 (06) (01) झोपडपट्टी निवासी आणि नागरी क्षेत्रातील गरीबांसाठी राजीव आवास योजना (केंद्राचा हिस्सा) (50%) मूळ 50,00,00 पुनर्विनियोजन -50,00,00	 --	 --	 ---

टिपा/भाष्य :-

या योजनेअन्वये केंद्र सरकारकडून निधी न मिळाल्यामुळे त्याबरोबर वित्त विभागाव्दारे मान्यताप्राप्त अनुदानाच्या 80% मर्यादेत खर्च केल्यामुळे मार्च 2013, 2013 मध्ये रु.5000 लाख एवढया रकमेचा संपूर्ण निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाव्दारे सुरु करण्यात आलेली राजीव आवास योजनेची अंमलबजावणी करण्यापूर्वी पूर्वतयारी व पथदर्शी प्रकल्प घेण्याकरिता केंद्र शासनाकडून प्रकल्प मान्य होऊन केंद्र हिस्सा प्राप्त झाल्यास असा निधी वितरित करण्याच्या उद्देशाने निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला होता. परंतु राज्य शासनाव्दारे योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात निर्णय होऊ शकला नाही. सदर योजनेसाठी रु.50.00 कोटी इतकी मुळ अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. तथापि, वित्त विभागाने दिनांक 14 जानेवारी, 2013 च्या परिपत्रकान्वये मूळ अर्थसंकल्पीय तरतूदीच्या 80 टक्के मर्यादेमध्ये खर्च करण्याबाबत सूचना दिल्याने सुधारित तरतूद रु.40.00 कोटी इतकी झाली. तसेच सदर योजनेतंर्गत केंद्र शासनाकडून निधी वितरित करण्यात आलेला नाही. सबब, संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे. यास्तव सदर लेखाशिर्षांतर्गत अधिक खर्च (+) किंवा बचत (-) निरंक आहे.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.50,00.00 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. सदर योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून निधी वितरित करण्यात आला नाही. त्यामुळे संपूर्ण रु.50,00.00 लक्ष इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80 सर्वसाधारण 800 इतर खर्च (04) (01) महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम, 2012 अंतर्गत गृहनिर्माण नियामक प्राधिकरण (2216 2664) मूळ 1,25,01 प्रत्यार्पण ----	00.00	00.00	00.00

प्रत्यक्ष आवश्यकतेच्या आधारे मार्च, 2013 मध्ये प्रत्यार्पण/पुनर्विनियोजन याव्दारे रु.125.01 लाख एवढ्या रकमेचा निधी उपलब्ध करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण नियामक प्राधिकरणासाठी रुपये 125.01 लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली होती. परंतु वर्ष 2012-13 मध्ये प्राधिकरणाची स्थापना होवू न शकल्याने हा निधी परत करण्यात आला.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.1,25.01 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. सदर तरतूदीमधून अपिल अधिकारी कार्यालयास 06-दूरध्वनी, वीज व पाणीशुल्क याकरिता रु.36,000/- रक्कम पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. वर्ष 2012-13 मध्ये प्राधिकरणाची स्थापना होवू न शकल्याने उर्वरीत रु.1,24.65 लक्ष इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आला आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80 सर्वसाधारण 800 इतर खर्च (04) (02) महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम, 2012 अंतर्गत गृहनिर्माण अपीलीय न्यायाधिकरण (2216 2673) मूळ 1,25,01 पुनर्विनियोजन -1,25,01 प्रत्यार्पण ----	00.00	00.00	00.00

महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम, 2012 हे विधेयक मंजूर न झाल्यामुळे मार्च, 2013 मध्ये पुनर्विनियोजन/प्रत्यर्पण याव्दारे रु.125,01 लाख एवढ्या रकमेचा निधी काढण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण अपीलीय न्यायाधिकरणासाठी रुपये 125.01 लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली होती.

परंतु वर्ष 2012-13 मध्ये न्यायाधिकरणाची स्थापना होवू न शकल्याने हा निधी परत करण्यात आला.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु. 1,25.01 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. परंतु वर्ष 2012-13 मध्ये न्यायाधिकरणाची स्थापना होवू न शकल्याने रु.29.05 लक्ष इतका निधी प्रत्यार्पित करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार रु.24.08 लक्ष इतक्या रकमेचे अपिलीय न्यायाधिकरणाच्या कार्यालयाचे म्हाडाकडे असणाऱ्या थकीत भाड्यापोटी (2216 0672) या लेखाशीर्षाखाली पुनर्विनियोजित करण्यात आले आहेत. या शिवाय रु.71.80 लक्ष इतका निधी (2216 1309) या लेखाशीर्षाखाली (अपर जिल्हाधिकारी/पश्चिम उपनगरे यांच्या अंधेरी व वांद्रे येथील भाडे प्रदानाकरिता) व वार्षिक हप्त्याची प्रतिपूर्ती रु.9,000/- (2216 0643) असे एकूण रु.95.96 लक्ष इतका निधी दिनांक 31/03/2013 च्या आदेशान्वये पुनर्विनियोजित करण्यात आला.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80 सर्वसाधारण 800 इतर खर्च 800 (00) (09) महाराष्ट्र आश्रय स्थान निधीसाठी राज्याचे अंशदान मूळ 50,00,00 पुनर्विनियोजन -10,00,00	40,00,00	40,00,00	---

टिपा/भाष्य :-

वित्त विभागाव्दारे मान्यताप्राप्त अनुदानाच्या 80% मर्यादेत खर्च केल्यामुळे मार्च, 2013 मध्ये रु.1000 लाख एवढ्या रकमेचा निधी परत करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्य व केंद्र शासनाच्या योजनांना अर्थसंकल्पाव्यतिरिक्त पूरक निधी उपलब्ध व्हावा याकरिता शासनाच्या मान्यतेने दिनांक 31 मे, 2010 च्या शासन निर्णयानुसार म्हाडाच्या स्तरावर महाराष्ट्र निवारा निधी स्थापित करण्यात आला आहे. राज्य शासनाव्दारे प्रस्तुत निधीत रु.100 कोटी इतका निधी अंशदान म्हणून देण्याबाबत तरतूद आहे. त्या अनुषंगाने मागील वर्षापासून टप्याटप्याने अंशदान म्हणून निधी वितरित होत असतो. सन 2012-13 या वर्षाकरिता रु.50.00 कोटी इतकी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. तथापि, वित्त विभागाने मूळ अर्थसंकल्पीय तरतूदीच्या 80 टक्के मर्यादेमध्ये खर्च वित्त विभागाच्या दिनांक 14 जानेवारी, 2013 च्या परिपत्रकानुसार करण्याबाबत सूचना दिल्याने सुधारित तरतूद रु.40.00 कोटी इतकी झाली. सदरहू रु.40 कोटी इतकी तरतूद वितरित करण्यात आली आहे व उर्वरीत रु.10 कोटी वर्षाअखेर समर्पित करण्यात आली. यास्तव सदर लेखाशीर्षांतर्गत अधिक खर्च (+) किंवा बचत (-) निरंक आहे.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु. 50,00.00 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. वित्त विभागाने मूळ अर्थसंकल्पीय तरतूदीच्या 80% तरतूद खर्च करण्याची मंजूरी दिल्यामुळे उर्वरीत रु.10,00.00 लक्ष इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 02 नागरी गृहनिर्माण 800 इतर खर्च 800 (01) (01) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र सुधारणा अधिनियम, 1971 अंतर्गत असलेल्या न्यायाधिकरणावरील खर्च मूळ 16,24 पूरक 0,01 पुनर्विनियोजन -23,59	39,84	42,05	+2,21

प्रत्यक्ष आवश्यकतेनुसार मार्च 2013 मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.23.59 लाख एवढ्या रकमेचा अतिरिक्त निधी देण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व.पु.) न्यायाधिकरण या कार्यालयास वित्तीय वर्ष सन 2012-13 मध्ये शासन निर्णय दिनांक 23 जुलै, 2012 अन्वये एकूण रु.16.24 लक्ष इतके अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करण्यात आले होते. सदर कार्यालयाच्या भाडेपट्टी व कर या उद्दिष्टांसाठी पुरक अनुदान व पुनर्विनियोजनाने दि.30 मार्च, 2013 च्या शासन निर्णयान्वये रु.24.08 लक्ष इतके अनुदान मंजूरकरण्यात आले. त्यानुसार सन 2012-13 या वित्तीय वर्षात सदरहू कार्यालयास रु.40.32 लक्ष इतके प्रत्यक्ष सुधारीत अनुदान मंजूरकरण्यात आले होते. सन 2012-13 या आर्थिक वर्षात सदरहू कार्यालयाचा प्रत्यक्ष खर्च रु.39.84 इतका झाला. एकूण रु.48,000/- इतकी बचत झाली असून सदरहू रक्कम दिनांक 31.03.2013 च्या शासन निर्णयान्वये समर्पित करण्यात आली आहे.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

In the EM department has stated that the revised estimates sanctioned by the finance Department was Rs.24.08 lakh. However, it may be clarified as to whether re-appropriation order was issued for increase in the grant and also whether FMG was confirmed with A.G. Reasons for not carrying out the same may be explained in PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.16.24 लक्ष इतकी तरतूद मंजूरकरण्यात आली होती. सदर कार्यालयाच्या भाडेपट्टी व कर या उद्दीष्टांसाठी पुरक अनुदान रु.1000/- व पुनर्विनियोजनाने एकूण रु.24.08 लक्ष इतके अनुदान मंजूर करण्यात आले. आवश्यकतेनुसार दिनांक 31 मार्च, 2013 पर्यंत प्रत्यक्ष खर्च रु.39.84 लक्ष इतका झाला. उर्वरीत रु.00.48 लक्ष इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 31-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) 800 (01) (03) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्र.1 (योजनांतर्गत) मूळ 1,06,55,00 पुनर्विनियोजन -2,38,69,00	3,45,24,00	3,45,23,64	-0,36

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील बेघर कुटूंबाकरिता अंमलात आलेल्या राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना क्र.1 या योजनेअंतर्गत सन 2012-13 या आर्थिक वर्षात मागणी क्र.क्यू-3 "2216-गृहनिर्माण, 31-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (01) (03) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्र.1 (योजनांतर्गत)" या लेखाशीर्षाखाली रु.10655 लाख इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. परंतु योजनेसाठी अधिक निधी आवश्यक असल्याने पुनर्विनियोजनाने 260,00 लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला. एकूण निधी मूळ अर्थसंकल्पीय तरतूद 10655 अधिक पुनर्विनियोजनाने उपलब्ध करुन दिलेला निधी 260,00 लक्ष असा एकूण 366,55 लक्ष असा होता. वित्त विभागाने मूळ अर्थसंकल्पीय तरतूदींपैकी (10655 लक्ष) फक्त 80%च निधी 85,24 लक्ष वितरित केल्याने उर्वरीत 20% निधी 21,31 लक्ष निधी खर्च करण्यात आला. रु.36,400 इतकी बचत प्रत्यार्पित करणे आवश्यक होते. परंतु ते प्रत्यार्पित करण्यात आले नाहीत. यापुढे याबाबत दक्षता घेण्यात येईल.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds Rs.36,400 may be explained in PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु. 106,55.00 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. परंतु योजनेसाठी अधिक निधी आवश्यक असल्याने पुनर्विनियोजनाने रु.260,00.00 लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून एकूण रु.366,55.00 लक्ष इतका निधी उपलब्ध करण्यात आला. त्यापैकी रु.345,23.64 लक्ष निधी खर्च करण्यात आला. त्यापैकी रु.345,23.64 लक्ष निधी खर्च करण्यात आला. वित्त विभागाने मूळ तरतूदीच्या 80% निधी उपलब्ध करुन दिल्याने उर्वरीत 20% तरतूद (रु.21,31.00 लक्ष) प्रत्यार्पित करण्यात आला. उर्वरीत रु.36,400/- इतकी किरकोळ बचत प्रत्यार्पित करणे आवश्यक होते. परंतु ती प्रत्यार्पित करण्यात अनावधाने दिनांक 31 मार्च, 2013 च्या FMG च्या आदेशात दर्शविण्यात आली नाही.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80-सर्वसाधारण 103-गृहनिर्माण मंडळे, महामंडळे इत्यादींना सहाय्य 103 (01) (06) झोपडपट्टी सुधार कामे गलिच्छ वस्तीमध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या व्यक्तींना सुविधा पुरविणे (विशेष घटक योजना) (2216 2628) मूळ 60,00,00 पुनर्विनियोजन 24,00,00	84,00,00	84,00,00	---

कोणतेही विनिर्दिष्ट कारण न देता, वर नमूद केलेल्या शिर्षाखाली मार्च, 2013 मध्ये पुनर्विनियोजनाव्दारे रु.26269 लाख एवढ्या रकमेचा अतिरिक्त निधी देण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन 2012-13 या आर्थिक वर्षात मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील मतदार संघातील दलित वस्त्यांमध्ये लोकोपयोगी व अत्यावश्यक नागरी सुविधा पुरविण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेंतर्गत रु.60 कोटी अर्थसंकल्पित करण्यात आला होता. तथापि, याच प्रयोजनांसाठी मागील वर्षात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीपैकी बराचसा निधी अखर्चित राहिल्याने, वित्त विभागाने रु.60 कोटी निधीपैकी सुधारित अंदाजाव्दारे रु.48 कोटी इतका निधी अंतिमत: वितरित करण्यात आला. सदर निधी म्हाडा प्राधिकरणांस शासन निर्णय निधी 2012/प्र.क्र.292/झोपनि-2, दि.30.3.2013 अन्वये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

बालकांचा मोफत व सक्तीचा अधिकार अधिनियम, 2009 (RTE 2009) तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये दिनांक 31.03.2013 पर्यंत मुलां-मुलींकरिता स्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगानेमुंबईशहर व उपनगर जिल्ह्यातील गलिच्छ वस्त्यांमधीलशाळांनापिण्याचे स्वच्छ पाणी व पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगानेसामाजिक न्याय विभागाने पुनर्विनियोजनाव्दारे सन 2012-13 या आर्थिक वर्षात रु.36 कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला होता. सदर निधी म्हाडा प्राधिकरणांस शासन निर्णय क्र.निधी 2013/प्र.क्र.45/झोपनि-2, दिनांक 30.3.2013 अन्वये उपलब्ध करुन देण्यात आला. सदरहू निधी पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करुन घेतांनावित्त विभागास पुरेशी कारणमीमांसा देण्यात आली होती.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.60,00.00 लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. तथापि, याच प्रयोजनासाठी मागील वर्षात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीपैकी बराचसा निधी अखर्चित राहिल्यामुळे वित्त विभागाने 80% इतकीच म्हणजेच रु.48,00.00 लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला. त्यामुळे 20% म्हणजेच रु.12,00.00 लक्ष इतकी तरतूद समर्पित करण्यात आली.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यातील सर्व शाळांमध्ये मुलांमुलींकरितास्वतंत्र स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगानेमुंबईशहर व उपनगर जिल्ह्यातील गलिच्छ वस्त्यांमधीलशाळांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगानेसामाजिक न्याय विभागाने पुनर्विनियोजनाव्दारे सन 2012-13 या आर्थिक वर्षात रु.36,00.00 लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला. यात राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्र.1 अंतर्गत (2216 1416) (विशेष घटक योजना) अंतर्गत अर्थसंकल्पित रु.21,60.00 लक्ष इतकया रकमेचे व जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान-एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (विशेष घटक योजना) (राज्य हिस्सा) (2216 2575) मधून रु.14,40.00 लक्ष असे रु.36,00.00 लक्ष रकमेचा समावेश आहे. हा निधी पूर्णपणे वितरित करण्यात आला आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्र.क्यू-3 2216-गृहनिर्माण 80-सर्वसाधारण 800- इतर खर्च (00) (02) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधीत जमा करण्याकरिता शासकीय अंशदान म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला रक्कम देणे (2216 0592)			
मूळ 38,00,00 पूरक 0,01 पुनर्विनियोजन 31,81,91 एकूण 69,82,00	69,82,00	69,82,00	00,00

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात गृहनिर्माण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधीत जमा करण्याकरिता शासकीय अंशदानापोटी वर्ष 2012-13 साठी 3800.00 लक्ष इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती.

मात्र शासकीय अंशदानापोटी द्यावयाच्या रकमेपोटी थकबाकी शिल्लक असल्याने थकबाकीपोटीची 3182 लक्ष रक्कम उपलब्ध करुन देण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली. हा संपूर्ण खर्च मंजूर देण्यासाठी पुनर्विनियोजनाने भागविणे शक्य असल्याने याबाबत मार्च, 2013 च्या अधिवेशनात रुपये 1000/- रकमेची लाक्षणिक पुरवणी मागणी मान्य करण्यात आली.

उपलब्ध करुन देण्यात आलेली एकूण अर्थसंकल्पीत तरतूद रु.6982.00 लक्ष मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधीत जमा करण्याकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाला संपूर्णत वितरित करण्यात आली.

महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय :-

Reasons for surrendered of funds may be incorporated in the reply to PAC.

विभागाचे अभिप्राय :-

सदर लेखाशीर्षाखाली वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये रु.38,00.00 लक्ष इतकी तरतूद मंजूरकरण्यात आली होती. मात्र शासकीय अंशदानापोटी द्यावयाची थकबाकी शिल्लक असल्याने रु.31,82,00 लक्ष रक्कम उपलब्ध करुन देण्यासाठी पुरवणी मागणी सादर करण्यात आली. हा संपूर्ण खर्च मंजूर अनुदानातून पुनर्विनियोजनाने भागविणे शक्य असल्याने याबाबत मार्च, 2013 च्या अधिवेशनात रु.1000/- रकमेची लाक्षणिक पुरवणी मागणी मान्य करण्यात आली. सदर रक्कम राज्य हिस्सा सहाय्यक अनुदान (2216 1425) ह्या लेखाशीर्षामधून रु.31,82.00 लक्ष इतका निधी पुनर्विनियोजित करुन देण्यात आले आहेत.

साक्ष :-

उपरोक्त विषयासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीच्या दिनांक 18 जानेवारी, 2017 रोजी अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष आयोजित करण्यात आली होती.

तथापि, अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग हे त्या दरम्यान दोन आठवड्याच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी गेले असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्याकडे गृहनिर्माण विभागाचा अतिरिक्त भार सोपविल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा हे समितीच्या उक्त बैठकीस साक्ष देण्यासाठी उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई शहर, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगरे, मागणी क्र.क्यू-3, प्रधान शीर्ष 2216, अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का) मुंबई शहर, अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का) पश्चिम उपनगरे, अपर जिल्हाधिकारी (अति.निष्का) पूर्व उपनगरे या अंतर्गत विभागाने पुनर्विनियोजन केले आहे की सरेंडर केले आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात खुलासा केला की, गृहनिर्माण विभागाकडे अपर जिल्हाधिकाऱ्यांची ३ कार्यालये आहेत. त्यातील एक मुंबई शहर येथे आहे. मुंबई उपनगरामध्ये पूर्व पश्चिम असे २ भाग होतात. त्याठिकाणी काही रक्कम सरेंडर झालेली आहे. ती आस्थापनेची रक्कम होती. त्या त्या वेळेस जी रिक्त पदे होती ती त्या वर्षी भरली गेली नाहीत. याबाबत असे आहे की, मुंबईमध्ये एकंदर सर्व विभागाची पद भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होत असते. विभागाकडून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पदभरतीची मागणी (रिक्वीजीशन) केली जाते. मात्र आजही अशी परिस्थिती आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे ३-४ वर्षांचा बॅकलॉग आहे. साधारणत: ३ वर्षांपूर्वी गृहनिर्माण किंवा म्हाडाने अमूक इतक्या पदांची आवश्यकता असल्याबाबत मागणी केली असल्यास महाराष्ट्र लोकसेवा आयोग ४ वर्षे मागे आहे. त्यामुळे जे पैसे सरेंडर झालेले आहेत, ती रक्कम दोन प्रकारची आहे. एक तर पदे न भरल्याने पगारावरील खर्च आहे. दुसरे म्हणजे गाड्यांवरील खर्च आहे.विभागाने गाड्यांची मागणी करुनही २-३ वर्षे त्या मिळाल्या नाहीत. मागच्या वर्षी १६ वाहनांच्या अगेन्स्ट केवळ ६ वाहनांचे पैसे मिळालेले आहेत आणि ती ६ वाहने खरेदी

करण्यास विभागाने अतिरिक्त जिल्हाधिकारी, कार्यालय, मुंबई शहर, पूर्व व पश्चिम उपनगरे या तिघांना परवानगी दिली आहे.विभागाने दिलेल्या उपरोक्त स्पष्टीकरण समितीने मान्य केले.

राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्र.-1 (विशेष घटक योजना) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना . 1 यामध्ये एससीपी व जनरल असे २ कंपोनंट आहेत. यामध्ये फक्त ज्या योजनेत पैशाची बचत झाली तो दुसऱ्या योजनेवर दिलेला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस विशद केले असता या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजनेच्या टप्पा-१ व टप्पा-२ अशा दोन योजना होत्या. त्यातील टप्पा-२ ला मागणी नसेल परंतु, टप्पा-१ ला खूप मागणी आहे. पण विभागाकडून सांगण्यात येते की, मागणीच नाही. मात्र टप्पा-१ मध्ये ओबीसी, इतर समाज तसेच जनरल वर्गवारीतूनही खूप मागणी आहे. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, एससीपी मध्ये डिमांड नव्हती. कारण त्याला पॅरलल रमाई व आयएवाय अशा दोन योजना सुरु होत्या.

राजीव गांधी योजनेतील टप्पा-१ मध्ये ९५ टक्केनिधी मिळतो. त्यामध्ये केवळ ५-१० टक्के इतक्या लोकवर्गणीची अट आहे ती देखील ते परिश्रम करुन देऊ शकतात अशी ही योजना आहे. ओबीसी किंवा जनरल प्रवर्गातील लोकांना घरकुले मिळत नाहीत. रमाई आवास योजनेत मिळणारी घरकुले विशिष्ट समाजापुरती आहेत. त्यामुळे या योजनेला प्रतिसाद मिळाला नाही हे म्हणणे वस्तुस्थितीला धरुन नाही. येथे सरेंडर म्हणजे रिॲप्रोप्रिएशन करुन घेतले आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, कार्यालयीन अभिलेखाप्रमाणे त्या पर्टीक्युलर वर्षामध्ये तशी परिस्थिती होती. सन २०१२-२०१३ मध्ये बरेचसे लाभार्थी रमाई व आयएवाय योजनेमध्ये गेल्याने जी बचत झाली ती विभागाने तेथे वापरली.

लाभार्थी दुसऱ्या योजनेत गेले हे मान्य आहे.मात्र एखादी योजना सुरु केली तर तिला लाभार्थी मिळत नाहीत, असे कधी होते काय ? याचाच अर्थ विभागाने त्यासाठी प्रयत्न केले नाहीत. जे पैसे शिल्लक आहेत ते दुसरीकडे वापरावे असे केले ही वस्तुस्थिती आहे. अन्यथा योजनेला प्रतिसाद मिळत नाही, लाभार्थी मिळत नाहीत ही गोष्ट मान्य होण्यासारखी नाही. सदर योजना ही इंदिरा आवास योजने सारखीच आहे.टप्पा-२ अवघड

आहे. मात्र टप्पा-१ ला खूप मागणी होती ही बाब समितीने निदर्शनास आणली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या वर्षी त्या योजनेला लाभार्थीच मिळाले नव्हते.

पूर्ण राज्यात कोठेही लाभार्थी मिळाले नाहीत काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, तो तर केवळ आस्थापनेवरील खर्च होता. सामाजिक न्याय विभागाने पत्र दिल्यानंतरचा हा प्रश्न आहे. सामाजिक न्याय विभागाने कळविले की, यामध्ये या वर्षी लाभार्थी नाहीत. समितीच्या म्हणण्यानुसार इतर वर्षी यालाही मागणी असू शकेल. मात्र सन २०१२-२०१३ या वर्षी सामाजिक न्याय विभागाकडून कम्युनिकेशन झाल्यानंतरच गृहनिर्माण विभागाने निधी ट्रान्सफर केलेला आहे.

सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता विभागाने प्रयत्न केले नाहीत, म्हणून लाभार्थी मिळाले नाहीत. अन्यथा लाभार्थी मिळत नाहीत असे होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, वेगवेगळ्या जिल्ह्यांचे जे डीआरडीए आहेत त्यांच्याकडून तसे कम्युनिकेशन विशेष घटक योजनेचे कंट्रोलिंग डिपार्टमेंट म्हणून सामाजिक न्याय विभागाकडे गेले. सामाजिक न्याय विभागाने ते गृहनिर्माण विभागाला कळविले.

विडी कामगारांना घरकुलासाठी अर्थसहाय्य (राज्य हिस्सा) :-

विडी कामगारांच्या घरकुलांना द्यावयाच्या अर्थसहाय्याशी संबंधितहा मुद्दा असूनविडी कामगारांना त्या वर्षी पैसेच मिळाले नाहीत काय ? विभागाने यामध्ये ५ कोटी रुपये सरेंडर केले आहेतही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा निधी राज्य हिश्शामधूनदिला जातो. केंद्र शासनाकडून काही योजना एखाद्या सोसायटीला योजना मंजूर झाल्यानंतर राज्य शासनाकडूनराज्याचा हिस्सा दिला जातो. काही ठराविक वर्षात विडी कामगारांसाठी केंद्र शासनाकडून योजनाच मंजूर झालेली नव्हती.

याबाबत योजना मंजूर करुन घेण्यासाठी विभागाकडून प्रस्ताव पाठविलेला होता काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाची विडी कामगार योजना आहे. ती डायरेक्ट सोसायटीला ॲप्रोच होत असते. केंद्र शासनाने योजना मंजूर केल्यानंतर राज्य शासनाला राज्याचा हिस्सा देणे क्रमप्राप्त आहे.

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्नरुत्थान अभियान नागरी क्षेत्रातील गरीबांना मुलभूत सेवा योजना (सर्वसाधारण योजना (राज्य हिस्सा) :-

या योजनेअंतर्गत 290 कोटी रुपयांपैकी गृहनिर्माण विभागाने 260 कोटी रुपये सरेंडर केले आहेत, याबाबत समितीला माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, सन 2007-2008, 2008-2009, 2009-2010 आणि 2010-2011 मध्ये बीएसयुपी आणि आयएचएसडीपीच्या संदर्भातील मुद्दे आहेत. केंद्र शासनाकडून जेवढी घरकुले राज्य शासनासाठी मंजूर होतात, त्यासंदर्भात राज्य हिस्सा दिला जातो. काही ठिकाणी घरांची संख्या कमी झाल्यामुळे तेवढ्या प्रमाणात राज्य शासनाचाराज्य हिस्सा वाचलेला आहे. केंद्र शासनाकडून जेवढी घरकुले मंजूर होतात त्या प्रमाणात राज्य शासनाने राज्य हिस्सा दिलेला आहे.

येथे सर्व ठिकाणी पुनर्विनियोजन केलेले आहे. याचाच अर्थ विभागाने अंदाजपत्रक बरोबर केलेले नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात सांगितले की, काही वर्षात दोन ते तीन कारणांमुळे तसे घडलेले आहे. दुष्काळी आणि वाळूच्या कमतरतेमुळे एस्टीमेटचा अंदाज चुकलेला होता. परिणामी योजना राबविण्यासाठी विलंब झालेला होता. तसेच काही ठिकाणी घरकुलांची संख्या कमी झालेली होती. अशा प्रकारच्या अनेक कारणांमुळेअंदाजपत्रकाचा अंदाज चुकलेला होता.

केंद्र शासनाकडून मान्यता मिळाली होती काय ? व त्यांच्याकडून निधी मिळाला होता काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू प्रकल्प मंजूर होते. काही कारणांमुळे त्या वर्षात कामे होऊ शकलेली नाहीत.व केंद्र शासनाकडून निधी मिळाला नव्हता.

समितीने पुढे विचारणा केली की, रिएम्बर्स केले जाते की, निधी दिला जातो ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यांच्याकडून पहिल्या प्रथम डीपीआर मंजूर केला जातो. त्यानंतर40 टक्के निधी वितरित केला जातो. सदरहू निधी व्यवस्थित खर्च झाला तर पुढील कामे करण्यासाठी निधी वितरित केला जातो. काही शहरांमध्ये ठराविक वर्षात वाळूची कमतरता आणि पाण्याची टंचाई उद्भवल्यामुळे योजना राबविण्यासाठी विलंब झालेला होता. आजमितीस कल्याण आणि मालेगाव येथील योजना याच कारणांमुळे रखडलेल्या आहेत. त्या ठिकाणी स्थानिक कारणांमुळे त्या योजना रखडलेल्या आहेत. तसेच काही ठिकाणी बेनिफिशरी आणि कोर्ट केसेसमुळे योजना रखडलेल्या आहेत.

वाळूची कमतरता आणि पाण्याची टंचाई उद्भवल्यामुळे योजना राबविण्यासाठी विलंब झालेला आहे असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. सद्य:स्थितीत योजना राबविण्यासाठी कोणते प्रयत्न केले जात आहेत ? ज्या ठिकाणी योजना पूर्ण झालेल्या आहेत, अशा ठिकाणच्या लाभार्थ्यांना योजनेचा फायदा झालेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये दोन ते तीन प्रकार आहेत. मुख्य सचिवांनी ज्या योजना मंजूर झालेल्या आहेत त्यासंदर्भात केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने दोन वेळा व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठका आयोजित केलेल्या आहेत. ज्या अपूर्ण योजना आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. ज्या योजना पूर्ण झालेल्या आहेत, परंतु लाभार्थी निवडीच्या विलंबामुळे त्या लांबलेल्या आहेत, यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. यासंदर्भात मुख्य सचिवांनी नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या आयुक्तांसमवेत एकत्रितपणे व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे बैठका आयोजित केलेल्या आहेत.

मंगरुळपीर, बाळापूर, वाशिम या ठिकाणी घरकुले बांधून झालेली आहेत. परंतु सद्य:स्थितीत घरकुले लाभार्थ्यांना हॅण्डओव्हर न केल्यामुळे त्या ठिकाणच्या खिडक्या आणि दरवाजे चोरीला गेलेली आहेत. सदर योजनेसाठी लाभार्थ्यांचा समन्वय, निवड, पात्रता, पाणी नसणे अशी अनेक कारणे आहेत. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीच्या मताशी सहमती दर्शविली व समितीस सांगितले की, ज्या ठिकाणी राहिलेले आहे, अशा ठिकाणी पुशअप करुन ते मार्गी लावणे हा एकच पर्याय विभागाकडे राहिलेला आहे.

मुख्य सचिवांनी नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या आयुक्तांसमवेत आणि संबंधित अधिकाऱ्यांसमवेत एकत्रितपणे व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे बैठका आयोजित केलेल्या आहेत, याबद्दल कोणतेही दुमत नाही. परंतु गृहनिर्माण विभागाने नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यासमवेत बैठक घेण्याची आवश्यकता आहे. योजना पूर्ण झालेल्या आहेत. संबंधित कंत्राटदार हैराण झालेले आहेत. योजना पूर्ण होऊन देखील लाभार्थ्यांना घरकुले हॅण्डओव्हर केली जात नाहीत. लाभार्थ्यांना घरकुले हॅण्डओव्हर करण्यासंदर्भात स्थानिक

मुख्याधिकारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता आहे. कंत्राटदारांना त्यांची बिल मिळाले तर पुढे त्यांचा योजनेशी काहीही देणे घेणे नसते. त्यामुळेत्याचा लाभ लाभार्थ्यांना होत नाही, ही वस्तुस्थिती आहे. लाभार्थ्यांना घरकुले हॅण्डओव्हर करण्यासाठी आजमित आपल्या विभागाने कोणते धोरण अवलंबिलेले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा करताना सांगितले की, त्यांनी पीएमजेएसवायच्या संदर्भात बैठक आयोजित केलेली आहे. पुढील डीपीआर मंजूर करण्यापूर्वी किंवा निधी वितरित करण्यासाठी पहिल्या टप्प्यातील लाभार्थ्यांना घरकुले हॅण्डओव्हर का केलेली नाहीत, याबाबतची उत्तरे विभागाला देण्यात यावी, असे त्यांच्याकडून सांगण्यात आले होते. सचिवांनी नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या आयुक्तांसमवेत आणि संबंधित अधिकाऱ्यांसमवेत एकत्रितपणे व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे बैठका आयोजित करुन सदर योजना तीन महिन्यात पूर्ण करण्यासाठी कालावधी दिलेला आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांसमवेत आतापर्यंत दोन वेळा बैठका घेतलेल्या आहेत. सदरहू बैठकीत दोन महिन्याच्या आता लाभार्थ्यांना घरकुले देण्यासंदर्भात टार्गेट निश्चित केलेले आहे. तसेच जी घरकुले अर्धवट अवस्थेत आहेत, अशी घरकुले पूर्ण करण्यासाठी आणखी 6 महिन्यांचा अवधी दिलेला आहे. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांसमवेत दोन महिन्यापूर्वी व्हिडीओ कॉन्फरन्सीद्वारे बैठका घेऊन त्यांना आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत.

गृहनिर्माण विभागाने जिल्हाधिकाऱ्यांसमवेत व्यक्तीगत बोलून कार्यवाही करणे अपेक्षित आहे. घरकुले संबंधित लाभार्थ्यांना तीन ते चार वर्षापासून मिळालेली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. नगरपालिकेचा हेड हा जिल्हाधिकारी यांच्याकडून तपासून घेतला जातो. सदरहू योजनेंतर्गत लाभार्थ्यांना लवकरात लवकर लाभ देण्यासाठी पदसिध्द डेप्युटी डायरेक्टर म्युन्सिपल ॲडमिनिस्ट्रेशन यांना आवश्यक त्या सूचना देण्याची आवश्यकता आहे असे समितीने सुचित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पदसिध्द डेप्युटी डायरेक्टर म्युन्सिपल ॲडमिनिस्ट्रेशन आहे.

या विषयाच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, राजीव गांधी निवारा योजनेसाठी 231.82 लक्ष रुपये हस्तांतरित केलेले आहेत. तद्नंतर जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरोत्थान अभियान एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (राज्य हिस्सा) या योजनेअंतर्गत राजीव गांधी निवारा योजनेसाठी 60

कोटी रुपये हस्तांतरित केलेले आहेत. याबाबतची माहिती कोणत्या हेडमध्ये दर्शविण्यात आलेली आहे ? राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेंतर्गत किती निधी खर्च झालेला आहे, याबाबतची कोणतीही माहिती दिलेली नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता याबाबतची राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेंतर्गत किती निधी खर्च झालेला याबाबत इत्यंभूत माहिती समितीला नंतर उपलब्ध करुनदेण्यात येणार आहे असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

यावर्षी बजेटमध्ये राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेंतर्गत किती निधी होता आणि ट्रान्सफर एन्ट्री करुन आणखी किती निधी उपलब्ध झाला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मूळ तरतूद106 कोटी रुपयांची होती.

विभागाने राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेसाठी निधी दिलेला आहे, असे मान्य केलेले आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरोत्थान अभियान नागरी क्षेत्रातील गरिबांना मुलभूत सेवा योजना (सर्वसाधारण योजना (राज्य हिस्सा) व जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरोत्थान अभियान एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (राज्य हिस्सा) यामध्ये अनुक्रमे राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेसाठी पुनर्नियोजनासाठी 231 कोटी, 60 कोटी रुपये दिल्याचे मान्य केलेले आहे. त्यामुळे सदरहू योजनेसाठी मूळ तरतूद किती रुपयांची केली होती? हा हेड कोठे आहे तो समितीला दिसून येत नाही. गृहनिर्माण विभागाने सदरहू योजनेंर्गत सन 2007 पासून सन 2012 पर्यंत सर्व निधी हस्तांतरित केलेला आहे, सदरहू योजनेसाठी मूळ तरतूद किती रुपयांची केली, रिॲप्रोप्रिएशन करुन किती झाले आणि खर्च किती झाला अशी विचारणा समितीने केली असता सदरहू माहिती संकलित करुन समितीला सादर केली जाणार आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम 2012 अंतर्गत गृहनिर्माण नियामक प्राधिकरण :-

सदर प्राधिकरणाची निर्मिती का झाली नाही, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, सन 2012 मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम कायदा पारित केलला होता. सन 2014 मध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी मान्यता दिली. दरम्यानच्या काळात हरकती आणि सूचना येत होत्या. त्यावेळी "रेरा"बाबत अनाऊन्समेंट झाली होती. "रेरा" आल्यामुळे ॲक्ट रिपील करुन घेतला होता. सन 2015

मध्ये लोकसभेतील सन्माननीय सदस्यांची एक समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने मुंबईत बैठका घेतलेल्या होत्या. सदरहू बैठकीस गृहनिर्माण विभागाच्या अधिकाऱ्यासोबत इतर संबंधित अधिकाऱ्यांना बोलाविण्यात आले होते. त्यामुळे नवीन ॲक्ट अंतर्गत जी प्रक्रिया सुरु होती, ती थोडीशी थांबली होती.

महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम २०१२ अंतर्गत गृहनिर्माण अपिलीय न्यायाधिकरण :-

अपिलीय न्यायाधिकरण ट्रिब्युनलच्या संदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये केवळ 48 हजार रुपयांची रक्कम सरेंडर केलेली आहे.

सदर लेखाशिर्षाखाली पुनर्विनियोजन 95.93 लाख रुपये दर्शविलेले आहे, ते बरोबर आहे काय ? मूळ तरतूद 125 कोटी रुपये एवढी आहे. मग पुनर्विनियोजन किती रुपयांचे केलेले आहे ? विभागाने किती रक्कम सरेंडर केलेली आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की,अपिलीय न्यायाधिकरण ट्रिब्युनलच्या संदर्भात केवळ 48 हजार रुपयांची रक्कम सरेंडर केलेली आहे. 95 लाख रुपये सरेंडर केलेली नाही.

विभागाने या ठिकाणी 95 लाख रुपये सरेंडर केलेले आहेत. परंतु, 29 लक्ष रुपये सरेंडर केल्याबाबतची माहिती देखिल नमूद केलेली आहे. एकूण 125 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. न्यायाधिकरणाची स्थापना होऊन 29 लक्ष 5 हजार रुपयांचा निधी प्रत्यार्पित केलेला आहे. उर्वीरत रक्कम खर्च केल्याबाबतची माहिती दिलेली आहे. विभागाने 29 लक्ष रुपये सरेंडर केलेले आहेत की, 95 लक्ष रुपये सरेंडर केलेले आहेत ? विभागाने 95 लक्ष रुपये खर्च केलेला आहे आणि 29 लक्ष 5 हजार रुपये सरेंडर केलेली आहे. या ठिकाणी दर्शविण्यात आलेली आकडेवारी चुकीची दाखविलेली आहे ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, या ठिकाणी थोडीशी टायपिंगमध्ये चूक झालेली आहे. 29 ल 5 हजार रुपये सरेंडर केलेली आहे आणि 95.96 लक्ष रुपये खर्च झालेला आहे. तसेच याबाबतचे खर्चाचे ताळमेळ (रिकन्सीलीएशन) करुन घेण्यात येईल असे देखिल समितीस आश्वस्त केले.

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र सुधारणा अधिनियम 1971 अंतर्गत असलेल्यान्यायाधिकरणावरील खर्च :-

या लेखाशीर्षा अंतर्गत 48 हजार रुपये सरेंडर केलेली आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत

केले आहे. परंतु मुद्दा 48 हजार रुपये सरेंडर केल्याबाबतचा नाही. या ठिकाणी आकडेवारी रिकन्साईल होत नाही. असा प्रश्न समितीस उपस्थित केले असता त्यासंदर्भात रि-कन्साईल करुन त्याबाबत समितीला माहिती दिली जाणार आहे. असे समितीस आश्वस्त केले.

या लेखाशीर्षाअंतर्गत मूळ तरतूद 16.24 लक्ष रुपये दर्शविलेली आहे. प्रत्यक्ष खर्च 42 लक्ष रुपये झालेला आहे. पुनर्विनियोजन 23 लक्ष रुपयांचे केलेले आहे. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, 24 लक्ष रुपये नंतर प्राप्त झालेले होते. मूळ तरतूद 16.24 लक्ष रुपयांची होती. त्यानंतर पुन्हा 24.08 लक्ष रुपये पुरवणी मागण्यांमधून प्राप्त झाले. त्यानंतर39.84 लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे. शिल्लक 48 हजार रुपये आहेत.

39.84 लक्ष रुपयांचा खर्च झालेला आहे. विभागाने या ठिकाणी 48 हजार रुपये सरेंडर केलेले आहेत.विभागाने ४२.०५ लाख रुपये खर्च केला आहे असे महालेखापालांचे म्हणणे आहे. याचे रिकन्साईल केले पाहिजे असे समितीने सुचित केले असता विभागाला ४०.३० लाख एवढा निधी उपलब्ध झालेला आहे. आता रिकन्साईल करुन घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासीत केले.

याबाबत समितीला नोट ऑफ एरर मिळाली पाहिजे. खर्चाचा ताळमेळ बसत नाही. विभागाने ४८ हजार रुपये प्रत्यार्पित केले असे विभागाचे म्हणणे आहे. महालेखापालांचे म्हणणे आहे की, २.२१ लाख रुपये अधिक खर्च झाला आहे. Excess is not very serious but your Accounts are not settled is very serious. असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्रमांक१ (योजनांतर्गत) :-

उपरोक्त मुद्याबाबतची माहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, मूळ तरतूद १०६.५५.०० लाख रुपये होती. मूळ आणि नंतर उपलब्धझालेली तरतूद मिळून एकूण रु.३३६,६९.०० लाख रुपये एवढी रक्कम होती. त्यापैकी ३४५,२३.६४ लाख रुपये एवढा खर्च झाला. मुद्दा एकच होता की, ३६४००/- रुपये एवढी किरकोळ बचत प्रत्यार्पित करणे आवश्यक होते. अनवधानाने ती रक्कम सिस्टीममध्ये दाखविण्याचे राहून गेले किंवा रिफ्लेक्ट झालेली नाही.

विभागाच्या म्हणण्यानुसार मूळ तरतूद१०६,५५ व अतिरिक्त २६० लाख एवढा निधी प्राप्त झाला. परंतु ही रक्कम मॅच होत नाही. महालेखापालांकडे उपलब्ध असलेल्या कागदोपत्री पुराव्यानुसार २३७.६९ लाख रुपये विभागाला मिळाले आहेत आणि विभागाचे असे म्हणणे आहे की, २६० लाख रुपये मिळाले असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की,मार्च महिन्याच्या अखेरीस आम्हाला २६० लाख रुपये मिळाले.याबाबतची गृहनिर्माण विभागाकडे वित्त विभागाच्या जीआरची प्रत उपलब्ध आहे. परंतु जीआर काढला असला तरी विभागाला प्रत्यक्ष निधी किती उपलब्ध झाला हे महत्वाचे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले की, गृहनिर्माण विभागाच्या रेकॉर्डवर २६० लाखाऐवजी कमी रक्कम दिसून येत असेल तर we will reconcile this figure also. Therefore, these will be the fourth point where we have to reconcile the figures.

रुपये १०६,५५ व २३७,६९ लाख अशी एकूण ३६६.५५ लाख एवढी रक्कम मिळाली व ३४५.२३ लाख एवढी रक्कम खर्च झाली आणि ३६ हजार रुपये बचत झाली असा महालेखापालांचा मुद्दा आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता गृहनिर्माण विभागाला प्रत्यक्ष २६० लाख रुपये उपलब्ध झाले आणि महालेखापालांच्या रेकॉर्डनुसार फिगर वेगळी दिसून येते असा मुद्दा आहेअसे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

विभागाने नंतर जी माहिती दिली त्यामध्ये चूक दिसून येते. एक्झीट कॉन्फरन्समध्ये विभागाने मान्य केले आहे की, एकूण ३४५ लाख रुपये मिळाले. जीआर काढला म्हणजे प्रत्यक्ष तितका निधी मिळतो असे नाही. प्रत्यक्ष निधी किती मिळाला? महालेखापालांनी जी हरकत घेतली आहे त्याला अनुसरुन विभागाने स्पष्टीकरण दिले पाहिजे. त्यांच्या म्हणण्यानुसार विभागाकडून उत्तर अपेक्षित होते. विभागाने जे स्पष्टीकरणे दिले त्यानुसार २६० लाख रुपये कुठून आले हे स्पष्ट होत नाही. ३६४०० रुपये बचत झाली आहे.विभागाबरोबर जेव्हा एक्झीट कॉन्फरन्स झाली त्यामध्ये महालेखापाल आणि गृहनिर्माण मंडळाची फिगर मॅच झालेली आहे. या परिच्छेदाचा विषय एवढाच होता की, ३६४०० रुपये सरेंडर का केले नाहीत? विभागाने ही आकडेवारी कोठून आणली ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मूळ

तरतूद रु.१०६.५५ ला २० टक्के कट लावण्यात आला होता. उर्वरित निधी २९ मार्चला उपलब्ध करुन देण्यात आला. ३६४०० रुपये ही रक्कम सरेंडर केली होती. सिस्टीममध्ये अनवधानाने रिफ्लेक्ट झाली नाही.याबाबतचे स्पष्टीकरण समितीस नंतर सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अश्वस्त केले.

मुद्दा क्रमांक-१८ : गलिच्छ वस्तीमध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या व्यक्तींना सुविधा पुरविणे:-

सर्वोच्च न्यायालयाच्या एका निवाड्याप्रमाणे शाळांमध्ये मुलांमुलींकरिता स्वतंत्र टॉयलेट ब्लॉक्ससाठी निधी उपलब्ध करुन द्यायचा होता. या कामासाठी ३६ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. राज्य शिक्षण मंडळाने अटी व शर्ती च्या आधीन राहून खर्च करावयाचा आहे. त्यानुसार१४.४० कोटी रुपये खर्च झाले आहेत. सुप्रीम कोर्टाचे एक जज्जमेंट आल्यामुळे आम्ही राज्य शालेय शिक्षण विभाग, उप संचालक (शिक्षण), संचालक (शिक्षण) यांच्याकडे विचारणा केली आहे. त्यांनी आणखी शाळा सुचवाव्यात.

म्हणजे विभागाचे असे म्हणणे आहे की, काही शाळा नियमात बसत नाहीत म्हणून तेथे खर्च केला नाही? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पूर्ण रक्कम खर्च झाली नसली तरी १४.४० कोटी रुपये खर्च झाले आहेत. उर्वरित रक्कम खर्च होण्यासाठी आणखी काही कालावधी लागेल. स्पष्टपणे सांगावयाचे झाले तर माननीय आमदार श्री.कपिल पाटील हे मुंबई शिक्षक मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करतात. ते या विषयावर अधिक पोटतिडकीने भूमिका मांडतात. त्यांचे म्हणणे आहे की, शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर एकत्रित बैठक घेऊन शाळांची निवड करुन हा निधीगृहनिर्माण विभागाने खर्च केला पाहिजे.

शिल्लक राहिलेला निधी सरेंडर केला का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, म्हाडाच्या स्लम इम्प्रूव्हमेंट बोर्डाकडे २१.६० कोटी एवढा निधी उपलब्ध आहे.

मुद्दा क्रमांक-१९ : मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधीत जमा करण्याकरिता शासकीय अंशदान म्हणून म्हाडाला रक्कम देणे:-

समितीला या मुद्याबाबत थोडक्यात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई शहर जिल्हयाकरिता स्वतंत्र इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ आहे. त्याकरिता या हेडमध्ये निधी येतो.२०१२-१३

मध्ये ६९.८२ लाख रुपये एवढा निधी दिला होता. वस्तुस्थिती अशी आहे की, त्यांची मागणी त्यापेक्षा कितीतरी जास्त असते. हा निधी नंतर उपलब्ध करुन दिला, तो सुध्दा मागणीपेक्षा कमी आहे.

निधी सरेंडर करण्याचे कारण काय आहे? मूळ तरतूद ३८ कोटी रुपये होती व पुनर्विनियोजनातून ३१.८१ कोटी रुपये देण्यात आले. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता यावर महालेखाकारांनी समितीस अवगत केले की, यहाँ पर सरंडर का मुद्दा नहीं है. ॲडिशनल अलॉटमेंट के बारे में इनको पहले से जानकारी होनी चाहिए थी. सप्लीमेंटरी के समय ध्यान देना चाहिए था.ओरिनल सप्लीमेंटरी में यह आंकड़ा आता तो हमें कोई दिक्कत नहीं है, लेकिन यह रकम रिएप्रोप्रिएशन से आयी है. दूसरे हेड की रकम का इस्तेमाल यहां पर किया गया है. यह अलॉटमेंट रिएप्रोप्रिएशन से कराया गया है, ऐसा हमारा कहना है. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, वर्षाच्या शेवटी सर्वसाधारणपणे हे होत असते. त्या मंडळाची मागणी यापेक्षा जास्त होती.

महालेखापालांचा त्याला विरोध नाही. महालेखापालांचे म्हणणे एवढेच आहे की, विभागाने पुरवणी मागणीच्या माध्यमातून निधी न घेता दुसऱ्या हेडचा पैसा या ठिकाणी वापरला आणि पुनर्विनियोजन केले.या अनुषंगाने महालेखाकारांनी सप्लीमेंटरी में पैसा मांगा गया है तो रिएप्रोप्रिएट से क्यों लेना पडा? असा मुद्दा उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १००० रुपयांची लाक्षणिक पुरवणी मागणी सादर केली होती.

दूसरी स्कीम के संबंध में मेरे पास पैसा उपलब्ध है और वह पैसा मैं यूज नहीं कर पाता हूं तो वह रिएप्रोप्रिएट तो नहीं कर रहा हूं, यह मुद्दा है. कहीं और जगह पर रकम खर्च नहीं हो रही है इसलिए इस रकम को डायवर्ड करके यहां पर यह रकम खर्च कर दी जाए, यह अच्छी बात नहीं है. ही बाब महालेखापालांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली असता या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, विधानमंडळाच्या निदर्शनास न आणता दुसऱ्या योजनेचा निधी कट केला जातो ते योग्य वाटत नाही. अशी पध्दत न अंमलात आणता पुरवणी मागणीच्या माध्यमातून बाब विधानमंडळाच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, १००० रुपयांची लाक्षणिक पुरवणी मागणी मान्य केलेली आहे.

हा व्हॅलिड मुद्दा आहे. विधानमंडळाच्या निदर्शनास आणूनच विभागाने इतका मोठा निधी वळता केला पाहिजे. एवढा मोठा निधी आवश्यक असेल तर सुरुवातीला घेतला पाहिजे, अन्यथा पुरवणी मागणीच्या माध्यमातून विधानमंडळाच्या निदर्शनास आणून नंतर तो निधी द्यावा व पुनर्विनियोजन करावेअसे समितीने सुचित केले.

जब भी कोई रिएप्रोप्रिएशन होता है तो उसके लिए कोई विशेष कारण दिया जाना चाहिए. Without assigning any reasons, it is re-appropriated. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता या अनुषंगाने समितीने सुचित केले की, The A.G. is saying that without giving any specific reason, re-appropriation should not be done. पुनर्विनियोजन शक्यतो टाळावे. पुरवणी मागणी घ्यावी. पुरवणी मागणी घेतली तर विधानमंडळाच्या निदर्शनास येते. यावर विभागीय सचिवांनी समितीने केलेल्या सुचनेची दखल घेण्यात येईल असे आश्वासन केले.

अभिप्राय व शिफारशी :-

अनुदान क्र.क्यू ३

(१)सदरहू परिच्छेदात विनियोजन लेख्यासंदर्भात मुलभूत बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. यात शिर्षक क्रमांक ८०० (०३) (०५) अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमणे/निष्कासित) मुंबई शहर, पश्चिम,पूर्व उपनगरे अंतर्गत मूळ निधीची तरतूद करण्यात येणे व वर्षाच्या अखेरीस निधी प्रत्यार्पित करण्यात येणे यांसदर्भात महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. यात विशेषत: रिक्त पदे, वेतन व भत्याची देयकेसादर अथवा मंजूर न होणे, कार्यालयीन खर्च अशा कारणास्तव अखर्चित राहिलेला निधी प्रत्यार्पित करण्यात आलेला आहे. लोकलेखा समितीसमोर चर्चेला घेण्यात येणाऱ्या विनियोजन लेख्यांसंदर्भात ही उपरोक्त नियमित निरीक्षणे समितीच्या निदर्शनास आलेली आहेत. अनेक मंत्रालयीन विभागाच्या साक्षी घेताना समितीस ही बाब प्रकर्षाने जाणवते की, प्रत्येक विभागात रिक्त पदे, वैद्यकीय प्रतिपूर्ती, कार्यालयीन खर्च, वेतन व भत्ते इत्यादींसाठी फार मोठ्या प्रमाणात निधी राखून ठेवण्यात येतो व प्रतिपूर्तीअभावी तो वर्षाअखेरीस सरेंडर करण्यात येतो. या प्रतिपूर्ती वर्षअखेरपर्यंत कधीही सादर होऊ शकतात. त्यामुळेअशा प्रकारे निधी राखून ठेवावाच लागतो व यास समितीचा कोणताही विरोध नाही. परंतु सर्व विभागांचा एकत्रित विचार केल्यास हा निधी फार मोठ्या प्रमाणात शासन स्तरावर वर्षभर राखून ठेवण्यात येतो. केवळ तरतूद आहे म्हणून ती ठेवायची व नंतर तीही सरेंडर करायची यास समितीचा व महालेखाकारांचा आक्षेप आहे. रिक्त पदे ही काही अचानक भरली जात नाही. त्यासाठी मोठा कालावधी जातो. अशा परिस्थितीत वर्षातून तीन वेळा पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने निधी जर विभागाला मिळणे शक्य असेल तर ही तरतूद अडवून पार्किंग झोनमध्ये ठेवण्याची आवश्यकता नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. मिळालेली तरतूद परत केली अथवा मागितली नाही तर पुन्हा हा निधी परत मिळण्यास वित्त विभागाकडून अनेक अडचणी येतात त्यामुळे असा निधी राखून ठेवण्याकडे विभागाचा कल जास्त असतो. अशा परिस्थितीत शासनाने व विशेषत: वित्त

विभागाने यातून तोडगा काढून अशा प्रकारे निधीची तरतूद वर्षभर राखून ठेवण्यापेक्षा यासाठी एकत्रित निधी राखून ठेवून विभागाकडून ज्या प्रमाणे मागणी येईल त्याप्रमाणे तातडीने निधीचे वितरण या एकत्रित निधीतून करण्यात यावे व फार मोठ्या प्रमाणात अशाप्रकारे निधी वर्षभर अडवून ठेवण्यासंदर्भातील कार्यपध्दतीला आळा घालावा. याबाबतचीशक्यता पडताळून यातून योग्य तो मार्ग काढावा व हा निधी पार्किंग झोनमधून बाहेर काढावा व या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

(२) उपरोक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने विनियोजन लेख्यासंदर्भात महालेखाकारांचे आक्षेपावर चर्चा करताना समितीला नियमित येणाऱ्या अडचणीपैकी सर्वांत महत्वाची बाब म्हणजे वित्त विभागाकडून लावण्यात आलेल्या २०% कपातीमुळे समर्पित करण्यात आलेली रक्कम ही आहे. विभागासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद करण्यात येते. या निधीवर काही वेळेला परिस्थितीनुसार वित्त विभागाकडून २०% कपात लावण्यात येते. त्यामुळे हा २०% निधी विभागाला वितरित होत नाही. अशा परिस्थितीत विभागाला एकूण प्राप्त तरतूदीपैकी वित्त विभागाच्या २०% कपातीमुळे प्राप्त होवू न शकलेली रक्कम वर्षाअखेरीस तांत्रिक दृष्टया कागदोपत्री प्रत्यार्पित (surrender)केल्याचे दाखवावे लागते व रक्कम प्रत्यार्पित दाखविल्यास त्यावर महालेखाकारांकडून आक्षेप नोंदविण्यात येतात. महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर हे परिच्छेद लोकलेखा समितीसमोर चर्चेला घेणे क्रमप्राप्त ठरते. समितीसमोर विनियोजन लेख्यांवर चर्चा करतेवेळी जास्तीत जास्त प्रकरणामध्ये वित्त विभागाच्या कपातीमुळे रक्कम तांत्रिक दृष्टया सरेंडर दाखविलेली असते व ही बाब विभागाअंतर्गत अत्यंत तांत्रिक स्वरुपाची असताना यात समितीचा बहुमूल्य वेळ वाया जातो व विनियोजन लेख्याअंतर्गत मोठया प्रमाणात आक्षेपांचे परिच्छेद प्रलंबित दिसतात. यावर अनेकदा समितीसमोर चर्चादेखील झालेली आहे. यासंदर्भात

वित्त विभागाने यथोचित तोडगा काढून कपात करण्यात आलेल्या निधीसंदर्भात तांत्रिकदृष्टया समायोजन करुन वितरीत व अवितरीत निधीचे योग्य नियोजन करुन महालेखाकार यांच्या स्तरावर यासंदर्भात आक्षेप येणार नाहीत अशा प्रकारे उपाययोजना करण्यात यावी व अवलंबिलेल्या सुधारीत कार्यपध्दतीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(३) लेखाशीर्ष क्र.८०० (१) (०४) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्र.१ (विशेष घटक योजना) (२२१६ १४१६) (राज्य योजना) (योजनाअंतर्गत) (विशेष घटक योजना) याअंतर्गत मूळ तरतूद२६ कोटी इतकी करण्यात येवून सदर योजनेअंतर्गत मागणी नाही म्हणून त्यातील .२१ कोटी ६० लक्ष निधी झोपडपट्टी स्वच्छता कामे, झोपडपट्टी क्षेत्रफळात राहणाऱ्या अनुसूचित जातींना नागरी सुविधा पुरविणे या बाबींकरितापुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आला व रुपये ५४० लक्ष निधी वित्त विभागाच्या कपातीमुळे प्रत्यार्पित करण्यात आलाअसा आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे आक्षेपात नमूद केलेला आहे राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजनेच्या टप्पा- १ व टप्पा -२अशा दोन योजना होत्या. त्यातील टप्पा-2 ला मागणी नाही परंतु टप्पा-1 ला मात्र मोठ्या प्रमाणात मागणी होती. रमाई व इंदिरा आवास योजनेमध्ये अनुसुचित जातीचेअधिकाधीक लाभार्थी सामवून घेतल्याने या योजनेअंतर्गत लाभार्थी नसल्यामुळे निधी खर्च होऊ शकला नाही हे विभागाचे म्हणणे समिती मान्य करून शकत नाही. एखादी योजना सुरु केली तर त्याला लाभार्थी मिळत नाही असे कधी होत नाही. यासाठी विभागाने विशेष प्रयत्न केले पाहिजे एवढेच नव्हे तर एका योजनेचा निधी विभागाकडून परस्पर अन्य योजनेसाठी पुनर्विनियोजित करणे ही बाब तर आर्थिक शिस्तीला अनुसरून नाही.पूर्ण राज्यात कोठेही लाभार्थी मिळाले नाहीत हे समितीला मान्य नाही.सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता विभागाने प्रयत्न केले

नाहीत, म्हणून लाभार्थी मिळाले नाहीत. या योजनेमध्ये गृहनिर्माण व सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी योग्यरित्या पार पाडलेली नाही. त्यामुळे राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे न करण्यास जे अधिकारी जबाबदार आहेत त्या सर्व अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करण्यात यावी व त्यामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात शासनमान्य योजनांची अंमलबजावणी प्रशासकीय स्तरावरुन प्रभावीपणे करणेबाबत सूचना निर्गमित करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(४) लेखाशीर्ष क्र. १०३ (०४) (०१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरोत्थान अभियान शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे (सर्वसाधारण योजना) (राज्य हिस्सा) अंतर्गत२९० कोटी रुपयांपैकी गृहनिर्माण विभागाने २६० कोटी पुनर्विनियोजीत केले याबाबत महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. ही योजना केंद्र पुरस्कृत असल्याने केंद्र हिश्याच्या प्रमाणात राज्य हिस्सा वितरित होतो. यावर्षी केंद्र शासनाकडून या योजनेअंतर्गत प्राप्त हिस्सा रुपये ९०,०९.०० लक्ष इतका कमी प्रमाणात उपलब्ध झाल्याने तेवढ्या प्रमाणात राज्य हिस्सा कमी वितरित करण्यात आला त्यामुळे प्रत्यक्ष खर्च ३०५३.१७ लक्ष इतका झाला आहे व रुपये २३१,८२.०० लक्ष इतकी तरतूद पुनर्विनियोजनाव्दारे राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेसाठी उपलब्ध करुन देण्यात आली. उर्वरीत रुपये २८,३३.८४ इतकी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे असे विभागामार्फत सांगण्यात आले. या योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून जेवढी घरकुले राज्य शासनासाठी मंजूर होतात त्याप्रमाणात राज्याचा हिस्सा वितरित होतो.दुष्काळीपरिस्थिती आणि वाळूच्या कमतरतेमुळे योजना राबविण्यासाठी विलंब झालेला होता. तसेच काही ठिकाणी घरकुलांची संख्या कमी झालेली होती. अशा प्रकारच्या अनेक कारणांमुळेअंदाजपत्रकाचा

अंदाज चुकलेला होता.काही कारणांमुळे त्या वर्षात कामे होऊ शकलेली नाहीत. केंद्र शासनाकडून पूर्ण निधी मिळाला नव्हता,काही शहरांमध्ये ठराविक वर्षात वाळूची कमतरता आणि पाण्याची टंचाई उद्भवल्यामुळे योजना राबविण्यासाठी विलंब झालेला होता. त्या ठिकाणी स्थानिक कारणांमुळे त्या योजना रखडलेल्या आहेत. तसेच काही ठिकाणी लाभार्थी आणि कोर्ट केसेसमुळे योजना रखडलेल्या असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. सद्य:स्थितीत योजना राबविण्यासाठी कोणते प्रयत्न केले जात आहेत अशी विचारणा समितीने केली असता केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेच्या अनुषंगाने दोन वेळा व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे मुख्य सचिवांनी संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठका घेऊन ज्या अपूर्ण योजना आहेत, त्या पूर्ण करण्यासाठी नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत. ज्या योजना पूर्ण झालेल्या आहेत, परंतु लाभार्थी निवडीच्या विलंबामुळे त्या लांबलेल्या आहेत, यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत असे विभागाकडून सांगण्यात आले. विभागाने केवळ बैठका घेवून सूचना देवून योजनेची फलनिष्पती होणार नाही. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. तसेच योजनेचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे. या प्रकरणी नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी यांच्याकडून योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून घेण्यासाठी विभागाने पाठपुरावा करावा तसेच मंगरुळपीर, बाळापूर, वाशिम या ठिकाणी घरकुले बांधून झालेली आहेत. परंतु, सद्य:स्थितीत घरकुले लाभार्थ्यांना हस्तांतरीत न केल्यामुळे त्या ठिकाणच्या खिडक्या आणि दरवाजे चोरीला गेलेली आहेत. सदर योजनेसाठी लाभार्थ्यांचा समन्वय, निवड, पात्रता, पाणी नसणे अशी अनेक कारणे आहेत. असे मत समितीने व्यक्त केले असून त्यास सचिवांनी सहमती दर्शविली.यासंदर्भात गृहनिर्माण विभागाने नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यासमवेत बैठक घेण्याची आवश्यकता आहे. योजना पूर्ण झालेल्या आहेत. परंतु

तरीही लाभार्थ्यांना घरकुले हस्तांतरीत केली जात नाहीत. लाभार्थ्यांना घरकुले हस्तांतरीत करण्यासंदर्भात स्थानिक मुख्याधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता आहे.सचिवांनी नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या आयुक्तांसमवेत आणि संबंधित अधिकाऱ्यांसमवेत एकत्रितपणे व्हिडीओ कॉन्फरन्सींगद्वारे बैठका आयोजित करुन सदर योजना तीन महिन्यात पूर्ण करण्यासाठी कालावधी दिलेला होता. तसेच संबंधित अधिकाऱ्यांसमवेत आतापर्यंत दोन वेळा बैठका घेतलेल्या आहेत. सदरहू बैठकीत दोन महिन्याच्या आत लाभार्थ्यांना घरकुले देण्यासंदर्भात उद्दीष्ट निश्चित केलेले होते. तसेच जी घरकुले अर्धवट अवस्थेत आहेत, अशी घरकुले पूर्ण करण्यासाठी आणखी ६ महिन्यांचा अवधी दिलेला होता. यासंदर्भातगृहनिर्माण विभागाने जिल्हाधिकाऱ्यांसमवेत व्यक्तीगत चर्चा करूनच कार्यवाही करणे अपेक्षित आहे. घरकुले संबंधित लाभार्थ्यांना तीन ते चार वर्षापासून मिळालेली नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. समितीने दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी बैठक घेऊन यासंदर्भात निर्देश दिल्यानंतर देखील अद्यापपर्यंत अनेक प्रकरणात घरकुले हस्तांतरीत झाल्याचे दिसून येत नाही. नगरपालिकेचा लेखाशीर्ष हा जिल्हाधिकारी यांच्याकडून तपासून घेतला जातो.सदरहू योजनेंतर्गत लाभार्थ्यांना लवकरात लवकर लाभ देण्यासाठी पदसीध्द उप संचालक, नगरपालिका प्रशासन यांना आवश्यक त्या सूचना देण्यात याव्यात व उपरोक्त सर्व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

6.5 राजीव गांधी निवारा योजनेसाठी 231.82 लक्ष रुपये पुनर्विनियोजनाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तदनंतर जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरोत्थान अभियान एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (राज्य हिस्सा) या योजनेअंतर्गत राजीव गांधी निवारा योजनेसाठी 60 कोटी रुपये उपलब्ध केलेले आहेत. याबाबतची माहिती कोणत्या शिर्षाअंतर्गत दर्शविण्यात आलेली आहे ?राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेंतर्गत किती निधी खर्च झालेला

आहे याबाबत इत्यंभूत माहिती समितीला देण्याचे आश्वासित करुनही अद्यापही माहिती समितीस सादर करण्यात आली नाही. ही सर्व माहिती समितीस १ महिन्याच्या आत देण्यात यावी व माहिती समितीस सादर न करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस १ महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी शिफारस करण्यात येत आहे. तसेच गृहनिर्माण विभागाने सदरहू योजनेंतर्गत सन 2007 पासून सन 2012 पर्यंत सर्व निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे, सदरहू योजनेसाठी मूळ तरतूद किती रुपयांची केली, पुनर्विनियोजन करुन किती निधी प्राप्त झाला आणि खर्च किती झाला अशी सर्व माहिती संकलित करुन समितीला सादर करण्याचे विभागीय सचिवांकडून मान्य करण्यात आले होते. परंतु अद्याप समितीस माहिती प्राप्त झालेली नसल्याने समितीस सदरहू माहिती तात्काळ देण्यात यावी व माहिती विहित मुदतीत समितीस सादर न करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस १ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

6.6 केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या अनेक योजनांमध्ये राज्याचा हिस्सा केंद्राच्या निधीच्या प्रमाणात राखून ठेवणे राज्य शासनास क्रमप्राप्त ठरते. ऐनवेळी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त न झाल्यास अथवा कमी प्रमाणात प्राप्त झाल्यास राज्याच्या हिश्याचा राखून ठेवलेला निधी प्रत्यार्पित करावा लागतो. प्रत्येक वेळी केंद्र शासनाकडून निधी वितरीत होतोच असे नाही. अशा परिस्थीतीत राज्य शासनाच्या हिश्याचा निधी अखर्चित राहतो. अनेक विभागांमध्ये समितीला या बाबी निदर्शनास आलेल्या आहेत. या बाबीला आळा घालण्यासाठी अशा परिस्थितीत प्रत्येक योजनानिहाय राज्याच्या हिश्याचा निधी स्वतंत्ररित्या राखून न ठेवता केंद्र शासनाच्या योजनांसाठी एकत्रित कॉर्पस निधी राखून ठेवून त्यातून मागणीप्रमाणे राज्याचा हिस्सा वितरित करता येण्याबाबतच्या शक्यतेचा व पर्यायाचा विचार शासन स्तरावरुन करुन योग्य तो मार्ग

काढण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

6.7 लेखाशीर्ष क्रमांक १०३ (०१) (०६) झोपडपट्टी सुधार कामे गलिच्छ वस्तीमध्ये राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या व्यक्तींना सुविधा पुरविणे (विशेष घटक योजना अंतर्गत वित्तीय वर्ष) सन २०१२-१३ मध्ये रु.६०,००.०० लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली होती. तथापि, याच प्रयोजनासाठी मागील वर्षात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीपैकी बराचसा निधी अखर्चित राहिल्यामुळे वित्त विभागाने ८०% इतकीच म्हणजे रुपये ४८,००.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला त्यामुळे २०% म्हणजेच रुपये १२,००.०० लक्ष इतकी तरतूद समर्पित करण्यात आली. मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्याच्या सर्व शाळांमध्ये मुलां-मुलींकरिता स्वतंत्र स्वच्छता गृहाची सुविधाउपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने मुंबई शहर व उपनगर जिल्ह्यातील गलिच्छ वस्त्यांमधील शाळांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाने पुनर्विनियोजनाव्दारे सन२०१२-१३ या आर्थिक वर्षात ३६,००.०० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन दिला. यात राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्र.१ अंतर्गत (२२१६ १४१६) (विशेष घटक योजना) अंतर्गत अर्थसंकल्पीत रुपये २१,६०.०० लक्ष इतक्या रकमेचे व जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरोत्थान अभियान-एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (विशेष घटक योजना) (राज्य हिस्सा) (२२१६ २५७५) मधून रुपये १४,४०.०० लक्ष असे रुपये ३६,००.०० लक्ष रकमेचा समावेश आहे. हा निधी पूर्णपणे वितरित करण्यात आला आहे असे विभागामार्फत सांगण्यात आले. या कामासाठी ३६ कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. हा निधी राज्य शिक्षण मंडळाने अटी व शर्तींच्या अधीन राहून खर्च करावयाचा होता. त्यानुसार १४.४० कोटी रुपये खर्च झाले आहेत. उर्वरित रक्कम खर्च होण्यासाठी विभागाने काही प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. शिवाय

म्हाडाच्या गलीच्छ वस्ती सुधारणा मंडळाकडे २१.६० कोटी एवढा निधी पडून आहे. गेली तीन वर्ष विभागाने यासंदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही. ज्या प्रयोजनासाठी हा निधी शासनाकडून देण्यात आला आहे त्या प्रयोजनासाठी हा निधी खर्च करणे ही विभागाची प्राथमिक जबाबदारी आहे. याबाबत विभागाने तातडीने संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

6.8 विनियोजन लेख्यासंदर्भात विभागाअंतर्गत असलेली आर्थिक ताळेबंदव लेख्यासंदर्भातील बेशिस्त कारणीभूत असल्याचे समितीचे मत आहे. विभागांनी प्रत्येकी ३ महिन्यात लेख्यांचे रिकन्सीलीएशन करणे आवश्यक असताना याचे पालन विभागांकडून करण्यात येत नाही. परिणामी हे ताळेबंद नंतर जुळत नसल्यामुळे त्यात खूप अडचणी निर्माण होतात. यासाठी विभागाअंतर्गत लेखापरिक्षण नियमित करण्यात यावे. नियमित रिकन्सीलीएशन करण्यात यावे. एका शीर्षाखालील मंजूर निधी अन्य शिर्षांकडे वळविणे अथवा चुकीने नोंदविणे या बाबी थांबविण्यासाठी विभागाकडून आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

7.1 भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. एस-४ "वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च" या शीर्षाअंतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

. हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधानशीर्ष-४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च मुळ ६२,२५,०० पुरक ४,००,०० वर्षभरात परत केलेली रक्कम (मार्च २०१३)	६६,२५,००	५१,४१,०८	(-) १४,८३,९२ १४,९५,९९

टिपा व भाष्ये :-

.१४८३.९२ लाख इतकी बचत लखात घेता, रु. १४९५.९९ लाख इतकी परत करण्यात आलेली रक्कम अधिक असल्याचे सिध्द झाले.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्रमांक एस-०४, ४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च ०३- वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०१ आयुर्वेद राज्य योजना (००)(०७) शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे बळकटीकरण व दर्जावाढ (४२१०१७१८) योजनांतर्गत मुळ ५०.०० पुरक ०.०० पुर्नर्विनियोजन -१३.०५	३६.९५	३७.४८	(+) ०.५३

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मूळ तरतूद रु.५०.०० लाख मध्ये सुधारीत अंदाजपत्रकात रु१०.०० लाख एवढी कपात होऊन रु.४०.०० लाख तरतूद उपलब्ध झाली. अंतिम प्रत्यक्ष खर्च रु.३६.९५ लाख एवढा झालेला असुन उस्मानाबाद महाविद्यालयाचे यंत्रसामुग्री खरेदीस शासन पत्र दि.२३ एप्रिल, २०१३ नुसार प्रशासकीय मान्यता प्राप्त न झाल्यामुळे उर्वरित तरतूदीपैकी .३.०५ लाख एवढी रक्कम शासन समर्पित करण्यात आली. सन २०११-१२ आर्थिक वर्षातील व्यपगत झालेला धनादेश रु.०.५३ लाख सन २०१२-१३ वर्षात महालेखापाल नागपूर यांनी खर्ची दाखविल्यामुळे खर्चात वाढ दिसून येते. सदर खर्चाची Transfer Entry महालेखापाल नागपूर यांना देण्यात आली आहे.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्रमांक एस-०४, ४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च ०३- आरोग्य शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषम चिकित्सा १०५(००)(३७) शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये आणि यंत्रसामुग्री यांचे बळकटीकरण व दर्जावाढ योजनांतर्गत मुळ ६०,००.०० पुरक ३,००.०० पुर्नर्विनियोजन -१३,८७.५८	४९,१२.४२	४९,२३.९८	(+) ११.५३

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या वर्षाकरीता मागणी क्र. एस-४ मध्ये ४२१०१६२९ या लेखाशिर्षाखाली मुळ अनुदान६० कोटी व पुरवणी अनुदान३ कोटी असा एकूण ६३ कोटी निधी मंजूर होता.

वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अंदाज२०.१२/ . .६४/२०१२/अर्थसंकल्प-३, दि.२२ फेब्रुवारी, २०१३

अनवये योजनांतर्गत निधीला अर्थसंकल्पीय तरतूदीच्या८० टक्के मर्यादेत वितरीत करण्याबाबतचे आदेश प्राप्त णालयाने संचालनालयामार्फत याबाबत आढावा घेवून २८ मार्च २०१३ राजी शासनास ४२१० १६२९ लेखाशिर्षाखाली ४९,१२,४२,०००/- खर्च कळविलेला आहे. मंजूर अनुदान रू.३ कोटीच्या २० टक्के कपात होऊन रुपये ५०,४०,००,०००/- शासनाने २८ मार्च, २०१३ च्या ज्ञापनाद्वारे कळविले. संचालनालयाने २८ मार्च, २०१३ रोजी खर्च रु.४९,१२,४२,०००/- असा कळविल्यामुळे शासनाने ३० मार्च २०१३ च्या ज्ञापनाद्वारे अंतिम सुधारित अनुदान एकूण ४९,१२,४२,०००/- असे कळविले. महालेखापाल यांच्याकडील खर्च ४९,२३,९८.०००/- असा आहे. महालेखापाल यांचा एकूण ४९,२३,९८.०००/- व संचालनालयाचा खर्च ४९,१२,४२,०००/- यामधील तफावत रु.११,५६,०००/- येतो व तो जास्तीचा खर्च दिसतो.

यासंदर्भात सादर करण्यात येते की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर यांची रुपये ३,०१,०००/- व मेयो सर्वोपचार रुग्णालय नागपूर यांची रुपये८,५५,०००/- ची देयके ३० मार्च २०१३ रोजी मंजूर झाल्यामुळे सदरचा खर्च संचालनालयाचे दि.२८ मार्च २०१३ रोजी कळविलेल्या खर्चात समाविष्ट नाही. त्यामुळे ११.५६ लक्ष हा खर्च जास्तीचा दिसतो.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्रमांक एस-०४, ४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च ०३- आरोग्य शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषम चिकित्सा १०५(००)(३८) शासकीय दंत महाविद्यालयांचे बळकटीकरण व दर्जावाढ मुळ ७५.०० पुरक ०.०० पुर्नर्विनियोजन -२१.२०	५३.८०	५३.७९	(-) ०.०१

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २०१२-१३ या वित्तीय वर्षात मुह मंजूर अनुदान रु७५.०० लाख मंजूर होते. ३१ मार्च रोजी पुनर्विनियोजनाद्वारे कपात करुन ५३.८० लाख इतके अनुदान उपलब्ध झाले पैकी खर्च ५३.७९ लाख हा झालेला आहे. याबाबत महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्यासोबत ताळमेळ घातलेला आहे.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्रमांक एस-०४, ४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च ०८- सर्व साधारण ८००- इतर खर्च ८००(००)(०३) १३ व्या वित्त आयोजाच्या शिफारशीनुसार प्राप्त यंत्रसामुग्रीची खरेदी मुळ ०.०० पुरक १००.०० पुर्नर्विनियोजन -४८.४०	५१.६०	५१.५९	(-) ०.०१

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

वित्तीय वर्ष २०१२-१३ मध्ये अन्न चाचणी प्रयोगशाळा, मुंबईकरीता १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून एक कोटी रुपयाची यंत्रसामुग्री खरेदी करणे प्रस्तावित होते. पैकी रक्कम रु५१.६० लाखाची खरेदी झाली असून उर्वरित रक्कम रु.४८.८० लाख शासनास समर्पित करण्यात आले होते.

1. शासनास पत्र क्र.नियोजन/FTL/१२-१३/४१५-१५/५, दि.२८.०८.२०१२ रोजी उपकरण खरेदी संदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात आला.

2. सदर प्रस्तावाच्या अनुषंगे शासन निर्णय क्र.संकिर्ण२०११/ . .७३१/११/औषधे-२, दि.०५ सप्टेबर, २०१२ प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली.
3. शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, निर्णय क्र.संकीर्ण/२०११/ . .७३१/११/औषधे-२, दि.१५.१०.२०१२ अन्वयेच्या शुध्दीपत्रकान्वये दि.५/९/२०१२ च्या शासन निर्णयासोबत उपकरणांची यादी रद्द करुन दुसरी यादी देण्यात आली व त्याबाबत खरेदी करण्याची कार्यवाही घेणेबाबत कळविण्यात आले.
4. शासन निर्णय क्र.संकीर्ण/२०११/ . .७३१/११/औषधे-२, दि.२७.११.२०१२ ला अनुसरुन प्रसिध्द करावयाच्या निविदा फॉर्म व Specification ला मान्यता देणेबाबत व वर्तमानपत्रात जाहिरात देणेबाबत मा.आयुक्तांना दि१२.१२.२०१२ रोजी सादर करण्यात आले. त्यास मा.आयुक्तांनी दि१४.१२.२०१२ रोजी मान्यता दिली.
5. पत्र क्र.औनिप्र/भांडार/टेंडर/२७१-१२/५, दि.१५.१२.२०१२ रोजी वर्तमानपत्रात उपकरणे खरेदीसंदर्भात जाहिरात प्रसिध्द करणेसाठी संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई यांना कळविण्यात आले.
6. वरील पत्राच्या अनुषंगे दि.२१.१२.२०१२ रोजी महाराष्ट्र टाईम्स या वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली.
7. वरील जाहिरातीच्या अनुषंगेनिविदापूर्व बैठक दि.०३.०१.२०१३ रोजी संपन्न झाली.
8. दि.०३.०१.२०१३ च्या बैठकीनुसार खरेदी सुधारीत MID-NIR या उपकरणाचे Specification बनवावे असे ठरले. तसेच सदर ०९.०१.२०१३ च्या सादरणीयावर सह आयुक्त (दक्षता) तथा खरेदी समिती अध्यक्ष यांनी on going physical tender procedure may be called off व E tender procedure .
9. may be adopted for purchase अशा आशयाचे शेरे दि.१०.०१.२०१३ रोजी लिहून सदर फाईल मा.आयुक्तांना सादर केली त्यास मा.आयुक्तांनी दि१४.०१.२०१३ मान्यता दिली.
10. वरील आदेशाच्या अनुषंगे ईनिविदेचा आवाका बधता कार्यालय प्रमुखांची सदर निधी वेळेत खर्ची पडण्याकरीता खालील प्रकारची कार्यवाही तातडीने घेतली.

9.1) ई-निविदा राबविणेबाबत NIC यांचेकडे प्रयोगशाळेतील Nodal Officer b3 Digital signature cretificate मिळविण्यासाठी व त्यास मान्यता मिळण्यासाठी दि.१८.०१.२०१३ रोजी मा.आयुक्तांना सादर करण्यात आले.

9.2) पत्र क्र.DCL/NO/& DSC/३०-१३//२, OF १८.०२.२०१३ State information officer/NIC सेंटर महाराष्ट्र शासन यांना Digital signature certificate request form & Tender Administration account साठी सादर करण्यात आले.

9.3) वरील मुद्यांच्या अनुषंगे०४.०२.२०१३ रोजी ई-निविदाचे Account open झाले.

9.4) त्यानंतर दि.१२.०२.२०१३ रोजी रजिस्ट्रेशन key साठी Nic Delhi यांना मेल पाठवण्यात आला.

9.5) दि.१३.०२.२०१३ रोजी Registration DSC जनरेट झाले.

9.6) दि.१५.०२.२०१३ रोजी उपकरणे उपसमितीने Specification सादर केले.

9.7) दि. २०.०२.२०१३ रोजी मा.आयुक्तांना ईटेंडर साठी जाहिरात द्यावयाचा Tender Form Specification व वर्तमानपत्रात जाहिरात देणेसंदर्भात मान्यतेस्वत सादर करण्यात आले व त्यास २२.०२.२०१३ रोजी मान्यता मिळाली.

9.8) त्यानुसार २५.०२.२०१३ रोजी संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना जाहिरात देणे संदर्भात पत्र देण्यात आले. त्यानुषंगे जाहिरात निविदा प्रसिध्द झाल्याच्या दि२७.०२.२०१३ ते दि.१९.०३.२०१३ असा होता व वर्तमानपत्र जाहिरात दि.०८.०३.२०१३ रोजी प्रसिध्द झाली.

9.9) उपकरणे खरेदी पूर्व समितीची बैठक दि.०८.०३.२०१३ रोजी झाली.

9.10) दि.२०.०३.२०१३ रोजी Technical Bid उघडण्यात आले.

9.11) Technical Bid च्या अनुषंगे छाननी केल्यानंतर 3 उपकरणासाठी योगय प्रतिसाद मिळाला व उर्वरित 6 उपकरणासाठी अत्यल्प प्रतिसाद मिळाला. अत्यल्प प्रतिसाद मिळालेल्या उपकरणसाठी ई-टेंडरच्या वेळेअभावी Extension देणे शक्य नसल्याने ज्या उपकरणांना पुरवठादारांचा योग्य प्रतिसाद मिळाला व छाननी प्रक्रियेत ग्राह्य धरण्यात आल्या. त्याबाबतचा प्रस्ताव मा.सचिव वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय यांना मान्यतेस्तव सादर करण्यात आला.

9.12) वरील प्रस्तावाच्या अनुषंगे राज्यस्तरीय खरेदी समितीची बैठक दि.२८.०३.२०१३ रोजी होऊन १० लाखावरील उपकरणांच्या बाबतीतील शासन निर्णय ३०.०३.२०१३ रोजी या कार्यालयास प्राप्त झाला. तसेच १० लाखापेक्षा कमी किंमतीच्या उपकरणांच्या खरेदी मंजूरीबाबतचा शासन निर्णय दि३०.०३.२०१३ रोजी प्राप्त झाला.

वरील सर्व प्रक्रियेत रु.५१.६० लाख रकमेच्या योग्य प्रतिसाद मिळालेल्या व छाननी प्रक्रियेत ग्राह्य ठरलेल्या उपकरणांची खरेदी करण्यात आली व उर्वरीत ४८.४० लाखाचे उपकरणे खरेदी करीता त्यानंतर वित्तीय वर्ष संपलेले असल्याने पुढील ईनिविदा प्रक्रिया करता येऊ शकली नाही व त्यामुळे रु.४८.४० लाख अखर्चित रक्कम शासनास समर्पित करण्यात आली.

. लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
मागणी क्रमांक एस-०४, ४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च ०८- सर्व साधारण, ८००- इतर खर्च ८००(००)(०१) अन्न व औषधीद्रव्ये प्रशासनाची पुनर्रचना व अन्न व औषधिद्रव्ये चाचणी प्रयोगशाळा आस्थापना मुळ १००.०० पुरक ०.०० पुर्नर्विनियोजन -२५.७६	७४.२४	७४.२३	(+) ०.०१

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

1. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास प्रशासनाकरिता करण्यात आलेल्या १००.०० लाख निधीच्या तरतूदीपैकी प्रशासनास सदर लेखाशिर्षाखाली रु.८०.०० लाख निधी वितरीत करण्यात आला होता.
2. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक अ औप्र२०११/ . .८७०(अ)/औषधे २, दि.११ फेब्रुवारी, २०१३ अन्वये अन्न चाचणी प्रयोगशाळा, नागपूरकरिता विभागवार कक्ष व नुतनीकरणाच्या कामाकरिता रु.४४,७३,०००/-दिनांक १५/३/२०१३ व रु.१५,२७,०००/- दिनांक २०/०३/२०१३ रोजी असे एकूण ६० लक्ष एवढा निधी धनादेशाद्वारे सह आयुक्त (नागपूर विभाग) कार्यालयाकडून कार्यकारी

अभियंता, एकात्मिकृत घटक (वैद्यकीय) सार्वजनकि बांधकाम विभाग, नागपूर यांना हस्तांतरीत करण्यात आला.

3. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र.अ औप्र-२०११/ . . ७८० (अ)/औषधे-२, दि.२७ नोव्हेंबर, २०१२ अन्वये रु.४० लक्ष एवढ्या निधीतून उपकरणे, वातानुकुलित यंत्रे, रेफ्रिजरेटर व गॅस कनेक्शन खरेदीस मंजूरी देण्यात आली होती. शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक.अ औप्र-२०११/ . .८७०(अ)/औषधे-२, दि.३० मार्च २०१३ अन्वये अन्न चाचणी प्रयोगशाळा, नागपूर करिता उपकरणे खरेदी करण्याकरीता रु.१६,१६,०६३/- एवढ्या निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यानुसार, ३ उपकरणांच्या खरेदीकरीता रु.१४,२३,१२५/- संबंधित पुरवठादारास धनादेशाद्वारे प्रदान करण्यात आले.

4. दि.१८/०३/२०१३ रोजी वातानुकुलित यंत्रे व रेफ्रिजरेटरकरीता रु.५,४६,०००/- व गॅस कनेक्शनकरीता .१२,८९०/- चे देयक कोषागार कार्यालयास सादर केले होते. परंतु, वित्तविभागाच्या परिपत्रक क्र.संकीर्ण-१०००/- . .१४/कोषा-४, दि.११/०२/२००० अन्वये कोषागार कार्यालय, नागपूर यांनी आक्षेप लावून सदर देयके परत केली. त्यामुळे अखर्चित निधी रु.५,७६,८७५/- शासनास समर्पित करण्यात आला.

साक्ष :-

7.2 महालेखाकारांनी या परिच्छेदासंदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी समितीच्या दिनांक 13 ऑक्टोबर, 2016 रोजीच्या बैठकीत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष आयोजित केली होती. सदरहू बैठकीत उक्त परिच्छेदासंदर्भात परिपूर्ण माहिती विभागीय सचिवांना देता आली नाही. त्यामुळे समितीचे कामकाज पूर्ण होऊ शकले नाही. परिणामी समितीची त्याच विषयावर दिनांक 18 जानेवारी, 2017 रोजी पुन्हा बैठक आयोजित करण्यात आली.

प्रधानशीर्ष 4210 वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च, 03 वैद्यकीय शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, 101 आयुर्वेद राज्य योजना (00) (07) शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय बळकटीकरण दर्जावाढ (4210 1712) योजनेअंतर्गत :-

शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय बळकटीकरण व दर्जावाढ योजनेअंतर्गत 53 हजार रुपये अधिकचा खर्च झाला आहे त्याबाबतमाहिती देताना विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, मूळ तरतूद 50 लाख रुपये होती. त्यात कपात होऊन 40 लाख रुपये मिळाले होते. अंतिम खर्च 36 लाख 95 हजार रुपये इतका झाला. त्या आर्थिक वर्षात व्यपगत झालेली 53 हजार रुपयांची ट्रान्सफर एन्ट्री महालेखापालांकडे देण्यात आली आहे.

तथापि, सदर रक्कमेची ट्रान्सफर एंन्ट्री महालेखाकार कार्यालयात प्राप्त नसल्याचे महालेखाकारांनी समितीस सांगितले असता सदर रकमेची ट्रान्सफर एन्ट्री यासंदर्भात दिनांक 10 सप्टेंबर, 2012 रोजी महालेखाकार यांच्याकडे पत्र पाठविले आहे असे विभागीय सचिवांकडून सांगण्यात आले.

समितीस उक्त विषयाबाबत समर्पक उत्तर प्राप्त न झाल्यामुळे यासंदर्भात समितीच्या पुढील बैठकीत विभागीय सचिवांनी समितीस सांगितले की, सन 2012-13 मध्ये अर्थसंकल्पीय तरतूद 50 लाख रुपयांची होती. कपात झाल्यानंतर अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी 36 लाख 95 हजार रुपये एवढा खर्च झालेला आहे. त्यावेळी 53 हजार रुपये जास्त खर्च झाला आहे असे दिसून येते. हा खर्च जास्त झालेला आहे हे बरोबर आहे. त्याचे कारण असे आहे की, हे सन 2012-13 चे लेखापरिक्षण आहे. सन 2011-12 मध्ये उस्मानाबादच्या आयुर्वेदिक कॉलेजच्या ठिकाणी सन 2011-12 च्या बजेटमधून खर्च केला होता. त्यांनी त्या संदर्भात चेक

देखील काढला होता. तो चेक बँकेमध्ये वेळेवर जमा न झाल्यामुळे तो असाच सरेंडर झाला. त्यानंतरच आर्थिक वर्षात पेमेंट करावे लागले. सन 2012-13 च्या आर्थिक वर्षात 53 हजार रुपये पेमेंट केले आहे, तशा प्रकारे ट्रान्सफर एन्ट्री करावी असे दिनांक 10 सप्टेंबर, 2012 ला पत्रक महालेखाकार कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहे. सन 2011-12 चा खर्च असला तरी तो सन 2011-12 च्या प्रलंबित देयकाचा खर्च आहे. पण तो सन 2012-13 मध्ये झाला आहे. सन 2012-13 चा खर्च असल्याने महालेखाकारांनी देखील ते मान्य केलेले नसावे. सन 2011-12 मध्ये प्रलंबित असलेले देयक 53 हजार रुपयांचे आहे. सन 2011-12 मधील 53 हजार रुपयांचा खर्च सन 2012-13 मध्ये झाला आहे.

आर्थिक शिस्त अशी असते की, विभागाने निधी कमीत कमी सरेंडर करावा. जुने देणे द्यावेच लागणार आहेत. मुद्दा इतकाच आहे की, सन 2011-12 मध्ये अकाऊंट क्लोज झाले. त्यामुळे सन 2012-13 मध्येच सर्व करावे लागणार आहे. विभागाला निधी मिळाला आहे. जुने पेसे देणे बाकी आहे, ते द्यावेच लागणार आहेत. विभागाने तितके पैसे कमी सरेंडर केले असते, त्याचे नियोजन लक्षात आले असते तर हा विषय आला नसता. विभागाने वर्षाच्या शेवटीच रक्कम सरेंडर केली असेल. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दुदैवाने विभागाने त्या वर्षी निधी सरेंडर केलेले नाहीत, त्या हेडखाली आलेले संपूर्णपैसे वापरले आहेत, त्या वर्षी 20 टक्के कपात होती.

विभागाने जास्त रक्कम म्हणजे 3 लाख रुपये सरेंडर केले आहेत. म्हणजेच 10 टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम सरेंडर केली आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, 3 लाख रुपये सरेंडर केले आहेत. तेव्हा विभाग प्रशासकीय मान्यतेची वाट पाहत होते. विभागाची अशी धारणा होती की, प्रशासकीय मान्यता वेळेवर मिळेल. त्यामुळे यंत्रसामुग्रीसाठी 3 लाख रुपये ठेवण्यात आले होते.

निधी सरेंडर केला किंवा का केला याची विचारणा समिती करीत नाही. विभागाला प्रशासकीय मान्यता मिळाली नाही, त्यामुळे निधी सरेंडर केला, ते योग्य केले. विभागीय सचिवांनी असे देखील सांगितले की, सन 2012 ला विभागाने महालेखाकारांना पत्र पाठविले की, सन 2011-12 मध्ये 53 हजार रुपये घ्यावेत.

मात्र हे पत्र पाठविणेच चुकीचे होते. त्याला गृहीत धरुनच विभागाने निधी सरेंडर केला पाहिजे होता. विभागाने त्याला गृहीत धरुनच सरेंडर केले असते तर ही अडचण आली नसती येथे विभागाकडून चूक झालेली दिसत आहे. याअनुषंगानेसमितीने सूचित केले की, विभागाने आर्थिक शिस्त पाळली पाहिजे.

शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय आणि यंत्रसामुग्रीयांचे बळकठीकरण व दर्जावाढ, योजनेंतर्गत :-

03 आरोग्य शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, 105 विषम चिकित्सा 105 (00) (37) शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय आणि यंत्रसामुग्रीयांचे बळकटीकरण व दर्जावाढ या योजनेअंतर्गत महालेखाकार यांच्या अहवालात दर्शविण्यात आलेला जास्तीचा खर्च रुपये 11 लाख 56 हजार संदर्भात लेखी स्पष्टीकरणात असे नमूद केले आहे की, याबाबत प्रधान महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्याशी समन्वय साधून खात्री करण्यात येईल. तथापि विभागाने महालेखापाल कार्यालयाकडे संपर्क सुध्दा केलेला नाही. यासंबंधी विभागाकडून कधी खात्री करुन घेण्यात येईल अशी विचारणा समितीने केली असता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांनी समिती समोर खुलासा केला की, महालेखाकार कार्यालयास सर्व कागदपत्रे पाठविलेली आहेत. या संदर्भात विभागाकडून अनेक प्रयत्न करण्यात आलेले आहे. 49 कोटी रुपयांमध्ये 11 लाख रुपयांचा ताळमेळ बसला नव्हता. मुळात ही रक्कम बीडीएसमध्ये आली नव्हती. बीडीएसमध्ये असलेल्या रकमेपेक्षा जास्त एकही रुपयाचे बिल मंजूर होत नाही. यामुळे ही रक्कम क्षमापित करावी अशी विनंती विभागाकडूनसमितीला करण्यात आली.

विभागाने यासंदर्भात त्याचवेळी महालेखाकांर कार्यालयाशी समन्वय साधला असता व वेळेवर कागदपत्रे पाठविली असती तर आज समितीचा वेळ वाया गेला नसता. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता यासंबंधीभविष्यात दक्षता घेतली जाईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला आश्वस्त केले.

या योजनेअंतर्गत 60 कोटी रुपयांची तरतूद आहे. 3 कोटी रुपये अजून पुरवणी म्हणून घेतले आहेत. 12 कोटी रुपये कपात झाली असेल तर 13 कोटी रुपये सरेंडर झाले आहेत ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता त्या वर्षी 63 कोटी रुपये मिळाले, त्यातून 13 कोटी 87 लाख रुपयांची कपात केली असे

विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

तथापि, ती कपात नाही. एकूण 60 कोटी रुपयांना कपात आहे. कारण 3 कोटी रुपयांच्या पुरवणीला कपात कधी लागत नाही. याकडे समितीने लक्ष वेधले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, बीडीएसवर त्या वर्षी 49 कोटी 12 लाख रुपये वितरित करण्यात आले.

समितीचा मुद्दा असा आहे की, कोणत्या आधारे हे पैसे विभागाला कमी मिळाले ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात वित्त विभागाचे रेग्यूलेशन्स होते की, मंजूर निधीच्या ७५ टक्केच खर्च करावा. सुरूवातीला असे निदेश होते. त्या अनुषंगाने तेवढ्याच मर्यादेत विभाग राहिला. नंतर फेब्रुवारीमध्ये अशा सूचना आल्या की, नॉन प्लॅनमध्ये ८५ टक्के व प्लॅनमध्ये ८० टक्के खर्च करावा. त्यामुळे हे राहिले आहे. ही पुरवणी मागणी डिसेंबर, २०१२ च्या अधिवेशनात टाकली होती. जानेवारी मधील सूचना आहेत.

समितीच्या मते मूळ तरतुदीला २० टक्के कट होता. पुरवणीला कट लागत नाही. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, पुरवणीच्या संदर्भात देखील वित्त विभागाचे प्रत्येक वर्षी वेळेवर बदल होत असतात. मागच्या वर्षी देखील पुरवणीमध्ये तसे होते.

याअनुषंगाने महालेखाकारांने असा मुद्दा उपस्थित केला की, ओरिजनल ग्रांट ही युज नहीं कर रहे है तो सप्लीमेंटरी में और ३ करोड़ रुपये लेने की बात ही नहीं आती है. आपको पहले ६० करोड़ रुपये मिले है और उसके बाद ३ करोड़ रुपये और लिए गए है. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, नियोजन करीत असताना २० टक्के कपात आहे म्हणून आता पुरवणीमध्ये देखील २० टक्के कपात असणार असा अंदाज धरून अधिकारी जास्त मागणी करतात, जेणेकरून विभागाला गरजेप्रमाणे पैसे मिळतील, त्या दृष्टीने नियोजन होत असते.

जरी ६३ कोटी रूपयांच्या २० टक्के कट लागला तरी सुध्दा विभागाला ५० कोटी ४० लाख रूपये मिळाले पाहिजे होते. मात्र ते देखील त्यांनी दिले नाहीत. विभागाला एकूण ४९ कोटी १२ लाख ४२ हजार रूपये दिले आहेत. विभागाने ४९ कोटी २३ लाख रूपये खर्च केला आहे, म्हणजे ११ लाख रूपये जास्तीचे

खर्च केले आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की,११ लाख ५६ हजार रूपयांचा जास्तीचा खर्च दिसत आहे. तत्कालीन अधिष्ठाता पातळीवर ११ लाख रूपयांची खरेदी झाली होती. तो खर्च रि-कन्सिलिएशनमध्ये महालेखाकारांना तत्कालीन संस्थेकडून कळविण्यात आला नव्हता, नाही तर असे झाले नसते, ११ लाख ५६ हजार रूपये खर्च जास्तीचा झालेला नाही. तो बीडीएसवर आला म्हणूनच खर्च झाला. ते विभागाने मान्य केले आहे.

म्हणजे ११ लाख ५६ हजार रूपये या शिर्षामध्ये लागत नाहीत असे विभागाचे म्हणणे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या हेडवर, बीडीएसवर पैसे आले होते आणि ते पैसे खर्चही केले आहेत. त्यामुळे तो अतिरिक्त खर्च म्हणण्यापेक्षा बीडीएसवर ॲव्हेलेबल होते म्हणून खर्च झाला.

बीडीएसवर ११ लाख ५६ हजार रूपये व ४९ कोटी १२ लाख रूपये उपलब्ध झाले का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर पैसे उपलब्ध झाले. विभागाने ॲव्हेलेबल होते आणि ट्रेझरीने देखील ते देयक अदा केले आहे. पैसे बीडीएसमध्ये आले नाहीत तर ट्रेझरीमधून काढताही येत नाहीत. ती रक्कम बीडीएसमधून उपलब्ध झालेली आहे. म्हणजे विभागाला ४९ कोटी १२ लाख मिळाले त्याच बरोबर व ११ लाख ५६ हजार देखील मिळाले.

असे असतांना हे अकाऊंट प्रॉपर कसे नाही ? अशी विचारणा समितीने केल्यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ११ लाख ५६ हजार रूपये मिळाले. नागपूरला संस्था पातळीवर खरेदी झाली होती. संस्था पातळीहून महालेखाकारांकडे याबाबतचा तपशिल जायला पाहिजे होता की, पैसे बीडीएसवरचे खर्च झाले आहेत. मात्र तसे न गेल्यामुळे महालेखाकारांनी४९ कोटी १२ लाख एवढेच फक्त गृहीत धरले आहे.

विभागाकडे ४९ कोटी १२ लाख उपलब्ध होते असे सांगितले आहे. बीडीएसवर ११ लाख ५६ हजार रूपये मिळाले आहेत, पण ते महालेखाकारांच्या रेकॉर्डवरच नाही. याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पैसे मिळाले आहे. नागपूर ट्रेझरीने ११ लाख ५६ हजाराचे देयक अदा देखील केले आहे.

बील पास झाले म्हणूनच एक्सेस खर्च झाला (बील पास किया गया तभी तो एक्सेस बुकींग हुवा) नामंजूर रकमेवर देयक पास होऊ शकत नाही, मंजूर रक्कम ४९ कोटी १२ लाख दाखविली आहे तर मग हे एक्सेस कसे आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्यक्षात बीडीएसमध्ये उपलब्ध झाले नाही तर कच्चे बूक करता येत नाही. बीडीएसमधून झाले आहे म्हणजे ती रक्कम रिलिज झाली आहे.

शासनाकडून पत्र येते की, ४९ कोटी १२ लाख रिलिज होणार आहेत, विभागाला असे पत्र आले का ? अशी विचारणा समितीने केली असता असे विभागीय सचिवांनी सांगितले की, ती अर्थसंल्पीय तरतूद आहे.

आता ११ लाख ५६ हजार रूपये आहेत, हे विभागाला कोणत्या हेडखाली दिले गेले आहेत. ते पैसे आले तर ते कुठून आले याबाबत विभागाने महालेखाकांराकडे खुलासा करावा असे समितीने सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाला ४९ कोटी १२ लाख व ११ लाख ५६ हजार एवढी रक्कम रिलिज करण्यात आली होती.

पण महालखाकारांकडे तसे कोणतेच रेकॉर्ड नाही आणि विभागाच्या उत्तरात देखील असेच म्हटले आहे. २८ मार्च, २०१३ चे पत्र आहे, त्यामध्ये ती फिगर बरोबर मॅच होत आहे. त्यामध्ये दोघांची फिगर सारखी आहे. पण त्यामध्ये ११ लाख ५६ हजाराचे जस्टिफिकेशन कुठेही नाही. ही बाब समितीने लक्षात आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, २८ मार्चपर्यंत झालेला खर्च बरोबर आहे, त्यानंतर दोन दिवसांचा म्हणजे ३१ मार्चपर्यंतचा कालावधी आहे. उरलेला अतिरिक्त खर्च झालेला आहे, त्याचे सुध्दा बीडीएस उपलब्ध झाले आहे. बीडीएस उपलब्ध झाले नाही तर ट्रेझरीचे लोक हे स्वीकारतच नाहीत. विभागाला ४९ कोटी २३ लाख रुपये अपलोड झाले.

महालेखाकांराकडे ४९ कोटी २३ लाखचे अकाऊंट उपलब्ध नाही. विभागाला ४९ कोटी १२ लाख मिळाले आहेत असा रेकॉर्ड महालखाकारांकडे आहे. ११ लाख ५६ हजार मिळाले म्हणून खर्च केले याचे रेकॉर्ड आहे. पण विभागाला ते मिळाले याचा रेकॉर्ड महालेखाकांराकडे नाही. ते विभागाने रिकन्साईल करून घ्यावे. १३ कोटी ८७ लाख रूपये कट २० टक्क्यांमुळे झाला आहे. एक्झिट कॉन्फरन्स झाली, त्यावेळी आपण

असे म्हटले होते की,"As purchase procedure was not completed timely the amount of Rs. 13,87.58 lakh was surrendered." कट लागला असे त्यांनी सांगितले नाही. त्यांनी असे सांगितले की "purchase procedure is critical and that is why it was not completed in time." ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यावेळी सांगितलेले बरोबर आहे. त्यामध्ये दुमत नाही. रेकॉर्डवर स्पष्ट आहे की त्या वर्षी वित्त विभागाने २० टक्के कपात केली आहे, त्यामुळे पैसे उपलब्धच नव्हते.

वित्त विभाग ने २० प्रतिशत कट लगाया था. अब आप २० प्रतिशत ही रकम लेंगे या जो रकम बची है, उतनी रकम लेंगे ? आपने पूरा पैसा खर्च किया होता तो इसमें कट नहीं लगता. आपने खर्चा नहीं किया इसलिए वित्त विभाग ने कट लगाया है. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असे विभागीय सचिवांनी सांगितले की, ऐसा नहीं होता है.

आप यदि पैसा खर्च कर देते तो इसमें कट नहीं लगता. असे महालेखाकारांना सांगितले यावर विभागीय सचिवांनी उत्तर दिले की, खर्चा नहीं कर सकते है. इस साल भी ऐसी ही स्थिति है.

शासनाने जानेवारीमध्ये ऑर्डर इश्यू केली की, ८० टक्के रिलिज होईल, हे विभागाने म्हणणे ऑप्टिमिस्टिक आहे. शासनाने २० टक्के कट लावला they cannot go beyond that without permission, they will demand further 20% and if the funds are available it will be released. फेब्रुवारी अखेरपर्यंत किंवा मार्चला निधी देतात पण २० टक्क्यांप्रमाणे ते चालले, त्याप्रमाणे त्यांनी पूर्ण रक्कम युटिलाईज केली. आता विषय एवढाच होता की ११ लाख ५६ हजार रूपये ही अधिकची रक्कम आहे. विभागाचे म्हणणे आहे की, त्यांना ती रक्कम मिळाली आहे. विभागाने ही बाब महालेखाकारांबरोबर रिकन्साईल करावी, तसेच नोट ऑफ एरर पूर्ण करावी. असे समितीने सूचित केले असा विभागीय सचिवांनी यास सहमती दर्शविली. तसेच वित्त विभागाबरोबर बसून रिकन्सिलिएशन करुन घेण्यात येईल. आणि त्याप्रमाणे महालेखाकारांना कळविण्यात येईल. समितीच्या सूचनेप्रमाणे सर्व कार्यवाही करण्यात येईल असे देखिल आश्वस्त केले.

यह कॅपिटल आऊटले है. २० प्रतिशत कट जनरली लगता है. रुटीन खर्चा होता है. कॅपिटल आऊटले के लिए अगर अलॉटमेंट हो गया, आपने ऑलरेडी कॉन्ट्रेक्ट कर दिया तो नॉर्मली कट नहीं लगता. जो रकम बच गई है, इसका मतलब दिनांक ३१ मार्च तक वह रकम खर्च नहीं हो पायी. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणली.

नॉन प्लान एक्सपेंडीचर में कट लग ही नहीं सकता, प्लान में कट लग सकता है. नॉन प्लान में इनका वेतन देना ही पड़ेगा. गाड़ी चलानी ही पड़ेगी, डिजल भरना ही पड़ेगा. Non-Plan expenditure cannot be cut. कॅपिटल एक्सपेंडीचर में कट नहीं होता है, योजनाओं में कट किए बिना पैसा दे ही नहीं सकते. आपल्याला देणे द्यावेच लागणार आहेत. नॉन प्लॅनचे पैस कपात करता येत नाहीत. असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, दिनांक १४ जानेवारी, २०१३ चे परिपत्रक आहे, त्यामध्ये अगदी स्पष्ट नमूद केले आहे. उदाहरणा दाखल विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०१२-१३ मध्ये हे किमान जानेवारीला दिलेले आहेत, पण चालू आर्थिक वर्षात सुरूवातीपासूनच२० टक्के कपात आहे. आर्थिक वर्ष सुरू झाल्यापासून २० टक्के कपात आहे. कॅपिटल व रेव्हेन्यू एक्सपेंडिचर आहे. या वर्षी कॅपिटल एक्सपेंडिचरवर १०० टक्के खर्च करावा आणि रेव्हेन्यू एक्सपेंडिचरवर ८० टक्के खर्च करावा असे सुरूवातीपासून आहे. आपण सांगत असलेल्या वर्षामध्ये जानेवारीपासून हे आहे आता सरसकट कपात लावली आहे.

विभागीय सचिवांनी फक्त ११ लाख ५६ हजार रूपये याबाबत स्पष्ट करावे. असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले की, याबाबत रिकन्सिलिएशन करुन घेण्यात येईल.

शासकीय दंत महाविद्यालय बळकटीकरण व दर्जावाढ :-

03 आरोग्य शिक्षण प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषम चिकित्सा १०५ (००) (३८) शासकीय दंत महाविद्यालय बळकटीकरण व दर्जावाढ या योजनेअंतर्गत मूळ तरतुदीमध्ये 75 लाख रुपयांच्या संदर्भात पुनर्विनियोजन केल्यानंतर 21 लाख 20 हजार रुपये सरेंडर केले आहेत का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, त्यात फक्त एक हजार रुपयांचा फरक होता.

प्रश्न फक्त एक हजार रुपयांचा नाही. कारण पुनर्विनियोजनात विभागाने 21 लाख 20 हजार रुपये सरेंडर केले आहेत याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मूळ तरतूद 75 लाख रुपये होती त्यावर 20 टक्के कट लागल्यामुळे सदर रक्कम मिळाली नाही. ती ही रक्कम आहे.

पण 75 लाख रुपयांच्या 20 टक्के रक्कम 15 लाख रुपये इतकी येते. परंतु ही रक्कम 21 लाख 20 हजार रुपये इतकी आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी याबाबत सांगितले की, विभागाला एकूण 53 लाख 80 हजार रुपये प्राप्त झाले होते. त्यापैकी 53 लाख 79 हजार रुपये खर्च झाले व एक हजार रुपये परत केलेले आहेत.

पुनर्विनीयोजनात 21 लाख 20 हजार रुपये नमुद करण्यात आले आहेत. सदर रक्कम सरेंडर केली की कट लावला आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कट लावला आहे.

नियोजन 75 लाख रुपयांचे आहे. त्यापैकी विभागाला 53 लाख 80 हजार रुपये मिळाले व 53 लाख 79 हजार रुपयांची रक्कम खर्च केली. एक हजार रुपयांची रक्कम खर्च झाली नाही. ही बाब मान्य परंतु 21 लाख 20 हजार रुपयांच्या रकमेचे पुनर्विनियोजन केले आहे की कट लागलेला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कट लागून विभागास बीडीएसवर 53 लाख 80 हजार रुपयांची रक्कम मिळाली होती.

तथापि विभागाकडून प्राप्त झालेल्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, अर्थसंल्पीय वितरण प्रणालीनुसार (बीडीएस) 54 लाख 13 हजार रुपयांचे अनुदान प्राप्त झाले असून त्यापैकी 53 लाख 79 हजार रुपये यंत्रसामुग्रीकरिता खर्च झालेले आहेत. विभागाला 54 लाख रुपये मिळाले की, 53 लाख रुपये मिळाले अशी विचारणा समितीने केली असता विभागास 53 लाख 80 हजार रुपये मिळाले होते. सदर रक्कम राऊंड फिगर केली आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पण ही रक्कम राऊंड फिगर कशी होऊ शकते ? विभागाला एकूण किती रक्कम मिळाली ? असा प्रश्न समितीने विचारला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, 54 लाख रुपयांची रक्कम चुकून नमूद केली आहे. एकूण 53 लाख 80 हजार रुपयांची रक्कम मिळाली होती. त्यात एक हजार रुपयांचा डिफरन्स होता.

म्हणजेच यात खूप विसंगती दिसत आहे. एका बाजूला बीडीएसवर 54 लाख रुपये मिळाल्याचे लेखी स्पष्टीकरणात नमूद केले आहे. पण समितीच्या बैठकीत 53लाख 80 हजार रुपये मिळाल्याचे सांगण्यात येते त्यामुळे विभागाने ही बाब तपासून समितीला सविस्तर माहिती सांगावी की यात पुनर्विनियोजन करण्यात आले आहे की, कट लावण्यात आला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी एवढेच सांगितले की, 53 लाख 80 हजार रुपयांची रक्कम प्राप्त झाली होती.

विभागाला 53 लाख 80 हजार रुपये प्राप्त झाले असल्यास 21 लाख 20 हजार रुपये कट झाल्यामुळे ही रक्कम 30 टक्क्यांपेक्षा जास्त आहे. शासनाने यापूर्वीच कट लावला असल्यास विभागाला पुनर्विनियोजन करण्याची गरज नाही. It is not a cut, it is a surrender. असे महालेखाकारांचे आक्षेप आहेत. महालेखाकार यांच्या रेकॉर्डनुसार विभागाला रक्कम मिळालेली आहे. परंतु विभागाचे म्हणणे आहे की, सदर रक्कम विभागाला मिळालेली नाही. यामुळे ही बाब तपासून घ्यावी. असे निदेश समितीने दिले असता ही बाब तपासून घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

बीडीएसवर रक्कम प्राप्त न झाल्यास ती रक्कम कट झाली आहे असा त्याचा अर्थ नाही. मूळ तरतूद पूर्णत: रिलीज झाली नसल्यास त्यासाठी विभागाला प्रयत्न करावे लागतात 75 लाख रुपयांची मूळ तरतूद असली तरी संपूर्ण रक्कम विभागाकडे पाठविली जात नाही. त्यात कधी 80 टक्के रक्कम प्रथम व उर्वरित रक्कम नंतर सुध्दा पाठविली जाऊ शकते. उर्वरित रकमेसाठी विभागाने मागणी केल्यास जानेवारीनंतर सुध्दा ती रक्कम पाठविली जाते. परंतु विभागाकडून निधीची मागणी करण्यात आली नाही व आता समितीच्या बैठकीत समितीला अशी माहिती देण्यात येते की, कट लागलेला आहे. परंतु महालेखाकार कार्यालयाचे असे म्हणणे आहे की, विभागाने सदर निधीची मागणी न केल्यामुळे ती रक्कम बीडीएसवर आली नाही. असे मत समितीने व्यक्त केले व विभागाला आदेश दिले की बीडीएसवर किती रक्कम मिळाली आणि सदर रक्कम सरेंडर केली आहे की कट लागलेला आहे याबाबतची संपूर्ण माहिती लेखी स्वरुपात समितीला सादर करावी यावर समितीला सदर माहिती लेखी सवरुपात नंतर दिली जाईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

80 सर्वसाधारण, 800 इतर खर्च 800 (00) (03) तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त अनुदानातून यंत्र सामुग्रीची खरेदी :-

तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त अनुदानातून यंत्र सामुग्रीची खरेदी याअंतर्गत 48 लाख 40 हजार रुपये अखर्चित का राहिले अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी अवगत केले की, ई-टेंडर अंतिम करीत असताना त्याला कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे ते फायनल होऊ शकले नाही यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली.

विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टिकरण ज्ञापनात प्रत्येक ठिकाणी पुनर्विनियोजन असे नमुद केले आहे. परंतु याला पुनर्विनियोजन असे म्हणता येणार नाही. It is a surrender. दुसरा विषय असा आहे की, एक वर्षापूर्वी निधीची तरतूद होत असते. परंतु विभागाकडून फेब्रुवारी महिन्यात निविदा काढण्यात आली. याचा अर्थ 11 महिने विभागाने कोणतीही कार्यवाही केली नाही. नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये यासंबंधी प्रक्रिया केली असती तर वेळेवर वर्कऑर्डर गेली असती व रक्कम सरेंडर करण्याची वेळ आली नसती. अशा परिस्थितीत तरतूद उपलब्ध असताना निविदा काढण्यासाठी 11 महिन्यांचा विलंब का झाला अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रथम डिसेंबर, 2012 मध्ये साधे टेंडर करण्यात आले होते. त्यानंतर प्रक्रियेमध्ये बदल करुन ई-टेंडर काढल्यामुळे त्यात वेळ गेला.

विभागाला ई-टेंडर करायचे असल्यास त्याकरिता जास्तीत जास्त 8 दिवसांचा कालावधी लागू शकतो. परंतु विभागाच्या निष्काळजीपणामुळे निधी परत गेला असे म्हणणे चुकीचे होणार नाही. असे मत नाराजीने व्यक्त केले असता ई-टेंडरला कमी प्रतिसाद मिळाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

दिनांक 21 डिसेंबर, 2012 रोजी महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्रात उपकरणे खरेदी करण्यासाठी जाहिरात देण्यात आली. परंतु तरतूद दिनांक 1 एप्रिल, 2012 पासून लागू होती. यामुळे एप्रिल पासून डिसेंबर म्हणजे 8 महिने थांबण्याची गरज का पडली ? 21 डिसेंबर, रोजी वर्तमानपत्रात निविदा जाहीर केल्यानंतर त्याची अंतीम

तारीख 11 जानेवारी, 2013 पर्यंत होती. 3 जानेवारी, 2013 रोजी आपण निविदापूर्व बैठक सुध्दा घेतली होती. उपकरणे ठरविली नसताना 1 कोटी रुपयांची मागणी कशासाठी केली, उपकरणे अगोदर ठरविली असल्यास त्यासाठी अर्थसंल्पामध्ये तरतूद होऊ शकते. विभागाकडून मागणी आल्यानंतरच अर्थसंकल्पात तरतूद केली जात असते. दुसरी बाब अशी आहे की, निविदा प्रक्रियेत बदल करण्याची सूचना आली तरी ती घोषित झालेल्या निविदांना लागू होत नाही. सदर परिपत्रकात असे नमूद करण्यात आले होते का, आता ज्या निविदा घोषित झाल्या आहेत त्या रद्दबातल समजण्यात याव्यात व आता ई-टेंडरिंग करण्यात याव्या. नोव्हेंबर महिन्यात प्रशासकीय मान्यता मिळाली असून ई-टेंडर काढण्यास खूप वेळ गेला. दिनांक 8 नोव्हेंबर, 2012 रोजी प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सदर नस्तीवर तातडीने कार्यवाही का करण्यात आली नाही व याकरिता कोण जबाबदार आहेत कारण दिनांक 8 नोव्हेंबर, 2012 रोजी प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर 5 महिन्यानंतर सुध्दा निविदा अंतिम न केल्यामुळे निधी परत गेला. ई-टेंडरचे नोटिफिकेशन प्रसिध्द झाल्यानंतर त्यापूर्वी जुन्या पध्दतीने टेक्निकल व फायनाशियल पध्दतीने बीडस् काढत होते त्यात अशी अट किंवा सूचना होती की, सर्व टेंडर रद्दबातल ठरविण्यात यावेत व नव्याने ई-टेंडर काढण्यात यावे. नसल्यास सदर निविदा प्रक्रिया का रद्द करण्यात आली. असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जास्त पारदर्शकता आणण्यासाठी ई-टेंडर काढले असावे.

समितीचा ई-टेंडर काढण्याकरिता विरोध नाही. फक्त वेळेत प्रक्रिया पूर्ण का केली नाही. परिणामी विभागाला निधी सरेंडर करावा लागला. त्यामुळे या प्रकरणी जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करावी कारण हा निधी जनतेचा आहे. शासन जनतेसाठी निधी खर्च करीत असते. परंतु अधिकाऱ्यांनी वेळेवर कार्यवाही न केल्यामुळे मंजूर झालेली तरतूद सरेंडर केली जात असल्यास ही बाब योग्य नाही. असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले. यावर विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले की, एफडीए कमिशनर यांच्याकडून याबाबतची क्रोनॉलॉजी घेऊन समितीला नंतर स्पष्टपणे माहिती देण्यात येईल. या अनुषंगाने समितीने सुचित केले की, अधिकाऱ्यांची क्रोनॉलॉजी फक्त पेपरवर नको. जे यास जबाबदार आहे त्याच्यावर कारवाई करण्यात यावी.

विभागाने ४८ लाख ४० हजार रूपये सरेंडर केले आहेत, या संदर्भात स्पष्टीकरण देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, १३ व्या वित्त आयोगाचा १ कोटी रूपयांचा निधी मंजूर झालाहोता. विभागाने निविदा प्रक्रिया केली होती, ती रेग्यूलर टेंडर पध्दतीने करण्यात आली होती. जॉईं ट कमिशनरव्हिजिलन्स, एफडीए यांनी लक्षात आणून दिले की, ई-टेंडरिंग प्रोसेसच वापरावी लागेल. त्यामुळे अगोदरची प्रक्रिया जानेवारीमध्ये रद्द करण्यात आली. नव्याने ई-टेंडरिंग प्रोसेसप्रमाणे टेंडर मागविण्यात आले. त्यामुळे हा विलंब झाला आहे.

जुन्या पध्दतीप्रमाणे टेंडर काढले, नंतर ई-टेंडरिंग केले, त्यालाही एक महिना लावला अशा प्रकारे चर्चा समितीच्या मागील बैठकीत झाली होती. प्रि-बिडिंग बैठकीमध्येही आणखी बदल करण्यात आला. या संदर्भात विभागाचे काहीच नियोजन नाही. नोव्हेंबरपर्यंत विभागाने काहीच विचार केला नाही. एप्रिलमध्ये १ कोटी रूपये मिळाले. मात्र विभागाने नोव्हेंबरपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही. कोणतेही काम केले नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पहिल्यांदाच नवीन फूड लॅब मुंबईत करण्यात येत आहे.

या कामासाठीच विभागाने १ कोटी रूपयांचे नियोजन केले, बजेटिंग केले. मात्र नोव्हेंबरपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नाही. नोव्हेंबर महिन्यामध्ये जुन्या पध्दतीने टेंडर काढण्यात येते व जानेवारीला ई-टेंडरिंग करण्यात येते. जानेवारीमध्ये समितीची बैठक होते. या सर्व कार्यवाहीमध्ये उशिरच सुरू आहे. शेवटी विभागाला पैसे सरेंडर करावे लागले असे मत समितीने व्यक्त केले असता यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, विभागाने शासनाला ऑगस्टमध्ये प्रस्ताव सादर केला होता. फूड लॅब एस्टॅब्लिश करण्याची पहिलीच वेळ होती. फूड लॅबला लागणारे साहित्य फार तांत्रिक स्वरूपाचे असते. संबंधित अधिकाऱ्यांना तांत्रिक स्पेसिफिकेशन्सबद्दल तेवढी माहिती नव्हती. हे पहिलेच वर्ष होते, त्यामुळे हा थोडा विलंब झाला आहे. नोव्हेंबरमध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली, डिसेंबरमध्ये टेंडर काढण्यात आले. ई-टेंडरिंग करण्यात यावे अशा डायरेक्शन्स शासनाकडून वेळोवेळी येत असल्यामुळे पूर्वीची प्रक्रिया रद्द करण्यात आली. प्रक्रिया ऑगस्टपासूनच सुरू झाली होती. प्रत्यक्षात प्रक्रिया ऑक्टोबर पासून सुरु झालेली दिसतेशासनाकडून १ कोटी रूपयांची तरतूद एप्रिल महिन्यात झाली.

मूळ तरतूद होती की पुरवणी मागणी होती? कारण समितीला प्राप्त झालेले पेपर मूळ तरतुदीचे नाहीत. मूळ तरतूद आहे की, जुलै, डिसेंबर, मार्च या महिन्यांतील पुरवणी मागणी आहे. अशी विचारणा समितीने केली असा विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, हे १३ व्या वित्त आयोगाचे पैसे होते.

दिनांक ५ सप्टेंबर २०१२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. समितीला प्राप्त झालेला अभिलेख्यावरुन असे दिसते की, निधीची तरतूद जुलै महिन्यात पुरवणी मागण्यांद्वारे करण्यात आली होती. त्यानंतर ई-टेंडरिंगचा निर्णय जानेवारीमध्ये झाला आहे. त्यानंतर फेब्रुवारीमध्ये ई-निविदा अकाऊन्ट उघडण्यात आले व त्यानंतर फेब्रुवारीमध्येच जाहिरात देण्यात आली आहे. इत्यादी बाबी समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिल्या असता यासंदर्भात विभागीय सचिवांनी खूलासा केला की, विभागाला १ कोटी रूपये मंजूर होते. परंतु, सप्टेंबर महिन्यामध्ये एक कोटी रूपयांपेक्षा जास्त रकमेची प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यामुळे शासनाकडून सुधारित मान्यता ऑक्टोबरमध्ये प्राप्त झाली. सुरूवातीला १८ इन्स्ट्रुमेंटस घ्यावयाची होती पण नंतर अजून १० इनस्ट्रुमेंट घेण्याचे निश्चित करण्यात आले. यासंबंधातील सुधारित मान्यता ऑक्टोबरमध्ये मिळालेली आहे. त्यानंतर मग सर्व पक्रिया सुरू झालेली आहे. जुलै महिन्यात सप्लीमेंटरी झाल्यानंतर ऑगस्ट पासून प्रशासकीय मान्यता देण्याची प्रक्रिया शासनस्तरावर सुरू झाली होती. FDA कडून प्रस्ताव आल्यानंतर विभागाने ५ सप्टेंबर रोजी प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. सदर प्रशासकीय मंजुरी दिल्यानंतर काही इक्विपमेंटमध्ये बदल करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता ऑक्टोबर मध्ये देण्यात आली. त्यानंतर FDA स्तरावर टेंडरींगची कार्यवाही केलेली आहे. अंतिम मंजुरी पर्यंत जात असताना सह आयुक्त, दक्षता यांनी यासंबंधात ईटेंडरिंग प्रक्रिया करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आणून दिली. त्यामुळे विभागाने ई-टेंडरिंगची प्रक्रिया केली. त्यामुळे आधी केलेली प्रक्रिया पूर्णपणे रद्द करण्यात आली व डिसेंबर महिन्यामध्ये ई-टेंडरिंगची कार्यवाही सुरू केली व ती जानेवारीमध्ये पूर्ण केली. त्यामुळे विलंब झाला आहे. यामुळे निधी खर्च होऊ शकलेला नाही.

रूपये ५१ लाख ५९ हजार इतका निधी कसा काय खर्च झाला आहे ? अशी विचारणा समितीने केली असा विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, विभागाने १० इन्स्ट्रुमेंटचे टेंडरिंग केले होते. ३ इन्स्ट्रुमेंटमध्ये

तीन किंवा त्या पेक्षा जास्त टेंडर आले होते. उर्वरित इन्स्ट्रुमेंटसंबंधात एक किंवा शून्य टेंडर आले होते. त्यावेळी मुदतवाढ देता आली नाही. कारण ही प्रक्रिया मार्च पर्यंत लांबली. त्यामुळे३ किंवा त्यापेक्षा जास्त टेंडर आले होते तेवढ्यांची निविदा उघडून इन्स्ट्रुमेंटसची खरेदी करण्यात आली आहे. उर्वरित इन्स्ट्रुमेंटची खरेदी नंतरच्या वर्षात करण्यात आली आहे. टेंडरमध्ये एकूण ९ इक्विपमेंट खरेदी करावयाची होती. त्यापैकी ३ इक्विपमेंटसंबंधातील टेंडर प्रक्रिया पूर्ण झाली. कारण ३ पेक्षा जास्त निविदाधारकांनी त्यात भाग घेतला होता. त्यामुळे त्या तीन इक्विपमेंटसंबंधातील टेंडर प्रक्रिया फायनल करण्यात आली. उर्वरित सहा इक्विपमेंटसंबंधात किमान ३ निविदाधारकांच्या निविदा न आल्यामुळे व मार्च महिन्याची मर्यादा ओलांडल्यामुळेरि-टेंडरिंगची प्रक्रिया त्या वर्षी करण्यात आली नाही. विभागाच्या पातळीवर प्रामाणिक प्रयत्न झालेला आहे. परंतु, सदर निधी वेळेत खर्च न झाल्यामुळे सरेंडर करावा लागला आहे.

८० सर्वसाधारण, ८०० इतर खर्च, ८०० (००) (०१) अन्न औषधी द्रव्ये प्रशासनाची पुर्नरचना व अन्न व औषधी द्रव्ये चचाणी प्रयोग शाळा आस्थापना :-

अन्न औषधी द्रव्ये प्रशासनाची पुनर्रचना व अन्न व औषधी द्रव्ये चाचणी प्रयोग शाळा आस्थापना याअंतर्गत पुढच्या प्रकरणामध्ये आपण 25 लाख 76 हजार रुपये सरेंडर केल्याबाबत नमूद केले आहे. 1 कोटी रुपयांची डिमांड होती व विभागाने 25 लाख रुपये देखील खर्च करु शकले नाहीत, त्याबाबतची अधिक माहिती देताना विभागीय सचिव समितीला अवगत केले की, प्रत्यक्षात 80 लाख रुपये प्राप्त झाले आहेत व 74 लाख रुपयांचा खर्च झालेला आहे. 5.57 लाख रुपयांचे बिल ट्रेझरीला दिनांक 15 फेब्रुवारी पूर्वी सादर न झाल्याने नामंजूरकरण्यात आले. त्यामुळे सदरचा निधी अखर्चित राहिलेला आहे.

विहीत वेळेत बील सादर न करण्याची कारणे काय आहेत कारण विभागाने ज्या तारखेच्या अगोदर ट्रेझरीला बील सादर केले पाहीजे होते त्या तारखेस ते सादर केले नाही. अर्थसंकल्पामध्ये पैशाची तरतूद करुन घेण्यासाठी सर्वजण भांडत असतात. त्यानंतरही जर विभागाचे पैसे खर्च होत नसतील तर ती दुर्दैवाची बाब आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक 18 मार्च, 2013 रोजी बिल सादर केले होते. मात्र 15 फेब्रुवारी रोजी निर्बंध लागल्याने ते ट्रेझरीतून पास झालेले नाही. त्यामुळे ती अमाऊंट समर्पित करावी लागली.

विभागाने तरतूद झाल्यानंतर सुरुवाती पासून सर्व गोष्टी केल्या असत्या तर हे सर्व पैसे मिळाले असते. मात्र विभागाकडून शेवटी मार्चमध्ये हे काम करण्यात येते. विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद केले आहे की, दिनांक 18/3/2013 रोजी वातानुकुलित यंत्रे व रेफ्रिजरेटर करीता .5,46,000/- व गॅस कनेक्शन करीता .12,890/- चे देयक कोषागार कार्यालयास सादर केले होते. परंत, वित्त विभागाच्या परिपत्रक क्र.संकीर्ण-1000/ . .14/कोषा-4, दि.11/02/2000 अन्वये कोषागार कार्यालय नागपूर यांनी आक्षेप लावून सदर देयके परत केली. जे नवीन सर्क्युलर निघाले असेल त्यात अकाऊंटिंग सिस्टमच्या काही रकान्यात बदल केला असेल. सबमिशनचा जुना प्रोफार्मा रद्द करुन नवीन लावला असेल. अशी बिले परत केल्याने काही चांगली कामे अडकली तर याला काही अर्थ आहे काय, विभाग अशाप्रकारे कॉन्झर्व्हेटिरित्या काम का करण्यात येते. विभागाने तरतूद झाल्यानंतर सुरुवातीपासून सर्व गोष्टी केल्या असत्या तर हे सर्व पैसे मिळाले असते. मात्र विभागाकडून हे शेवटी मार्च महिन्यामध्ये करण्यात येते असे मत समितीने व्यक्त केले.

या सर्व हेडस मध्ये एकूण 14 कोटी 95 लक्ष 99 हजार रुपये सरेंडर झालेले आहेत. त्यामुळे विभागाचे उत्तर समितीला समर्पक वाटत नाही. पुनर्विनियोजन केले असे लिहून दिले तर समिती ते मान्य करेल असे नाही. महालेखाकांराकडून तपासून (vetting) झाल्यानंतर विभागाचे उत्तर लोकलेखा समितीकडे आलेला आहे. Surrender of funds of Rs.1495.99 lakhs under the above mentioned subheads in March 2013 was due to less expenditure than anticipated and based on the revised estimates sanctioned by the Finance Department. एका बाजूला एका हेडमध्ये 18 लक्ष 56 हजार रुपये जास्तीचे खर्च केलेले आहेत, दुसऱ्या ठिकाणी 14 कोटी 95 लक्ष रुपये सरेंडर केलेले आहेत आणि समितीला असे सांगण्यात येते की, हे सर्व पुनर्विनियोजन आहे. विभागाने स्पष्टपणे असे नमूद केले की, "मार्च, 2000 अखेर प्रक्रिया पूर्ण करण्यात तांत्रिक अडचणी आल्यामुळे" याचा अर्थ मार्चपर्यंत प्रक्रिया करायची नाही आणि मार्चमध्ये सांगायचे की, तांत्रिक अडचण आहे, विभागीय सचिव म्हणून या गोष्टीचे समर्थन करता काय ? कारण यामध्ये अकाऊंटिंग डिसीप्लीन, वर्क डिसीप्लीन नाही. यातून एक गोष्ट वारंवार लक्षात येते की, विभागाला किती वेळात काम करायचे याला बंधन नाही. समितीच्या बैठका होतात. त्यांना समिती आपले मत व्यक्त करते

पण विभागाकडून मात्र त्यावर अंमलबजावणी होत नाही. विभागाकडून परत पूर्वी सारखीच कामे करण्यात येतात. एकंदरीत ही यंत्रणा कशासाठी आहे ? जबाबदारी ही (अकाऊंटिबिलीटी) सर्वांची आहे. विभागातील कर्मचाऱ्यांना कर्तव्यातील कसुरीवर पडदा टाकण्याचा प्रयत्न होत असेल तर तो काही तितका समर्थनीय नाही. असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

या मुद्दासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, नागपूर येथीलअन्नचाचणी प्रयोगशाळेकरिता १.०० कोटी रूपये मंजूर झाले होते. परंतु ८०.०० लाख रूपयेच रिलीज झाले. त्यापैकी रूपये ७४ लाख २३ हजार इतका निधी खर्च झाला आहे तर रूपये ५ लाख ७६ हजार इतका निधी अखर्चित राहिला आहे. तो शासनास समर्पित करण्यात आला आहे. विभागाने हे बिल ट्रेझरीला दिले होते. परंतु, त्यांनी सन २००० चा शासन निर्णयाचा आधार घेतला आहे. यात १५ फेब्रुवारीच्या आत सर्व देयके सादर केली पाहिजेत असे नमूद केलेले आहे. कोषागार कार्यालय, नागपूर यांनी हे कारण देऊन३० तारखेला देयक रिजेक्ट केलेले आहे.

सन २००० चा शासन निर्णय विभागास माहीत नव्हता काय, त्या जी.आर.नुसार वेळेवर देयक सादर का केले नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, नागपूर येथील अन्न चाचणी प्रयोगशाळेकरिता सन २०१२-१३ मध्ये परवानगी मिळाली होती. रूपये ८०.०० लाख रकमेतील रूपये ६०.०० लाख सार्वजनिक बांधकाम विभागाला अंतर्गत कामकाजासाठी वर्ग करण्यात आले होते. त्यांच्याकडून अंतर्गत कामकाज करण्याचे काम होते. ते काम झाल्यानंतरच रूपये ५ लाख ७६ हजार लाखामध्ये गॅस कनेक्शन, रेफ्रिजरेटर, वातानुकूलित लावावयाचे होते. त्यांच्याकडून इलेक्ट्रीफिकेशनचे काम पूर्ण होत नव्हते तो पर्यंत आपल्याला सदर यंत्रे बसविता येत नव्हती. त्यामुळे त्याची खरेदी झालेली नाही. सदर खरेदी ही पुढच्या आर्थिक वर्षात करण्यात आली आहे. दिनांक १८.३.२०१३ रोजी वातानुकूलित यंत्रे रेफ्रिजरेटर व गॅस कनेक्शनचे देयक कोषागार कार्यालयास सादर करण्यात आले आहे. तथापि, १५ फेब्रुवारीच्या आत सर्व देयके सादर करावीत असा वित्त विभागाचा शासन निर्णय आहे.

ही सर्व खरेदी फेब्रुवारी नंतरची आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ही ऑर्डर आधी देण्यात आली होती. परंतु बिल जनरेशन हे नंतर झाले आहे.

सदर खरेदी ही १५ फेब्रुवारी पूर्वीची आहे की, नंतरची आहे, जुनी खरेदी असले तर विभागाने वेळेवर देयक सादर केले पाहिजे. १५ फेब्रुवारी नंतरची खरेदी असेल तर समिती विभागाचे म्हणणे मान्य करेल असे मत समितीने व्यक्त केले असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदर खरेदी ही १५ फेब्रुवारीच्या आधी झाली नव्हती. त्यामुळे विभागाला हे बिल पास करून घेता आले.

अभिप्राय

7.3 101 आयुर्वेद (00) (06) शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे बळकटीकरण व दर्जावाढ या योजनेअंतर्गत 50 लाख रुपयांची मूळ तरतूद करण्यात आली होती. त्यातील .37.48 लाख एवढा प्रत्यक्षात खर्च दाखविलेला असून .53 हजार अधिकचा खर्च दाखविलेला असून .13.05 लाख प्रत्यार्पित केल्यासंदर्भात महालेखाकारांनी आक्षेप नोंदविलेले आहेत. सदरहु परिच्छेदावर समितीसमोर चर्चा करताना असे निदर्शनास आणण्यात आले की, एकूण तरतूद ही .50 लाखाची असून त्यावर वित्त विभागाकडून निधी कपात झाल्यामुळे विभागाला केवळ .40 लाख प्राप्त झाले. त्यापैकी .37.48 लाख एवढा निधी खर्च झाला असून उर्वरित .3.05 लाख अधिक निधी कपात झालेले .10 लाख असे एकूण .13.05 लाख वर्षअखेरीस प्रत्यार्पित करण्यात आले. परंतु सन 2011-12 या आर्थिक वर्षातील उस्मानाबाद, आयुर्वेदिक महाविद्यालयासाठी देण्यात आलेला परंतु व्यपगत झालेला धनादेश .53 हजार हा सन 2011-12 नव्हेतर सन 2012-13 या वर्षात महालेखाकार, नागपूर यांनी खर्ची दाखविल्यामुळे हा अधिकचा खर्च दिसून येतो. परंतु या खर्चाची ट्रान्स्फर एन्ट्री महालेखापाल, नागपूर यांना देण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आणण्यात आले.

शिफारस

7.4 या लेखा शिर्षाअंतर्गत मुळ तरतूद ही .50 लाखाची असून त्यास वित्त विभागाने लावलेल्या निधी कपातीमुळे विभागास . 40 लाख प्राप्त झाले व त्यातील .37.48 लाख खर्च करुन उर्वरित .3.05 अधिक कपात केलेले .10 लाख असे एकूण .13.05 लाख एवढी रक्कम विभागाने प्रत्यार्पित केली. असे असताना . 53 हजार हा अधिक खर्च झाल्याचे महालेखाकार यांच्या आक्षेपात नमूद असून उस्मानाबाद आयुर्वेदिक महाविद्यालयासाठी सन 2011-12 या वर्षी देण्यात आलेला धनादेश .53 हजार हा त्या वर्षात व्यपगत झाल्यामुळे तो सन 2012-13 या वर्षी खर्ची दाखविण्यात आल्यामुळे हा अधिकचा खर्च दिसून येत असल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. सदरहू प्रकरण हे आर्थिक

बेशीस्तीचे व अनियमिततेचे असून अत्यंत अयोग्य पध्दतीने व वित्तीय नियमांचे उल्लंघन करुन हाताळण्यात आल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. वित्तीय नियमांप्रमाणे सन 2011-12 मध्ये जर निधी अखर्चित राहिला तर तो आर्थिक वर्ष अखेरीस प्रत्यार्पितच करावा लागतो व आगामी नविन वर्षासाठी प्राप्त नविन तरतूदीमधून तो खर्च करावा लागतो. असे असतानाही सन 2011-12 चा धनादेश हा सन 2012-13 च्या तरतूदीमधून वटविण्यात आला. एवढेच नव्हेतर अशाप्रकारे जर आगामी आर्थिक वर्षात हा निधी विभागाला नियमानुसार खर्च करता येत असेल तर त्यांनी हा .53 हजाराचा निधी खर्ची दाखवून उर्वरित निधी प्रत्यार्पित करणे आवश्यक असतानाही प्रथम निधी प्रत्यार्पित करुन देणे व नंतर हा खर्च केल्याचे दाखविल्यामुळे हा अधिकचा खर्च असल्याचे आक्षेप महालेखाकारांकडून घेण्यात येणे. वास्तविक सदरहु स्पष्टीकरण महालेखाकारांसमोर लेखापरिक्षणाच्या वेळी करणे आवश्यक असताना विभागाने ते न केल्यामुळे हा आक्षेप नोंदविला गेला. हा संपुर्ण घटनाक्रम विभागांतर्गत लेखापरिक्षण व्यवस्था ही अतिशय कमकुवत व अकार्यक्षम असल्याचे समितीचे मत आहे. वित्तीय लेख्यांच्या व त्याच्या ताळमेळाच्या प्राथमिक ज्ञानाचा अभाव समितीला दिसून येत असून ही बाब आर्थिक शिस्तीला अनुसरुन नसणारी व वित्तीय नियमांचे उल्लंघन करणारी आहे. अत: या प्रकरणी संबंधितांवरजबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी. नियमित लेखापरिक्षण करुन ताळमेळाचे काम विहित मुदतीत अंतिम करण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस 3 महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

2) अभिप्राय

7.6 105 (00) (37) शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये आणि यंत्रसामुग्री यांचे बळकटीकरण व दर्जावाढ या लेखाशिर्षांतर्गत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधक, मुंबई संचालनालयास त्यांच्या अधिपत्याखाली शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये आणि यंत्रसामुग्री यांचे बळकटीकरण आणि दर्जावाढीकरीता सन 2012-13 या वित्तिय वर्षासाठी . 60 कोटी इतके मुळ अनुदान मंजूर करण्यात आले होते व पुरवणी मागणी .3 कोटी घेण्यात आले असून एकूण अनुदान रुपये 63 कोटी रुपये आहे त्यापैकी रुपये 49 कोटी 23 लाख 98 हजार इतके यंत्रसामुग्रीखरेदीकरीता खर्च केले असून रुपये 13 कोटी 87 लाख 58 हजार परत केले असताना रुपये 11.56 लाख या अधिक खर्च का झाला असा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे. सदरहु विषयात मुळ तरतूद,

झालेला खर्च व प्रत्यार्पित निधी या रकमेचा ताळमेळ बरोबर दर्शविण्यात आलेला असून फक्त .11.56 लाखाचा अतिरिक्त खर्च दाखविण्यात आलेला आहे, त्याबाबतचा प्रश्न समितीसमोर प्रलंबित राहतो. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, .11.56 लाखाचा जास्तीचा खर्च झालेला नसून ही रक्कम बी.डी.एस. वर उपलब्ध झालेली होती व ती खर्च देखील झालेली होती. तत्कालिन अधिष्ठाता पातळीवर एवढ्या रकमेची खरेदी झालेली असून तो खर्च रिकन्सीलीएशनमध्ये महालेखाकारांना तत्कालिन संस्थेकडून कळविण्यात आलेला नसल्यामुळे हा खर्च अतिरिक्त झाल्याचे दिसून येते. कोणत्याही परिस्थितीत हा तरतूदीपेक्षा जास्त खर्च नाही. तरतूदीमधीलच खर्च बी.डी.एस.वर उपलब्ध झाला व त्यामुळेच ते देयक अदा करण्यात आले व त्यास कोषागार कार्यालयाची मान्यता देखील असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. यावर समितीने ही .11.56 लाखाची रक्कम कोणत्या शिर्षाखाली प्रदान करण्यात आली, कारण पूर्ण अखर्चित रक्कम अगोदरच प्रत्यार्पित करण्यात आल्यामुळे निधीच शिल्लक नव्हता अशी विचारणा समितीने केली असता दि.28 मार्च पर्यंत हा ताळमेळ करण्यात आल्यानंतर उर्वरित दोन दिवसांच्या कालावधीमध्ये हा निधी खर्च झालेला असल्यामुळे व तो लेख्यांमध्येन दर्शविण्यात आल्यामुळे ही अडचण झालेली असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस

7.7 शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये आणि यंत्रसामुग्री यांचे बळकटीकरण आणि दर्जावाढीकरीता सन 2012-13 या वित्तिय वर्षासाठी .60 कोटी इतके मुळ अनुदान मंजूर करण्यात आले होते व पुरवणी मागणी .3.00 कोटी घेण्यात आली असून एकूण अनुदान .63.00 कोटी रुपये आहे त्यापैकी .49,23,98,000/- इतके यंत्रसामुग्री खरेदीकरीता खर्च केले असून .13,87,58,000/- परत केले असताना .11.56 लाख एवढा अधिकचा खर्च झाल्याचे दिसून येते. सदरहु प्रकरणी अधिक चिकित्सा केली असता हा अधिकचा खर्च नसून मुळ तरतूदीमधूनच झालेला खर्च असून केवळ या खर्चाबाबतची अद्ययावत माहिती आर्थिक वर्षाअखेरपर्यंत महालेखाकार कार्यालयास कळविण्यात न आल्यामुळे लेख्यांचा ताळमेळ जुळू शकला नाही असे आक्षेप नोंदविण्यात आले. ही .11.56 लाखाची देयके दि.30 मार्च, 2013 रोजी मंजूर झालेली असून संचालनालयाने दि.28/3/2013 रोजीच खर्चाचा ताळमेळ पूर्ण करुन महालेखाकारांना कळविल्यामुळे दि.30 मार्चच्या खर्चाची बाब यात समाविष्ट होवू शकली नाही. त्यामुळे हा अधिकचा खर्च दिसून येत असल्यामुळे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. ही बाब

प्रशासकीय स्तरावरुन आर्थिक बेशिस्तीची असून विभागाने आर्थिक वर्षात झालेल्या खर्चाचे रिकन्सीलीएशन करुन आर्थिक वर्षाअखेरीस तो महालेखाकार कार्यालयाला कळविणे बंधनकारक असतानाही या प्रकाराकडे विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे व पूर्ण खर्चाची रक्कम समाविष्ट न करता अगोदरच महालेखाकारांना कळविल्यामुळे महालेखाकारांनी हे आक्षेप नोंदवून ते छाननीसाठी समितीसमोर आले. या संदर्भात सर्व संबंधितांवरजबाबदारी निश्चित करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस 3 महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय -

7.8 105 (00) (38) शासकीय दंतमहाविद्यालयाचे बळकटीकरण आणि दर्जावाढ या लेखाशिर्षांतर्गत संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधक मुंबई संचालनालयास त्यांचे अधिपत्याखाली शासकीय दंत महाविदयालय व रुग्णालय आणि यंत्रसामुग्री यांचे बळकटीकरण आणि दर्जावाढीकरीता सन 2012-13 या वित्तिय वर्षासाठी एकूण .75.00 लाख इतके मूळ अनुदान मंजूर करण्यात आले होते. अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीनुसार .53.80 लाख एवढे अनुदान प्राप्त झाले असून त्यापैकी .53.79 लाख खर्च झाले असून .1000/- एवढी बचत झाल्याचे व .21.20 लाख निधी विभागाने पुनर्विनियोजित केल्यासंदर्भातील आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेला आहे. उर्वरित रक्कम वित्त विभागाने लावलेल्या कपातीमुळे बी.डी.एस. वर उपलब्ध होवू शकली नसल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस

7.9 **उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत विभागास मंजूर अनुदानापैकी जी रक्कम प्राप्त झाली ती संपुर्ण खर्च झालेली असून उर्वरित रक्कम वित्त विभागाने लावलेल्या निधी कपातीमुळे विभागास प्राप्त होवू शकली नसून ती बी.डी.एस. वर उपलब्ध न झाल्यामुळे अखर्चित राहिली. त्यामुळे ती तांत्रिकदृष्ट्या प्रत्यार्पित केल्याचे दर्शविण्यात आले. वित्त विभाग निधीच्या उपलब्धतेनुसार तसेच परिस्थितीनुसार वेळोवेळी निधीची आर्थिक कपात करीत असते व अशा कपातीसंदर्भात वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करुनच ही कपात करण्यात येत असतानाही सदरहु प्रकरणी केवळ बी.डी.एस. वर निधी उपलब्ध झाला नाही, त्यामुळे त्यास वित्त विभागाने निधी कपात केल्याचे गृहीत धरुन विभागाकडून पुढे निधी मिळविण्याची कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे. मंजूर अनुदानाची रक्कम अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर प्राप्त झाली नाही याचा अर्थ सदर अनुदान रक्कम कपात केली आहे असा होत नाही. यामध्ये मूळ तरतूद पूर्णत:**

वितरीत झाली नाही तर त्यासाठी विभागाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. अर्थसंकल्पातील मूळ अनुदानाची संपूर्ण रक्कम विभागास एकाचवेळी प्राप्त होत नाही. त्यामध्ये प्रथम 80 टक्क्यापर्यंत रक्कम वितरीत केला जातो व कपात नसेल तर उर्वरित निधी टप्प्याटप्प्याने वितरीत केला जातो. विभागाने उर्वरीत रक्कमेसाठी मागणी करणे आवश्यक असतानाही त्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. वित्त विभागाने मंजूर केलेली रक्कम बीडीएसवर नसल्यामुळे विभागाने सदर निधी खर्च केला नाही असे विभागाचे म्हणणे आहे. तर विभागाला अर्थसंकल्पात मंजूर असलेली पूर्ण रक्कम मिळालेली आहे असे महालेखाकारांचे म्हणणे आहे. विभाग व महालेखाकार यांच्या खुलाशात असलेली तफावत विचारात घेऊन विभागास संपूर्ण मंजूर अनुदान का खर्च करता आले नाही व सदर रक्कम बीडीएसवर का दिसली नाही आणि सदर रक्कम प्रत्यार्पित का केली आहे. तसेच हा निधी कपात आहे की अन्य कारणास्तव निधी अखर्चित राहिला याबाबतची संपूर्ण माहिती विभागाने महालेखाकार यांच्याशी समन्वय साधून तीन महिन्याच्या आत समितीस देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय -

7.10 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार प्राप्त अनुदानातून यंत्र सामुग्रीची खरेदी या लेखाशिर्षाअंतर्गत वित्तीय वर्ष 2012-13 मध्ये अन्य चाचणी प्रयोग शाळा, मुंबई याकरीता .1.00 कोटी रुपयाचा निधी देण्यात आला होता. यापैकी .51.60 लाख रक्कमेची खरेदी झाली असून उर्वरित रक्कम .48.40 लाख अखर्चित राहिल्याबाबतचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. सदरहु निधी अखर्चित राहण्याची कारणे समितीने विचारली असता 13 व्या वित्त आयोगाचा .1.00 कोटी निधी विभागाला मंजूर करण्यात आला होता. हा निधी जुलै महिन्यातील अधिवेशनात पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून विभागाला प्राप्त झालेला असून ऑगस्ट यासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यास सप्टेंबरमध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली. यात सुरुवातीला 18 इन्स्ट्रुमेंटस् घ्यायचे निश्चित झालेले असताना त्यात आणखी 10 इन्स्ट्रुमेंट वाढविण्यात आल्यामुळे त्यास सुधारीत प्रशासकीय मान्यता ऑक्टोबर मिळाली. निविदा अंतिम मंजूरीसाठी जात असतानाच सहआयुक्त, दक्षता यांनी यासंबंधात ई-निविदा प्रक्रिया केली नसल्याचे आक्षेप घेतले. त्यामुळे आधी केलेली प्रक्रिया पूर्णपणे रद्द करुन डिसेंबरमध्ये ई-निविदेची कार्यवाही सुरु केली. त्यासाठी ई-निविदा खाते उघडून निविदा मागविण्यासाठीची कार्यवाही जानेवारीमध्ये पूर्ण झाली. यात 10 इन्स्ट्रुमेंटची निविदा मागविण्यात आली होती. 03 इन्स्ट्रुमेंटसाठी 03 पेक्षा जास्त निविदा प्राप्त झाल्या होत्या.

परंतु उर्वरित इन्स्ट्रुमेंट संदर्भात एक किंवा शुन्य निविदा प्राप्त झाल्या. त्यावेळी मुदतवाढ देता आली नाही कारण त्यावेळी ही प्रक्रिया मार्चपर्यंत लांबली. अशा परिस्थितीत ज्यामध्ये जास्त निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यांची खरेदी करण्यात आली व उर्वरित यंत्रांचीखरेदी नंतरच्या आर्थिक वर्षात करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस

7.11 **शासन निर्णय . संकीर्ण/प्र.क्र.73/11/औ-2, (1सी), दिनांक 08.11.2012 अन्वये अन्न व औषध चाचणी प्रयोगशाळेसाठी अत्याधुनिक उपकरणे खरेदी करण्यासाठी .1.00 कोटी निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली. त्यापैकी .51.60 लाखाची खरेदी झाली असून उर्वरित रक्कम .48.80 लाख शासनास समर्पित करण्यात आली. यंत्र खरेदीसाठी निधी मंजूर होण्यापासून ते निविदा अंतिम होणेपर्यंत जवळजवळ 8 ते 9 महिन्यांचा कालावधी लागल्यामुळे व अंतिमत: एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे ही खरेदी होवू शकली नाही असे विभागीय सचिवांकडून सांगण्यात आले. वास्तविकत: आर्थिक वर्षामध्ये प्राप्त तरतूद खर्च करण्याकरीता केवळ एकच वर्षाचा कालावधी उपलब्ध असताना यात निविदा प्रक्रिया कधी सुरु करावी व ती किती कालावधीत पूर्ण करावी याची कालमर्यादा असतानाही अशापध्दतीने निविदा प्रक्रिया विभागीय स्तरावरुन राबविण्यात येते. परिणामी तरतूद असलेल्या निधीचा कोणताही उपयोग विभागाला करता येत नाही. विभागीय स्तरावरुन प्रशासकीय दिरंगाईमुळे जनतेच्या सोयी-सुविधांसाठी प्राप्त निधी हा संपुर्ण आर्थिक वर्षात अखर्चित राहणे व वर्षअखेरीस तो प्रत्यार्पित करण्यात येणे ही बाब अत्यंत आक्षेपार्ह असून ज्या उद्दिष्टासाठी निधीची तरतूद करण्यात आली त्या उद्दिष्टपूर्तीमध्ये बाधा आणणारी आहे. समिती या कार्यपध्दतीबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अत: या प्रकरणी सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात यावी व भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व तरतूद निधीचा विहित मुदतीत पुर्ण उपयोग करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस 3 महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

महिला व बालविकास विभाग

8.1 भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. एक्स-२ "सचिवालय-सामाजिक सेवा" या शीर्षाअंतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

(रुपये हजारात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
प्रधान शीर्ष 2251 सचिवालय-सामाजिक सेवा दत्तमत- मूळ 2,61,68 पूरक 2 वर्षभरात परत करण्यात आलेली रक्कम (मार्च, 2013)	2,61,70	2,67,08	+5,38 11,01

टिपा व भाष्ये :-

(1) अनुदानामधील रु.5.38 लाख इतका अतिरिक्त खर्च हा (रु.5,38,485 लाख इतका प्रत्यक्ष अधिक खर्च) नियमात बसविणे आवश्यक आहे.

(2) अंतिम अधिक खर्च लक्षात घेता परत केलेली रु.11.01 लाख एवढी रक्कम अनावश्यक होती.

(3) अनुदानापेक्षा अधिक खर्च खालीलप्रमाणे झाला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर आक्षेपाच्या अनुषंगाने असे स्पष्ट करण्यात येते की, सन 201213 या वर्षी प्रधान शीर्ष 2251 सचिवालय सामाजिक सेवा अंतर्गत वेतन+ईगव्हर्नन्स या अंतर्गत देण्यात आलेली रक्कम एकत्रित दाखविण्यात आलेली होती. यावर्षी विभागातील काही अधिकारी/कर्मचारी यांची सहाव्या वेतन आयोगाची अनुज्ञेय असलेली (सन 2009 पासून देय असलेली) थकबाकीची रक्कम अदा करण्यात आली. त्यामुळे यावर्षी वेतनावर रक्कम रु.5,38,485 इतका

अतिरिक्त खर्च झाला आहे. तसेच प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीकोनातून माहिती तंत्रज्ञान विभागाने ई-गव्हर्नन्सची अंमलबजावणी करण्यासाठी विभागातील योजना व योजनांतर्गत तरतूदीच्या अर्धा टक्का इतक्या निधीची तरतूद करावी, असा सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 10.6.2010 अन्वये निर्णय घेतला होता. त्यानुसार सन 2012-13 या वर्षामध्ये रक्कम रु.11.00 लाख एवढा निधी उपलब्ध झाला होता. तथापि, सदर योजना नविन असल्यामुळे व या योजनेंतर्गत राबवावयाचा प्रकल्प निश्चित न झाल्यामुळे उक्त निधीचा वापर त्यावर्षी होऊ शकला नाही.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
2251 सचिवालय-सामाजिक सेवा 090 सचिवालय 090 (01) (01) महिला व बालविकास विभाग पूरक 2,50.68 पूरक 0.01	2,50.69	2,67,08	+16.39

टिपा व भाष्ये :-

रु.16.39 लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे मागवून देखील कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, 2013)

वरील टीप 3 मध्ये नमूद करण्यात आलेला अधिक खर्च खालील बचतीव्दारे अंशत:प्रतिसंतुलित करण्यात आला.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

2251 या मुख्य लेखाशिर्षाखाली मुळ रु.25068000/- इतकी तरतूद प्राप्त झाली होती. पुरवणी मागणीव्दारे .1000/- इतकी तरतूद प्राप्त झाल्यामुळे एकूण रु.25069000/- इतकी तरतूद प्राप्त झालीी. विभागातील

अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी तसेच वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती, स्वग्राम/महाराष्ट्र दर्शन रजा प्रवास सवलत, अतिरिक्त कार्यभाराचे विशेष वेतन याच्या परिणामी रु.1639485/- एवढा अधिक खर्च झाला आहे. सदरचा अधिक खर्च नियमानुकूल करावा, हि विनंती.

(रुपये लाखात)

शीर्ष	**एकूण अनुदान**	**प्रत्यक्ष खर्च**	**अधिक खर्च (+) बचत (-)**
2251 सचिवालय-सामाजिक सेवा 090 सचिवालय 090 (02) (01) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी मूळ 11.00 पुनर्विनियोजन (-) 11.00	--	--	--

टिपा व भाष्ये :-

मार्च, 2013 मध्ये परत करण्यात आलेल्या रु.11 लाख एवढ्या निधीची कारणे मागवून देखील कळविण्यात आलेली नाहीत. (ऑगस्ट, 2013)

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात महिला व बालविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर आक्षेपाच्या अनुषंगाने असे स्पष्ट करण्यात येते की, राज्याचे प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीकोनातून माहिती तंत्रज्ञान विभागाने ई-गव्हर्नन्सची अंमलबजावणी करण्यासाठी विभागातील योजना व योजनांतर्गत तरतूदीच्या अर्धा टक्का इतक्या निधीची तरतूद करावी, असा सामान्य प्रशासन विभागाने दिनांक 10.6.2010 अन्वये निर्णय घेतला होता. त्यानुसार सन 2012-13 या वर्षामध्ये रक्कम रु.11.00 लाख एवढा निधी उपलब्ध झाला होता. तथापि, सदर योजना नविन असल्यामुळे व या योजनेंतर्गत राबवावयाचा प्रकल्प निश्चित न झाल्यामुळे उक्त निधीचा वापर त्यावर्षी होऊ शकला नाही.

साक्ष :-

8.2 उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे समितीने दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी सचिव, महिला व बालविकास विभाग यांची साक्ष घेतली.

प्रधान शीर्ष २२५१ सचिवालय सामाजिक सेवा ०९ सचिवालय ०९० (०१) (०२) महिला व बालविकास विभाग, ०९० (०२) (०१) ई-गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी :-

सन २०१२-२०१३ या वर्षी प्रधानशीर्ष २२५१ "सचिवालय सामाजिक सेवा अंतर्गत" ई-गव्हर्नन्स प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ११ लाख रुपये एवढा निधी उपलब्ध झाला होता. परंतु खर्च झाला नाही म्हणून आणि परत केले. योजनेचे कसलेही नियोजन नसताना हे पैसे का घेतले असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, ई-गव्हर्नन्सची अंमलबजावणी करण्यासाठी ११ लाख रुपयांचे नियोजन केले होते, परंतु तो निधी सन २०१२-१३ मध्ये खर्च न झाल्यामुळे प्रत्यार्पित केलेले आहेत. कारण ही नवीन योजना असल्यामुळे या योजनेचे स्वरूप काय आहे, त्या योजनेची अंमलबजावणी कशी करायची, हे त्यावेळेला विभागाला समजले नाही. सदरची योजना कशी राबवायची यासंदर्भात वारंवार बैठका झाल्या, परंतु त्या योजनेचे स्वरुप निश्चित होऊ शकले नाही म्हणून सदरहू योजनेसाठीचा निधी प्रत्यार्पित केला. परंतु पुढील वर्षापासून ई-गव्हर्नन्सच्या प्रकल्पास सुरुवात झाली. ई-गव्हनर्न्सची वेबसाईट मेन्टेन करणे, त्या वेबसाईटवरील माहिती अद्यावत करणे, वेगवेगळ्या योजनांचे संगणीकरण करणे, पब्लिकमध्ये प्रसिध्दी देणे या बाबी विभागाने सुरु केलेल्या आहेत. अर्धा टक्का निधी ई-गव्हर्नन्ससाठी खर्च करावयाचा आहे. सदरचे काम सुरळितपणे सुरु आहे.

प्रधान शीर्ष २२५१ सचिवालय सामाजिक सेवा, ०९० (०१) (०१) महिला व बालविकास विभाग या अंतर्गत १६ लाख ३९ हजार रुपये जास्त खर्च झालेला आहे. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यावेळेस नव्याने वेतन आयोग लागू झाला होता. त्यावेळी

कर्मचारी/अधिकाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाचा एरिअर्स द्यायचा होता. वैद्यकीय प्रतिपूर्तीचा खर्च यावर ही रक्कम खर्च झालेली आहे. सहाव्या वेतन आयोगाचे हप्ते द्यावयाचे असल्यामुळे १६०३९ लाख रुपये जास्तीचा खर्च झालेला असून तो उपरोक्त शिर्षाखाली केलेला आहे. प्लॅनसाठी ११ लाख रुपये आणि नॉन प्लॅनसाठी १६.३९ लाख रुपये जास्तीचा खर्च केलेला आहे व ११ लाख १ हजार रुपये परत केलेले आहेत.

नॉन प्लॅनमध्ये जास्तीचा पैसा खर्च केला आहे काय? ई-गव्हर्नन्ससाठी ११ लाख रुपये मिळाले आणि ११ लाख १ हजार रुपये परत केले असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता याबाबत विभागीय सचिवांनी नमूद केले की, एक हजार रुपये ही प्लॅनमधील तरतूद होती.

सहाव्या वेतन आयोगाचे पैसे विभागाला द्यावे लागणार आहेत त्यादृष्टीने पुरवणी मागण्यांमध्ये निधीची मागणी का केली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या निधीचा विनियोग पुढील आर्थिक वर्षात केलेला आहे.

प्लॅनचे ११ लाख रुपये आणि १६ लाख रुपये नॉन प्लॅनचे ही रक्कम एकत्रित करता येत नसल्याचे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, प्लॅनची आणि नॉन प्लॅनची रक्कम एकत्रित करण्यात आली नाही. परंतु पुढील आर्थिक वर्षात जास्त खर्च झाल्यामुळे तो विनियोग केलेला आहे, instead of combining it with the permission of Planning and Finance department.

प्लॅनची आणि नॉन प्लॅनची रक्कम आवश्यकता असल्यास विनियोजीत करता येते. परंतु त्यासाठी नियोजन आणि वित्त विभागाची परवानगी घ्यावी लागते ही बाब समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, we will keep this for future reference. We will follow this route in the future course of action.

अभिप्राय व शिफारशी :-

8.3 मागणी क्र.एक्स-2 **"2251 सचिवालय सामाजिक सेवा"** या लेखाशिर्षांतर्गत 090 सचिवालय 090 (02) (01) ई- गव्हर्नन्स प्रकल्पाची अंमलबजावणी यामध्ये 11 लाख रुपयांची मुळ तरतूद करण्यात आली होती. ती संपूर्णतरतूद सरेंडर करण्यात आल्याचा आक्षेप महालेखाकारांनी नोंदविला आहे.

8.4 राज्याचे प्रशासन अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्याच्या दृष्टिकोनातून माहिती तंत्रज्ञान विभागाने ई-गव्हर्नन्सची अंमलबजावणी करण्यासाठी विभागातील योजना व तरतुदीच्या अर्धा टक्का इतक्या निधीची तरतूद करुन ई- गव्हर्नन्स योजना सुरु करावी असे दिनांक 10/6/2010 च्या निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाने इतर विभागांना कळविले होते.

8.5 महिला व बाल विकास विभागाने ई- गव्हर्नन्स बाबतचे शासनाचे उद्येश लक्षात घेऊन सन 2012-13 या वर्षात 11 लाख रुपयांची तरतूद केलेली होती. ई- गव्हर्नन्स योजनेच्या अंमलबजावणीसाठी महिला व बालविकास विभागाकडे कोणतेही नियोजन नव्हते. योजनेचे स्वरुप काय आहे त्याची अंमलबजावणी कशी करायची याबाबत विभागाने माहिती जाणून घेण्याचा प्रयत्नही केलेला दिसून आला नाही व त्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्याचा तसेच विभागात संगणकाचे ज्ञान असलेल्या व्यक्तीच्या ज्ञानाचा फायदाही करुन घेतलेला दिसत नाही. **आजच्या काळात महिला व बाल विकास विभागात संगणकाचे ज्ञान असलेले व संगणकासंबंधी शिक्षण घेतलेले अनेक अधिकारी व कर्मचारी असतील असे असताना सचिवांनी साक्षीच्यावेळी समितीस सांगितले की, नवीन योजना असल्यामुळे या योजनेचे स्वरुप काय आहे त्या योजनेची अंमलबजावणी कशी करायची हे विभागास समजत नव्हते. त्यामुळे विभागाने ई- गव्हर्नन्स प्रकल्पाची सुरुवात केली नाही. सचिवांनी दिलेले हे कारण समितीस संयुक्तिकवाटत नाही. ई- गव्हर्नन्सची वेबसाईट नीट सुरु करणे, त्या वेबसाईटची**

माहिती अदयावत ठेवणे, वेगवेगळया योजनांचे संगणकीकरण करणे, त्याची प्रसिध्दी करणे इत्यादी बाबी विभागाने आता सुरु केल्या आहे. या सर्व बाबी विभाग सन 2012-13 मध्ये सुध्दा सुरु करु शकत होते. त्यासाठी त्यांनी विभागात संगणकाचे शिक्षण घेतलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा वापर करणे किंवा बाहयस्त्रोतीकरणाच्या (oursourcing) माध्यमातून सेवा घेवून कार्यवाही करणे अपेक्षित होते. एकंदरीतच निधी प्राप्त असूनही केवळ नियोजनाच्या कामामुळे हा निधी अखर्चित राहिला या सर्व बाबी विचारात घेता जाणीवपूर्वक व निष्काळजीपणे ई- गव्हर्नन्स या योजनेकडे दुर्लक्ष केले व निधीचा विनियोग योग्य प्रकारे केला नाही त्यामुळे याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी तसेच या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट - अ

बुधवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०१६

लोकलेखा समिती

लोकलेखा समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.४५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री.हरीभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री.योगेश सागर, वि.स.स.

(९) श्री.सत्यजित पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१०) श्री.वैभव नाईक, वि.स.स.

(११) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(१२) श्री.वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१३) श्री.राजेश टोपे, वि.स.स.

(१४) श्री.भास्कर जाधव, वि.स.स.

(१५) श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स.

(१६) श्री.अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

(१७) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री.श्री.चु.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्रीमती सायंतानी जाफा, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :-

पदुम विभाग :-

(१) श्री.बिजयकुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग

(२) श्री.आर.जी.कुलकर्णी, आयुक्त, दुग्धविकास विभाग

(३) श्री.गायकवाड, आयुक्त, मत्स्यव्यवसाय विकास विभाग

(४) श्री.कांतीलाल उमाप, आयुक्त, पशुसंवर्धन विभाग

(५) डॉ.चव्हाण डी.एम, सह आयुक्त, पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती औं ध

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. डी-९, डी-१०, डी-११ संदर्भात पशुसंवर्धन,दुग्धविकास व मत्स्यव्यसाय (पशुसंवर्धन व मत्स्यव्यसाय) विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६

लोकलेखा समिती

लोकलेखा समितीची बैठक गुरुवार, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.०५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री.हरीभाऊ जावळे, वि.स.स.

(४) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री.योगेश सागर, वि.स.स.

(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(८) श्री.अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

(९) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री.श्री.चु.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्री.राजदीप सिंह, महालेखाकार

वित्त विभाग :-

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :-

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग :

१) श्रीमती मेधा गाडगीळ, अपर मुख्य सचिव

२) श्री.शिनगारे, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन

सार्वजनिक बांधकाम विभाग :-

(१)श्री.आशिषकुमार, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

(२) श्री.चंद्रशेखर जोशी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान .एस-४ संदर्भात अपर मुख्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व अनुदान क्र. एच-३, एच-४ व एच-५ संदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभागयांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१६

लोकलेखा समिती

लोकलेखा समितीची बैठक गुरुवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी१२.३० वाजता सुरुहोऊन दुपारी२.१५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(४) श्री. शंभुराजदेसाई, वि.स.स.

(५) श्री.सत्यजित पाटील-सरुडकर, वि.स.स.

(६) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

(७) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री.श्री.चु.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्री.शिवराज धुप्पे, उप महालेखाकार

वित्त विभाग :-

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :-

(१) श्री.सुधीर श्रीवास्तव, अतिरिक्त मुख्य सचिव, राज्य उत्पादन शुल्क, परिवहन व बंदरे विभाग

(२) व्ही.राधा, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क

(३) श्री.प्रविण गेडाम, आयुक्त, परिवहन

(४) श्री.विद्याधर मालेगांवकर, वि.का.अ., परिवहन

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान .बी-२ संदर्भात अपर मुख्य सचिव, गृह विभाग व आयुक्त, राज्य उत्पादन शुल्कयांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६

लोकलेखा समिती

लोकलेखा समितीची बैठक मंगळवार, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरु होऊन दुपारी ३.५५ वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री.हरीभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(८) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(९) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(१०) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री.श्री.चु.श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :-

ग्रामविकास विभाग (मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) :-

श्री.वि.रा.नाईक, सचिव (मुमंग्रासयो), ग्रामविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान . एल-७ संदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना) विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.२० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(४) श्री.कालिदास कोळंबकर, वि.स.स.

(५) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(1) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(2) श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :-

श्री.जमादार, प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान . जे-१ संदर्भात प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(७) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(८) श्री.वसंतराव चव्हाण, वि.प.स.

(९) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(१०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(११) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(1) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(2) श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्री.राजदीप सिंह, महालेखाकार, नागपूर कार्यालय

वित्त विभाग :-

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :-

१) श्रीमती मालिनी शंकर, अपर मुख्य सचिव, महसुल (मदत व पुनर्वसन) विभाग

२) श्री.सी.पी.जोशी, सार्वजनिक बांधकाम विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान . एच-६, एच-७, एच-८ व एच-९ संदर्भात अपर मुख्य सचिव, महसुल (मदत व पुनर्वसन), व सचिव सार्वजनिक बांधकामविभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ४ जानेवारी, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.३० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.संजय केळकर, वि.स.स.

(३) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(४) श्री.जयंत पाटील, वि.प.स.

(५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(६) श्री.संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(1) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(2) श्री.श्री.चु.श्रीरंगम तथा नि.अ.

(3) श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :-

श्री.सुधीर श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, गृह विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान . बी-१० संदर्भात अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १८ जानेवारी, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरु होऊन साय. ४.३० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री.हरीभाऊ जावळे, वि.स.स.

(५) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(८) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(९) श्री.वसंतराव चव्हाण, वि.प.स.

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(११) श्री. संजय दत्त, वि.प.स.

<u>महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय</u>

(1) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(2) श्री.श्री.चु.श्रीरंगम तथा नि.अ.

(3) श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्री.डी.के.शेखर, उप महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :-

<u>वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग :</u>

१) श्री.राजकुमार देवरा, प्रधान सचिव,

२) श्री.प्रविण शिनगारे, संचालक वैद्यकीय शिक्षण

<u>गृहनिर्माण विभाग :</u>

१) श्री.झेंडे, उपाध्यक्ष म्हाडा तथा सचिव (अतिरिक्त कार्यभार)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान . एस-४ संदर्भात प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग व सचिव गृहनिर्माण यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २४ जानेवारी, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २४ जानेवारी, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दु. २.३० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री.हरीभाऊ जावळे, वि.स.स.

(४) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री.संजय केळकर, वि.स.स.

(६) श्री.भास्कर जाधव, वि.स.स.

(७) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(1) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(2) श्री.श्री.चु.श्रीरंगम तथा नि.अ.

(3) श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्री.डी.के.शेखर, उप महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :-

१) श्रीमती वनीता सिंघल, सचिव , महिला व बालविकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान . एक्स-२ संदर्भात सचिव, महिला व बाल विकास विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ३१ मे, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ३१ मे, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दु. २.०० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.हरीभाऊ जावळे, वि.स.स.

(३) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(४) श्री.संजय केळकर, वि.स.स.

(५) श्री.सत्यजित पाटील-सरुडकर, वि.स.स.

(६) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(७) श्री.राजेश टोपे, वि.स.स.

(८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(९) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(1) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(2) श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री. व्ही.गिरीराज, प्रधान सचिव, वित्त विभाग

साक्षीदार :-

श्री.सुधीर श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, गृह विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान . बी-१० संदर्भात अपर मुख्य सचिव, गृह विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक १३ जुलै, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक १३ जुलै, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दु.१२.०० वाजता सुरु होऊन दु.२.०० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री.योगेश सागर, वि.स.स.

(४) श्री.अनिल बोंडे, वि.स.स.

(५) श्री.प्रशांत ठाकुर, वि.स.स.

(६) श्री.सुरेश गोरे, वि.स.स.

(७) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(1) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(2) श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान . क्यु-३ गृहनिर्माण विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे सायं. ४.०० वाजता सुरु होऊन सायं.६०० वाजता स्थगित झाली.

उ प स्थि ती

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य

(२) श्री.शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री.प्रशांत ठाकुर, वि.स.स.

(४) श्री.संजय केळकर, वि.स.स.

(५) श्री.राजेश टोपे, वि.स.स.

(६) श्री.संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(1) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(2) श्री.सोमनाथ सानप, अवर सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान बी-२, बी-१० गृह विभाग, अनुदान क्र. डी-९, डी-१०, डी-११, पदुम विभाग, एच-३ ते एच-९ सार्वजनिक बांधकाम विभाग, अनुदान क्र.जे-१ विधी व न्याय विभाग, अनुदान क्र. एल-७ ग्रामविकास व जलसंधारण विभाग (जलसंधारण), एस-४ वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, अनुदान क्र. एक्स-२ महिला व बालविकास या विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई